# संविधान निर्मितीची प्रक्रिया

## घटनात्मक विकास

**❊ 1773 : नियामक कायदा (Regulating Act) :**

- ब्रिटिश शासनाकडून सत्तेच्या केंद्रिकरणाची सुरुवात.
- ब्रिटिश शासनाने (संसद) भारतातील ईस्ट इंडीया कंपनीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी उचललेले पहिले पाऊल.
- बंगालचा गव्हर्नर हा बंगालचा गव्हर्नर जनरल बनला. (पहिला : लॉर्ड वॉरेन हेस्टिंग्ज)
- मुंबई व मद्रासचे गव्हर्नर (जे की अगोदर स्वतंत्र होते) याच्याच नियंत्रणाखाली आले.
- गव्हर्नर जनरलच्या मदतीसाठी 4 सदस्यांचे कार्यकारी मंडळ नेमले
- 1774 : कलकत्ता येथे सर्वोच्च न्यायालय स्थापन (1 मुख्य व 3 इतर न्यायाधीश)

A) कंपनी कर्मचाऱ्यांनी खाजगी व्यापार करण्यावर बंदी घातली तसेच स्थानिकांकडून भेटवस्तू व लाच स्विकारण्यावर पण बंदी घालण्यात आली.

**❊ 1784 : पीट्सचा इंडिया ॲक्ट (Pitt's India Act):**

- भारतातील कंपनीचा कारभार ब्रिटीश शासनाच्या नियंत्रणाखाली आणला.

1) ईस्ट इंडिया कंपनीच्या कार्याचे विभाजन करण्यात आले : व्यापारी आणि राजकीय स्वरूपाचे कार्य

- व्यापारी कार्याचे व्यवस्थापन : कंपनीकडेच
- राजकीय कारभाराचे व्यवस्थापन : नियामक मंडळाकडे (ब्रिटनच्या संसदेकडे) (दुहेरी शासन पद्धती प्रस्थापित)
- याद्वारे कंपनीच्या प्रतिनिधी मंडळावर (Board of Director) नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रिटीश कॅबिनेटचे प्रतिनिधीमंडळ (Board of Control) नेमण्यात आले.
- भारतातील कंपनीचे संपूर्ण लष्करी व नागरी अधिकार व प्रशासन इंग्लंड सरकारच्या नियंत्रणाखाली आले.

B) या कायद्यास सेटलमेंट कायदा असेही म्हणतात.

- **या कायद्यामुळे दोन ठळक बाबी निदर्शनास आल्या :**

- भारतातील कंपनीचे क्षेत्र हे 'ब्रिटिशांच्या ताब्यातील क्षेत्र' असे संबोधले गेले.
- भारतातील कंपनीच्या व्यवहारांवर ब्रिटिश सरकारचे सर्वोच्च नियंत्रण प्रस्थापित झाले.

**❊ 1813 चा सनदी कायदा (Charter Act) :**

- ईस्ट इंडीया कंपनीची भारतातील व्यापाराची मक्तेदारी संपुष्टात आली (चहा व अफू सोडून)

**❊ 1833 चा सनदी कायदा :**

- याद्वारे सत्तेचे केंद्रिकरण पूर्ण झाले.
- कंपनीचे व्यापारी कार्य संपुष्टात आणण्यात आले.
- बंगालचा गव्हर्नर जनरल भारताचा गव्हर्नर जनरल बनला. (पहिला : विल्यम बेंटींग)
- या कायद्याने पहिल्यांदाच ब्रिटीशांच्या ताब्यातील संपूर्ण प्रदेशावर एक केंद्रीय शासन निर्माण झाले.
- मुंबई आणि मद्रास प्रांतातील गव्हर्नरचे कायदे करण्याचे अधिकार काढून हे अधिकार भारताच्या गव्हर्नर जनरल यांना देण्यात आले.
- पूर्वीच्या कायद्यानुसार बनवलेले कायदे हे नियम (Regulations) मानले जात तर नवीन कायद्यानुसार केलेल्या कायद्यांना कायदे (Act) संबोधण्यात येऊ लागले.
- ईस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी कार्य संपुष्टात आल्याने ती फक्त एक प्रशासनिक संस्था म्हणून कार्य करू लागली.
- कंपनीतील नागरी सेवांकरिता मुक्त स्पर्धात्मक पद्धतीचा प्रयत्न स्वीकारला गेला परंतु त्याला विरोध होताच ही तरतूद रद्द करण्यात आली.
- आग्रा प्रांत निर्माण.

**❊ 1853 चा सनदी कायदा :**

- गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलचे दोन विभाग केले :
  - कार्यकारी विभाग
  - कायदेविभाग (विधिमंडळ : Legislative Council)
- कायदेविभाग हेच पुढे केंद्रीय विधीमंडळ म्हणून काम करू लागले. (कामकाज : ब्रिटीश संसदेच्या पद्धतीनुसार)
- ब्रिटीश संसदेने कंपनीच्या राजवटीचा कार्यकाल वाढवला परंतु या अगोदर केलेल्या कायद्याप्रमाणे या कार्यकालाला कालमर्यादा निश्चित केलेली नव्हती.
- पहिल्यांदाच केंद्रीय विधीमंडळात स्थानिक प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद : 6 कायदे सदस्यांपैकी 4 स्थानिक प्रांतातून (सरकारांकडून) (मुंबई, बंगाल, मद्रास आणि आग्रा) येथून नियुक्ती-1854.
- नागरी सेवा भरतीसाठी खुली स्पर्धेचे नियोजनाची तरतूद (मेकॉले समितीचा अहवाल : 1856)

Dilip Sir's STEP UP Academy

### ❋ 1858 चा भारत सरकारचा कायदा :

- पार्श्वभूमी : 1857 च्या उठावाची
- कंपनीची भारतातील सत्ता संपुष्टात आली.
- ही सत्ता इंग्लंडच्या राजपदाकडे हस्तांतरित झाली. (म्हणजेच भारताचा कारभार राणीच्या नावाने चालविण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली.)
- बोर्ड ऑफ कंट्रोल आणि बोर्ड ऑफ डिरेक्टर्स बरखास्त (दुहेरी शासन पद्धत रद्द)
- भारतातील प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी इंग्लंडच्या मंत्रीमंडळात भारतमंत्री हे पद निर्माण झाले.
- भारतमंत्र्यांना मदतीसाठी : 15 सदस्यीय : इंडिया कौन्सिल निर्माण.
- भारतमंत्री ब्रिटिश संसदेस जबाबदार
- भारताचा गव्हर्नर जनरल हा भारताचा व्हाईसरॉय बनला (पहिला व्हॉइसरॉय : लार्ड कॅनिंग)
- यानुसार इंडिया कौन्सिलला एक व्यक्ती म्हणून स्थान प्राप्त झाले. त्यामुळे हे भारतात व भारताबाहेरही कोणावरही खटले दाखल करू शकत होते. आणि यावरही कोणतीही व्यक्ती खटले दाखल करू शकत होती.

### ❋ 1861 : भारतीय कौन्सिल कायदा :

- सत्तेच्या विकेंद्रिकरणाला सुरुवात
- लॉर्ड कॅमिगने 1859 ला खाते विभागणी सुरु केली त्या खाते विभागणी (Portfolio System) ला मान्यता (भारतात मंत्रीमंडळ (Cabinet) पद्धतीचा पाया घातला)
- प्रथमच व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात कायदेविषयक कामासाठी काही भारतीयांची बिनसरकारी सभासद म्हणून नेमणूक (प्रथमच विधिमंडळात भारतीय प्रतिनिधित्त्व)
- कौन्सिलमधील अशासकीय सदस्य. बनारसचा राजा, पतियाळाचे महाराज आणि सर दिनकर राव
- या कायद्याने मुंबई व मद्रास प्रांतांना स्वतःसाठी कायदा करण्याचा, त्यासाठी बदल करण्याचा अधिकार परत देण्यात आला. (परंतु यांच्या कायद्याला व्हाईसरॉयची संमती आवश्यक)
- या कायद्यानुसार बंगाल (1862), वायव्य प्रांत (1866) आणि पंजाब (1897) मध्ये प्रांतीय कायदेमंडळे स्थापन
- व्हाईसरॉयला आणीबाणीच्या स्थितीत कायदेमंडळाच्या परवानगीशिवाय अध्यादेश (Ordinance) काढण्याचा अधिकार दिला. असा अध्यादेश जास्तीत जास्त 6 महिने चालू शकत होता.

### ❋ 1892 चा भारतीय कौन्सिल कायदा :

- मध्यवर्ती कायदेमंडळाच्या सभासद संख्येत वाढ
- प्रांतिक कायदेमंडळाच्या सभासद संख्येत वाढ (परंतु दोन्हीकडेही शासकीय सदस्यांचे बहुमत होते.)
- कायदेमंडळाच्या सदस्यांना अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचे व सार्वजनिक हिताच्या बाबींवर प्रश्न विचारण्याचे अधिकार दिले. (परंतू उपप्रश्न विचारण्याचे अधिकार नाही)
- तसेच भारतीय सदस्यांना ठराव मांडण्याचाही अधिकार नव्हता.
- केंद्रीय कायदेमंडळातील 5 गैर सरकारी सदस्यांची निवड चार प्रांतांची कायदेमंडळे व कलकत्त्याचे व्यापार मंडळ हे करत.
- प्रांतीय कायदेमंडळात ही निवड नगरपालिका, जिल्हामंडळ, विश्वविद्यालय आणि व्यापार मंडळ ह्यांच्याकडून होत. (निवडणूक अप्रत्यक्ष : निर्वाचित सदस्याला nominated मानले जाते.)
- या कायद्यात 'निवडणूक' हा शब्द कटाक्षाने टाळण्यात आला.

### ❋ 1909 चा मोर्ले-मिंटो सुधारण कायदा :

- भारतमंत्र्यांच्या मंत्रीमंडळात हिंदी सभासद
  1) बंगाल महसूल बोर्डाचे सभासद : के.जी.गुप्ता
  2) हैदराबादच्या निजामचे सल्लागार : सय्यद हुसेन बिलग्रामी यांची नेमणूक
- व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात पहिले (कायदा सदस्य) हिंदी सभासद : बंगालचे वकील : एस.पी.सिन्हा
- अरूंडेल समीती : राजकीय सुधारणाबाबत
- केंद्र व प्रांतात कायदेमंडळातील सभासद संख्येत वाढ केली. (केंद्रिय विधीमंडळात सदस्य संख्या 16 वरून 60 करण्यात आली.)
- मध्यवर्ती कायदेमंडळात सरकारी सभासदांचे बहुमत कायम
- प्रांतात बिनसरकारी सभासदांचे बहुमत दाखवण्यापूरते निर्माण केले.

**केंद्रीय कायदेमंडळ**

सभासद : 60

- सरकारी : 28
- बिनसरकारी : 32
  - सरकार नियुक्त : 5
  - लोकनियुक्त : 27

Dilip Sir's STEP UP Academy

**मुंबई प्रांत**

46 : सभासद
- सरकारी : 18
- बिनसरकारी : 28
  - सरकार नियुक्त : 7
  - लोकनियुक्त : 21

- प्रथमच धर्मनिहाय प्रतिनिधित्व मान्य-मुस्लीमांना स्वतंत्र मतदारसंघ. ('स्वतंत्र मतदारसंघ' संकल्पना मान्य)
- सांप्रदायिक मतदारसंघाचा जनक - लॉर्ड मिंटो.
- कायदेमंडळातील सदस्यांना नवीन ठराव, उपप्रश्न विचारणे, कर्ज किंवा करांबाबत ठराव मांडण्याचा, अर्थसंकल्पावर ठराव मांडणे, सदस्यांना पूरक प्रश्न विचारण्याचा अधिकार देण्यात आले (हा ठराव सरकारवर बंधनकारक नव्हता)
- या कायद्याद्वारे कायदेमंडळातील सदस्य

1) सरकार नियुक्त
2) अप्रत्यक्ष निवडणूक
3) मुस्लिम प्रतिनिधी व नगर मंडळ, विद्यापीठ, चेंबर ऑफ कॉमर्स, जमिनदार यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष निवडणूकीने निवडून देण्याची तरतूद (स्वतंत्र प्रतिनिधीत्व).

- या कायद्यात 'निवडणूक' या तत्त्वाचा उल्लेख.

## ✻ 1919 चा मोंटग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा :

- केंद्रात दोन गृहे प्रस्थापित झाली. (द्विगृह : Bicameral)

1) केंद्रिय कनिष्ठ सभा (Central Legislative Assembly) : सदस्य : 145
2) वरीष्ठ सभा (Council of State) : सदस्य : 60

- लोकप्रतिनिधींचे दोन्ही सभागृहात बहुमत तसेच दोन्ही गृहांचे बहुतांश सदस्य थेट निवडणूकीतून निवडून येण्याची तरतूद या कायद्यामध्ये करण्यात आली होती.
- मुसलमान, शीख, युरोपियन, अँग्लो इंडियन यांना कायद्याने स्वतंत्र मतदार संघ बहाल केले.
- केंद्रीय आणि प्रांतिक स्तरांवर विषयांची विभागणी करून प्रांतांना त्यांच्या विषयांवर कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला.
- मतदानाचा अधिकार वार्षिक 10 हजार रुपये उत्पन्न असणारे व त्यावर आयकर देणारे किंवा किमान 750 रु. वार्षिक भूमीकर देणारे किंवा शिक्षण या आधारावर व्यक्ती मतदानास पात्र होते.
- केंद्रीय मंत्रीमंडळाला प्रांताविषयी कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला.
- गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळातून अंदाजपत्रक कनिष्ठ सभेत मांडले जाईल, त्यावर सभासद चर्चा करतील, मतदान करतील परंतू संरक्षण खर्च, राजकीय बाबी, सनदी अधिकाऱ्यांचे पगार, कर्जाचे व्याज यावर सभासदांना मतदान करता येणार नाही. पहिल्यांदाच प्रांतांचे अर्थसंकल्प केंद्रिय अर्थसंकल्पापासून वेगळे करून प्रांतिय विधीमंडळांना मांडण्याचे अधिकार देण्यात आले.
- प्रांतात द्विदल राज्यपद्धती (Dyarchy)

| राखीव विषय<br>Reserved Subject | सोपीव विषय<br>Transfered Subject |
|---|---|
| ↓ | ↓ |
| प्रांतीय गव्हर्नर व त्याचे कार्यकारी मंडळ (विधिमंडळाला उत्तरदायी नव्हते.) (पोलीस, जमीन महसूल, न्याय अशी खाती) | मंत्री (विधिमंडळाला उत्तरदायी होते.) (स्था.स्व.संस्था, आरोग्य, शिक्षण अशी खाती) |

मात्र हा प्रयोग बऱ्यापैकी अयशस्वी ठरला.

- इंग्लंडमध्ये उच्चायुक्त (हायकमीशनर) पद तयार करून भारतमंत्र्यांची काही त्याच्याकडे कामे सोपवली.
- कायदेमंडळात स्त्रियांना सदस्यत्व नव्हते.
- भारतमंत्र्यांचा पगार इंग्लंडच्या तिजोरीतून देण्यात येणार तर उच्चायुक्तांचा पगार भारताच्याच तिजोरीतून.
- प्रांतीय कायदेमंडळांना विधान परीषद (Legislative Council) म्हटले गेले. यांची निवडणूक प्रत्यक्ष पद्धतीची होती.
- केंद्रातील विधानसभेची मुदत 3 वर्षे होती व त्यात स्त्रीयांना मतदानाचा अधिकार होता.
- 1926 : केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्थापना (ली कमिशनची शिफारस 1923-24)

> हा कायदा 1921 साली अंमलात आला. या कायद्यातच अशी तरतूद होती की हा कायदा लागू झाल्यापासून याची अंमलबजावणी कशी झाली यासाठी दहा वर्षांनी एक आयोग नेमण्यात येईल.

## ✻ 1935 चा भारत सरकार कायदा :

- या कायद्यासाठी खालील मसुदे वापरले.

Dilip Sir's STEP UP Academy

1) सायमन आयोग अहवाल 1930 : मुख्य शिफारसी घोषणा - 1927

- दुहेरी शासनव्यवस्था रद्द करावी.
- प्रांतामध्ये जबाबदार शासनपद्धती असावी.
- ब्रिटीश भारत आणि संस्थानांचे संघराज्य स्थापन करावे.
- धर्मानुसार मतदारसंघ पद्धती पुढेही सुरू ठेवावी.

2) नेहरू अहवाल

3) गोलमेज परीषदांमधील चर्चा

4) श्वेत पत्रिका (White Paper)

5) लोथिअन अहवाल (निवडणूकांबाबत)

- **या कायद्यातील तरतूदी :**

**एकूण कलमे 321 व 10 परिशिष्ट्ये -**

1) संघराज्य पद्धतीचा स्वीकार : संस्थानांवर संघराज्यात सामील होण्याची सक्ती नव्हती, परंतु नंतरही सामील झाल्यावर त्यांना अंतर्गत स्वायत्तता राहणारच होती.

2) प्रांतीय स्वायत्तता : द्वीदल राज्यपद्धती नष्ट

- प्रांतातील सर्व खाती लोकप्रतिनिधींकडे : म्हणजेच प्रांतामध्ये जबाबदार शासन पद्धती सुरू केली गेली.
  (1937 साली सुरू झालेली ही पद्धती 1939 साली रद्द केली गेली.)

3) केंद्रात राखीव व सोपीव अशी खात्यांची वाटणी

- केंद्रात द्वीदल राज्यपद्धती (प्रत्यक्षात आली नाही.)

4) राज्यकारभाराची वाटणी : केंद्रीय, प्रांतीय व संयुक्त सुचीत

- केंद्राचे विषय (59), प्रांताचे विषय (54), समवर्ती विषय (36). परंतु शेषाधिकार व्हाईसरॉयकडेच.

5) 11 पैकी 6 प्रांतांमध्ये द्विगृह कायदेमंडळाची तरतूद होती. त्यानुसार बंगाल, बाम्बे, मद्रास, बिहार, आसाम आणि संयुक्त प्रांतात विधानपरिषद आणि विधानसभा अस्तित्वात आली, परंतु यांच्यावर अनेक बंधने होती.

6) स्वतंत्र मतदारसंघाची विस्तारणी : दलित वर्ग, महिला कामगार यांच्यासाठीही तरतूद.

7) भारतीय रिझर्व्ह बँक स्थापण्याची तरतूद.

8) संघराज्य लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग तसेच संयुक्त लोकसेवा आयोग स्थापण्याची तरतूद.

9) संघराज्य कोर्ट स्थापन : 1937

10) 10% लोकांनाच मतदानाचा अधिकार

11) भारत मंत्र्यांचे इंडीया कौन्सिल रद्द

12) भारत मंत्र्याला सल्ला देणारे सल्लागार नियुक्त केले.

13) सिंघ व ओरीसा प्रांत स्वतंत्र करावेत. प्रत्यक्षात (1938 ला स्वतंत्र)

## ※ भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा : 1947

स्वातंत्र्याचे विधेयक ब्रिटिश संसदेत मांडले : 4 जुलै 1947

इंग्लंडच्या राजाची मान्यता : 18 जुलै 1947

कायद्याचा अंमल : 15 ऑगस्ट 1947

- भारत एक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र घोषित.
- भारताचा व्हाईसरॉय व भारतमंत्री पद रद्द.
- भारतातील संस्थानांना भारतात / पाकिस्तानात सामील होण्याची किंवा स्वतंत्र राहण्याची मुभा.
- भारताचा गव्हर्नर जनरल आणि प्रांतांचे गव्हर्नर यांना घटनात्मक (नाममात्र) राष्ट्रप्रमुख घोषित केले.
- यांना मंत्रीमंडळाचा सल्ला बंधनकारक केला.
- लॉर्ड मॉऊंटबॅटन स्वतंत्र भारताचा पहिला गव्हर्नर जनरल बनला आणि 1946 साली स्थापन करण्यात आलेली संविधान सभा भारताचे कायदेमंडळ बनले.
- याची दोन कामे :
  1) स्वतंत्र भारताची राज्यघटना बनवणे.
  2) देशासाठी सर्वसाधारण कायदे बनवणे.
- घटना समिती अध्यक्ष : डॉ. राजेंद्र प्रसाद.
- कायदेमंडळ संस्था सभापती : जी. व्ही. माळवणकर
  (घटना समिती विधिमंडळ म्हणून पहिल्यांदा 17 नोव्हेंबर 1947 रोजी भरली. तेव्हाच यांची सभापती म्हणून निवड केली.)
- पाकिस्तानची निर्मिती झाल्यावर मुस्लिम लीगचे सदस्य घटना समितीतून बाहेर पडले तेव्हा घटना समितीची सदस्य संख्या 299 झाली. (प्रांत : 229, संस्थाने : 70)

## ※ अंतरीम सरकार (1946) :

- अंतरिम सरकारमधील सदस्य हे गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य होते.

- **त्यांची यादी पुढीलप्रमाणे :**

| क्र. | सदस्य | खाते |
|---|---|---|
| 1) | जवाहरलाल नेहरू | परराष्ट्र व्यवहार आणि राष्ट्रकुल संबंध |
| 2) | सरदार वल्लभभाई पटेल | गृह, माहिती व नभोवाणी |
| 3) | डॉ. राजेंद्रप्रसाद | अन्न व कृषी |
| 4) | डॉ. जॉन मथाई | उद्योग व पुरवठा |

Dilip Sir's STEP UP Academy

| | | |
|---|---|---|
| 5) | जगजीवन राम | श्रम |
| 6) | सरदार बलदेव सिंग | संरक्षण |
| 7) | सी. एच. भाभा | बांधकाम, खाणी आणि ऊर्जा |
| 8) | लियाकत अली खान | वित्त |
| 9) | अब्दुर रब निश्तार | डाक व हवाई |
| 10) | असफ अली | रेल्वे व वाहतूक |
| 11) | सी. राजगोपालाचारी | शिक्षण व कला |
| 12) | आय. आय. चुंद्रीगर | वाणिज्य |
| 13) | गझनफर अली खान | आरोग्य |
| 14) | जोगिंदर नाथ मंडल | कायदा |

※ **स्वतंत्र भारताचे पहिले मंत्रिमंडळ (1947) +** संविधान सभाच पुढे स्वतंत्र भारताची पहिली संसद बनली.

- **याची प्रमुख सदस्यांची यादी पुढीलप्रमाणे** :

| क्र. | सदस्य | खाते |
|---|---|---|
| 1) | जवाहरलाल नेहरू | पंतप्रधान, परराष्ट्र, व्यवहार व राष्ट्रकुल संबंध, वैज्ञानिक संशोधन |
| 2) | सरदार वल्लभभाई पटेल | गृह, माहिती व नभोवाणी राज्ये (संस्थाने) |
| 3) | डॉ.राजेंद्रप्रसाद | अन्न व कृषी |
| 4) | मौलना अबुल कलाम आझाद | शिक्षण |
| 5) | डॉ.जॉन मथाई | रेल्वे व वाहतूक |
| 6) | आर.के. षण्मुगम चेट्टी | वित्त |
| 7) | डॉ.बी.आर. आंबेडकर | कायदा |
| 8) | जगजीवन राम | श्रम |
| 9) | सरदार बलदेव सिंग | संरक्षण |
| 10) | राजकुमारी अमृत कौर | आरोग्य |
| 11) | सी.एच. भाभा | वाणिज्य |
| 12) | रफी अहमद किडवाई | संचार |
| 13) | डॉ.श्याम प्रसाद मुखर्जी | उद्योग व पुरवठा |
| 14) | व्ही.एन. गाडगीळ | बांधकाम, खाणी व ऊर्जा |

Dilip Sir's STEP UP Academy

# भारतीय संविधान (राज्यघटना)

**❊ भारतीय राज्य घटनेची निर्मिती प्रक्रिया (Making of Indian Constitution)**

- महात्मा गांधीनी 1922 साली 'यंग इंडिया'त म्हटले होते की, ''भारताचे स्वराज्य ही ब्रिटीश संसदेने दिलेली भेटवस्तू असणार नाही.''
- 1924 मध्ये मोतीलाल नेहरू यांनी केंद्रीय विधिमंडळात, ''भारतासाठी एक संविधान असावे'' अशी मागणी केली.
- 1927 मध्ये काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात काँग्रेस कार्यकारणीने ''भारतासाठी संविधानाचा आराखडा तयार करावा'' अशी मागणी केली.
- 1928 मध्ये मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारतासाठीच्या घटनेची मूलतत्त्वे (Basic principle) निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली. आपले संविधान निर्माण करण्यासाठी भारतीयांनी केलेला हा पहिला प्रयत्न होता.
- डिसेंबर 1929 मध्ये लाहोर येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात 'संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव' पारित करण्यात आला आणि घटना समितीची निर्मिती ही काँग्रेसची महत्त्वाची मागणी बनली.
- 1940 मध्ये ब्रिटिश सरकारने प्रथमतः 'ऑगस्ट घोषणे'द्वारा भारतीय घटनानिर्मितीसाठी घटना समिती असावी हे अप्रत्यक्षपणे मान्य केले.
- 1942 च्या 'क्रिप्स मिशन'ने स्वतंत्र भारताचे संविधान निर्माण करण्याची जबाबदारी संपूर्णतः भारतीयांचीच असेल हे मान्य केले.
- 1946 च्या **कॅबिनेट मिशनच्या शिफारशींनी भारताची घटना समिती तयार करण्याची पध्दत ठरली.**

  Cabinet Mission चे सदस्य - पॅथिक लॉरेन्स, स्टॅफर्ड क्रिप्ट्स व ए. व्ही. अलेकझांडर. योजना - 16 मे 1946 ला प्रसिद्ध.

**❊ कॅबिनेट मिशनच्या शिफारशींप्रमाणे :**

1) प्रत्येक प्रांताच्या (Provinces) वाट्याला त्या प्रांताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व द्यावे.
2) प्रत्येक प्रांताच्या वाट्याला आलेल्या प्रतिनिधी संख्येची वाटणी तेथे वास्तव्य करणाऱ्या प्रमुख जमातींमध्ये (ST) जमातीच्या संख्येच्या प्रमाणात करावी.
3) त्या-त्या जमातींच्या लोकांनी आपले प्रतिनिधी निवडावेत.
4) संस्थानांचेही (Princely states) प्रतिनिधित्व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाटले जावे. त्यांची निवडणूक कशी करायची हे संबंधित संस्थानिकांच्या सल्ल्याने ठरवावे.
5) या दृष्टीने मुस्लिम बहुसंख्येचे प्रांत, हिंदू बहुसंख्येचे प्रांत आणि दोन्ही जमातींची समान संख्या असलेले प्रांत (सर्वसाधारण प्रांत) अशा तीन गटांत प्रांतांचे विभाजन केले जावे.
6) त्या प्रतिनिधींनी आपापल्या गटातील प्रांतांसाठी प्रथम संविधान तयार करावे आणि मग संपूर्ण देशाचे संविधान बनवावे.
7) प्रत्येक समुदायाचे प्रतिनिधी प्रांतिक विधीमंडळातील त्या समुदायाच्या सदस्यांनी निवडून द्यायचे होते. ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पद्धतीने एकल संक्रमणीय मतदान तत्वानुसार होती.

- कॅबिनेट मिशन योजनेनुसार घटना समितीत एकूण 389 सदस्यांची निवड केली जाणार होती.

  त्यांपैकी प्रांतांचे 296 (292 : 11 प्रांतातून; 4 उच्च आयुक्तांचे प्रदेश (दिल्ली, अजमेर-मारवाड, कुर्ग, बलुचिस्तान)) तर संस्थानिकांचे 93 प्रतिनिधी निवडले जाणारे होते.
- साधारणपणे 10 लाख लोकसंख्येस एक सदस्य संविधान सभेमध्ये निवडून गेला. एकूण जागांपैकी 208 जागा काँग्रेसने जिंकल्या, 73 जागा मुस्लीम लीगला मिळाल्या आणि बाकी 15 जागा इतर पक्षांच्या वाट्याला आल्या.
- **कम्युनिस्ट पक्ष, युनियनिस्ट पक्ष, कृषक प्रजा पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, युनियनिस्ट मुस्लिम पक्ष, युनियनिस्ट शेड्युल्ड कास्ट पक्ष, शिख (गैर काँग्रेस) पक्ष,** यांना प्रत्येकी 1 जागा मिळाली, तर 8 जागेवर अपक्ष उमेदवार (Independent) निवडून आले.
- एकूण निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये 15 महिलांचा समावेश होता. त्यांची नावे पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| 1) अम्मू स्वामीनाथन | 2) दुर्गाबाई देशमुख |
| 3) हंसा मेहता | 4) सूचेता कृपालानी |
| 5) विजयालक्ष्मी पंडित | 6) सरोजिनी नायडू |
| 7) लिला रे | 8) राजकुमारी अमृत कौर |
| 9) ॲनी मॅस्कॅरिन | 10) दक्षयानी वेलायुदन |
| 11) पूर्णिमा बॅनर्जी | 12) रेणुका रे |
| 13) कमला चौधरी | 14) मालती चौधरी |
| 15) बेगम रसूल (एकमेव मुस्लिम महिला सदस्य) | |

Dilip Sir's STEP UP Academy

- संस्थानांच्या 93 जागांसाठी निवडणुका झाल्याच नाहीत. हे प्रतिनिधी संस्थानिकांमार्फत नियुक्त केले गेले.
- घटना समितीची पहिली बैठक 9 ते 23 डिसेंबर 1946 रोजी नवी दिल्ली येथील 'संविधान सभागृहा' मध्ये पार पडली.

**✻ थोडक्यात घटना निर्मिती ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

- घटना निर्मितीचे काम साधारणपणे ''संविधान सभेने'' केले. भारतात अशा संविधान सभेची मागणी करण्याचा व घटना निर्मितीचा कालानुक्रम पुढीलप्रमाणे :
- 1922 : महात्मा गांधी – अशा सभेची मागणी
- 1928 : नेहरू अहवाल
- 1934 : मानवेंद्रनाथ रॉय – संविधान सभेची कल्पना सर्वप्रथम मांडली.
- 1934 डिसेंबर : पाटणा येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत पहिल्यांदाचा संविधान सभेची औपचारिक मागणी.
- 1938 : घटना बनविण्याचा अधिकार फक्त संविधानसभेला बाह्य प्रभावास मनाई करण्याची मागणी जवाहरलाल नेहरू यांनी केली.
- 1940 : लॉर्ड लिनलिथगो – 'ऑगस्ट ऑफर' – घटना मुख्यतः भारतीयांनी तयार करावी.
- 1942 : 'क्रिप्स मिशन' – घटना पूर्णतः भारतीयांनी तयार करावी.
- 1946 मे : 'कॅबिनेट मिशन प्लॅन' – संविधान सभेच्या निर्मितीची तरतूद करण्यात आली.
- 1946 जुलै–ऑगस्ट : संविधान सभेसाठी निवडणूका
- 1946, 9 डिसेंबर : संविधान सभेची पहिली बैठक – (हंगामी) अध्यक्ष : सच्चिदानंद सिन्हा
  (हंगामी) उपाध्यक्ष : फ्रँक ॲन्थोनी
- फ्रान्स प्रथेचे अनुकरण करुन हंगामी अध्यक्ष निवड.
- या पहिल्या बैठकीवर मुस्लीम लीगने बहिष्कार टाकला होता (स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीसाठी)
- फक्त 211 सदस्य उपस्थित.
- 1946, 11 डिसेंबर : अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड :
  - डॉ. राजेंद्र प्रसाद : अध्यक्ष
  - एच. सी. मुखर्जी : उपाध्यक्ष
  - सर बी. एन. राव : संविधान सभेचे कायदेशीर घटनात्मक सल्लागार

उद्दिष्टांचा ठराव : घटना समितीची निर्मिती झाल्यानंतर अल्पावधीतच म्हणजे 13 डिसेंबर 1946 रोजी पं.जवाहरलाल नेहरू यांनी घटना समितीपुढे उद्दिष्टांचा ठराव मांडला. घटनासमितीने हा ठराव 22 जानेवारी 1947 रोजी एकमताने मान्य केला. याची सुधारित आवृत्ती म्हणजेच घटनेचा सरनामा होय.

- घटना समितीचे दुसरे उपाध्यक्ष – UT कृष्णाम्माचारी
- 3 जून, 1947 : माऊंट बॅटन योजना : भारताची फाळणी मान्य करण्यात आली.
- पाकिस्तानच्या निर्मितीनंतर भारतीय प्रदेशातील मुस्लीम लीगचे सदस्यही आता घटना समितीमध्ये सहभागी झाले होते.
- फाळणीनंतर घटना समितीच्या सदस्य संख्येमध्ये पुढीलप्रमाणे बदल झाले :
- एकूण संख्या 389 वरून 299 झाली तर प्रांतांकडून निवडून आलेले सदस्य 296 वरून 229 झाले आणि संस्थांनामधून नियुक्त करण्यात आलेले सदस्य 93 वरून 70 इतके झाले.

**✻ घटना समितीतील बिगर काँग्रेस पक्षाचे सदस्य**

| | |
|---|---|
| - डॉ.बी.आर. आंबेडकर | के.टी.शाह |
| - अल्लादी कृष्णस्वामी अय्यर | एच.सी. मुखर्जी |
| - एन.जी. अय्यंगार | एच.एन. कुंझरू |
| - एम.आर. जयकर | तेकचंद्र बक्क्षी |
| - श्यामा प्रसाद मुखर्जी | पी.एस. देशमुख |
| - बी. शिवराव | महावीर त्यागी |
| - डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन | ठाकूरदास भार्गव |

**✻ घटना समितीच्या महत्त्वपूर्ण समित्या**

| समित्या | अध्यक्ष |
|---|---|
| 1) सुकाणू समिति (Adivisory committee) | डॉ.के.एम. मुन्शी |
| 2) कार्यपध्दतीविषयक नियम समिती | डॉ.राजेंद्र प्रसाद |
| 3) गृह समिती (House committee) | बी. पट्टाभी सीतारामय्या |
| 4) वित्त आणि स्टाफ समिती | डॉ.राजेंद्र प्रसाद |
| 5) मसुदा समिती (Drafting committee) | डॉ.बी.आर. आंबेडकर |
| 6) राज्यांसोबत वाटाघाटी करणारी समिती | जवाहरलाल नेहरु |
| 7) संघ राज्यघटना समिती (Union constitution) | जवाहरलाल नेहरू |
| 8) प्रांतीय राज्यघटना समिती (Province constitution) | सरदार पटेल |
| 9) राष्ट्रध्वजावरील तदर्थ समिती (Adhoc committee) | डॉ.राजेंद्र प्रसाद |
| 10) केंद्र (संघ) अधिकार समिती | जवाहरलाल नेहरू |
| 11) मूलभूत हक्क आणि अल्प संख्यांकांबाबत समिती (Fundimental Rights, Minorities) | सरदार पटेल |

Dilip Sir's STEP UP Academy

### ❊ मसुदा समिती (Drafting committee) :

- घटना समितीच्या सर्व समित्यांमधील सर्वांत महत्त्वाची समिती
- स्थापना : 29 ऑगस्ट 1947
- नव्या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याचे मुख्य काम या समितीकडे होते.
- या समितीमध्ये 7 सदस्य होते.



1) डॉ. बी. आर. आंबेडकर
2) एन. गोपालस्वामी अय्यंगार
3) अल्लादी कृष्णस्वामी अय्यर
4) डॉ.के.एम. मुन्शी
5) सईद मोहम्मद सादुल्ला
6) एन. माधव राऊ (आजारीपणामुळे बी.एल.मित्तर यांनी राजीनामा दिल्याने नियुक्ती)
7) टी.टी. कृष्णम्माचारी (डी.पी.खैतान यांच्या 1948 सालच्या मृत्यूनंतर नियुक्ती)

- घटना समितीची पुन्हा एकदा 24 जानेवारी 1950 रोजी बैठक झाली. या बैठकीत भारताच्या राज्यघटनेवर सर्व सदस्यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

### ❊ सभा कामकाज कालावधी

- 2 वर्ष 11 महिने 18 दिवस संविधान सभेचे कामकाज चालले. यात एकूण 11 अधिवेशने झाली. 11 वे अधिवेशन 14 नोव्हेंबर ते 26 नोव्हेंबर 1949 दरम्यान पार पडले.

### ❊ घटना समितीचे इतर कार्ये

- 22 जुलै 1947 : घटना समितीने राष्ट्रध्वजाचा स्वीकार केला.
- मे 1949 : घटना समितीने भारताच्या राष्ट्रकूल सदस्यत्वाला मान्यता दिली.
- 24 जानेवारी 1950 : घटना समितीने राष्ट्रगीताचा स्वीकार केला.
- 24 जानेवारी 1950 : डॉ.राजेंद्र प्रसाद यांना भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवडून दिले.

### ❊ घटना समितीची इतर माहिती

- घटना समितीची निशाणी : हत्ती
- घटना समितीचे कायदेविषयक सल्लागार : सन बी.एन.राव
- घटना समितीचे सचिव : एच.व्ही.आर.अय्यंगार
- मसुदा बनविण्याचे प्रमुख (Chief Draftman) : एस.एन.मुखर्जी




### ❊ प्रास्ताविका (Preamble) :

- 13 डिसेंबर 1946 रोजी जवाहरलाल नेहरू यांनी 'उद्देशपत्र' संविधान सभेत मांडले. त्यास 22 जानेवारी 1947 रोजी स्वीकृती मिळाली.

**भारताचे संविधान**

**प्रस्तावना (Preamble)**

आम्ही, भारतीय लोक, भारताचे एक **सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य** घडवण्याचा व त्यांच्या सर्व नागरिकांस : **सामाजिक, आर्थिक व राजकीय** न्याय, **विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना** यांचे स्वातंत्र्य, **दर्जाची व संधीची** समानता,

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये **व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता** यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा गांभीर्यपूर्वक निर्धार करून आमच्या संविधान सभेत आज दि. 26 नोव्हेंबर 1949 रोजी याद्वारे हे संविधान **अंगीकृत आणि अधिनियमित** करून **स्वतःप्रत** अर्पण करीत आहोत.

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolve to constitute India in to a SOVEREIGN, SOCIALIST, SECULAR, DEMOCRATIC, REPUBLIC and to secure to all its citizens :
JUSTICE, social, economic and political;
LIBERTY of thought, expression, beliefe, faith and worship;
EQUALITY of status and opportunity;
and to promot among them all
FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity and integrity of the Nation :
IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-six day of November, 1949, DO HEREBY ADOPT, ENACT AND VIEW TO OURSELVES THIS CONSTITUTION.

### ❊ सरनाम्याचे तत्त्वज्ञान (Principles of preamble) :

1) अधिकाराचा/अधिसत्तेचा **स्त्रोत** : भारतीय जनता
2) भारतीय राज्यव्यवस्थेचे **स्वरूप** : भारत हे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य असेल असे उद्घोषित केले.

Dilip Sir's STEP UP Academy

3) भारतीय राज्यव्यवस्थेची **उद्दिष्टे** : जनतेला न्याय, स्वातंत्र्य, समता आधि बंधुता यांची प्राप्ती करून देणे ही राज्यव्यवस्थेची व पर्यायाने राज्यघटनेची उद्दिष्टे म्हणून घोषित केली गेली आहेत.

**⁂ घटनेचा अंमल (Implementation of Indian Constitution) :**

- 26 जानेवारी 1950 रोजी घटना अंमलात आली. परंतु घटनेतील कलम 394 नुसार घटनेतील काही तरतुदींचा अंमल 26 नोव्हेंबर 1949 रोजीच सुरू झाला होता. जसे की नागरिकत्व (कलम 5 ते 9), राष्ट्रपती (कलम 60), केंद्रीय निवडणूक आयोग (324) आणि इतर तरतुदी (कलम 366, 367, 379, 380, 388, 391, 392, 393)

**⁂ सरनाम्याचे महत्त्व (Importance of preamble) :**

- पंडित ठाकूरदास भार्गव : 'सरनामा हा घटनेचा आत्मा आहे. संविधानाची ती गुरुकिल्ली आहे.
- सर अर्नेस्ट बार्कर : 'भारतीय घटनेचा सरनामा ही एक महत्त्वपूर्ण बाब आहे'
- एम. हियादतुल्ला : 'सरनामा हा आपल्या संविधानाचा आत्मा असून तो राजकीय समाजाच्या प्रारूपाचे कथन करतो.'
- के.एम. मुन्शी : 'सरनामा म्हणजे भारतीय घटना जाणून घेण्यासाठी आवश्यक असलेली एक राजकीय दृष्टी पुरवतो.'

**⁂ सरनामा : राज्यघटनेचा एक भाग याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय :**

1) बेरूबारी संघ (युनियन) केस (1960) : सरनामा राज्यघटनेचा भाग नाही.
2) केशवानंद भारती वि. केरळ राज्य केस (1973) : सरनामा राज्यघटनेचा भाग आहे.
3) भारतीय जीवन विमा महामंडळ (LIC India) वि. युनियन ऑफ इंडिया केस (1995) : सरनामा राज्यघटनेचा भाग आहे.

**⁂ सरनाम्याबाबत पुढील महत्त्वाच्या गोष्टी (Source) :**

1) सरनामा हा कायदेमंडळाच्या अधिकारांचा स्त्रोत नाही किंवा तिच्या अधिकारावरील निर्बंधदेखील (Restriction) नाही.
2) सरनामा हा न्यायप्रविष्ठ नाही, म्हणजेच तिच्या तरतुदींना अंमलात आणले नाही तर न्यायालयात आव्हान देता येत नाही.

**⁂ सरनाम्यात झालेली घटनादुरुस्ती :**

- 42 व्या घटनादुरुस्तीनुसार 1976 साली सरनाम्यामध्ये समाजवादी (Socialist), धर्मनिरपेक्ष (Secular) आणि एकात्मता (Integrity) हे तीन शब्द समाविष्ट केले गेले. (केशवानंद भारती खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने सरनाम्यामध्ये दुरुस्ती करता येऊ शकते असा निर्णय दिला घटनेचा मूलभूत गाभा बदलणारी घटनादुरुस्ती मात्र करता येणार नाही असेही सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.)

**⁂ सरनाम्याचे तत्त्वज्ञान :**

**1) सौर्वभौम (Sovereign) :**

- भारत देश पूर्णपणे स्वतंत्र असून कोणत्याही परकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली नाही.
- म्हणजेच अंतर्गत आणि बाह्य कारभार पाहण्यास सक्षम
- याचाच अर्थ असाही होतो की भारत परकीय प्रदेश मिळवू शकतो तसेच स्वतःचा प्रदेश परकीय देशास देऊ शकतो.
- संयुक्त राष्ट्र, राष्ट्रकूल इ. संघटनांचे सदस्यत्व म्हणजे सार्वभौमत्वाचा लोप असे नाही.

**2) समाजवादी (Socialist) :**

- साम्यवादी समाजवादामध्ये उत्पादनाच्या सर्व घटकांचे राष्ट्रीयीकरण व खाजगी मालमत्तेला पूर्णपणे बंदी.
- लोकशाही समाजवाद : यात सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचे सहअस्तित्व अपेक्षित असते. (मिश्र अर्थव्यवस्था)
- लोकशाही समाजवादात अहिंसक उत्क्रांतीच्या मानाने आर्थिक विषमता कमी करणे अपेक्षित – इंदिरा गांधी
- लोकशाही समाजवादाची उद्दिष्ट्ये गरीबी, अज्ञान, अनारोग्य व संधीची विषमता दूर करणे ही असतात – सर्वोच्च न्यायालय

**3) धर्मनिरपेक्ष (Secular) :**

- भारतीय राज्य हे कोणत्याही धर्माचा विशेष पुरस्कार करत नाही.
- यावरून राज्य धार्मिक आहे / अधार्मिक आहे / धर्मविरोधी आहे असा निष्कर्ष निघत नाही.
- व्यक्तींसाठी कोणत्याही धर्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य
- राज्य धर्माच्या आधारे भेदभाव करणार नाही.
- 1976 साली करण्यात आलेल्या 42 व्या घटनादुरूस्तीने वरील समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द उद्देशपत्रिकेत समाविष्ट केले गेले.

Dilip Sir's STEP UP Academy

**4) लोकशाही (Democracy) :**

- लोकांची सत्ता असणारी शासनपद्धती
- उद्देशपत्रिकेत नमूद केल्याप्रमाणे लोकशाही ही जन सार्वभौमत्वाच्या तत्त्वावर आधारलेली आहे. (Principle of Popular Sovereignty)
- प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे लोकशाहीचे 2 प्रकार :

**1) प्रत्यक्ष (Direct) :** प्रत्यक्षपणे लोकांचा सहभाग

- सार्वत्रिक मतदान आणि सार्वमत (Referendum and Plebiscite)
- पुढाकार आणि परत बोलावणे (Initiative and Recall)
  उदा.: स्वित्झर्लंड

**2) अप्रत्यक्ष (Indirect) :** या पद्धतीत जनता आपले प्रतिनिधी निवडून राज्यकारभार चालवते म्हणजेच ते प्रत्यक्षपणे सहभागी न होता लोकप्रतिनिधींमार्फत काम करतात. त्यामुळे यास प्रतिनिधिक लोकशाही (Representative Democracy) म्हणतात.

- **याचे पुढील दोन प्रकार :**

- संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही
- भारतात संसदीय लोकशाही असून अमेरिकेत अध्यक्षीय लोकशाही पद्धती स्वीकारलेली आहे. अध्यक्षीय शासनपद्धतीत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ हे परस्परांपासून वेगळे असतात.

**5) प्रजासत्ताक (Republic) :**

प्रजासत्ताक : लोकशाहीचे दोन प्रकार पडतात.

- राजसत्ताक
  राष्ट्रप्रमुख वंशपरंपरेने चालत आलेले असते. (राजा/राणी)
  उदा. ब्रिटन
- प्रजासत्ताक
  राष्ट्रप्रमुख लोकांमधून निवडून येतो
  - प्रत्यक्षपणे — उदा. अमेरिका
  - अप्रत्यक्षपणे — उदा. भारत

भारतातील राष्ट्रपती अप्रत्यक्षपणे निवडून येतात. त्यांचा कार्यकाल 5 वर्षे असतो.

प्रजासत्ताक मधून पुढील 2 अर्थ निघतात.

1) सर्वोच्च पद हे जनतेकडेच आहे.
2) विशेष अधिकार असलेला कोणताच वर्ग अस्तित्वात नसून सार्वजनिक पदे कुठलाही भेदभाव न करता सर्व नागरिकांसाठी खुली असतील.

**6) न्याय (Justice) :** सरनामा सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायांचा उल्लेख करतो.

- सामाजिक न्याय : यात कुठल्याही आधारांवर (म्हणजे जात, वर्ण, वंश, धर्म, लिंग इ.) भेदभाव होणार नाही. मागास वर्गांच्या विकासासाठी राज्य विशेष प्रयत्न करू शकते.
- आर्थिक न्याय : उत्पन्न, संपत्ती व मालमत्ता इ. विषमता दूर करणे यात अपेक्षित आहे.
- राजकीय न्याय : यात सर्वांना समान राजकीय अधिकार, राजकीय पदांसाठी समान संधी आणि सरकारबाबत आपले मत व्यक्त करण्याची समान संधी इ. अंतर्भूत आहे.

**7) स्वातंत्र्य :** सरनाम्यामध्ये सर्व नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य नमूद आहे. वरील स्वातंत्र्याची खात्री ही मूलभूत अधिकारांद्वारे देण्यात आली आहे.

**8) समता (Equality) :** सरनाम्यामध्ये दर्जा व संधीची समानता नमूद आहे. यावरून कोणालाही विशेष अधिकार नसणे तसेच भेदभाव न करता सर्वांना समान संधी उपलब्ध असणे अपेक्षित आहे.

- घटनेतील पुढील कलमांमधून समता प्रस्थापित होते.

- कलम 14 : कायद्यापुढे समानता
- कलम 15 : भेदभाव करण्यास मनाई
- कलम 16 : सार्वजनिक नोकऱ्यांमध्ये समान संधी
- कलम 17 : अस्पृश्यता निर्मूलन
- कलम 18 : पदव्यांची समाप्ती
- कलम 326 : प्रौढ मताधिकाराद्वारे निवडणूका
- वरील तरतुदींवरून नागरी, राजकीय तसेच आर्थिक समता नमूद असल्याचे लक्षात येते.

**9) बंधुत्व :** यात व्यक्तिची प्रतिष्ठा आणि देशाची एकता आणि एकात्मता या बाबी येतात.

- एकेरी नागरिकत्त्वाच्या (Single citizenship) पद्धतीतून राज्यघटना बंधुभावास चालना देते.

- 28 एप्रिल 1947 रोजी सहा संस्थानांचे प्रतिनिधी घटना

Dilip Sir's STEP UP Academy

समितीत सहभागी झाले. बडोदा, बिकानेर, जयपूर, पतियाना, रेवा, उदयपूर.

- भारताच्या फाळणीनंतर बहुतेक संस्थानांचे प्रतिनिधी घटना समितीत सहभागी झाले. तसेच भारतीय प्रदेशातील मुस्लीम लीगचे सदस्यही घटना समितीत सहभागी झाले.
- घटनेच्या मसुद्यावर 114 दिवस विचार विनियम केला होता.
- 24 जानेवारी 1950 ला घटना समितीचे अखेरचे सत्र झाले. तथापि ती संप्ष्टात न येता तिने पहिली संसद अस्तित्वात येईपर्यंत भारताची हंगामी संसद म्हणून काम पाहिले.

❊ **समित्या :**

**मुख्य समित्या –** 8

1) अ) मूलभूत हक्क उपसमिती – जे. बी. कृपलानी
   ब) अल्पसंख्यांक उपसमिती – सर मुखर्जी

2) वित्त व कर्मचारी समिती – राजेंद्र प्रसाद

3) सर्वोच्च न्यायालयाबाबत समिती – S वरदाचारी

   मसुदा समितीने पहिला मसुदा – फेब्रुवारी 1948, दुसरा – ऑक्टोबर 1948, अुतीम – 4 नोव्हेंबर 1948

   मसुदा समीतीचे कामकाज – 141 दिवस चालले.

- 26 नोव्हेंबर 1949 रोजी राज्यघटनेच्या मसुद्याचा ठराव संमत करण्यात आला. त्यादिवशी 284 सदस्यांनी सह्या केल्या. त्या दिवशी घटनेत सरनामा, 395 कलमे, 22 भाग व 8 परिशिष्ट्चे होती.
- घटनेची अंमलबजावणी –

- कलम 5, 6, 7, 8, 9, 60, 324, 366-367, 379-380, 388, 391-392-393 ही एकूण 15 कलमे 26 नोव्हेंबर 1949 रोजीच अंमलात आली. यामध्ये नागरिकत्व, निवडणूका, हंगामी संसद, तात्पुरत्या व संक्रमणात्मक तरतूदी व लघू शीर्षक संबंधी तरतूदी आहेत.
- उरलेल्या तरतूदी 26 जानेवारी 1950 रोजी लागू.

- भारतीय राज्यघअना हस्ताक्षर – प्रेमबिहारी नारायण रायजादा
- घटना समितीत सर्वाधिक सदस्य

- संयुक्त प्रांत (55), मद्रास प्रांत (49) होते.
- संस्थाल – म्हैसूर (7)

Dilip Sir's STEP UP Academy

# भारतीय संविधानाची ठळक वैशिष्ट्ये

**1) जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना :**

- अंमलबजावणीवेळी घटनेत 8 परिशिष्ट्ये (Schedule) - 22 भाग (Part) आणि 395 कलमे होती.
- सध्या 450 पेक्षा जास्त कलमे, 25 भाग आणि 12 परिशिष्ट्ये आहेत. (इतर देशांच्या राज्यघटनेतील कलमे : अमेरिका (7), ऑस्ट्रेलिया (128))

**2) ताठर व लवचिक यांचा मेळ (Combination of Rigidity and Flexibility) :**

- घटनेच्या कलम 368 मध्ये घटनादुरुस्तीच्या (Constitutional amendment) दोन पद्धती नमूद
  i) विशेष बहुमत (Special majority)
  ii) विशेष बहुमत आणि 50% पेक्षा जास्त राज्यांची सहमती (Special majority +more than 50% state's approval)
- या कलमाअंतर्गत साध्या बहुमताची (Simple majority) तरतूद नाही.
- काही तरतूदी सहजासहजी बदलता येतात तर काहींसाठी अवघड प्रक्रिया.

**3) संसदीय लोकशाही शासनपद्धती (Parliament democratic government) :**

- यात मंत्रीमंडळाची (Executives) निवड कायदेमंडळाच्या (Legislature) सदस्यांकडून केली जाते.
- मंत्रीमंडळ हे कायदेमंडळास जबाबदार असते.
- राष्ट्रप्रमुख (Head of State) हे नामधारी कार्यकारी प्रमुख तर शासनप्रमुख (Head of Government) हे वास्तव कार्यकारी प्रमुख असतात.
- भारतात घटकराज्यांचा स्तरावरही (States level) संसदीय शासनव्यवस्था (Parliament democratic government) निर्माण केली गेली आहे.

**⁕ भारतीय संसदीय शासनव्यवस्थेची वैशिष्ट्ये :**

1) राष्ट्रपती नामधारी प्रमुख असतात.
2) मंत्री कायदेमंडळाचे सदस्य असतात.
3) कायदेमंडळात बहुमत असलेल्या पक्षाचे सरकार असते.
4) मंत्रीमंडळाची सामुहीक जबाबदारी (Collective responsibility)
5) कनिष्ठ सभागृहाचे (Lower house) विसर्जन (लोकसभा) होते तर वरीष्ठ सभागृह (Upper house) (राज्यसभा) विसर्जित (Dissolve) होत नाही.

- यामुळे संसदीय शासनपद्धतीस वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते.
  i) कॅबिनेट शासनव्यवस्था
  ii) पंतप्रधान शासनव्यवस्था
  iii) वेस्ट मिन्स्टर शासनव्यवस्था
- **भारतीय संसदीय पद्धती ब्रिटीश पद्धतीवर आधारीत असली तर त्यात मुख्य फरक**
  i) भारतीय संसद ब्रिटीश पार्लमेंटप्रमाणे सार्वभौम (Sovereign) नाही.
  ii) भारतीय राज्यव्यवस्था ही गणराज्य (Republic) आहे तर ब्रिटन मध्ये घटनात्मक राजेशाही (Constitutional Monarchy) आहे.

**⁕ संघराज्यीय स्वरूप (Federal Constitutiion) :**

- देशातील विविधता, खंडप्राय स्वरुप आणि लोकशाही विकेंद्रीकरणाची आवश्यकता यामुळे संघराज्यीय पद्धती स्वीकारून त्यात केंद्र व राज्ये अशा दोन पातळ्या निर्माण केल्या गेल्या.
- लिखित संविधानाने अधिकार विभागणी झाली तर स्वतंत्र न्यायव्यवस्थेने केंद्र व राज्यातील वाद निष्पक्षपपणे सोडवण्याची तरतूद केली.

**⁕ भारतीय राज्यघटनेची संघराज्यीय वैशिष्ट्ये (Federal feartures of Indian constitution) :**

- केंद्र व घटक राज्याचे अस्तित्व, केंद्र व घटक राज्यात अधिकारांची विभागणी, लिखित घटना आणि घटनेची सर्वोच्चता
  घटनेची ताठरता, स्वतंत्र न्यायव्यवस्था, द्विगृही कायदेमंडळाचे अस्तित्व इ.

**⁕ भारतीय राज्यघटनेची एकात्मिक वैशिष्ट्ये (Unitary feartures of Indian constitution) :**

- प्रभावी केंद्रशासन, एकच घटना, एकेरी नागरीकत्व घटनेची लवचिकता, एकात्मिक न्यायव्यवस्था, राज्यपाल नेमणूक, अखिल भारतीय सेवा, आणीबाणीविषयक तरतुदी.
- घटनेत संघराज्य शब्दाचा उल्लेख नसून कलम 1 हे भारताचे वर्णन राज्यांचा संघ (Union of State) असे करते.

Dilip Sir's STEP UP Academy

- संघराज्य शब्दाचा उल्लेख न करण्यामागील आंबेडकरांची भूमिका.

i) भारताचे संघराज्य राज्यांच्या कराराने निर्माण झालेले नाही.

ii) घटकराज्ये संघराज्यातून बाहेर पडू शकत नाही.

**※ भारतीय संघराज्याचे केलेले वर्णन :**

1) अर्धसंघराज्य : के.सी. व्हेअर

2) वाटाघाटीचे संघराज्य : मॉरीस जोन्स

3) सहकारी संघराज्य : ग्रॅनवील ऑस्टीन

4) केंद्रीकरणाची प्रवृत्ती असलेले संघराज्य : आयव्हर जेनिंग्ज

**※ सार्वभौम संसद (Sovereign parliament) आणि सर्वश्रेष्ठ न्यायव्यवस्था (Judiciary) यांचा संगम :**

- संसदेचे सार्वभौमत्व हे ब्रिटनच्या संसदेशी निगडित असून न्यायव्यवस्थेचे श्रेष्ठत्व हे तत्त्व अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाशी संबंधित आहे.
- भारतात संसदेने केलेले कायदे घटनाबाह्य (Unconstitutional) ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाकडे आहे. तसेच संसद आपला कायदा करण्याचा अधिकार वापरून राज्यघटनेमध्ये दुरुस्त्या (Constitutional amendment) करू शकते.

**※ सार्वत्रिक प्रौढ मताधिकार (Universal Adult Suffrage)**

- लोकसभा आणि राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे तत्त्व स्विकारले आहे.
- कलम 326 नुसार 21 वर्षावरील सर्व नागरीक मतदानास पात्र ठरतील
  (यात कुठल्याही प्रकारचा भेदभाव : जात, वंश, वर्ण, धर्म, साक्षरता, संपत्ती या आधारे केला जात नाही.)
- 1988 साली 61 व्या घटनादुरुस्तीने मतदानाचे वय 21 वरून कमीत कमी 18 वर्षे इतके केले आहे.

**※ महत्त्वाचे** : भारताने स्वातंत्र्यानंतर लगेचच स्त्री-पुरुष भेद न करता सर्वांना मताधिकार दिला होता.

- सर्वात पहिल्यांदा न्यूझीलंडने 1893 साली महिलांना मतदानाचा अधिकार दिला होता.
- अमेरीकेत महिलांना 1920 साली मतदानाचा अधिकार मिळाला.
- ब्रिटनने महिलांना 1928 साली मतदानाचा अधिकार दिला.
- 1930 साली दक्षिण आफ्रिकेत, 1931 साली श्रीलंकेत, 1932 साली ब्राझिल तर 1934 साली तुर्की यांनी महिलांना मतदानाचा अधिकार दिला.

**※ स्वतंत्र आणि एकात्मिक न्यायव्यवस्था (Independent and Integrated Judiciary) :**

- नागरीकाचा हक्कांचे संरक्षण, शासन संस्थांकडून घटनात्मक कारभाराची हमी, केंद्र राज्य विवाद यासाठी दबावापासून मुक्त अशी स्वतंत्र न्यायव्यवस्था उभारली आहे.
- या न्यायव्यवस्थेचे स्वरूप एकात्मिक किंवा एकेरी आहे. सर्वात वर सर्वोच्च न्यायालय, राज्य स्तरावर उच्च न्यायालय तर खाली कनिष्ठ न्यायालयाची उभारणी आहे. या एकेरी न्यायव्यवस्थेत केंद्रीय तसेच राज्य कायदेही बजावले जातात.

**※ मुलभूत अधिकार (Fundamental Rights) :**

- हे भारतीय संविधानाचा भाग 3 मध्ये नमूद आहेत.

**※ राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे (Directive Principles of State Policy) :**

- भारतीय संविधानाचा भाग 4 मध्ये नमूद आहेत.
- सामाजिक व आर्थिक लोकशाहीच्या (Social and economic democracy) प्रस्थापनेसाठी समावेश केलेला आहे.

**※ एकेरी नागरीकत्व (Single Citizenship) :**

- भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरुप संघराज्यीय असले तरीही घटनेने एकेरी नागरीकत्व स्वीकारले आहे.

**※ स्वतंत्र संस्था/मंडळे :**

- निवडणूक आयोग, नियंत्रक व महालेखापरीक्षक, केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग यांना निष्पक्षपातीपणे काम करण्यासाठी स्वायत्ततेचा दर्जा दिला आहे.

**※ आणीबाणीविषयक तरतूदी (Provision of emergency)**

- असामान्य आणि अनपेक्षित परिस्थिती हाताळता यावी यासाठी घटनेने राष्ट्रपतीला आणीबाणी विषयक अधिकार दिलेले आहेत.
- भारताचे सार्वभौमत्व एकता, अखंडता आणि देशाची राजकीय व्यवस्था आणि घटनेचे संरक्षण करण्यासाठी आणीाबणीची तरतूद केल्याचे दिसते.
- घटनेत नमूद तीन प्रकारच्या आणीबाणी (भाग 18 मध्ये)
- राष्ट्रीय आणीबाणी (कलम 352), राष्ट्रपती राजवट (कलम 356), वित्तीय आणीबाणी (कलम 360)

**※ त्रिस्तरीय शासनव्यवस्था (Three tier government)**

- सुरुवातीस द्विस्ततरीय शासन व्यवस्थेचाच उल्लेख घटनेतत आढळतो. परंतु 73 वी आणि 74 वी घटनादुरुस्तीने त्रिस्तरीय शासन व्यवस्थेस सुरुवात केली.

Dilip Sir's STEP UP Academy

## ❊ मुलभूत कर्तव्ये (Fundamental duties) :

- मुळ घटनेत मुलभूत कर्तव्ये समाविष्ट नव्हती.
- स्वर्णसिंग समितीच्या शिफारशीनुसार 1976 साली 42 व्या घटनादुरुस्तीने 10 कर्तव्ये समाविष्ट केली गेली.
- 2002 साली 86 व्या घटनादुरुस्तीने 11 वे कर्तव्य समाविष्ट केले गेले.

## ❊ विविध स्त्रोतांचा (Source) स्वीकार :

- जगातील विविध देशांच्या राज्यघटनेतील महत्त्वपूर्ण तरतूदी आपल्या राज्यघटनेत समाविष्ट केल्या आहेत.

**❊ त्यातील काही पुढीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| - भारतीय शासन कायदा, 1935 | संघराज्यीय योजना, न्यायव्यवस्था, लोक सेवा आयोग, आणीबाणीच्या तरतुदी, राज्यपालाचे पद, प्रशासकीय तपशील. |
| - ब्रिटीश घटना | संसदीय शासन व्यवस्था, कॅबिनेट व्यवस्था, द्विगृही संसद, फर्स्ट-पास्ट-पोस्ट-सिस्टिम, कायदा करण्याची पद्धत, कायद्याचे राज्य (Rule of law), एकच नागरिकत्व, संसदीय विशेषाधिकार. |
| - युएसएची घटना | मुलभूत हक्क, उपराष्ट्रपती हे पद, न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य, न्यायिक पुनर्विलोकन (Judicial review), राष्ट्रपतींवरील महाभियोगाची पद्धत, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशास पदावरून दूर करण्याची पद्धत. |
| - कॅनडाची घटना | प्रभावी केंद्र असलेले संघराज्य, शेषाधिकार केंद्राकडे असण्याची तरतूद, राज्यपालाची केंद्राचा प्रतिनिधी म्हणून नेमणूक, सर्वोच्च न्यायालयाचे सल्लागार अधिकारक्षेत्र. |
| - आयरिश घटना | राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, राष्ट्रपतींच्या निवडणुकीची पद्धत, राज्यसभेवर काही सदस्यांचे नामनिर्देशन. |
| - ऑस्ट्रेलियाची घटना | समवर्ती सूची, संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक, व्यापार व वाणिज्याचे स्वातंत्र्य. |
| - फ्रान्सची घटना | गणराज्य, प्रास्तविकेतील स्वातंत्र्य, समता व बंधुता हे आदर्श. |
| - दक्षिण आफ्रिकेची घटना | घटनादुरुस्तीची पद्धत, राज्यसभेच्या सदस्यांची निवडणूक |
| - सोव्हिएत रशियाची घटना | मुलभूत कर्तव्ये, प्रास्तविकेतील सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाचा आदर्श. |
| - जपानची घटना | कायद्याने प्रस्थापित पद्धत (Procedure established by law) |
| - जर्मनीची घटना (वेइमर घटना) | आणीबाणीदरम्यान मुलभूत हक्क स्थगित होणे. |

Dilip Sir's STEP UP Academy

## राज्यघटनेतील परिशिष्टे (Scheduled of Constitution)

**⁕ पहिले परिशिष्ट :**

- यामध्ये भारतातील घटकराज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांची यादी दिलेली आहे.

**⁕ दुसरे परिशिष्ट : वेतन, भत्ते व विशेष अधिकार याबाबत (Provision of sallary, special power)**

- राष्ट्रपती व राज्यपाल यांच्याबाबत तरतूदी
- लोकसभा : अध्यक्ष, उपाध्यक्ष
- राज्यसभा : सभापती, उपसभापती
- राज्याच्या विधानसभेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष
- विधानपरिषदेचा सभापती, उपसभापती यांच्याबाबत तरतूदी
- सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय न्यायाधीश यांच्याबाबत तरतूदी
- भारताचा CAG च्या बाबत.

**⁕ तिसरे परिशिष्ट : शपथांचे नमुने (Forms of oaths or affirmations)**

- शपथांचे नमुने : केंद्रिय मंत्री, संसद सदस्य, संसदेच्या निवडणुकीतील उमेदवार, राज्यातील मंत्री, राज्य विधिमंडळाचे सदस्य, राज्य विधिमंडळाच्या निवडणुकीतील उमेदवार, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, भारताचे CAG.

**⁕ चौथे परिशिष्ट :**

- राज्यसभेतील राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या जागा (Allocation of seats in Rajya sabha)

**⁕ पाचवे परिशिष्ट :**

- अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जनजाती यांचे प्रशासन व नियंत्रण याबाबत तरतूदी (Provision as to the administration and control of scheduled areas and scheduled tribes)

**⁕ सहावे परिशिष्ट :**

- आसाम, मेघालय, त्रिपूरा व मिझोरम या राज्यांमधील जनजाती क्षेत्राच्या प्रशासनाबाबत (Provision as to the administration of tribel areas (in Assam, Meghalay, Tripura and Mizoram))

**⁕ सातवे परिशिष्ट :**

| | सुरुवातीला | सध्या |
|---|---|---|
| – कलम 246 : संघसुची (Union list) | विषय 97 | 100 |
| राज्यसुची (State list) | विषय 66 | 61 |
| समवर्तीसुची (Concurrent list) | विषय 47 | 52 |

**⁕ आठवे परिशिष्ट : List of recognised languages**

- भारतातील घटनात्मक भाषा : 22
- सुरुवातीला 14 भाषा होत्या. 21 व्या घटनादुरुस्तीनुसार सिंधी भाषेचा यात समावेश करण्यात आला.
- कोकणी, मणिपूरी आणि नेपाळी यांचा समावेश केल्यामुळे यातील भाषांची संख्या 18 झाली : 71 वी घटनादुरुस्ती 1992
- 4 भाषांचा परिशिष्टात समावेश : 18 वरून संख्या 22 (बोडो, डोंगरी, मैथिली, संथाली) : 92 वी घटनादुरुस्ती 2004

**⁕ नववे परिशिष्ट : Validation of certain acts and regulations**

- 1951 : पहिली घटनादुरुस्ती
- यात घटनादुरुस्ती केलेले कायदे न्यायिक पुर्नविलोकनाच्या बाहेर
- (केशवानंद खटल्यानंतर : 24 एप्रिल, 1973 नंतर समाविष्ट केलेल्या कायद्यांचे न्यायिक परिक्षण होऊ शकते असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने 2007 साली दिला.)

**⁕ दहावे परिशिष्ट : Provision as to disqualification on ground of defection (पक्षांतर बंदी संबंधी तरतूदी)**

- 1985 : 52 वी घटनादुरुस्ती : पक्षांतर बंदी कायदा
- संसदेचे सदस्य आणि राज्यविधिमंडळाचे सदस्य यांच्यासाठी लागू.

**⁕ अकरावे परिशिष्ट : Power, authority and responsibilities of Panchayats**

- 73 वी घटनादुरुस्ती
- पंचायत राज संस्था (29 विषय राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था देण्यात यावे परंतु कोणते व किती बंधनकारक नाही.)

Dilip Sir's STEP UP Academy

**※ बारावे परिशिष्ट : Power, authority and responsibilities of Panchayats of municipalities, etc.**

- 1993 : 74 वी घटनादुरुस्ती
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (18 विषय)

**राज्यघटनेतील भाग**

| भाग | विषय | कलम |
|---|---|---|
| 1 | घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेश (The union & its territory) | कलम 1-4 |
| 2 | नागरिकत्व (Citizenship) | कलम 5-11 |
| 3 | मूलभूत हक्क (Fundamental rights) | कलम 12-35 |
| 4 | मार्गदर्शक तत्त्वे (DPSP) | कलम 36-51 |
| 4A | मूलभूत कर्तव्ये (Fundamental duties) | कलम 51A |
| 5 | केंद्र सरकार (Union government) | कलम 52-151 |
| 6 | राज्य सरकार (State governments) | कलम 152-237 |
| 7 | Repealed | |
| 8 | केंद्रशासित प्रदेश (Union territories) | कलम 239-242 |
| 9 | पंचायत राज (The Panchayats) | कलम 243-243O |
| 9A | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (The municipalities) | कलम 243P-243ZG |
| 9B | सहकारी संस्था (The co-operative societies) | कलम 243ZH-243ZT |
| 10 | अनुसूचीत व आदिवासी प्रदेश (The scheduled & trible area) | कलम 244 |
| 11 | केंद्र-राज्य संबंध (Relation between union & states) | कलम 245-263 |
| 12 | करार, वित्त (Contracts and finance) | कलम 264-300A |
| 13 | व्यापार आणि वाणिज्य (Trade and commerce) | कलम 301-307 |
| 14 | केंद्र राज्य सेवा (Services under union and states) | कलम 308-323 |
| 14A | न्यायाधिकरण (Tribunals) | कलम 323A-323B |
| 15 | निवडणूका (Elections) | कलम 324-329A |
| 16 | विशेष वर्ग तरतूद (Special provision for certain classes) | कलम 330-342 |
| 17 | कार्यालयीन भाषा (Official languages) | कलम 343-351 |
| 18 | आणीबाणीविषयक (Emergency provisions) | कलम 352-360 |
| 19 | Miscellaneus | कलम 361-367 |
| 20 | घटनुदूरूस्ती (Constitutional amendments) | कलम 368 |
| 21 | तात्पूरत्या संक्रमनशिल तरतुदी (Temporary & transitional provisions) | कलम 369-392 |
| 22 | घटनेची हिंदीतील आवृत्ती | कलम 394A |

- भाग 7 : Part B राज्यांविषयी होता तो 7 व्या घटनादुरुस्तीने (1956) काढून टाकला.
- भाग 4अ आणि भाग 14अ हे दोन्हीही 42 व्या घटनादुरुस्तीने (1976) समाविष्ट केले.
- भाग 9अ हा 74 व्या घटनादुरुस्तीने (1992) तर 9ब हा 97 व्या घटनादुरुस्तीने (2011) समाविष्ट केला गेला.

Dilip Sir's STEP UP Academy

# संसदीय प्रणाली (Parliamentary form of Government)

- भारतीय राज्यघटनेमध्ये केंद्र व राज्ये या दोहोंमध्येही संसदीय प्रणालीच्या सरकारची तरतूद आहे.
- कलम 74 व कलम 75 केंद्रातील संसदीय प्रणालीशी संबंधित आहेत तर कलम 163 व कलम 164 राज्यातील विधिमंडळ प्रणालीशी संबंधित आहेत.

**✼ संसदीय प्रणाली :**

- यात धोरणे व कृतींसाठी कार्यकारी विभाग कायदेमंडळाला उत्तरदायी असतो.
- संसदीय शासन व्यवस्थेलाच मंत्रिमंडळ सरकार, उत्तरदायी सरकार किंवा वेस्टमिन्स्टर पद्धतीचे सरकार असेही म्हटले जाते.
- मंत्रिमंडळ (वास्तवातील कार्यकारी विभाग) संसदेला उत्तरदायी असते आणि जोपर्यंत संसदेचा विश्वास आहे तोपर्यंत अधिकारावर राहू शकते म्हणून संसदीय सरकारला उत्तरदायी सरकार असेही म्हटले आहे.
- उदा. : ब्रिटन, जपान, कॅनडा, भारत इ.

**✼ अध्यक्षीय प्रणाली :**

- यात धोरणे व कृतींसाठी कार्यकारी विभाग कायदेमंडळाला उत्तरदायी नसतो आणि त्याच्या कार्यकालाबाबत घटनात्मकदृष्ट्या विधिमंडळापासून स्वतंत्र असतो.
- अध्यक्षीय सरकारला उत्तरदायी नसलेले किंवा संसदीय नसलेले किंवा स्थिर कार्यकारी प्रणालीचे सरकार असे म्हटले जाते.
- उदा. : अमेरिका, ब्राझील, रशिया, श्रीलंका इ.

## संसदीय सरकारची वैशिष्ट्ये (Features of Parliamentary form of Government)

1) **नाममात्र व वास्तव कार्यकारी प्रमुख (Nominal & Real Head)** : राष्ट्रपती नाममात्र कार्यकारी प्रमुख (कायदेशीर प्रमुख किंवा पदाने प्रमुख) असतो तर पंतप्रधान हा प्रत्यक्ष कार्यकारी प्रमुख किंवा वास्तव कार्यकारी प्रमुख असतो. त्यामुळे राष्ट्रपती हा राष्ट्राचा प्रमुख असतो व पंतप्रधान हा सरकारचा प्रमुख असतो.
   - राष्ट्रपतींना त्यांची कामे करण्यास साहाय्य करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ असेल, अशी तरतूद कलम 74 मध्ये केली आहे तर कलम 75 नुसार राष्ट्रपती पंतप्रधानांची नियुक्ती करतात. मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक असतो.
2) **बहुमत असलेल्या पक्षाचे सरकार (Majority Party Rule)** : लोकसभेत ज्या पक्षाला बहुमत मिळेल तो राजकीय पक्ष सरकार स्थापन करतो. त्या पक्षाच्या नेत्याला राष्ट्रपती पंतप्रधानपदावर नियुक्त करतो. पंतप्रधानांच्या सल्ल्यावरून राष्ट्रपती इतर मंत्र्यांची नियुक्ती करतात.
3) **सामूहिक जबाबदारी (Collective Responsibility)** : यामध्ये मंत्री सामूहिकरित्या सर्वसाधारणपणे संसदेला आणि विशेषतः लोकसभेला उत्तरदायी असतात (कलम 75); लोकसभा अविश्वासाचा ठराव संमत करून मंत्रिमंडळाला (पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील मंत्रिपरिषदेला) पदावरून हटवू शकते.
4) **दुहेरी सदस्यत्व** : मंत्री विधिमंडळाचे व कार्यकारी विभाग या दोहोंचे सदस्य असतात. म्हणजेच संसद सदस्य असल्याशिवाय व्यक्ती मंत्री बनू शकत नाही. जो मंत्री सलग सहा महिने संसद सदस्य नाही तो मंत्रिपदी राहू शकत नाही, असे राज्यघटनेत सांगितले आहे.
5) **पंतप्रधानांचे नेतृत्व (PM as a Leader)** : संसदीय शासन प्रणालीमध्ये सरकारमध्ये पंतप्रधान नेतृत्वपदाची भूमिका बजावतो. तो मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो. संसदेचा प्रमुख असतो आणि सत्तारूढ पक्षाचा प्रमुख असतो.
6) **कनिष्ठ सदन विसर्जित करणे (Dissolution of lower house)** : पंतप्रधानाच्या शिफारशीवरून राष्ट्रपती संसदेचे कनिष्ठ सभागृह (लोकसभा) विसर्जित करू शकतो. म्हणजेच लोकसभेची मुदत संपण्यापूर्वी पंतप्रधान लोकसभा विसर्जित करून नव्याने निवडणुका घ्याव्यात, असा सल्ला देऊ शकतो. संसदीय प्रणालीमध्ये कार्यकारी विभागाला विधिमंडळ विसर्जित करण्याचा अधिकार असतो.
7) **गुप्तता (Secrecy)** : मंत्री कामकाज गुप्त ठेवण्याच्या तत्त्वावर काम करतात आणि त्यांचे निर्णय, धोरणे आणि प्रक्रिया याविषयीची माहिती उघडपणे मांडू शकत नाहीत. पदभार स्वीकारण्यापूर्वी ते गुप्ततेची शपथ घेतात. राष्ट्रपती मंत्र्यांनाही गुप्ततेची शपथ देतात.

## अध्यक्षीय सरकारची वैशिष्ट्ये (Features of Presidential form of Government)

- भारतीय राज्यघटनेपेक्षा भिन्न असे अध्यक्षीय प्रणालीचे सरकार अमेरिकन राज्यघटनेत आहे. अमेरिकेतील अध्यक्षीय सरकारची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

Dilip Sir's STEP UP Academy

1) अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा राष्ट्राचा प्रमुख व सरकारचा प्रमुख असतो. सरकारचा प्रमुख म्हणून तो सरकारच्या कार्यकारी विभागाचा नेता असतो.

2) चार वर्षांच्या ठरलेल्या मुदतीसाठी निर्वाचन मंडळ अध्यक्षाची निवड करते. गंभीर घटनाबाह्य कृतीसाठी महाभियोग चालविल्याशिवाय अमेरिकेचे कायदेमंडळ (कॉंग्रेस) अध्यक्षास पदावरून कमी करू शकत नाही.

3) मंत्रिमंडळ किंवा 'किचन कॅबिनेट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लहान गटाच्या साहाय्याने अध्यक्ष सरकार चालवितो. हा केवळ सल्लागारी गट असतो आणि यात निवडून न आलेले विभागीय सचिव असतात. अध्यक्ष त्यांची निवड व नियुक्ती करतो आणि ते फक्त त्याला उत्तरदायी असतात. अध्यक्ष त्यांना कधीही कमी करू शकतो.

4) अध्यक्ष व त्याचे सचिव त्यांच्या कामकाजासाठी अमेरिकेच्या विधिमंडळाला उत्तरदायी नसतात. ते कॉंग्रेसचे सदस्य नसतात व कॉंग्रेसच्या सभांना उपस्थित राहत नाहीत.

5) अध्यक्ष कॉंग्रेसचे कनिष्ठ सदन (हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्ह) विसर्जित करू शकत नाही.

6) अधिकारांची विभागणी हे अमेरिकेच्या अध्यक्षीय प्रणालीचे मूळ आहे. सरकारच्या वैधानिक, कार्यकारी आणि न्यायिक अधिकारांची तीन स्वतंत्र घटकांमध्ये विभागणी केली जाते.

**संसदीय प्रणाली स्वीकारण्याची कारणे**

**1) परिचयाची प्रणाली :** ब्रिटिश काळापासून भारतात कार्यरत असलेली संसदीय प्रणाली घटनाकर्त्यांच्या थोडी परिचयाची होती. ''गेल्या तीस-चाळीस वर्षांमध्ये देशाच्या प्रशासनामध्ये काही प्रमाणात उत्तरदायित्वाची भावना आली आहे. आपली घटनात्मक परंपरा संसदीय पद्धतीची बनली आहे. या अनुभवानंतर आता परत नवीन प्रयोग कशासाठी करायचा?'' असे के. एम. मुन्शी यांनी म्हटले आहे.

| संसदीय प्रणाली व अध्यक्षीय प्रणाली | |
|---|---|
| **संसदीय प्रणालीची वैशिष्ट्ये** | **अध्यक्षीय प्रणालीची वैशिष्ट्ये** |
| 1) दुहेरी कार्यकारी विभाग | 1) एकच कार्यकारी विभाग |
| 2) बहुमताच्या पक्षाची सत्ता | 2) निश्चित कालावधीसाठी अध्यक्ष आणि कायदे मंडळाचे सभासद स्वतंत्रपणे निवडले जातात. |
| 3) सामूहिक जबाबदारी | 3) सामूहिक जबाबदारी नाही. |
| 4) राजकीय एकजिनसीपणा | 4) राजकीय एकजिनसीपणा असेलच असे नाही. |
| 5) दुहेरी सदस्यत्व | 5) एकेरी सदस्यत्व |
| 6) पंतप्रधानाचे नेतृत्व | 6) अध्यक्षाचे वर्चस्व |
| 7) कनिष्ठ गृह विसर्जित करता येते. | 7) कनिष्ठ गृह विसर्जित करता येत नाही. |
| 8) अधिकारांचे एकत्रीकरण | 8) अधिकारांची विभागणी. |
| **संसदीय प्रणालीचे फायदे** | **अध्यक्षीय प्रणालीचे फायदे** |
| 1) विधिमंडळ व कार्यकारी विभाग यांत सामंजस्य | 1) स्थिर सरकार |
| 2) उत्तरदायी सरकार | 2) धोरणात निश्चितता |
| 3) जुलूमशाहीवर नियंत्रण | 3) अधिकार विभागणीवर आधारित |
| 4) विस्तृत प्रतिनिधित्व | 4) तज्ज्ञांचे सरकार |
| **संसदीय प्रणालीच्या उणिवा** | **अध्यक्षीय प्रणालीच्या उणिवा** |
| 1) अस्थिर सरकार | 1) विधिमंडळ व कार्यकारी विभाग यांत संघर्ष |
| 2) धोरणांत सातत्याचा अभाव | 2) उत्तरदायी सरकार नाही. |
| 3) अधिकार विभागणीच्या विरोधी | 3) एकाधिकारशाही होण्याची शक्यता |
| 4) नवशिक्यांचे सरकार | 4) संकुचित प्रतिनिधित्व |

Dilip Sir's STEP UP Academy

2) **अधिक उत्तरदायित्वाला प्राथमिकता** : "लोकशाहीतील कार्यकारी विभागाने दोन अटींची पूर्तता केली पाहिजे. स्थैर्य आणि उत्तरदायित्व. दुर्दैवाने या दोन्ही निकषांची सम प्रमाणात पूर्तता होईल, अशी प्रणाली अजून विकसित झालेली नाही. अमेरिकेच्या पद्धतीमध्ये स्थैर्य जास्त आहे, पण उत्तरदायित्व कमी आहे. या उलट ब्रिटनच्या प्रणालीमध्ये उत्तरदायित्व जास्त आहे, पण स्थैर्य कमी आहे. जास्त स्थैर्यापेक्षा जास्त उत्तरदायित्वाला प्राथमिकता देऊन घटनेच्या मसुद्यात कार्यकारी संसदीय प्रणालीची शिफारस केली आहे, असे डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी संविधान सभेत म्हटले होते.

3) **विधिमंडळ–कार्यकारी विभाग यांच्यातील विवाद टाळण्याची गरज** : अमेरिकेसारख्या अध्यक्षीय प्रणालीमध्ये विधिमंडळ आणि कार्यकारी विभाग यांच्यामध्ये विवाद उद्‌भवणे स्वाभाविक असल्याने तो टाळणे हा घटनाकारांचा हेतू होता.

4) **भारतीय समाजाचे स्वरूप** : भारत हा जगातील सर्वांत वैविध्यपूर्ण आणि गुंतागुंतीचा बहुआयामी समाज आहे. त्यामुळे सरकारमध्ये विविध घटकांना, हितांना व क्षेत्रांना प्रतिनिधित्व मिळण्यास वाव असावा या उद्देशाने घटनाकारांनी संसदीय प्रणाली निवडली. यामुळे लोकांच्या राष्ट्रीय भावनेस आणि एकसंध भारताच्या निर्मितीस चालना मिळते.

- संसदीय प्रणाली चालू ठेवावी की, त्याजागी अध्यक्षीय प्रणाली आणावी, हा मुद्दा आपल्या देशात सत्तरच्या दशकापासून चर्चिला जात आहे. सन 1975 मध्ये काँग्रेस सरकारने स्थापन केलेल्या स्वर्णसिंग समितीने याचा तपशीलवार विचार केला. समितीच्या मतानुसार संसदीय प्रणाली चांगल्या रीतीने चालू असून तिच्या जागी अध्यक्षीय प्रणाली आणण्याची आवश्यकता नाही.

### भारतीय आणि ब्रिटनमधील पद्धतीतील फरक

- भारतातील सरकारची संसदीय प्रणाली मुख्यतः ब्रिटनमधील संसदीय प्रणालीवर आधारित आहे. तथापि, ती ब्रिटनमधील प्रणालीची हुबेहूब प्रतिकृती बनलेली नाही, त्यामध्ये खालील प्रकारचे फरक आढळू येतात.

1) भारतात प्रजासत्ताक पद्धती आहे, तर ब्रिटनमध्ये राजसत्ताक पद्धती आहे. म्हणजेच भारतामध्ये राष्ट्राचा प्रमुख (राष्ट्रपती) निवडला जातो, तर ब्रिटनमध्ये राष्ट्राचा प्रमुख (राजा किंवा राणी) वंशपरंपरेने बनतो.

2) ब्रिटनमधील पद्धती संसदेच्या सार्वभौमत्वावर आधारित आहे, तर भारतात संसद सर्वोच्च नसून लिखित राज्यघटना, संघराज्यीय पद्धती, न्यायालयीन पुनर्विलोकन आणि मूलभूत हक्क यांमुळे संसदेला थोडे आणि मर्यादित अधिकार आहेत.

3) ब्रिटनमध्ये पंतप्रधान हा संसदेच्या कनिष्ठ गृहाचा (हाऊस ऑफ कॉमन्स) सदस्य असला पाहिजे, अशी तरतूद आहे. भारतात पंतप्रधान संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही गृहाचा सदस्य असला तरी चालतो.

4) सामान्यतः ब्रिटनमध्ये फक्त संसद सदस्यांनाच मंत्री पदावर नेमले जाते. भारतात संसद सदस्य नसलेल्या सदस्यांनासुद्धा मंत्रिपदावर नेमता येते, मात्र सहा महिन्यांच्या आत त्यांना संसदेवर निवडून यावे लागते.

5) ब्रिटनमध्ये मंत्र्याच्या कायदेशीर उत्तरदायित्वाची पद्धती आहे, भारतात मात्र अशी पद्धती नाही. ब्रिटनप्रमाणे राष्ट्रप्रमुखाच्या अधिकृत कृतींसाठी भारतात मंत्र्यांना सहस्वाक्षरी करावी लागत नाही.

6) ब्रिटिश मंत्रिमंडळ पद्धतीची 'शॅडो कॅबिनेट' ही वैशिष्ट्यपूर्ण पद्धत आहे. सत्तारूढ मंत्रिमंडळाबरोबर संतुलन राखण्यासाठी विरोधी पक्ष ती स्थापन करतो आणि सदस्यांना भविष्यातील मंत्रिपदासाठी तयार करतो. भारतात अशी पद्धती नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

## संघराज्यीय प्रणाली (Federal Structure)

- संघराज्यीय प्रणालीमध्ये दोन प्रकार दिसून येतात. 1) एकात्मिक शासन पद्धती 2) संघराज्यीय शासन पद्धती

### ✻ एकात्मिक शासन पद्धती :

- यात सर्व अधिकार केंद्र सरकारकडे एकवटलेले असतात आणि प्रांतिक सरकारांना काही अधिकार असलेच तर ते त्यांना केंद्र सरकारकडून प्राप्त झालेले असतात.
- उदा. : ब्रिटन, फ्रान्स, जपान, चीन, इटली, बेल्जियम, नॉर्वे, स्वीडन, स्पेन इ.

### ✻ संघराज्यीय शासन पद्धती :

- यात केंद्र सरकार आणि प्रांतिक सरकार यांच्यामध्ये घटनेद्वाराच अधिकार विभागले जातात आणि दोन्ही स्वतंत्रपणे आपल्या अधिकारक्षेत्रात कामकाज करतात.
- उदा. : अमेरिका, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, रशिया, ब्राझील, अर्जेंटिना इ.
- संघराज्यीय पद्धतीमध्ये केंद्र सरकारला संघराज्यीय सरकार किंवा राष्ट्रीय सरकार असे संबोधले जाते व प्रांतिक सरकारला राज्य सरकार किंवा प्रांतिक सरकार असे संबोधले जाते.
- संघराज्यांमध्ये घटक राज्यातील सहमतीनुसार किंवा करारानुसार संघराज्य हे नवे राज्य (राजकीय प्रणाली) स्थापन होते. संघराज्यातील घटकांना अमेरिकेत स्टेटस्, स्वित्झर्लंडमध्ये कँटन, कॅनडामध्ये प्रोव्हिन्सेस व रशियामध्ये रिपब्लिक असे संबोधले जाते.
- संघराज्य स्थापन करण्याच्या दोन पद्धती आहेत. 1) एकत्रीकरण करून 2) विघटन करून

### ✻ एकत्रीकरण करून :

- लष्करीदृष्ट्या दुर्बल किंवा आर्थिकदृष्ट्या मागासलेली अनेक स्वतंत्र राज्ये एकत्र येऊन मोठे व सामर्थ्यवान संघराज्य स्थापन करतात. उदा. अमेरिका.
- अमेरिका हे जगातील पहिले व सर्वांत जुने संघराज्य आहे. त्यात 50 राज्ये (सुरुवातीला 13 राज्य) आहेत.

### ✻ विघटन करून :

- क्षेत्रीय हितसंबंध जपण्यासाठी प्रांतांना स्वायत्तता देऊन एका मोठ्या एकात्मिक राज्याचे संघराज्यात रूपांतर केले जाते. उदा. कॅनडा.
- कॅनडा संघराज्यामध्ये 10 प्रांत (सुरुवातीला 4 प्रांत) आहेत व हे सुद्धा बरेच जुने आहे. याची स्थापना 1867 मध्ये झाली आहे.

**संघराज्यीय व एकात्मिक सरकारांच्या वैशिष्ट्यांची तुलना**

| संघराज्यीय सरकार (Federal form of Govt.) | एकात्मिक सरकार (Unitary form of Govt.) |
|---|---|
| 1) दुहेरी सरकार (केंद्र सरकार आणि प्रांतिक सरकार) | 1) एकच सरकार – केंद्र सरकार. केंद्र सरकार प्रांतिक सरकार निर्माण करू शकते. |
| 2) लिखित राज्यघटना | 2) राज्यघटना लिखित (फ्रान्स) किंवा अलिखित (ब्रिटन) असते. |
| 3) केंद्र आणि प्रांतिक सरकारमध्ये अधिकारांची विभागणी | 3) अधिकारांची विभागणी नाही. सर्व अधिकार केंद्र सरकारकडे असतात. |
| 4) राज्यघटना सर्वश्रेष्ठ | 4) राज्यघटना सर्वोच्च असते (जपान) किंवा सर्वोच्च नसते. (ब्रिटन) |
| 5) ताठर राज्यघटना | 5) राज्यघटना ताठर असू शकते (फ्रान्स) किंवा लवचिक असू शकते. (ब्रिटन) |
| 6) स्वतंत्र न्यायव्यवस्था | 6) न्यायव्यवस्था स्वतंत्र असू शकते किंवा स्वतंत्र नसू शकते. |
| 7) द्विगृही विधिमंडळ | 7) विधिमंडळ द्विगृही असू शकते (ब्रिटन) किंवा एकगृही असू शकते. (चीन) |

Dilip Sir's STEP UP Academy

- भारतीय राज्यघटनेमध्ये संघराज्यीय प्रणालीच्या सरकारची तरतूद आहे. आपल्या राज्यघटनेत 'संघराज्य' (Federation) हा शब्द कोठेही वापरलेला नाही. त्याऐवजी राज्यघटनेच्या कलम 1 मध्ये भारताला 'राज्यांचा संघ' (Union of States) असे म्हटले आहे.

  1) अमेरिकेतील संघराज्याप्रमाणे भारतीय संघराज्य हे राज्यातील करारानुसार स्थापन झाले नाही.

  2) राज्यांना संघराज्यातून बाहेर पडण्याचा अधिकार नाही.
- भारतीय संघराज्यप्रणाली कॅनडाच्या प्रणालीवर आधारलेली आहे.
- भारतीय संघराज्याचे कॅनडाच्या संघराज्याशी पुढील घटकांबाबत साधर्म्य आहे :

  1) स्थापनेची पद्धत (विघटन करून बनविलेले)

  2) संघ ही संज्ञा वापरली आहे (कॅनडातसुद्धा संघराज्याला 'संघ' म्हटले आहे.)

  3) केंद्रीकरणाकडे कल (राज्यांच्या तुलनेत केंद्राला अधिक अधिकार).

## राज्यघटनेची संघराज्यीय वैशिष्ट्ये (Federal Features of Indian Constitution)

### ❊ दुहेरी राज्यव्यवस्था (Dual government system) :

- राज्यघटनेने केंद्रामध्ये संघ आणि इतर राज्ये अशी दुहेरी राज्यव्यवस्थेची तरतूद केली आहे. राज्यघटनेने दिलेल्या क्षेत्रामध्ये प्रत्येकाने सार्वभौम अधिकारांचा वापर करावयाचा आहे. केंद्र सरकार संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, चलन, संचार इ. राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांशी संबंधित असते; तर राज्य सरकार सार्वजनिक सुव्यवस्था, कृषी, आरोग्य, स्थानिक सरकार इ. प्रादेशिक व स्थानिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांशी संबंधित असते.

### ❊ लिखित राज्यघटना (Written constitution)

- भारतीय राज्यघटना केवळ लिखित स्वरूपातच आहे, त्याचबरोबर ती आकारमानाने जगातील सर्वांत मोठी राज्यघटना आहे.
- सुरुवातीला यात सरनामा, 22 भागांत विभागलेली 395 कलमे आणि 8 परिशिष्टे होती.
- सध्या त्यात सरनामा, 25 भागांत विभागलेली 450 पेक्षा अधिक कलमे आणि 12 परिशिष्टे आहेत.
- यामध्ये केंद्र व राज्य या दोन्ही सरकारांची संरचना, संघटना, अधिकार आणि कार्ये सांगितली असून कोणत्या मर्यादित त्यांनी कामे करावयाची आहेत, हेही सांगितले आहे.

### ❊ अधिकारांचे विभाजन (Seperation of power)

- परिशिष्ट 7 मधील केंद्र सूची, राज्य सूची व समवर्ती सूची यातून राज्यघटनेने केंद्रात व राज्यांत अधिकारांची विभागणी केली आहे. केंद्र सूचीमध्ये 100 विषय आहेत. (सुरुवातीला 97) राज्यसूचीमध्ये 61 विषय आहेत (सुरुवातीला 66) आणि समवर्ती सूचीमध्ये 52 विषय आहेत (सुरुवातीला 47). (101 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2016 अन्वये केंद्रसूचीतील विषय क्र. 92 व 92सी आणि राज्यसूचीतील विषय क्र. 52 व 55 वगळल्यामुळे आता केंद्रसूचीतील विषयांची संख्या 98 पर्यंत खाली आली असून राज्य सूचीतील विषयांची संख्या 59 इतकी कमी झाली आहे. समवर्ती सूचीतील विषयांची संख्या 52 इतकीच राहिली आहे.)
- समवर्ती सूचीमधील विषयांबाबत केंद्र व राज्ये दोहोंनाही कायदे करण्याचा अधिकार आहे. दोन्ही कायद्यात काही परस्पर विसंगत तरतुदी असल्यास केंद्राचा कायदा श्रेष्ठ ठरतो. तिन्ही सूचींमध्ये उल्लेख नसलेले उर्वरित विषय केंद्राकडे असतात.

### ❊ राज्यघटनेचे श्रेष्ठत्व (Supremacy of constitution)

- राज्यघटना हा देशातील सर्वोच्च किंवा सर्वश्रेष्ठ कायदा आहे. केंद्राने व राज्याने केलेले कायदे घटनेच्या तरतुदीनुसारच असले पाहिजेत. तसे नसतील तर न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराद्वारा सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालये ते कायदे अवैध ठरवू शकतात. त्यामुळे विधिमंडळ, कार्यकारी विभाग आणि न्यायव्यवस्था या सरकारच्या तिन्ही विभागांनी दोन्ही स्तरावर घटनेच्या चौकटीतच काम केले पाहिजे.

### ❊ ताठर राज्यघटना (Rigid constitution)

- संघराज्यीय संरचनेसंबंधित (केंद्र-राज्य संबंध आणि न्यायालयीन संरचना) तरतुदींमध्ये दुरुस्ती करण्याबाबत राज्यघटना ताठर आहे. यात केंद्र व राज्य सरकारांच्या संयुक्त कृतीशिवाय दुरुस्ती करता येत नाही. अशा तरतुदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी संसदेच्या विशेष बहुमताची आवश्यकता असते आणि निम्म्यापेक्षा अधिक राज्य विधिमंडळांची संमती लागते.

Dilip Sir's STEP UP Academy

**✻ स्वतंत्र न्यायव्यवस्था (Independent judiciary)**

- राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालयाच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र न्यायव्यवस्था स्थापन केली आहे.
- याचे दोन उद्देश आहेत :

  1) न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराद्वारा घटनेचे सर्वश्रेष्ठत्व अबाधित राखणे.

  2) केंद्र-राज्य व राज्य-राज्य यांतील विवाद सोडविणे.
- न्यायाधीशांना ठराविक कालावधीची हमी, निश्चित सेवा-शर्ती इ. विविध उपाययोजना राज्यघटनेत असल्यामुळे न्यायव्यवस्था सरकारपासून किंवा कार्यकारी मंडळापासून स्वतंत्र आहे.

**✻ द्विगृही व्यवस्था (Bicameral legislature)**

- राज्यघटनेमध्ये वरिष्ठ सभागृह (राज्यसभा) आणि कनिष्ठ सभागृह (लोकसभा) अशी द्विगृही विधिमंडळ व्यवस्थेची तरतूद आहे. राज्यसभा भारतीय संघराज्यातील राज्यांचे प्रतिनिधित्व करते, तर लोकसभा भारतातील संपूर्ण जनतेचे प्रतिनिधित्व करते. जरी राज्यसभेकडे कमी अधिकार असले तरी केंद्राच्या अयोग्य हस्तक्षेपापासून राज्यांच्या हितांचे रक्षण करून संघराज्यीय संतुलन राखण्यासाठी राज्यसभेची आवश्यकता आहे.

## राज्यघटनेची एकात्मिक वैशिष्ट्ये (Unitary Features of Indian Constitution)

**✻ प्रबळ केंद्र (Strong centre) :**

- अधिकारांची विभागणी केंद्राला अनुकूल आहे असून राज्यांना कमी महत्त्व दिले आहे.

1) केंद्र सूचीमध्ये राज्य सूचीपेक्षा जास्त विषय आहेत.
2) अधिक महत्त्वाचे विषय केंद्रसूचीत आहेत.
3) समवर्ती सूचीबाबत केंद्राला श्रेष्ठ अधिकार आहेत.
4) उर्वरित विषय केंद्राकडे सोपविलेले आहेत. (याउलट अमेरिकेमध्ये उर्वरित विषय राज्यांकडे सोपविलेले आहेत.)

**✻ राज्ये अविनाशी नाहीत (State not indestructible)**

- इतर संघराज्यांप्रमाणे, भारतातील राज्यांना प्रादेशिक अखंडतेचा अधिकार नाही. संसद एकतर्फी कृतीने कोणत्याही राज्याचे क्षेत्र, सीमा व नाव बदलू शकते. शिवाय यासाठी फक्त साध्या बहुमताची आवश्यकता आहे, विशेष बहुमताची नाही. त्यामुळे भारतीय संघराज्य हे 'विनाशी राज्यांचा अविनाशी संघ आहे' (an indestructible union of destructible states) याउलट अमेरिकेचे संघराज्य हे 'अविनाशी राज्यांचा अविनाशी संघ आहे' (an indestructible union of indestructible states) असे वर्णन केले जाते.

**✻ एक राज्यघटना (Single constitution)**

- सामान्यतः संघराज्यीय व्यवस्थेमध्ये राज्यांना केंद्रीय राज्यघटनेव्यतिरिक्त स्वतःची वेगळी राज्यघटना असण्याचा अधिकार असतो. भारतामध्ये, राज्यांना असा कोणताही अधिकार दिलेला नाही. भारतीय राज्यघटना ही केंद्राची तसेच राज्यांचीही राज्यघटना आहे. केंद्र व राज्ये या दोहोंनीही या चौकटीत काम केले पाहिजे. (याबाबतीत फक्त जम्मू आणि काश्मीरचा अपवाद होता. देशात फक्त या राज्याला स्वतःची (राज्याची) स्वतंत्र राज्यघटना होती.)

**✻ राज्यघटनेची लवचीकता (Flexibility of constitution)**

- घटनादुरुस्तीची प्रक्रिया इतर संघराज्यांइतकी ताठर नाही. राज्यघटनेतील बहुतेक भागांत साध्या बहुमताने किंवा विशेष बहुमताने संसद एकतर्फी दुरुस्ती करू शकते. खरे तर, राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव मांडण्याचा अधिकार फक्त संसदेलाच आहे. अमेरिकेमध्ये मात्र राज्येसुद्धा राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव मांडू शकतात.

**✻ राज्य प्रतिनिधित्वात समानता नाही (No equality of state respresentation) :**

- राज्यसभेत लोकसंख्येच्या आधारावर राज्यांना प्रतिनिधित्व दिले जाते. त्यामुळे सदस्यसंख्या 1 ते 31 असू शकते. याउलट अमेरिकेमध्ये वरिष्ठ सभागृहात राज्यांच्या समान प्रतिनिधित्वाचे तत्त्व पूर्णपणे मान्य करण्यात आले आहे. त्यामुळे अमेरिकेतील सिनेटमध्ये प्रत्येक राज्याचे दोन याप्रमाणे 100 सदस्य असतात. हे तत्त्व म्हणजे छोट्या राज्यांच्या संरक्षणाची उपाययोजना मानली जाते.

**✻ आणीबाणीच्या तरतुदी (Emergency provisions) :**

- राज्यघटनेमध्ये राष्ट्रीय आणीबाणी, राज्य आणीबाणी आणि आर्थिक आणीबाणी अशा तीन प्रकारच्या आणीबाणी सांगितल्या आहेत. आणीबाणीच्या काळात सर्व अधिकार केंद्राकडे एकवटतात व राज्ये पूर्णपणे केंद्राच्या नियंत्रणाखाली येतात. राज्यघटनेत औपचारिक दुरुस्ती न करता संघराज्यीय संरचना एकात्मिक संरचना बनते. अशा प्रकारचा बदल इतर कोणत्याही संघराज्यात आढळून येत नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

**❊ एकेरी नागरिकत्व (Single citizenship) :**

- दुहेरी राज्यव्यवस्था असली तरी कॅनडाप्रमाणे भारतीय राज्यघटनेनेसुद्धा एकेरी नागरिकत्व पद्धत स्वीकारली आहे. यामध्ये फक्त भारतीय नागरिकत्व आहे आणि राज्याचे स्वतंत्र किंवा वेगळे नागरिकत्व नाही.
- अमेरिका, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया अशा इतर संघराज्यीय देशात राष्ट्रीय नागरिकत्व तसेच राज्य नागरिकत्व असे दुहेरी नागरिकत्व असते.

**❊ एकात्मिक न्यायव्यवस्था (Integrated judiciary) :**

- भारतीय राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालय आणि त्याअंतर्गत उच्च न्यायालये अशी एकात्मिक न्यायव्यवस्था स्वीकारली आहे. ही न्यायालयीन पद्धती केंद्रीय कायदे व राज्य कायदे अशा दोन्ही कायद्यांची अंमलबजावणी करते. याउलट अमेरिकेमध्ये दुहेरी न्यायव्यवस्था आहे. संघराज्यीय न्यायालये संघराज्यीय कायद्यांची अंमलबजावणी करतात तर राज्य न्यायालये राज्याच्या कायद्यांची अंमलबजावणी करतात.

**❊ अखिल भारतीय सेवा (All India Services) :**

- अमेरिकेमध्ये संघराज्यीय सरकार आणि राज्य सरकारे यांच्या स्वतंत्र वेगळ्या लोकसेवा असतात. भारतातसुद्धा केंद्र व राज्ये यांच्या वेगळ्या सेवा आहेत. पण त्या व्यतिरिक्त, भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व भारतीय वनसेवा या अखिल भारतीय सेवा असून त्या केंद्र व राज्यांसाठी समान आहेत. केंद्र या सेवेतील सदस्यांची भरती करते; त्यांना प्रशिक्षण देते आणि त्यांच्यावर अंतिमतः केंद्राचे नियंत्रण असते. त्यामुळे अशा सेवांमध्ये घटनेतील संघराज्याच्या तत्त्वांचे उल्लंघन होते.

**❊ एकात्मिक लेखापरीक्षण यंत्रणा (Integrated audit machinery) :**

- भारताचा महालेखापरीक्षक केवळ केंद्र सरकारच्या लेखांचे परीक्षण करतो असे नव्हे तर तो राज्यांच्या लेखांचेही परीक्षण करतो. अशा या महालेखापालाची नियुक्ती करताना राष्ट्रपती राज्यांशी विचारविनिमय करीत नाही. त्याला पदच्युत करतानाही राष्ट्रपतींना राज्यांशी विचारविनिमय करावा लागत नाही. त्यामुळे या पदाने राज्यांची आर्थिक स्वायत्तता मर्यादित होते. याउलट अमेरिकेतील महालेखापरीक्षकाला राज्यांच्या लेख्यांबाबत काहीही भूमिका नसते.

**❊ राज्यसूचीवर संसदेचा अधिकार (parliaments authority over state list) :**

- राज्यांकडे सोपविलेल्या मर्यादित अधिकार क्षेत्राबाबतसुद्धा राज्यांकडे निव्वळ अधिकार नसतात. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने केंद्राने कायदा करावा असा ठराव राज्यसभेने संमत केल्यास संसद राज्यसूचीतील कोणत्याही विषयावर कायदा करू शकते. म्हणजेच राज्यघटनेत दुरुस्ती न करता संसदेचा कायदा करण्याचा अधिकार विस्तृत करता येतो. विशेष म्हणजे कोणत्याही प्रकारची आणीबाणीची परिस्थिती नसतानासुद्धा असे करता येते.

**❊ राज्यपालाची नियुक्ती (Appointment of governor)**

- राज्यप्रमुख असलेल्या राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपतींद्वारे केली जाते. राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत तो पदावर राहू शकतो. तो केंद्राचा प्रतिनिधी म्हणूनही काम करतो. त्याच्याद्वारे केंद्र राज्यावर नियंत्रण ठेवते. याउलट अमेरिकेच्या राज्यघटनेनुसार राज्याचा प्रमुख हा निवडून दिला जातो. या संदर्भात भारताने कॅनडाची पद्धत स्वीकारली आहे.

**❊ एकात्मिक निवडणूक प्रक्रिया (Integrated election machinery)**

- निवडणूक आयोग केंद्रीय विधिमंडळाच्या तसेच राज्य विधिमंडळाच्याही निवडणुका घेते. तथापि, निवडणूक आयोगाची स्थापना राष्ट्रपतींमार्फत केली जाते आणि त्याबाबत राज्यांना काहीही अधिकार नसतो. त्याच्या सदस्यांना काढून टाकण्याबाबतही हीच स्थिती आहे. याउलट अमेरिकेमध्ये संघराज्यीय व राज्यस्तरावर निवडणूक घेण्यासाठी वेगळ्या यंत्रणा असतात.

**❊ राज्य विधेयकांबाबत नकाराधिकार (Veto power over state bills)**

- राज्य विधिमंडळांनी संमत केलेली काही प्रकारची विधेयके राज्यपाल राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवू शकतो. पहिल्यांदाच नव्हे तर दुसऱ्यांदाही राष्ट्रपती अशा विधेयकांना मान्यता राखून ठेवू शकतो. म्हणजेच राष्ट्रपतीला राज्यांच्या विधेयकांबाबत निरंकुश नकाराधिकार (निलंबनाचा नकाराधिकार नव्हे) आहे. मात्र अमेरिकेत आणि ऑस्ट्रेलियात राज्यांना त्यांच्या अधिकारक्षेत्रात स्वायत्तता आहे आणि अध्यक्षाने विधेयक राखून ठेवण्याची तरतूद नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

## संघराज्यीय प्रणालीचे टीकात्मक मूल्यमापन

- भारतीय संघराज्यीय पद्धतीचे विविध विचारवंतांनी पुढील प्रकारे वर्णन केले आहे.

✻ **के. सी. व्हिअर :** भारतीय राज्यघटना 'अर्ध-संघराज्यात्मक' (Quasi-federal) आहे.

- 'भारतीय संघराज्य दुय्यम एकात्मिक वैशिष्ट्ये असलेले संघराज्य असण्यापेक्षा दुय्यम संघराज्यीय वैशिष्ट्ये असलेले एकात्मिक राज्य आहे,' असे म्हटले आहे.

✻ **ॲपलबाय :** भारतीय प्रणाली 'बव्हंशी संघराज्यीय' (Extremely federal) आहे.

✻ **मॉरीस जोन्स :** भारतीय प्रणाली 'वाटाघाटचे संघराज्य' (Bargaining federalism) आहे.

✻ **आयवॉर जेनिंग्ज :** 'केंद्र प्रबल असलेले संघराज्य' आहे.

- 'भारतीय राज्यघटना ही राष्ट्रीय एकात्मता आणि विकास साधण्यासाठी विशेष उपाययोजना असलेली मुख्यतः संघराज्यीय प्रणाली आहे,'.

✻ **अलेक्झांड्रोविझ :** 'भारताची प्रणाली ही एकमेवाद्वितीय आहे'.

✻ **ग्रॅनव्हिले ऑस्टिन :** 'भारताच्या संघराज्यप्रणालीला सहकारी संघराज्यप्रणाली' (Co-operative federalism) आहे.

✻ **के. संथानम् :** राज्यघटनेचा एकात्मिकतेकडे वाढता कल (केंद्रीकरण) असण्यास दोन कारणे :

1) आर्थिक बाबींमध्ये केंद्राचे प्राबल्य व राज्ये केंद्रीय अनुदानावर अवलंबून असणे.

2) राज्यातील विकास प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणाऱ्या प्रबल नियोजन आयोगाचा उदय.

✻ **एस.आर.बोम्मई केस (1994) :** 'राज्यघटनेचे स्वरूप संघराज्यीय असून हे घटनेचे मूलभूत वैशिष्ट्य आहे,' असे सर्वोच्च न्यायालयाने बोम्मई खटल्यात (1994) म्हटले आहे. 'राज्यघटनेत जरी राज्यांपेक्षा केंद्राला जास्त अधिकार असले तरी राज्ये म्हणजे केवळ केंद्राचा दुय्यम जोडलेला भाग नव्हे. राज्यांना स्वतःचे घटनात्मक अस्तित्व आहे. राज्ये म्हणजे केंद्राचे प्रतिनिधी किंवा अपत्य नाहीत. त्यांच्याकडे सोपविलेल्या क्षेत्रात राज्ये सर्वोच्च आहेत. जरी आणीबाणीच्या काळात आणि काही अपवादात्मक परिस्थितीत त्यांचे अधिकार केंद्र आपल्याकडे घेत असले तरी त्यामुळे राज्यघटनेचे संघराज्य हे मूळ वैशिष्ट्य नष्ट होत नाही. हे केवळ अपवाद आहेत आणि अपवाद म्हणजे नियम नव्हे. भारतीय राज्यघटनेतील संघराज्यीय प्रणाली ही प्रशासकीय सोय नसून हे एक तत्त्व आहे आणि हे तत्त्व आपल्या स्वतःच्या प्रक्रियांवर व वास्तवाच्या आकलनावर आधारलेले आहे' असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते.

Dilip Sir's STEP UP Academy

# राज्यांची निर्मिती (Formation of States)

- भारत : संघराज्य (Federation) प्रदेश (परंतु राज्यघटनेत 'राज्यांचा संघ' (Union of states) असा उल्लेख.)
- राज्यघटनेतील पहिला भाग (कलम 1 ते 4) हा भारताच्या भूप्रदेशाबाबतच्या तरतूदीबाबत आहे.

**✲ कलम 1 : संघराज्याचे नाव व राज्यक्षेत्र**

- कलम 1 (1) : इंडीया म्हणजेच भारत (India i.e. Bharat) हा राज्यांचा संघ असेल.
- कलम 1 (2) : घटकराज्ये आणि के.प्र. (States and Union Teritory) यांची नावे आणि त्यांचे भूप्रदेश
- कलम 1 (3) : भारतीय भूपद्रेशाचे तीन गटात वर्गीकरण i) राज्याचा भूप्रदेश ii) केंद्रशासित प्रदेश iii) कोणत्याही वेळी भारत सरकारने मिळवलेला भूप्रदेश

- भारताचा संघ आणि भारताचा भूप्रदेश वेगवेगळ्या संकल्पना
- सध्या एकूण राज्ये : 28 आणि केंद्रशासित प्रदेश : 8
- राज्यघटनेतील तरतूदी : सर्व राज्यांना लागू (अपवाद : जम्मू काश्मीर)
- कलम 371 (भाग 21) : विशेष राज्यांसाठी
- तसेच 5 व्या व 6 व्या अनुसूचीत काही प्रदेशाविषयी प्रशासनाबाबत स्वतंत्र तरतूदी

**✲ कलम 2 : नवीन राज्यांबाबतचे संसदेचे अधिकार**

1) योग्य अटी व करारांवर कायद्याद्वारे नवीन राज्य संघराज्यात दाखल करून घेण्याबाबत
2) नवीन राज्य स्थापन करण्याबाबत
   (हे कलम भारतीय संघाचा भाग नसलेल्या नवीन राज्याच्या स्थापनेशी संबंधीत)

**✲ कलम 3 : भारतातील राज्यांची पुनर्रचना (State reorganisation) करण्याबाबत संसदेचा अधिकार**

1) कोणत्याही राज्याचा भूप्रदेश वाढवणे.
2) कोणत्याही राज्याचा भूप्रदेश कमी करणे.
3) कोणत्याही राज्याच्या सीमा बदलणे.
4) कोणत्याही राज्याचे नाव बदलणे.
5) कोणत्याही राज्यामधून भूप्रदेश अलग करून/ दोन वा अधिक राज्यांना किंवा राज्यांच्या प्रदेशाला एकत्रित करून /कोणत्याही राज्याच्या भूभागाला इतर कोणताही प्रदेश जोडून नवीन घटकराज्य निर्माण करता येईल.

- नवीन केंद्रशासित प्रदेश बनविण्याची तरतूद कलम 3 मध्येच अंतर्भूत आहे. (18 वी घ.दु. 1966)

- **परंतू त्यासाठी**

- असे विधेयक संसदेत मांडण्याअगोदर राष्ट्रपतींची पूर्व संमती आवश्यक आहे.
- असे विधेयक राष्ट्रपती आपली शिफारस देण्यापूर्वी संबंधित राज्याच्या विधिमंडळापूढे (State legislature) ठेवतात.
- त्यासाठी ठरावीक कालावधी राष्ट्रपती देतात किंवा मुदत वाढवू शकतात. (म्हणजेच fix कालावधी नमूद नाही.)

- **म्हणजेच यावरून असे दिसते की,**

- राज्यविधिमंडळाचे मत संसदेवर किंवा राष्ट्रपतींवर बंधनकारक नाही.
- प्रत्येक वेळी (दुरुस्ती केल्यावर) विधिमंडळाचा विचार घ्यावाच असेही बंधन संसदेवर नाही.
- केंद्रशासित प्रदेशाबाबत संबंधित विधिमंडळाचा विचार घेण्याची आवश्यकता नसते.
- शिफारस मागितल्यामुळे राज्ये या प्रक्रियेत सहभागी होतात.

**✲ कलम 4 :**

- कलम 2 आणि 3 अंतर्गत करण्यात येणारे बदल हे कलम 368 नुसार घटनादुरुस्ती मानता येणार नाही.
  (म्हणजेच विधेयकास मंजूरी साध्या बहुमताने होते)
  (बेरूबारी केस : 1960 – 9 वी घटनादुरुस्ती)

**राज्यांची निर्मितीबाबतचे विविध आयोग (Commission)**

**1) एस. के. धर आयोग, 1948 :**

- अहवाल – डिसेंबर 1948.
- शिफारस : भाषा / संस्कृती ऐवजी नवीन राज्यांची निर्मिती प्रशासकीय सोयीनुसार व्हावी.
- भाषावार प्रांत रचनेची ही योग्य वेळ नाही
- भाषावार प्रांत रचना ही भारताच्या ऐक्यास व एकात्मतेस मारक ठरेल.

**2) जे.व्ही.पी. समिती** : डिसेंबर 1948.

- काँग्रेस पक्षाने स्थापन अहवाल – एप्रिल – 1949.
- शिफारस : भाषावार प्रांत रचना मान्य परंतू योग्य वेळ आलेली नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

- यानंतर तेलगू भाषिक प्रदेशात आंदोलन
- दरम्यान पोट्टी श्रीरामलू : आंध्र काँग्रेसचे सदस्य - यांनी 56 दिवसांचे उपोषण व त्यानंतर त्यांचा मृत्यू
- 1953 : आंध्र प्रदेश निर्मितीची घोषणा

3) **राज्य पुनर्रचना आयोग, 1953 (State reorganisation commission) :**

- अहवाल - सप्टेंबर 1955
- अध्यक्ष : फाजल अली
- सदस्य : के.एम. पन्नीकर, हृदयनाथ कुंझरू
- भाषिक आधारावर राज्यांची पुनर्रचना मान्य (एक भाषा - एक राज्य हे तत्त्व अमान्य)
- त्यांची शिफारस : 16 घटकराज्ये व 3 केंद्रशासित प्रदेशांची निर्मितीची

**1 नोव्हेंबर 1956 : परंतू प्रत्यक्षात 14 घटकराज्ये 6 केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती**

**✻ घटकराज्ये :**

1) आंध्र प्रदेश
2) आसाम
3) बिहार
4) बॉम्बे
5) जम्मू आणि काश्मीर
6) केरळ
7) मध्यप्रदेश
8) मद्रास
9) म्हैसूर
10) ओरिसा
11) पंजाब
12) राजस्थान
13) उत्तर प्रदेश
14) पश्चिम बंगाल

**✻ केंद्रशासित प्रदेश :**

1) दिल्ली
2) हिमाचल प्रदेश
3) अंदमान आणि निकोबार
4) मणिपूर
5) त्रिपूरा
6) लक्कदीव, मिनीकॉय आणि अमीनदीवी बेटे

**1956 नंतर निर्माण झालेली राज्ये**

- 1960 : महाराष्ट्र आणि गुजरात (गुजरात 15 वे राज्य)
- 1961 : दादरा आणि नगर हवेली (के.प्र. 10 वी घटनादुरुस्ती)
- 1962 : गोवा, दमण आणि दीव (के.प्र. 12 वी घटनादुरुस्ती)
- 1962 : पाँडीचेरी (के.प्र. 14 वी घटनादुरुस्ती)
- 1963 : नागालँड (16 वे राज्य)
- 1966 : हरीयाणा (17 वे राज्य) आणि चंदीगड (के.प्र.)
- 1971 : हिमाचल प्रदेश (18 वे राज्य)
- 1972 : मणिपूर (19 वे राज्य)
  - त्रिपूरा (20 वे राज्य)
  - मेघालय (21 वे राज्य)
- 1974 : सिक्कीम (35 वी घटनादुरुस्ती : सोबती राज्य (Associated state))
- 1975 : सिक्कीम (36 वी घटनादुरुस्ती : 22 वे राज्य)
- 1987 : मिझोरम (23 वे राज्य)
  - अरूणाचल प्रदेश (24 वे राज्य)
  - गोवा (25 वे राज्य)
- 2000 : छत्तीसगड (26 वे राज्य)
  - उत्तरांचल (27 वे राज्य)
  - झारखंड (28 वे राज्य)
- 2014 : तेलंगणा (29 वे राज्य)
- 2019 : जम्मू-काश्मीर आणि लडाख या दोन राज्यांना केंद्रशासित प्रदेश करण्यात आले.
- 2019 : दादरा नगर हवेली आणि दमण दीव या दोन केंद्रशासित प्रदेशांना एकत्र करून याचे नाव दादरा नगर हवेली आणि दमण दीव असे करण्यात आले.

**✻ नावात बदल :**


- 1950 : संयुक्त प्रांत-उत्तर प्रदेश
- 1969 : मद्रास-तामिळनाडू
- 1973 : म्हैसूर-कर्नाटक
- 1973 : लकदीव,मिनिकॉम व अमिनदिवी बेटे - लक्षद्विप
- 1992 : दिल्लीला NCR चा दर्जा (69 वी घटनादुरुस्ती)
- 2006 : उत्तरांचल-उत्तराखंड
- 2006 : पाँडिचेरी-पुदुचेरी
- 2011 : ओरिसा-ओडिशा

Dilip Sir's STEP UP Academy


## ✻ नविन राज्यांची मागणी :




Demand of New States
Current States and Union Territories
Aspirant States
Other proposals
Jammu and Kashmir
Panun Kashmir
Ladakh
Himachal Pradesh
Punjab
Chandigarh
Uttarakhand
Haryana
Delhi
Harit Pradesh
Maru Pradesh
Rajasthan
Awadh
Uttar Pradesh
Purvanchal
Bhojpuri
Bihar
Mithila
Gorkhaland
Sikkim
Kamtapur
Bodoland
Assam
Karbi Anglong
Dimaraji
Nagaland
Arunachal Pradesh
Meghalaya
Manipur
Tripura
Mizoram
West Bengal
Jharkhand
Bundelkhand
Vindhya Pradesh
Bagelkhand
Mahakoshal
Madhya Pradesh
Gujarat
Saurashtra
Chhattisgarh
Kosal
Orissa
Vidarbha
Gondwana
Daman and Diu
Dadra and Nagar Haveli
Maharashtra
Telangana
Andhra
Andhra Pradesh
Yanam (Puducherry)
Goa
Karnataka
Rayalaseema
Tulu Nadu
Kodagu
Mahe (Puducherry)
Kongu Nadu
Puducherry
Karaikal (Puducherry)
Karaikal
Tamil Nadu
Kerala
Lakshadweep
Andaman and Nicobar Islands






Jammu and Kashmir
Panun Kashmir
Ladakh
Himachal Pradesh

Haryana
Maru Pradesh
Rajasthan
Gujarat
Saurashtra


Uttarakhand
aryana
Delhi
Harit Pradesh
Awadh
Uttar Pradesh
Sikkim
Gorkhaland
Purvanchal
Mithila
Kamtapur
Bhojpuri
Bihar
Bundelkhand
Vindhya Pradesh
Bagelkhand
Jharkhand
Mahakoshal
West Bengal
Madhya Pradesh


Madhya Pradesh
West Bengal
Chhattisgarh
Kosal
Vidarbha
Orissa
Gondwana
Maharashtra


Telangana
Andhra
Yanam (Puducherry)
Andhra Pradesh
Goa
Karnataka
Rayalaseema
Tulu Nadu
Kodagu
Mahé (Puducherry)
Puducherry
Kongu Nadu
Karaikal (Puducherry)
Karaikal
Tamil Nadu
Kerala
dweep


Arunachal Pradesh
Bodoland
Assam
Karbi Anglong
Nagaland
Meghalaya
Dimaraji
Manipur
Tripura
Mizoram

# नागरिकत्व (Citizenship)

- या बाबतच्या तरतुदी राज्यघटनेच्या भाग 2 मध्ये (कलम 5 ते 11) नमूद आहेत.
- घटनेत 26 जानेवारी 1950 रोजी कोणती व्यक्ती भारताचे नागरिक असेल याबाबतच्या तरतूदी दिलेल्या आहेत. परंतु त्यानंतर नागरिकत्वाचे संपादन (Acquisition) किंवा समाप्ती (Termination) कशी होईल, याबाबतच्या तरतुदी नमूद नाहीत.
- **कलम 11** : नागरिकत्वाचे संपादन (Acquisition) व समाप्ती (Termination) आणि नागरिकत्वाबद्दलच्या अन्य बाबी संसद कायद्याद्वारे नमूद करेल. असे कलम 11 मध्ये नमूद होते यावरून संसदेने नागरिकत्व कायदा, 1955 संमत केला आणि त्या वेळोवेळी बदल केलेला आहे.

**✼ घटनेच्या सुरूवातीला नागरिकत्वासाठी घटनेतील तरतुदी :**

- **कलम 5** : घटनेच्या सुरूवातीस भारतात वास्तव्य करणारी प्रत्येक व्यक्ती नागरिक असेल, जर ...
  1) तिचा जन्म भारतात झाला होता.
  2) तिच्या आईवडिलांपैकी कोणा एकाचाही जन्म भारतात झाला होता.
  3) ती मागील कमीत कमी पाच वर्षापासून भारतात वास्तव्य करत असेल. (वरील कोणतेही एक).
- **कलम 6** : पाकिस्तानातून भारतात स्थलांतर करून आलेली व्यक्ती. घटनेच्या सुरूवातीला भारताचा नागरिक मानले जाईल, जर....

अ) तिचा/तिच्या आई-वडिलांपैकी एकाचा/तिच्या आजी आजोबांपैकी एकाचा जन्म अविभाजित भारतात (Undivided India) झाला असेल आणि :

i) अशा व्यक्तीने 19 जुलै 1948 पूर्वी स्थलांतर (Migration) केले असेल व तेव्हापासून ती भारतात सामान्यतः निवासी असेल.

ii) अशा व्यक्तीने 19 जुलै 1948 नंतर स्थलांतर (Migration) केले असेल व घटनेच्या लागू होण्यापूर्वी सक्षम अधिकाऱ्याकडे अर्ज करून नागरिक म्हणून नोंदणी केली असेल परंतु असा अर्ज करण्यापूर्वी ती व्यक्ती भारतात सलग 6 महिने निवासी असेल.

- **कलम 7** : 1 मार्च 1947 नंतर भारतातून पाकिस्तानात स्थलांतरित झालेली व्यक्ती पुन्हा स्थायिक होण्यासाठी भारतात परत आली असेल आणि यासाठी नोंदणीचा अर्ज करण्यापूर्वी सहा महिने तिचे भारतात वास्तव्य असेल. (ही तरतूद 1 मार्च 1947 ते 26 जानेवारी 1950 पर्यंतच्या कालावधी दरम्यान झालेल्या स्थलांतरितांसाठी आहे. नंतरचे स्थलांतरण बाबत 1955 चा कायदा भाष्य करतो.)
- **कलम 8** : एखादी व्यक्ती/तिच्या आई वडिलांपैकी/तिच्या आजीआजोबांपैकी कोणीही एक अविभाजित भारतात जन्मले होते आणि ती व्यक्ती आता भारताबाहेर निवास करते आहे अशा व्यक्तीने राहत असलेल्या देशातील भारताच्या प्रतिनिधीकडे घटनेच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर नागरिकत्वासाठी केलेल्या अर्जावरून जर अशा प्रतिनिधीने तिची भारतीय नागरिक म्हणून नोंद केली असेल तर ती व्यक्ती भारताचा नागरिक होऊ शकते.

**✼ नागरिकत्वाबाबत इतर तरतुदी :**

- **कलम 9** : एखाद्या व्यक्तीने परकीय देशाचे नागरिकत्व स्वेच्छेने (Voluntarity) स्विकारले तर ती भारताचा नागरिक राहणार नाही.
- **कलम 10** : नागरिक असलेल्या प्रत्येक व्यक्तीस संसदेने केलेल्या कायद्याच्या अधीन राहावे लागेल.
- **कलम 11** : नागरिकत्वाबाबत तरतूदी करण्याचे अधिकार संसदेस असतील.

**नागरिकत्व कायदा, 1955**

- या कायद्यात नागरिकत्व मिळवण्याचे पाच मार्ग सांगितले आहेत.

**अ) जन्माद्वारे (By Birth)**

1) 26 जानेवारी 1950 ते 1 जुलै 1987 पूर्वी भारतात जन्मलेली व्यक्ती भारताचा नागरिक असेल (आई-वडिलांच्या राष्ट्रीयत्वाचा विचार न करता)

2) 1 जुलै 1987 पासून पुढे जन्मलेली व्यक्ती भारताचा नागरिक असेल जर त्याच्या जन्माच्यावेळी त्याच्या आई-वडिलांपैकी कोणी एक भारताचा नागरिक असेल.

Dilip Sir's STEP UP Academy

3) 3 डिसेंबर 2004 पासून पुढे जल्मलेली व्यक्ती भारताचा नागरिक असेल जर :

अ) त्याच्या जन्मावेळी आई-वडील दोघेही भारताचे नागरिक असतील किंवा

ब) त्याच्या आई-वडिलांपैकी एक भारताचा नागरिक असेल आणि दुसरा बेकायदेशिर स्थलांतरित नसेल

4) अपवाद : भारतात नियुक्त असलेले परकीय राजदूत अधिकारी (Foreign Diplomat) व शत्रू परकीयांची मुले. हे जन्माने भारतीय नागरिक होवू शकत नाही.

**ब) वंशाद्वारे (By Descent) :**

1) 26 जानेवारी 1950 ते 10 डिसेंबर 1992 दरम्यान भारताबाहेर जन्मलेली व्यक्ती वंशाद्वारे भारताचा नागरिक असेल, जर त्याच्या जन्मावेळी त्याचे वडील भारताचे नागरिक असतील.

2) 10 डिसेंबर 1992 पासून पुढे भारताबाहेर जन्मलेली व्यक्ती भारताचा नागरिक असेल तर त्याच्या जन्मावेळी त्याच्या आई-वडिलांपैकी कोणीही एक भारताचा नागरिक असेल.

3) 3 डिसेंबर 2004 नंतर भारताबाहेरील जन्मलेली व्यक्ती वंशत्वाद्वारे भारतीय नागरिक होणार नाहीत.

त्यासाठी जन्म झाल्यावर 1 वर्षाच्या आत/केंद्र सरकारच्या परवानगीने जर जन्माची नोंदणी भारतीय प्राधिकृत अधिकाऱ्याकडे केली तर ती व्यक्ती भारतीय नागरिक बनू शकते.

**क) नोंदणीद्वारे (By Registration) :**

1) भारतीय वंशाची व्यक्ती की जी नोंदणीसाठी अर्ज करण्यापूर्वी सामान्यतः सात वर्षे भारतात वास्तव्य केलेली असावी.

2) अविभाजीत भारत सोडून इतर ठिकाणी सामान्यपणे वास्तव्य करणारी भारतीय वंशाची व्यक्ती

3) भारतीय नागरिकाशी विवाह केलेली व्यक्ती जी नोंदणीसाठी अर्ज करण्यापूर्वी सामान्यतः सात वर्षे भारतात राहत होती.

4) भारतीय नागरिक असलेल्या व्यक्तीची अज्ञान मुले.

5) भारतीय नागरिक असलेल्या आई-वडिलांची सज्ञान व पात्र मुले.

5) जी व्यक्ती सज्ञान व पात्र आहे आणि ती/तिचे आई-वडिलांपैकी एक स्वतंत्र भारताचे नागरिक असेल आणि नोंदणीसाठी अर्ज करण्यापूर्वी लगतच अगोदर एक वर्ष भारतात राहत असल्यास.

6) भारताचा परदेशस्थित नागरिक (Overseas Citizen) म्हणून 5 वर्षे नोंदणी असलेली सज्ञान व पात्र व्यक्ती जर ती नोंदणीसाठी अर्ज करण्यापूर्वी लगतच अगोदर एक वर्ष भारतात वास्तव्य करीत असेल.

- **अर्जदार सामान्यपणे निवासी आहे हे समजण्यासाठी :**

अ) नोंदणीसाठी अर्ज करण्यापूर्वीच्या 1 वर्ष त्याचे भारतात वास्तव्य असायला हवे.

ब) वर उल्लेखलेल्या एक वर्ष कालावधीच्या अगोदरच्या आठ वर्षात सहा वर्षांपेक्षा जास्त काळ त्याचे भारतात वास्तव्य असायला हवे.

**ड) स्वीकृतीने (By Naturalisation) :**

केंद्र सरकार अर्ज केलेल्या व्यक्तीच्या नावावर विचार करून नागरिकत्व देऊ शकते (बेकायदेशीर स्थलांतरीत सोडून)

- **अटी :**

1) ती व्यक्ती अशा देशाची नागरिक नसावी की जेथे भारतीयांना स्वीकृती तत्त्वाद्वारे नागरिक बनण्यास प्रतिबंध आहे.

2) भारतीय नागरिकत्व स्वीकारल्यास दुसऱ्या देशाचे नागरिकत्वाचा त्याग करावा लागेल हे मान्य असल्यास.

3) अर्ज करण्याच्या लगतच्या 1 वर्षात ती व्यक्ती भारतात सलग वास्तव्यास असावी / भारत सरकारच्या सेवेत असावी / दोन्ही अंशतः.

4) वरील नमूद 1 वर्षाच्या लगतपूर्वीच्या 14 वर्षांच्या काळात त्याने किमान 11 वर्षे भारतात वास्तव्य केले असावे किंवा भारत सरकारच्या सेवेत असावे किंवा अंशतः दोन्ही.

5) त्या व्यक्तीचे चारित्र्य चांगले असावे.

6) त्या व्यक्तीस घटनेतील परिशिष्ट 8 मधील नमूद कोणत्याही एका भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.

- या व्यतिरिक्त विज्ञान, तत्त्वज्ञान, कला, साहित्य, जागतिक शांतता किंवा मानव विकास यात अतुलनीय काम केलेल्या व्यक्तीस भारत सरकार वरील अटी शिथिल करू शकते.

**इ) क्षेत्र विलिनिकरणाद्वारे (By Incorporation of Territory) :**

- भारत सरकार अशा प्रदेशातील व्यक्ती नागरिक होण्यासाठी अटी व शर्ती लागू ठरवू शकते.
- नागरिकत्वाचा लोप/समाप्ती : नागरिकत्व कायदा 1955 मध्ये नमूद आहेत.

अ) नागरिकत्वाचा त्याग करणे (By Renunciation)

ब) नागरिकत्व संपुष्टात येणे (By Termination)

क) नागरिकत्व काढून घेणे (By Deprivation)

- **केंद्र सरकार पुढील आधारांवर असे करू शकते :**

अ) फसवेगिरी करून/खोटी माहिती देऊन नागरिकत्व मिळवलेले असल्यास.

ब) भारताच्या संविधानाप्रती अनिष्ठा दर्शवल्यास.

क) युद्धादरम्यान शत्रूशी बेकायदेशीर व्यापार/संपर्क केल्यास

ड) नोंदणी/स्वीकृती तत्त्वाद्वारे नागरिकत्व बनलेल्या व्यक्तीला पाच वर्षाच्या आत कोणत्याही देशात दोन वर्षाच्या कालावधीसाठी कारावासाची शिक्षा मिळाल्यास.

इ) एखादा नागरिक सलग 7 वर्षे भारताबाहेर सामान्यतः निवासी असल्यास (विद्यार्थी, सरकारी सेवेतील व्यक्ती इ. वगळता)

- **काही महत्त्वाची माहिती :**

1) अनिवासी भारतीय (Non Resident Indian) : असा भारतीय नागरिक ज्याचे समान्यतः भारताच्या बाहेर वास्तव्य आहे व तो भारतीय पासपोर्ट धारण करतो.

2) मूळ भारतीय व्यक्ती (Person of Indian Origin - PIO) : अशी व्यक्ती/ज्याच्या पूर्वजांपैकी एक भारतीय नागरिक होते, मात्र सध्या तो दुसऱ्या देशाचा नागरिक आहे.

3) पी. आय. ओ. कार्डधारक (PIO Card holder) : 2002 पासून.

- **पात्रता :**

अ) पूर्वी त्याने कोणत्याही वेळी भारताचा पासपोर्ट धारण केलेला असावा. किंवा

ब) तो/त्याचे पूर्वज भारतात जन्मलेले व वास्तव्य करणारे असावे. किंवा

क) वरीलप्रमाणे मूळचा भारतीय व्यक्ती असणाऱ्या/नागरिक असणाऱ्या व्यक्तीशी विवाहीत असावा.

Dilip Sir's STEP UP Academy

# मूलभूत हक्क (Fundamental Rights) भाग तीन : कलम 12 ते 35

- "Rights in fact are those conditions of social life without which no man can seek in general, to be himself at his best." - Prof. Laski
- प्रेरणा : अमेरिकेतील राज्यघटना – Bill of Rights
- मूलभूत अधिकारांना प्रथम घटनात्मक स्थान : अमेरीकेत
- मूलभूत अधिकार हे व्यक्तीच्या सर्वांगिक विकासासाठी आवश्यक
- याची गरज : व्यक्तीमत्व, बौद्धीक, अध्यात्मिक, शारीरिक, मानसिक विकास होण्यासाठी.

**※ मूलभूत अधिकार :**

- कायदेशीररित्या बंधनकारक – कोणावर? – राज्यावर (कारण ते द्यावेच लागतात.)
- यांचे संरक्षण करण्यासाठी घटनेत तरतूद : कलम 32 नुसार, कलम 226 नुसार
- संरक्षण करण्याची जबाबदारी : सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय यांच्यावर
- ऐच्छीक जबाबदारी : उच्च न्यायालय (कारण याबाबत उच्च न्यायालयाने निर्णय दिलेच पाहीजे याचे बंधन नाही.)

**※ वैयक्तिक अधिकार :**

- हक्क अनिर्बंध नाहीत (They are not absolute but restricted)
- निर्बंध कोण लावते? :
  i) घटना स्वतः (358 व 359 कलम)
  ii) घटनेच्या आधारावर संसद कायदा करून निर्बंध लावू शकतो.
- मूलभूत अधिकारांवर संसदेने लावलेले निर्बंध योग्य व न्याय्य आहेत की नाही हे न्यायालय ठरवते.
- यांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयात दाद मागता येते.
- मुलभूत अधिकार हे राज्याच्या अधिकारावर मर्यादा समजले जातात. (मुख्यता राज्याच्या विरूद्ध समजले जातात)
- कारण ते कार्यकारी-विधीमंडळ (Executives and legislatives) यांना 'सर्वशक्तीमान' होण्यापासून थांबवतात.
- यातील काही अधिकार व्यक्तींच्या विरोधातही आहेत.
- घटनेतील काही अधिकार फक्त भारतीय नागरीकांना उपभोगता येतात तर काही अधिकार नागरिक व परकीय देशातील नागरिकांना उपभोगता येतात.

- **फक्त भारतीय नागरिकांना उपलब्ध असलेले अधिकार कलम**
- 15 : भेदभाव करण्यास मनाई (Prohibition of discrimination)
- 16 : सार्वजनिक सेवेत समान संधी (Equality of opportunity)
- 19 : विचार स्वातंत्र्य व त्याचे रक्षण (Protection of rights regarding freedom of speech)
- 29 : सांस्कृतीक व शैक्षणिक अधिकार (Cultural and educational rights)
- 30 : अल्पसंख्यांकांना शैक्षणिक संस्था स्थापण्याचा, प्रशासन करण्याचा अधिकार आहे.
  (Rights minorities to establish and administer educational institutions)
- राजकीय लोकशाही (Political democracy) स्थापन करण्यास मदत करतात.
- व्यक्तींबरोबर संस्थांनाही मुलभूत हक्कांचा उपभोग घेता येतो.
- काही अधिकार नकारात्मक तर काही सकारात्मक (Negative and positive rights) आहेत.
- आणीबाणीत (Emergency) मुलभूत हक्क तहकूब होऊ शकतात.

- **अपवाद :** कलम 20 व 21 कधीही तहकूब होत नाही.
- कलम 20 : अपराधांच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण
- कलम 21 : जीवीत व व्यक्तीगत स्वातंत्र्याचे संरक्षण
- आणीबाणी काळातही कलम 32 पूर्णपणे तहकूब न होता कलम 20 व 21 यांचे संरक्षण करू शकते.
- कलम 19 हे फक्त बाह्य आणीबाणीत (परकीय आक्रमण/युद्ध) तहकूब होते.

**※ मुलभूत अधिकारांचे वर्गीकरण :**

- मुळ राज्यघटनेत सात अधिकार (सध्याचे 6 आहेत)

1) समतेचा अधिकार (Right to Equality) (कलम 14-18)
2) स्वातंत्र्याचा अधिकार (Right to Freedom) (कलम 19-22)
3) शोषणाविरूद्धचा अधिकार (Right against Exploitation) (कलम 23-24)
4) धर्मस्वातंत्र्याचा अधिकार (Right to Freedom of Religion) (कलम 25-28)

Dilip Sir's STEP UP Academy

5) संस्कृती व शिक्षणाचा अधिकार (Cultural and Educational Rights) (कलम 29-30)
6) संपत्तीचा अधिकार (Right to Property) (कलम 31)
7) घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार (Right to Constitutional Remedies) (कलम 32)

- संपत्तीचा अधिकार 44 व्या घटनादुरुस्तीनुसार (1978) 'रद्द' करण्यात आला. त्याचा घटनात्मक (Constitutional) (पूर्वी मूलभूत हक्क होता) अधिकार म्हणून कलम 300A मध्ये समावेश करण्यात आला.

✻ **कलम 12** : 'राज्य' शब्दाची व्याप्ती सांगते. (Defination of States)

- 'राज्य' या शब्दात भारताचे सरकार व संसद आणि राज्यांपैकी प्रत्येक राज्याचे शासन व विधिमंडळ आणि भारताच्या राज्यक्षेत्रातील अथवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील सर्व स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणे (LIC, ONGC) यांचा समावेश आहे.
- सर्वोच्च न्यायालयानुसार : राज्याच्या वतीने कार्य करणारी खाजगी संस्था किंवा संघटना यांचा सुद्धा कलम 12 नुसार राज्य या संज्ञेत समावेश होतो.

✻ **कलम 13(1)** : संविधानाच्या अंमलापूर्वी भारतात अंमलात असलेले असे सर्व कायदे या भागाच्या तरतूदींशी विसंगत असतील. तर ते अशा विसंगतीच्या व्याप्तीपूरते शून्यवत (lapse) असतील.

✻ **कलम 13(2)** : राज्य, या भागाने प्रदान केलेले हक्क हिरावून घेणार नाही किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि असे उल्लंघन करून तयार केलेला कायदा त्या उल्लंघनाच्या प्राप्तीपुरता शुन्यवत (Lapse) असेल.

✻ **कलम 13(3)** : कायदा म्हणजेच भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्याइतकाच प्रभावित असलेला अध्यादेश, आदेश, नियम, अधिसूचना व इतर यांचा समावेश असेल.

✻ **कलम 13(4)** : नुसार कलम 368 अंतर्गत संविधानात केलेल्या कोणत्याही सुधारणेला (घटनादुरुस्ती) या अनुच्छेदातील गोष्ट लागू असणार नाही. (24 वी घटना दुरुस्ती 1971)

## समानतेचा हक्क

✻ **कलम 14** : भारतीय प्रदेशात राज्य कोणत्याही व्यक्तीस कायदेविषयक समानता (Equality before Law) आणि कायद्याचे समान संरक्षण (Equal Protection of Law) नाकारणार नाही.

- कायदेविषयक समानता (Equality before Law) : इंग्लंडमधून घेतलेले तत्त्व
- कायद्याचे समान संरक्षण (Equal Protection of Law) : अमेरिकेतून घेतलेले तत्त्व

● **कायदेविषयक समानता (Equality before Law) :** (नकारात्मक संकल्पना)
**अर्थ** : अ) कोणत्याही व्यक्तीला कायद्यापासून विशेष सुट नाही.
ब) कायदा सर्वांना समान लागू
क) कुठलीही व्यक्ती (गरीब/श्रीमंत/वरिष्ठ किंवा कनिष्ठ, शासकिय किंवा अशासकीय) कायद्यापेक्षा श्रेष्ठ नाही.
(अपवाद : राष्ट्रपती आणि राज्यपाल - कलम 361)

● **कायद्याचे समान संरक्षण (Equal Protection of Law) : (सकारात्मक संकल्पना)**
**अर्थ** : अ) समान परिस्थितीत समान वागणूक
ब) समान परिस्थितीतील सर्वांना समान कायदा लागू
क) समानांमध्ये समानता (हे तत्त्व असमानांमध्ये समानतेचा विरोध करते) (Equality among equals)

- वरील तत्त्व आरक्षणाचा आधार आहे.

✻ **अपवाद (Exceptions) :**

✻ **कलम 361** : राष्ट्रपती (President) किंवा राज्यपाल (Governor) हे त्यांच्या नावाखाली केलेल्या कोणत्याही अधिकृत कृतीसंबंधी न्यायालयाला उत्तरदायी नसतात. (कारण : नामधारी प्रमुख)

- पदावर असताना राष्ट्रपती व राज्यपाल यांच्यावर कुठल्याही प्रकारचा फौजदारी खटला (Criminal case) दाखल करता येत नाही. (पदाचा मान राखला जावा म्हणून)
- तसे करावयाचे असल्यास त्यांना पदाचा राजीनामा (Resignation) द्यावा लागतो अथवा कार्यकाल संपल्यावर खटला चालवला जातो.
- राष्ट्रपती व राज्यपाल यांच्यावर दिवाणी खटला (Civil case) दाखल करता येतो परंतू त्याआधी त्यांना **दोन महिन्यापूर्वी** तपासप्रकरणी सुचना दिली जाते.

✻ **कलम 105** : संसदेमध्ये किंवा संसदेच्या समितीमध्ये कोणत्याही बाबतीत केलेल्या मतदानासंदर्भात किंवा वक्तव्याबाबत कोणत्याही न्यायालयात संसद सदस्याविरोधात (MP) खटला दाखल करता येत नाही.

✻ **कलम 194** : वरील प्रमाणेच राज्याच्या राज्यविधिमंडळात किंवा विधीमंडळ समितीत कोणत्याही बाबतीत केलेल्या मतदानासंदर्भात किंवा वक्तव्याबाबत कोणत्याही न्यायालयात विधिमंडळ सदस्याविरोधात खटला दाखल करता येत नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

❊ **कलम 361A** : संसदेच्या किंवा राज्यविधिमंडळाच्या कोणत्याही गृहातील कामकाजाबाबत वृत्तपत्रामध्ये किंवा रेडीओ किंवा दूरदर्शनवर प्रसिद्ध केलेल्या बहुतांशी खऱ्या अहवालाबाबत कोणत्याही व्यक्ती विरूद्ध न्यायालयात दिवाणी/फौजदारी खटला दाखल करता येत नाही.

❊ **कलम 31 सी** : कलम 14 ला कलम 31 सी हे अपवाद आहे. यात कलम 39 बी आणि 39 सी मध्ये असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्याने केलेल्या कायद्याला कलम 14 चे उल्लंघन होते या कारणावरून आव्हान देता येत नाही असे कलम 31 सी मध्ये नमूद केलेले आहे.

- विदेशी राजदूत आपल्या कार्याबद्दल स्थानिक न्यायालयाला 'उत्तरदायी' नसतात.

- सकारात्मक भेद (Positive discrimination) : सर्वांना समान आणण्यासाठी
- 'समान परिस्थितीत समान असनाऱ्यांनाच समान वागणूक देणे आणि विशिष्ट परिस्थितीत भेद मान्य करणे' हा कायद्यापुढील समतेच्या तत्त्वाचा खरा उद्देश आहे.
- कायद्यापूढील समानता हे तत्त्व 'कायद्याचे अधिराज्य' (Rule of law) या तत्त्वावर आधारित आहे.
- OBC आरक्षणाचा आधार : सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणा आहे. (संपत्तीचा आधारावर कायद्याने नाकारले आहे)
- SC/ST यांच्यात 'क्रिमीलेयर' हे तत्त्व लागू केलेले नाही हे फक्त OBC साठीच आहे.

❊ **कायद्याचे राज्य (Rule of law) : संकल्पना ए. व्ही. डीसी (इंग्लंड)**

1) राज्यास मनमानी करण्याचा अधिकार नाही. (म्हणजेच कायदा मोडला तरच शिक्षा) (Supremacy of law)
2) कायद्यापुढे समानता (सर्व नागरिकांना कायदा समान) (Equality before the law)
3) राज्यघटना ही व्यक्तींच्या हक्कांचा परिणाम म्हणून व्यक्तींचे हक्क श्रेष्ठ.

- भारतात तिसरे तत्त्व लागू होत नाही. कारण भारतात राज्यघटना ही व्यक्तींच्या हक्कांचा स्त्रोत (Source) आहे.
- सर्वोच्च न्यायालयानुसार : 'कायद्याचे राज्य' हे राज्यघटनेचे 'मूलभूत वैशिष्ट्य' आहे.

❊ **कलम 15 : भेदभाव करण्यास बंदी (No discrimination)**

- **कलम 15(1)** : कोणत्याही नागरिकाच्या बाबतीत **केवळ** धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान (Religion, race, caste, sex or place of birth) या कारणांवरून राज्य भेदभाव करणार नाही.
- **कलम 15(2)** : कोणत्याही नागरिकास वरील कारणांवरून सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकरता येणार नाही.
  अ) दुकाने, सार्वजनिक उपाहारगृहे, हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीच ठिकाणे यांत प्रवेश.
  ब) विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्याच्या जागा यांचा वापर.

- कलम 15(2) हे खाजगी व्यक्तींच्या विरुद्धही लागू ठरते.
- भेदभाव करण्याबद्दलच्या सर्वसाधारण नियमास पुढील तीन अपवाद आहेत : कलम 15(3), 15(4), 15(5).

- **कलम 15(3)** : वरील तरतुदींमुळे स्त्रिया आणि मुले यांच्यासाठी खास कायदे करण्यास शासनास प्रतिबंध असणार नाही.
- **कलम 15(4)** : या आणि कलम 29(2) यातील कोणत्याही तरतुदींमुळे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या तसेच अनुसूचीत जाती आणि जमातींच्या नागरिकांच्या विकासासाठी विशेष तरतूदी करण्यास शासनास प्रतिबंध असणार नाही. (1 ली घटनादुरुस्ती : 1951)
- **कलम 15(5)** : राज्यसंस्थेस नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरता किंवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरता राज्याचे अनुदान मिळणाऱ्या/न मिळणाऱ्या खाजगी शैक्षणिक संस्थांसहीत सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये विशेष तरतूद करू शकतो.
  (93 व्या घटनादुरुस्तीने 2005 कलम 15(5) समाविष्ट केले.)

- याच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने केंद्रिय शैक्षणिक संस्था (प्रवेशामध्ये आरक्षण) कायदा 2006 केला आहे.
- यात आय.आय.एम., आय.आय.टी. सारख्या सर्व केंद्रिय उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये ओबीसीसाठी 27% जागा आरक्षित ठेवण्यात आले. 2008 साली सर्वोच्च न्यायालयाने वरील कायदा वैध ठरवून ओबीसीमधून क्रिमिलेअर गटास वगळण्याचे निर्देश दिले.

- **कलम 15(6) : आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शिक्षणासाठी विशेष तरतूद**

  i) कलम 15(4) आणि कलम 15(5) मधील गटांव्यतिरिक्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विशेष तरतूद करण्याबाबत.

  ii) शैक्षणिक संस्थांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना 10% आरक्षणाची तरतूद.

– ही तरतूद 103 वी घटनादुरुस्ती 2019 करुन समाविष्ट

❋ **कलम 16 : सार्वजनिक नोकरीत संधीची समानता (Equality of opportunity in public employment)**

- **कलम 16(1)** : सरकारी नोकऱ्यांमध्ये सर्वांना समान संधी
- **कलम 16(2)** : कोणताही नागरीक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून सरकारी रोजगार किंवा पदासाठी अपात्र ठरणार नाही किंवा राज्य भेदभाव करणार नाही.
- **अपवाद :**
- **कलम 16(3)** : सरकारी नोकरीसाठी त्या राज्यातील किंवा केंद्रशासित प्रदेशातील निवासी असण्याची आवश्यकता बंधनकारक करू शकते.

– यासाठी सार्वजनिक रोजगार (निवासाबाबतची आवश्यकता) कायदा, 1957 हा कायदा लागू होता परंतु, 1974 साली संपुष्टात आला. सध्या फक्त अशी तरतुद तेलंगणा आणि आंध्रप्रदेश या राज्यातच आहे.

- **कलम 16(4)** : राज्य मागासलेल्या वर्गाला सरकारी सेवांमध्ये काही जागा राखीव (आरक्षित) ठेऊ शकते.
- **कलम 16(4A)** : अनुसुचित जाती व जमातींसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षण राखून ठेवता येईल. (77 वी घटनादुरुस्ती, 1995)

– अनुसूचित जाती व जमातींसाठी परिणाम स्वरूप ज्येष्ठतेसह आरक्षण असण्याची तरतूद राज्य करू शकेल. (85 वी घटनादुरुस्ती, 2001)

- **कलम 16(4B)** : आरक्षित जागा एखाद्या वर्षी भरल्या नाहीत तर, त्या कोणत्याही वर्षामध्ये त्यांना रिक्त जागांचा एक स्वतंत्र वर्ग म्हणून विचारात घेता येईल. त्या वर्षातील रिक्त जागांच्या 50% इतकी आरक्षणाची मर्यादा ठरविण्याकरिता त्या वर्गातील इतर रिक्त जागांबरोबर जमेस धरल्या जाणार नाही. (81 वी घटनादुरुस्ती, 2000)
- **कलम 16(5)** : धार्मिक संस्थेच्या कारभाराशी संबंधीत पदावर किंवा तिच्या शासक मंडळातील कोणताही सदस्य त्याच धर्माचा किंवा संप्रदायाचा अनुयायी असण्याबद्दल कायद्याने तरतूद करता येईल.
- **कलम 16(6) : आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या नोकऱ्यांसाठी विशेष तरतूद**
- कलम 16(6) : कलम 16(4) मध्ये नमूद केलेल्या गटांव्यतिरिक्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना नोकऱ्यांमध्ये जास्तीत जास्त 10% आरक्षण देण्यात येईल.

– 'आरक्षण' : हा मूलभूत अधिकार नसून संसद त्यावर कधीपण बंधने आणू शकते.

– 103 वी घटनादुरुस्तीने समाविष्ट.

❋ **कलम 17 : अस्पृश्यता नष्ट करणे (Abolition of untouchability)**

– हे कलम सर्व प्रकारची अस्पृश्यता नष्ट करते. ही तरतूद खाजगी व्यक्तींविरुद्धही नमूद आहे.

– घटनेत अस्पृश्यतेची व्याख्या दिलेली नाही.

– 'अस्पृश्यता पाळणे' यासाठी कुठल्याही प्रकारच्या शिक्षेची तरतूद घटनेत नव्हती.

– त्यासाठी Untouchability Offences Act, 1955 (अस्पृश्यता (अपराध) कायदा, 1955) करण्यात आला पुढे याचेच नाव बदलून Civil Rights Protection Act, 1976 (नागरी अधिकार संरक्षण कायदा) असे ठेवण्यात आले.

– त्याहीपुढे शिक्षेचे स्वरूप वाढवण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार निवारण) कायदा, 1989 हा कायदा करण्यात आला.

❋ **कलम 18 : पदव्यांचे संपुष्टीकरण/किताब नष्ट करणे. (Abolition of titles)**

❋ **कलम 18(1)** : शैक्षणिक आणि लष्करी पदव्या वगळता इतर पदव्या राज्य देणार नाही.
(शैक्षणिक व लष्करी पदव्या देण्यामागे कारण : गुणवत्तेत वाढ होण्यासाठी प्रोत्साहन)

❋ **कलम 18(2)** : भारतातील कोणताही नागरीक परराष्ट्रीय पदवी स्वीकारणार नाही.

❋ **कलम 18(3)** : भारताची नागरिक नसलेली कोणतीही व्यक्ती ती राज्याचे काणतेही विश्वासाचे/लाभाचे पद धारण करताना राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय कोणत्याही परकिय देशाकडून कोणताही किताब स्वीकारणार नाही.

❋ **कलम 18(4)** : कायद्याची जागा भूषवणारी (office of profit) विदेशी व्यक्ती किंवा नागरिक राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय परराष्ट्राकडून कोणत्याही प्रकारचे बक्षिस, पद किंवा किताब स्वीकारणार नाही.

– यासाठी कुठल्याही प्रकारच्या शिक्षेची तरतूद नाही. फक्त वरील कृत्य गुन्हा आहे हे घटना स्पष्ट करते.

Dilip Sir's STEP UP Academy

- बालाजी राघवर विरूद्ध भारत सरकार 1996 : राष्ट्रीय किताबांविरूद्ध जनहित याचिका - सर्वोच्च न्यायालय
- सर्वोच्च न्यायालयाचा निकाल : राष्ट्रीय किताब देणे घटनेविरूद्ध नाही.

  (कायद्याने पदव्या देऊ नये : लोकांनी व्यक्तीस तीच्या महानतेबद्दल दिल्या तर चालते)
- राष्ट्रीय पारितोषिके (पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न) वितरणाला सुरूवात 1954 साली झाली. 1977 साली जनता सरकारच्या काळात यास बंदी घातली आणि पुन्हा 1980 पासून पारितोषिके वितरणाला सुरूवात केली गेली.

## स्वातंत्र्याचा अधिकार (Right to freedom)

✻ **कलम** 19 :
- हे कलम नागरिकांना 'सहा' स्वातंत्र्याचे अधिकार देते.
- हे अधिकार सशक्त लोकशाहीस आवश्यक आहे.
- हे अधिकार राज्याच्या कारवाईपासून संरक्षण देतात. परंतु खाजगी व्यक्तीविरुद्ध नाही.

✻ **कलम 19(1)** सर्व नागरिकांना ..........

A) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा (Freedom of Speech and Expression)
- यानुसार नागरिकांना आपली मते शब्दाद्वारे, लिखानाद्वारे, छापून, चित्राद्वारे किंवा इतर मार्गाने व्यक्त करण्याचा अधिकार आहे
- सर्वोच्च न्यायालयानुसार या अधिकाराअंतर्गत खालील बाबींचा समावेश होतो.

  1) स्वतःचे व दुसऱ्याचे मत व्यक्त करणे.

  2) वृत्तपत्र स्वातंत्र्य : derived from above

  3) व्यावसायिक जाहिराती देण्याचे स्वातंत्र्य

  4) दुरध्वनी संभाषण टॅपींग घेण्याविरूद्ध अधिकार

  5) बंद विरोधी अधिकार-बंद झाल्यास (रास्ता रोको)- व्यक्ती राज्याकडे तक्रार करते-राज्य त्याविरोधी कारवाई करते.

  6) शासकिय कृती माहीत करण्याचा अधिकार म्हणजेच माहितीचा अधिकार हा मुलभूत अधिकार आहे हे सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले आहे.

  7) शांत राहण्याचा अधिकार

  8) वृत्तपत्रांवर प्रकाशित होण्याअगोदर बंधने घालण्याविरूद्ध अधिकार

  9) निदर्शनाचा अधिकार (परंतू सर्वोच्च न्यायालयाने संपाचा अधिकार हा मुलभूत अधिकार म्हणून नाकारला आहे)

B) शांततेने व निशस्त्र एकत्र जमण्याचा (Freedom of assembly)

C) संस्था किंवा संघटना किंवा सहकारी संस्था स्थापन करण्याचा (97 वी घटनादुरुस्ती, 2011 नुसार 'सहकारी संस्था' समाविष्ट) (Freedom to form associations)

D) भारतीय प्रदेशात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा (Freedom of movement)

E) भारताच्या राज्यक्षेत्रात कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा (Freedom to reside and to settle)

F) मालमत्ता मिळवणे, धारण करणे किंवा विकण्याचा : (44 व्या घटनादुरुस्तीनंतर हे उपकलम रद्द केले.)

G) कोणताही व्यवसाय, धंदा अगर व्यापार करण्याचा (Freedom of profession, occupation, trade or bussiness) हक्क असेल.
- हे अधिकार राज्याच्या कृतीच्या विरूद्ध संरक्षित आहेत. खाजगी व्यक्तीच्या विरूद्ध नाहीत.
- राज्य या अधिकारांवर घटनेच्या कलम : 19 मध्ये दिल्याप्रमाणेच बंधने घालू शकतात.

✻ **कलम 19(2)** : भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर पुढील आधारे बंधने घालण्यात येतील.

1) देशाच्या सुरक्षतेसाठी

2) देशाच्या सार्वभौमत्व व अखंडत्वासाठी (16 वी घटनादुरुस्ती, 1963)

3) परकीय राज्यांशी असणाऱ्या मैत्रीपूर्ण संबंध राखण्यासाठी

4) सार्वजनिक सुव्यवस्था (1 वी घटनादुरुस्ती, 1951)

5) नैतिकता व सभ्यपणासाठी

6) न्यायालयाचा अवमान

7) बदनामी

8) गुन्ह्यास उत्तेजन देणारे

✻ **कलम 19(3)** : शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याच्या स्वातंत्र्यावरील बंधने -
- देशाच्या सार्वभौमत्व व अखंडत्वासाठी, सभ्यता व नैतिकता या आधारावर

✻ **कलम 19(4)** : संस्था व संघ किंवा सहकारी संघटना स्थापन करण्यावर बंधने -
- देशाच्या सार्वभौमत्व व अखंडत्वासाठी, सभ्यता व नैतिकता आणि सार्वजनिक सुव्यवस्था या आधारावर
- हा हक्क संघटना स्थापन करण्याबाबत आहे परंतु संघटनेला मान्यता मिळण्याबाबत नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

- यामध्ये संस्था स्थापन न करणे व त्यामध्ये सहभागी न होणे हा पण अधिकार आहे.

❊ **कलम** 19(5) : भारताच्या कोणत्याही राज्यात मुक्तपणे संचार करण्याचा अधिकार.

- खाली दिलेली बंधने-घटनेत नमूद आहेत.
- अनुसूचित जमातींच्या प्रदेशाचे रक्षण करण्यासाठी, सामान्य लोकांचे हित.

  उदा. अंदमान निकोबारमधील 'Bo' जमात नष्ट होण्याच्या मार्गावर त्यामुळे तीथे संचार करण्यास बंदी.
- राज्याच्या सुरक्षतेशी संबंधीत (वैश्या व्यवसायावर बंधने, एड्सग्रस्त रुग्णांवर संचार करण्याचे बंधन)
- हे कलम अंतर्गत संचाराबाबत (भारतात) भाष्य करते, तर भारताबाहेरील संचाराबाबत तरतूद कलम 21 मध्ये केलेली आहे.

❊ **कलम** 19(6) : भारताच्या राज्यक्षेत्रात कोणत्याही भागात राहण्याचा किंवा स्थायिक होण्याबाबत बंधने -

1. अनुसूचीत जमातींच्या प्रदेशाचे रक्षण करण्यासाठी
2. राज्याच्या सुरक्षेसंबंधी

❊ **कलम** 19(7) : एखादा विशिष्ट व्यवसाय अगर धंदा करण्यासाठी विशिष्ट पात्रतेची अट (तांत्रिक कौशल्य) सरकार घालू शकेल किंवा एखादा व्यवसाय अगर धंदा अंशतः अगर पूर्णतः स्वतःकडे घेण्याचा अधिकार सरकारला राहील.

- जनहिताच्या दृष्टीने या स्वातंत्र्यावर कायद्याने बंधने घालण्याचा अधिकार सरकारला आहे.

  उदा. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सुरू केलेले जड उद्योगधंदे, घातक उद्योगधंदे, सावकारी यांचे नियमन.

❊ **कलम** 20 : **अपराधाबद्दल दोषी ठरवण्यासंदर्भात संरक्षण (Protection in respect of conviction for offences)**

- यानुसार जोपर्यंत प्रचलित कायद्यानुसार गुन्हा झाला आहे असे सिद्ध होत नाही तोपर्यंत व्यक्तीला अपराधाकरिता शिक्षा देता येत नाही.
- यानुसार व्यक्तीला खालील संरक्षण मिळते.

1) No ex-facto law : कोणताही दंड, कायदा ज्यादिवशी संमत झाला असेल, तो कायदा त्याअगोदर घडणाऱ्या गुन्ह्यांसाठी लागू करता येणार नाही. i.e. With Effective From (wef)

- ही तरतूद फक्त फौजदारी गुन्ह्यांकरीताच लागू आहे. दिवाणी कायदे किंवा इतर कर कायदे यासाठी नाही.

2) No double jeopardy : कोणत्याही व्यक्तीस एकाच गुन्ह्याबद्दल एकाहून अधिक वेळा शिक्षा दिली जाणार नाही.

- वरील तत्व फक्त न्यायालयासंबंधीच लागू होते. समजा एखादी व्यक्ती सरकारी कर्मचारी/अधिकारी असली तर तीची प्रशासनातून बडतर्फी होऊनही न्यायालय केलेल्या गुन्ह्यासाठी शिक्षा देते.

3) No self incrimination : एखाद्या गुन्ह्याबद्दल आरोपी असलेल्या व्यक्तीला स्वतः विरूद्ध साक्ष देण्याची सक्ती केली जाणार नाही.

- यामध्ये स्वतःविरूद्ध साक्ष न देणे म्हणजेच तोंडी व लेखी पुरावा सादर करण्याची सक्ती न करणे होय परंतु हे पुढील बाबींना लागू असणार नाही. :
  - वस्तू सादर करण्याची सक्ती
  - अंगठ्याचा ठसा, नमुना सही, रक्ताचा नमुना देण्याची सक्ती
  - शरीर दाखविण्याची सक्ती
- हे संरक्षण फक्त फौजदारी प्रक्रियेसाठी असून दिवाणी स्वरूपांच्या प्रक्रियांसाठी नाही.
- राष्ट्रीय आणीबाणीत कलम 20 तहकूब करता येत नाही.

❊ **कलम 21 : जीवित व व्यक्तीगत स्वातंत्र्याचे संरक्षण (Protection of life & personal liberty) :**

- कोणत्याही व्यक्तीचे जीवित अथवा व्यक्तीगत स्वातंत्र्य कायद्याने घालून दिलेल्या पद्धतीखेरीज हिरावून घेतले जाणार नाही.
- सर्वोच्च न्यायालयाने या मुलभूत अधिकारातून बरेचसे मुलभूत अधिकार स्पष्ट केले आहेत.

● **ते खालीलप्रमाणे :**

1) स्वच्छ व प्रदूषणविरहीत वातावरण, पाणी व हवा मिळण्याचा हक्क (Right to Livable Environment)
2) जीवन जगण्यासाठी रोजगार मिळण्याचा हक्क
3) मानवी प्रतिष्ठेसह जगण्याचा हक्क
4) एकांतात राहण्याचा अधिकार (Right to privacy)
5) निवारा मिळण्याचा हक्क
6) उत्तम आरोग्य मिळण्याचा हक्क
7) वयाच्या 14 वर्षापर्यंत मोफत शिक्षणाचा अधिकार
8) मोफत कायदेशिर सहाय्य मिळण्याचा अधिकार
9) खटला लवकर चालवण्याचा अधिकार
10) हतकडी बांधून न नेण्याचा अधिकार
11) अमानवीय वागणुकिविरूद्धचा अधिकार

Dilip Sir's STEP UP Academy

12) परदेशी प्रवासाचा अधिकार
13) वेठबिगारीविरूद्धचा अधिकार
14) पोलीस कोठडीत होणाऱ्या त्रासाविरूद्धचा अधिकार
15) अमानवीय शिक्षेच्या विरूद्धचा अधिकार
16) स्त्रीयांना प्रतिष्ठेची वागणूक मिळण्याचा अधिकार
17) जाहीर फाशीविरूद्धचा अधिकार
18) वेतन मिळण्याचा अधिकार

✻ **विधिसंमत प्रक्रिया (Procedure Established by Law) :**

- संकल्पना : इंग्लंड
- यानुसार व्यक्तीला कार्यकारींच्या चुकीच्या कृतीविरूद्ध संरक्षण मिळते परंतू विधिमंडळाच्या चुकीच्या कृतीविरूद्ध संरक्षण मिळत नाही.
- यानुसार कार्यकारींनी दिलेला आदेश किंवा नियम यास कायद्याचे पाठबळ नसेल तर न्यायालय असा आदेश व नियम रद्द करू शकतो. परंतू न्यायालय कायदा रद्द करू शकत नाही.

✻ **ए.के. गोपालन वि. मद्रास राज्य (1950)** : सुप्रीम कोर्टाने कलम 21 चा अर्थ विधीसंमत प्रक्रियेनुसारच लावला जाईल.

- यानुसार न्यायालय फक्त 3 गोष्टी बघेल.

1) कार्यकारी कृतींसाठी एक विशिष्ट कायदा आहे.
2) हा कायदा योग्य अशा विधिमंडळाने संमत केला आहे.
3) विधीमंडळाने कायदा करताना योग्य प्रक्रिया पाळली आहे.

- जर वरील तीनही गोष्टी योग्य असतील तर सर्वोच्च न्यायालय त्या पलीकडे जाणार नाही.
- सर्वोच्च न्यायालयाने कलम 21 चा अर्थ Due Process of Law यानुसार लावण्याचे नाकारले.
- या केसमध्ये व्यक्तीगत स्वातंत्र्य म्हणजे केवळ व्यक्ती व व्यक्तीचे शरीर या बाबतचे स्वातंत्र्य अशी व्याख्या सर्वोच्च न्यायालयाने केली.

✻ **कायद्याची सुयोग्य प्रक्रिया (Due Process of Law) :**

- उगम : अमेरिका
- यानुसार न्यायालय फक्त कार्यकारींची चुकीची कृती नाही तर विधिमंडळाची सुद्धा चुकीची कृती रद्द करू शकते.
- Due Process of Law हे नैसर्गीक न्यायाच्या तत्त्वावर अवलंबून आहे.

✻ **नैसर्गीक न्यायाचे तत्त्व (Principle of natural justice):**

1) कोणतीही व्यक्ती आपल्याच खटल्यात स्वतः न्यायाधिश असू शकत नाही.
2) कोणत्याही व्यक्तीची बाजू जाणून न घेता त्यास शिक्षा करू नये.
3) कुठलाही कायदा व न्याय योग्य, न्याय्य व विशिष्ट कारणांसहीत असला पाहिजे. (Fair, Just, Reasonable)

- भारतात 1978 नंतर मेनका गांधी खटल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने कलम 21 चा अर्थ Due Process of Law नुसार लावण्यास सुरूवात केली.
- या खटल्यात जीविताचा अधिकार म्हणजेच प्राणीमात्राचे अस्तित्व व जीवंत राहणे इतकेच नाही तर त्यात सन्मानाने जगण्याचा आणि मानवाचे जीवन अर्थपूर्ण ठरण्यासाठी असणाऱ्या सर्व बाबींचा समावेश होतो असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.

✻ **कलम 21A : शिक्षणाचा हक्क (Right to education) :** राज्याने 6 ते 14 वर्षे वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे अनिवार्य असेल.

- वरील कलम फक्त प्राथमिक शिक्षण मोफत देण्याची हमी देते, उच्च व व्यावसायिक शिक्षणाची नाही.
- 86 वी घटनादुरुस्ती, 12 डिसेंबर 2002 नुसार याचा समावेश मुलभूत अधिकारात करण्यात आला आहे. या अगोदर वरील तरतूदींचा समावेश राज्यांच्या मार्गदर्शक तत्वाच्या (भाग IV) च्या कलम 45 मध्ये होता.
- यानुसार कलम 45 मधील वाक्य रचनेत बदल करण्यात आला आहे.
  ''राज्य हे बालकांचे वय सहा वर्षांचे होईपर्यंत त्यांचे संगोपण करण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठीची तरतूद करेल.''
- यामुळे मुलभूत कर्तव्ये कलम 51A मध्ये सुद्धा नवीन कर्तव्याचा समावेश करण्यात आला.
  ''प्रत्येक नागरिकाने त्याच्या अपत्यास अथवा पाल्यास त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते चौदा वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे त्याचे कर्तव्य असेल.''
- सर्वोच्च न्यायालयाने 1993 मध्येच प्राथमिक शिक्षणाचा अधिकार हा कलम 21 अंतर्गत मुलभूत अधिकार आहे हे स्पष्ट केले होते : उन्नीकृष्णन खटला.
- कलम 21A, कलम 45, कलम 51A : घटनादुरुस्ती 86 वी 12 डिसेंबर 2002 नंतर लागू.

✻ **कलम 22 : अटक आणि स्थानबद्धतेविरूद्ध संरक्षण (Safeguards against arbitrary arrest & detention)**

- पुढील कलम 22(1), 22(2), 22(3) ही शिक्षात्मक स्थानबद्धता (Arbitrary arrest) विषयी भाष्य करतात. तर कलम 22(4) हे प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेविषयी (Preventive detention) भाष्य करते.

Dilip Sir's STEP UP Academy

* **कलम 22(1) :** कोणत्याही व्यक्तीस अटक करतेवेळी अटक करण्याची कारणे स्पष्ट केली जातील; तसेच त्या व्यक्तीला हव्या असलेल्या वकिलामार्फत स्वतःची बाजू मांडण्याचे स्वातंत्र्य दिले जाईल.
* **कलम 22(2) :** अटक केलेल्या प्रत्येक व्यक्तीस अटक केल्यापासून चोवीस तासांच्या अवधीत सर्वात जवळच्या न्यायाधिशापूढे हजर केले जाईल.
* **कलम 22(3) :** न्यायाधिशांनी परवानगी दिलेल्या कालावधीपेक्षा जास्त काळ कोणत्याही व्यक्तीस अटकेत ठेवता येणार नाही.
* **अपवाद :** शत्रू राष्ट्राच्या नागरिकास व प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या कायद्याखाली अटकेत असलेल्या नागरिकास वरील तिनही अधिकार उपलब्ध नसतील.
* **कलम 22(4) : प्रतिबंधात्मक स्थानबद्धता (Preventive Detention)**

- या कायद्याखाली अटकेत असणाऱ्यांस खालील अधिकार असतील.

अ) जर अशा व्यक्तीस 3 महिन्यापेक्षा जास्त काळ अटकेत ठेवायचे असेल तर त्यासंबंधीचा तसा अहवाल, त्या उच्च न्यायालयाचे कार्यरत न्यायाधिश (एक) व इतर दोन कोणत्याही उच्च न्यायालयाचे कार्यरत किंवा निवृत्त न्यायाधिश अशा त्रिसदस्यीय सल्लागार मंडळाने दिला पाहीजे.

- वरील 3 महिन्याचा कालावधी 44 व्या घटनादुरुस्तीनुसार बदलून 2 महिने केला आहे. परंतु ही तरतूद लागू करण्यात आलेली नाही.

ब) अटकेचे कारण अशा व्यक्तीला लवकरात लवकर सांगायला पाहीजे, परंतु नागरीकांच्या किंवा राष्ट्राच्या हितासाठी अशी माहीती राखून ठेवली जाऊ शकते.

क) अशा व्यक्तीस लवकरात लवकर न्यायालयात आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाईल.

- अशा प्रकारचे कायदे करण्याचे अधिकार केंद्र तसेच राज्यांनाही आहे.
- 'संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि देशाची सुरक्षा' या कारणांसाठी कायदा करण्याचा अधिकार फक्त संसदेला आहे. तर राज्याची सुरक्षा सार्वजनिक सुव्यवस्था आणि समाजाला आवश्यक असणारा पुरवठा व सेवा या संबंधी कारणांसाठी प्रतिबंधात्मक स्थानबद्धता कायदा हा राज्य विधिमंडळ तसेच संसद करू शकते.

● **या बाबत केलेले कायदे :**

1) अंतर्गत सुरक्षा राखण्यासाठी कायदा (MISA) : 1971 (रद्द : 1978)
2) दहशतवादी आणि विघातक कारवाया (प्रतिबंधक) कायदा (TADA) : 1985 (रद्द : 1995)
3) दहशतवादी कारवाया प्रतिबंधक कायदा (POTA) : 2002 (रद्द : 2004)

## शोषणाविरूद्धचे अधिकार (Right Against Exploitation)

* **कलम 23 : माणसांचा अपव्यापार व वेठबिगारी यांस मनाई (Prohibition of traffic in human being)**

- यानुसार मानवी व्यापार, वेठबिगार (Bonded labour) तसेच सक्तीची मजुरी (forced labour) यांना प्रतिबंध केला आहे.
- या कलमानुसार वरील कृती करणे गुन्हा आहे. व त्यासाठी केलेले कायदे खालीलप्रमाणे :
- किमान वेतन कायदा-1948, कंत्राटी कामगार कायदा-1970,
- वेठबिगार पद्धती (निर्मूलन)-1976, समान वेतन कायदा-1976,
- या कलमाचा वापर खाजगी व्यक्तींविरूद्ध सुद्धा करता येतो.

* **अपवाद :** सार्वजनिक कार्यासाठी कोणत्याही स्वरूपाची सक्तीची सेवा नागरिकांवर लादण्याचा हक्क आहे.

- उदा. भूकंपग्रस्त भागात सेवेसाठी डॉक्टरांना राज्य तेथे जाऊन वैद्यकिय सेवा पुरवण्याची आदेश देते.

* **कलम 24 : कारखान्यांमध्ये बालकांस कामाला मनाई (Prohibits employing children)**

- चौदा वर्षाखालील मुलांना एखाद्या कारखाण्यात, खाणीत व अन्य जोखमीच्या व धोक्याच्या ठिकाणी (hazardous profession) कामावर लावले जाऊ शकत नाही.
- बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा, 1986 : 2006 मध्ये शासनने 14 वर्षांखालील मुलांना सर्व प्रकारच्या कामावर ठेवणे (घरगुती व व्यावसायिक) गुन्हा ठरवलेला आहे व त्यासाठी शिक्षेची तरतूद केलेली आहे.
- या कायद्यात 2016 साली सरकारने सुधारणा करून बाल कामगार कमी होण्यासाठी आणखी कडक तरतुदींचा समावेश केला आहे.

Dilip Sir's STEP UP Academy

**धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार**
**(Right to Freedom of Religion)**

❊ **कलम 25(1)** : सर्व व्यक्तींना आपापल्या सद्सद्विवेक बुद्धीनुसार त्यांच्या आवडीच्या धर्माचे अंतर्गत आचरण करणे, उच्चार करणे व तसेच त्याच्या पद्धतीचे पालन करणे व प्रचार करणे, यांचे स्वातंत्र्य असेल.

(1) आपल्याला वाटेल त्या प्रकारात देवाशी असलेल्या संबंधांना आकार देणे.
(2) धर्माबद्दल असलेली श्रद्धा मनमोकळे पणाने मांडणे.
(3) धर्माची उपासना, विधी-संस्कार, सण साजरे करणे.
(4) धर्माबद्दल प्रचार करणे, त्याची तत्त्वे मांडणे.

यात दुसऱ्या व्यक्तीला सक्ती करून स्वधर्मात धर्मांतर करण्याचा अधिकार नाही.

❊ **अपवाद** : या स्वातंत्र्याचा उपभोग घेताना नागरिकाच्या सार्वजनिक सुव्यवस्था, नितीमत्ता व आरोग्य यांस बाधा होणार नाही याचे बंधन असेल.

❊ **कलम 25(2)** : वरील कलमामुळे

अ) धर्म आचरणाशी निगडीत असलेल्या कोणत्याही आर्थिक, वित्तीय, राजनैतिक किंवा अन्य धार्मिकेतर कार्याचे विनिमय करणाऱ्या किंवा त्यावर निर्बंध घालणाऱ्या

ब) सामाजिक कल्याण व सुधारणा याबाबत अथवा सार्वजनिक स्वरूपाच्या हिंदु धार्मिक संस्था, हिंदूचे सर्व वर्ग व पोट भेद यांना खुल्या करण्याबाबत तरतूद करणाऱ्या

कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही किंवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

**स्पष्टीकरण** : कृपाने धारण करणे हे शीख धर्माच्या प्रकटीकरणात समाविष्ट असल्याचे मानले जाईल. तसेच कलम 25 (2ब) मधील हिंदू म्हणजेच शीख, जैन किंवा बौद्ध धर्म प्रकट करणाऱ्या व्यक्तींचा उल्लेख समाविष्ट आहे असा त्याचा अर्थ लावला जाईल.
जबरदस्तीचे धर्मांतरण बेकायदेशिर आहे. कारण असे धर्मांतरण पैसे देऊन किंवा वेगवेगळी प्रलोभणे देऊन केले जाऊ शकते असा निष्कर्ष सर्वोच्च न्यायालयाने निकालात दिला आहे.

❊ **कलम 26** : सार्वजनिक सुव्यवस्था, नितिमत्ता व आरोग्य यांच्या अधिनतेने प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा त्यांच्या कोणत्याही गटास,

❊ **कलम 26(1)** : धार्मिक गटाला किंवा पंथाला धार्मिक कारणांसाठी संस्था स्थापन करण्याचे व ते स्वखर्चाने चालविण्याचे,

❊ **कलम 26(2)** : त्यांच्या व्यवहारांचे व्यवस्थापन करणे,

❊ **कलम 26(3)** : तसेच त्यासाठी स्थावर वा जंगम मालमत्ता मिळवण्याचे व बाळगण्याचे,

❊ **कलम 26(4)** : कायद्यानुसार अशा मालमत्तेच्या प्रशासनाचा हक्क असेल,

असे अधिकार दिले आहे.

- वरील कलम हे गटाच्या सामूहीक धर्मस्वातंत्र्याबद्दल अर्थ स्पष्ट करते.

❊ **अपवाद** : धार्मिक आचारणाशी संबंधीत आर्थिक, राजकिय व्यवहारांचे नियमन व नियंत्रण राज्य करू शकते.

❊ **कलम 27 : राज्य कोणत्याही व्यक्तीवर कोणत्याही एका विशिष्ट धर्माचे पालन करण्यासाठी सक्तीचा कर (Tax) लावू शकत नाही.**

- म्हणजेच राज्याने कराद्वारे गोळा केलेला जनतेचा पैसा कोणत्याही एका विशिष्ट धर्माच्या प्रचारासाठी वा आचारणासाठी वापरू नये. म्हणजेच राज्यशासन कोणत्याही एका धर्माची बाजू घेऊ शकत नाही व राज्य सर्व धर्मांच्या प्रचारासाठी व आचरणासाठी पैसा वापरू शकते.
- परंतू राज्य एखाद्या धार्मिक ठिकाणी पुरवल्या जाणाऱ्या सेवेंबद्दल शुल्क (फी) आकारू शकते.

❊ **कलम 28 : शैक्षणिक संस्थांमधून धार्मिक शिक्षण देण्याविषयी यांत खालील चार नियम आहेत.**

❊ **कलम 28(1)** : पूर्णतः शासकिय अनुदानांवर चालणाऱ्या संस्था - यांच्यात प्रवेशाबाबत भेदभाव होऊ शकत नाही व कुठल्याही प्रकारचे धार्मिक शिक्षण देता येत नाही.

❊ **कलम 28(2)** : पूर्णतः खाजगी पण सरकारी मान्यता असलेल्या शैक्षणिक संस्था.

❊ **कलम 28(3)** : पूर्णतः खाजगी व शासनाच्या अनुदानावर (Govt Aid) चालणाऱ्या शैक्षणिक संस्था.

कलम 28(2) व (3) यांच्यात धार्मिक शिक्षण देणे हे बंधनकारक नसते ते देऊ शकतात अथवा नाकारू शकतात.

❊ **कलम 28(4)** : धार्मिक कारणांसाठीच उभारलेल्या संस्था - अशा शैक्षणिक संस्थामध्ये धार्मिक शिक्षण दिले जाते परंतू दुसऱ्या धर्माच्या विद्यार्थ्यांना इथे प्रवेशाबाबत सक्ती केली जाऊ शकत नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

## सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार
## (Cultural and Educational Rights)

* **कलम** 29 : भारतातील **कोणत्याही भागात राहणाऱ्या नागरिकांना** स्वतःची भाषा लिपी व संस्कृती जपण्याचा व अबाधित राखण्याचा हक्क असेल. (यावरून हे कलम बहुसंख्य तसेच अल्पसंख्यांकासाठी लागू ठरते असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.)
* **कलम** 29(1) : स्वतःची वेगळी भाषा, लिपी किंवा संस्कृती असल्यास ती जपण्याचा अधिकार (गटांसाठीचा हक्क)
* **कलम** 29(2) : राज्याकडून मिळणाऱ्या निधीतून शिक्षण संस्थेत नागरिकांस धर्म, वंश, जात, भाषा यांतील कारणातून प्रवेश नाकरला जाणार नाही. (एका व्यक्तीसाठी/गटांसाठीचा हक्क)

  अल्पसंख्यांक हे धार्मिक आणि भाषिक तत्वावर ठरवले जातात.

  **उदा.**: शिख समाज – हा राज्य पातळीवर म्हणजेच पंजाब राज्यात बहुसंख्य (Majority) आहे. तर राष्ट्रीय पातळीवर शिख लोक असल्पसंख्याक (Minority) समजले जातात.
* **कलम** 30 : धार्मिक किंवा भाषिक अल्पसंख्यांकांना स्वतःचे अस्तित्व जपण्यासाठी स्वतःच्या शिक्षण संस्था स्थापन करण्याचा व त्या चालवण्याचा हक्क असेल.

  अल्पसंख्यांकांचा अर्थ घटनेत कुठेही नमूद करण्यात आलेला नाही.
* **कलम** 30(1) : धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांक वर्गांना शैक्षणिक संस्था स्थापण्याचा अधिकार.
* **कलम** 30(1A) : अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेची मालमत्ता सक्तीने संपादन करण्याची तरतूद असलेला कायदा करतांना जी भरपाईची रक्कम ठरविली जाईल त्यामुळे कलम 30(1) मधील हक्क निर्बंधित किंवा रद्द होणार नाही याची खात्री राज्यसंस्था करेल. (44 वी घटनादुरुस्ती, 1978)

  अल्पसंख्यांकाच्या शैक्षणिक संस्थांचे तीन प्रकार पडतात.

1) राज्यांकडून मान्यता मिळालेल्या व साहाय्य मिळणाऱ्या संस्था
2) राज्यांकडून मान्यता मिळालेल्या व साहाय्य न इच्छिणाऱ्या संस्था
3) राज्यांकडून मान्यता व साहाय्य दोन्हीही न इच्छिणाऱ्या संस्था

* **कलम 32 : मूलभूत हक्कांच्या घटनात्मक संरक्षणाचा हक्क (Right to Constitutional Remedies)**

- व्यक्ती सर्वोच्च न्यायालयात दाद (Appeals) मागू शकते.
- यासंबंधी निकाल देणे सर्वोच्च न्यायालयाला बंधनकारक (उच्च न्यायालयास बंधनकारक नाही)
- हक्कांच्या संबंधी संरक्षणासाठी आदेश देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.
- सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राला बाधा न आणता संसद इतर न्यायालयांना त्यांच्या कार्यक्षेत्रात असे अधिकार वापरण्याचा कायदा करू शकते. परंतु अद्याप असे झालेले नाही. (इतर न्यायालय : म्हणजेच यात उच्च न्यायालयाचा समावेश होत नाही. कारण त्यांना हा अधिकार कलम 226 द्वारा मिळालेला आहे.)
- घटनेत नमूद केलेल्या पद्धतीशिवाय सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार निलंबित करता येणार नाही. (**कलम** 359 : राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी कोणत्याही न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार राष्ट्रपती निलंबित करू शकतात.)

* **मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालय (SC & HC) खालील आदेश देते.**

**1) हॅबिअस कॉर्पस (Habeaus Corpus) : बंदी प्रत्यक्षीकरण**

**अर्थ** : To have a body of : शरीर बाळगणे.
- हा आदेश शासन (शासकिय अधिकारी) अथवा खाजगी व्यक्ती यांच्याविरूद्ध न्यायालय देऊ शकते.
- यानुसार कोणत्याही व्यक्तीस अवैध पद्धतीने तुरूंगात अटक करून ठेवता येत नाही (व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण)
- न्यायालय अटक झालेल्या व्यक्तीस त्यांच्यापुढे हजर करण्यास सांगू शकते व अटकेची वैधता ठरवू शकते. जर अटक अवैध असेल तर अशा नागरीकास लगेच मुक्त करण्यात येते.
- पुढील परिस्थितीत हा आदेश दिला जात नाही :

1) जेव्हा अटक वैध (Valid) असेल.
2) जेव्हा अटक कायदे मंडळाच्या किंवा न्यायालयाच्या अवमानासंबंधी (Offence of court or legislature) असेल.
3) जेव्हा सक्षम न्यायालयाने अटक केले असेल.
4) जेव्हा अटकेची कारणे न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेर असेल.

**2) मँडामस (Mandamus) : परमादेश**

**अर्थ** : We commands : ''आम्ही आज्ञा देतो.''

Dilip Sir's STEP UP Academy

- एखाद्या शासकिय कर्मचारी त्याचे कर्तव्य पूर्ण करत नसेल किंवा करण्यास नाकारत असेल तर न्यायालय त्यास त्याचे कार्य करण्यास आदेश देते.
- परमादेश खाजगी व्यक्ती किंवा संस्थेला देता येत नाही (कारण मूलभूत अधिकारांचे संरक्षण हे शासनाचे काम आहे.)
- पुढील परिस्थितीत परमादेश दिला जाऊ शकत नाही :
  1) खाजगी व्यक्ती किंवा संस्था विरूद्ध
  2) जेव्हा काम हे बंधनकारक नसून विवेकाधिकारावर अवलंबून असते.
  3) राष्ट्रपती किंवा राज्यपालांच्या विरूद्ध

**3) प्रोहिबिशन (Prohibition) : प्रतिषेध**

**अर्थ :** To forbid : प्रतिबंध

- कनिष्ठ न्यायालय किंवा लवाद आपल्या अधिकार क्षेत्राच्या बाहेरील खटला चालवत असेल तर वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालय किंवा लवाद यांना खटला थांबवण्याचे आदेश देते.
- हा आदेश फक्त न्यायालयीन अथवा निम्नः न्यायालयीन अधिकाऱ्यांविरूद्ध देता येतो.
- हा आदेश प्रशासकिय अधिकारी, विधिमंडळ किंवा खाजगी व्यक्ती विरूद्ध जारी करता येत नाही.
- हा फक्त काही करण्यापासून थांबवू शकतो म्हणून यास Preventive असेही म्हणतात.

**4) सर्शिओररी (Certiorary) : उत्प्रेक्षण**

**अर्थ :** "to be certified or to be informed"

- कनिष्ठ न्यायालय किंवा लवाद यांनी आपल्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर निकाल दिला असेल, किंवा न्यायालयाचा अर्थ चुकिचा लावला असेल तर वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालय किंवा लवाद यांना निकाल देण्यापासून थांबवू शकते किंवा निकाल दिला असेल तर तो रद्द करून खटला वरीष्ठ न्यायालयाकडे हस्तांतरीत करण्यास सांगू शकते. म्हणून यास Preventive and Curative म्हणतात.
- 1991 पर्यंत हे फक्त न्यायिक संस्थेविरूद्धच उपलब्ध होते. परंतू 1991 नंतर सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला की हे प्रशासकिय अधिकाऱ्यांविरूद्ध सुद्धा उपलब्ध असेल.
- विधिमंडळ व खाजगी व्यक्तींविरूद्ध हे जारी करता येत नाही.
- प्रतिषेध फक्त थांबवते तर उत्प्रेक्षण हे निकालात दुरुस्तीही करते.

**5) क्यू वॉरंटो (Que Warranto) : अधिकार पृच्छा**

**अर्थ :** "By what authority of warrent"

- याद्वारे न्यायालय व्यक्तीला त्याने ग्रहण केलेल्या शासकिय पदाची कायदेशिरता किंवा घटनात्मकता विचारू शकते.
- याद्वारे योग्य व्यक्तीच अधिकारपदी असल्याची खात्री केली जाते. हा आदेश मंत्रीपदा विरूद्ध किंवा खाजगी पदा विरूद्ध देता येत नाही.
- पहिले चार आदेश फक्त पिडीत व्यक्तिच मागू शकते तर शेवटचा आदेश पिडीत किंवा कोणीही हितसंबंधी व्यक्ती मागू शकते.

**कलम 32 बाबत केलेली काही महत्त्वाची विधाने :**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर : कलम 32 हे राज्यघटनेतील सर्वात महत्त्वाचे कलम असून हे कलम नसल्यास राज्यघटना शून्यवत होईल. हे कलम राज्यघटनेचा आत्मा आहे आणि राज्यघटनेच्या हृदयस्थानी आहे.
2) सर्वोच्च न्यायालय : कलम 32 हे राज्यघटनेचे मूलभूत वैशिष्ट्ये आहे.

| कलम 32 | कलम 226 |
|---|---|
| - यानुसार सर्वोच्च न्यायालय फक्त मुलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी आदेश जारी करू शकते, परंतु वैधानिक अधिकारांसाठी आदेश जारी करू शकत नाही. | - उच्च न्यायालय मुलभूत व वैधानिक या दोन्हीही अधिकारांच्या संरक्षणासाठी आदेश जारी करू शकते. |
| - आदेश जारी करणे हे सुप्रिम कोर्टावर बंधनकारक (Mandatory) | - ऐच्छीक (Voluntary) |
| - कार्यक्षेत्र : संपूर्ण देश | - फक्त राज्यापुरतेच |

**※ कलम 33 : संसदेला सेनेच्या मूलभूत हक्कांमध्ये बदल करण्याचा अधिकार**

1) सशस्त्र सेनेचे सदस्य
2) सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या दलांचे सदस्य
3) शासनाने गुप्तवार्ता किंवा प्रतिगुप्तवार्ता यांसाठी स्थापन केलेल्या ब्युरो किंवा इतर संस्थेचे सदस्य
4) वरील दल/ब्युरो/संस्थेच्या कामासाठी उभारलेल्या दूरसंचार यंत्रणेमध्ये कार्य करणाऱ्या व्यक्ती.

* **कलम 34 : लष्करी कायदा अंमलात असतांना मूलभूत हक्कांवर निर्बंध**
- एखाद्या भागात लष्करी कायदा अंमलात असतांना मूलभूत हक्कांवर निर्बंध आणण्यासाठी तरतूद.
- लष्करी कायद्यातंर्गत दिलेला शिक्षादेश, केलेली शिक्षा, जप्ती किंवा अन्य कृती विधिग्राह्य असल्याचे संसद घोषित करू शकते.

| लष्करी कायदा (Martial law) (संकल्पना–ब्रिटन) | राष्ट्रीय आणीबाणी (National Emergency) |
|---|---|
| - यामुळे फक्त मूलभूत हक्कांवर परिणाम होतो | - यामुळे मुलभूत हक्कांबरोबरच केंद्र राज्य संबंध तसेच यांच्यातील वैधानिक अधिकारावर परिणाम होतो |
| - यामुळे सरकार आणि सामान्य कायद्याची न्यायालये निलंबित होतात. | असे होत नाही. |
| - कोणत्याही कारणामुळे कायदा व सुव्यवस्था कोलमडल्यास लष्करी कायदा लागू होतो. | - कारणे : युद्ध, परकीय आक्रमण, सशस्त्र बंड |
| - हा कायदा विशिष्ट क्षेत्रा साठी लागू असतो. | - संपूर्ण देशात किंवा देशाच्या काही भागात लागू केली जाते. |
| - घटनेत याची स्पष्टपणे तरतूद नाही. | - घटनेत याची स्पष्टपणे तरतूद आहे. |

* **कलम 35 : मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीकरता कायदे**
- मूलभूत हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार फक्त संसदेला (राज्य विधी मंडळाला नाही) आहे.

* **कलम 35(1)** : संसदेला कायदे करण्याचा अधिकार असेलः

अ) कलम 16(3) नुसार, एखाद्या राज्य/केंद्रशासित प्रदेशातील सरकारी नोकऱ्यांसाठी त्याचा राज्य/केंद्रशासित प्रदेशाचा निवासी असल्याची आवश्यकता बंधनकारक करणारा कायदा.

ब) कलम 32(3) नुसार, मूलभूत हक्क बजावण्यासाठी निर्देश, आदेश व प्राधिलेख काढण्याचा सर्वोच्च व उच्च न्यायालयांचा अधिकार इतरही न्यायालयांना प्रदान करण्यासाठी कायदा.

क) कलम 33 नुसार, सेनेच्या मूलभूत हक्कांमध्ये फेरबदल करण्यासाठी कायदा.

ड) कलम 34 नुसार, कोणत्याही प्रदेशात लष्करी कायदा लागू असतांना सरकारी कर्मचारी किंवा अन्य व्यक्तींच्या कृतींचे संरक्षण करण्यासाठीचा कायदा.

* **कलम 35(2)** : जी कृत्ये अपराध म्हणून घोषित केली त्याबाबत शिक्षा विहित करण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार फक्त संसदेलाच आहे (राज्य विधीमंडळाला नाही).

अ) अस्पृश्यता (कलम 17)

ब) माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी (कलम 23)

**मालमत्तेच्या हक्काबाबत सद्यस्थिती (Status on Right to Property)**

- घटनेच्या सुरूवातीस कलम 19(1)(F) आणि कलम 31 मध्ये तरतूद होती.
- कलम 19(1)(F) : नागरिकांना मालमत्ता विकत घेणे, राखणे आणि विकणे हे अधिकार दिले होते.
- कलम 31 : सर्व व्यक्तींना (देशातील/परकीय) मालमत्ता हिरावून घेण्याविरोधी अधिकार प्रदान केले होते. (म्हणजेच कायद्यानुसार मालमत्ता हिरावून घेतली जाऊ शकते, इतर स्थितीत नाही)
- परंतु याबाबत पुढील दोन परिस्थितीत मालमत्ता राज्य अधिग्रहीत करेल : अ) सार्वजनिक हितासाठी
  ब) त्यासाठी मालकास नुकसान भरपाई मिळावी
  (44 व्या घटनादुरुस्तीनुसार : मालमत्ता अधिकार हा घटनात्मक आणि वैधानिक अधिकार ठरला आहे)

* **कलम 39(b)** : समुदायाच्या भौतिक संसाधनांचे स्वामित्त्व व नियंत्रण अशा तऱ्हेने नियंत्रित केले पाहिजे की त्याचा लाभ सामूहीक हितासाठी होईल.
* **कलम 39(c)** : आर्थिक व्यवस्था अशी नको की ज्यामुळे देशाच्या संपत्तीचे केंद्रीकरण होईल, उत्पादन संसाधन काहीच लोकांच्या हाती जाईल व त्यामुळे सामाजिक हितास बाधा पोहचेल.

- कलम 39b व 39c या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी संसदेने घटना दुरूस्त्या केल्या, यामुळे न्यायालय व संसद यांमध्ये वाद झाले. यावर संसदेने कलम 31a, 31b, 31c समाविष्ट केले.

* **कलम 31a** : कलम 13 मध्ये काहीही नमूद असले तरीही या कलमात नमूद 'मालमत्ता अधिग्रहणाबाबतच्या अधिकारांना' न्यायालयाचे संरक्षण नसेल.

- यात पुढील पाच कायदे आहेत की जे शेतजमीन सुधारणा, उद्योग याबाबत आहेत.

Dilip Sir's STEP UP Academy

1) राज्याने मालमत्ता अधिग्रहण करणे व त्याबाबतचे अधिकार.
2) राज्याने मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे.
3) निगमांचे एकीकरण.
4) निगमांच्या संचालकांचे किंवा भाग धारकांचे हक्क रद्द करणे / त्यात बदल करणे.
5) भाडेतत्वावरील खाणींचा करार रद्द करणे/त्यात बदल करणे.

- जेव्हा व्यक्तीची लागवडीखालील व कायदेशीर कमाल मर्यादेत असलेली जमीन राज्य अधिगृहीत करते तेव्हा त्यास बाजारभावाप्रमाणे नुकसानभरपाईची रक्कम दिली जावी अशी तरतूद या कायद्यात आहे.
- कलम 31a : पहिली घटनादुरुस्ती, 1951
- कलम 31a मधील पाच कायद्यांमुळे जर कलम 14 व कलम 19 यांनी नमूद केलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असेल तरीही, न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

※ **कलम 31 b :**
- परिशिष्ट 9 मध्ये नमूद कायद्यांमुळे/नियमांमुळे जर मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असेल तरीही त्यांना कलम 31b नुसार आव्हान देता येणार नाही किंवा रद्द ठरवले जाणार नाही.
- या कलमाची व्याप्ती ही कलम 31a पेक्षा मोठी आहे. (पहिली घटनादुरुस्ती : परिशिष्ट 9 व कलम 31b समाविष्ट केले)

सर्वोच्च न्यायालय : जानेवारी 2007 कोएल्हो वि. तामिळनाडू राज्य च्या निकालाद्वारे असे नमूद केले की परिशिष्ट 9 मधील कायद्यांना सरसकट संरक्षण नसेल. 24 एप्रिल 1973 पासून पुढील परिशिष्ट 9 मधील कायदे न्यायिक पुनर्विलोकनाच्या (Judicial review) अंतर्गत येतील जर ते घटनेचे मूलभूत संरचनेचे किंवा कलम 14, 15, 19 व 21 मधील हक्कांचे उल्लंघन करत असतील.

- 1951 मध्ये परिशिष्ट 9 मध्ये 13 कायदे/नियम होते.
- 2016 मध्ये परिशिष्ट 9 मध्ये 282 कायदे/नियम झाले.

※ **कलम 31c** : कलम 39b आणि 39c या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी बनवलेला कायदा हा कलम 14 व कलम 19 पेक्षा वरचढ असेल, तरीही अवैध (Invalid) ठरवला जाणार नाही. (कलम 31c : 25 वी घटनादुरुस्ती)
- वरील कायद्यात 42 व्या घटनादुरुस्तीने बदल करायचा प्रयत्न केला.
- कलम 31c ची व्याप्ती वाढवून 39b व 39c बरोबरच घटनेच्या भाग 4 मधील सर्व तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी केलेले कायद्यांना संरक्षण असेल असे नमूद केले.
- परंतु वरील दुरुस्ती मिनर्व्हा मिल्स खटल्यामध्ये (1980) सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य व अवैध ठरवली.

※ **भाग 3 मध्ये नमूद नसलेले काही घटनात्मक हक्क :**
1) कायद्याच्या अधिकाराशिवाय कोणताही कर आकारला जाणार नाही. (भाग 12, कलम 265)
2) कायद्याच्या अधिकाराशिवाय कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता हिरावून घेतली जाणार नाही (भाग 12, क. 300A)
3) भारताच्या क्षेत्रात मुक्तपणे व्यापार, वाणिज्य व अंतर्गत व्यवहार करता येतील (भाग 13, कलम 301)
4) लोकसभा व राज्य विधानसभा यांच्या निवडणूका प्रौढ मताधिकारावर आधारित असतील (भाग 15, कलम 326)

Dilip Sir's STEP UP Academy

## राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे (DPSP)

### भाग 4 : कलम 36 ते 51

❊ **संकल्पना :** आर्यलँडच्या घटनेपासून प्रेरित ही तत्त्वे राज्याच्या प्रशासनासाठी मूलभूत असतील व या तत्त्वांचा वापर राज्याने कायदा करताना केला पाहिजे.

- 1935 च्या भारत सरकारच्या कायद्यात नमूद असलेल्या सूचनापत्रकाशी मार्गदर्शक तत्त्वे ही साम्य दर्शवितात.
- मार्गदर्शक तत्त्वे ही कल्याणकारी राज्याची (Welfare state) संकल्पना दर्शवितात.
- सामाजिक व आर्थिक लोकशाही (Social & economic democracy) स्थापण्यासाठी (राजकिय लोकशाही : मूलभूत हक्क)
- यांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयात दाद मागता येत नाही. यांची अंमलबजावणी करणे हे राज्यांचे कर्तव्य आहे.
- हे न्यायप्रविष्ठ नाहीत.

❊ **कलम 36 :** कलम 12 प्रमाणेच

❊ **कलम 37 :** देशाच्या राज्य व्यवस्थेसाठी ही तत्त्वे मूलभूत स्वरूपाची आहेत आणि कायदे करताना ही तत्त्वे विचारात घेणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

❊ **कलम 38(a) :** सामाजिक, आर्थिक व राजकिय न्यायाने युक्त अशा समाजव्यवस्थेची रचना करून लोककल्याण साधने : आर्थिक विषमता नष्ट करून, दर्जा, सुविधा व संधी यांच्याबाबत असलेली विषमता नाहीशी करणे.

❊ **कलम 38(b) :** राज्य हे व्यक्ती-व्यक्तीमध्येच नव्हे तर वेगवेगळ्या क्षेत्रात राहणाऱ्या किंवा वेगवेगळ्या व्यवसायामध्ये गुंतलेल्या लोकांच्या गटामध्ये देखील उत्पन्नांच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी प्रयत्न करेल, आणि दर्जा, सुविधा व संधी यामधील विषमता नाहीशी करण्याचा प्रयत्न करेल.

❊ **कलम 39(a) :** स्त्री-पुरूष यांना उपजीवकेचे पुरेसे साधन मिळविण्याचा समान अधिकार.

❊ **कलम 39(b) :** समुदायाच्या भौतिक संसाधनांचे स्वामित्त्व व नियंत्रण अशा तऱ्हेने नियंत्रित केले पाहिजे की त्याचा लाभ सामूहीक हितासाठी होईल (e.g. land reform act, 1960)

❊ **कलम 39(c) :** आर्थिक व्यवस्था अशी नको की ज्यामुळे देशाच्या संपत्तीचे केंद्रीकरण (Decentralization of wealth) होईल, उत्पादन संसाधन काहीच लोकांच्या हाती जाईल व त्यामुळे सामाजिक हितास बाधा पोहचेल.

❊ **कलम 39(d) :** स्त्री-पुरूष यांना समान कामासाठी समान वेतन. (Equal wage for equal work)

❊ **कलम 39(e) :** स्त्री व पुरूष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरूपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यांस न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पडू नये.

❊ **कलम 39(f) :** बालकांना मुक्त आणि प्रतिष्ठापूर्ण वातावरणात आपला विकास करण्याची संधी व सुविधा दिल्या जातात आणि बालके व युवक यांना शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जाते. (42 वी घटनादुरुस्ती, 1976)

❊ **कलम 39(A) :** समान न्यायाची हमी व गरीबांना मोफत कायदेविषयक सहाय्य. (42 वी घटनादुरुस्ती, 1976)

❊ **कलम 40 :** ग्रामपंचायतींचे संघटन व त्यांना पर्याप्त अधिकार

❊ **कलम 41 :** राज्य हे आपली आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत राहून कामाचा, शिक्षणाचा व बेकारी, वृद्धत्व, आजारपण व अपंगत्व अशा परिस्थितीत सार्वजनिक सहाय्य मिळवण्याच्या अधिकाराची तरतूद करेल.

❊ **कलम 42 :** कामगारांना कामाच्या ठिकाणी न्याय व मानवी वागणुकीची हमी तसेच प्रसुतीविषयक साहाय्यासाठी तरतुदी.

❊ **कलम 43 :** राज्य कायद्याद्वारे किंवा आर्थिक संघटन करून किंवा इतर मार्गाने शेतकी, औद्योगिक किंवा इतर प्रकारच्या सर्व कामगारांना काम, निर्वाह वेतन, चांगले जीवनमान आणि विश्रांती तसेच सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग याची खात्री देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी आणि विशेषतः ग्रामीण क्षेत्रामध्ये वैयक्तिक किंवा सहकारी तत्त्वावर कुटिर उद्योगांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

❊ **कलम 43A :** कामगारांचा कंपनी व्यवस्थापणात सहभाग. (42 वी घटनादुरुस्ती, 1976)

❊ **कलम 43A :** सहकारी संस्था स्वेच्छेने स्थापन करणे, स्वायत्तता देणे, लोकशाही व्यवस्थापन चालना देणे.

❊ **कलम 44 :** सर्व नागरिकांना समान नागरी कायदा

❊ **कलम 45 :** राज्य बालकांचे वय सहा वर्षे होऊपर्यंत त्यांचे संगोपन करण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठीची तरतूद करेल. (86 वी घटनादुरुस्ती, 2002)

Dilip Sir's STEP UP Academy

* **कलम 46 :** राज्य, दुर्बल घटक आणि विशेषतः अनुसूचित जाती व जमाती यांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासास प्रोत्साहन देईल आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांच्यापासून त्यांचे संरक्षण करणे.
* **कलम 47 :** आपल्या जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचावणे तसेच सार्वजनिक आरोग्य सुधारणे या गोष्टी राज्य आपल्या प्राथमिक कर्तव्यांपैकी असल्याचे मानेल आणि विशेषतः मादक प्येय व आरोग्यास अपायकारक अशी अंमली द्रव्ये यांच्या सेवनावर बंदी आणण्यास राज्य प्रयत्नशील असेल.
* **कलम 48 :** आधुनिक व शास्त्रीय रितीने कृषी व पशुसंवर्धन यांची सुसूत्र व्यवस्था लावण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील आणि विशेषतः गाई, वासरे व इतर दुभती व जुंपणीची गुरे यांच्या जातीचे जतन करणे व त्या सुधारणे आणि त्यांच्या कत्तलीस मनाई करणे याकरिता उपाययोजना करणे.
* **कलम 48(1) :** राज्य हे देशाच्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आणि वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नशील राहील. (42 वी घटनादुरुस्ती, 1976)
* **कलम 49 :** राष्ट्रीयदृष्ट्या महत्वाची स्मारके, ऐतिहासिक व कलात्मकदृष्ट्या महत्त्वाची स्थळे यांचे जतन करणे. (संसदेने केलेल्या कायद्याद्वारे किंवा त्याखाली राष्ट्रीय महत्वाचे म्हणून घोषित झालेले यांचे जतन करण्याची जबाबदारी राज्याची असेल.)
* **कलम 50 :** न्याय व्यवस्था व कार्यकारी व्यवस्था अलग करणे. (Seperate judiary and executive)
* **कलम 51 :** राज्य हे
  - **कलम 51(1) :** आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करण्यासाठी,
  - **कलम 51(2) :** राष्ट्रांराष्ट्रामध्ये न्याय संगत आणि सन्मानपूर्ण संबंध राखण्यासाठी,
  - **कलम 51(3) :** संघटित जनसमाजांच्या आपसातील व्यवहारांमध्ये आंतरराष्ट्रीय कायदा व तह याबद्दल आदरभावना जोपासण्यासाठी आणि
  - **कलम 51(4) :** आंतरराष्ट्रीय तंटे लवादाद्वारे मिटविण्यासाठी, प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील राहील.

**✻ वरील मार्गदर्शक तत्त्वांचे त्यांच्या संदर्भानुसार पुढीलप्रमाणे वर्गीकरण केलेले आहे. (घटनेत असे वर्गीकरण नमूद नाही)**

1) सामाजिक तत्त्वे : 38, 39, 39A, 41, 42, 43, 43A, 47
2) गांधीवादी तत्त्वे : 40, 43, 43B, 46, 47, 48
3) उदारमतवादी-बुद्धिवादी : 44, 45, 48, 48A, 49, 50, 51
4) नवी तत्त्वे : 39, 39A, 43A, 48A

**✻ मार्गदर्शक तत्त्वासंबंधी झालेल्या घटनादुरुस्त्या :**

- 42 वी घटनादुरुस्ती : कलम 39f, 39A, 43A, 48(1)
- 44 वी घटनादुरुस्ती : कलम 38B
- 86 वी घटनादुरुस्ती : कलम 45
- 97 वी घटनादुरुस्ती : कलम 43B

**✻ मार्गदर्शक तत्त्वासंबंधी काही महत्त्वाचे विधाने :**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर : मार्गदर्शक तत्त्वे ही भारतीय राज्य घटनेचे 'नाविन्यपूर्ण वैशिष्ट्य' आहे.
2) ग्रॅनव्हिले ऑस्टिन : मार्गदर्शक तत्त्वे व मूलभूत हक्क ही 'राज्य घटनेची सद्‌सद्‌विवेकबुद्धी' आहे.
3) न्या.एम.सी.छागला : जर ही मार्गदर्शक तत्त्वे प्रत्यक्षात आली तर आपला देश पृथ्वीवरचा स्वर्ग ठरेल.
4) सर बी.एन.राव : मार्गदर्शक तत्त्वे ही राज्याच्या अधिकाऱ्यांसाठी नैतिक नियम आहेत.

**✻ सर्वोच्च न्यायालयाचे यासंबंधी महत्त्वाचे निर्णय :**

1) चंपकम दोराईराजन खटला (1951) : जेव्हा मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांच्यामध्ये विरोध असेल तेव्हा मूलभूत हक्क श्रेष्ठ ठरते.
2) मिनर्व्हा मिल्स खटला (1980) : भारतीय राज्यघटना मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांच्या योग्य संतूलनावर आधारलेली आहे.

**✻ मार्गदर्शक तत्त्वांवरील टीका :**

1) के.टी. शाह : ही तत्त्वे म्हणजे केवळ आदर्शवादी विचार होय.
2) के.सी. व्हिअर : मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे उद्दिष्ट आणि आकांक्षा यांचे घोषणापत्र आहे.
3) आयवॉर जेनिंग्ज : मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे केवळ पवित्र आकांक्षा आहे.
4) टि.टि.कृष्णमाचारी : मार्गदर्शक तत्त्वे ही भावनांची कचरापेटी आहे.

Dilip Sir's STEP UP Academy

## मूलभूत कर्तव्ये (Fundamental duties)
### भाग 4 अ : कलम 51A

❊ **पार्श्वभूमी :**

- समाजाचा घटक या नात्याने व्यक्तीला जसे हक्क प्राप्त होतात त्याचप्रमाणे त्या व्यक्तीने समाजासाठी काही जबाबदाऱ्या पार पाडणेही अपेक्षित असते. लोकशाहीत लोकांनी केवळ हक्कांचीच मागणी करू नये, तर कर्तव्यांप्रती त्यांनी दक्ष असावे लागते.
- मात्र भारताच्या मूळ घटनेत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला नव्हता. पुढे 1976 मध्ये 42 व्या घटनादुरुस्तीने घटनेत 10 मूलभूत कर्तव्यांची यादी समाविष्ट करण्यात आली. 2002 मध्ये 86 व्या घटनादुरुस्तीने 11 वे मूलभूत कर्तव्य टाकण्यात आले.
- भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्य तत्कालीन सोव्हिएत रशियाच्या घटनेवरून घेण्यात आली आहेत. मात्र, युएसए, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रेलिया यांसारख्या प्रमुख देशांच्या घटनांमध्ये मूलभूत कर्तव्ये आढळून येत नाही. केवळ जपानची घटना त्यास अपवाद आहे. याउलट समाजवादी देशांनी नागरिकांच्या मूलभूत हक्क व कर्तव्यांना सारखेच महत्व प्रदान केले आहे.

❊ **सरदार स्वर्ण सिंह समिती, 1976 :**

- आणीबाणीच्या काळात निर्माण झालेल्या गरजेमुळे भारत सरकारने 1976 मध्ये मूलभूत कर्तव्यांबाबत सरदार स्वर्ण सिंह समिती स्थापन केली. या समितीने मूलभूत कर्तव्यांचे एक स्वतंत्र प्रकरण घटनेत समाविष्ट करण्याची शिफारस केली.
- तत्कालिन काँग्रेस सरकारने ही शिफारस स्वीकारून 42 व्या घटनादुरुस्ती (1976) अन्वये घटनेत भाग IV A समाविष्ट करण्यात आला. या नवीन भागात कलम 51 A हे केवळ एकच कलम टाकण्यात आले. या कलमात 10 मूलभूत कर्तव्यांची यादी देण्यात आली.
- अर्थात, 10 मूलभूत कर्तव्यांपैकी केवळ आठच कर्तव्यांची शिफारस स्वर्ण सिंह समितीने केली होती. तसेच, समितीने शिफारस केलेल्या इतर काही कर्तव्यांचा समावेश घटनेत करण्यात आला नाही.

❊ **सरदार स्वर्णसिंग समितीने केलेल्या मात्र न स्विकारलेल्या शिफारशी :**

1. कर भरणे नागरिकांचे कर्तव्य.
2. कर्जव्य पालन करण्यात कसूर केल्यास दंड.
3. असा दंढ केल्याने मूलभूत हक्क किंवा इतर घटनात्मक तरतूदींचे उल्लंघन होते या कारणावरुन न्यायालयात आव्हान देता येवू नये.

❊ **मूलभूत कर्तव्यांची यादी :**

- कलम 51 A मध्ये दिल्याप्रमाणे नागरिकांची मूलभूत कर्तव्ये पुढीलप्रमाणे आहेत :

a) घटनेचे पालन करणे आणि तिचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे,

b) ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र लढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्याचे अनुसरण करणे,

c) भारताचे सार्वभौमत्व, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे,

d) देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे,

e) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलिकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीस लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

f) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशांचे मोल जाणून तो जतन करणे,

g) वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे, आणि प्राणिमात्रांबद्दल दया-बुद्धी बाळगणे,

h) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे,

i) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे,

j) राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी (endevour and achievments) यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे व्यक्तिगत व सामुदायिक कार्याच्या सर्व क्षेत्रांमध्ये उत्तमता संपादन करण्यासाठी झटणे,

k) जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने, आपल्या अपत्यास अथवा पाल्यास, त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते चौदाव्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे. (86 वी घटनादुरुस्ती, 2002)

Dilip Sir's STEP UP Academy

# घटनादुरुस्ती आणि तिची प्रक्रिया (Constitutional Amendment and its Process)
## भाग 20 : कलम 368

### घटनादुरुस्तीची प्रमुख वैशिष्ट्ये

- भारतातील राज्यघटनेत दुरुस्तीची प्रक्रिया : ताठर आणि लवचिक यांचे मिश्रण आहे. (Combination of rigidity and flexibility)
- घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार फक्त संसदेचाच (काही विशिष्ट विषय सोडल्यास)
- घटनादुरुस्तीच्या तीन पद्धती (कलम 368 अंतर्गत दोनच पद्धती समाविष्ट)
- यासाठी संयुक्त बैठकीची (Joint sitting) तरतूद नाही.
- राष्ट्रपतीस घटनादुरुस्तीस मंजूरी द्यावीच लागते. (24 वी घटनादुरुस्ती)

### घटनादुरुस्ती प्रक्रिया

- याबाबतचे विधेयक पहिल्यांदा लोकसभेत किंवा राज्यसभेत मांडले जाऊ शकते. (मात्र राज्य विधीमंडळात नाही)
- याबाबतचे विधेयक मंत्र्याकडून किंवा खाजगी सदस्यांकडून (Private member) मांडले जाऊ शकते.
- यासाठी राष्ट्रपतींची पूर्वपरवानगी आवश्यक नसते.
- हे विधेयक सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या विशेष बहुमताने आणि उपस्थित असणाऱ्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या 2/3 बहुमताने संमत व्हावे लागते.
- जर घटनेतील संघराज्यात्मक तरतूदीत दुरुस्ती करणारे विधेयक असल्यास यासाठी निम्म्यापेक्षा जास्त घटकराज्यातील विधिमंडळांची साध्या बहुमताने (Simple majority) असलेली संमती लागते.
- यानंतर ते विधेयक राष्ट्रपतींकडे संमतीसाठी जाते.

### घटनादुरुस्तीचे प्रकार (Types of Constitutional Amendments)

1) **संसदेचे साधे बहुमत (Simple majority)** : (कलम 368 च्या अंतर्गत येत नाही.)

- यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहाचे साधे बहुमत (Simple majority of both houses) आवश्यक असते.
  (साधे बहुमत म्हणजेच उपस्थित सदस्यांमधून निम्म्यापेक्षा जास्त सदस्यांची मान्यता)

● **याबाबत काही तरतुदी पुढील प्रमाणे** :

- नवीन राज्यांचा समावेश किंवा स्थापना.
- नवीन राज्य निर्माण करणे आणि अस्तित्वात असलेल्या राज्याच्या क्षेत्रामध्ये, सीमेमध्ये किंवा नावामध्ये बदल करणे.
- घटक राज्यामध्ये विधान परिषद (State legislative council) निर्माण करणे वा बरखास्त करणे.
- दुसरे परिशिष्ट : राष्ट्रपती, राज्यपाल, सभापती, न्यायाधीश वगैरेचे वेतन, भत्ते, विशेषाधिकार आणि इतर बाबी.
- संसदेची गणसंख्या (quorum)
- संसद सदस्यांचे वेतन आणि भत्ते
- सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राचा विस्तार
- सर्वोच न्यायालयातील कनिष्ट न्यायाधिशांची संख्या
- केंद्रशासित प्रदेश (Union territory)
- कार्यालयीन भाषेचा वापर (Official language)
- नागरिकत्व : प्राप्त करणे आणि रद्दबातल
- मतदारसंघांचे परिसीमन (Delimitation)
- संसद आणि राज्य विधानसभेच्या निवडणूका (नियम)
- परिशिष्ट पाच : अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित जमातींचे प्रशासन (Administration of scheduled area & scheduled tribes)
- परिशिष्ट सहा : आदिवासी क्षेत्राचे प्रशासन

2) **संसदेचे विशेष बहुमत (Special majority)** :

- प्रत्येक सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येचे बहुमत (50% पेक्षा जास्त) आणि प्रत्येक सभागृहामधील उपस्थित असलेल्या आणि मतदानात भाग घेतलेल्या सदस्यांपैकी 2/3 सदस्य यांचे बहुमत म्हणजेच विशेष बहुमत होय.

● **याबाबत काही तरतुदी पुढील प्रमाणे** :

- मूलभूत हक्क (Fundamental rights)
- राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे (DPSp) आणि
- 'साधे बहुमत' आणि 'विशेष बहुमत व राज्यांची संमती' या दोन वर्गवारीमध्ये न येणाऱ्या इतर सर्व तरतुदी.

3) **संसदेचे विशेष बहुमत आणि राज्यांची संमती** :

- हे विधेयक सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या विशेष बहुमताने आणि उपस्थित असणाऱ्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या 2/3 बहुमताने संमत व्हावे लागते आणि निम्म्यापेक्षा जास्त घटकराज्यातील विधिमंडळांची साध्या बहुमताने असलेली संमती लागते.
- यासाठी घटक राज्याने किती वेळात विधेयकाला संमती द्यावी असा कालावधी नमूद केलेला नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

- **यात समाविष्ट असलेले विषय :**
- राष्ट्रपतींची निवडणूक आणि तिची पद्धत.
- केंद्र आणि राज्यांच्या कार्यकारी अधिकाराचा विस्तार.
- सर्वोच्च आणि उच्च न्यायालय
- संसदेमध्ये घटकराज्यांचे प्रतिनिधित्व.
- केंद्र (संघ) आणि राज्यांमध्ये कायदेविषयक अधिकारांचे वाटप.
- सातव्या परिशिष्टातील कोणतीही सूची.
- संसदेचा घटनादुरुस्तीचा अधिकार आणि तिची कार्यपद्धती (कलम 368)

**घटनादुरुस्ती संदर्भात न्यायालयीन निकाल**

- **कलम 13(2) :** राज्याने असा कोणताही कायदा करू नये जो घटनेतील तरतुदींच्या विरूद्ध आहे.

**1950 : जमीन सुधारणा कायदा :**

- या कायद्याने कलम 19, 31, 14 चे उल्लंघन केल्याने सर्वोच्च न्यायालयाने ते रद्द केले.

**पहिली घटनादुरुस्ती : 9 वे परिशिष्ट निर्मिती (1951)**

1) कलम 31 'अ' आणि 31 'ब' यांचा समावेश केला.
2) सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्यसंस्थेला दिला.
3) मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी तरतुदी असणारे कायदे.
4) जमीन सुधारणा आणि इतर कायद्यांचे न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण करण्यासाठी 9 व्या परिशिष्टाचा समावेश.
5) भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घालणाऱ्या तीन आधारांचा उदा. सार्वजनिक सुव्यवस्था, परराष्ट्रांसोबत मैत्रीपूर्ण संबंध आणि गुन्ह्याला उत्तेजन देणे. इ. बाबींचा समावेश. ह्या मर्यादा 'वाजवी' असतील, म्हणून न्यायप्रविष्ट असतील.
6) राज्यातील व्यापार : राज्यसंस्थेने कोणताही व्यापार वा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केल्यास त्यामुळे व्यापार आणि उद्योग करण्याच्या हक्कांचा भंग होतो, या आधारावर ती कृती अवैध ठरविता येणार नाही.

**शंकरी प्रसाद विरूद्ध केंद्र शासन : 1951**

- यात पहिल्या घटनादुरुस्तीला अवाहन दिले (संसदेला घटनादुरुस्तीचा अधिकार नसल्याचा दावा)

- **सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय – संसदेचे दोन प्रकारचे अधिकार :**

  1) सामान्य कायदा बनवण्याचा अधिकार
  2) घटनात्मक कायदा बनवण्याचा अधिकार (कलम 368)

- कलम 13 मधील कायदा या शब्दाचा अर्थ सामान्य कायदा असा होतो त्यामुळे कलम 13 हे घटनादुरुस्तीला लागू होत नाही. म्हणून संसद मुलभूत अधिकारांसहीत घटनेच्या कोणत्याही भागात बदल करू शकते. असा कायदा कलम 13 नुसार अवैध ठरणार नाही.

**※ 17 वी घटनादुरुस्ती 1964**

1) बाजारभावाप्रमाणे नुकसानभरपाई दिल्याशिवाय व्यक्तिगत लागवडीखालील असलेली जमीन प्राप्त करण्यास प्रतिबंध.
2) 9 व्या परिशिष्टामध्ये आणखी 44 कायद्यांचा समावेश.

**※ गोलकनाथ विरूद्ध पंजाबराज्य : 1968**

यामध्ये 17 व्या घटनादुरुस्तीस आव्हान :

- यात सर्वोच्च न्यायालयाने आपला आधीचा निकाल बदलला व संसद मुलभूत अधिकार व घटना यात दुरुस्ती करू शकत नाही.
- घटनादुरुस्ती कायदा हा सुद्धा कलम 13 मधील सामान्य कायद्यासारखाच आहे. त्यामुळे जर मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत असेल तर तो कायदा रद्द होईल.
- **सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय :** यानुसार कलम 368 नुसार फक्त घटनादुरुस्तीची प्रक्रिया हे शब्द दिले आहेत, म्हणजेच कलमात फक्त प्रक्रिया दिली असून तसे अधिकार कोणाचे हे नमूद केलेले नाही.
  (सर्वोच्च न्यायालयाने कलम 368 चा फार संकोचीत अर्थ घेतला)

**※ 24 वी घटनादुरुस्ती : 1971**

कलम 13(4) चा समावेश : कलम 13 मधील कोणत्याही भागाचा कलम 368 शी संबंध असणार नाही.

कलम 368(3) : संसदेचा घटनादुरुस्तीचा अधिकार व त्यानुसार प्रक्रिया.

- यानुसार कलम 13 मधील कोणताही भागास कलम 368 जबाबदार नाही.
- यानुसार संसदेने स्वतःकडे अमर्याद अधिकार घेतले.
- या घटनादुरुस्तीनुसार : राष्ट्रपतींनी घटनादुरुस्ती विधेयकास संमती देणे बंधनकारक ठरले.

**1973 : केशवानंद भारती वि. केरळ सरकार**

- 24 व्या घटनादुरुस्तीस आव्हान :
- **सर्वोच्च न्ययालय** : निर्णय बदलला, संसदेचा घटनादुरुस्तीचा अधिकार मान्य. तसेच घटनेची ''मुलभूत चौकट'' ही नवीन संकल्पना निर्माण केली.
- यानुसार संसद घटनेत कोणत्याही कलमात (मूलभूत अधिकारांसह) दुरुस्ती करू शकते परंतु या दुरुस्तीने घटनेच्या **मुलभूत चौकटीला** (Basic Structure of Indian Constitution) धक्का पोहचू नये.

  SC : ने मुलभूत चौकट हे स्पष्ट न करून आपल्या अधिकारांवर मर्यादा घातली नाही.

**❊ 39 वी घटनादुरुस्ती : 1975**

- पंतप्रधान आणि लोकसभा सभापती यांच्या निवडणूकांचा विषय न्यायालयाच्या कक्षेबाहेर ठेवण्याची तरतुद.
- सर्वोच्च न्यायालय : वरील तरतूद अवैध ठरवली. (घटनेच्या मूलभूत संरचनेस धक्का पोहचत असल्याने)

**❊ 42 वी घटनादुरुस्ती : 1976**

- कलम 368(4), (5) चा समावेश
- 368 (4) : क 368 अंतर्गत संसदेने केलेल्या घटनादुरुस्तीस (मूलभूत अधिकारांचे उल्लंघन/इतर कोणत्याही कारणांमुळे) न्यायालयात अवाहन देता येणार नाही.
- 368(5) : संसदेचे घटनादुरुस्तीचे अधिकार अमर्याद आहेत व त्यांना अवाहन देता येणार नाही.

**1980 : मिनर्व्हा मिल्स केस**

- 42 व्या घटनादुरुस्तीस आव्हान :
- SC : वरील 2 घटनादुरुस्ती रद्द ठरवल्या कारण न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारांचे उल्लंघन होत असल्याने.
- SC : संसदेचा घटनादुरुस्तीचा अधिकार मर्यादित स्वरूपाचा.
- या अधिकराची व्याप्ती वाढवून राज्यघटनेची मूलभूत संरचना नष्ट केली जाऊ शकत नाही.
- 'दुरुस्तीचा मर्यादित अधिकार' हे राज्यघटनेचे वैशिष्ट्य आहे, त्यामुळे हा संसदेचा अधिकार काढून टाकता येणार नाही.
- देणगी स्वरूपात मिळालेल्या अधिकराचा वापर करून संसद अमर्यादित स्वरूपात वापरू शकत नाही.
- याच खटल्यात मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्व यांच्यात **संतुलन** असावे असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे.

**❊ 1981 : वामन राव खटला**

- सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत संरचनेचे तत्त्व अंगीकारले आणि 24 एप्रिल 1973 नंतर (केशवानंद भारती केसच्या निकालाचा दिवस) केलेल्या घटनादुरुस्ती कायद्यांना ते लागू असेल असे जाहीर केले.
- **सर्वोच्च न्यायालयानुसार खालील संकल्पना घटनेच्या मुलभूत गाभ्यात खालील गोष्टी समाविष्ट होतात :**
- घटनेचे श्रेष्ठत्त्व

  सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्षता
- राज्यघटनेचे संघराज्यीय स्वरूप

  कार्यकारी-विधी-न्यायमंडळ यांची अधिकार विभागणी
- देशाची एकता व एकात्मता

  घटनेचे कल्याणकारी राज्य स्वरूप
- न्यायीक पुनर्विलोकन, संसदीय शासनपद्धती

  कायद्याचे अधिराज्य, मुक्त व न्याय्य निवडणूका
- मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्त्वे

  समानतेचे तत्त्व
- न्यायालयीन स्वतंत्र न्याय व्यवस्था

  संसदेचे घटनादुरुस्तीचे मर्यादीत अधिकार

**आजपर्यंत झालेल्या घटनादुरुस्त्या**

**❊ 1 ली घटनादुरुस्ती 1951**

1) कलम 31 'अ' आणि 31 'ब' यांचा समावेश केला.
2) सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्यसंस्थेला दिला.
3) मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी तरतुदी असणारे कायदे.
4) जमीन सुधारणा आणि इतर कायद्यांचे न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण करण्यासाठी 9 व्या परिशिष्टाचा समावेश.
5) भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घालणाऱ्या तीन आधारांचा उदा. सार्वजनिक सुव्यवस्था, परराष्ट्रांसोबत मैत्रीपूर्ण संबंध आणि गुन्ह्याला उत्तेजन देणे. इ. बाबींचा समावेश. ह्या मर्यादा 'वाजवी' असतील, म्हणून न्यायप्रविष्ट असतील.
6) राज्यातील व्यापार; राज्यसंस्थेने कोणताही व्यापार वा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केल्यास त्यामुळे व्यापार आणि उद्योग करण्याच्या हक्कांचा भंग होतो, या आधारावर ती कृती अवैध ठरविता येणार नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

| राज्यघटनेच्या मूळ संरचनेची उत्क्रांती | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **खटल्याचे नाव (वर्ष)** | **मूळ संरचनेतील घटक (सर्वोच्च न्यायालयाने ठरविल्याप्रमाणे)** |
| 1. | केशवानंद भारती खटला (1973) (मूलभूत हक्क खटला या नावाने ओळखला जातो.) | 1. राज्यघटनेचे सर्वश्रेष्ठत्व<br>2. विधिमंडळ, कार्यकारी विभाग व न्यायव्यवस्था यांमध्ये अधिकारांची विभागणी<br>3. राज्यव्यवस्थेचे लोकशाही व प्रजासत्ताक स्वरूप<br>4. राज्यघटनेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप 5. राज्यघटनेचे संघराज्यीय स्वरूप 6. देशाचे सार्वभौमत्व व एकात्मा 7. व्यक्तीचे स्वातंत्र्य व प्रतिष्ठा 8. कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचा आदेश<br>9. संसदीय प्रणाली |
| 2. | इंदिरा नेहरू-गांधी खटला (1975) (निवडणूक खटला म्हणून ओळखला जातो.) | 1. भारत सार्वभौम लोकशाही, प्रजासत्ताक आहे.<br>2. व्यक्तीला समान दर्जा व संधी<br>3. धर्मनिरपेक्षता आणि विवेकाचे व धर्माचे स्वातंत्र्य<br>4. कायद्याचे शासन (व्यक्तींचे नव्हे!) (म्हणजेच कायद्याचे राज्य)<br>5. न्यायालयीन पुनर्विलोकन<br>6. लोकशाहीला अभिप्रेत असलेल्या मुक्त व न्याय्य निवडणुका |
| 3. | मिनर्व्हा मिल्स खटला (1980) | 1. राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा संसदेचा मर्यादित अधिकार<br>2. न्यायालयीन पुनर्विलोकन 3. मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे यांमध्ये सुसंगतता व संतुलन |
| 4. | सेंट्रल कोल फिल्डस् लि. खटला (1980) | न्यायासाठी प्रभावी उपाययोजना |
| 5. | भीमसिंगजी खटला (1981) | कल्याणकारी राज्य (सामाजिक-आर्थिक न्याय) |
| 6. | एस. पी. संपतकुमार खटला (1987) | 1. कायद्याचे राज्य 2. न्यायालयीन पुनर्विलोकन |
| 7. | पी. सांबमूर्ती खटला (1987) | 1. कायद्याचे राज्य 2. न्यायालयीन पुनर्विलोकन |
| 8. | दिल्ली ज्युडिशिअल सर्व्हिस असोसिएशन खटला (1991) | कलम 32, 136, 141 व 142 अनुसार सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार |
| 9. | इंद्र सहानी खटला (1992) (मंडल खटला या नावाने ओळखला जातो.) | कायद्याचे राज्य |
| 10. | कुमार पद्म प्रसाद खटला (1992) | स्वतंत्र न्यायव्यवस्था |
| 11. | किहोतो होलोहोन खटला (1993) (पक्षांतर खटला नावाने ओळखला जातो.) | 1. मुक्त व न्याय्य निवडणुका<br>2. सार्वभौम, लोकशाही व प्रजासत्ताक संरचना |
| 12. | रघुनाथ राव खटला (1993) | 1. समानतेचे तत्त्व 2. भारताची एकात्मता व अखंडता |
| 13. | एस. आर. बोम्मई खटला (1994) | 1. संघराज्यीय प्रणाली 2. धर्मनिरपेक्षता 3. लोकशाही<br>4. देशाची एकात्मता व अखंडता 5. सामाजिक न्याय<br>6. न्यायालयीन पुनर्विलोकन |
| 14. | एल. चंद्रकुमार खटला (1997) | कलम 226 व 227 अनुसार उच्च न्यायालयाचे अधिकार |
| 15. | इंद्र सहानी खटला (2000) | समानतेचे तत्त्व |
| 16. | ऑल इंडिया जजेस असोसिएशन खटला (2002) | स्वतंत्र न्यायव्यवस्था |
| 17. | कुलदीप नायर खटला (2006) | 1. लोकशाही 2. मुक्त व न्याय्य निवडणुका |
| 18. | एम. नागराज खटला (2006) | समानतेचे तत्त्व |

Dilip Sir's STEP UP Academy

**❋ 2 री घटनादुरुस्ती 1952**

1) लोकसभेचा एक सदस्य 7 लाख 50 हजारांपेक्षा अधिक लोकांचे प्रतिनिधित्व करेल. या पद्धतीने लोकसभेतील प्रतिनिधीत्वाच्या प्रमाणाची पुनर्रचना.

**❋ 3 री घटनादुरुस्ती 1954**

1) सार्वजनिक हितासाठी अन्नधान्य, जनावरांचा चारा, कच्चा कापूस, कापूस बियाणे आणि कच्चा ताग यांचे उत्पादन, पुरवठा आणि वितरण यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी संसदेला अधिकार दिले.

**❋ 4 थी घटनादुरुस्ती 1955**

1) खाजगी मालमत्तेची अनिवार्यपणे प्राप्ती केल्यानंतर देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईचे प्रमाण ठरविले आणि ही बाब न्यायालयाच्या न्यायिक पुनरावलोकनाच्या कक्षेबाहेर ठेवली.
2) कोणताही व्यापार राष्ट्रीयीकृत करण्याची राज्यसंस्थेला सत्ता बहाल केली.
3) 9 व्या परिशिष्टामध्ये आणखी काही कायदे समाविष्ट केले.
4) कलम 31 'अ' ची व्याप्ती वाढविली.

**❋ 5 वी घटनादुरुस्ती 1955**

1) राज्यांच्या क्षेत्रावर, सीमारेषांवर आणि नामाभिधानांवर परिणाम करू शकणाऱ्या प्रस्तावित केंद्रीय कायद्यावर मत प्रदर्शन करण्यासाठी राज्यांची कालमर्यादा निश्चित केली जावी याकरिता राष्ट्रपतींना अधिकार दिले.

**❋ 6 वी घटनादुरुस्ती 1956**

1) केंद्र सूचीमध्ये एका नवीन विषयाची भर घालण्यात आली. उदा. राज्यांतर्गत व्यापार आणि दळणवळण दरम्यान होणाऱ्या वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर कर लादणे या संदर्भात राज्यांच्या अधिकारांवर निर्बंध घातले.

**❋ 7 वी घटनादुरुस्ती 1956**

1) अस्तित्वात असलेले राज्यांच वर्गीकरण, उदा. भाग अ, ब, क आणि ड, रद्द करण्यात येऊन 14 घटकराज्ये आणि 6 केंद्रशासित प्रदेशांना मान्यता दिली.
2) केंद्रशासित प्रदेशांपर्यंत उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये वाढ करण्यात आली.
3) दोन वा अधिक घटकराज्यांसाठी सामाईक उच्च न्यायालयाची स्थापना करणे.
4) उच्च न्यायालयाच्या सहाय्यक आणि हंगामी न्यायाधीशांची नियुक्ती.

**❋ 8 वी घटनादुरुस्ती 1960**

1) लोकसभेमध्ये आणि राज्यांच्या विधान सभांमध्ये अनुसूचित जाती आणि जमाती तसेच आंग्ल-भारतीय (Anglo-Indian) समाजाच्या प्रतिनिधित्वासाठी आरक्षित जागांची मुदत 10 वर्षांकरिता वाढविली (1970 पर्यंत).

**❋ 9 वी घटनादुरुस्ती 1960**

1) भारत-पाकिस्तान करारनाम्यानुसार (1958) बेरूबारी संघाचा (पं.बंगालमधील) भारतीय भूप्रदेश पाकिस्तानमध्ये विलीन केला.

**❋ 10 वी घटनादुरुस्ती 1961**

1) भारतीय संघव्यवस्थेत दादरा आणि नगर हवेलीचा समावेश केला.

**❋ 11 वी घटनादुरुस्ती 1961**

1) संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक घेण्याऐवजी स्वतंत्र निर्वाचन मंडळाची तरतूद करून उपराष्ट्रपती पदाच्या निवडणूक प्रक्रियेत बदल केला.
2) निर्वाचन मंडळामध्ये रिक्त असलेल्या जागेच्या आधारे राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीला आव्हान देता येणार नाही.

**❋ 12 वी घटनादुरुस्ती 1962**

1) भारतीय संघव्यवस्थेत गोवा, दमण आणि दीव यांचा समावेश केला.

**❋ 13 वी घटनादुरुस्ती 1962**

1) नागालँडला घटकराज्याचा दर्जा देण्यात आला आणि त्यासंदर्भात विशेष तरतुदी केल्या.

**❋ 14 वी घटनादुरुस्ती 1962**

1) भारतीय संघव्यवस्थेत पाँडिचेरीचा अंतर्भाव.
2) हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपूरा, गोवा, दमण-दीव आणि पाँडिचेरी या केंद्रशासित प्रदेशांसाठी विधिमंडळ आणि मंत्रिमंडळाच्या निर्मितीची तरतूद.

**❋ 15 वी घटनादुरुस्ती 1963**

1) एखादी कृती, गुन्हा, कृत्य एखाद्या उच्च न्यायालयाच्या भौगोलिक अधिकारक्षेत्रात घडलेले असेल तर त्या संबंधातील खटल्याच्या न्यायनिवाड्यात उच्च न्यायालय त्या भौगोलिक क्षेत्राबाहेरील कोणत्याही व्यक्तीला वा अधिसत्तेला न्यायालयीन आदेश बजावू शकते.

Dilip Sir's STEP UP Academy

2) उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे निवृत्ती वय 60 वरून 62 करण्यात आले.
3) उच्च न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीशाला त्याच उच्च न्यायालयात हंगामी न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्याची तरतूद.
4) एका उच्च न्यायालयातून दुसऱ्या उच्च न्यायालयामध्ये बदली केलेल्या न्यायाधीशाला हानीपूरक भत्ता देण्याची तरतूद.
5) उच्च न्यायालयाचा सेवानिवृत्त न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयाचा तदर्थ न्यायाधीश म्हणून कार्य करू शकतो.
6) सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या वय निश्चितीची कार्यपद्धती.

### ✻ 16 वी घटनादुरुस्ती 1963

1) भारताचे सार्वभौमत्व आणि अखंडता यांच्या हितार्थ भाषण आणि अभिव्यक्ती, शांततापूर्वक एकत्र जमणे आणि संघटना, संस्था स्थापन करणे या मूलभूत हक्कांवर आणखी निर्बंध लादण्यासाठी राज्यसंस्थेला अधिकार दिले.
2) कायदेमंडळासाठी निवडणूक लढविणारे उमेदवार, कायदेमंडळाचे सदस्य, मंत्री, न्यायाधीश आणि भारताचे महालेखापरीक्षक यांनी करावयाच्या सत्य विधान आणि शपथेच्या प्रारूपामध्ये सार्वभौमत्व आणि अखंडता यांचा समावेश.

### ✻ 17 वी घटनादुरुस्ती 1964

1) बाजारभावाप्रमाणे नुकसानभरपाई दिल्याशिवाय व्यक्तिगत लागवडीखालील असलेली जमीन प्राप्त करण्यास प्रतिबंध.
2) 9 व्या परिशिष्टामध्ये आणखी 44 कायद्यांचा समावेश.

### ✻ 18 वी घटनादुरुस्ती 1966

1) एखाद्या घटक राज्याचा किंवा केंद्रशासित प्रदेशाचा एखादा भाग दुसऱ्या एखाद्या घटकराज्य वा केंद्रशासित प्रदेशाल जोडून नवीन घटकराज्य वा केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्याचा संसदेचा हा अधिकार तिच्या 'नवीन घटकराज्य निर्माण करण्याच्या अधिकारा'मध्ये अंतर्भूत आहे.

### ✻ 19 वी घटनादुरुस्ती 1966

1) निवडणूक न्यायासनाची व्यवस्था रद्द केली आणि निवडणूक याचिका सुनवाईचा अधिकार उच्च न्यायालयांना दिला.

### ✻ 20 वी घटनादुरुस्ती 1966

1) सर्वोच्च न्यायालयाने अवैध घोषित केलेल्या उत्तर प्रदेशातील जिल्हा न्यायाधीशाच्या विशिष्ट नियुक्त्यांना वैध ठरविले.

### ✻ 21 वी घटनादुरुस्ती 1967

1) 8 व्या परिशिष्टामध्ये 15 वी भाषा म्हणून सिंधी भाषेचा समावेश केला.

### ✻ 22 वी घटनादुरुस्ती 1969

1) आसाम या राजयांतर्गत नवीन स्वायत्त राज्य म्हणून मेघालयाच्या निर्मितीचा मार्ग सुकर.

### ✻ 23 वी घटनादुरुस्ती 1969

1) लोकसभा आणि राज्यांच्या विधान सभांमध्ये अनुसूचित जाती आणि जमाती तसेच आंग्ल-भारतीय समाजाच्या प्रतिनिधित्वासाठी आरक्षित जागांची मुदत आणखी 10 वर्षांकरिता वाढविली (1980 पर्यंत).

### ✻ 24 वी घटनादुरुस्ती 1971

1) मूलभूत हक्कांसह राज्यघटनेतील कोणत्याही भागामध्ये दुरुस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकाराचा पुनरूच्चार.
2) घटनादुरुस्ती विधेयकाला संमती देण्याचे राष्ट्रपतींवर बंधनकारक करण्यात आले.

### ✻ 25 वी घटनादुरुस्ती 1971

1) मालमत्तेच्या हक्कासंबंधी तरतुदीतील 'भरपाई' या शब्दाऐवजी 'रक्कम' हा शब्द समाविष्ट केला आणि मालमत्तेला मूलभूत हक्क संकुचित करण्यात आला.
2) मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम 39 (ब) किंवा (क) या मधील तरतुदींच्या परिणामकारकतेसाठी करण्यात आलेल्या कोणत्याही कायद्याला कलम 14, 19 आणि 31 मध्ये दिलेल्या हक्कांचे उल्लंघन झाले, या कारणास्तव आव्हान देता येणार नाही. त्यासाठी घटनेत 31 'क' हे नवे कलम समाविष्ट केले.

### ✻ 26 वी घटनादुरुस्ती 1971

1) संस्थानिकांचे तनखे आणि विशेषाधिकार रद्द केले.

### ✻ 27 वी घटनादुरुस्ती 1971

1) विशिष्ट केंद्रशासित प्रदेशाच्या प्रशासकांना वटहुकूम जारी करण्याचा अधिकार दिला.
2) अरूणाचल प्रदेश आणि मिझोराम या नवीन केंद्रशासित प्रदेशांसाठी काही विशेष तरतुदी केल्या.
3) मणिपूर या नवीन घटक राज्यासाठी विधानसभा आणि मंत्रिमंडळाची निर्मिती करण्याचा अधिकार संसदेला दिला.

Dilip Sir's STEP UP Academy

**❊ 28 वी घटनादुरुस्ती 1972**

1) भारतीय सनदी सेवकांचे (आयसीएस) विशेषाधिकार रद्द केले आणि त्यांच्या सेवाशर्ती निश्चित करण्याचा अधिकार संसदेला दिला.

**❊ 29 वी घटनादुरुस्ती 1972**

1) केरळ राज्याने जमीन सुधारणेबाबत केलेले दोन कायदे 9 व्या परिशिष्टामध्ये समाविष्ट केले.

**❊ 30 वी घटनादुरुस्ती 1972**

1) एखाद्या दिवाणी खटल्यामध्ये 20 हजार रूपये वा त्यापेक्षा अधिक रकमेचा समावेश असेल तर सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्याची मान्यता असलेली तरतूद रद्द करण्यात आली. त्याऐवजी एखाद्या खटल्यामध्ये केवळ कायद्याचा महत्त्वपूर्ण प्रश्न निहीत असेल तरच अशा दिवाणी खटल्यांसंबंधी सर्वोच्च न्यायालयाकडे अपील केले जाऊ शकते, अशी तरतूद केली.

**❊ 31 वी घटनादुरुस्ती 1972**

1) लोकसभेतील सदस्य संख्येत वाढ करून ती 525 वरून 545 करण्यात आली.

**❊ 32 वी घटनादुरुस्ती 1973**

1) आंध्र प्रदेशातील तेलंगणा भागातील लोकांच्या अशा-आकांक्षापूर्तीसाठी विशेष तरतूद करण्यात आली.

**❊ 33 वी घटनादुरुस्ती 1974**

1) संसद सदस्य किंजवा राज्यविधिमंडळाच्या सदस्याने राजीनामा दिल्यास, तो स्वेच्छेने दिलेला आहे वा अस्सल आहे, अशी सभापती/अध्यक्ष यांची खात्री झाल्यानंतर तो राजीनामा स्वीकारला जाऊ शकतो.

**❊ 34 वी घटनादुरुस्ती 1974**

1) विविध राज्यांच्या आणखी 20 जमीन कूळ आणि जमीन सुधारणा कायद्यांचा समावेश 9 व्या परिशिष्टामध्ये केला.

**❊ 35 वी घटनादुरुस्ती 1974**

1) सिक्कीम या राज्याचा 'संरक्षाणात्मक' हा दर्जा संपुष्टात आणला आणि तिला भारतीय संघशासनाच्या 'सहकारी' राज्याचा (Associated state) दर्जा देण्यात आला. सिक्कीम राज्याचे भारतासोबत सहकारीत्व कोणत्या नियम वा अटींनुसार असेल, याबाबतची नोंद करून 10 वे परिशिष्ट निर्माण करण्यात आले.

**❊ 36 वी घटनादुरुस्ती 1975**

1) सिक्कीमला भारतीय घटकराज्याचा दर्जा देण्यात आला. आणि 10 वे परिशिष्ट वगळण्यात आले.

**❊ 37 वी घटनादुरुस्ती 1975**

1) अरूणाचल प्रदेश या केंद्रशासित प्रदेशासाठी विधानसभा आणि मंत्रिमंडळाची तरतूद केली.

**❊ 38 वी घटनादुरुस्ती 1975**

1) राष्ट्रपतीने न्यायप्रविष्ट नसणाऱ्या आणीबाणीची घोषणा केली.
2) राष्ट्रपती, राज्यपाल आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासकांनी जारी केलेले आदेश न्यायप्रविष्ट असणार नाहीत.
3) एकाचवेळी भिन्न भिन्न आधारांवर राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणीसंदर्भात घोषणा करू शकतो.

**❊ 39 वी घटनादुरुस्ती 1975**

1) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि सभापती यांच्याशी संबंधित वाद न्यायालयाच्या कक्षेबाहेर ठेवला. संसदेने निश्चित केलेल्या अधिसत्तेकडून त्याबाबतच निर्णय होईल.
2) विशिष्ट केंद्रीय कायद्यांचा 9 व्या परिशिष्टामध्ये समावेश केला.

**❊ 40 वी घटनादुरुस्ती 1976**

1) भूप्रदेशीय जलक्षेत्र, भूखंडीय सलगक्षेत्र, विस्तृत आर्थिक क्षेत्र आणि भारताचे समुद्री क्षेत्र (विभाग) या बाबतच्या मर्यादा वेळोवेळी नोंद करण्याचा अधिकार संसदेला दिला.
2) बहुतांश जमीन सुधारणांशी संबंधित आणखीन 64 केंद्रीय आणि राज्य कायद्यांचा 9 व्या परिशिष्टामध्ये समावेश करण्यात आला.

**❊ 41 वी घटनादुरुस्ती 1976**

1) राज्य लोकसेवा आयोग आणि संयुक्त लोक सेवा आयोगाच्या सदस्यांचे निवृत्ती वय 60 वरून 62 केले.

**❊ 42 वी घटनादुरुस्ती 1976**

**(या घटनादुरुस्तीने स्वर्णसिंह समितीच्या शिफारशींना मूर्तरूप दिले. शिवाय या घटनादुरुस्तील 'लघु राज्यघटना' (Mini Constitution) म्हणून ओळखले जाते.)**

1) सरनाम्यामध्ये समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि अखंडता या तीन नवीन शब्दांचा समावेश केला.
2) नागरिकांसाठी मूलभूत कर्तव्ये हा नवा भाग समाविष्ट केला.
3) राष्ट्रपतीने मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच कारभार करण्याचे बंधनकारक केले.

Dilip Sir's STEP UP Academy

4) प्रशासकीय न्यायासन आणि इतर विषयांसाठी न्यायासनांची तरतूद.

5) घटनादुरुस्त्या ह्या न्यायालयीन पुनरावलोकनाच्या कक्षेबाहेर ठेवल्या.

6) न्यायालयीन पुनर्विलोकन आणि सर्वोच्च व उच्च न्यायालयाचा आदेश अधिकारक्षेत्राचा संकोच केला.

7) लोकसभा आणि विधानसभा यांचा कार्यकाळ 5 वरून 6 वर्षे करण्यात आला.

9) मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी केलेल्या कायद्यांमुळे काही मूलभूत हक्कांचे उल्लंघन होते, या आधारावर (कारणास्तव) न्यायालये त्यांना अवैध घोषित करू शकत नाहीत.

10) देशविघातक कारवायांना हाताळण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आणि अशा कायद्यांचे मूलभूत हक्कांवर देखील श्रेष्ठत्व असेल.

11) तीन नवीन मार्गदर्शक तत्त्वांची भर घालण्यात आली. उदा.: समान न्याय आणि मोफत कायदेशीर मदत; उद्योगांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांचा सहभाग आणि पर्यावरण, जंगले व प्राण्यांचे संरक्षण.

12) भारताच्या कोणत्याही भागामध्ये राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा करणे सुकर केले.

13) घटक राज्यातील राष्ट्रपती राजवटीचा एकवेळ (सलग) कालावधी 6 महिन्यांवरून 1 वर्ष करण्यात आला.

14) कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती हाताळण्यासाठी कोणत्याही राज्यात सशस्त्र दलांची तैनाती करण्याचे अधिकार केंद्राला दिले.

15) राज्यसूचीतील 5 विषय समवर्तीसूची मध्ये स्थानांतरित केले. उदा. शिक्षण, जंगले, जंगली प्राणी आणि पक्ष्यांचे संरक्षण, वजन आणि मापे आणि न्यायाचे प्रशासन, सर्वोच्च आणि उच्च न्यायालये वगळता इतर सर्व न्यायालयांची स्थापना आणि संरचना इ.

16) संसद आणि राज्यविधिमंडळातील गणसंख्येची (Quorum) आवश्यकता रद्द केली.

17) संसदेचे सदस्य आणि तिच्या समित्यांचे हक्क आणि विशेषाधिकार वेळोवेळी निश्चित करण्याचे अधिकार संसदेला दिले.

18) अखिल भारतीय न्यायिक सेवेच्या (Indian Judicial Service) निर्मितीसाठी तरतूद.

19) चौकशीनंतर दुसऱ्या टप्प्यावर आपली बाजू मांडण्याचा सनदी सेवकांचा हक्क काढून घेत शिस्तभंगाच्या कारवाईची कार्यपद्धत संक्षिप्त केली.

### ❊ 43 वी घटनादुरुस्ती 1977

1) न्यायालयीन पुनर्विलोकन (Judicial review) आणि आदेश देण्याच्या बाबत सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र पुनस्थापित केले.

2) देशविघातक कारवायांच्या हाताळणीसाठी कायदे करण्याच्या विशेष अधिकारापासून संसदेला वंचित करण्यात आले.

### ❊ 44 वी घटनादुरुस्ती 1978

1) लोकसभा आणि विधानसभांचा मूळ कार्यकाळ (5 वर्षे) पुनर्स्थापित केला.

2) लोकसभा आणि राज्य विधिमंडळाच्या गणसंख्येची तरतूद पुनर्स्थापित केली.

3) संसदीय विशेषाधिकाराबाबत ब्रिटिशांच्या सामान्यगृहाचा संदर्भ वगळण्यात आला.

4) संसद आणि राज्यविधिमंडळामध्ये चालणाऱ्या कार्यपद्धतीचे खरे वार्तांकन वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध (प्रकाशित) करण्यास घटनात्मक संरक्षण दिले.

5) मंत्रिमंडळाचा सल्ला पुनर्विचारार्थ केवळ एकदा परत पाठविण्याचा अधिकार राष्ट्रपतीला दिला. परंतु पुनर्विचार करू दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक करण्यात आला.

6) वटहुकूम जारी करण्यासाठी राष्ट्रपती, राज्यपाल आणि प्रशासक यांच्या समाधानाची तरतूद रद्द केली.

7) सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे काही अधिकार पुनर्स्थापित केले.

8) राष्ट्रीय आणीबाणीच्या संदर्भात 'अंतर्गत अशांतता' या शब्दाऐवजी 'सशस्त्र बंडाळी' हा शब्द योजण्यात आला.

9) कॅबिनेटने केवळ लेखी स्वरूपात शिफारस केल्यानंतरच राष्ट्रपती 'राष्ट्रीय आणीबाणी' घोषित करू शकतात अशी तरतूद केली.

10) राष्ट्रीय आणीबाणी आणि राष्ट्रपती राजवटीबाबत काही ठराविक प्रक्रियात्मक संरक्षक तरतुदी केल्या.

11) मालमत्तेचा हक्क मूलभूत हक्कांच्या यादीतून रद्द केला आणि तो केवळ कायदेशीर हक्क केला.

12) कलम 20 आणि 21 अन्वये हमी दिलेले मूलभूत हक्क राष्ट्रीय आणीबाणीमध्ये तहकूब होणार नाहीत.

13) 'राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि लोकसभेचा सभापती यांच्या निवडणूक वादाबाबत न्यायालये निर्णय देऊ शकत नाहीत', ही तरतूद वगळण्यात आली.

Dilip Sir's STEP UP Academy

**✻ 45 वी घटनादुरुस्ती 1980**

1) लोकसभा आणि राज्याच्या विधानसभांतील अनुसूचित जाती व जमाती तसेच आंग्ल-भारतीय (Anglo Indian) समाजाला देण्यात आलेल्या आरक्षित जागांची मुदत पुढील 10 वर्षांसाठी (1990 पर्यंत) वाढविण्यात आली.

**✻ 46 वी घटनादुरुस्ती 1982**

1) विक्रीकर (Sales Tax) थकबाकीची पूर्तता करण्यासाठी आणि कायद्यातील पळवाटा बुजविण्यासाठी राज्यांना सक्षम केले.
2) विशिष्ट घटकांवरील कर दरांमध्ये (Tax rate) एकवाक्यता आणली.

**✻ 47 वी घटनादुरुस्ती 1984**

1) विविध घटकराज्यांच्या जमीन सुधारणाविषयक 14 कायद्यांचा समावेश 9 व्या परिशिष्टामध्ये केला.

**✻ 48 वी घटनादुरुस्ती 1984**

1) पंजाबमध्ये राष्ट्रपती राजवटचा कालावधी 1 वर्षापुढे वाढविण्यात आला. अशा मुदतवाढीसाठी आवश्यक असलेल्या दोन विशेष अटींची पूर्तता न करताच ही मुदतवाढ देण्यात आली.

**✻ 49 वी घटनादुरुस्ती 1984**

1) त्रिपुरातील स्वायत्त जिल्हा परिषदेला (Qutonomous District Council) घटनात्मक मान्यता दिली.

**✻ 50 वी घटनादुरुस्ती 1984**

1) लष्करी दलांसाठी स्थापन करण्यात आलेल्या गुप्तचर संस्था आणि दूरसंचार दळणवळण व्यवस्थेमध्ये किंवा गुप्तचर संघटनांमध्ये कार्यरत असणाऱ्या सेवकांच्या मूलभूत हक्कांवर निर्बंध लावण्याचे अधिकार संसदेला दिले.

**✻ 51 वी घटनादुरुस्ती 1984**

1) मेघालय, अरूणाचल प्रदेश, नागालँड आणि मिझोराम या राज्यातील लोकसभा आणि मेघालय व नागालँड या राज्यातील विधानसभांमध्ये अनुसूचित जमातींसाठी जागा आरक्षित ठेवण्यात आल्या.

**✻ 52 वी घटनादुरुस्ती 1985**

**(पक्षांतर बंदी कायदा म्हणून परिचित)**

1) लोकसभा आणि राज्यविधिमंडळातील सदस्यांना पक्षांतराच्या आधारे अपात्र ठरविण्याची तरतूद करण्यात आली. तसेच यासंदर्भात विस्तृत माहिती देणाऱ्या 10 व्या परिशिष्टाचा समावेश केला.

**✻ 53 वी घटनादुरुस्ती 1986**

1) मिझोराम संदर्भात विशेष तरतूद करण्यात आली आणि तिच्या विधानसभेची किमान सदस्य संख्या 40 इतकी निश्चित केली.

**✻ 54 वी घटनादुरुस्ती 1986**

1) सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या वेतनामध्ये वाढ करण्यात आली आणि भविष्यात साध्या कायद्याने त्यामध्ये बदल करण्यासाठी संसदेला अधिकार दिले.

**✻ 55 वी घटनादुरुस्ती 1986**

1) अरूणाचल प्रदेशाबाबत विशेष तरतूद करण्यात आली आणि तिच्या विधानसभेची सदस्य संख्या किमान 30 इतकी निश्चित करण्यात आली.

**✻ 56 वी घटनादुरुस्ती 1987**

1) गोवा राज्याच्या विधानसभेची सदस्यसंख्या किमान 30 इतकी निश्चित करण्यात आली.

**✻ 57 वी घटनादुरुस्ती 1987**

1) अरूणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम आणि नागालँड या राज्यांच्या विधानसभांमध्ये अनुसूचित जमातींसाठी जागा आरक्षित ठेवण्यात आल्या.

**✻ 58 वी घटनादुरुस्ती 1987**

1) राज्यघटनेची हिंदी भाषेतील प्रमाणित संहिता पुरविण्यात आली आणि राज्यघटनेच्या हिंदीतील भाषांतराला कायदेशीर मान्यता दिली.

**✻ 59 वी घटनादुरुस्ती 1988**

1) तीन वर्षांपर्यंत पंजाबमध्ये राष्ट्रपती राजवट लागू.
2) अंतर्गत अशांततेच्या आधारावर पंजाबमध्ये राष्ट्रीय आणीबाणीच्या घोषणेची तरतूद.

**✻ 60 वी घटनादुरुस्ती 1988**

1) व्यवसाय, व्यापार, धंदा आणि रोजगार यांवरील करांची मर्यादा वाढवून ती 250 रूपये प्रतिवार्षिक वरून 2500 रुपये प्रतिवार्षिक अशी करण्यात आली.

**✻ 61 वी घटनादुरुस्ती 1989**

1) लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या निवडणूकींमध्ये मतदारांचे वय 21 वरून 18 वर्षे करण्यात आले.

Dilip Sir's STEP UP Academy

**❊ 62 वी घटनादुरुस्ती 1989**

1) अनुसूचित जाती, जमाती आणि आंग्ल-भारतीय समुदायाची लोकसभा आणि विधानसभांतील आरक्षणाची मुदत पुढील 10 वर्षांकरीता (2000 सालापर्यंत) वाढविली.

**❊ 63 वी घटनादुरुस्ती 1989**

1) 59 व्या घटनादुरुस्तीने (1988) पंजाबबाबत केलेले बदल मागे घेतले. दुसऱ्या शब्दांत, आणीबाणी तरतुदींच्या संदर्भात पंजाब राज्याला इतर राज्यांच्या समकक्ष आणले.

**❊ 64 वी घटनादुरुस्ती 1990**

1) पंजाबमधील आणीबाणीचा एकूण कालावधी 3 वर्षे 6 महिन्यांपर्यंत विस्तारित केला.

**❊ 65 वी घटनादुरुस्ती 1990**

1) अनुसूचित जाती आणि जमाती यांच्यासाठी विशेष अधिकारी नेमण्याच्या तरतुदीऐवजी त्यांच्याकरिता बहुसदस्यीय राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्याची तरतूद केली.

**❊ 66 वी घटनादुरुस्ती 1990**

1) विविध राज्यांच्या आणखीन 55 जमीन सुधारणा कायद्यांचा समावेश 9 व्या परिशिष्टामध्ये केला.

**❊ 67 वी घटनादुरुस्ती 1990**

1) पंजाबमधील राष्ट्रपती राजवटीचा एकूण कलावधी 4 वर्षांपर्यंत वाढविला.

**❊ 68 वी घटनादुरुस्ती 1991**

1) पंजाबमधील राष्ट्रपती राजवटीचा एकूण कलावधी 5 वर्षांपर्यंत सुकर केला.

**❊ 69 वी घटनादुरुस्ती 1991**

1) 'दिल्ली राष्ट्रीय राजधानी भूप्रदेश' अशी पुनर्रचना करून दिल्ली या केंद्रशासित प्रदेशाला विशेष दर्जा दिला. या घटनादुरुस्तीने दिल्लीसाठी 70 सदस्यीय विधानसभा आणि 7 सदस्यीय मंत्रिमंडळांची देखील तरतूद केली.

**❊ 70 वी घटनादुरुस्ती 1992**

1) 'राष्ट्रीय राजधीचा भूप्रदेश' असलेल्या दिल्ली आणि पाँडिचेरी या केंद्रशासित प्रदेशांतील विधानसभा सदस्यांचा समावेश राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी असलेल्या निर्वाचन मंडळामध्ये करण्यात आला.

**❊ 71 वी घटनादुरुस्ती 1992**

1) कोकणी, मणिपुरी आणि नेपाळी या भाषांचा 8 व्या परिशिष्टामध्ये समावेश करण्यात आला. यामुळे अनुसूचित भाषांची एकूण संख्या 18 झाली.

**❊ 72 वी घटनादुरुस्ती 1992**

1) त्रिपुरा राज्याच्या विधानसभेमध्ये अनुसूचित जमातींसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या.

**❊ 73 वी घटनादुरुस्ती 1992**

1) पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा आणि संरक्षण मंजूर केले. या हेतूपूर्तीसाठी घटनेमध्ये 'पंचायत' या शीर्षकाखाली 9 व्या भगाची भर घालण्यात आली. याशिवाय नव्या '11 व्या' परिशिष्टामध्ये पंचायतीच्या 29 कार्यात्मक बाबींचा समावेश केला.

**❊ 74 वी घटनादुरुस्ती 1992**

1) शहरी स्थानिक संस्थांना घटनात्मक दर्जा आणि संरक्षण देण्यात आले. याकरिता घटनेमध्ये भाग 9 'अ' चा 'नगरपालिका' या शीर्षकांतर्गत समावेश करण्यात आला. याशिवाय, नव्या '12 व्या' परिशिष्टामध्ये नगरपालिकांच्या 18 कार्यात्मक बाबींचा समावेश केला.

**❊ 75 वी घटनादुरुस्ती 1994**

1) भाडे त्याचे नियंत्रण आणि नियमन या संबंधातील वादांच्या न्यायनिवाड्यासाठी भाडे न्यायासनाची स्थापना करण्याची तरतूद केली. याशिवाय जमीनमालक आणि कुळे यांचे हक्क शीर्षक आणि हितसंबंधांचा समोवश वहिवाट विषयामध्ये केला.

**❊ 76 वी घटनादुरुस्ती 1994**

1) न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण देण्यासाठी तामिळनाडू आरक्षण अधिनियम (1994) याचा (या कायद्याने शैक्षणिक संस्था आणि राज्यसेवेतील पदांमध्ये 69 टक्के आरक्षण दिले) समावेश 9 व्या परिशिष्टामध्ये करण्यात आला. 1992 साली सर्वोच्च न्यायालयाने निकाला दिला होता की, एकूण आरक्षण मर्यादा 50% च्या पुढे जाऊ नये.

**❊ 77 वी घटनादुरुस्ती 1995**

1) अनुसूचित जाती आणि जमातींना शासकीय नोकऱ्यांमधील बढत्यांमध्ये आरक्षण देण्याची तरतूद केली. बढत्यांमधील आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याला या घटनादुरुस्तीने निकालात काढले.

Dilip Sir's STEP UP Academy

**✻ 78 वी घटनादुरुस्ती 1995**

1) विविध राज्यांतील जमीन सुधारणाविषयक आणखीन 27 कायद्यांचा समावेश 9 व्या परिशिष्टामध्ये करण्यात आला. यामुळे या परिशिष्टातील एकूण कायद्यांची संख्या 284 झाली.

**✻ 79 वी घटनादुरुस्ती 1999**

1) अनुसूचित जाती व जमाती आणि आंग्ल-भारतीय समुदायाचे लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांतील आरक्षणाची मुदत पुढील 10 वर्षांकरिता (2010 सालापर्यंत) वाढविली.

**✻ 80 वी घटनादुरुस्ती 2000**

1) केंद्र आणि राज्यांमध्ये महसुलाच्या 'पर्यायी हस्तांतरणाची योजना' सुरू केली. (Alternate scheme for sharing taxes between the Union and States) 10 व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या आधारे ही तरतूद केली. आयोगाच्या मते कर आणि शुल्कांपासून केंद्राल प्राप्त होणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी (आय) 29 टक्के रक्कम राज्यांमध्ये वितरित केली जावी.

**✻ 81 वी घटनादुरुस्ती 2000**

1) एखाद्या वर्षी भरण्यात न आलेल्या आरक्षित जागांचा विचार सरकारने (राज्याने) ''रिक्त पदांचा स्वतंत्र वर्ग'' या दृष्टीने करावा आणि पुढील वर्षामध्ये किंवा वर्षांमध्ये त्या भरण्याचे अधिकार राज्याला दिले. या स्वतंत्र वर्गाचा समावेश त्यावर्षीच्या रिक्त जागांमध्ये करू नये. थोडक्यात, या घटनादुरुस्तीने अनुशेष रिक्त जागांच्या आरक्षणावरील 50 टक्क्यांची मर्यादा संपुष्टात आणली.

**✻ 82 वी घटनादुरुस्ती 2000**

1) अनुसूचित जाती आणि जमातींसाठी कोणत्याही परीक्षेच्या पात्रता गुणांमध्ये शिथिलता देणे किंवा त्यांच्या मूल्यांकनाचा दर्जा कनिष्ठ ठेवण्याची तरतूद केली. याशिवाय केंद्र आणि राज्याच्या लोकसेवांमध्ये चालना देण्यासाठी त्यांना आरक्षण दिले.

**✻ 83 वी घटनादुरुस्ती 2000**

1) अरूणाचल प्रदेशमध्ये अनुसूचित जातींसाठी (SC) पंचायतींमध्ये आरक्षण देण्याची आवश्यकता नाही. संपूर्ण राज्याची लोकसंख्या ही आदिवासी असून तेथे अनुसूचित जाती नाहीत.

**✻ 84 वी घटनादुरुस्ती 2001**

1) लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमधील सदस्य संख्या पुढील 25 वर्षांकरीता (2026 पर्यंत) पुनर्रचित करण्यावर निर्बंध घातले. म्हणजेच, 2026 पर्यंत लोकसभा आणि विधानसभांमधील सदस्य संख्या तीच (2001 पूर्वीची) राहणार आहे. 1991 च्या जनगणनेच्या आधारे राज्यांमधील भौगोलिक मतदार संघांची पुनर्रचना करण्याची तरतूद केली. यापूर्वी 1971 ची जनगणना आधारभूत मानली होती.

**✻ 85 वी घटनादुरुस्ती 2001**

1) जून 1995 पासून पूर्वानुवर्ती परिणामाद्वारा (Retrospective effect) अनुसूचित जाती आणि जमातींच्या शासकीय सेवकांसाठी असलेल्या आरक्षणाच्या नियमानुसार बढतीमध्ये 'अनुक्रमणात्मक सेवाज्येष्ठता' (Consequential seniority) हे तत्त्व लागे केले.

**✻ 86 वी घटनादुरुस्ती 2002**

1) प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्कामध्ये समावेश केला. यानुसार समाविष्ट केलेले कलम 21 'अ' म्हणजे, ''राज्यसंस्था तिने निश्चित केलेल्या रीतीने 6 ते 14 वयोगटातील सर्व मुला-मुलींना मोफत आणि सक्तीचे शिक्षण पुरवेल.
2) मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम 45 च्या विषयामध्ये बदल केला. त्यानुसार, ''सर्व मुलांच्या वयाची 6 वर्षे पूर्ण होईपर्यंत राज्यसंस्था त्यांना प्रारंभिक बाल्यावस्थेत संगोपन आणि शिक्षण पुरविण्याचा प्रयत्न करेल.''
3) कलम 51 - 'अ' अंतर्गत नवीन मूलभूत कर्तव्य (11 वे) समाविष्ट करण्यात आले. त्यानुसार, 6 ते 14 वयोगटातील मुला-मुलींचे आईवडील या पालक असणाऱ्या सर्व भारतीय नागरिकांचे हे कर्तव्य असेल की, त्यांनी आपल्या मुलांना वा पाल्याला शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी.''

**✻ 87 वी घटनादुरुस्ती 2003**

1) 1991 च्या जनगणनेऐवजी (84 वी घटनादुरुस्ती) 2001 सालच्या जनगणनेच्या आधारे भौगोलिक मतदार संघांची पुनर्रचना करण्यात यावी.

**✻ 88 वी घटनादुरुस्ती 2003**

1) सेवा कराबाबत (कलम 268 'अ') तरतूद केली. केंद्राकडून सेवांवर कर लादले जातात. परंतु, त्याची वसुली आणि वितरण संसदेने ठरवून दिलेल्या तत्त्वाप्रमाणे केंद्र आणि राज्यामध्ये केले जाते.

**✻ 89 वी घटनादुरुस्ती 2003**

1) अनुसूचित जाती आणि जमाती यांच्यासाठी पूर्वी संयुक्त असलेल्या राष्ट्रीय आयोगाचे विभाजन करण्यात आले. त्यानुसार दोन राष्ट्रीय आयोग स्थापन केले. उदा. अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग (कलम 338) अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग (338 A) प्रत्येक आयोगामध्ये एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष आणि इतर तीन सदस्य असतात. त्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतात.

**✻ 90 वी घटनादुरुस्ती 2003**

1) आसामच्या विधानसभेमध्ये बोडोलँड टेरिटोरीयल एरियाज डिस्ट्रिक्ट (कलम 332(6)) यामधून होणाऱ्या अनुसूचित जमाती आणि बिगर अनुसूचित जमातींच्या पूर्वाश्रमीच्या प्रतिनिधित्वामध्ये सातत्य राखण्याची (चालू ठेवणे) तरतूद केली.

**✻ 91 वी घटनादुरुस्ती 2003**

– मंत्रिमंडळाचा आकार मर्यादित ठेवणे, सार्वजनिक पदे धारण करण्यापासून, पक्षांतर करणाऱ्यांना रोखणे आणि पक्षांतर बंदी कायदा बळकट करणे या उद्देशाकरिता पुढील तरतुदी केल्या :

1) पंतप्रधानांसहित, केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्र्यांची एकूण संख्या $\frac{1}{3}$ लोकसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या 15 टक्क्यांपेक्षा अधिक असू नये (कलम 75 (1 अ)).

2) संसदेच्या दोन्ही सभागृहांपैकी कोणत्याही सभागृहातील, कोणत्याही राजकीय पक्षाच्या सदस्याला पक्षांतरामुळे अपात्र घोषित केले असेल तर, त्या व्यक्तीला मंत्रिपदी नियुक्त करू नये (कलम 75 (1 ब)).

3) मुख्यमंत्र्यांसहित, राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या संबंधित राज्याच्या विधानसभेतील एकूण सदस्य संख्येच्या 15 टक्क्यांपेक्षा अधिक असू नये. परंतु, मुख्यमंत्र्यांसहित, एकूण मंत्र्यांची संख्या 12 पेक्षा कमी असू नये (कलम 164 (1 अ)).

4) राज्य विधिमंडळाच्या सभागृहांपैकी कोणत्याही सभागृहातील, कोणत्याही राजकीय पक्षाच्या सदस्याला पक्षांतरामुळे अपात्र घोषित केलेले असेल तर, त्या व्यक्तीला मंत्रिपदी नियुक्त करू नये (कलम 164 (1 ब)).

5) संसदेच्या किंवा राज्य विधिमंडळाच्या सदस्यांपैकी, कोणत्याही पक्षाचा सदस्य असणाऱ्याला पक्षांतराच्या आधारे अपात्र घोषित केलेले असेल तर, तिला इतर कोणतेही मोबदलाप्राप्त राजकीय पद भूषविता येणार नाही. मोबदला प्राप्त (मेहनताना) राजकीय पद म्हणजे :

अ) केंद्र वा राज्य शासनाच्या अखत्यारीतील असे कोणतेही पद, जिला संबंधित शासनाच्या सार्वजनिक महसुलातून वेतन वा मोबदला दिला जातो. किंवा

ब) एखाद्या संस्थांतर्गत वा मंडळांतर्गत पद, जिचा समावेश शासनामध्ये केलेला असेल किंवा नसेल, ती संस्था वा मंडळ पूर्णपणे वा निम शासकीय (केंद्र वा राज्य) असेल आणि त्या पदासाठी ते मंडळ/संस्था वेतन वा मोबदला देत असेल (अपवाद, असे वेतन वा मोबदल्याचे स्वरूप नुकसान भरपाईचे असेल तर) (कलम 361 'ब').

6) 10 व्या परिशिष्टामधील पक्षांतरबंदी कायद्यामध्ये तरतूद केली होती की, विधिमंडळीय (मूळच्या) पक्षापासून $\frac{1}{3}$ सदस्य विभक्त झाल्यास ते पक्षांतरामुळे अपात्र ठरणार नाहीत. या घटनादुरुस्तीने ही तरतूद रद्द केली. याचाच अर्थ, पक्षांतर करणाऱ्यांना फुटीचा आधार घेऊन कोणतेही संरक्षण उपलब्ध नाही.

**✻ 92 वी घटनादुरुस्ती 2003**

1) 8 व्या परिशिष्टामध्ये आणखी चार नव्या भाषांचा समावेश करण्यात आला. त्या भाषा : बोडो, डोग्री (डोंगरी), मथली (मैथिली) आणि संथाळी इ. होत. अशाप्रकारे घटनेची मान्यता असलेल्या भाषांची संख्या 22 झाली.

**✻ 93 वी घटनादुरुस्ती 2005**

1) अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांचा अपवाद करून खाजगी शैक्षणिक संस्थांसह (राज्याकडून निधी मिळणाऱ्या वा न मिळणाऱ्या) इतर शैक्षणिक संस्थांमध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी किंवा अनुसूचित जाती व जमातींसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्यसंस्थेला दिला. इनामदार निर्णयाला या घटनादुरुस्तीने निकालात काढले. या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले होते की, ''राज्यसंस्था तिचे आक्षरणाचे धोरण, व्यावसायिक महाविद्यालयांसह, अल्पसंख्यांक आणि बिगर अल्पसंख्याक विनाअनुदानित खाजगी महाविद्यालयांवर लादू शकत नाही.'' खाजगी, विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये 'आरक्षण' ही बाब बिगर घटनात्मक असल्याचे न्यायालयाने घोषित केले होते.

**✻ 94 वी घटनादुरुस्ती 2006**

1) आदिवासी कल्याणमंत्री असण्याच्या आबंधनातून बिहार राज्याला वगळण्यात आले आणि ही तरतूद झारखंड व छत्तीसगढ या राज्यांना लागू केली. याशिवाय, ही तरतूद मध्यप्रदेश आणि ओरिसा (या दोन राज्यांत अंमलात होतीच. (कलम 164 (1)) या राज्यांना देखील लागू असेल.

Dilip Sir's STEP UP Academy

**✻ 95 वी घटनादुरुस्ती 2009**

1) या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे राज्यघटनेतील कलम 334 (राखीव जागा व विशेष प्रतिनिधित्व) यामध्ये 'साठ वर्षे' या शब्दाऐवजी 'सत्तर वर्षे' अशी दुरुस्ती करण्यात आली. म्हणजेच या दुरुस्तीद्वारे लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे आरक्षण तर आंग्लभारतीय समाजाच्या विशेष प्रतिनिधित्वाची (नामनिर्देशनाची) कालमर्यादा 2020 सालापर्यंत वाढविण्यात आली. या विधेयकाला 18 जानेवारी 2010 रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली तर, अधिनियमाची अंमलबजावणी 25 जानेवारी 2010 पासून सुरू झाली.

**✻ 96 वी घटनादुरुस्ती 2011**

1) राज्यघटनेच्या 8 व्या परिशिष्टातील (भाषा) 15 क्रमांकाच्या 'ओरिया' (Oriya) या शब्दाऐवजी 'उडिया/ओडिया' (Odia) हा शब्द या घटनादुरुस्तीने नमूद करण्यात आला. या विधेयकाला 23 सप्टेंबर 2011 रोजी राष्ट्रपतींनी संमती दिली.

**✻ 97 वी घटनादुरुस्ती 2011**

1) या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे, राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातील कलम 19(1) खंड (क) मध्ये 'वा संघ' या शब्दानंतर 'वा सहकारी संस्था' (Or Co-operative Societies) हा शब्द समाविष्ट करण्यात आला.
2) राज्यघटनेच्या चौथ्या भागातील कलम 43 (अ) नंतर नव्याने 'कलम 43 (ब) नुसार, 'राज्यसंस्था सहकारी संस्थांची (Societies) ऐच्छिक निर्मिती, स्वायत्त कार्यप्रवणता, लोकशाही नियंत्रण आणि व्यावसायिक व्यवस्थापन करण्याकरिता प्रोत्साहन देईल', असे नमूद केले आहे.
3) राज्यघटनेतील 9 'अ' या भागानंतर 'The Co-operative Societies' या शीर्षकाखाली 9 'ब' हा नवीन भाग समाविष्ट करण्यात आला. या भागामध्ये कलम 243 ZH ते कलम 243 ZT इत्यादी कलमांचा समावेश आहे. या कलमांमध्ये विविध संज्ञा (243 ZH), सहकारी संस्थांची निर्मिती (243 ZI), मंडळ आणि तिच्या पदाधिकाऱ्यांची संख्या व कालावधी (243 ZJ), मंडळ सदस्यांच्या निवडणूका (243 ZK), मंडळ आणि अंतरिम व्यवस्थापनाचे नियंत्रण व तहकुबी (243 ZL), सहकारी संस्थांच्या लेखांची हिशोब तपासणी (243 ZM), साधारण सभेची बैठक (243 ZN), माहिती मिळविण्याचा सदस्यांचा अधिकार (243 ZO), परतावे (243 ZP), गुन्हे आणि शिक्षा (243 ZQ), बहुराज्यीय सहकारी संस्थेसाठी अर्ज (243 ZR), केंद्रशासित प्रदेशाकडे अर्ज (243 ZS) आणि अस्तित्वात असलेल्या कायद्यांचे सातत्य (243 ZT) इत्यादी तरतुदी केलेल्या आहेत.

- या विधेयकाला 12 जानेवारी 2012 रोजी राष्ट्रपतींनी संमती दिली. या अधिनियमाची अंमलबजावणी मात्र केंद्र सरकार राजपत्रामध्ये अधिसूचित करेल त्या तारखेपासून सुरू होईल.

**✻ 98 वी घटनादुरुस्ती 2013**

- कर्नाटक राज्याच्या राज्यपालांना हैद्राबाद-कर्नाटक क्षेत्रातील विकासासाठीचे अधिकार

**✻ 99 वी घटनादुरुस्ती, 2014**

- कलम 124 A : राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाची (National Judicial Appointments Commission) रचना.

1) अध्यक्ष : सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश. (CJI)
2) सदस्य : 2 सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ न्यायाधिश.
   - केंद्रीय कायदा व न्याय मंत्री
   - दोन इतर व्यक्ती

- या दोन व्यक्तींची निवड एक समितीद्वारे केली जाईल : या समितीत CJI, PM, लोकसभा विरोधी पक्ष नेता
- या दोन व्यक्तींपैकी एक व्यक्ती SC/ST/OBC/Minority/Woman या गटातील असावी.
- या दोन व्यक्तींची नियुक्ती : 3 वर्षांसाठी (पुनर्नेमणूक : नाही)

- कलम 124 B : राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाची कार्ये:
- भारताचे सरन्यायाधिश, सर्वोच्च न्यायालयाचे इतर न्यायाधिश, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश, उच्च न्यायालयाचे इतर न्यायाधिश, या पदांवरील व्यक्तींची शिफारस करणे.
- उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींची बदलीबाबत शिफारस करणे.

**✻ 100 वी घटनादुरुस्ती, 2015**

- याद्वारे बांग्लादेशाने 510 एकर जमिनीचे हस्तांतरण भारतास केले. तर भारताने 10,000 एकर जमीन बांग्लादेशास हस्तांतरित केली.
- या जमीन हस्तांतरणात सहभागी राज्ये : आसाम, पश्चिम बंगाल, मेघालय, त्रिपुरा.

**✻ 101 वी घटनादुरुस्ती, 2016**

- या घटनादुरुस्ती कायद्यावर 8 सप्टेंबर 2016 रोजी राष्ट्रपतींची सही झाली.
- कलम 246 A : 'वस्तू आणि सेवा' या विषयावर केंद्र आणि राज्य कायदा करू शकतील.
- राज्यांतर्गत व्यापार केंद्र आणि राज्याच्या अधिकारात आला असून राज्य-राज्यादरम्यानचा व्यापार हा केंद्राचा विषय झाला आहे.

- कलम 269 A : राज्या-राज्या दरम्यानच्या होणाऱ्या व्यापारावर कर आकारणी व गोळा करण्याचा अधिकार केंद्र सरकारचा असेल आणि GST परिषदेच्या शिफारशीनुसार हा कर केंद्र आणि राज्यांमध्ये विभागला जाऊ शकतो.
- याद्वारे 7 व्या परिशिष्टात बदल झाला.
- कलम 246A : घटनेत हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले.
- कलम 246A (1) : कलम 246 आणि 254 मध्ये काहीही नमूद असले तरी, संसदेने आणि खंड (2) च्या अधीन राहून प्रत्येक राज्याच्या विधिमंडळाला संघाने (Union) किंवा अशा राज्याने लादलेल्या वस्तू आणि सेवा करांविषयीचे नियम बनवण्याचे अधिकार आहेत.
- कलम 246A (2) : वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या आंतरराज्यीय व्यापाराच्या (Inter-State Trade) दरम्यान होत असलेल्या वस्तू आणि सेवा कर यांच्याशी संबंधित कायदे करण्याचा अधिकार संसदेस असेल.
- कलम 269A हे नवीन कलम
- कलम 269 (2) : वरील उपकलम (1) द्वारे एखाद्या राज्यास वाटलेली रक्कम भारताच्या संचित निधीचा (Consolidated fund of India) भाग नसेल.
- कलम 279A : GST परिषद (GST Council) स्थापन करण्याबाबत.

**✼ GST परिषदेची रचना :**

- अध्यक्ष : केंद्रीय वित्त मंत्री
- सदस्य : केंद्रीय महसूल/वित्त राज्य मंत्री
- वित्त किंवा कर आकारणीचा प्रभार असलेला प्रत्येक राज्यातील एक नामनिर्देशित सदस्य

- **इतर काही महत्त्वाच्या दुरुस्त्या :**

- The residuary power of legislation of parliament under article 248 is now subject to article 246A
- कलम 249 मध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे.
- कलम 249 : राज्यसभेने 2/3 बहुमताने जर ठराव मंजूर केला तर संसद राष्ट्रीय हिताच्या दृष्टीकोनातून GST बाबत आवश्यक कायदा करू शकते.
- कलम 250 : आणीबाणीच्या काळातही GST संदर्भात कायदे करण्याचा संसदेला अधिकार असेल.
- कलम 269 : GST संदर्भात आंतरराज्यीय व्यापार (Inter-State Trade) बाबत कायदे करण्याचा अधिकार संसदेला असेल.

**✼ 102 वी घटनादुरुस्ती, 11 ऑगस्ट 2018**

- राष्ट्रीय मागास वर्ग आयोगास (National Commission on Backward Classes) घटनात्मक दर्जा देण्याबाबत.
- कलम 338 B कलम 342 A आणि कलम 366 (26 C) हे नव्याने समाविष्ट करण्यात आले.
- कलम 338 B : सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांसाठी 'राष्ट्रीय मागास वर्ग आयोग' काम करले.
- या आयोगाची रचना अध्यक्ष + उपाध्यक्ष + सदस्य (1 + 1 + 3) अशी असेल.
- यांची नियुक्ती (Appointment) राष्ट्रपती करतील.
- कलम 342 A : सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग
  i) राष्ट्रपती अधिसुचनेद्वारे या गटात येणाऱ्या वर्गांची यादी जाहीर करू शकतात.
  ii) अशा यादीत एखाद्या वर्गाचा समावेश करण्याचा अथवा काढून टाकण्याचा संसदेला असेल. संसद कायदा करून तो बदल करू शकते.
- कलम 366 (26 C) : सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग म्हणजेच कलम 342 A नुसार घोषित केलेले वर्ग होय.

**✼ 103 वी घटनादुरुस्ती, 12 जानेवारी 2019**

- या घटनादुरुस्तीने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षण नमूद केले असून त्यासाठी घटनेत कलम 15(6) आणि कलम 16(6) नव्याने समाविष्ट केलेले आहे.
- कलम 15(6) :
  i) कलम 15(4) आणि कलम 15(5) मधील गटांव्यतिरिक्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विशेष तरतूद करण्याबाबत.
  ii) शैक्षणिक संस्थांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना 10% आरक्षणाची तरतूद.
- कलम 16(6) : कलम 16(4) मध्ये नमूद केलेल्या गटांव्यतिरिक्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना नोकऱ्यांमध्ये जास्तीत जास्त 10% आरक्षण देण्यात येईल.

Dilip Sir's STEP UP Academy

# विविध प्रकारचे आयोग

## राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (NHRC)

- स्थापना : 12 ऑक्टोबर 1993
- रचना : अध्यक्ष + 5 पूर्णवेळ सदस्य + 7 मानद सदस्य
- अध्यक्ष : सर्वोच्च न्यायालयाचे कोणतेही माजी न्यायाधीश

● **पूर्णवेळ सदस्य :**

- 1 : सर्वोच्च न्यायालयाचे कार्यरत किंवा माजी न्यायाधीश
- 1 : उच्च न्यायालयाचे कार्यरत किंवा माजी मुख्य न्यायाधीश
- 3 : मानवाधिकारांचे ज्ञान किंवा या क्षेत्राशी संबंधीत व्यक्ती (पैकी कमीत कमी एक महिला असावी.)

● **मानद सदस्य :**

1) अध्यक्ष, राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग
2) अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोग
3) अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग
4) अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग
5) अध्यक्ष, राष्ट्रीय मागास वर्ग आयोग
6) अध्यक्ष, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग
7) अपंगासाठीचे मुख्य आयुक्त (Chief Commissioner for Persons with Disabilities)

- नेमणूक : सदस्य व अध्यक्षांची नेमणूक राष्ट्रपती करतात.
- उच्चाधिकार समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती करतात. त्या निवड समितीत अध्यक्ष पंतप्रधान असतात. तर सदस्यांमध्ये लोकसभा सभापती, केंद्रीय गृहमंत्री, राज्यसभा उपाध्यक्ष. लोकसभा व राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते यांचा समावेश होतो.

✻ **कार्यकाल :**

- अध्यक्ष व सदस्यांनी पदभार सांभाळल्यापासून 3 वर्षे किंवा वयाची 70 वर्षे पूर्ण होऊ पर्यंत असेल.
- फक्त अध्यक्षांची पुनर्नेमणूक होऊ शकते (वयोमर्यादेच्या आत असेल तर).

✻ **कार्ये व अधिकार :**

1) स्वप्रेरणेने किंवा पिडीत व्यक्तिने तक्रार केल्यास, किंवा तिच्यावतीने इतर कोणीही तक्रार केल्यास चौकशी करणे.
2) मानवी अधिकाराच्या उल्लंघनाशी संबंधित चालू खटल्यात किंवा प्रलंबित खटल्यात न्यायालयाच्या अनुमतीने हस्तक्षेप करणे.
3) मानवी अधिकारांवरील करार व इतर आंतरराष्ट्रीय साधनांचा अभ्यास करणे व त्यांच्या अंमलबजावणीसाठी शिफारस करणे.
4) मानवी अधिकार क्षेत्रात संशोधन हाती घेणे व त्याचे प्रवर्तन करणे.
5) या क्षेत्रात काम करणाऱ्या क्षेत्रात गैर-सरकारी संघटना व संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे.

● वरील कार्ये करण्यासाठी आयोगास नागरी प्रक्रिया संहिता, 1908 (Code of Civil Procedure, 1908) अंतर्गत दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत. यामध्ये पुढील बाबींचा समावेश :

1) साक्षीदारांना बोलावणे व शपथेवर त्यांची साक्ष नोंदवणे.
2) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध आणि निर्मिती.
3) ॲफिडेव्हिटवर पुरावा नोंदवणे.
4) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणताही शासकीय अभिलेख मिळवणे इत्यादी.

✻ **याबाबत अधिक माहिती :**

1) राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करायची असल्यास ती इंग्रजी, हिंदी किंवा आठव्या परिशिष्टात नमूद केलेल्या कोणत्याही भाषेत करता येते.
2) तक्रारी स्वीकारण्यासाठी ई-मेल, फोन, फॅक्स किंवा आयोगाच्या मोबाईल नंबर ही उपलब्ध करून दिलेला आहे.
3) आयोगाकडे स्वतःचे तपास कर्मचारी आहेत. पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली तपासासाठी कर्मचारी आहेत. तसेच अनेक तपासणी खटल्यांमध्ये आयोग NGO ची सुद्धा मदत घेतो.
4) जर सशस्त्र सेना दलांद्वारे मानवी अधिकारांचे उल्लंघन झाल्याची तक्रार आयोगाकडे आल्यास यावर आयोग केंद्र सरकारकडे अहवाल मागेल. असा अहवाल केंद्र सरकारकडून प्राप्त झाल्यानंतर आयोग त्यावर कारवाई करणार नाही किंवा पुन्हा त्यावर कारवाई करण्यासाठी केंद्र सरकारला शिफारशी सादर करेल. पुढील तीन महिन्यात आयोगाने सुचवलेल्या शिफारशींवर केंद्र सरकारने कारवाई करणे अपेक्षित असते. त्यानंतर आयोगाने केलेल्या शिफारशी आणि केंद्र सरकारने केलेली कारवाई याबाबत एक अहवाल तयार करून प्रसिद्ध करेल आणि त्याची एक प्रत तक्रारकर्त्याला देण्यात येईल.

Dilip Sir's STEP UP Academy

- आयोगाने केलेल्या शिफारशींवर केंद्र/राज्य शासन सामान्य परिस्थितीत एकच महिन्यात कृती करेल. आणि जर ते सशस्त्र दलांशी संबंधित असेल तर त्यासाठी जास्तीत जास्त 3 महिने वेळ दिला जातो.

⁕ **मानवी हक्क (दुरुस्ती) अधिनियम 2006 :** याद्वारे मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 यामध्ये पुढील सुधारणा केल्या.

1) राज्य मानवी हक्क आयोगातील सदस्य संख्या 5 वरून 3 करण्यात आली.
2) राज्य सरकारला न कळविता तुरूंगाला भेटी देण्याचा अधिकार राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाला देण्यात आला.
3) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडे आलेल्या तक्रारी राज्य मानवी हक्क आयोगाकडे हस्तांतरित करण्याची तरतूद केली.
4) NCST आणि NCSC या आयोगाच्या अध्यक्षांना राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे पदसिद्ध सदस्य करण्याची तरतूद केली.
5) चौकशी चालू असतानासुद्धा मानवी हक्क आयोगाला नुकसान भरपाई करण्याची शिफारस करण्याचा अधिकार देण्यात आला.

⁕ **मानवी हक्क (दुरुस्ती) अधिनियम 2019 :**

- याद्वारे मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 यामध्ये पुढील सुधारणा केल्या :

1) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष हे सर्वोच्च न्यायालयातील माजी सरन्यायाधीश किंवा इतर न्यायाधीश असू शकतील.
2) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगात पूर्णवेळ सदस्य संख्या 4 वरून 5 केली. यात मानवी हक्कांशी संबंधीत ज्ञान असणाऱ्या 3 व्यक्तींपैकी कमीत कमी एक महिला असण्याची तरतूद केली.
3) अगोदर फक्त अल्पसंख्यांक आयोग, महिला आयोग अनुसूचित जाती आयोग आणि अनुसूचीत जमाती आयोग या राष्ट्रीय आयोगाच्या अध्यक्षांना पदसिद्ध सदस्यत्व देण्यात आले होते परंतू आता यात राष्ट्रीय मागासवर्ग आयोग, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष आणि अपंगाबाबतचे मुख्य आयुक्त यांनाही स्थान देण्यात आले आहे.
4) राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष हे उच्च न्यायालयातील कोणतेही न्यायाधीश असण्याची तरतूद केली आहे.
5) राष्ट्रीय तसेच राज्य आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाल 5 वर्षांवरून 3 वर्षांपर्यंत कमी केला आहे.

⁕ **आयोगाचे आत्तापर्यंतचे अध्यक्ष :**

| नाव | कार्यकाल |
|---|---|
| 1) न्या.रंगनाथ मिश्रा | 1993-1996 |
| 2) न्या.व्यंकट चैलय्या | 1996-1999 |
| 3) न्या.जे.एस. वर्मा | 1999-2003 |
| 4) न्या.ए.एस. आनंद | 2003-2006 |
| 5) न्या.शिवराज पाटील | 2005-2007 (तात्पूरते) |
| 6) न्या.राजेंद्र बाबू | 2007-2009 |
| 7) न्या.गोविंद प्रसाद माथूर | 2009-2010 (तात्पूरते) |
| 8) न्या.के.जी.बालकृष्णन | 2010-2015 |
| 9) न्या.सिरियाक जोसेफ | 2015-2016 (तात्पूरते) |
| 10) न्या.एच.एल.दत्तू | 2016-2020 |
| 11) अरुण कुमार मिश्रा | 2 जून 2021 पासून |

## राज्य मानवाधिकार आयोग

- रचना : अध्यक्ष आणि दोन सदस्य
- अध्यक्ष : उच्च न्यायालयाचे कोणतेही माजी न्यायाधीश.
- सदस्य : 1) उच्च न्यायालयाचे कार्यरत किंवा माजी न्यायाधीश किंवा 7 वर्षे अनुभव असलेले जिल्हा न्यायाधीश.
  2) मानव अधिकार क्षेत्रात ज्ञान असलेली, तज्ञ व्यक्ती,
- **नेमणूक :** अध्यक्ष व सदस्य नेमणूक : राज्यपाल एका निवड समितीच्या शिफारशीनुसार करतात.
- या निवड समितीत अध्यक्ष मुख्यमंत्री, तर सदस्यांमध्ये राज्याचे गृहमंत्री, विधानसभा अध्यक्ष, विधानसभेतील विरोधीपक्ष नेते यांचा समावेश होतो.
- विधानपरिषद असलेल्या राज्यात विधानपरिषदेचे सभापती व विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते.
- कार्यकाल : अध्यक्ष व सदस्यांचा कार्यभार स्वीकारल्यापासून 3 वर्षे किंवा वयाची 70 वर्षे पूर्ण होईपर्यंत असेल.
- वयोमर्यादेच्या आत अध्यक्षांची पुनर्नेमणूक करता येऊ शकते.
- कार्ये : कार्ये व अधिकार राष्ट्रीय आयोगाच्या प्रमाणेच परंतु राज्य व समवर्ती विषयासंबंधीत मानवाधिकारांच्या उल्लंघनाची चौकशीचे अधिकार आहेत.

## महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग (MSHRC)

- स्थापना : 6 मार्च 2001
- रचना : अध्यक्ष आणि दोन सदस्य.
- महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करण्यासाठी मराठी, हिंदी, गुजराती किंवा इंग्रजी भाषेचा वापर केला जाऊ शकतो.

Dilip Sir's STEP UP Academy

- पश्चिम बंगाल हे राज्य मानवी हक्क आयोग स्थापन करणारे पहिले (1995) राज्य ठरले आहे.

| ❊ महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाचे आतापर्यंतचे अध्यक्ष | |
|---|---|
| **अध्यक्ष** | **कार्यकाळ** |
| 1) न्या.अरविंद सावंत | 2001 ते 2002 |
| 2) न्या.अनंत माने | 2002 ते 2006 |
| 3) न्या.क्षितीज व्यास | 2007 ते 2012 |
| 4) न्या.एस.आर.बन्नूरमथ | 2012 ते 2017 |
| 5) श्री.एम.ए.सयीद | 2017 पासून (तात्पुरते) |
| 6) के.के. ताटेड | 2021 पासून |

❊ **मानवाधिकार न्यायालय (Human Rights Courts)**

- मानवी अधिकार संरक्षण अधिनियम, 1993 नुसार प्रकरण सहा, सेक्शन 30 नुसार राज्य शासन उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांच्या सहमतीने प्रत्येक जिल्ह्यात एक कोर्ट ऑफ सेशन मानवाधिकार न्यायालय म्हणून अधिसूचनेद्वारे घोषित करू शकेल.
- प्रत्येक मानवाधिकार न्यायालयासाठी राज्य शासन एखाद्या सरकारी वकिलाला किंवा किमान 7 वर्षे वकिलीचा अुनभव असलेल्या वकिलाला विशेष सरकारी वकिल म्हणून घोषित करेल.

## राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग (NCST) (National Commission on Scheduled Tribes)

❊ **इतिहास :**

- कलम 338 मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठीचे विशेष अधिकारी नेमण्याची तरतूद होती. त्यास अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आयुक्त असे म्हटले गेले.
- कार्ये : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या घटनात्मक सुरक्षेबाबतच्या मुद्यांची चौकशी करण्यासाठी व त्यांच्या कामकाजाबाबत अहवाल देणे.
- 1978 साली अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी एका अवैधानिक बहुसदस्यीय आयोगाची स्थापना करण्यात आली.
- 1987 : सरकारने आयोगाच्या कार्यात बदल केले व त्याचे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठीचा राष्ट्रीय आयोग असे नामकरण केले.
- 1990 साली राष्ट्रीय एस.सी.-एस.टी. आयोग असे नाव देण्यात आले (65 वी घटनादुरुस्ती) आणि 1992 साली हा घटनात्मक आयोग कार्यरत झाला.
- 2003 : 89 वी घटनादुरुस्तीद्वारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठीच्या संयुक्त आयोगाचे विभाजन करून अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग आणि अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग अशा दोन संस्था निर्माण करण्यात आल्या.
- कलम 338 : अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग (NCSC)
- कलम 338A : अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग (NCST)

## अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग (NCST)

- स्थापना : 19 फेब्रुवारी 2004
- नियुक्ती : राष्ट्रपती
- रचना : अध्यक्ष + उपाध्यक्ष + 3 सदस्य
  (3 सदस्यांपैकी एक महीला असावी. अध्यक्ष आदिवासी समाजातीलच असावा परंतु उपाध्यक्ष आणि सदस्य यांच्यापैकी कमीत कमी दोन सदस्य आदिवासी समाजातील असावेत.)
- कार्यकाल : 3 वर्षे (दोन पेक्षा जास्त वेळा नियुक्ती होणार नाही)
- राजीनामा : अध्यक्ष व सदस्य आपला राजीनामा राष्ट्रपतींना देतात.
- पदाचा दर्जा : अध्यक्षांना केंद्रिय कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जा, उपाध्यक्षांना राज्य मंत्र्यांचा दर्जा आणि सदस्यांना भारत सरकारच्या सचिवांचा दर्जा देण्यात येतो.

❊ **या आयोगाची कार्ये :**

1) अनुसूचित जमातींसाठी असलेल्या घटनात्मक व इतर कायदेशीर सुरक्षा उपाययोजनांसंबंधी सर्व बाबींची चौकशी करणे व त्यावर देखरेख करणे आणि त्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करणे.
2) अनुसूचित जमातींसाठीच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना व अधिकार यापासून वंचित ठेवण्याविषयीच्या विशिष्ट तक्रारींची चौकशी करणे.
3) अनुसूचित जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासाच्या योजना प्रक्रियेत सहभागी होणे व सल्ला देणे आणि केंद्रात किंवा राज्यात त्यांच्या विकासाच्या वाटचालीचे मूल्यमापन करणे.
4) सुरक्षा उपाययोजनांच्या कामकाजाबाबत राष्ट्रपतीला वार्षिक किंवा आवश्यक वाटेल त्यावेळी अहवाल सादर करणे. आयोग राष्ट्रपतीला वार्षिक अहवाल सादर करतो.

Dilip Sir's STEP UP Academy

❊ **आयोगाचे अधिकार :**

- या आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असून यात पुढील बाबी समाविष्ट असतात :

1) भारताच्या कोणत्याही भागातून कोणत्याही व्यक्तिला उपस्थित राहण्याचे आदेश काढणे व त्याची अंमलबजावणी करणे आणि शपथेवर त्याची तपासणी करणे.
2) कोणतेही कागदपत्र शोधून काढण्याचा व सादर करण्याचा आदेश देणे.
3) प्रतिज्ञापत्रावर साक्ष घेणे.
4) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून सार्वजनिक नोंदींची कागदपत्रे मागविणे.
5) साक्षीदार आणि कागदपत्रांच्या परीक्षणासाठी उपस्थित राहण्याचा आदेश देणे.
6) राष्ट्रपती ठरवतील त्याप्रमाणे इतर कोणताही मुद्दा.

❊ **इतर कार्ये :**

1) वन क्षेत्रात राहणाऱ्या अनुसूचित जमातींना दुय्यम व उत्पादनांचे मालकी अधिकार देण्यासंबंधी उपाययोजना करणे.
2) कायद्याप्रमाणे जल व खनिज साधनांवर आदिवासी समुदायांचे अधिकार सुरक्षित करण्यासाठी उपाययोजना करणे.
3) आदिवासींच्या विकासासाठी आणि त्यांना अधिक चांगली व शाश्वत स्वरूपाची उपजीविका मिळावी यासाठी प्रयत्न करणे.
4) आदिवासी लोकांपासून जमीन हिरावून घेण्याविरूद्ध उपाययोजना करणे. जर ते जमिनीपासून वंचित झाले असतील तर त्यांचे परिणामकारक पुनर्वसन करण्यासाठी उपाययोजना करणे.
5) वन संरक्षण आणि सामाजिक वनीकरण करण्यासाठी आदिवासी समुदायाचे सर्वाधिक सहकार्य व सहभाग मिळविण्यासाठी उपाययोजना करणे.
6) पंचायत (अनुसूचित क्षेत्रांना लागू) कायदा, 1996 मधील तरतुदींची पूर्ण अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करणे.

❊ **आयोगाचे आतापर्यंतचे अध्यक्ष :**

| अध्यक्ष | कार्यकाळ |
|---|---|
| 1) कुंवर सिंह | 2004-07 |
| 2) श्रीमती उर्मिला सिंग | 2007-10 |
| 3) डॉ. रामेश्वर ओरान | 2010-13 |
| 4) डॉ. रामेश्वर ओरान | 2013-16 |
| 5) नंदकुमार साय | 2017-2020 |
| 6) हर्ष चौहान | 2021 पासून |

## राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (National Commission for Scheduled Caste)

- या आयोगाची पार्श्वभूमी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगा-प्रमाणेच असल्याने येथे पुन्हा नमूद केलेली नाही.
- स्थापना वर्ष : 2004
- रचना : अध्यक्ष + उपाध्यक्ष + 3 सदस्य
  (3 सदस्यांपैकी कमीत कमी एक महिला असावी.)
- नियुक्ती : राष्ट्रपती
- राजीनामा : राष्ट्रपतींकडे देतील.
- कार्यकाळ : 3 वर्षे (पुनर्नियुक्ती-फक्त एकदाच होऊ शकते.)

❊ **कार्ये :**

1) अनुसूचित जातींसाठी असलेल्या घटनात्मक व इतर कायदेशीर सुरक्षा उपाययोजनांसंबंधी सर्व बाबींची चौकशी करणे व त्यावर देखरेख करणे आणि त्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करणे.
2) अनुसूचित जातींसाठीच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना व अधिकार यापासून वंचित ठेवण्याविषयीच्या विशिष्ट तक्रारींची चौकशी करणे.
3) अनुसूचित जातींच्या सामाजिक-आर्थिक विकासाच्या योजना प्रक्रियेत सहभागी होणे व सल्ला देणे आणि केंद्रात किंवा राज्यात त्यांच्या विकासाच्या वाटचालीचे मूल्यमापन करणे.
4) सुरक्षा उपाययोजनांच्या कामकाजाबाबत राष्ट्रपतीला वार्षिक किंवा आवश्यक वाटेल त्यावेळी अहवाल सादर करणे.

❊ **आयोगाचे अधिकार :**

- या आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असून यात पुढील बाबी समाविष्ट असतात :

1) भारताच्या कोणत्याही भागातून कोणत्याही व्यक्तिला उपस्थित राहण्याचे आदेश काढणे व त्याची अंमलबजावणी करणे आणि शपथेवर त्याची तपासणी करणे.
2) कोणतेही कागदपत्र शोधून काढण्याचा व सादर करण्याचा आदेश देणे.
3) प्रतिज्ञापत्रावर साक्ष घेणे.
4) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून सार्वजनिक नोंदींची कागदपत्रे मागविणे.
5) साक्षीदार आणि कागदपत्रांच्या परीक्षणासाठी उपस्थित राहण्याचा आदेश देणे.
6) राष्ट्रपती ठरवतील त्याप्रमाणे इतर कोणताही मुद्दा.

Dilip Sir's STEP UP Academy

※ या आयोगाचे आतापर्यंतचे अध्यक्ष :

| अध्यक्ष | कार्यकाळ |
|---|---|
| 1) श्री. सुरज गाम | 2004-06 |
| 2) डॉ. भुटा सिंग | 2007-10 |
| 3) डॉ. पी.एल. पुनिया | 2010-13 |
| 4) डॉ. पी.एल. पुनिया | 2013-16 |
| 5) श्री. राम शंकर कथेरिया | 2017-2020 |
| 6) विजय तापला | 2021 पासून |

## राष्ट्रीय मागासवर्ग आयोग (National Commission for Backward Class)

- संसदेने राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा देण्यासाठी 102 वी घटनादुरुस्ती केली आहे.
- घटनेतील कलम 338 बी मध्ये याबाबत तशी तरतूद करण्यात आली आहे.
- रचना : अध्यक्ष + उपाध्यक्ष + 3 सदस्य
- नेमणूक : राष्ट्रपती करतील.
- कालावधी : 3 वर्षे
- पुनर्नेमणूक : एकदाच होऊ शकते.
- राजीनामा : राष्ट्रपतींना सादर करतील.
- अध्यक्ष हे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गातील असावे. उपाध्यक्ष आणि 3 सदस्यांमध्ये कमीत कमी 2 व्यक्ती समाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गातील असतील तसेच कमीत कमी एका जागेवर महिलेची नियुक्ती व्हावी.

● **कार्ये :**

- सामाजिक तसेच शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांशी संबंधीत सुरक्षा उपायांवर देखरेख ठेवत त्यांचे मूल्यांकन करणे.
- यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्या संबंधीत तक्रारींची चौकशी करणे.
- यांच्या विकासाच्या कार्यक्रमात सहभागी होऊन सल्ला देणे आणि अशा कार्यक्रमांचे मूल्यांकन करणे.
- दरवर्षी आपला वार्षिक अहवाल राष्ट्रपतींकडे सादर करणे.
- या वर्गातील लोकांचे कल्याण व्हावे तसेच सामाजिक-आर्थिक विकास व्हावा यासाठी केंद्र किंवा राज्य सरकारांना सल्ले देणे किंवा शिफारसी करणे.
- या आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील.
- या आयोगाचे **पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. भगवान लाल सहानी** यांनी फेब्रुवारी 2019 मध्ये कामकाजाला सुरुवात केली.

## राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग

- पहिला आयोग - 1978 ला स्थापन
- याची स्थापना 'राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग कायदा, 1992' यानुसार करण्यात आली.
- रचना : अध्यक्ष + उपाध्यक्ष + 5 सदस्य
- अध्यक्षांसहीत सदस्यांमध्ये प्रत्येकी एक सदस्य हा अल्पसंख्यांक समुदायातील असावा.
- नियुक्ती : केंद्र सरकार
- कालावधी : 3 वर्षे
- राजीनामा : केंद्र सरकारकडे

● **कार्ये :**

1) केंद्र आणि राज्यांतर्गत अल्पसंख्यांकाच्या विकासाच्या प्रगतीचे मुल्यांकन करणे.
2) घटना/संसद/राज्य विधीमंडळाद्वारे केलेल्या कायद्यांमध्ये नमूद केलेल्या संरक्षणांवर देखरेख ठेवणे.
3) केंद्र किंवा राज्य सरकारांना अल्पसंख्यांकांच्या अधिकारांच्या संरक्षाणासाठी प्रभावी उपाय योजना राबवण्यासाठी शिफारस करणे.
4) अल्पसंख्यांकांच्या सामाजिक-आर्थिक आणि शैक्षणिक विकासाशी संबंधीत विषयांवर अभ्यास संशोधन व विश्लेषण इ. चे आयोजन करणे.
5) केंद्र सरकारला दरवर्षी आपला वार्षिक अहवाल सादर करणे.

## राष्ट्रीय महिला आयोग

- स्थापना : 31 जानेवारी 1992
  (राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम : 1990 नुसार)
- रचना : केंद्र सरकार द्वारे नियुक्त केलेले एक अध्यक्ष आणि 5 सदस्य.
- सदस्यांमध्ये कमीत कमी प्रत्येकी एक असे अनुसूचित जाती व अनु.जमातीतील सदस्य असावेत.
- कार्यकाल : अध्यक्ष आणि सदस्यांचा कार्यकाल 3 वर्षांपेक्षा अधिक नसेल.
- अध्यक्ष किंवा सदस्य आपला राजीनामा केंद्र सरकारकडे देतील.
- कायदा, कामगार संघटना, स्त्रियांच्या स्वयंसेवी संस्था, प्रशासन, समाज कल्याण इत्यादी क्षेत्रात अनुभव असलेल्या व्यक्तींची केंद्र सरकार नियुक्ती करते.

Dilip Sir's STEP UP Academy

❊ **कार्ये :**

- संविधान व इतर कायद्यांनी स्त्रियांना दिलेल्या कायदेशीर सुरक्षाउपायांची तपासणी करून सरकारला त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजनांची शिफारस करणे.
- स्त्रियांना प्रभावित करणाऱ्या संविधान व इतर कायद्यांतील तरतुदींचे परिक्षण करून त्यातील कमतरता दूर करण्याची शिफारस करणे.
- महिलांना त्यांच्या अधिकारांपासून वंचित ठेवणाऱ्या घटनांवर स्वप्रेरणेने लक्ष देणे आणि सक्षम अधिकाऱ्यासमोर प्रस्तुत करणे.
- महिलासंबंधित मुद्यांवर संशोधन/अभ्यास हाती घेणे.
- त्यांच्या विकासासाठी नियोजनात सहभागी होणे.
- केंद्रशासन काही नवीन महिलांविषयक धोरणे आखताना या आयोगाचे मत विचारात घेते.

❊ **आयोगाचे विविध विभाग (Cell) :**

1) Complaint and Investigation Cell
2) Legal Cell
3) Policy Monitoring and Research Cell
4) Non Resident Indians Cell
5) North East Cell
6) Sou-Motu Cell
7) Public Relations Including Media Management
8) Psychiatric / Custodial Homes Reform Cell
9) Capacity Building Cell
10) Women Safety Cell
11) Women Welfare Cell
12) RTI Cell

❊ **आतापर्यंतच्या अध्यक्षा :**

| अध्यक्ष | कार्यकाल |
|---|---|
| 1) जयंती पटनाईक | 1992-95 |
| 2) डॉ. व्हि. मोहिनी गिरी | 1995-98 |
| 3) विभा पार्थसारथी | 1999-2000 |
| 4) डॉ. पूर्णीमा अडवाणी | 2002-2005 |
| 5) डॉ. गिरीजा व्यास | 2005-2011 (2 वेळा) |
| 6) ममता शर्मा | 2011-2014 |
| 7) ललीथा कुमारमंगलम | 2014-2017 |
| 8) रेखा शर्मा | 2018 पासून |

## वित्त आयोग (Finance Commission)

- कलम 280 नुसार तरतूद
- स्थापना : राष्ट्रपती करतील
- कार्यकाल : 5 वर्षे
- रचना : 1 अध्यक्ष व 4 सदस्य.
- नियुक्ती : अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतात. (यांचा कार्यकाल राष्ट्रपतीने काढलेल्या आदेशानुसार असतो).
- पुनर्नियुक्ती : होऊ शकते.
- पात्रता : संसदेने अध्यक्ष व सदस्यांच्या निवडीचे निकष ठरवलेले आहेत :
  अध्यक्ष : सार्वजनिक व्यवहारातील अनुभव असावा.

● सदस्यांसाठी :

1) उच्च न्यायालयाचे न्यायाधीश/ त्या पदावर नियुक्त होण्याची पात्रता असलेले व्यक्ती.
2) सरकारी वित्त व लेखा प्रणालीचे विशेष ज्ञान असलेली व्यक्ती.
3) वित्तीय बाबी व प्रशासन यांच्याबाबत विशेष अनुभव असलेली व्यक्ती.
4) अर्थशास्त्रातील विशेष ज्ञान असलेली व्यक्ती याप्रमाणे प्रत्येकी एक सदस्य.

● **कार्ये :**

- केंद्र व राज्यात करांची विभागणी तसेच राज्यांमध्ये कर विभागणीसाठी निकष ठरवणे.
- केंद्राने राज्यांना द्यावयाच्या अनुदानाबाबतची (Grant in aid) तत्त्वे.
- राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार पंचायत आणि नगरपालिका यांच्या संसाधनांना पुरक होण्यासाठी राज्याचा संचित निधी वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना ठरवणे.
- वित्त प्रणालीबाबत राष्ट्रपतींनी सांगितलेले इतर मुद्दे.
- 'वित्त आयोग ही एक घटनात्मक संस्था तसेच एक अर्धन्यायिक संस्था असल्याने अत्यंत महत्त्वाच्या कारणाशिवाय भारत सरकारने त्यांच्या शिफारशी नाकारू नये' - डॉ. पी. व्ही. राजमन्नार (चौथ्या वित्त आयोगाचे अध्यक्ष)

❊ **आत्तापर्यंतचे वित्त आयोग व अध्यक्ष :**

| क्र. | अध्यक्ष | कार्यकाल |
|---|---|---|
| 1) | के. सी. नियोगी | 1952-57 |
| 2) | के. संथानम | 1957-62 |
| 3) | ए. के. चंदा | 1962-66 |
| 4) | डॉ. पी. व्ही. राजमन्नार | 1966-69 |

Dilip Sir's STEP UP Academy

| | | |
|---|---|---|
| 5) | महावीर त्यागी | 1969-74 |
| 6) | ब्रम्हानंद रेड्डी | 1974-79 |
| 7) | जे. एम. शेलाट | 1979-84 |
| 8) | वाय. बी. चव्हाण | 1984-89 |
| 9) | एन.के.पी. साळवे | 1989-95 |
| 10) | के. सी. पंत | 1995-2000 |
| 11) | ए. एम. खुस्त्रो | 2000-2005 |
| 12) | डॉ. सी. रंगराजन | 2005-2010 |
| 13) | डॉ. विजय केळकर | 2010-2015 |
| 14) | डॉ. वाय. व्ही. रेड्डी | 2015-2020 |
| 15) | एन.के. सिंग | 2020-2025 |

**आंतरराज्यीय जल विवाद**

- कलम 262 नुसार आंतरराज्यीय जल विवादाच्या निवाड्याची तरतूद केलेली आहे.

अ) आंतरराज्यीय नद्या आणि नदी खोरे यांच्या वापराबाबत, वितरणाबाबत आणि नियंत्रणाबाबत तक्रारीच्या निवाड्यासाठी संसद कायदा करू शकते.

ब) असे विवाद/तक्रारी सर्वोच्च न्यायालयाच्या तसेच इतर कोणत्याही न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात असणार नाहीत, अशी तरतूदसुद्धा संसद करू शकते.

- वरील नमूद कलमांनुसार नदी मंडळ कायदा (1956) आणि आंतरराज्यीय जल विवाद कायदा (1956) हे कायदे संमत केले आहे.

✻ **तात्पुरते न्यायाधिकरण (Tribunal) :**

- स्थापना : आंतरराज्यीय जल विवाद कायद्याद्वारे करण्यात येते.
- स्थापण्याचा अधिकार : केंद्र शासन
- दोन किंवा अधिक राज्यांच्या विवादाच्या निवाड्यासाठी यांचा निर्णय अंतिम असेल.
- या विवादात समाविष्ट राज्यांना हा निर्णय बंधनकारक असेल.

(या कायद्यानुसार या न्यायाधिकरणाकडे सोपवलेला जल विवाद सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा इतर कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही).

**आंतरराज्य जलविवाद**

| क्र | नदी | संबंधित राज्य | न्यायाधिकरण स्थापना |
|---|---|---|---|
| 1) | कृष्णा | महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश (विभाजनपूर्व) | 1969, एप्रिल |
| 2) | गोदावरी | महाराष्ट्र, आंध्र प्रदेश (विभाजनपूर्व), कर्नाटक, मध्यप्रदेश, ओडिशा | 1969, एप्रिल |
| 3) | नर्मदा | राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र | 1969, ऑक्टोबर |
| 4) | कावेरी | केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, पदुच्चेरी | 1990 |
| 5) | कृष्णा | कर्नाटक, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र (दुसरे न्यायासन) | 2004, एप्रिल |
| 6) | महादायी | गोवा, कर्नाटक, महाराष्ट्र | 2014, नोव्हेंबर |
| 7) | वसंधरा | आंध्र प्रदेश आणि ओडिशा | 2010, फेब्रुवारी |

Dilip Sir's STEP UP Academy

# विविध प्रकारचे आयोग

## केंद्रीय निवडणूक आयोग (Election Commission of India)

- राज्यघटनेतील कलम 324 मध्ये याबाबत तरतूद : संसद, राज्य विधिमंडळे, भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रती यांच्या निवडणुकींवर देखरेख, मार्गदर्शन आणि नियंत्रण करण्याचे काम निवडणूक आयोग करतो.
- संसद आणि राज्य विधिमंडळांच्या निवडणुका घेणारी ही एकच व्यवस्था असल्याने हे भारतीय राज्यव्यवस्थेचे एकात्मक स्वरूप (Unitary features) दर्शविते.
- रचना : 1 मुख्य निवडणुक आयुक्त आणि राष्ट्रपती वेळोवेळी ठरवतील इतके इतर निवडणूक आयुक्त.
- नियुक्ती : राष्ट्रपती करतात.
- कार्यकाल : 6 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे पूर्ण होईपर्यंत.
- राजीनामा : राष्ट्रपतींकडे देतात.
- पदावरून दूर करण्याची पद्धत : मुख्य निवडणूक आयुक्तांना सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांना पदच्यूत करण्याच्या पद्धतीप्रमाणेच पदावरून दूर करता येते.
- (म्हणजेच फक्त अकार्यक्षमता किंवा सिद्ध झालेली गैरवर्तवणूक (Incapacity or proved misbehavior) या कारणासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांनी विशेष बहुमताने संमत केलेल्या ठरावाच्या आधारे राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करू शकतात.) इतर निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त राष्ट्रपतींकडे शिफारस करतील आणि राष्ट्रपती यांना पदावरून दूर करतील.
- पदाचा दर्जा : मुख्य निवडणूक आयुक्त व इतर दोन निवडणूक आयुक्त यांना समान अधिकार आहेत.
- त्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाचा दर्जा आहे. (त्यांचे पगार व भत्ते सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाप्रमाणेच असतात.)

- **इतर महत्त्वाचे :**

1) निवडणूक आयोगाच्या मदतीसाठी मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या सल्ल्याने राष्ट्रपती विभागीय आयुक्त नियुक्त करू शकतात.
2) निवडणूक आयुक्त आणि विभागीय आयुक्त यांच्या सेवाशर्ती आणि कार्यकाल राष्ट्रपती ठरवतील.

- **आयोगाच्या रचनेत झालेला बदल :**
  - 1950 ते 1989 पर्यंत फक्त मुख्य निवडणूक आयुक्त (Chief Election Commission)
  - 16 ऑक्टोबर 1989 पासून दोन सदस्यांची नेमणूक झाली. (मतदान करण्यासाठी वयोमर्यादेत झालेल्या बदलामुळे)
  - 1990 : दोन सदस्यांची पदे रद्द करण्यात आली.
  - ऑक्टोबर 1993 पासून सध्यापर्यंत मुख्य निवडणूक आयुक्त व इतर दोन निवडणूक आयुक्त असा त्रिसदस्यीय आयोग कार्यरत आहे. यांच्यामध्ये मतभेद झाल्यास बहुमताने (Majority) निर्णय घ्यावा लागतो.
  - या आयोगाच्या अध्यक्षांचा कार्यकाल राष्ट्रपतींच्या मर्जीवर अवलंबून नसतो.
  - नियुक्तीनंतर मुख्य निवडणूक आयुक्तांच्या सेवाशर्तींमध्ये त्यांना प्रतिकूल ठरेल असा बदल करता येणार नाही.
  - इतर निवडणूक आयुक्त किंवा विभागीय आयुक्त यांना मुख्य निवडणूक आयुक्तांच्या शिफारशींव्यतिरिक्त पदावरून दूर करता येत नाही.
- **घटनेत पुढील तरतुदी समाविष्ट नाहीत :**
  - आयुक्त पदासाठी पात्रता / निकष (Criteria)
  - निवडणूक आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाल
  - निवडणूक आयुक्तांच्या कार्यकाल समाप्तीनंतर अन्य पदावर होणाऱ्या नियुक्तीबाबत बंदी घातलेली नाही.
- **अधिकार व कार्ये :**
  - संसद, राज्य विधिमंडळे, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणूकीवर देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रणाचे काम हा आयोग करतो.
  - कार्याचे स्वरूप : 1) प्रशासकीय (Administrative)
    2) सल्लागारी (Consultative)
    3) अर्ध-न्यायिक (Quasi judicial)
  - संसद परिसीमन आयोग कायद्याच्या आधारे देशभरातील निवडणूकांच्या मतदारसंघाचे भौगोलिक क्षेत्र ठरवणे (आतापर्यंत संसदेने 1952, 1962, 1972 व 2002 मध्ये परिसीमन आयोग (Delimitation Commission) कायदे पास केले आहेत)
  - मतदार याद्यांबाबत : तयार करणे, अद्ययावत करणे, नवीन मतदारांची नोंदणी करणे.
  - राजकीय पक्षांना मान्यता देणे व निवडणूक चिन्ह देणे.
  - संसद सदस्य अपात्रतेबाबत राष्ट्रपतींना सल्ला देणे.

Dilip Sir's STEP UP Academy.

- विधिमंडळ सदस्य अपात्रतेबाबत राज्यपालांना सल्ला देणे.
- एक वर्षानंतर आणीबाणीचा कालावधी वाढविण्याबाबत राष्ट्रपती राजवट असलेल्या राज्यात निवडणूका घेण्याबाबत राष्ट्रपतीस सल्ला देणे.
- राजकीय पक्षांना राष्ट्रीय / राज्य पक्षाचा दर्जा देणे
- मतदार कक्षांचा ताबा घेणे, हिंसाचर, निवडणूकीत भ्रष्टाचार, किंवा इतर नियमबाह्य घटना घडल्यास निवडणूक रद्द करणे.

❊ **निवडणूक आयुक्त :**

| क्र. आयुक्त | कालावधी |
|---|---|
| 1) सुकुमार सेन | 1950-1958 |
| 2) कल्याण सुंदरम | 1958-1967 |
| 3) एस. पी. सेन वर्मा | 1967-1972 |
| 4) नागेंद्र सिंग | 1972-1977 |
| 5) टी. स्वामीनाथन | 1973-1977 |
| 6) एस. एल. शकधार | 1977-1982 |
| 7) आर. के. त्रिवेदी | 1982-1985 (31 डिसेंबर) |
| 8) आर.व्ही.एस.पेरी सस्त्री | 1986-1990 |
| 9) व्ही. एस. रमादेवी | 1990-1990 (16 दिवस - 26 नोव्हेंबर ते 11 डिसेंबर) |
| 10) टी. एन. शेषन | 1990-1996 |
| 11) एम. एस. गील | 1996-2001 |
| 12) जे. एम. लिंगडोह | 2001-2004 |
| 13) टी. एस. कृष्णमूर्ती | 2004-2005 |
| 14) बी. बी. टंडन | 2005-2006 |
| 15) एन. गोपालस्वामी | 2006-2009 |
| 16) नवीन चावला | 2009-2010 |
| 17) एस. वाय. कुरेशी | 2010-2012 |
| 18) व्ही. एस. संपथ | 2012-2015 |
| 19) एच. एस. ब्रह्मा | 16 जानेवारी 2015 ते 19 एप्रिल 2015 |
| 20) नसिम झैदी | 2015 ते 2016 |
| 21) अचल कुमार ज्योती | 2016 ते 2018 |
| 22) ओम प्रकाश रावत | 2018 पासून डिसेंबर 2018 |
| 23) सुनील अरोरा | 2018 ते 2021 |
| 24) सुशील चंद्रा | एप्रिल 2021 ते 14 मे 2022 |
| 25) राजीव कुमार | 15 मे 2022 पासून |

❊ **इतर महत्त्वाचे :**

- पहिल्यांदा त्रिसदस्यीय झालेला आयोग : 1989
- मुख्य निवडणूक आयुक्त : आर. व्ही. एस. पेरी सस्त्री.
- इतर दोन निवडणूक आयुक्त : एस. एस. धनुआ, व्ही. एस. सैगल.
- दुसऱ्यांदा त्रिसदस्यीय झालेला आयोग : 1993
- मुख्य निवडणूक आयुक्त : टी. एन. शेषन.
- इतर दोन निवडणूक आयुक्त : एम. एस. गील, डी. व्ही. जी. कृष्णमूर्ती

## केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC)

❊ **कलम 315, भाग 14**

- स्वतंत्र घटनात्मक संस्था (Independent constitutional body)
- याशिवाय घटनेमध्ये राज्य लोकसेवा आयोग (SPSC) व दोन किंवा अधिक राज्यांसाठी संयुक्त लोकसेवा आयोग (JSPSC) निर्मिती घटनेनुसार होते, पण JSPSC ची निर्मिती संबंधित राज्यांच्या विधिमंडळाच्या विनंतीनुसार संसदेने केलेल्या कायद्यानुसार होते.
- जर एखाद्या राज्याच्या राज्यपालांनी विनंती केली व राष्ट्रपतींनी त्यास मान्यता दिली तर UPSC, संबंधीत राज्याला भरती प्रक्रियेत मदत करू शकते.
- घटनेत तरतूद : UPSC, SPSC, JSPSC
- घटनेनुसार निर्मिती : UPSC, SPSC
- संसदेच्या कायद्यानुसार निर्मिती : JSPSC

- **रचना :**
- अध्यक्ष व इतर सदस्य : सर्वांची नेमणूक राष्ट्रपतींद्वारा (कलम 316)
- घटनेत सदस्यसंख्या दिलेली नाही परंतु राष्ट्रपती स्वविवेकाधिराने सदस्यांची संख्या ठरवतात म्हणजेच UPSC ची रचना राष्ट्रपती ठरवतात (सध्या : 1+8 आहे)
- सामान्यतः UPSC त अध्यक्षांसहीत सदस्यसंख्या 9 ते 11 असते
- घटनेनुसार आयोगाच्या सदस्यांनी केंद्र किंवा राज्य शासनात कमीतकमी 10 वर्षे काम केलेले असावे.
- घटनेनुसार राष्ट्रपती आयोगाचे अध्यक्ष व सदस्यसंख्या सेवा शर्ती ठरवतात.

Dilip Sir's STEP UP Academy

- **कालमर्यादा** : अध्यक्ष व सदस्य : 6 वर्षे/वयाची 65 वर्षापर्यंत
  JSPSC or SPSC : 6 वर्षे / वयाची 62 वर्षापर्यंत
- **राजीनामा** : राष्ट्रपतींकडे
- **निलंबन** : राष्ट्रपतींकडून (घटनेतील तरतूदीनुसार) खालील आधारावर
- **अटी** :

1. जर तो दिवाळखोर घोषीत झाला असेल तर
2. जर तो पदावर कार्यरत असताना इतर दुसरीकडे वेतनावर कार्यरत असतील तर
3. जर राष्ट्रपतींच्या मते ते कुठल्याही शारीरिक अथवा मानसिक अकार्यक्षमतेमुळे (Incapacity) पदावर राहण्यास योग्य नसतील.

- **याव्यतिरिक्त** :

- राष्ट्रपती अध्यक्ष व सदस्यांना गैरवर्तनासाठी निलंबीत करू शकतात.
- परंतु राष्ट्रपतींनी ही बाब चौकशीसाठी सर्वोच्च न्यायालयाकडे सुपूर्त करणे आवश्यक असते. जर चौकशीनंतर सर्वोच्च न्यायालयाने निलंबन योग्य ठरवले तर राष्ट्रपती अध्यक्ष व सदस्यांना निलंबीत करू शकतात.
- यावेळी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक असतो.

- **याबाबत** : घटनेने गैरवर्तन म्हणजे काय हे स्पष्ट केलेले आहे.

- घटनेनुसार अध्यक्ष किंवा सदस्य गैरवर्तन या कारणासाठी दोषी असतील जर केंद्र किंवा राज्य शासन यांनी केलेल्या कुठल्याही कराराशी ते संबंधीत असतील किंवा त्यांना त्या रस असेल किंवा संबंधीत करारापूसन त्यांना फायदा होत असेल.
- सर्वोच्च न्यायालयाच्या चौकशीदरम्यान राष्ट्रपती आयोगाचे अध्यक्ष किंवा सदस्याला निलंबित करू शकतात.

- **स्वातंत्र्य : घटनेनुसार**

1. राष्ट्रपती, अध्यक्ष व सदस्यांना फक्त घटनेतील तरतूदीनुसार व त्यांच्या आधारावरच निलंबित करू शकतात.
2. त्यांच्या पदाच्या सेवाशर्ती नियुक्तीनंतर त्यांना नुकसान होईल असे बदलता येत नाही.
3. UPSC : सर्व खर्च : देशाच्या संचित निधिवर भार
4. UPSC चे अध्यक्ष कार्यकाल संपल्यावर केंद्र किंवा राज्य शासन यांच्या अखात्यारित कोणतेही पद स्विकारू शकत नाही.
5. आयोगाचे सदस्य व त्यांचा कार्यकाल संपल्यावर UPSC/ SPSC चे अध्यक्ष होऊ शकतात परंतु केंद्र शासन अथवा राज्य शासन यांचे इतर कुठलेही पद स्विकारू शकत नाही.
6. अध्यक्ष व सदस्य यांची त्याच पदावर पुनर्नियुक्ती होऊ शकत नाही.

- **कार्य** :

1. भरतीसाठी परीक्षांचे संचालन करणे.
2. दोन किंवा अधिक राज्यांनी विनंती केल्यास त्यांना संयुक्त भरती प्रक्रियेत मदत करणे ज्यात उमेदवारांचे विशेष शिक्षण आवश्यक असेल.
3. आयोग राष्ट्रपतींना खालील बाबतीत सल्ला देतो.
   i) नागरी सेवांच्या भरती प्रक्रियेविषयी
   ii) नागरी सेवेतील बढती, बदल्या व नियुक्ती यांची तत्त्वे निर्धारीत करणे.
   ii) नियुक्ती, बदली, पदोन्नती बाबतीत सल्ला देणे यात संबंधीत विभाग सेवकांच्या बढतीची शिफारस करतो व UPSC ला त्याच्या मान्यतेविषयी विनंती करतो.
   iv) केंद्रशासनातील कर्मचाऱ्यांच्या शिस्तविषयक बाबीसाठी
   v) जर शासकिय कर्मचाऱ्यांवर त्याच्या शासकिय कृतीविषयक जर एखादा खटला सुरू असेल, तर त्याला यासाठी लागलेल्या कायदेशिर खर्चाची परत मिळण्याची मागणी.
   vi) जर कर्मचाऱ्याला शासकिय सेवेत असताना काही इजा झाल्यास व त्याने निवृत्ती वेतनाची मागणी केल्यास.
   vii) 1 वर्षापेक्षा अधिक काळासाठी तात्पुरत्या नेमणूका करावयाच्या असल्यास.
   viii) निवृत्त सेवकाला सेवेत वाढ (Extension) देण्याविषयी.
   ix) त्याच्याकडे सोपावलेल्या कोणत्याही कर्मचारी प्रशासनाविषयी.
4. संसद केंद्र शासनांच्या सेवांच्या विषयी अतिरिक्त कार्य UPSC चे अधिकार क्षेत्र/ कार्यक्षेत्र वाढवता येते.
5. केंद्र शासन कार्यकारी आदेश किंवा ठरावाद्वारे UPSC कडे काही कार्य सोपवू शकते. यात संसदेच्या मान्यतेची किंवा त्यांच्याकडे प्रकरण पाठवण्याची गरज नसते.
6. UPSC काही कार्य संकेतानुसार करते. उदा. NDA, CDS तसेच काही शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ यांची निवड
7. UPSC आपला अहवाल राष्ट्रपतींकडे सादर करते व राष्ट्रपती तो संसदेपुढे सादर करतात.

- वैयक्तीक मंत्रालय किंवा विभागाला UPSC चा सल्ला नाकारण्याचा अधिकार नसतो.

Dilip Sir's STEP UP Academy

* **UPSC कडे चार प्रकारची कार्ये :**

1) घटनेद्वारा 2) संसदेच्या कायद्यानुसार 3) कार्यकारी आदेश/ठरावानुसार 4) संकेतानुसार

- **मर्यादा :** खालील बाबतीत UPSC चा सल्ला घेतला जात नाही

1) SC/ST व OBC यांच्यासाठी पदांमध्ये आरक्षणाची तरतूद
2) आयोग व लवाद यांच्या अध्यक्ष व सदस्य यांच्या निवडीविषयी
3) उच्च राजनैतिक (diplomatic) स्वरूपाच्या पदांविषयी तसेच C व D group सेवांविषयी
4) एक वर्षापेक्षा कमी कार्यकाळ असलेल्या नियुक्तीविषयी

- राष्ट्रपती काही सेवा, पदे किंवा विषय UPSC च्या कार्य कक्षेतून वगळू शकतात. परंतू राष्ट्रपतींचे हे नियम त्यांनी कमीत कमी 14 दिवस आधी संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर मांडणे आवश्यक असते. संसद त्यात सुधारणा करू शकते किंवा नाकारू शकते.

- **भूमिका :** अ.भा.से., केंद्रीय सेवा तसेच केंद्रशासनाच्या Group A व Group B सेवांशी संबंधीत UPSC चा सेवा वर्गीकरण, वेतन सेवाशर्ती ठरवणे, केडर व्यवस्थापन, तसेच प्रशिक्षणाशी संबंध नसतो. ही कार्ये Ministry of Personnel, Public Grievances and Pensions च्या कर्मचारी व प्रशिक्षण विभाग (Dept of Personnel Trainning) द्वारा केली.

- UPSC सल्लागार यंत्रणा आहे. UPSC चा सल्ला शासनावर बंधनकारक नसतो.
- सनदी सेवकांवर शिस्त विषयक कार्यवाहीमध्ये शासन UPSC व CVC (केंद्रीय दक्षता आयोग : Central Vigilance Commission) यांचा सल्ला घेते. जर दोघांच्या सल्ल्यांमध्ये विरोधाभास असल्यास CVC पेक्षा UPSC चा सल्ला वरचा ठरतो कारण UPSC घटनात्मक संस्था आहे.

## राज्य लोकसेवा आयोग (State Public Service Commission)

- भाग : 14, कलम 315 ते 323
- रचना : 1 अध्यक्ष आणि राज्यपालांना आवश्यक वाटतील तेवढे सदस्य
- पात्रता : सदस्यांपैकी निम्मे सदस्य केंद्र किंवा राज्य सरकारच्या सेवेत दहा वर्षे काम केलेले असावे.
  इतर सदस्यांबाबत निकष नाहीत.
- नियुक्ती : राज्यपाल करतात.
- कार्यकाल : 6 वर्षे किंवा वयाची 62 वर्षे होईपर्यंत
- राजीनामा : राज्यपालांकडे
- पुनर्नियुक्ती : नाही (अध्यक्ष व सदस्यांची)
- पदावरून दूर करण्याचा अधिकार : राष्ट्रपतींना
- ज्या कारणांवरून आणि ज्या पद्धतीने राष्ट्रपती UPSC च्या अध्यक्षांना/सदस्यांना पदावरून दूर करतात, त्याच कारणावरून व त्याच पद्धतीने यांना पदावरून दूर केले जाते.
- निवृत्तीनंतर : राज्यलोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य हे दुसऱ्या राज्यांच्या लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष होऊ शकतात किंवा UPSC मध्ये अध्यक्ष /सदस्य होऊ शकतात. परंतु भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही सेवेस पात्र ठरू शकत नाही.

## संयुक्त राज्य लोकसेवा आयोग (Joint State Service Public Commission)

- दोन किंवा अधिक राज्यांसाठी असा आयोग स्थापन केला जाऊ शकतो.
- याची स्थापना संसदेच्या कायद्याने होते. म्हणून यास कायदेशीर दर्जा आहे.
- राज्याच्या विधिमंडळाने विनंती केल्यास अशा प्रकारचा आयोग स्थापन केला जाऊ शकतो.
- याची रचना, कार्ये सर्व राज्य लोकसेवा आयोगाप्रमाणेच असेल.
- राज्यपालांनी विनंती केल्यास राष्ट्रपतींनी संमती दिल्यास UPSC ही राज्याची कामे पूर्ण करू शकते.
- 1966 साली पंजाब व हरियाणा या राज्यांसाठी अशा प्रकारचा आयोग कार्यरत होता.

## राष्ट्रीय महिला आयोग (National Women Commission)

- राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम : 1990 नुसार स्थापन
- स्थापना : 31 जानेवारी 1992
- कार्यकाल : 3 वर्षे
- रचना : केंद्र सरकार द्वारे नियुक्त केलेले एक अध्यक्ष आणि 5 सदस्य.
- सदस्यांमध्ये कमीत कमी प्रत्येकी एक असे अनुसूचित जाती व अनु.जमातीतील सदस्य असावेत.

Dilip Sir's STEP UP Academy

- कायदा, कामगार संघटना, स्त्रीयांच्या स्वयंसेवी संस्था, प्रशासन, समाज कल्याण इत्यादी क्षेत्रात अनुभव असलेल्या व्यक्तींची केंद्र सरकार नियुक्ती करते.
- कार्यकाल : अध्यक्ष आणि सदस्यांचा कार्यकाल 3 वर्षांपेक्षा अधिक नसेल.

  अध्यक्ष किंवा सदस्य आपला राजीनामा केंद्र सरकारकडे देतील.

- **आयोगाची कार्ये :**
- संविधान व इतर कायद्यांनी स्त्रियांना दिलेल्या कायदेशीर सुरक्षा उपायांची तपासणी करुन सरकारला त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजनांची शिफारस करणे.
- स्त्रियांना प्रभावित करणाऱ्या संविधान व इतर कायद्यांतील तरतुदींचे परिक्षण करुन त्यातील कमतरता दूर करण्याची शिफारस करणे.
- महिलांना त्यांच्या अधिकारांपासून वंचित ठेवणाऱ्या घटनांवर स्वप्रेरणेने लक्ष देणे आणि सक्षम अधिकाऱ्यासमोर प्रस्तुत करणे.
- महिलांसंबंधित मुद्यांवर संशोधन/अभ्यास हाती घेणे. त्यांच्या विकासासाठी नियोजनात सहभागी होणे.
- या आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, सर्व कार्यालयीन सदस्य हे IPC तील कलम 21 नुसार लोक सेवक असतील.
- केंद्रशासन काही नवीन महिलांविषयक धोरणे आखताना या आयोगाचे मत विचारात घेईल.
- काम करताना या आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत.

## महाराष्ट्र राज्य महिला आयोग

- स्थापना : 1993
- रचना : अध्यक्ष + 6 सदस्य
- सध्या अध्यक्षा : विजया रहाटकर (2016 पासून)

  (राज्य महिला आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले.)

## राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (NHRC)

- स्थापना : 12 ऑक्टोबर 1993
- रचना : 1 अध्यक्ष, 4 पूर्णकालीन सदस्य, 4 मानद सदस्य
- अध्यक्ष : सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश
- सदस्य : 1 सर्वोच्च न्यायालयाचे कार्यरत किंवा माजी न्यायाधीश

  1 उच्च न्यायालयाचे कार्यरत किंवा माजी मुख्य न्यायाधीश

  2 सदस्य मानवाधिकारांचे ज्ञान/अनुभव असलेले

- मानद सदस्य : पुढील आयोगांचे अध्यक्ष

  i) राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग

  ii) राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग

  iii) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग

  iv) राष्ट्रीय महिला आयोग.

- नेमणूक : सदस्य व अध्यक्षांची नेमणूक राष्ट्रपती करतात.
- ही नेमणूक उच्चाधिकार समितीच्या शिफारशीनुसार होते.
- **त्या निवड समितीत :** अध्यक्ष : पंतप्रधान

  सदस्य : लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय गृहमंत्री, राज्यसभा उपसभापती. लोकसभा व राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते.

- **कार्यकाल :**
- सदस्य व अध्यक्षांनी पदभार सांभाळल्यापासून पाच वर्षे किंवा वयाची 70 वर्षे पूर्ण होऊ पर्यंत असेल.
- सदस्यांची पुनर्नेमणूक होऊ शकते (वयोमर्यादेच्या आत असेल तर)
- पुढील परिस्थितीत राष्ट्रपती, अध्यक्ष किंवा कोणत्याही सदस्यास पदावरून दूर करू शकतात.

1) जर तो दिवाळखोर घोषित झाला असेल, किंवा
2) जर त्याने त्याच्या कार्यकाळात दुसरीकडे वेतनावर पद स्वीकारले असेल, किंवा
3) शारीरिक व मानसिक दुर्बलतेमुळे तो पदावर काम करण्यास अकार्यक्षम झाला असेल, किंवा
4) जर तो मानसिकदृष्ट्या अस्थिर आहे, असे सक्षम न्यायालयाने घोषित केले असेल, किंवा
5) तो गुन्हेगार सिद्ध झाला आणि कारावासाची शिक्षा झाली असे तर.

- या व्यतिरिक्त सिद्ध झालेले गैरवर्तन आणि अक्षमता या कारणांवरून सुद्धा राष्ट्रपती, अध्यक्ष/सदस्यांना पदावरून दूर करू शकतात.
- ही बाब राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाकडे चौकशीसाठी पाठवतात आणि सर्वोच्च न्यायालयाच्या सल्ल्याने राष्ट्रपती पुढील कारवाई करतात.
- **कार्ये व अधिकार :**

1) स्वप्रेरणेने (Suo moto) किंवा पिडीत व्यक्तिने तक्रार केल्यास, किंवा तिच्यावतीने इतर कोणीही तक्रार केल्यास चौकशी करणे.
2) मानवी अधिकाराच्या उल्लंघनाशी संबंधित चालू खटल्यात किंवा प्रलंबित खटल्यात न्यायालयाच्या अनुमतीने हस्तक्षेप करणे.

Dilip Sir's STEP UP Academy

3) मानवी अधिकारांवरील करार व इतर आंतरराष्ट्रीय साधनांचा अभ्यास करणे व त्यांच्या अंमलबजावणीसाठी शिफारस करणे.

4) मानवी अधिकार क्षेत्रात संशोधन हाती घेणे व त्याचे प्रवर्तन करणे.

5) या क्षेत्रात काम करणाऱ्या क्षेत्रात गैर-सरकारी संघटना व संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे.

- वरील कार्ये करण्यासाठी आयोगास नागरी प्रक्रिया संहिता, 1908 (Code of Civil Procedure, 1908) अंतर्गत दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत.

- **पुढील बाबींचा समावेश :**

1) साक्षीदारांना बोलावणे व शपथेवर त्यांची साक्ष नोंदवणे.
2) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध आणि निर्मिती.
3) ॲफिडेव्हिटवर पुरावा नोंदवणे.
4) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणताही शासकीय अभिलेख मिळवणे इत्यादी.

1) राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करायची असल्यास ती इंग्रजी, हिंदी किंवा आठव्या परिशिष्टात नमूद केलेल्या कोणत्याही भाषेत करता येते.

2) तक्रारी स्वीकारण्यासाठी ई-मेल, फोन, फॅक्स किंवा आयोगाच्या मोबाईल नंबर ही उपलब्ध करून दिलेला आहे.

3) आयोगाकडे स्वतःचे तपास कर्मचारी आहेत. डिरेक्टर जनरल ऑफ पुलीस यांच्या अध्यक्षतेखाली तपासासाठी कर्मचारी आहेत. तसेच अनेक तपासणी केस साठी आयोग NGO ची सुद्धा मदत घेतो.

4) जर सशस्त्र सेना दलांद्वारे मानवी अधिकारांचे उल्लंघन झाल्याची तक्रार आयोगाकडे आल्यास यावर

- आयोग केंद्र सरकारकडे अहवाल मागेल. असा अहवाल केंद्र सरकारकडून प्राप्त झाल्यानंतर आयोग त्यावर कारवाई करणार नाही किंवा पुन्हा त्यावर कारवाई करण्यासाठी केंद्र सरकारला सादर करेल. पुढील तीन महिन्यात आयोगाने सुचवलेल्या शिफारशींवर केंद्र सरकारने कारवाई करणे अपेक्षित असते. त्यानंतर आयोगाने केलेल्या शिफारशी आणि केंद्र सरकारने केलेली कारवाई याबाबत एक अहवाल तयार करून प्रसिद्ध करेल आणि त्याची एक प्रत तक्रारकर्त्याला देण्यात येईल

- आयोगाने केलेल्या शिफारशींवर केंद्र/राज्य शासन सामान्या परिस्थितीत एकच महिन्यात कृती करेल. आणि जर ते सशस्त्र दलांशी संबंधित असेल तर त्यासाठी जास्तीत जास्त 3 महिने वेळ दिला जातो.

5) मानवी अधिकारांचे उल्लंघन झाल्यानंतर एक वर्षाच्या आत या आयोगाकडे तक्रार दाखल केली तरच हा आयोग तक्रारीची दखल घेतो. एक वर्षापूर्वी घडलेल्या घटनेवर आयोग चौकशी करू शकत नाही.

| **आयोगाचे आत्तापर्यंतचे अध्यक्ष** | |
|---|---|
| 1) न्या. रंगनाथ मिश्रा | 1993-1996 |
| 2) न्या. व्यंकटचल्लय्या | 1996-1999 |
| 3) न्या. जे. एस. वर्मा | 1999-2003 |
| 4) न्या. ए. एस. आनंद | 2003-2006 |
| 5) न्या. शिवराज पाटील | 2005-2007(Acting) |
| 6) न्या. राजेंद्र बाबू | 2007-2009 |
| 7) न्या. गोविंद प्रसाद माथूर | 2009-2010 (Acting) |
| 8) न्या. के.जी. बालकृष्णन | 2010-2015 |
| 9) न्या. सिरियाक जोसेफ | 2015-2016 (Acting) |
| 10) न्या. एच. एल. दत्तू | 29 फेब्रुवारी 2016 पासून |

## राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग (NCST) (National Commission on Scheduled Tribes)

**※ इतिहास :**

- कलम 338 मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठीचे विशेष अधिकारी नेमण्याची तरतूद होती. त्यास अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आयुक्त असे म्हटले गेले.
- कार्ये : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या घटनात्मक सुरक्षेबाबतच्या मुद्यांची चौकशी करण्यासाठी व त्यांच्या कामकाजाबाबत अहवाल देणे.
- 1978 साली अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी एका अवैधानिक बहुसदस्यीय आयोगाची स्थापना करण्यात आली.
- 1987 : सरकारने आयोगाच्या कार्यात बदल केले व त्याचे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठीचा राष्ट्रीय आयोग असे नामकरण केले.

Dilip Sir's STEP UP Academy

- 1990 साली राष्ट्रीय एस.सी.-एस.टी. आयोग असे नाव देण्यात आले (65 वी घटनादुरुस्ती) आणि 1992 साली हा घटनात्मक आयोग कार्यरत झाला.
- 2003 : 89 वी घटनादुरुस्तीद्वारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठीच्या संयुक्त आयोगाचे विभाजन करून अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग आणि अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग अशा दोन संस्था निर्माण करण्यात आल्या.
- कलम 338 : अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग (NCSC)
- कलम 338A : अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग (NCST)

**※ अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग (NCST) :**

- स्थापना : 19 फेब्रुवारी 2004
- नियुक्ती : राष्ट्रपती
- रचना : अध्यक्ष + उपाध्यक्ष + 3 सदस्य
  (3 सदस्यांपैकी एक महीला असावी. अध्यक्ष आदिवासी समाजातीलच असावा परंतु उपाध्यक्ष आणि सदस्य यांच्यापैकी कमीत कमी दोन सदस्य आदिवासी समाजातील असावेत.)
- कार्यकाल : 3 वर्षे (दोन पेक्षा जास्त वेळा नियुक्ती होणार नाही)
- राजीनामा : अध्यक्ष व सदस्य आपला राजीनामा राष्ट्रपतींना देतात.
- पदाचा दर्जा : अध्यक्षांना केंद्रिय कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जा, उपाध्यक्षांना राज्य मंत्र्यांचा दर्जा आणि सदस्यांना भारत सरकारच्या सचिवांचा दर्जा देण्यात येतो.

- **या आयोगाची कार्ये :**

1) अनुसूचित जमातींसाठी असलेल्या घटनात्मक व इतर कायदेशीर सुरक्षा उपाययोजनांसंबंधी सर्व बाबींची चौकशी करणे व त्यावर देखरेख करणे आणि त्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करणे.
2) अनुसूचित जमातींसाठीच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना व अधिकार यापासून वंचित ठेवण्याविषयीच्या विशिष्ट तक्रारींची चौकशी करणे.
3) अनुसूचित जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासाच्या योजना प्रक्रियेत सहभागी होणे व सल्ला देणे आणि केंद्रात किंवा राज्यात त्यांच्या विकासाच्या वाटचालीचे मूल्यमापन करणे.
4) सुरक्षा उपाययोजनांच्या कामकाजाबाबत राष्ट्रपतीला वार्षिक किंवा आवश्यक वाटेल त्यावेळी अहवाल सादर करणे. आयोग राष्ट्रपतीला वार्षिक अहवाल सादर करतो.

- **आयोगाचे अधिकार :**

- या आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असून यात पुढील बाबी समाविष्ट असतात :

1) भारताच्या कोणत्याही भागातून कोणत्याही व्यक्तिला उपस्थित राहण्याचे आदेश काढणे व त्याची अंमलबजावणी करणे आणि शपथेवर त्याची तपासणी करणे.
2) कोणतेही कागदपत्र शोधून काढण्याचा व सादर करण्याचा आदेश देणे.
3) प्रतिज्ञापत्रावर साक्ष घेणे.
4) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून सार्वजनिक नोंदींची कागदपत्रे मागविणे.
5) साक्षीदार आणि कागदपत्रांच्या परीक्षणासाठी उपस्थित राहण्याचा आदेश देणे.
6) राष्ट्रपती ठरवतील त्याप्रमाणे इतर कोणताही मुद्दा.

- **इतर कार्ये :**

1) वन क्षेत्रात राहणाऱ्या अनुसूचित जमातींना दुय्यम व उत्पादनांचे मालकी अधिकार देण्यासंबंधी उपाययोजना करणे.
2) कायद्याप्रमाणे जल व खनिज साधनांवर आदिवासी समुदायांचे अधिकार सुरक्षित करण्यासाठी उपाययोजना करणे.
3) आदिवासींच्या विकासासाठी आणि त्यांना अधिक चांगली व शाश्वत स्वरूपाची उपजीविका मिळावी यासाठी प्रयत्न करणे.
4) आदिवासी लोकांपासून जमीन हिरावून घेण्याविरूद्ध उपाययोजना करणे. जर ते जमिनीपासून वंचित झाले असतील तर त्यांचे परिणामकारक पुनर्वसन करण्यासाठी उपाययोजना करणे.
5) वन संरक्षण आणि सामाजिक वनीकरण करण्यासाठी आदिवासी समुदायाचे सर्वाधिक सहकार्य व सहभाग मिळविण्यासाठी उपाययोजना करणे.
6) पंचायत (अनुसूचित क्षेत्रांना लागू) कायदा, 1996 मधील तरतुदींची पूर्ण अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करणे.

**राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (National Commission for Scheduled Caste)**

**※ इतिहास :**

- कलम 338 मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठीचे विशेष अधिकारी नेमण्याची तरतूद असून त्यास अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आयुक्त असे म्हटले गेले.

Dilip Sir's STEP UP Academy

- कार्ये : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या घटकात्मक सुरक्षेबाबतच्या मुद्यांची चौकशी करण्यासाठी व त्यांच्या कामकाजाबाबत अहवाल देणे.
- 1978 : सरकारने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी एका अवैधानिक बहुसदस्यीय आयोगाची स्थापना केली.
- 1987 : सरकारने आयोगाच्या कार्यात बदल केले व त्याचे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठीचा राष्ट्रीय आयोग असे नामकरण केले.
- 1990 साली यास राष्ट्रीय एस.सी.-एस.टी. आयोग असे नाव देण्यात आले. (65 वी घटनादुरुस्ती) आणि 1992 सालापासून हा घटनात्मक आयोग कार्यरत झाला.
- 2003 : 89 वी घटनादुरुस्तीद्वारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठीच्या संयुक्त आयोगाचे विभाजन करून अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग आणि अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग अशा दोन संस्था निर्माण करण्यात आल्या.
- कलम 338 : अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग (NCSC)
- कलम 338-ए : अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग (NCST)
- 2004 : राष्ट्रीय अनु.जाती आयोग (89 वी घटनादुरुस्ती)

**✻ अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग (NCSC) :**

- रचना : अध्यक्ष + उपाध्यक्ष + 3 सदस्य (3 सदस्यांपैकी कमीत कमी एक महिला असावी.)
- नियुक्ती : राष्ट्रपती
- राजीनामा : राष्ट्रपतींकडे देतील.
- कार्यकाळ : 3 वर्षे (पुनर्नियुक्ती : फक्त एकदाच होऊ शकते.)

- **कार्ये :**

1) अनुसूचित जातींसाठी असलेल्या घटनात्मक व इतर कायदेशीर सुरक्षा उपाययोजनांसंबंधी सर्व बाबींची चौकशी करणे व त्यावर देखरेख करणे आणि त्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करणे.
2) अनुसूचित जातींसाठीच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना व अधिकार यापासून वंचित ठेवण्याविषयीच्या विशिष्ट तक्रारींची चौकशी करणे.
3) अनुसूचित जातींच्या सामाजिक-आर्थिक विकासाच्या योजना प्रक्रियेत सहभागी होणे व सल्ला देणे आणि केंद्रात किंवा राज्यात त्यांच्या विकासाच्या वाटचालीचे मूल्यमापन करणे.
4) सुरक्षा उपाययोजनांच्या कामकाजाबाबत राष्ट्रपतीला वार्षिक किंवा आवश्यक वाटेल त्यावेळी अहवाल सादर करणे.

- **आयोगाचे अधिकार :**

- या आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असून यात पुढील बाबी समाविष्ट असतात :

1) भारताच्या कोणत्याही भागातून कोणत्याही व्यक्तिला उपस्थित राहण्याचे आदेश काढणे व त्याची अंमलबजावणी करणे आणि शपथेवर त्याची तपासणी करणे.
2) कोणतेही कागदपत्र शोधून काढण्याचा व सादर करण्याचा आदेश देणे.
3) प्रतिज्ञापत्रावर साक्ष घेणे.
4) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून सार्वजनिक नोंदींची कागदपत्रे मागविणे.
5) साक्षीदार आणि कागदपत्रांच्या परीक्षणासाठी उपस्थित राहण्याचा आदेश देणे.
6) राष्ट्रपती ठरवतील त्याप्रमाणे इतर कोणताही मुद्दा.

**राष्ट्रीय मागासवर्ग आयोग (National Commission for Backward Class)**

- 1993 च्या राष्ट्रीय मागास वर्ग आयोग कायद्यानुसार स्थापना करण्यात आली होती. तेव्हा याची रचना पुढीलप्रमाणे होती.
- स्थापना : 14 ऑगस्ट 1993
- रचना : अध्यक्ष + 3 सदस्य
- अध्यक्ष : सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश / उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश

- **आयोगाला मिळालेला घटनात्मक दर्जा :**

- संसदेने राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा देणारे 123 वे विधेयक मंजूर केले असून त्यास घटनात्मक दर्जा देण्यात आला आहे.
- घटनेतील कलम 338 बी मध्ये याबाबत तशी तरतूद करण्यात आली आहे.
- घटनेतील कलम 342 अ नुसार राष्ट्रपती राज्याच्या राज्यपालांशी सल्लामसलत करून किंवा संसद कायदा करून मागासवर्ग कोण आहेत हे ठरवेल.
- या आयोगात पाच सदस्य असतील की ज्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतील.
- रचना : अध्यक्ष + उपाध्यक्ष + 3 सदस्य
- या विधेयकामुळे राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाकडे असलेले इतर मागासवर्गीयांबाबतचे अधिकार काढून टाकण्यात आले आहे.
- या आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील.

Dilip Sir's STEP UP Academy

## राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग

- स्थापना : 1978 (गृह मंत्रालयाअंतर्गत कार्यरत)
- 1984 साली गृह मंत्रालयाकडून कल्याण मंत्रालयाकडे हस्तांतरित करण्यात आले.
- UN घोषणा : 18 डिसेंबर 1992 (18 December - Minority Rights Day)
  (राज्य आपल्या क्षेत्रातील अल्पसंख्यांकांच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि भाषिक वेगळेपणाचे संरक्षण करेल आणि ती जोपासण्यासाठी योग्य वातावरण उपलब्ध करेल.)

※ **राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग कायदा, 1992 कलम 9(1) मध्ये भारतातील अल्पसंख्यांक कोण हे नमूद केलेले आहे.**
**राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग कायदा – 1992**

- आयोगाची रचना : अध्यक्ष + उपाध्यक्ष + 5 सदस्य (आयोगाच्या सदस्यांसहीत पाच सदस्य हे अल्पसंख्यांक समाजातील असतील.)
- सध्याचे अध्यक्ष : सय्यद घयोरूल हसन रिझवी
- 2014 साली केंद्र सरकारने जैन धर्मास अल्पसंख्याकाचा दर्जा दिल्याने सध्या भारतात पुढील 6 धर्मांना अल्पसंख्याकाचा दर्जा प्राप्त आहे. : मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, पारशी, जैन.

## वित्त आयोग (Finance Commission)

- कलम 280 नुसार तरतूद
- स्थापना : राष्ट्रपती करतील
- कार्यकाल : 5 वर्षे
- रचना : 1 अध्यक्ष व 4 सदस्य.
- नियुक्ती : अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतात. (यांचा कार्यकाल राष्ट्रपतीने काढलेल्या आदेशानुसार असतो).
- पुनर्नियुक्ती : होऊ शकते.
- पात्रता : संसदेने अध्यक्ष व सदस्यांच्या निवडीचे निकष ठरवलेले आहेत :
  अध्यक्ष : सार्वजनिक व्यवहारातील अनुभव असावा.

● सदस्यांसाठी :

1) उच्च न्यायालयाचे न्यायाधीश/ त्या पदावर नियुक्त होण्याची पात्रता असलेले व्यक्ती.
2) सरकारी वित्त व लेखा प्रणालीचे विशेष ज्ञान असलेली व्यक्ती.
3) वित्तीय बाबी व प्रशासन यांच्याबाबत विशेष अनुभव असलेली व्यक्ती.
4) अर्थशास्त्रातील विशेष ज्ञान असलेली व्यक्ती याप्रमाणे प्रत्येकी एक सदस्य.

● **कार्ये :**

- केंद्र व राज्यात करांची विभागणी तसेच राज्यांमध्ये कर विभागणीसाठी निकष ठरवणे.
- केंद्राने राज्यांना द्यावयाच्या अनुदानाबाबतची (Grant in aid) तत्त्वे.
- राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार पंचायत आणि नगरपालिका यांच्या संसाधनांना पुरक होण्यासाठी राज्याचा संचित निधी वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना ठरवणे.
- वित्त प्रणालीबाबत राष्ट्रपतींनी सांगितलेले इतर मुद्दे.
- 'वित्त आयोग ही एक घटनात्मक संस्था तसेच एक अर्धन्यायिक संस्था असल्याने अत्यंत महत्त्वाच्या कारणाशिवाय भारत सरकारने त्यांच्या शिफारशी नाकारू नये' – डॉ. पी. व्ही. राजमन्नार (चौथ्या वित्त आयोगाचे अध्यक्ष)

**※ आत्तापर्यंतचे वित्त आयोग व अध्यक्ष :**

| क्र. अध्यक्ष | कार्यकाल |
|---|---|
| 1) के. सी. नियोगी | 1952–57 |
| 2) के. संथानम | 1957–62 |
| 3) ए. के. चंदा | 1962–66 |
| 4) डॉ. पी. व्ही. राजमन्नार | 1966–69 |
| 5) महावी त्यागी | 1969–74 |
| 6) ब्रम्हानंद रेड्डी | 1974–79 |
| 7) जे. एम. शेलाट | 1979–84 |
| 8) वाय. बी. चव्हाण | 1984–89 |
| 9) एन.के.पी. साळवे | 1989–95 |
| 10) के. सी. पंत | 1995–2000 |
| 11) ए. एम. खुस्त्रो | 2000–2005 |
| 12) डॉ. सी. रंगराजन | 2005–2010 |
| 13) डॉ. विजय केळकर | 2010–2015 |
| 14) डॉ. वाय. व्ही. रेड्डी | 2015–2020 |
| 15) एन.के. सिंग | 2020–2025 |

## आंतरराज्यीय जल विवाद

- कलम 262 नुसार आंतरराज्यीय जल विवादाच्या निवाड्याची तरतूद केलेली आहे.

अ) आंतरराज्यीय नद्या आणि नदी खोरे यांच्या वापराबाबत, वितरणाबाबत आणि नियंत्रणाबाबत तक्रारीच्या निवाड्यासाठी संसद कायदा करू शकते.

Dilip Sir's STEP UP Academy

ब) असे विवाद/तक्रारी सर्वोच्च न्यायालयाच्या तसेच इतर कोणत्याही न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात असणार नाहीत, अशी तरतूदसुद्धा संसद करू शकते.

- वरील नमूद कलमांनुसार नदी मंडळ कायदा (1956) आणि आंतरराज्यीय जल विवाद कायदा (1956) हे कायदे संमत केले आहे.

**※ तात्पुरते न्यायाधिकरण (Tribunal) :**

- स्थापना : आंतरराज्यीय जल विवाद कायद्याद्वारे करण्यात येते.
- स्थापण्याचा अधिकार : केंद्र शासन
- दोन किंवा अधिक राज्यांच्या विवादाच्या निवाड्यासाठी यांचा निर्णय अंतिम असेल.
- या विवादात समाविष्ट राज्यांना हा निर्णय बंधनकारक असेल.

(या कायद्यानुसार या न्यायाधिकरणाकडे सोपवलेला जल विवाद सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा इतर कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही).

**आंतरराज्य जलविवाद**

| क्र | नदी | संबंधित राज्य | न्यायाधिकरण स्थापना |
|---|---|---|---|
| 1) | कृष्णा | महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश (विभाजनपूर्व) | 1969, एप्रिल |
| 2) | गोदावरी | महाराष्ट्र, आंध्र प्रदेश (विभाजनपूर्व), कर्नाटक, मध्यप्रदेश, ओडिशा | 1969, एप्रिल |
| 3) | नर्मदा | राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र | 1969, ऑक्टोबर |
| 4) | कावेरी | केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, पदुच्चेरी | 1990 |
| 5) | कृष्णा | कर्नाटक, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र (दुसरे न्यायासन) | 2004, एप्रिल |
| 6) | महादायी | गोवा, कर्नाटक, महाराष्ट्र | 2014, नोव्हेंबर |
| 7) | वसंधरा | आंध्र प्रदेश आणि ओडिशा | 2010, फेब्रुवारी |

Dilip Sir's STEP UP Academy

# राष्ट्रपती (President)

**※ घटनेतील भाग 5 मधील कलम 52 ते 78 हे संघराज्याच्या कार्यकारी विभागाशी संबंधित आहेत. या संघराज्यीय कार्यकारी विभागामध्ये पुढील घटक समाविष्ट आहेत :**

1) भारताचे राष्ट्रपती (President)
2) उपराष्ट्रपती (Vice President)
3) पंतप्रधान (Prime Minister)
4) मंत्रीमंडळ (Ministers)
5) महान्यायवादी (Attorney General of India)

**※ राष्ट्रपती पदाशी संबंधित काही महत्त्वाची कलमे :**

- कलम 52 : भारताचे राष्ट्रपती
- कलम 53 (1) : संघराज्याचे कार्यकारी अधिकार (Executive power of Union) राष्ट्रपतीकडेच
- कलम 53 (2) : राष्ट्रपती संघराज्याच्या संरक्षक दलांचे सरसेनापती (Commander-in-Chief) असतील.
- कलम 54 : राष्ट्रपती पदाची निवडणूक (Election of President)
- कलम 55 : राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीची पद्धत (Election Procedure)
- कलम 56 : राष्ट्रपतींचा कार्यकाळ (Tenure)
- कलम 57 : पुनर्निवडीबाबतची पात्रता (Re-election)
- कलम 58 : राष्ट्रपती पदासाठीची पात्रता (Qualification)
- कलम 59 : राष्ट्रपती पदाच्या शर्ती (Conditions)
- कलम 60 : राष्ट्रपती पदाची शपथ (Oath)
- कलम 61 : राष्ट्रपतींवरील महाभियोगाची प्रक्रिया (Impeachment)
- कलम 62 : राष्ट्रपती पद रिक्त झाल्यानंतरची प्रक्रिया (Time of holding election to fill vacancy)
- कलम 72 : राष्ट्रपतींचा दयेचा अधिकार (Power to pardon)

● **पात्रता (Qualifications) :**

1) भारताचा नागरिक असावी.
2) वयाची 35 वर्षे पूर्ण केली असावीत.
3) लोकसभा सदस्यत्वासाठी लागणारी पात्रता अंगी असावी.
4) कोणतेही शासकीय / शासनाच्या अंतर्गत येणारे पद (लाभाचे पद (Office of profit)) धारण केलेले नसावे.
5) संघ / राज्य विधीमंडळाचा ती सदस्य नसावी.
(मात्र कार्यरत राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल, केंद्र किंवा राज्य शासनाचे मंत्री हे अपवाद असतात.)

- राष्ट्रपती पदासाठी उमेदवारी भरताना : 50 मतदात्यांचा (Voters) पाठिंबा (Proposers) आणि 50 मतदात्यांचे अनुमोदन (Seconders) गरजेचे
(उमेदवाराला RBI मध्ये 15,000 रु. अनामत रक्कम भरावी लागते. जर उमेदवारास एकूण मतांच्या 1/6 मते न मिळाल्यास तर अनामत रक्कम जप्त होते.)

● **राष्ट्रपती पदाची शपथ (Oath) : कलम 60 :**

1) पदाची कार्ये प्रामाणिकपणे पार पाडणे.
2) राज्यघटना व कायदा जतन करणे त्यांचे संरक्षण करणे व सुरक्षित ठेवणे. (To preserve, protect and defend the constitution and law)
3) भारतीय लोकांच्या सेवेसाठी आणि कल्याणासाठी स्वतःला वाहून घेणे.

- भारताचे सरन्यायाधीश (CJI) हे राष्ट्रपतींना पदाची शपथ देतात.

● **निवडणूकीबाबतचा वाद :**

- याबाबत निकाल देण्याचा अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालयाला असतो. आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अंतिम असेल.
- निर्वाचन गण अपूर्ण होते या कारणावरून या निवडणूकीस आव्हान देता येणार नाही.
(येथे निर्वाचन गणात (Electroral College) काही पदे रिक्त असतील तरीही चालेल.)

● **राष्ट्रपतीचा कालावधी (Office term) :**

- कलम 56 (1) नुसार पद धारण केल्यापासून पुढे पाच वर्षे ते पदावर राहू शकतात.
(राजीनामा : उपराष्ट्रपतींकडे देतात आणि उपराष्ट्रपती तसे वृत्त लोकसभा अध्यक्षांना कळवतात)
- कलम 61 नुसार : महाभियोग (impeachment)
- पदाचा कार्यकाल संपल्यानंतर पुढील व्यक्ती राष्ट्रपती पद धारण करेपर्यंत अगोदरचे राष्ट्रपती त्या पदावर राहू शकतात.
- कलम 57 : कितीही वेळा पुर्ननेमणूक होऊ शकते.

● **राष्ट्रपती पदाच्या शर्ती (Conditions of Presidents office) :**

1) खासदार/आमदार असलेली व्यक्ती या पदावर निवडून आल्यास पद धारण केल्याच्या दिवशी त्याचे अगोदरचे पद रिक्त झाल्याचे गृहीत धरतात.

Dilip Sir's STEP UP Academy

2) संसदेने कायद्याद्वारे निश्चित केलेला पगार व भत्ते व विशेषाधिकार त्यांना प्रात होतील.

3) त्यांच्या पदावधीदरम्यान पगार व भत्ते कमी केले जाणार नाही (सध्याचा पगार : पाच लाख रु. प्रति महिना)

4) राष्ट्रपतींचे वेतन, भत्ते व विशेषाधिकार संसद निश्चित करते.

- **निर्वाचन मंडळ (Electoral College) : सदस्य**

1. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे निवडून आलेले सदस्य (Elected members of both houses of parliament)
2. राज्यविधानसभेतील निवडून आलेले सदस्य (Elected members of state legislative assembly)
3. दिल्ली व पाँडेचेरी या केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभेतील निवडून आलेले सदस्य (Elected members of LA of UT (Delhi of PD)) (70 वी घटनादुरुस्ती, 1992 : अंमलबजावणी 1995 पासून)

- विधानसभेच्या सदस्याच्या मताचे मूल्य (Value of vote of a MLA) =

$$= \frac{\text{राज्याची लोकसंख्या (Population of state)}}{\text{विधानसभेच्या सदस्यांची एकूण संख्या (Total no. of elected members in LA)}} \times \frac{1}{1000}$$

- संसद सदस्यांच्या मतांचे मुल्य (Value of vote of a MP) =

$$= \frac{\text{सर्व राज्यातील विधानसभा निर्वाचित सदस्यांची एकूण मते (Total value of votes of all MLAs of all states)}}{\text{लोकसभा व राज्यसभा यांच्यातील निर्वाचित सदस्यांची संख्या (Total no. of elected members of parliament)}}$$

- निवडून येण्यासाठी लागणाऱ्या मतांचा विशिष्ट कोटा =

$$= \frac{\text{एकूण मतांची संख्या}}{\text{निवडायचे प्रतिनिधी + 1}} + 1$$

- **महाभियोग (Impeachment) :** घटनेचा भंग (Violation of the constitution) केल्याच्या आरोपावरून (कलम 61) (घटनेचा भंग : याचा अर्थ घटनेत स्पष्ट केलेला नाही.)

- ही प्रक्रिया कोणत्याही सभागृहात सुरू करता येते.
- अट : त्याआधी राष्ट्रपतींना 14 दिवसआधी पूर्वसूचना (Notice) द्यावी लागते.
- घटनाभंग आरोप करणाऱ्या सभागृहाच्या एकूण सदस्यांपैकी 1/4 सदस्यांनी आरोपपत्रावर स्वाक्षऱ्या आवश्यक.
- आरोप दाखल करणाऱ्या सभागृहात हा ठराव त्या सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या 2/3 सदस्यांनी मंजूर केल्यानंतर तो ठराव चौकशीसाठी दुसऱ्या सभागृहात पाठवला जातो.
- चौकशीच्या वेळी राष्ट्रपती किंवा प्रतिनीधी हजर राहू शकतात.
- चौकशी पूर्ण झाल्यावर; जर चौकशी करणाऱ्या सभागृहाने त्याच्या एकूण सदस्यसंख्येच्या 2/3 बहुमताने हा ठराव संमत केला तर त्या दिवसापासून राष्ट्रपतींना पदच्यूत केले असे समजले जाते.
- राष्ट्रपतींनी त्या दिवसाअगोदर घेतलेले सर्व निर्णय वैध (Valid) ठरतात.
- या प्रक्रियेत दोन्ही सभागृहातील नामनिर्देशित सदस्यसुद्धा (Nominated members) सहभागी होतात.
- राज्य तसेच केंद्रशासित प्रदेश यांचा मात्र या प्रक्रियेत सहभाग नसतो.

- **राष्ट्रपती पदाची रिक्तता :**

1) राष्ट्रपतींचा पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण झाल्यास

2) राष्ट्रपतींनी राजीनामा दिल्यास (Resignation)

3) राष्ट्रपतींवर महाभियोग आल्यास (Impeachment)

4) राष्ट्रपतींचा मृत्यू झाल्यास (Death)

5) इतर कारणांमुळे (उदा. निवडणूक अवैध (Invalid) ठरल्यास)

- **परंतु :**

1) राष्ट्रपतीचा कार्यकाळ संपायच्या आतच पुढील राष्ट्रपतींची निवडणूक घेतली जाते.
(काही कारणामुळे नवे राष्ट्रपती अगोदरच्या राष्ट्रपतींच्या पदाचा कार्यकाळ संपल्यानंतरही जर लगेचच पदावर रुजू होऊ शकत नसल्यास जुनेच राष्ट्रपती पदावर कार्यरत असतील.

2) जर राष्ट्रपतींनी राजीनामा दिला किंवा आकस्मित मृत्यू झाल्यास किंवा इतर कारणाने ते पद रिक्त होत असेल तर पुढील 6 महिन्याच्या आत पुढील राष्ट्रपतींची निवडणूक व्हावी आणि त्या दरम्यान उपराष्ट्रपती हे राष्ट्रपती पदाची जबाबदारी सांभाळतील.

3) राष्ट्रपती पदावर कार्यरत असताना गैरहजर असतील किंवा ते आजारी असल्याने कार्ये पाहू शकत नसतील तेव्हा उपराष्ट्रपती हे त्याचा कारभार पाहतील.
(वरील दोन परिस्थितीत (2 आणि 3) उपराष्ट्रपती पद जर रिक्त असेल तर सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश आणि जर तेही पद रिक्त असेल तर सर्वोच्च न्यायालयाचे सर्वात जेष्ठ न्यायाधिश राष्ट्रपती म्हणून काम पाहतील.)

Dilip Sirs STEP UP Academy

- 1969 साली राष्ट्रपती डॉ.झाकीर हुसेन यांचे निधन झाले तेव्हा उपराष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांनी राष्ट्रपती म्हणून काम पाहिले. परंतु राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एम. हिदायतुल्ला हे राष्ट्रपती पदावर रुजू झाले.
- अमेरिकेत राष्ट्रपती पद रिक्त झाल्यावर उपराष्ट्रपती हा राष्ट्रपती बनतो. भारतात अशी तरतूद अस्तित्वात नाही.

## राष्ट्रपतींचे अधिकार व कार्ये

### ⁕ कार्यकारी अधिकार (Executive powers) :

- भारत शासनाचा कारभार सुरळीत चालावा त्यासाठी मंत्रीमंडळात राष्ट्रपती काही नियम बनवतात हे नियम बनवण्यासाठी राष्ट्रपतींना कॅबिनेट सचिवालय (Cabinet secretariate) मदत करते.
- ते कोणताही प्रदेश अनुसूचित प्रदेश (Scheduled area) म्हणून जाहीर करू शकतात व त्या अनु.जमाती (Tribal area) प्रदेशाचे प्रशासनाचे अधिकार त्यांच्याकडे असतात.
- पंतप्रधानांची नेमणूक आणि पंतप्रधानांच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची नेमणूक करणे.
- भारताचे महान्यायवादी (Attorney General), महालेखापाल (CAG) मुख्य निवडणूक आयुक्त (CEC) व इतर निवडणूक आयुक्त, UPSC चे अध्यक्ष व सदस्य, राज्यपाल, वित्त आयेगाचे (Finance commission) अध्यक्ष व सदस्य इत्यादींची नेमणूक.
- केंद्र सरकारच्या कामकाजाची माहिती मागवणे.
- मंत्रीमंडळास सामूहिक जबाबदारीने (Collective responsibility) काम करण्यास बजावू शकतात.
- अनु. जाती व अनु. जमाती व इतर मागास वर्गीयांच्या (SC/ST/OBC) परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी आयोग नेमू शकतात.
- आंतर-राज्यीय परिषदेची (Inter state council) नियुक्ती करू शकतात.
- केंद्रशासीत प्रदेशाचे (UT) प्रशासन करण्यासाठी प्रशासकाची नियुक्ती करतात.

### ⁕ कायदेविषयक अधिकार (Legislate powers) :

- संसदेचे अधिवेशन बोलावणे व तहकूब करणे.
- पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार लोकसभा विसर्जित (Dissolution) करणे.
- कलम 123 नुसार संसदेच्या विरामकाळात वटहुकूम (Ordinance) जारी करणे (संसद सुरू झाल्यावर 6 आठवड्याच्या आत त्यावर संसदेची मंजुरी घ्यावी लागते)
- संसदेची संयुक्त बैठक (Joint sitting) बोलावण्याचा अधिकार
- सार्वत्रिक निवडणूकी नंतरच्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरूवातीला संसदेसमोर अभिभाषण करण्याचा अधिकार.
- दरवर्षी संसदेच्या पहिल्या अधिवेशनाची सुरूवात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने होते.
- लोकसभा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची पदे रिक्त असल्यास तसेच राज्यसभा सभापती आणि उपसभापती यांची पदे रिक्त असल्यास त्या त्या सभागृहातून कामकाज चालवण्यासाठी राष्ट्रपती एखाद्या सदस्यास नेमू शकतात.
- राष्ट्रपती वाङ्मय, विज्ञान, कला आणि सामाजिक सेवा या क्षेत्रातील विशेष ज्ञान असणाऱ्या 12 व्यक्तींना राज्यसभेवर नामनिर्देशित (Nominate) करतात.
- अँग्लो इंडियन समाजातील प्रतिनिधी जर लोकसभेत निवडून आला नसेल तर या समाजातील 2 प्रतिनिधींची नियुक्ती लोकसभेत करतात. (104 वी घटनादुरुस्तीने ही तरतूद रद्द)
- संसद सदस्याच्या अपात्रतेबाबत (Disqualification) निवडणूक आयोगाच्या सल्ल्याने निर्णय ठरवतात.
- काही विधेयके राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीने (Prior recommendation) संसदेत मांडली जातात.
- राष्ट्रपतींच्या सहीशिवाय विधेयकांचे कायद्यात रूपांतर होत नाही. विधेयकावर राष्ट्रपती पुढील निर्णय घेऊ शकतात. (कलम 111 अंतर्गत) :

  1) संमती देणे (Give assent to bill) 2) संमती राखून ठेवणे (With hold his assent) 3) पुनर्विचारासाठी संसदेकडे पाठवणे (धन विधेयक वगळता) (Return it for reconsideration of parliament)

  परंतु पुनर्विचारासाठी पाठवलेले विधयेक संसदेकडून पुन्हा आले (बदल करून अथवा आहे तसेच) तर मात्र राष्ट्रपतींना सही करावीच लागते.
- राज्यविधेयकाबाबत राष्ट्रपतींचे अधिकार (कलम 201 अंतर्गत)

  1) संमती देणे 2) संमती नाकारणे 3) राज्यविधिमंडळाकडे पुनर्विचारासाठी पाठवणे (धन विधेयक वगळता)

  येथे मात्र पुनर्विचारासाठी राज्यविधीमंडळाकडे पाठवलेले विधेयक पुन्हा राष्ट्रपतीकडे आले तरी राष्ट्रपती त्यास संमती/नकार देऊ शकतात.
- CAG, UPSC वित्त आयोग (Finance commission) इत्यादीचे अहवाल संसदेसमोर मांडण्याचे अधिकार

Dilip Sir's STEP UP Academy

**※ अर्थविषयक अधिकार (Financial powers) :**

- अर्थसंकल्प मांडण्यासाठी पुर्वपरवानगी
- वित्त आयोग नेमणूक (Finance commission)

**※ संरक्षणविषयक अधिकार (Military powers)**

- युद्ध, युद्धबंदी किंवा तह जाहीर करणे : परंतु याला संसदेच्या मान्यतेची आवश्यकता

**※ न्यायविषयक अधिकार (Judicial powers) :**

- सर्वोच्च न्यायालयाचे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश (मुख्य व इतर) यांच्या नेमणूका करणे.
- कलम 143 : सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला - बंधनकारक नाही.

**※ परराष्ट्र विषयक अधिकार (Diplomatic powers) :**

- सर्व आंतरराष्ट्रीय तह / करार यांच्या नावाने केले जातात.
- भारताचे राजनैतिक व राजदूत यांच्या नेमणूका करणे.

**※ राष्ट्रपतींचा क्षमादानाचा अधिकार (Power of pardon) :**

- कलम 72 नुसार
- न्यायमंडळापासून स्वतंत्र असलेला हा अधिकार हा एक कार्यकारी अधिकार आहे.
- राष्ट्रपती हा अधिकार वापरताना अपिलाचे न्यायालय म्हणून काम करत नाही.
- असा अधिकार देण्यामागे कारण :
  अ) न्यायमंडळाने घाईत चुका केल्यास त्यात दुरुस्ती करणे.
  ब) राष्ट्रपतींना एखादी शिक्षा अनावश्यकपणे कठोर वाटल्यास त्यापासून मुक्तता देऊ शकतात.

- **यात पुढील बाबींचा समावेश :**

1) क्षमा करणे (Complete pardon) : आरोपीला शिक्षा माफीबरोबरच सर्व प्रकारच्या अपाप्रतेपासून मुक्त केले जाते.
2) शिक्षेत सूट देणे : शिक्षेचे स्वरुप बदलतात. उदा. फाशीऐवजी सलग कारावास
3) शिक्षा कमी करणे : शिक्षेच्या स्वरुपात बदल न होता तिचा कालावधी कमी केला जातो. उदा. पाच वर्षांऐवजी दोन वर्ष कारावास
4) शिक्षा सौम्य करणे : एखाद्या विशेष परिस्थितीमुळे मूळ शिक्षा कमी करण्याचा समावेश यात होतो. उदा. दोषी महिला गर्भवती असल्यास, दोषी व्यक्तीला अपंगत्व असल्यास
5) शिक्षा स्थगिती करणे : यात शिक्षेची अंमलबजावणी (विशेषतः मृत्यूदंड) तात्पुरती स्थगित (Temporary suspension) करण्याचा समावेश होतो.
   उदा. दोषी व्यक्तीस राष्ट्रपतींकडून माफी किंवा शिक्षेत सूट मिळविण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा म्हणून अशी तरतूद केलेली आढळते.

- संविधानातील कलम 161 हे राज्यपालांच्या दयेच्या अधिकाराबाबत भाष्य करते.
- राज्यपालांना राज्याच्या कायद्याविरोधातील गुन्ह्यांशी संबंधीत गुन्हेगाराला क्षमा करणे, शिक्षेत सूट देणे, शिक्षा कमी करणे, सौम्य करणे, स्थगित करणे इ. अधिकार देण्यात आले आहेत.

- **परंतु :**

1) कोर्टमार्शल झालेल्या गुन्हेगारांबाबत राज्यपालांना क्षमादानाचा अधिकार नाही.
2) फाशीच्या शिक्षा सुनावलेल्या गुन्हेगारांबाबत राज्यपाल शिक्षा माफ करू शकत नाही. बाकी मात्र सर्व अधिकार राज्यपालांना असतील.

- सर्वोच्च न्यायालयाने विविध खटल्यांमध्ये राष्ट्रपतींच्या दयेच्या अधिकाराचे परीक्षण करून पुढील तत्त्वे नमूद केलेली आहेत.

1) दया याचना करणाऱ्या अर्जदाराला राष्ट्रपतींद्वारे मौखिक सुनावणी (Oral hearing) करण्याचा हक्क नाही.
2) राष्ट्रपती नव्याने सर्व पुरावे तपासू शकतात आणि न्यायालयाने स्वीकारलेल्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा दृष्टिकोन मांडू शकतात.
3) केंद्रीय कॅबिनेट सल्ल्यानुसार राष्ट्रपतीने या अधिकारांचा वापर करावा.
4) आपल्या आदेशांबाबत खुलासा करण्यास राष्ट्रपती बांधील नाहीत.
5) राष्ट्रपती त्यांना वाटणाऱ्या 'अनावश्यक कठोर' शिक्षेपासून मुक्तता तर देतीलच पण स्पष्ट चुकांपासूनही दोषमुक्त करू शकतील.
6) राष्ट्रपतींनी या अधिकारांचा वापर कसा करावा याबाबत सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शिका आखून देण्याची आवश्यकता नाही.
7) राष्ट्रपतींनी उपयोगात आणलेल्या अधिकारांचे न्यायालयीन पुनर्विलोकन करता येणार नाही. राष्ट्रपतींनी घेतलेले निर्णय लहरी, अतार्किक, अयोग्य हेतूने प्रेरित किंवा भेदमूलक असतील तर मात्र ते न्यायालयीन पुनर्विलोकनास पात्र ठरतात.
8) राष्ट्रपतींनी क्षमायाचनेचा अर्ज फेटाळून लावला असेल तर पुन्हा एकदा अर्ज करून त्यावर स्थगिती मिळविता येणार नाही.

**※ आणीबाणीविषयक अधिकार (Emergency powers)**

अ) राष्ट्रीय आणिबाणी (National emergency) : कलम 352

Dilip Sir's STEP UP Academy

पुढील तीन आधारांवर जारी करतात :

1) युध्द, 2) बाह्य आक्रमण, 3) सशस्त्र बंड

- आणीबाणी जाहीर झाल्यावर एका महिन्याच्या आत दोनही सभागृहांनी तीला मान्यता दिली पाहिजे जर ती मान्य झाली तर आणीबाणी सहा महीन्यांपर्यंत लागू होते. ती अनिश्चित काळापर्यंत लागू राहू शकते, परंतू प्रत्येक सहा महीन्यानंतर तिला संसदेची परवानगी आवश्यक असते.

- **आणीबाणीकाळात राष्ट्रपतींचे अधिकार :**

1. कलम 20 व 21 वगळता, मूलभूत अधिकारांवर गदा (अपवाद कलम 19 फक्त बाह्य आणीबाणीत बरखास्त)
2. केंद्र-राज्य कराविषयी उत्पन्नाची वाटणी बदलू शकते.
3. घटकराज्यांनी कार्यकारी अधिकार कसे वापरावे याबाबत सूचना देतात.

- **राष्ट्रीय आणीबाणीत संसदेला खालील अधिकार प्राप्त होतात.**

- राज्यसुचीतील विषयांवर कायदे करण्याचा अधिकार. (आणीबाणीनंतर 6 महिन्यात हे कायदे रद्द होतात.)
- संसद व विधानसभा यांचा कार्यकाळ एका वर्षाने वाढवू शकते. (अनिश्चित काळासाठी)
- परंतु आणीबाणीनंतर सहा महिन्यांपेक्षा जास्त हा कार्यकाळ वाढू शकत नाही.

**※ राष्ट्रपतींचे नकाराधिकार (Veto power of the president) :**

1) निलंबनात्मक नकाराधिकार (Suspensive Veto)
- एखादे विधेयक पुनर्विचारासाठी पाठवणे.

2) पूर्ण नकाराधिकार (Absolute Veto)
- राज्यांविषयीचे विधेयक नाकारू शकतात.
- तसेच खाजगी विधेयक आणि कॅबिनेटने राजीनामा दिल्यानंतर नवीन कॅबिनेटने तसा सल्ला दिला तर राष्ट्रपती अशा प्रकारचा अधिकार वापरतात.

3) पॉकेट नकाराधिकार (Pocket Veto)
- स्वविवेकाधीन अधिकार (1986 : पोस्टल बील - टपालखात्याच्या स्वातंत्र्यावर बंधने)
(ग्यानी झैलसिंग राष्ट्रपती असताना त्यांनी हा अधिकार राजीव गांधीचे सरकाराविरूद्ध वापरला होता.)

**※ गुणात्मक नकाराधिकार (Qualitative veto) :**

- अशा प्रकारचा अधिकार भारतीय राष्ट्रपतींना नाही.

**राष्ट्रपतींना घटनात्मक विधेकाधिकार (Constitutional discretion) नाहीत परंतु, त्यांना परिस्थितीजन्य विवेकाधिकार (Situational discretion) आहेत.**

- सामान्य परिस्थितीत राष्ट्रपती बहुमत असलेल्या पक्षांच्या नेत्याला सरकार स्थापण्यासाठी पंतप्रधान म्हणून पाचारण करतात.
- परंतु जर संसदेत कोणत्याही पक्षाला बहुमत नसेल तर संकेतानुसार खालील पद्धतीने पंतप्रधानांची नेमणूक करतात.

1) जर सरकारने राजीनामा दिला तर विरोधी पक्षांच्या नेत्याला
2) निवडणूकीच्या अगोदर बनवलेली पक्षांची आघाडीच्या नेत्याला
3) निवडणूकीच्या नंतर बनवलेल्या आघाडी पक्षांचा नेता
4) सर्वात मोठ्या पक्षांचा नेता
5) वरीलपैकी कोणीही तयार होत नसेल तर कोणालाही ते सरकार स्थापण्यास आमंत्रित करू शकतात.

- जर शासनाने बहुमत गमावले व पंतप्रधानांनी राष्ट्रपतींना लोकसभा बरखास्तीचा सल्ला दिला तर अशा परिस्थितीत राष्ट्रपतींना वाटले की दुसरा पक्ष किंवा पक्षांचा गट सरकार स्थापन करू शकतो तर ते पंतप्रधानांचा सल्ला नाकारतात व लोकसभा बरखास्त करत नाही.
- सामूहिक जबाबदारी निश्चित करणे.
- मंत्रीमंडळास सामुहीक निर्णय घेण्यास सांगू शकतात.
- काळजीवाहू सरकारच्या काळात जर या सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला तर राष्ट्रपती समोर येऊन त्या सरकारला असा निर्णय घेण्यापासून थांबवतात. कारण नैतिकदृष्ट्या निवडणुकीनंतर येणाऱ्या नवीन शासनाने महत्त्वाचे निर्णय घेणे अपेक्षित असते.
- नकाराधिकार वापरणे. पंतप्रधानांकडून माहिती मागण्याचा अधिकार (Right to be inform)

**※ वटहुकुम काढण्याचा अधिकार (Ordinance-Making power) : कलम 123**

- राष्ट्रपती वहहुकूम केव्हा काढतात?
- जेव्हा संसदेचे कोणतेही सभागृह कार्यरत नसेल.
- जेव्हा संसदेचे केवळ एकाच सभागृहाचे कामकाज सुरू असेल. (कारण कायदा दोन्ही सभागृहांनी संमत करावा लागतो.)
- वटहुकूम : जर संसदेची मान्यता - तर कायद्यात रूपांतर. असा वटहुकूम 6 आठवडे किंवा 6 महिन्यांच्या आत संसदेला मंजूर करून घ्यावा लागतो. (6 महिने - कारण दोन अधिवेशनातील अंतर हे सहा महिने असू शकते).

Dilip Sir's STEP UP Academy

- राष्ट्रपती आपला वटहुकूम माघारी घेऊ शकतात. हा त्यांचा स्वविवेकाधीन अधिकार नाही – केवळ केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच ते वटहुकूम जारी करतात अथवा माघार घेतात.
- घटनादुरुस्ती करण्याबाबत वटहुकूम जारी करता येत नाही.
- वटहुकूम जारी करण्याबाबतचे अधिकार भारतीय राष्ट्रपतीला असलेले असाधारण अधिकार आहेत. अशा प्रकारचे अधिकार अमेरिका व इंग्लंड अशा लोकशाही देशांतही आढळत नाही.

**※ डी. पी. वधवा खटला (1987) :**

- सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की एकाच प्रकारचा अध्यादेश पुन्हा पुन्हा काढणे हे घटनाविरोधी आहे. (कारण हा अपवादात्मक अधिकार आहे, तो विधिमंडळाच्या कायदेविषयक अधिकाराची जागा घेऊ शकत नाही.)

**※ भारताच्या राष्ट्रपतींची निवडणूक (1952 ते 2017)**

| क्र. | निवडणूक वर्ष | विजयी उमेदवार | प्रमुख प्रतिस्पर्धी |
|---|---|---|---|
| 1) | 1952 | डॉ.राजेंद्र प्रसाद | के.टी. शहा |
| 2) | 1957 | डॉ.राजेंद्र प्रसाद | एन.एन. दास |
| 3) | 1962 | डॉ.एस. राधाकृष्णन | चौधरी हरी राम |
| 4) | 1967 | डॉ.झाकीर हुसेन | के.सुब्बा राव |
| 5) | 1969 | व्हि.व्हि. गिरी | एन.संजीव रेड्डी |
| 6) | 1974 | फक्रुद्दिन अली अहमद | त्रिदेव चौधरी |
| 7) | 1977 | एन.संजीव रेड्डी | बिनविरोध |
| 8) | 1982 | ग्यानी झैल सिंह | एच.आर. खन्ना |
| 9) | 1987 | आर.वेंकटरमण | व्हि.कृष्ण अय्यर |
| 10) | 1992 | डॉ.शंकर दयाल शर्मा | जॉर्ज स्वेल |
| 11) | 1997 | के.आर. नारायणन | टि.एन. सेशन |
| 12) | 2002 | डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम | लक्ष्मी सेहगल |
| 13) | 2007 | श्रीमती प्रतिभा पाटील | भैरवसिंह शेखावत |
| 14) | 2012 | प्रणव मुखर्जी | पी. ए. संगमा |
| 15) | 2017 | राम नाथ कोविंद (65.65%) | मीरा कुमार (34.35%) |

**※ काही महत्त्वाचे :**

- अपक्ष म्हणून निवडून आलेले एकच राष्ट्रपती : व्ही.व्ही. गिरी (1969) (यांच्याच निवडणुकीच्या वेळी दुसऱ्या फेरीची मतमोजणी केली गेली. बाकी सर्वांसाठी पहिल्याच फेरीत निकाल लागले आहेत.)
- बिनविरोध निवडून आलेले एकमेव राष्ट्रपती निलम संजीव रेड्डी (1977)
- (निलम संजीव रेड्डी हे 1969 साली राष्ट्रपती पदासाठी काँग्रेसचे उमेदवार होते, परंतु तेव्हा पराभूत झाले आणि त्यावेळी व्ही.व्ही. गिरी राष्ट्रपती म्हणून निवडून आले. जनता सरकारच्या काळात पुन्हा निलम संजीव रेड्डी यांनाच उमेदवारी देऊ केल्याने काँग्रेस पक्षाने आपला उमेदवार घोषित केला नव्हता. त्यावेळी निलम संजीव रेड्डी हे लोकसभेचे अध्यक्ष होते.)

**※ राष्ट्रपती होण्याअगोदर उपराष्ट्रपती पद भूषवलेल्या व्यक्ती :**

1) एस. राधाकृष्णन (1952, 1957 साली उपराष्ट्रपती म्हणून निवडले गेले आणि 1962 साली ते राष्ट्रपती झाले.
2) झाकीर हुसेन (1962 साली उपराष्ट्रपती म्हणून तर 1967 साली राष्ट्रपती म्हणून निवडले गेले.)
3) व्ही.व्ही. गिरी (1967 साली उपराष्ट्रपती म्हणून तर 1969 साली राष्ट्रपती म्हणून निवडले गेले.)
4) आर. वेंकटरामण (1984 साली उपराष्ट्रपती म्हणून तर 1987 साली राष्ट्रपती म्हणून निवडले गेले.)
5) शंकरदयाल शर्मा (1987 साली उपराष्ट्रपती म्हणून तर 1992 साली राष्ट्रपती म्हणून निवडले गेले.)
6) के.आर. नारायण (1992 साली उपराष्ट्रपती म्हणून तर 1997 साली राष्ट्रपती म्हणून निवडले गेले.)

**※ प्रभारी राष्ट्रपती म्हणून काम पाहिलेल्या व्यक्ती :**

1) उपराष्ट्रपती व्ही.व्ही. गिरी (जुलै 1969 साली राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसैन यांचा मृत्यू झाल्याने)
2) न्या. मोहम्मद हिदायतुल्लाह (जुलै–ऑगस्ट 1969 साली राष्ट्रपती व उपराष्ट्रपती असे दोन्ही पद रिक्त असल्याने भारताचे मुख्य न्यायाधिश म्हणून राष्ट्रपती पद सांभाळले होते.)
3) बी.डी. जत्ती (फेब्रुवारी 1977 साली फक्रुद्दीन अली अहमद यांचा मृत्यू झाल्याने)

**※ निवडणूकीबाबत :**

1) सर्वाधिक मतफरकाने निवडून आलेले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद (1957)
   (त्यावेळी प्रमुख प्रतिस्पर्धी होते एन.एन. दास, त्यांना केवळ 0.4% मते मिळाली.)
2) सर्वात कमी मतफरकाने निवडून आलेले राष्ट्रपती व्ही.व्ही. गिरी (1969)
   (त्यावेळी प्रमुख प्रतिस्पर्धी होते निलम संजीव रेड्डी, त्यांना 48.5% मते मिळाली, तर व्ही.व्ही. गिरी यांना 50.22% मते मिळाली.

Dilip Sir's STEP UP Academy

आम्ही आमच्या राष्ट्रपतींना वास्तविक सत्ता दिलेली नाही, परंतू त्यांचे स्थान महत्त्वाचे आणि मानाचे बनविले आहे.
– पंडीत जवाहरलाल नेहरू

राष्ट्रपती हे केवळ नामधारी प्रमुख नाही. राज्यघटनेचे उल्लंघन न करता राष्ट्रपती अधिकारशाहीवादी शासन स्थापित करू शकतात. – के.एम. मुन्शी

**※ दृष्टिक्षेपात राष्ट्रपती संबंधित कलमे**

| कलम | विषय |
|---|---|
| 52 | भारताचा राष्ट्रपती |
| 53 | संघराज्याचे कार्यकारी अधिकार |
| 54 | राष्ट्रपतीची निवडणूक |
| 55 | राष्ट्रपतीच्या निवडणुकीची पद्धती |
| 56 | राष्ट्रपतीचा कार्यकाल |
| 57 | पुनर्निवडीसाठी पात्रता |
| 58 | राष्ट्रपतिपदी निवड होण्यासाठी आवश्यक पात्रता |
| 59 | राष्ट्रपतिपदाच्या अटी |
| 60 | राष्ट्रपतीची शपथ किंवा वचनबद्धता |
| 61 | राष्ट्रपतीच्या महाभियोगाची प्रक्रिया |
| 62 | राष्ट्रपतिपद रिक्त झाल्यास निवडणूक घेण्यासाठी कालावधी |
| 65 | उपराष्ट्रपतीने प्रभारी राष्ट्रपती म्हणून काम करणे किंवा राष्ट्रपतीची कार्ये करणे. |
| 71 | राष्ट्रपतीच्या निवडणुकीसंबंधी बाबी |
| 72 | राष्ट्रपतीचा क्षमा करण्याचा किंवा काही बाबतीत शिक्षेमध्ये स्थगिती, सवलत किंवा पर्यायी शिक्षा देण्याचा अधिकार. |
| 74 | राष्ट्रपतीला सल्ला देण्यासाठी व साहाय्य करण्यासाठी मंत्रिमंडळ |
| 75 | मंत्र्यांसंबंधी इतर तरतुदी. जसे – नियुक्ती, कार्यकाल, वेतन इत्यादी. |
| 76 | भारताचा महान्यायवादी |
| 77 | भारत सरकारचे कामकाज चालविणे. |
| 78 | राष्ट्रपतीला माहिती देण्याबाबत व इतर बाबतीत पंतप्रधानांचे कर्तव्य |
| 85 | संसदेची अधिवेशने, तहकुबी व विसर्जन |
| 111 | संसदेने संमत केलेल्या विधेयकांना मान्यता |
| 112 | केंद्रीय अर्थसंकल्प (वार्षिक आर्थिक पत्रक) |
| 123 | अध्यादेश जारी करण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार |
| 143 | सर्वोच्च न्यायालयाशी विचारविनिमय करण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार |

Dilip Sir's STEP UP Academy

# उपराष्ट्रपती (Vice President)

**※ उपराष्ट्रपतींबाबत महत्वाची कलमे :**

- कलम 63 : भारताचे उपराष्ट्रपती
- कलम 64 : भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतील.
- कलम 65 : राष्ट्रपतींची हंगामी रिक्तता /गैरहजेरीत उपराष्ट्रपती हे राष्ट्रपती म्हणून कारभार पाहतील.
- कलम 66 : उपराष्ट्रपती पदाची निवडणूक (प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पद्धतीने एकल संक्रमनीय मतदान तत्त्व) (System of proportional representation by means of the single transferable vote)
- कलम 67 : उपराष्ट्रपतींचा कार्यकाल (कलम 67 ब : पदावरून दूर करण्याबाबत तरतूद)
- कलम 68 : रिक्त झालेल्या उपराष्ट्रपती पदाची निवडणूक घेण्याचा कालावधी
- कलम 69 : उपराष्ट्रपती पदाची शपथ
- कलम 70 : आकस्मिक परिस्थितीत राष्ट्रपतींची कार्ये पार पाडणे.
- कलम 71 : राष्ट्रपती व उपराष्ट्रपतींच्या निवडणूकींबाबत
- भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतील. (अमेरिकेतही अशी तरतूद आहे.)

**※ निर्वाचन गण (Electoral College) :**

1) लोकसभा आणि राज्यसभेतील सर्व सदस्य (घटकराज्यांच्या विधीमंडळाचा यात समावेश नसतो.)

- **पात्रता (Qualifications) :**

1) ते भारताचे नागरीक असावेत.
2) त्यांचे वय वर्षे 35 पूर्ण असावित.
3) राज्यसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावा.
4) केंद्र किंवा राज्यांतर्गत लाभाचे पद (Office of profit) धारण केलेले नसावे.
(लाभाच्या पदाअंतर्गत अपवाद : राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल, केंद्र किंवा राज्य यामधील मंत्री)

- उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूकीचा अर्ज करताना उमेदवारास 20 मतदात्यांचा पाठिंबा (proposers) आणि 20 मतदात्यांचे अनुमोदन (seconders) आवश्यक असते. (उमेदवारास RBI मधे 15,000 रु. अनामत रक्कम ठेवावी लागते.)

- **पदाच्या अटी :**

- तो व्यक्ती जर कार्यरत आमदार किंवा खासदार असेल तर अशी व्यक्ती जेव्हा उपराष्ट्रपती पदावर निवडून आल्यास आणि त्याने पदग्रहण केल्यास त्याचे अगोदरचे सदस्यत्व आपोआपच रद्द होते.
- त्यांच्याकडे लाभाचे पद (Office of profit) नसावे.

- **शपथ (oath) :**

1) राज्यघटने प्रति श्रद्धा व निष्ठा बाळगणे आणि
2) पदाची कार्ये प्रामाणिकपणे पार पाडणे.

- राष्ट्रपती किंवा त्यांनी नियुक्त केलेली व्यक्ती उपराष्ट्रपतींना शपथ देते.

- **पदाची रिक्तता (Vacancy in office) :**

1) 5 वर्षांचा कार्यकाल संपल्यास (Expiry of his tenure)
2) राजीनामा दिल्यास (By his resignation)
3) संसदेतील ठरावाद्वारे पदच्युती झाल्यास (removal)
4) त्यांचा आकस्मित मृत्यू झाल्यास (By his death)
5) इतर कारणांमुळे (निवडणूक अवैध (Invalid) ठरवली तर)

- **कार्यकाल (Term of office) :**

- 5 वर्षे (पुनर्नियुक्ती (Reappointment) होऊ शकते.)
- कार्यकाल संपल्यानंतरही त्यांचे उत्तराधिकारी पद धारण करेपर्यंत उपराष्ट्रपती कार्यरत राहू शकतात.
- परंतू उपराष्ट्रपतींचे पद मृत्यू, राजीनामा, पदच्यूती या कारणांमुळे रिक्त झाले **तर लवकरात लवकर** निवडणूका घेण्यात याव्यात अशी तरतूद केलेली आहे. तोपर्यंत ते पद रिक्तच राहते.

- **पदावरून दूर करण्याची प्रक्रिया (Removal process):**

- अशा प्रकारचा ठराव पहिल्यांदा राज्यसभेतच मांडला जाईल. हा ठराव राज्यसभा निव्वळ बहुमताने (Effective majority) मंजूर करून लोकसभेत पाठवेल. पुढे लोकसभा अशा ठरावास सहमती देईल. परंतु असा ठराव मांडण्याअगोदर उपराष्ट्रपतींना 14 दिवसांची पूर्व सूचना द्यावी लागेल. (पदावरून दूर करण्यासाठी कारण काय असे घटनेत नमूद नाही.)
- राजीनामा : राष्ट्रपतींकडे देतात.

Dilip Sir's STEP UP Academy

● **निवडणूक विवाद (Election dispute) :**

- याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.
- जर उपराष्ट्रपती पदाची निवडणूक सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरवली तर त्या दिवसापर्यंतचे उपराष्ट्रपतींनी घेतलेले निर्णय वैध (Valid) ठरतात.
- निर्वाचन गण (quorum) अपूर्ण होते या कारणावरुन निवडणूकीस आव्हान देता येणार नाही.

**❊ भारताच्या उपराष्ट्रपतींची निवडणूक (1952 ते 2017)**

| क्र. | निवडणूक वर्ष | विजयी उमेदवार | प्रमुख प्रतिस्पर्धी |
|---|---|---|---|
| 1) | 1952 | डॉ.एस.राधाकृष्णन | बिनविरोध |
| 2) | 1957 | डॉ.एस.राधाकृष्णन | बिनविरोध |
| 3) | 1962 | डॉ.झाकीर हुसेन | एन.सामंत सिंह |
| 4) | 1967 | व्हि.व्हि.गिरी | प्रो.हबीब |
| 5) | 1969 | जी.एस.पाठक | एच.व्हि.कामथ |
| 6) | 1974 | बी.डी.जत्ती | एन.ई.होरो |
| 7) | 1979 | एम.हिदायतुल्ला | बिनविरोध |
| 8) | 1984 | आर.वेंकटरमण | बी.सी.कांबळे |
| 9) | 1987 | डॉ.शंकर दयाल शर्मा | बिनविरोध |
| 10) | 1992 | के.आर नारायणन | काका जोगिंदर सिंह |
| 11) | 1997 | कृष्ण कांत | सुरजीत सिंह बर्नाला |
| 12) | 2002 | भैरवसिंह शेखावत | सुशिलकुमार शिंदे |
| 13) | 2007 | मोहम्मद हमीद अन्सारी | नजमा हेपतुल्ला |
| 14) | 2012 | मोहम्मद हमीद अन्सारी | जसवंत सिंह |
| 15) | 2017 | एम.व्यंकय्या नायडू (516 मते) | गोपाल कृष्ण गांधी (244 मते) |

● **सलग दोन वेळा निवडून आलेले उपराष्ट्रपती :**

1) डॉ. एस. राधाकृष्णन (1952 व 1957)
2) मोहम्मद हमीद अन्सारी (2007 व 2012)

● **बिनविरोध निवडून आलेले राष्ट्रपती :**

1) डॉ. एस. राधाकृष्णन (दोन वेळा बिनविरोध)
2) एम. हिदायतुल्ला (1979)
3) डॉ. शंकर दयाळ शर्मा (1987)

- राष्ट्रपती पदाची निवडणूक हरलेले उपराष्ट्रपती भैरवसिंह शेखावत
- सर्वात जास्त मतफरकाने निवडून आलेले उपराष्ट्रपती के.आर. नारायण (1992)
  (त्याचे प्रतिस्पर्धी काका जोगींदर सिंह यांना फक्त एकच मत मिळाले.)
- सर्वात कमी मतफरकाने निवडून आलेले उपराष्ट्रपती भैरवसिंह शेखावत (2007)
  (त्याचे प्रतिस्पर्धी सुशिलकुमार शिंदे यांना 305 मते मिळाली होती.

**❊ दृष्टिक्षेपात उपराष्ट्रपतिसंबंधित कलमे :**

| कलम | विषय |
|---|---|
| 63 | भारताचा उपराष्ट्रपती |
| 64 | उपराष्ट्रपती राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. |
| 65 | उपराष्ट्रपतीने प्रभारी राष्ट्रपती म्हणून काम करणे किंवा राष्ट्रपती अनुपस्थित असताना किंवा राष्ट्रपतिपद अल्पावधीसाठी रिक्त असताना राष्ट्रपतीचे काम पाहणे. |
| 66 | उपराष्ट्रपतीची निवडणूक |
| 67 | उपराष्ट्रपतीचा कार्यकाल |
| 68 | उपराष्ट्रपतिपद रिक्त झाल्यास ते पद भरण्यासाठी निवडणूक घेण्याचा कालावधी आणि अल्पावधीसाठी रिक्त झालेल्या पदावर निवडून आलेल्या व्यक्तिचा कार्यकाल |
| 69 | उपराष्ट्रपतीची शापथ किंवा प्रतिज्ञा |
| 70 | इतर आकस्मिक परिस्थितीत राष्ट्रपतीचे काम पाहणे. |
| 71 | उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीशी निगडित किंवा संबंधित बाबी. |

Dilip Sir's STEP UP Academy

# पंतप्रधान (Prime Minister)

* कलम 74 : राष्ट्रपती हे कार्यकारी मंडळाचे सर्वोच्च प्रमुख असले तरी त्यांना हे अधिकार मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानेच वापरता येतात.
* कलम 75 : 1) राष्ट्रपती पंतप्रधानांची नियुक्ती करतील आणि पंतप्रधानांच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची नियुक्ती करतील.
  2) राष्ट्रपतींची मर्जी (Pleasure of the president) असेपर्यंत मंत्री पदावर राहू शकतात.
  3) मंत्रीमंडळ संयुक्तरित्या लोकसभेत जबाबदार (Collectively responsible to Loksabha) असते.
  (म्हणजेच घटनेत पंतप्रधानांच्या निवडीसाठी/नियुक्तीसाठी कोणतीही विशेष पद्धत सांगितलेली नाही. येथे गरजेनुसार राष्ट्रपती परिस्थितीजन्य विवेकाधिकार (Situational discreation) वापरतात.)
  (1979 : चरण सिंग यांची पंतप्रधानपदी निलम संजीव रेड्डी यांनी पहिल्यांदा अशी नेमणूक केली. त्यानंतर अशाप्रकारे नियुक्त केलेले पंतप्रधान – व्ही. पी. सिंग (1989), चंद्रशेखर (1990), पी. व्ही. नरसिंहराव (1991), अटलबिहारी वाजपेयी (1996), एच. डी. देवेगौडा (1996), आय. के. गुजराल (1997) आणि अटल बिहारी वाजपेयी (1998))

**न्यायालयाचे याबाबत काही महत्त्वाचे निकाल :**

1) एखाद्या व्यक्तीस बहुमत सिद्ध करण्यापूर्वीच पंतप्रधान पदावर नेमले जाऊ शकते. त्यानंतर ठराविक कालावधीत त्यांनी तसे बहुमत सिद्ध केले तरी चालेल.
2) संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसलेली व्यक्ती पंतप्रधान म्हणून नियुक्त केली जाऊ शकते. परंतु पुढील 6 महिन्यांच्या आत त्यांनी कोणत्याही सभागृहाचे सदस्यत्व मिळवावे लागते. अन्यथा त्यांची नेमणूक रद्द होते.

- पंतप्रधान हे कोणत्याही गृहाचे (लोकसभा / राज्यसभा) सदस्य असू शकतात.
- 1966 : इंदिरा गांधी, 1996 : एच. डी. देवेगौडा, 1997 : आय. के. गुजराल, 2004 : डॉ. मनमोहन सिंग हे राज्यसभेचे सदस्य होते.
  (एच. डी. देवेगौडा पंतप्रधान झाले तेव्हा कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. नंतर ते राज्यसभा सदस्य बनले.)

● **शपथ :** पंतप्रधानांना पदग्रहण करण्यापूर्वी राष्ट्रपती पुढील शपथ देतात.

1) भारताच्या राज्यघटनेप्रती खरी श्रद्धा व निष्ठा बाळगणे.
2) भारताचे सार्वभौमत्व आणि अखंडता (Sovereignty and integrity) अबाधित राखणे.
3) पदाची कामे प्रामाणिकपणे व विवेकबुद्धीने पार पाडणे. (Faithfully and conscientiously)
4) सर्व प्रकारच्या लोकांप्रती घटनेनुसार व कायदेनुसार भयाने किंवा पक्षपात तसेच आकसाने किंवा प्रेमाने प्रेरित न होता (Without fear or favour) योग्य व्यवहार करणे.

- पंतप्रधानांना /केंद्रीय मंत्र्यांना एक पदाची शपथ तर दुसरी गोपनियतेची शपथ अशा दोन शपथा घ्याव्या लागतात.
  (यावरुन असे दिसते की पंतप्रधान म्हणून त्यांना वेगळी शपथ घेता येत नाही. तसेच यांच्या शपथेचे नमूने परिशिष्ट तीन मध्ये नमूद केलेले आहेत. म्हणजेच घटनेत शपथेचे नमूने फक्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि राज्यपाल यांचेच नमूद केलेले आहेत.)

● **कालावधी :**

- घटनेत निश्चित कालावधी नमूद केलेला नाही.
- ते राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत पदावर असतात. परंतू, लोकसभेत बहुमत असेपर्यंत ते पदावर असतात.
  (लोकसभेत पराभव झाल्यावर व्ही.पी. सिंग (1990) आणि एच.डी. देवेगौडा (1997) यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला होता.)

● **अधिकार व कार्ये :**

- मंत्रीमंडळातील इतर मंत्र्यांची शिफारस राष्ट्रपतींकडे करणे.
- एखाद्या मंत्र्यास राजीनामा देण्यास सांगू शकतात. जर अशा मंत्र्याने राजीनामा नाही दिला तर राष्ट्रपतींद्वारे ते त्या मंत्र्यास पदावरुन दूर करू शकतात. (असा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारकच असतो.)
- मंत्रीमंडळाच्या बैठकीचे ते अध्यक्षस्थान भूषवतात.
- यांचा राजीनामा म्हणजेच संपूर्ण मंत्रीमंडळाचा राजीनामा ठरतो.
- राष्ट्रपतींना ते विविध नियुक्त्यांसाठी सल्ला देतात.
- राष्ट्रपतींनी मागितलेली माहिती पुरवतात.
- अधिवेशन बोलावणे, स्थगित करण्याबाबत ते राष्ट्रपतींना सल्ला देतात.
- लोकसभा विसर्जित करण्याबाबत राष्ट्रपतींना सल्ला देतात.
- भारताचे महान्यायवादी, कॅग, युपीएससी अध्यक्ष तसेच सदस्य, निवडणूक आयुक्त, वित्त आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य इ. नियुक्तीसाठी राष्ट्रपतींना सल्ला देतात.

- पंतप्रधान हे नीति आयोग, राष्ट्रीय विकास परिषद, राष्ट्रीय एकात्मता परिषद, आंतरराज्यीय परिषद आणि जल संसाधन परिषद यांचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.
- आपल्या राज्यघटनेतील केवळ पंतप्रधान या पदाची तुलना अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांशी करता येईल. आपल्या राष्ट्रपती पदाची त्यासोबत तुलना होणे शक्य नाही. - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

- **पंतप्रधान पदाविषयी विविध तज्ञांनी मांडलेली मते :**
- पंतप्रधान म्हणजेच राज्यरूपी जहाजाचा कॅप्टन होय. : मन्रो
- पंतप्रधान म्हणजेच राज्यरूपी जहाजाचा चालक होय. : रॅम्से मूर
- पंतप्रधान हे समानातील पहिले असतात. : मोर्ले
- मंत्रीमंडळरूपी कमानीची आधारभूत शिळा : मोर्ले
- पंतप्रधान हे गौण ताऱ्यांमधील चंद्र आहेत. : विल्यम हारकोर्ट
- पंतप्रधान म्हणजेच ग्रह ज्याभोवती फिरतात असा सूर्य : जेनिंग्ज

**⁂ पंतप्रधान :**

| क्र. | पंतप्रधानाचे नाव | पक्ष | कालावधी |
|---|---|---|---|
| 1) | पं. जवाहरलाल नेहरू | काँग्रेस | 1947-1964 |
| 2) | गुलझारीलाल नंदा (प्रभारी) | काँग्रेस | 1964-1964 |
| 3) | लाल बहादूर शास्त्री | काँग्रेस | 1964-1966 |
| 4) | गुलझारीलाल नंदा (प्रभारी) | काँग्रेस | 1966-1966 |
| 5) | इंदिरा गांधी | काँग्रेस | 1966-1977 |
| 6) | मोरारजी देसाई | जनता पार्टी | 1977-1979 |
| 7) | चौधरी चरण सिंह | जनता पार्टी (S) | 1979-1980 |
| 8) | इंदिरा गांधी | काँग्रेस (I) | 1980-1984 |
| 9) | राजीव गांधी | काँग्रेस (I) | 1984-1989 |
| 10) | व्हि.पी. सिंह | जनता दल | 1989-1990 |
| 11) | चंद्र शेखर | जनता दल | 1990-1991 |
| 12) | पी.व्ही. नरसिंहराव | काँग्रेस | 1991-1996 |
| 13) | अटल बिहारी वाजपेयी | भाजपा | 1996-1996 |
| 14) | एच.डी. देवेगौडा | जनता दल | 1996-1997 |
| 15) | आय.के. गुजराल | जनता दल | 1997-1998 |
| 16) | अटल बिहारी वाजपेयी | भाजपा | 1998-1999 |
| 17) | अटल बिहारी वाजपेयी | भाजपा | 1999-2004 |
| 18) | डॉ. मनमोहन सिंह | काँग्रेस | 2004-2014 |
| 19) | श्री. नरेंद्र मोदी | भाजपा | 2014 पासून |

**⁂ काही महत्त्वाचे :**

- **पंतप्रधान बननण्यापूर्वी मुख्यमंत्री पद भूषविलेल्या व्यक्ती**

1) मोरारजी देसाई 2) चरणसिंग 3) व्ही.पी. सिंग
4) पी.व्ही.नरसिंहराव 5) एच.डी.देवेगौडा 6) नरेंद्र मोदी

**⁂ प्रधानमंत्री आणि सरकार :**

- व्ही.पी. सिंग : राष्ट्रीय आघाडी सरकार
- एच.डी. देवेगौडा आणि आय.के. गुजराल : संयुक्त आघाडी सरकार
- डॉ. मनमोहन सिंग : संयुक्त पुरोगामी आघाडी
- अटल बिहारी वाजपेयी, श्री.नरेंद्र मोदी : राष्ट्रीय लोकशाही आघाडी

## केंद्रीय मंत्रीमंडळ (Central council of ministers)

**⁂ कलम 74 :**

- राष्ट्रपतीस सल्ला देण्यासाठी मंत्रिमंडळ असेल. (Council of ministers to aid and advise president)

1) 42 वी घटनादुरुस्ती : राष्ट्रपती मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसारच वागतील. (म्हणजेच राष्ट्रपतींवर मंत्रीमंडळाचा सल्ला बंधनकारक असेल.)
2) 44 वी घटनादुरुस्ती : राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने काम करतील आणि मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपती फेरविचारासाठी मंत्रिमंडळाकडे पाठवू शकतील. परंतू फेरविचारानंतर राष्ट्रपतींकडे आलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक असेल. (सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार : जर राष्ट्रपती मंत्रीमंडळाच्या सल्ल्याशिवाय कार्यकारी अधिकारांचा वापर करत असतील तर ते घटनाबाह्य ठरेल.)

- अशा वेळी मंत्र्यांनी / मंत्रीमंडळाने राष्ट्रपतींना दिलेल्या सल्ल्याबाबत न्यायालयात चौकशी करता येणार नाही.

**कलम 74 बाबत न्यायालयीन निकाल :**

1) काळजीवाहू सरकारच्या काळातसुद्धा राष्ट्रपती मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसारच वागतील.
2) घटनेत जेथे-जेथे राष्ट्रपतींच्या मर्जीचा उल्लेख आहे त्याचा अर्थ मंत्रीमंडळाची मर्जी असाच विचारात घ्यावा.

- **मंत्रिमंडळ :**
- नियुक्ती : राष्ट्रपती : पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार, कार्यकाल : राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत.
- मंत्री हा लोकसभा तसेच राज्यसभेतील सदस्य असू शकतो.
- कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसलेला व्यक्ती मंत्री म्हणून नियुक्त केला जाऊ शकतो. (पुढील सहा महिन्यात त्यास एका सभागृहाचा सदस्य म्हणून निवडून जावेच लागते.)

Dilip Sir's STEP UP Academy

**91 वी घटनादुरुस्ती, 2003 :**

1) मंत्र्यांची संख्या लोकसभेच्या सदस्यसंख्येच्या 15% पेक्षा जास्त नको.

2) पक्षांतर बंदी कायद्यांतर्गत सदस्य म्हणून अपात्र ठरला तर तो मंत्री होण्यासाठी अपात्र ठरेल.

*(उपपंतप्रधान पदाची शपथ : न्यायालयाने वैध (valid) ठरवलेली आहे ती फक्त एक संज्ञा आहे. त्यामुळे त्यांना अधिक काही अधिकार प्राप्त होत नाही.)*

- **मंत्रीमंडळाची रचना :**

1) कॅबिनेट मंत्री (Cabinet Ministers)
2) राज्यमंत्री (Ministers of State)
3) उपमंत्री (Deputy Ministers)

- कॅबिनेट मंत्र्यांना मंत्रालयाचा स्वतंत्र कारभार दिला जातो.
- राज्यमंत्र्यांना मंत्रालय / विभागाचा स्वतंत्र कारभार दिला जातोच असे नाही. ते कॅबिनेट मंत्र्यांना सहाय्यक म्हणूनही नेमले जाऊ शकतात.
- उपमंत्र्यांना स्वतंत्र मंत्रालये / विभागाचा दर्जा दिला जात नाही.

  (संसदीय सचिव : असाही एक मंत्र्यांचा प्रकार आहे, परंतू तो सध्या अस्तित्वात नाही.)
- मंत्री कोणत्याही सभागृहामध्ये किंवा संयुक्त सभेमध्ये चर्चेसाठी भाग घेऊ शकतो. परंतु तो ज्या गृहाचा सदस्य आहे तेथेच मतदान करू शकतो.

- **मंत्र्याची जबाबदारी :**

1) वैयक्तिक तसेच सामुहीक जबाबदारी (Individual responsibility and Collective responsibility)
2) वैयक्तिकरित्या मंत्री हे राष्ट्रपतींना जबाबदार असतात.
3) मंत्रीमंडळ संयुक्तरित्या लोकसभेला जबाबदार (Collectively responsible to Loksabha) असते.

- **मंत्र्यांची सामुहिक जबाबदारी (Collective responsibility) :**

- मंत्रीमंडळ बैठकीत मतभेद असले तरी मंत्रीमंडळाने घेतलेला निर्णय सर्व मंत्र्यांवर बंधनकारक असतो. जर एखाद्या मंत्र्यास मंत्रिमंडळाचा निर्णय मान्य नसेल त्याने राजीनामा देणे अपेक्षित असते.
- उदा.: 1953 : हिंदू कोड बिलाबाबत पंडित नेहरूंशी झालेल्या मतभेदामुळे आंबेडकरांनी राजीनामा दिला होता.
- 1956 : राज्य पुनर्रचनेबाबत पंडित नेहरूंशी झालेल्या मतभेदामुळे सी. डी. देशमुख यांनी राजीनामा दिला होता.
- 1986 : अरिफ मोहम्मद खान यांनी मुस्लीम महिला (घटस्फोटानंतरच्या अधिकारांचे संरक्षण) कायदा, 1986 ला असलेल्या विरोधामुळे राजीनामा दिला होता.
- **मंत्र्यांवर कायदेशीर जबाबदारी नसते.**

- **कॅबिनेट समित्या :** दोन प्रकार :

- (कॅबीनेट हा शब्द कलम 352 मध्ये समाविष्ट केलेला आहे. परंतू कॅबिनेट म्हणजे कलम 75 अंतर्गत नियुक्त केलेले पंतप्रधान व कॅबिनेट दर्जाचे अन्य मंत्री असे नमूद केले आहे.)
- यांचा घटनेमध्ये उल्लेख नाही. परंतू संसदेच्या कामकाजाच्या नियमात यांची तरतूद केलेली आहे.

1) तदर्थ समिती (Adhoc) : तात्पुरती समिती
2) स्थायी समिती (Standing) : कायमस्वरुपी समिती

- यांची रचना गरजेनुसार बदलवली जाऊ शकते. साधारण सदस्यसंख्या 3 ते 8 असते.

- **सध्याच्या कॅबिनेट समित्या :**

- The Government of India's (transaction of business) Rules 1961 नुसार कॅबिनेट समित्यांची नेमणूक करण्याचे अधिकार पंतप्रधानांना आहेत.
- या समितीमधील सदस्य कॅबिनेट मंत्रीच असतात.
- याचे अध्यक्ष शक्यतो पंतप्रधान असतात.

1) नेमणूक कॅबिनेट समिती : अध्यक्ष - पंतप्रधान
- ही समिती केंद्रीय सचिवालय, सार्वजनिक उपक्रम, बँका आणि वित्त संस्था यामधील वरिष्ठांच्या नेमणुकीबाबत निर्णय घेते.

2) निवास कॅबिनेट समिती : अध्यक्ष - गृहमंत्री
3) संसदीय कामकाजावरील कॅबिनेट समिती : अध्यक्ष - गृहमंत्री
4) राजकीय कामकाजावरील कॅबिनेट समिती : अध्यक्ष - पंतप्रधान
- सर्वात महत्त्वाची समिती
- यास सुपर कॅबिनेट असेही म्हटले जाते.
- यात अंतर्गत व परराष्ट्रीध धोरणात्मक बाबी हाताळल्या जातात.

5) आर्थिक कामकाजावरील कॅबिनेट समिती : अध्यक्ष - पंतप्रधान
6) संरक्षणसंबंधी कॅबिनेट समिती : अध्यक्ष - पंतप्रधान

- जून 2019 मध्ये पंतप्रधानांनी पुढील कॅबिनेट समित्याची नियुक्ती केली.

  1) गुंतवणूक आणि वाढ (Investment and growth)

  2) रोजगार आणि कौशल्य विकास (Empbloyment and skill development)
- अगोदरच्या 6 आणि नवीन 2 अशा एकूण 8 कॅबिनेट कमिटी अस्तित्वात आहेत.

Dilip Sir's STEP UP Academy

# भारताचे महाधिवक्ता/महान्यायवादी (Attorney General of India)

**भारताचे महान्यायवादी (Attorney General of India)**

- घटनेतील कलम 76 मध्ये या पदाची तरतूद
- यांना देशाचे सर्वोच्च कायदा अधिकारी म्हणतात.
- यांची नेमणूक : राष्ट्रपती करतात.
- पात्रता : सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश होण्यासाठी लागणारी पात्रता
- म्हणजेच : 1) तो भारताचा नागरिक असावा आणि
  2) त्याने उच्च न्यायालयात किमान 5 वर्षे न्यायाधिश म्हणून काम केलेले असावे. किंवा
  त्याने उच्च न्यायालयात किमान 10 वर्षे वकिली केलेली असवी. किंवा
  राष्ट्रपतींच्या मते तो निष्णात कायदेपंडीत असवा.
- कार्यकाल : निश्चित नसून राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत (साधारणतः नवीन सरकार आले की राजीनामा देतात.)
- पदावरून दूर करण्याबाबत घटनेत कोणतीही तरतूद नाही.
- नियुक्ती : राष्ट्रपती करतात व तरीही सल्ला पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या निर्णयानेच - म्हणजे सरकार बदलले की महान्यायवादीही बदलतात.
- मानधन : राष्ट्रपती ठरवतात. (संसद नाही.)

- **अधिकार व कार्ये :**

- भारत शासनाचे मुख्य कायदा अधिकारी म्हणून
  - शासनास कायदाविषयक सल्ला देणे.
- कायदेविषयक जबाबदाऱ्या पार पाडणे.
  - घटनेने व कायद्याने दिलेली कर्तव्ये पार पाडणे.

- **राष्ट्रपतींनी दिलेली कर्तव्ये :**

- केंद्रशासनवादी अथवा प्रतिवादी असलेल्या प्रत्येक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात व उच्च न्यायालयात शासनाचा प्रतिनिधी म्हणून हजर राहणे.
- याशिवाय जेव्हा क्र. 143 नुसार एखाद्या विषयावर राष्ट्रपती जेव्हा सर्वोच्च न्यायालयाला सल्ला विचारतात तेव्हा ते भारतशासना तर्फे सर्वोच्च न्यायालयात उपस्थित असतात.

- **अधिकार :**

1. आपले कर्तव्य पार पाडत असताना देशातील सर्व न्यायालयात हजर राहण्याचा अधिकार
2. संसदेच्या कामकाजात किंवा सदस्य असलेल्या संसदीय समित्यांच्या कामकाजात बोलण्याचा व भाग घेण्याचा अधिकार परंतू त्यांना मतदानाचा अधिकार असत नाही.
3. संसद सदस्यास असणारे सर्व विशेष अधिकार व संरक्षण यांनाही असतात.

ते खाजगी प्रक्टीस करू शकतात परंतू शासनाविरूद्ध खटला लढू शकत नाही. कारण ते भारत शासनाचे सेवक नसतात. ते पूर्ण वेळ भारत सरकारचा सल्लागार नसतात.

- **भारताचे महान्याय अधिकर्ता (Solicitor General of India)**

- महाधिवक्ता यांच्याशिवाय भारत शासनाचे दोन कायदा अधिकारी असतात.
- नियुक्ती : राष्ट्रपती
  1. Solicitor General of India
  2. Additional Solicitor General of India
- महाधिवक्त्यांना मदत करतात.
- महाधिवक्ता : घटनात्मक पद आहे, तर वरील दोन पदे कायद्यानुसार निर्माण केलेली आहेत.

**✼ राज्याचे महाधिवक्ता (Advocate General)**

- राज्यघटनेतील कलम 165 मध्ये या पदाविषयी तरतूद.
- हे राज्यातील सर्वोच्च कायदा अधिकारी असतात.
- केंद्रीय स्तरावर जे स्थान महान्यायवाद्यांना आहे तेच स्थान यांना राज्यात असते.
- नेमणूक : राज्यपाल करतात.
- पात्रता : उच्च न्यायालयात न्यायाधीश नेमल्या जाण्याची योग्यता असलेल्या व्यक्तीला त्या घटकराज्याचा महाधिवक्ता म्हणून नेमले जाते. (म्हणजेच जो व्यक्ती भारताचा नागरीक असून त्याने न्यायिक पदावर 10 वर्षे काम केले पाहिजे किंवा उच्च न्यायालयात 10 वर्षे वकिली केली पाहिजे.)
- कार्यकाल : घटनेत निश्चित कार्यकालाबाबत तरतूद नाही म्हणजेच राज्यपालांच्या मर्जीवर तो पदावर कार्यवर असतो.
- शक्यतो सरकार बदलले की हे राजीनामा देतात.
- वेतन : राज्यपाल ठरवतात. (विधीमंडळ नाही.)

Dilip Sir's STEP UP Academy

● कार्ये :

– राज्याचे मुख्य कायदा अधिकारी म्हणून पुढील कार्ये करतातः

i) आवश्यक असेल तेव्हा राज्य सरकारला कायदेशीर सल्ला देणे.

ii) राज्य शासनाच्या वतीने न्यायालयात ते बाजू मांडतात.

iii) विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात आणि विधीमंडळ समितीचा सदस्य असलेल्या समितीच्या बैठकीत बाजू मांडण्याचा अधिकार त्यांना आहे मात्र मतदानाचा अधिकार त्यांना नसतो.

– राज्य विधीमंडळातील सदस्यांना असणारे सर्व विशेषाधिकार व संरक्षण त्यांना असते.

**⁕ महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग या घटकाविषयी निवडणुका या प्रकरणात माहिती दिलेली आहे.**

**⁕ लोकपाल या घटकाविषयी माहिती प्रशासकीय कायदा या प्रकरणामध्ये दिलेली आहे.**

⁕⁕⁕

Dilip Sir's STEP UP Academy

# भारताचे नियंत्रक व महालेखापाल (Comptroller and Auditor General of India)

**भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक**

- **पार्श्वभूमी :**

- 1857 : सामान्य लेखा विभागाची स्थापना
- 1860 : भारताचे महालेखापाल पद निर्माण
- 1865 : त्यांनाच महानियंत्रक असे संबोधू लागले.
- 1884 : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक असे नाव
- 1919 चा कायदा : वैधानिक तसेच स्वतंत्र दर्जा
- 1950 : घटनेने जुनेच नाव कायम ठेवले.

※ **घटनात्मक तरतुदी :**

- **कलम 148 :** कॅगचे स्वतंत्र कार्यालय
- **कलम 149 :** कॅगचे कर्तव्य व अधिकार ठरविण्याचा संसदेला अधिकार
- **कलम 150 :** केंद्र व राज्य यांचे लेखे ठेवण्या संबंधीचे नमुने तयार करण्यास राष्ट्रपतींना सल्ला
- **कलम 151 :** लेखा अहवाल :

- कॅग ही घटनात्मक यंत्रणा आहे.

- यामुळे वित्तीय प्रशासनामध्ये संसदीय जबाबदारीपणा, संघराज्यीय पर्यवेक्षण आणि खर्चावरील तज्ञांचे प्रशासकीय नियंत्रण इ. हमी मिळते.
- टी. टी. कृष्णम्माचारी (घटना समिती सदस्य) यांनी महालेखापरिक्षक या नावामागे 'नियंत्रक' शब्द जोडण्याचे सुचवले होते.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते 'कॅगचे पद आणि कार्यालय हे भारतीय राज्यघटनेतील सर्वात महत्त्वाचे पद आहे.

※ **भारताचे नियंत्रक व महालेखापाल (Comptroller and Auditor General of India)**

- कलम 148 : सार्वजनिक निधीचा रक्षणकर्ता : केंद्र व राज्य
- वित्तीय प्रशासनात घटनात्मक व कायदेशीर व्यवहारांची हमी देणे, हे त्यांचे प्रमुख कार्य आहे.
- नियुक्ती : राष्ट्रपती
- वेतन संसद ठरवते.
- अहवाल : राष्ट्रपतींकडेच देतात.
- पात्रता : वयाच्या 65 वर्षांपर्यंत / 6 वर्षे कार्यकाल
- राजीनामा : राष्ट्रपतींकडे
- बडतर्फी : राष्ट्रपतींद्वारे (सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांप्रमाणे व त्याच आधारावर)
  (आधार : सिद्ध गैरवर्तणूक व अकार्यक्षमता हे घटनेत नमूद केलेले आहे.)

※ **स्वतंत्रता :**

1) पदच्यूत करण्याची स्वतंत्र पद्धती (कार्यकालाची हमी)
2) कार्यकाल संपल्यावर केंद्र किंवा राज्य शासनात कोणत्याही पदावर काम करू शकत नाही.
3) वेतन व भत्ता (संसद ठरवते) (नेमणूकीनंतर मात्र त्यांचे नुकसान होईल असे बदलता येणार नाही)
   वेतन : सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांइतके
4) CAG यांचे प्रशासकीय अधिकार व भारतीय लेखा हा लेखापरीक्षण विभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्ती राष्ट्रपती CAG यांच्याशी सल्लामसलतीनंतर ठरवतात.
5) या कार्यालयाच्या संपूर्ण खर्चाचा भार संचित निधीवर असतो.

※ **कार्ये व अधिकार :**

- घटनेतील कलम 149 नुसार संसद CAG यांचे केंद्र व राज्य यांच्या लेखाविषयी कार्य ठरवते.
- यासाठी संसदेने महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) कायदा, 1971 (CAG's Duties, Power and Condition of Service act, 1971) हा कायदा संमत केला. परंतु 1976 मध्ये लेखा व लेखापरिक्षणात वेगळे करण्यासाठी यात सुधारणा करण्यात आली.
- याचबरोबर CAG पुढील आधारांवरही लेखा परीक्षण करू शकते.

1) न्यायालयीन निर्णय
2) भारत सरकारच्या सूचना
3) Regulation on Audit and Account, 2007

- **घटनेनुसार व संसदेने ठरवलेली CAG ची कार्ये**

1) केंद्र व राज्य यांच्या शासनाद्वारे करण्यात आलेल्या खर्चाची लेखातपासणी करणे.
2) राष्ट्रपती / राज्यपाल यांनी विचारलेल्या कोणत्याही अधिसत्तेच्या खर्चाची लेखातपासणी करणे.
3) क. 150 नुसार केंद्र व घटकराज्य शासन यांच्या लेखांचे नमुने (Form) राष्ट्रपती CAG च्या सल्ल्यानुसार स्पष्ट करतात.

Dilip Sir's STEP UP Academy

4) क 151 नुसार CAG आपला लेखापरीक्षण अहवाल राष्ट्रपती व राज्यपाल यांना सादर करतात व ते तो अहवाल संसदेसमोर सादर करतात.
5) CAG हे राज्यशासनाच्या लेखांचे संकलन करतात. (1976 नंतर केंद्राच्या या जबाबदारीतून त्यांना मुक्त करण्यात आले आहे.)
- 1976 मध्ये CAG यांचे लेखा व लेखापरीक्षण कार्य स्वतंत्र केले गेले. त्यानंतर CAG यांची केंद्र शासनाच्या लेखांची नोंद करण्यापासून मुक्तता करण्यात आली व त्यांच्याकडे केंद्रशासनाच्या लेखांचे परीक्षण करणे इतकेच कार्य देण्यात आले.
- परंतु राज्यांमध्ये वरील दोनही कार्य अजूनही कॅग यांच्याकडेच आहे.
- कॅग हे राष्ट्रपतींना तीन लेखापरीक्षण अहवाल सादर करतात.

1) विनियोजनाचा लेखापरीक्षण अहवाल (Audit report on appropriation accounts) :
- यात संसदेने विनियोजन विधेयकाद्वारे संमत केलेला खर्च व प्रत्यक्ष खर्च असतो.

2) वित्तीय लेखापरीक्षण अहवाल (Audit report on finance accounts) :
- यात केंद्र सरकारची वार्षिक जमा व खर्च असतो.

3) सार्वजनिक उपक्रमांचा लेखापरीक्षण अहवाल (Audit report on public undertakings) :
- राष्ट्रपती हे अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडतात. त्यानंतर सार्वजनिक लेखा समिती (PAC) त्याचे परीक्षण करते व त्याचे निष्कर्ष राष्ट्रपतींना कळवते.
- CAG - Indian Audit and Accouns Department चे प्रमुख अधिकारी असतात, असे असले तरी त्यांच्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे स्वातंत्र्य त्यांना नसते. अशा नियुक्त्या केंद्र सरकारद्वारेच केल्या जातात.

### ※ CAG यांची भूमिका :

- राष्ट्रपतींकडे सादर केलेला अहवाल : संसदेत : लोकलेखा समितीकडे
- CAG लोकलेखा समितीला त्यांच्या कार्यात मदत करतात : मार्गदर्शक, तत्वज्ञ व मित्र
- CAG च्या अहवालानुसार संसदेचे कार्यकारींवरील आर्थिक नियंत्रण ठेवले जाते.
- CAG हे संसदेचे हस्तक म्हणून संसदेच्या वतीने लेखापरीक्षणाचे कार्य करतात.
- CAG फक्त संसदेला जबाबदार असतात. (राष्ट्रपतींना नाही)
- लेखांमध्ये दाखवण्यात आलेला निधी हा कायदेशीररित्या उपलब्ध होतो व तो ज्या कारणासाठी किंवा उद्देशांसाठी मंजूर केला जातो त्याच कारणासाठी खर्च केला आहे का व ज्या अधिसत्तेमार्फत खर्च करायला हवा त्यांनीच केला आहे का याची खातरजमा CAG करतात. यालाच CAG चे Legal and Regulatory Audit म्हणतात व हे कार्य CAG यांवर बंधनकारक असते.
- तसेच प्रशासकीय विभागांनी आपला पैसा अक्कलहुशारीने खर्च केला आहे का याची खातरजमा करणे यास CAG चे Propriety Audit असे म्हणतात व हे ऐच्छिक असते.
- गुप्तसेवाच्या खर्चावरील लेखापरीक्षणाबाबत CAG यांच्यावर बंधने आहेत. CAG या खर्चाची तपशिलवार माहिती विचारू शकत नाही. याबाबत त्या शाखेच्या प्रमुखांनी दिलेली माहितीच पुरेशी मानावी लागते.
- CAG यांच्या नावात नियंत्रक हा शब्द आहे, परंतु खर्च करण्यासाठी त्यांच्या परवानगीची आवश्यकता नसते. त्यामुळे नियंत्रक या शब्दाला काही अर्थ उरत नाही.
- ब्रिटनमध्ये मात्र CAG हे नियंत्रक व लेखापरिक्षक दोनही कामे करतात.

### ※ सार्वजनिक निगमांबाबत कॅगचे अधिकार :

1) काही निगमांबाबत कॅग यांना लेखापरीक्षणाचे प्रत्यक्ष आणि पूर्ण अधिकार असतात.
उदा. दामोदर खोरे निगम, तेल आणि नैसर्गिक गॅस आयोग (ONGC), एअर इंडिया, इंडियन एअरलाईन्स इ.
2) काही निगमांबाबत केंद्र सरकार कॅगचा सल्ला घेऊन लेखा परीक्षणासाठी खाजगी व्यावसायिक नेमतात. गरज असल्यास महालेखापरीक्षक पूरक लेखापरीक्षण करू शकतात.
उदा. केंद्रीय गोदाम निगम, औद्योगिक वित्त निगम
3) काही निगमांचे लेखा परीक्षण हे पूर्णतः खाजगी लेखापरीक्षकांकडून केले जाते. ते वार्षिक अहवाल थेट संसदेला सादर करतात.
- उदा. भारतीय जीवन विमा निगम (LIC), भारतीय रिझर्व्ह बँक (RBI), भारतीय स्टेट बँक (SBI), भारतीय खाद्य निगम (FCI) आणि इतर
- सरकारी कंपन्यांच्या लेखापरीक्षणाबाबतही कॅग यांची भूमिका मर्यादित आहे. त्यांचे लेखा परीक्षण सरकारने व महालेखापरीक्षकाच्या सल्ल्याने नियुक्त केलेले खाजगी लेखापरीक्षक करतात. अशा कंपन्यांमध्ये कॅग हे पूरक लेखापरीक्षण करू शकतात.

Dilip Sir's STEP UP Academy

**※ लेखा परीक्षण मंडळ**

- स्थापना वर्ष : 1968
- शिफारस : पहिला प्रशासकीय सुधारणा आयोग
- सदस्य : 1 अध्यक्ष + 2 सदस्य
- नियुक्ती : कॅग
- कार्य : अभियांत्रिकी, लोह व पोलाद, रसायने इ. विशेष उपक्रमांच्या तांत्रिक बाबींचे परीक्षण करणे.
  (नेमलेले व्यक्ती वरील विषयात तज्ञ असतील).

**※ लेखा व लेखापरीक्षण ही वेगळी कार्यक्षेत्रे :**

- इ. स. 1976 पर्यंत लेखा व लेखापरीक्षण भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली होते. म्हणजेच लेखा खात्यांवरील व्यवहार एकत्र करुन त्यांची नोंद ठेवणे व त्यांचे परीक्षण करणे ही दोन्ही कार्य तोच करीत असे.
- लेखा व लेखापरीक्षण विभक्त करावे अशी शिफारस इंचकॅप समिती (1923), मुडीमन समिती (1924), सायमन आयोग (1929) सार्वजनिक लेखा समिती व अंदाज समितीने केली.

**महालेखा नियंत्रक (Controller General of Accounts)**

- 1976 मध्ये वित्त मंत्रालयाच्या खर्च विभागामध्ये महालेखा नियंत्रक हे नवे पद निर्माण करण्यात आले. तो केंद्र सरकारच्या लेखा कार्याच्या विभागीकरणसंदर्भातील सर्व बाबींचे प्रशासन करतो. तो केंद्र सरकारच्या नव्या लेखा विभागाचा तांत्रिक अधिकारी आहे.

- **कार्ये :**

1) तो केंद्र व राज्य सरकारांच्या लेखाशास्त्राची तत्त्वे व स्वरुप मांडतो व त्यासंबंधीचे नियम व नियमपुस्तिका बनवितो.
2) तो केंद्र सरकारसाठी अर्थसंकल्पीय नियंत्रण, प्राप्ती संकलन प्रदान, लेखांकन पार पाडणे ही कार्ये पार पाडतो.
3) तो वित्तमंत्र्यांना व इतर कार्यकारी मंत्र्यांना सरकारच्या वित्त परिस्थितीबाबत नियमितपणे पुनः प्रदाय (Feedback) देतो.
4) तो सर्व नागरी मंत्रालयांना व विभागांना विविध लेखाशास्त्रांबाबत तांत्रिक सल्ला देतो. तो सल्ला त्यांच्यावर बंधनकारक असतो.
5) सर्व नागरी मंत्रालयातून निवृत्त होणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन देणे व त्यांचे हिशेब ठेवणे ही त्याची जबाबदारी आहे.
6) आर्थिक अनियमितता शोधून काढण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांनी व विभागांनी केलेल्या खर्चाचे अंतर्गत लेखापरीक्षण करणे.
7) केंद्र सरकारच्या विविध सार्वजनिक क्षेत्रांतील उपक्रमातील निर्गुंतवणूक व भांडवली पुनर्रचना या बाबतच्या प्रस्तावांचे विश्लेषण व मुल्यमापन करणे. हे कार्य 1989 पासून त्याच्याकडे सोपविण्यात आले आहे.
8) तो भारतीय नागरी लेखा सेवेतील संवर्गाचे व नागरी मंत्रालयातील सर्व लेखा कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन पाहतो आणि त्यांच्या संबंधीच्या सर्व कार्मिक व्यवस्थापनाचे सर्व पैलू हाताळतो.
9) तो केंद्र सरकारच्या मासिक व वार्षिक लेख्यांचे एकत्रीकरण करतो.
10) तो केंद्र सरकारचे विनियोजन लेखा व वित्तीय लेखा व वित्तीय लेखा यांचे संक्षिप्त रुप तयार करतो. राष्ट्रपती हे भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षणानंतर संसदेसमोर सादर करतो.

***

# आणीबाणी (Emergency)

**भाग 18, कलम 352 ते 360**

- कोणतीही असामान्य परिस्थिती उद्‌भवल्यास केंद्र सरकार आणीबाणीविषयक अधिकार वापरू शकते.
- आणीबाणीबाबतचे सर्व अधिकार केंद्र सरकारकडे असतात.

※ 'सामान्य परिस्थितीत संघराज्यीय प्रणाली असलेली व्यवस्था आणीबाणीच्या काळात एकात्मिक प्रणाली बनते'.
– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**※ प्रकार :**

1) राष्ट्रीय आणीबाणी (National emergency) (कलम 352) : युद्ध, परकीय आक्रमण (External aggression) आणि सशस्त्र उठाव (Armed rebellion) या कारणांमुळे ही आणीबाणी घोषित केली जाते.
(44 व्या घटनादुरुस्तीने 'अंतर्गत अशांतता' या शब्दांच्या ऐवजी 'सशस्त्र उठाव' हे शब्द टाकले आहेत).
2) राष्ट्रपती राजवट (President's Rule) (कलम 356) : जर घटकराज्यांमध्ये घटनात्मक यंत्रणा कोलमडली तर ही आणीबाणी लावली जाते.
यास 'राज्यातील आणीबाणी' (Financial emergency) किंवा 'घटनात्मक आणीबाणी' म्हटले जाते.
3) आर्थिक आणीबाणी (कलम 360) : भारताच्या आर्थिक स्थैर्यास धोका उत्पन्न झाल्यास ही आणीबाणी लावली जाते.

**※ राष्ट्रीय आणीबाणी (कलम 352) :**

- युद्ध, परकीय आक्रमण, सशस्त्र उठाव किंवा अशी शक्यता या कारणांवरून राष्ट्रपती आणीबाणी घोषित करू शकतात.
- राष्ट्रपतींनी यापूर्वी आणीबाणी घोषित केली असली तरीही ते दुसऱ्या कारणासाठी आणीबाणीची घोषणा करू शकतात. (38 वी घटनादुरुस्ती, 1975)
- बाह्य आणीबाणी : युद्ध किंवा परकीय आक्रमण यामुळे
- अंतर्गत आणीबाणी : सशस्त्र उठाव यामुळे
राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा संपूर्ण देशासाठी किंवा देशातील काही भागासाठी लावली जाऊ शकते.
(42 वी घटनादुरुस्ती : देशातील काही भागासाठी आणीबाणी लावण्याचे अधिकार राष्ट्रपतींना मिळाले).

44 व्या घटनादुरुस्तीने : राष्ट्रीय आणीबाणी लावण्यासाठी कॅबिनेट मंत्र्यांनी लेखी मागणी केल्यासच राष्ट्रपती आणीबाणी लावतील म्हणजे फक्त पंतप्रधान नव्हे तर मंत्रीमंडळाचा सल्ला देखील विचारात घ्यावा लागतो.
फक्त कलम 352 मध्ये : कॅबीनेट या शब्दाचा उल्लेख यानुसार कॅबीनेट म्हणजे – पंतप्रधान आणि कॅबीनेटचा दर्जा असलेले इतर मंत्री.

- सर्वोच्च न्यायालयाने मिनर्व्हा मिल केस (1980) च्या निकालात नमूद केले आहे की अप्रामाणिकपणा किंवा अवास्तव आणि दुष्ट हेतू इ. कारणावरून आणीबाणीस न्यायालयात आव्हान देण्यात येऊ शकते.
- राष्ट्रीय आणीबाणी घोषित झाल्यापासून 1 महिन्याच्या आत दोन्ही सभागृहांनी विशेष बहुमताने मान्यता दिली पाहिजे.
- परंतु लोकसभा विसर्जित असेल तर राज्यसभेची मान्यता घेऊन, नवीन लोकसभा सुरू झाल्यापासून पहिल्या महिन्याच्या आत मान्यता घ्यावी लागते.
- संसदेच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यास पुढील 6 महिने आणीबाणी सुरू राहते, त्यानंतर दर 6 महिन्यांनी पुन्हा संसदेची मान्यता मिळवून आणीबाणी अनिश्चित काळासाठी सुरू राहू शकते.
- आणीबाणी सुरू ठेवण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांचे विशेष बहुमत आवश्यक असेल.

1) सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येचे बहुमत आणि
2) सभागृहात उपस्थित आणि मतदान करणाऱ्या किमान 2/3 सदस्यांचे बहुमत. (Special majority)

**※ 44 वी घटनादुरूस्ती :**

- अगोदर आणीबाणी घोषित झाल्यापासून 2 महिन्याच्या आत संसदेची परवानगी आवश्यक होती ती बदलून 1 महिना केली आहे.
- अगोदर एकदा लावलेली आणीबाणी अनिश्चित काळासाठी लावली जात होती. परंतु या घटनादुरूस्तीने यामध्ये वेळोवेळी संसदेची मान्यता घेण्याची तरतूद केली.
- अगोदर संसदेच्या मान्यतेचे साधे बहुमत आवश्यक होते ते बदलून या घटनादुरुस्तीने विशेष बहुमताची तरतूद केली.

Dilip Sir's STEP UP Academy

- **आणीबाणी रद्द करणे/माघारी घेणे :**

1) राष्ट्रपती घाषणेद्वारे : संसदेच्या मान्यतेची आवश्यकता नाही.
2) आणीबाणी ठराव लोकसभेने संमत केला नाही तर आणीबाणी रद्द करावी लागते (44 वी घटनादुरुस्ती)
(म्हणजेच लोकसभेने आणीबाणी ठराव अमान्य केला असे समजले जाते - येथे साध्या बहुमताची तरतूद आहे)

- येथे राज्यसभेची भूमिका नाही.

- **आणीबाणीची घोषणा रद्द करण्याबाबत :**

- लोकसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या 1/10 सदस्यांनी लोकसभा अध्यक्षांना (सभागृहाचे अधिवेशन सुरू असताना राष्ट्रपतींना) असे निवेदन दिल्यास लोकसभेची विशेष बैठक 14 दिवसात बोलावली जाते (44 वी घटनादुरुस्ती)

- **राष्ट्रीय आणीबाणीचे परिणाम :**

1) केंद्र-राज्य संबंधावर होणारे परिणाम :
– केंद्र सरकार राज्यातील कार्यकारींना अधिकार वापराबाबत सांगू शकतात.
– या काळात केंद्र सरकार राज्याच्या कोणत्याही विषावर कायदे करू शकते. (राज्य सरकार आस्तीत्वात असेल तरीही)

- संसदेचे अधिवेशन सुरू नसल्यास राष्ट्रपती राज्य विषयावर अधिसूचना काढू शकतात.
- असे केलेले कायदे राष्ट्रीय आणीबाणी संपल्यानंतर सहा महिन्यांनी लोप पावतात.
(संसदेने बदलवलेले राज्यांचे कार्यकारी व कायदेविषयक अधिकार ज्या क्षेत्रात आणीबाणी लागू नसेल तेथेही परिणामात्मक ठरतात.)
- केंद्र आणि राज्यातील कर विभागणी (Tax distribution) बदलू शकते. (अशी कर विभागणी आणीबाणी संपल्यानंतर आर्थिक वर्ष संपेपर्यंत लागू असते.)
- राष्ट्रपतींचे असे सर्व आदेश संसदेसमोर मांडले जातात.
- लोकसभा आणि विधानसभेचा कार्यकाल एका वर्षाने वाढवता येतो आणि असा तो कितीही वेळा वाढवता येतो. परंतु आणीबाणी माघारी घेतल्यानंतर हा कालावधी सहा महिन्यापेक्षा जास्त नसेल.

- **आणीबाणीचे मूलभूत हक्कांवर होणारे परिणाम :**

- कलम 358 आणि 359
- कलम 358 : हे कलम 19 मधील नमूद हक्क हे आपोआप निलंबित होतात. त्यांच्या निलंबनासाठी वेगळा आदेश काढण्याची गरज नसते. म्हणजेच आणीबाणी काळात कलम 19 शी विसंगत कायदा करण्याचा अधिकार संसदेस मिळतो. तसेच कार्यकारी मंडळसुद्धा अशा प्रकारचा आदेश काढू शकतात.
- आणीबाणी संपुष्टात आल्यानंतर कलम 19 आपोआप पुनर्जीवित होते. म्हणजेच त्याच्याशी विसंगत कायदे आपोआप रद्द ठरतात.

**※ कलम 358 ची व्याप्ती सीमित करणारे मुद्दे :**

1) युद्ध किंवा परकीय आक्रमण या कारणांसाठी राष्ट्रीय आणीबाणी घोषित झाली तरच कलम 19 निलंबीत होते. अंतर्गत आणीबाणी मध्ये नाही.
2) फक्त आणीबाणी संबंधीत कायद्यांना आव्हान देण्यापासून सूट, इतर कायद्यांना आव्हान देता येते.
वरील दोन्ही मुद्दे 44 व्या घटनादुरुस्ती 1978 ने समाविष्ट केलेली आहे.

- **कलम 359 : नुसार इतर मूलभूत अधिकारांचे निलंबन**

- यानुसार राष्ट्रपती आपल्या आदेशात नमूद मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणी निलंबित करू शकतात.
- हे निलंबीत अधिकार विशिष्ट प्रदेशासाठी किंवा संपूर्ण प्रदेशासाठी लागू ठरतात.
- 359 नुसार मूलभूत हक्क निलंबित होत नसून त्यांची अंमलबजावणी निलंबित होते.
- आणीबाणीचा आदेश रद्द झाला की या अधिकारांवरील निलंबन रद्द ठरते.

- **कलम 359 ची व्याप्ती सीमित करणारे मुद्दे :**

1) राष्ट्रपती कलम 20 व कलम 21 या कलमांची अंमलबजावणी -साठी न्यायालयात जाण्याचा हक्क स्थगिती देऊ शकत नाही.

- कलम 20 : गुन्ह्याबद्दल दोषी ठरविण्यासंदर्भातील संरक्षण
- कलम 21 : जीविताचा आणि व्यक्तीस्वातंत्र्याचा हक्क

2) आणीबाणी संबंधीत कायद्यांनाच न्यायालयात आव्हान देता येणार नाही. इतर कायद्यांना न्यायालयात आव्हान देता येईल.

- वरील दोन्ही मुद्दे 44 व्या घटनादुरुस्ती 1978 ने समाविष्ट केलेली आहे.

- **कलम 358 आणि कलम 359 मधील फरक :**

1) कलम 358 हे फक्त कलम 19 पुरतेच मर्यादित मात्र कलम 359 हे सर्व मूलभूत अधिकारांशी संबंधीत.
2) कलम 358 नुसार आणीबाणी घोषित झाल्यावर कलम 19 मधील मूलभूत अधिकार आपोआप निलंबित होतात परंतु 359 नुसार असे होत नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

3) फक्त बाह्य आणीबाणीमध्ये कलम 358 लागू होते. आणि कलम 359 हे बाह्य तसेच अंतर्गत आणीबाणी मध्ये लागू होते.

4) कलम 358 नुसार कलम 19 मधील मूलभूत अधिकार आणीबाणीच्या पूर्ण कालावधीसाठी निलंबीत होतात. तर कलम 359 नुसार निलंबीत होणारे मूलभूत अधिकार आणीबाणीच्या संपूर्ण किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी निलंबीत होतात.

5) कलम 358 संपूर्ण देशभर लागू होते तर कलम 359 हे संपूर्ण देशभर किंवा काही विशिष्ट प्रदेशासाठी लागू ठरते.

- **आतापर्यंतच्या राष्ट्रीय आणीबाणी :**

1) 1962 साली (परकीय आक्रमण) : समाप्ती 1968 साली
2) 1971 साली (परकीय आक्रमण) : समाप्ती 1977 साली
3) 1975 साली (अंतर्गत अशांतता) : समाप्ती 1977 साली

## राज्यातील राष्ट्रपती राजवट (Presidents Rule in the State)

(राष्ट्रपती राजवट/राज्य आणीबाणी/घटनात्मक आणीबाणी)

- **आधार :**

1) कलम 356 : राज्यातील घटनात्मक यंत्रणा बंद पडल्यास असा अहवाल राज्यापाल देतील किंवा नाही दिला तरी राष्ट्रपती त्याराज्यात राष्ट्रपती राजवटीची घोषणा करू शकतात.

2) कलम 365 : केंद्राच्या निर्देशांचे पालन न केल्यास घटनेतील तरतुदीनुसार राज्य सरकार काम करू शकत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. असा निष्कर्ष राष्ट्रपती काढतील.

- राष्ट्रपतींनी याबाबत केलेली घोषणा ही दोन महिन्यांच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहांनी साध्या बहुमताने मंजूर करणे आवश्यक असते.
- घोषणेचा अंमल 6 महिन्यांपर्यंत असतो व तो प्रत्येक वेळी 6 महिने वाढवता येऊ शकतो परंतु एकूण कालावधी 3 वर्षांपेक्षा जास्त नसेल. परंतु जर घोषणेचा कालावधी 1 वर्ष झाल्यास आणि त्याही पुढे राष्ट्रपती राजवट सुरू ठेवायची असल्यास पुढील दोन गोष्टी विचारात घेतल्या जातात. (44 वी घटनादुरुस्ती)

अ) त्यावेळी संपूर्ण भारतात / राज्यात / राज्यातील एखाद्या भागात राष्ट्रीय आणीबाणीचा अंमल सुरू असेल.

ब) निवडणूक आयोगाने असा अहवाल दिला की या राज्यात निवडणुका घेण्यायोग्य स्थिती नाही.

- वरील परिस्थितीतच राष्ट्रपती राजवट 1 वर्षापेक्षा अधिक काळासाठी लागू राहते.
- राष्ट्रपती राजवट समाप्तीसाठी संसदेची मान्यतेची गरज नसते. राष्ट्रपती राजवटीची समाप्ती राष्ट्रपतींच्या घोषणेद्वारे करण्यात येते.

- **परिणाम :**

1) राष्ट्रपती राज्य शासनाची सर्व / काही कार्ये तसेच राज्यशासनाच्या संस्था आणि प्राधिकरणे यांचे सर्व किंवा काही अधिकार स्वतःकडे घेऊ शकतात.

2) राज्यविधीमंडळाचे अधिकार संसदेकडून वापरले जाण्याबाबत राष्ट्रपती घोषणा करतील.

3) उच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य या दरम्यान अबाधित असेल.

4) या दरम्यान मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रीमंडळ बरखास्त होऊन राज्यपाल राष्ट्रपतींच्या सल्ल्याने काम करतात. म्हणून यास राष्ट्रपती राजवट म्हणतात. (राष्ट्रपती विधानसभेचे विसर्जन किंवा निलंबन करू शकतात.)

- **इतर अधिकार :**

- राज्य विधानसभेच्या निलंबन किंवा विसर्जनानंतर राज्य विधेयके आणि अर्थसंकल्प संसदेमार्फत संमत केले जातात.

- **असे केले तर :**

- संसद आपले राज्यविषयक कायदे करण्याचे अधिकार - राष्ट्रपतींना देते तसेच राष्ट्रपती हे अधिकार पुढे काही प्राधिकाऱ्यांना देऊ शकतात.
- राज्याच्या संचित निधीच्या खर्चास लोकसभा मान्यता देते तर लोकसभा अधिवेशन सुरू नसल्यास राष्ट्रपती संमती देतात.
- संसदेचे अधिवेशन सुरू नसल्यास राष्ट्रपती अध्यादेश काढू शकतात.
- राष्ट्रपतींनी / संसदेने / प्राधिकाऱ्यांनी या दरम्यान केलेला कायदा राष्ट्रपती राजवट संपल्यानंतर सुद्धा लागू राहतो आणि तो बदल तसेच रद्द करण्याचा अधिकार राज्य विधीमंडळाचा असेल.
- डॉ. आंबेडकर : कलम 356 चा वापर शेवटचा पर्याय म्हणून करावा.

- **राष्ट्रपती राजवटीचे न्यायिक पुनर्विलोकन :**

38 वी घटनादुरुस्ती : न्यायिक पुनर्विलोकनांतर्गत येत नाही. (राष्ट्रपतींची खात्री पटणे हे अंतिम व निर्णायक असेल.)

44 वी घटनादुरुस्ती : वरील तरतूद रद्द केली.

### ❊ एस. आर. बोम्मई खटला (1994) :

**सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल :**

1) राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या घोषणेचे न्यायिक पुनर्विलोकन केले जाऊ शकते.

Dilip Sir's STEP UP Academy

2) राष्ट्रपतींची खात्री पटणे हे संबंधित घटना व माहितीवर आधारित असावे, असे नसल्यास न्यायालय अशी कृती अवैध (Invalid) ठरेल.
3) राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यायोग्य परिस्थिती होती/आहे हे केंद्र सरकार सिद्ध करेल.
4) न्यायालय घटना/माहितीची सत्यता पडताळून पाहणार नाही. परंतु ती कृतीशी संबंधित आहे/नाही हे बघू शकते.
5) न्यायालयाने याबाबत सरकारची कृती अवैध ठरवली तर मंत्रीमंडळ तसेच विधानसभा पुनर्जिवित होते.
6) संसदेने मान्यता देईपर्यंत विधानसभा फक्त निलंबित करता येईल मात्र विसर्जित करता येणार नाही.
7) धर्मनिरपेक्ष हे घटनेचे मूलभूत वैशिष्ट्य आहे, त्यामुळे धर्मनिरपेक्षतेविरुद्ध धोरणे राबवणारे सरकार कलम 356 नुसार राष्ट्रपती राजवटीस पात्र ठरेल.

- यानुसार 1992 साली मध्यप्रदेश, हिमाचलप्रदेश, राजस्थान या तीन राज्यांमध्ये लादली गेलेली राष्ट्रपती राजवट सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवली होती.

8) राज्य सरकारला बहुमत आहे की नाही याबाबतचा प्रश्न राज्याच्या विधिमंडळातच निकाली काढावा, तोपर्यंत मंत्रीमंडळ बरखास्त करू शकत नाही.
9) केंद सरकारमध्ये नवीन राजकीय पक्ष सत्तेवर आला याचा अर्थ असा घेऊ नये की राज्यातील इतर पक्षांच्या सरकारांनी बहुमत गमावले आहे.

- अंतर्गत आणीबाणी रद्द झाल्यावर 1977 साठी लोकसभेमध्ये जनता पक्षाचे सरकार बहुमतात आले. तेव्हा त्यांनी जेथे जेथे काँग्रेस पक्ष सत्तेत होता तेथील सर्व राज्यसरकारे (एकूण : 9) बरखास्त केली. 1980 च्या निवडणूकीमध्ये पुन्हा काँग्रेस पक्षाचे बहुमत सिद्ध झाले आणि यांनीही वरील कारणासाठीच 9 राज्यसरकारे बरखास्त केली.
- जनता सरकारने बरखास्त केलेली राज्यसरकारे : RJ, UP, MP, PB, BR, HP, OD, WB, HR
- काँग्रेस सरकारने बरखास्त केलेली राज्यसरकारे : RJ, UP, MP, PB, BR, OD, MH, GJ, TN.

10) राष्ट्रपतींना देण्यात आलेला कलम 356 अंतर्गतचा अधिकार हा असामान्य अधिकार आहे म्हणून त्याचा योग्य वापर व्हावा.

**※ राष्ट्रपती राजवटीचा इतिहास :**

- सर्वात पहिल्यांदा राष्ट्रपती राजवट लागू झालेले राज्य : पंजाब (1951)
- 10 वेळा : मणीपूर
- 9 वेळा : उत्तरप्रदेश
- 8 वेळा : पंजाब, बिहार
- 7 वेळा : जम्मू आणि काश्मिर
- 6 वेळा : ओडिशा, कर्नाटक, पाँडेचेरी (कें. प्र.)
- 5 वेळा : गोवा, गुजरात, केरळ
- 4 वेळा : तामिळनाडू, राजस्थान, नागालँड, आसाम
- 3 वेळा : आंध्रप्रदेश, हरियाणा, झारखंड, मध्यप्रदेश, मिझोरम, त्रिपुरा, महाराष्ट्र (1980, 2014, 2019)
- 2 वेळा : अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश, मेघालय, सिक्किम, उत्तराखंड
- 1 वेळा : दिल्ली (2014)
- एकदाही नाही : तेलंगणा, छत्तीसगड

**वित्तीय आणीबाणी : कलम 360**

- संपूर्ण भारत / विशिष्ट प्रदेशातील आर्थिक स्थैर्य धोक्यात आले तर राष्ट्रपती अशी घोषणा करतील.
- (न्यायिक पुनर्विलोकनाच्या कक्षेत असेल.)
- घोषणेनंतर दोन महिन्यांच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहाची साध्या बहुमताने मंजूरी आवश्यक.
- अंमल किती दिवस असावा हा कालावधी नमूद नाही.
- अंमल सुरू ठेवण्यासाठी पुन्हा मंजूरीची गरज नाही.
- समाप्तीसाठी : राष्ट्रपतींची घोषणा पुरेशी आहे. (संसदेच्या मान्यतेची आवश्यकता नसेल)

**आणीबाणी तरतुदविषयक प्रतिक्रिया**

1) के. टी. शाह : प्रतिगामी व ऱ्हास करणारे प्रकरण.
2) टी. टी. कृष्णम्माचारी : याद्वारे राष्ट्रपती व कार्यकारी मंडळ एक प्रकारची घटनात्मक हुकुमशाही आणतील.
3) अल्लादी कुष्णस्वामी अय्यर : आणीबाणीबाबतच्या तरतूदी 'घटनेचा श्वास' आहेत.
4) महावीर त्यागी : आणीबाणीविषयक तरतुदी या 'सुरक्षा झडपेचे' काम करतील.

Dilip Sir's STEP UP Academy

# संसद (Parliament)

संसद (भाग 5 : कलम 79-122)

| राष्ट्रपती | लोकसभा | राज्यसभा |
|---|---|---|
| (कलम 52) | (कलम 81) | (कलम 80) |

- राष्ट्रपती संसदेचा भाग आहेत कारण संसदेने संमत केलेल्या विधेयकाचे (Bill) कायद्यात रूपांतर होण्यासाठी राष्ट्रपतींच्या संमतीची आवश्यकता असते.

● **राष्ट्रपती (President of India) :**

- सभागृहांना संबोधित करतात तसेच सभागृहांना संदेश पाठवतात.
- अधिवेशन बोलावणे, खंडीत करणे व लोकसभा बरखास्त करण्याचा अधिकार
- विधेयक संसदेच्या पुनर्विचारासाठी (Reconsideration) पाठवतात.
- राज्यसभेच्या सदस्यांची नियुक्ती करतात.
- काही विधेयक संसदेत मांडण्यासाठी राष्ट्रपतींच्या पूर्व संमतीची आवश्यकता.
- अध्यादेश (Ordinance appointed) जारी करू शकतात.

**राज्यसभा (Rajya Sabha)**

- सदस्य संख्या : नेमणूक केलेले सदस्य 12 पेक्षा जास्त नाही आणि निवडून आलेले (Elected) सदस्य 238 पेक्षा जास्त नाही.

(म्हणजेच : 238 + 12 = 250)

अ) राज्यांचे प्रतिनिधित्व (Representation of States) : 229

ब) केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधी (Representation of UT) : 4

क) नामनिर्देशित सदस्य (Appointed member) : 12

सद्यस्थिती : 233 + 12 = 245

- सदस्यांची निवड राज्य विधानसभेच्या 'निवडून' दिलेल्या सदस्यांद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्त्व एकल संक्रमणीय पध्दतीनुसार केलेली असते. (Proportional representation by means of the single transforbale vote)

⁂ **राज्यसभेची संघराज्यीय वैशिष्ट्ये (Federal features of Rajya Sabha) :**

1. राज्यांचे प्रतिनिधित्व : राज्यांना द्यावयाच्या जागा परिशिष्ट 4 (Schedule 4) मध्ये नमूद आहे.
2. घटनादुरुस्ती : राज्यसभेने स्वतंत्ररीत्या विशेष बहुमताने (Special majority) मंजूर करणे आवश्यक
3. आणीबाणीविषयक ठराव (Emergency resolution) राज्यसभेने मंजूर करणे आवश्यक
4. राष्ट्रपती निवडणूक व पदच्युती (Election and removal of president)
5. अखिल भारतीय सेवा (All India Services) निर्मितीसाठी मान्यता आवश्यक (कलम 312)

● **कालावधी :** स्थायी सभागृह (Permnent house)

- 1/3 सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात.
- घटनेत : राज्यसभेच्या सदस्यांचा कार्यकाल निश्चित नाही.
- यासाठी संसदेने लोकप्रतिनिधी कायदा, 1951 हा कायदा केला आहे. यानुसार राज्यसभा सदस्यांचा कार्यकाल 6 वर्षांचा आहे.

⁂ **राज्यसभेतील जागांची घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये (States and U's) विभागणी घटनेच्या चौथ्या अनुसूचीमध्ये (Forth Schedule) देण्यात आलेली आहे ती पुढीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| आंध्रप्रदेश - 18 | अरूणाचल प्रदेश - 1 |
| आसाम - 7 | बिहार - 16 |
| गोवा - 1 | गुजरात - 11 |
| छत्तिसगड - 5 | झारखंड - 6 |
| हरियाणा - 5 | हिमाचल प्रदेश - 3 |
| जम्मु-काश्मीर - 4 | कर्नाटक - 12 |
| केरळ - 9 | मध्य प्रदेश - 11 |
| महराष्ट्र - 19 | मेघालय - 1 |
| मिझोरम - 1 | नागालँड - 1 |
| ओडिशा - 10 | पंजाब - 7 |
| राजस्थान - 10 | सिक्किम - 1 |
| तामिळनाडू - 18 | त्रिपूरा - 1 |
| उत्तरप्रदेश - 31 | उत्तराखंड - 3 |
| पश्चिम बंगाल - 16 | मणीपूर - 1 |
| दिल्ली - 3 | पुदुचेरी - 1 |
| **एकूण - 233** | |

Dilip Sir's STEP UP Academy

**※ राज्यसभेचे विशेष अधिकार (Special Powers of Rajya Sabha) :**

- कलम 249 : राज्यसभेतील 2/3 सदस्यांनी जर मागणी केली तर केंद्र शासन घटकराज्यांच्या राज्यसुचीतील विषयांवर कायदे करू शकते. (It can authorise parliament to make a law on state list)
- कलम 312 : अखिल भारतीय सेवेबाबत राज्यसभेने मागणी केल्यास बहुमताचा ठराव पास केल्यास संसद अखिल भारतीय सेवांवर कायदे करू शकते – निर्मिती व नियमन (It can authorise parliament to create new All India Services)
- कलम 67 (b) : उपराष्ट्रपतींवर महाभियोग (Removal process of vice president of India)

**लोकसभा (Lok Sabha)**

– राज्यांचे प्रतिनिधी (Representation of States) : 530

– केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधी (Representation of UT's) : 13

– अँग्लो इंडीयन समाजातून (From Anglo-Indian Community) : 2 (कलम 331) – ही तरतूद रद्द. (104 वी घटनादुरुस्ती नुसार)

- **सदस्यांचे दोन प्रकार :**

| नियुक्त | निर्वाचित |
|---|---|
| 2 | 530 + 20 = 552 : घटनेनुसार (According to constitution) |
| 2 | 530 + 13 = 545 : संसदेच्या कायद्यानुसार सदस्य संख्या निश्चिती |

– क्षेत्रिय एकप्रतिनिधी मतदारसंघाची पद्धती (Single member territorial constituency)

– मतदारसंघासंबंधी कायदे करण्याचा अधिकार संसदेस असून यानुसार 1952, 1962, 1972 व 2002 मध्ये परिसीमन आयोग कायदा (Delimitation Commission Act) असे कायदे केले. (यामुळे सर्वांना समान प्रतिनिधीत्व मिळते परंतु यासाठी 60 लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेले राज्य अपवाद असते.)

- **42 वी घटनादुरुस्ती : 1976**

– प्रत्येक राज्यासाठी असणाऱ्या लोकसभेच्या जागा व मतदार संघ 1971 च्या जनगणनेनुसार वर्ष 2000 पर्यंत गोठवण्यात (Freeze) आले आहेत

- **84 वी घटनादुरुस्ती : 2001**

– मतदारसंघ पुनर्रचना (Readjustment) बंदी 25 वर्षासाठी (2026 पर्यंत) वाढवण्यात आलेली आहे.

- **87 वी घटनादुरुस्ती : 2003**

– शासनास राज्यातील मतदारसंघांची 2001 च्या जनगणनेनुसार पुनर्रचना (Readjustment) करण्याचे अधिकार दिले आहेत (अट : प्रत्येक राज्यातील एकूण मतदारसंघांची संख्या बदलणार नाही कारण तो 2026 पर्यंत गोठवण्यात आलेला आहे)

– लोकसभेत अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमातीसाठी (ST) राखीव जागा (Reserved seats) : कलम 330

– विधानसभेत अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमातीसाठी (ST) राखीव जागा (Reserved seats) : कलम 332

– विधानसभेत अँग्लो इंडीयन समाजासाठी प्रतिनिधीत्व नसल्यास 1 व्यक्तिच्या नियुक्तीबाबत तरतूद : कलम 333 रद्द (104 वी घटना दुरुस्ती नुसार)

– लोकसभेत : अनुसूचित जाती : 84 आणि अनुसूचित जमाती : 47

– महाराष्ट्रातून अनुसूचित जाती : 5 आणि अनुसूचित जमाती : 4

- **कालावधी :**

– लोकसभेचा कार्यकाल : पहिल्या बैठकीच्या तारखेपासून पुढे पाच वर्षे असतो.

परंतु,

1) राष्ट्रपती : कार्यकाळ पूर्ण होण्याअगोदरच पंतप्रधानांच्या सल्ल्याने लोकसभा बरखास्त (dissolve) करू शकतात.

2) आणीबाणी दरम्यान लोकसभा कार्यकाळ संसदीय कायद्याद्वारे एका वेळी एका वर्षाने वाढवला जातो.

(किती वेळा वाढवायचा : याबाबत बंधन नाही.)

**※ सध्या लोकसभेतील जागांची घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभागणी पुढीलप्रमाणे आहे :**

| | |
|---|---|
| आंध्रप्रदेश – 42 | अरूणाचल प्रदेश – 2 |
| आसाम – 14 | बिहार – 40 |
| गोवा – 2 | गुजरात – 26 |
| छत्तिसगड – 11 | झारखंड – 14 |
| हरियाणा – 10 | हिमाचल प्रदेश – 4 |
| जम्मू-काश्मीर – 5 | कर्नाटक – 28 |

Dilip Sir's STEP UP Academy

| | | |
|---|---|---|
| केरळ - 20 | मध्य प्रदेश - 29 | |
| महाराष्ट्र - 48 | मेघालय - 2 | |
| मिझोरम - 1 | नागालँड - 1 | |
| ओडिशा - 21 | पंजाब - 13 | |
| राजस्थान - 25 | सिक्किम - 1 | |
| तामिळनाडू - 39 | त्रिपूरा - 2 | |
| उत्तर प्रदेश - 80 | उत्तराखंड - 5 | |
| पश्चिम बंगाल - 42 | मणिपूर - 1 | |
| **केंद्रशासित प्रदेश :** | | |
| अंदमान व निकोबार बेटे - 1 | | चंदिगड - 1 |
| दमण दीव - दादरा व नगर हवेली - 2 | | |
| दिल्ली - 7 | | लक्षद्विप - 1 |
| पुदुचेरी - 1 | | लडाख - 1 |

**※ संसद सदस्य पात्रता :**

- **घटनेतील तरतुदीनुसार**

1) भारतीय नागरीक असावा.
2) राज्यसभेसाठी वयाची 30 तर लोकसभेसाठी वयाची 25 वर्षे पूर्ण असावी.
3) निवडणूक आयोगाने अधिकृत केलेल्या व्यक्तीसमोर पुढील प्रकारे शपथ घेतली पाहिजे व लिहून दिली पाहिजे -

अ) भारताच्या राज्यघटनेप्रती खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन. (Faith and allegiance to the constitution)

ब) भारताची एकता व अखंडता अबाधित राखीन. (Uphold the sovereignty and integrity of India)

- **संसदेने केलेल्या कायद्यानुसार (लोकप्रतिनिधी कायदा 1951) (Representation People of Act 1951) :**

1) तो देशातील कुठल्याही मतदार यादीतील नोंदणीकृत मतदार असावा. (लोकप्रतिनिधी कायदा 1951 नुसार)
राज्यसभेच्या निवडणूकीसाठी अगोदर उमेदवार हा त्याच्याच राज्यातील असावा अशी अट होती. परंतु 2003 साली ही अट रद्द करण्यात आली.
2) जर आरक्षित जागेत निवडणूक लढवायची असल्यास तो उमेदवार त्या राज्यात किंवा केंद्रशासित प्रदेशात अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचा सदस्य असायला हवा.

- **संसद सदस्यांची अपात्रता (Disqualification) :**

1) कलम 102 नुसार : लाभाचे पद धारण केले तर (Office of profit under the Union or State govt.)

- मनोरूग्ण (सक्षम न्यायालयाचा निष्कर्ष) (he is of unsound mind and stands so declared by a country)
- त्याने स्वेच्छेने परकीय नागरिकत्व स्वीकारले (voluntarily acquired the citizenship of foreign state) असेल किंवा परकीय राष्ट्राशी त्याने निष्ठा व्यक्त केली असेल तर.
- दिवाळखोर (insolvent) असेल तर
- संसदेच्या कायद्यानुसार अपात्र ठरला तर (राष्ट्रपती निर्णय देतील : त्यासाठी निवडणूक आयोगाचा सल्ला घेतील की जो बंधनकारक असेल)

2) लोकप्रतिनिधित्व कायदा, 1951 नुसार (Representation of people act 1951)

- विशिष्ट निवडणूक गुन्ह्यांबाबत दोषी असेल तर (उदा. भ्रष्टाचार)
- तिचे सरकारी कंत्राटे (Govt. contracts), कामे किंवा सेवा यात हित गुंतलेले असेल तर
- सरकारचा किमान 25% हिस्सा असलेल्या निगमांमध्ये ती संचालक, व्यवस्थापक प्रतिनिधी असल्यास.
- सरकारी सेवेतून भ्रष्टाचार/देशविरोधी कारवाया या कारणावरून काढून टाकलेले नसावे.
- ती लाचलुचपत किंवा दोन गटांत वैमनस्य उत्पन्न करणे या आरोपात दोषी ठरलेली नसावी.
- अस्पृश्यता, हुंडा किंवा सती अशा सामाजिक गुन्ह्यात सहभागी असल्यास किंवा त्याचा प्रचार करण्याच्या गुन्ह्याबाबत तिला शिक्षा झालेली नसावी.
- कोणत्याही गुन्ह्यासाठी दोन वर्षे/अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा झाली असेल तर
- वेळेत निवडणूक विषयक लेखे (accounts) सादर करण्यास अपयशी ठरल्यास.

3) पक्षांतराच्या बंदी कायद्यानुसार जर अपात्र असल्यास (On the ground of Defection)

- अंतिम निर्णय : लोकसभा अध्यक्ष/राज्यसभा सभापती घेतील (याचे न्यायिक पुनर्विलोकन (Judicial review) होऊ शकते)

1) ज्या पक्षातर्फे निवडून आला त्या पक्षाचे सदस्यत्व त्याने स्वेच्छेने सोडल्यास.
2) त्याच्या राजकीय पक्षाने दिलेल्या आदेशाविरुद्ध तो मतदान करतो किंवा मत न देता तटस्थ (Abstains) राहतो.
3) जेव्हा एखादा अपक्ष सदस्य (Independent member) एखाद्या राजकीय पक्षात प्रवेश करतो.
4) जेव्हा नामनिर्देशित सदस्य (Nominated member) सहा महिन्यांच्या कालावधीनंतर राजकीय पक्षात प्रवेश घेतो.

Dilip Sir's STEP UP Academy

● **शपथ (Oath) :**

- दोन्ही सभागृहातील सदस्यांना राष्ट्रपती किंवा त्यांनी नियुक्त केलेला व्यक्ती त्यांना पुढीलप्रमाणे शपथ देतात.
  अ) भारताच्या राज्यघटनेप्रती खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन. (True faith and allegiance to the constitution)
  ब) भारताची एकता व अखंडता अबाधित राखीन. (Uphold the sovereignty and integrity)
  क) तो जे पद ग्रहण करीत आहे त्या पदाची कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडेन.
  (जोपर्यंत संसद सदस्य शपथ घेत नाही. तोपर्यंत तो सभागृहाच्या कामकाजात सहभागी होऊ शकत नाही तसेच मतदान करू शकत नाही. जर त्याने असे केले तर त्या व्यक्तिला प्रत्येक दिवसासाठी 500 रु. दंड होऊ शकतो.)

● **वेतन व भत्ते (Salaries and allowances) :**

- घटनेमध्ये दोन्ही गृहांच्या सदस्यांना फक्त वेतन आणि भत्ते याबाबत तरतूद आहे. निवृत्तीवेतन (पेन्शन) हे मात्र घटनेत नमूद नाही. त्यासाठी संसदेने 'संसद सदस्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन कायदा, 1954' हा कायदा केलेला आहे.

● **जागा रिक्त होण्याबाबत (Vacating of seats) :**

1) दुहेरी सदस्यत्व (लोकप्रतिनिधी कायदा 1951 नुसार) (Dual membership)
- जेव्हा एखादा व्यक्ती दोन्ही सभागृहांचे पदांवर निवडून आले तर त्यांनी पुढील 10 दिवसात आपला अंतिम निर्णय सांगावा नाहीतर राज्यसभेतील जागा रद्द होते.
- अगोदर एखाद्या सभागृहात कार्यरत असलेला सदस्य दुसऱ्या गृहात निवडला गेला तर अगोदरचे सदस्यपद रद्द होते.
- एकाच सभागृहातील दोन जागांवर निवडलेली व्यक्तीने त्यातील एका जागेची निवड करावी अथवा त्याच्या दोन्ही जागा रद्द होतील.
- एखादी व्यक्ती केंद व राज्य विधिमंडळात निवडून आली तर 14 दिवसात राज्यविधिमंडळाचा राजीनामा द्यावा अथवा संसदेतील पद रद्द होते.

2) अपात्र ठरल्यास (Disqualification specified in the constitution)

3) राजीनामा दिल्यास (Resignation) :
- राज्यसभा सदस्य : राज्यसभेच्या अध्यक्षांकडे राजीनामा देतात.
- लोकसभा सदस्य : लोकसभा सभापतीकडे राजीनामा देतात.

4) अनुपस्थिती (Absence) : सभागृहाच्या संमतीशिवाय 60 दिवस सर्व सभांना गैरहजर असल्यास त्यांचे सभासदत्व रद्द होते.

5) इतर (Other cases) : अ) राष्ट्रपती/उपराष्ट्रपती/राज्यपाल पदी निवडून गेल्यास
  ब) न्यायालयाने निवडणूक अवैध (Invalid) ठरवल्यास
  क) सभागृहाने त्यांचे पद काढून घेतल्यास

Dilip Sir's STEP UP Academy

# लोकसभा सभापती (Speaker of Loksabha)

- पहिल्या बैठकीनंतर लवकरात लवकर लोकसभा सभापतींची निवड केली जाते. (सामान्य परिस्थितीत यांचा कार्यकाल लोकसभेचा कार्यकाल संपेपर्यंत असतो.)
- निवड प्रक्रियेची दिनांक राष्ट्रपती ठरवतात. जर काही कारणाने जागा रिक्त झाली तर नव्या सभापतींची निवडणूक घेतली जाते.

● **शपथ (Oath) :** लोकसभा सभापती म्हणून त्यांना कुठल्याही प्रकारची वेगळी शपथ दिली जात नाही.

● **पद रिक्त होण्याची कारणे (Vacate his office due to):**

1) जर त्याचे लोकसभा सदस्यत्व संपुष्टात आले तर
2) राजीनामा दिला तर (ते आपला राजीनामा उपसभापतीला देतात.)
3) लोकसभेने प्रभावी बहुमताने (Effective Majority) त्यास पदावरून दूर करण्याचा ठराव (Resolution) संमत केला तर (याबाबत लोकसभा सभापतींना 14 दिवस अगोदर पूर्वसूचना द्यावीच लागते.)
   (प्रभावी बहुमत म्हणजे सभागृहाचे एकूण बहुमत)

- या बाबत ठरावाला किमान 50 सदस्यांचा पाठिंबा आवश्यक असतो.

● **पदावरून दूर करण्याबाबत :**

- या प्रक्रियेत लोकसभा अध्यक्ष आपले म्हणणे सभागृहासमोर मांडू शकतात. तसेच कामकाजाच्या पहिल्या टप्प्यात आपले मत देऊ शकतात. परंतु निर्णायक मत (Casting vote) देऊ शकत नाही.
- लोकसभेचे विसर्जन (Dissolve) झाल्यावर सुद्धा पुढील सभापती निवडून येईपर्यंत ते पदावर राहतात.

● **अधिकार व कार्ये :**

- हे लोकसभेचे प्रमुख असतात तसेच सदस्यांच्या विशेषाधिकारांचे ते संरक्षण करतात.
- यांचे अधिकार व कार्ये 3 स्त्रोतांकडून :
  1) राज्यघटना 2) लोकसभा कामकाज प्रक्रिया व नियम 3) संसदीय परंपरा (Convention)

1) लोकसभा कामकाज चालवण्यासाठी शिस्त आणि योग्य वातावरण ठेवण्याबाबत अंतिम अधिकार यांचे असतात.
2) सभागृहामध्ये त्यांना पुढील बाबींबाबत अर्थ लावण्याचा अंतिम अधिकार असेल :
   अ) भारताची राज्यघटना
   ब) लोकसभेच्या कामकाजाची पद्धती आणि व्यवहार याबाबतचे नियम आणि
   क) संसदीय पूर्व इतिहास
3) लोकसभेची गणपूर्ती (Quorum) होत नसल्यास बैठकीस स्थगिती देतील (गणपूर्तीसाठी 1/10 सदस्य आवश्यक)
4) लोकसभा कामकाजात निर्णायक मत (Casting vote) देण्याचा अधिकार
   (फक्त दुसऱ्या टप्प्यात : जेव्हा एखाद्या विधेयकावर समान मत पडली असती तर)
5) संसदेच्या संयुक्त बैठकीचे (Joint sitting) अध्यक्षस्थान भूषवणे.
6) एखादे विधेयक अर्थ विधेयक (Money bill) आहे किंवा नाही याबाबत यांचा निर्णय अंतिम असेल.
7) जेव्हा असे अर्थविधेयक शिफारशींसाठी राज्यसभेकडे पाठवले जाते आणि मान्यतेसाठी राष्ट्रपतींना सादर केले जाते तेव्हाच हे विधेयक अर्थ विधेयक आहे, असे सभापती प्रमाणित करतात.
8) पक्षांतरबंदीच्या कायद्यावरून (Anti defection law) (10 वे परिशिष्ट) सदस्यांना अपात्र ठरविण्याबाबत लोकसभा अध्यक्षांचा निर्णय अंतीम असेल. (न्यायिक पुनर्विलोकन लागू (Judicial review))
9) लोकसभा अध्यक्ष हे सर्व संसदीय समित्यांच्या (Parliamentary committee) अध्यक्षांची नियुक्ती करतात.
10) तो आंतर-संसदीय संघटनेच्या भारतीय संसदीय गटाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो; तसेच तो देशातील कायदेमंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांच्या परिषदेचाही पदसिद्ध अध्यक्ष असतो.
11) लोकसभा सभापती हे व्यवहार सल्लागार समिती (Business advisory committee), नियम समिती (Rules committee) आणि सर्वसाधारण उद्देश समिती (General purpose committee) यांच्या अध्यक्ष असतात.

● **पदाचे स्वातंत्र्य (Independence and Impartiality):**

- यांचे वेतन आणि भत्ते संसदेद्वारे निश्चित केले जातात. (संचित निधीतून दिले जाते. (Consolidated fund of India))

Dilip Sir's STEP UP Academy

- यांचे स्थान हे भारताच्या सरन्यायाधिशांच्या (CJI) बरोबरीचे आहे. (ज्येष्ठतेनुसार क्र. 7)
- यांचे पद हे पंतप्रधान व उपपंतप्रधान वगळता सर्व कॅबिनेटमंत्र्यांच्याही वरचे आहे.
- सभागृहाचे कामकाज चालविणे तसेच त्यात सुव्यवस्था राखणे याबाबतच्या प्रक्रियेचे नियमन करण्याचे त्यांचे अधिकार कोणत्याही न्यायालयाच्या अधिकार कक्षेत येत नाही.
- त्यांच्या कार्यावर आणि कामकाज पद्धतीवर चर्चा करता येत नाही व टीकाही करता येत नाही. (Can not be discussed and criticised)

ब्रिटनमध्ये सभापती हे राजकीय पक्षाशी संबंधित नसतात. त्यामुळे ते सभापती म्हणून निवडून आल्यानंतर आपल्या पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देतात. यामुळे संसदीय कामकाजात त्यांचा तटस्थपणा जाणवतो, परंतु भारतात सभापती पदावर निवडून आल्यानंतर पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्याची तरतूद नाही.

## लोकसभेचे उपसभापती (Deputy Speaker of Lok Sabha)

- यांची निवड लोकसभेच्या सभापतींच्या निवडणूकीनंतर होते. यासाठी सभापती निवडणूकीबाबत दिनांक ठरवतात.
- यांचे पद जर रिक्त झाले तर लोकसभा दुसऱ्या सदस्याची या पदावर निवड करते.

- **शपथ** : लोकसभा उपसभापती म्हणून त्यांना कुठल्याही प्रकारची वेगळी शपथ दिली जात नाही.
- **पद रिक्त होणे (Vacate his office due to)** :

1) जर त्याचे लोकसभा सदस्यत्व संपुष्टात आले तर
2) त्यांनी राजीनामा दिला तर (ते राजीनामा सभापतीला देतात.)
3) लोकसभेने प्रभावी बहुमताने (Effective Majority) त्यास पदावरून दूर करण्याचा ठराव संमत केला तर.
   (याबाबत लोकसभा उपसभापतींना अगोदर 14 दिवसांची पूर्वसूचना द्यावीच लागते.)

- **कार्ये (Functions)** :

- जेव्हा लोकसभेचे सभापती हे बैठकीस अनुपस्थित (Absent) असतील तेव्हा उपसभापती हे सभापती म्हणून काम पाहतात. अशावेळी त्यांना सभापतीचे अधिकार प्राप्त होतात.
- संयुक्त बैठकीवेळी (Joint sitting) लोकसभा सभापती बैठकीस अनुपस्थित असल्यास उपसभापती हे या बैठकीचे अध्यक्षस्थानी असतात.
- जेव्हा सभापती हजर असतात तेव्हा उपसभापती हे लोकसभेच्या सामान्य सदस्यांप्रमाणे असतात.
- 10 व्या लोकसभा कार्यकालापर्यंत सभापती आणि उपसभापती दोघेही सत्ताधारी पक्षाचे होते.
- 11 व्या लोकसभा कार्यकालापासून उपसभापती हे मुख्य विरोधी पक्षाचे असावे, असे ठरले.
- यांचे वेतन आणि भत्ते संसदेद्वारे निश्चित केले जातात. (संचित निधीतून दिले जाते.)

**सभापती आणि उपसभापती : इतिहास**

या पदांची निर्मिती 1919 च्या माँटेग्यू-चेम्सफोर्ड कायद्यानुसार केली होती.

त्यावेळी ही पदे अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष या नावाने ओळखली जात.

1921 पूर्वी : भारताचा व्हाईसरॉय हा केंद्रीय विधिमंडळ परिषदांच्या बैठकांच्या अध्यक्षस्थानी होता. परंतु त्यानंतर त्याने पहिल्यांदा फ्रेडरिक व्हाईट हे अध्यक्ष तर सच्चिदानंद सिन्हा हे उपाध्यक्ष म्हणून नेमले.

1925 : विठ्ठलभाई जे. पटेल हे केंद्रीय विधिमंडळ परिषदेचे पहिले भारतीय आणि पहिले निवडून आलेले सभापती ठरले.

1935 च्या भारत सरकार कायद्यानुसार अध्यक्ष व उपाध्यक्ष हे सभापती आणि उपसभापती म्हणून ओळखले जातील अशी तरतूद केली, परंतु या कायद्याची अंमलबजावणी झाली नाही.

1947 साली लोकसभेचे सभापती हे जी. व्ही. मावळणकर आणि उपसभापती हे अनंतशयनम अय्यंगार हे होते.

जी. व्ही मावळणकर हे संविधान सभेच्या कायदेमंडळाचे तसेच हंगामी संसदेचे सभापती होते. (1946 ते 1956 सालापर्यंत)

- **लोकसभा सभापतींचा गट (Panel of Chairpersons of Lok Sabha)** :

- लोकसभा नियमांनुसार लोकसभेत 10 जणांचा एक गट असतो.
- या गटात सदस्यांची नियुक्ती लोकसभा सभापती करतात.
- जेव्हा लोकसभा सभापती आणि उपसभापती हे **गैरहजर** (Absent) असतील तेव्हाच या मधून एका व्यक्तीची लोकसभा अध्यक्षपदी नियुक्ती केली जाते. परंतु जेव्हा लोकसभा सभापती आणि उपसभापती ही पदे **रिक्त** (Vacant) असतील तेव्हा मात्र राष्ट्रपती कोणत्याही एका सदस्याची अध्यक्षपदी नियुक्ती करतात.

Dilip Sir's STEP UP Academy

- **प्रोटेम स्पिकर (हंगामी सभापती) (Speaker - Pro Tem):**
- लोकसभा सभापती हे नवीन लोकसभा निवडून आल्यानंतर पहिल्या बैठकीच्या अगोदर आपल्या पदाचा राजीनामा देतात.
- तेव्हा राष्ट्रपती सभागृहातील सर्वात जेष्ठ सदस्याची (Number of Terms) स्पिकर प्रोटेम पदावर नियुक्ती करतात.
- यांना शपथ राष्ट्रपती देतात.
- कार्य : नव्याने निवडून आलेल्या लोकसभेच्या पहिल्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे ते नवीन सदस्यांना शपथ देणे, नवीन सभापतीची निवड करणे इ. काम करतात.

| क्र. | नाव | कालावधी | लोकसभा |
|---|---|---|---|
| 1) | गणेस वासूदेव मावळणकर | मे 1952 - फेब्रुवारी 1956 | पहिली |
| 2) | एम.ए. अय्यंगार | मार्च 1956 - मे 1957 | पहिली |
| | | मे 1957 - एप्रिल 1962 | दुसरी |
| 3) | सरदार हुकुमसिंग | एप्रिल 1962 - मार्च 1967 | तिसरी |
| 4) | निलम संजीव रेड्डी | मार्च 1967 - जुलै 1969 | चौथी |
| 5) | गुरूदयाल सिंग धिल्लोन | ऑगस्ट 1969 - मार्च 1971 | चौथी |
| | | मार्च 1971 - डिसेंबर 1975 | पाचवी |
| 6) | बलीराम भगत | जानेवारी 1976 - मार्च 1977 | पाचवी |
| 7) | निलम संजीव रेड्डी | मार्च 1977 - जुलै 1977 | सहावी |
| 8) | के.एस. हेगडे | जुलै 1977 - जानेवारी 1980 | सहावी |
| 9) | बलराम जाखर | जानेवारी 1980 - ऑक्टोबर 1984 | सातवी |
| | | जानेवारी 1985 - डिसेंबर 1989 | आठवी |
| 10) | रवि रे | डिसेंबर 1989 - जुलै 1991 | नववी |
| 11) | शिवराज पाटील | जुलै 1991 - मे 1996 | दहावी |
| 12) | पी.ए. संगमा | मे 1996 - मार्च 1998 | अकरावी |
| 13) | जी.एम.सी. बालयोगी | मार्च 1998 - ऑक्टोबर 1999 | बारावी |
| | | ऑक्टोबर 1999 - मार्च 2002 | तेरावी |
| 14) | मनोहर जोशी | मे 2002 - जून 2004 | तेरावी |
| 15) | सोमनाथ चटर्जी | जून 2004 - मे 2009 | चौदावी |
| 16) | मिरा कुमार | जून 2009 - जून 2014 | पंधरावी |
| 17) | सुमित्रा महाजन | जून 2014 - 2019 | सोळावी |
| 18) | ओम बिर्ला | जून 2019 पासून | |

## राज्यसभा अध्यक्ष (Chaiman of Rajya Sabha)

- घटनेनुसार या पदावर उपराष्ट्रपती (Vice President of India) असतात.
- जर उपराष्ट्रपतींना पदावरून दूर केले तरच राज्यसभेच्या अध्यक्ष पदावरून त्यांना काढता येते.
- त्यांचे सभागृहाबाबतचे कार्य हे लोकसभा अध्यक्षाप्रमाणेच असते.
- फक्त पुढील बाबतीत त्यांना लोकसभा सभापतींपेक्षा कमी अधिकार :

1) एखादे विधेयक धन विधेयक (Money bill) असल्याबाबत लोकसभा सभापतींचा निर्णय अंतिम असतो. याबाबत राज्यसभेच्या अध्यक्षांना काही अधिकार नाही.
2) संयुक्त बैठकीवेळी (Joint sitting) लोकसभा सभापती अध्यक्षस्थान भूषवितात. याबाबत राज्यसभेच्या अध्यक्षांना काही अधिकार नाही.

- ज्याप्रमाणे लोकसभा सभापती हे लोकसभेचे सदस्य असतात त्याप्रमाणे राज्यसभेचे अध्यक्ष हे राज्यसभेचे सदस्य नसतात. त्यामुळे ते फक्त निर्णायक मत (Casting vote) देऊ शकतात. परंतु त्यांना पहिल्या टप्प्यात मतदान करण्याचा अधिकार नसतो.

- यांचे वेतन आणि भत्ते संसद निश्चित करते. (यांचे वेतन संचित निधीतून (Consolidated fund) दिले जाते.)

- **पदावरून दूर करण्याबाबत :**

- राज्यसभेने या बाबत प्रभावी बहुमत (Effective majority) वापरून ठराव संमत केला आणि लोकसभेने त्याला साध्या बहुमताने मंजुरी दिली तर राज्यसभा अध्यक्ष हे पदावरून दूर होतात. (त्यासाठी त्यांना 14 दिवसांची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे – यांना पदावरून दूर करण्यसाठी घटनेत कोणतेही कारण नमूद केलेले नाही.) जेव्हा यांना पदावरून दूर करण्यासाठी मतदान होत असते त्यादरम्यान उपराष्ट्रपती आपले म्हणणे मांडण्यासाठी सभागृहात हजर राहू शकतात, परंतु ते मतदान करू शकत नाही.

### ❊ राज्यसभा उपाध्यक्ष (Deputy Chairman of Rajya Sabha) :

- राज्यसभा, सदस्यांपैकी एकाची या पदावर निवड करते.
- ज्यावेळी हे पद रिक्त असेल त्यावेळी दुसऱ्या सदस्याची निवड करून हे पद भरले जाते.
- पुढील तीन कारणांमुळे हे पदावर राहू शकत नाही.

1) राज्यसभेचे सदस्यत्व संपुष्टात आल्यास
2) राजीनामा दिल्यास (अध्यक्षांना)
3) त्यांना पदावरून दूर करण्याचा प्रस्ताव राज्यसभेने प्रभावी बहुमताने (Effective majority) मंजूर केल्यास. (14 दिवसांची पूर्वसूचना देऊन)

- ज्यावेळी राज्यसभा अध्यक्षपद रिक्त होईल किंवा उपराष्ट्रपती हे राष्ट्रपतीचा कारभार बघतात त्यावेळी उपाध्यक्ष हे सभागृहाचे अध्यक्षस्थानी असतात.
- ज्यावेळी अध्यक्ष हे सभागृहाच्या अध्यक्षपदी असतात त्यावेळी उपाध्यक्ष हे सामान्य सदस्यांसारखे असतात.

- **राज्यसभेच्या उपप्रमुखांचा गट (Panel of Vice-Chairpersons of Rajya Sabha) :**

- राज्यसभेच्या कामकाजाच्या नियमानुसार याची निर्मिती.
- यामध्ये 6 सदस्य असतात आणि त्यांची नियुक्ती राज्यसभेचे अध्यक्ष करतात.
- अध्यक्ष आणि उपाध्यक्ष **गैरहजर** (Absent) असल्यास त्यांच्यापैकी एक जण सभागृहाचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात. परंतु ज्या वेळी अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष दोन्ही पदे **रिक्त** (Vacant) असतील त्यावेळी मात्र राष्ट्रपतींने नियुक्त केलेला सदस्यच हा अध्यक्षपदी असेल आणि रिक्त असलेले पद लवकरात लवकर भरले जाईल.

### ❊ संसदेचे सचिवालय (Secretariat of Parliament) :

- दोन्ही सभागृहांना स्वतःचे सचिवालय असते.
- सचिवालयातील कर्मचारी : भरती व सेवाशर्ती संसद कायद्यानुसार ठरवते.
- सचिवालयाचे प्रमुख : महासचिव (Secretary General)
- नेमणूक : सभागृहाचे अध्यक्ष/सभापती

### संसदेतील नेते (Leaders in Parliament)

- **सभागृह नेता (Leader of the House) :** लोकसभा/राज्यसभा नियमात याची तरतूद.

- पंतप्रधान ज्या गृहाचे सदस्य असतील त्या गृहाचे ते सभागृह नेते असतात आणि दुसऱ्या गृहाचा नेता हा सदस्य असलेला मंत्री असतो.

- **विरोधी पक्ष नेता (leader of the Opposition) :**

- दोन्ही सभागृहांमध्ये या पदाची तरतूद
- गृहाच्या 1/10 पेक्षा जास्त जागा असलेल्या सर्वात मोठ्या विरोधी पक्षांच्या नेत्यास त्या गृहाचा विरोधी पक्षनेता म्हटले जाते. (येथे पक्षांची आघाडी अपेक्षित नाही).
- 1977 साली लोकसभा व राज्यसभा यांच्या विरोधी पक्षनेत्यांना वैधानिक मान्यता (Legal status) दिली गेली. यानुसार दोघांनाही कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा देण्यात आला आहे. (Salary and Allowances of Leaders of Opposition in Parliament Act, 1977)
- 1969 साली पहिल्यांदा अधिकृतरित्या विरोधी पक्षनेता या पदास मान्यता (Recognition) मिळाली (या अगोदर झालेल्या निवडणुकीत विरोधी पक्षाला आवश्यक तेवढे संख्याबळ मिळविता आलेले नव्हते.)

### ❊ शॅडो कॅबिनेट (Shadow cabinet) :

- ब्रिटनच्या राजकीय व्यवस्थेतील एक संकल्पना
- सत्ताधारी मंत्रिमंडळावर लक्ष ठेवण्यासाठी तसेच भविष्यात मंत्रिपदासाठी सदस्यांना तयार करण्यासाठी विरोधी पक्ष शॅडो कॅबिनेट बनवतो. (आयव्हर जेनिंग्ज : विरोधी पक्षनेत्यास 'पर्यायी पंतप्रधान' म्हणतात.)

2005 साली महाराष्ट्रामध्ये विलासराव देशमुख यांच्या सरकारवर लक्ष ठेवण्यासाठी विरोधी पक्षांनी शॅडो कॅबिनेट स्थापन केले होते. अशा प्रकारचे हे भारतातील पहिलेच शॅडो कॅबिनेट होते. यामध्ये भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना पक्ष सामील होते. त्यावेळी विरोधी पक्ष नेते असलेले नारायण राणे हे 43 सदस्य असलेल्या शॅडो कॅबिनेटचे प्रमुख होते. तर गोपिनाथ मुंडे हे उपनेता होते. परंतु याचा जास्त प्रभाव जाणवला नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

**✻ प्रतोद (Whip)**

- याचा उल्लेख घटनेत (Constitution) नाही आणि संसदीय कायद्यातही नाही. (सभागृहाच्या नियमांमध्ये (Rule of the House) तरतूद आहे.)
- प्रत्येक राजकीय पक्षाचे संसदेत प्रतोद असतात. तो संसदेच्या सदस्यांमधील वर्तणूकीवर लक्ष ठवेतो. तसेच सर्व सदस्यांचे नियमन करतो. यांनी दिलेले सल्ले सदस्यांनी न पाळल्यास पक्ष शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करू शकतो.

**✻ सरकारी चीफ व्हीप्स :**

- लोकसभेत सरकारी पक्षाचे चीफ व्हीप : संसदीय कामकाज मंत्री असतात.
- राज्यसभेत सरकारी पक्षाचे चीफ व्हीप : संसदीय कामकाज राज्यमंत्री असतात.
- हे सभागृह नेत्यास प्रत्यक्षपणे जबाबदार असतात.
- सरकारला संसदीय कामकाजाबाबत मदत करणे. हे त्यांचे मुख्य काम असते.

**संसदेचे अधिवेशन : कलम 85**

- वेळोवेळी राष्ट्रपती संसदेचे अधिवेशन बोलावतात लगतच्या दोन अधिवेशनातील अंतर 6 महिन्यांपेक्षा जास्त असणार नाही याची ते काळजी घेतील. (पहिल्या घटनादुरुस्तीने तरतूद)
- भारतात साधारणतः एका वर्षात तीन अधिवेशने भरवली जातात.

1) अर्थसंकल्पीय अधिवेशन (Budget session) :
- फेब्रुवारीमध्ये : सर्वात जास्त काळ चालणारे व महत्त्वाचे अधिवेशन
- अर्थसंकल्पीय अधिवेशन राष्ट्रपतींच्या संसदेच्या संयुक्त बैठकी समोरील अभिभाषणाने सुरू होते.

2) पावसाळी अधिवेशन (Monsoon session) : जुलै-ऑगस्ट
3) हिवाळी अधिवेशन (Winter session) : नोव्हेंबर-डिसेंबर

**✻ याशिवाय विशेष अधिवेशन (Special session) बोलावता येते :**

1) हे विशेष अधिवेशन नियमित अधिवेशनात सुद्धा बोलावता येते.
2) नियमित अधिवेशन सुरू नसल्यावर सुद्धा बाहेरून बोलावू शकतात.

**✻ संसदेच्या कामकाजाबाबतच्या काही संकल्पना :**

1) **तहकूब करणे (Adjournment) :** काही कालावधीसाठी सभागृहाचे कामकाज तहकूब केले जाते.
(तो कालावधी काही तास/दिवस/आठवडे असू शकतो.)

2) **अनिश्चित कालापर्यंतची तहकूब (Indefinite period)** : सभागृहाचे कामकाज निश्चित कालावधी नमूद न करता तहकूब केले जाते.
- या दरम्यान कधीही गृहाची बैठक बोलावण्याचे अधिकार अध्यक्ष/सभापती यांचे असतील.

3) **सत्र समाप्ती (Prorogation) :** अधिवेशन संपल्यावर पीठासीन अधिकारी शेवटची बैठक अनिश्चित काळासाठी तहकूब करतात. त्यानंतर काही दिवसांनी राष्ट्रपती अधिवेशनाच्या सत्र समाप्तीबाबत अधिसूचना काढतात. (राष्ट्रपती सभागृहाचे अधिवेशन सुरू असतानाही अशी अधिसूचना काढू शकतात.)

| **तहकुबी (Adjournment)** | **सत्रसमाप्ती (Prorogation)** |
|---|---|
| 1) यामुळे गृहाची बैठक संपते.<br>2) घोषणा : सभापती/अध्यक्ष<br>3) यामुळे सभागृहातील प्रलंबित विधेयके (Bills) तसेच इतर कामकाजावर कोणताही परिणाम होत नाही. | 1) यामुळे गृहाचे अधिवेशन संपते.<br>2) घोषणा : राष्ट्रपती<br>3) यामुळे सभागृहातील प्रलंबित विधेयके (Bills) किंवा इतर कामकाजावर परिणाम होत नाही. मात्र सर्व प्रलंबित नोटीसा व्यपगत (Lapse) होतात. पुढच्या अधिवेशनासाठी नव्याने सूचना काढाव्या लागतात. |

- ब्रिटनमध्ये सत्रसमाप्ती मुळे गृहापुढे प्रलंबित असलेली सर्व विधेयके आणि इतर सर्व कामकाज लोप पावते. (End all bills or any other business pending before the house)

**✻ लोकसभेचे विसर्जन (Dissolution of Lok Sabha) : दोन प्रकारे :**

अ) नियमित पाच वर्षाचा कार्यकाळ संपला किंवा आणीबाणीमध्ये वाढविलेला कार्यकाल संपल्यानंतर तर लोकसभा आपोआप विसर्जीत होते (Automatic dissolution), किंवा

ब) कार्यकाल संपण्याअगोदर पंतप्रधानांनी असा सल्ला राष्ट्रपतींना दिला तर.

- यामुळे : लोकसभेसमोरील तसेच तिच्या समित्यांकडील सर्व कामकाज (विधेयक, प्रस्ताव, ठराव, नोटीसा, अर्ज इ. (Bills, motions, resolutions, notices, petitions)) व्यपगत (Lapse) होते. परंतू पुढील विधेयके व्यपगत होत नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

● **व्यपगत (Lapse) होणारी विधेयके :**

1) लोकसभेत प्रथम मांडलेले किंवा राज्यसभेने पारीत करून लोकसभेकडे पाठवलेले विधेयक (लोकसभेत प्रलंबित असलेले (A bill pending in Lok Sabha))

2) लोकसभेने पारीत केलेले परंतू राज्यसभेत प्रलंबित असलेले विधेयक (A bill passed by the Lok Sabha but pending in Rajya Sabha)

● **व्यपगत (Lapse) न होणारी विधेयके :**

1) जर मतभेदांमुळे विधेयक दोन्ही सभागृहात पारीत झाले नाही (मतभेद असल्याने) आणि त्यासाठी राष्ट्रपतींनी संयुक्त बैठक (Joint sitting) आयोजित केली असेल, असे विधेयक

2) लोकसभेत पारीत न झालेले (Not passed by the Lok Sabha) परंतू राज्यसभेत प्रलंबित (Pending in Rajya Sabha) असणारे विधेयक

3) दोन्ही सभागृहांनी संमत केलेले परंतु राष्ट्रपतींकडे संमतीसाठी प्रलंबित (Pending assent of the President) असलेले विधेयक

4) दोन्ही सभागृहांनी संमत केलेले परंतू राष्ट्रपतींनी संसदेकडे पुनर्विचारासाठी (Reconsideration) पाठवलेले विधेयक

## सभागृहाच्या कामकाजाशी संबंधीत बाबी

● **गणपूर्ती (Quorum) :**

- कलम 100 : सभागृहाची सभा भरण्यासाठी गणपूर्ती आवश्यक असून कलम 100(3) नुसार गणसंख्या सभागृहाच्या एकूण सदस्यांच्या 1/10 एवढी असेल. (पीठासीन अधिकारी धरून (Including presiding officer))

● **सभागृहातील मतदान (Voting in House) :**

- कलम 100 नुसार सर्वसाधारण पद्धतीमध्ये 'साध्या बहुमताने' (Simple majority) निर्णय घेतले जातात.
  (अपवाद : राष्ट्रपतींवरील महाभियोग (कलम 61), घटनादुरुस्ती प्रक्रिया (कलम 368),
- लोकसभा सभापतींना पदावरून दूर करणे. (कलम 96), राज्यसभा अध्यक्षांना पदावरून दूर करणे. (कलम 67 बी)
- सभागृहातील पीठासीन अधिकारी पहिल्या फेरीत (First round) मतदान करत नाही. त्यांना निर्णायक मत देण्याचा (Casting Vote) अधिकार असतो.
- सभागृहातील एखादे पद रिक्त (Vacant) असल्यास किंवा एखाद्या व्यक्तीने अधिकार नसतानाही कामकाजात भाग घेतल्यास/मतदान केल्याचे नंतर जरी आढळून आले तरी सभागृहाचे झालेले कामकाज विधिग्राह्य ठरवले जाते.

● **संसदेतील भाषा (Language in parliament) :**

- कलम 120 : संसदेचे कामकाज हिंदी आणि इंग्रजीतून केले जाईल.
- संसद सदस्य पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने आपल्या मातृभाषेतूनही सभागृहामध्ये भाषण करू शकतात.
- कलम 120 : या कलमानुसारच 1965 सालापर्यंतच इंग्रजी भाषेचा वापर करण्यात येणार होता.
- सध्या 1963 साली केलेल्या Official Language Act, 1963 नुसार इंग्रजी भाषेचा वापर सुरु ठेवण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

## ❊ लेम-डक अधिवेशन (Lame-duck Session)

- नवीन लोकसभा निवडणूक झाल्यावर अगोदरच्या लोकसभेचे शेवटचे अधिवेशनास लेम-डक अधिवेशन संबोधतात. विद्यमान लोकसभेतील सदस्य नवीन लोकसभेत निवडून न आल्यास त्यांना लेम-डक म्हटले जाते.
- ही संकल्पना अमेरिकेत जास्त प्रचलित आहे.

## ❊ मंत्र्यांचे आणि महान्यायवाद्याचे अधिकार (Rights of Ministers and Attorney General) :

- मंत्री आणि महान्यायवादी हे दोन्ही सभागृहात आपले मत मांडू शकतात, परंतु मंत्री ज्या गृहाचे सदस्य आहेत, तेथेच मतदान करतील तर महान्यायवादी हे मतदान करू शकत नाही.
- कोणत्याही सभागृहाचा भाग नसलेला मंत्री हा मतदान करू शकत नाही.

## संसदेचे कामकाजाची साधने (Divices of Parliamentary Proceedings)

1) **प्रश्न काळ (Question Hour)** : प्रत्येक बैठकीचा पहिला तास

- सदस्यांच्या प्रश्नांचे निराकरण संबंधीत मंत्री करतात.

● **प्रश्नांचे प्रकार (Types of Questions) :**

अ) तारांकीत प्रश्न (Starred Question)

- उत्तर : तोंडी देण्यात येते.
- उपप्रश्न (Subquestion) : विचारू शकतात.
- अध्यक्ष/सभापती या प्रश्नांना अतारांकीत (Unstarred) गटात रूपांतरीत करू शकतात.
- सदस्य एका दिवशी एकापेक्षा अधिक प्रश्न विचारू शकतात. मात्र कोणत्याही एका दिवशी एका सदस्याच्या एकाच प्रश्नाचे उत्तर मिळते. यात एका दिवशी जास्तीत जास्त 20 प्रश्न घेतले जातात.

Dilip Sir's STEP UP Academy

ब) अतारांकीत प्रश्न (Unstarred Question)
- उत्तर : लेखी स्वरूपात देतात.
- उपप्रश्न (Subquestion) : विचारू शकत नाही.
- यामध्ये आकडेवारीची मागणी, दीर्घ तपशील मागवला जातो.
- उत्तरे देण्यासाठी एका दिवशी एका सदस्याचे चार किंवा पाच प्रश्न समाविष्ट असतील.
  (तारांकित प्रश्नांच्या यादीत याच सदस्याचा प्रश्न समाविष्ट असल्यास 4 नाहीतर 5)
- एका दिवशी जास्तीत जास्त 230 प्रश्न असतात.

क) अल्प सूचना प्रश्न (Short Notice Question)
- 10 दिवसांपेक्षा कमी कालावधीत उत्तर हवे असल्यास
- तशी परवानगी : अध्यक्ष/सभापती आणि संबंधित मंत्री
- प्रश्न विचारण्याचे कारण नमूद करावे.
- याचे तोंडी उत्तर दिले जाते.

- मंत्र्याविरूद्ध खाजगी सदस्यांनाही प्रश्न विचारले जाऊ शकतात. (खाजगी विधेयक असेल तर)
- प्रश्नांचा प्रकार कसा आहे त्यासाठी पुढीलप्रमाणे रंगीत पेपर छापले जातात :
- तारांकित प्रश्न (Starred question) : हिरवा रंगाचा पेपर
- अतारांकित प्रश्न (Unstarred question) : पांढऱ्या रंगाचा पेपर
- अल्पसूचना प्रश्न (Short Notice question) : फिकट गुलाबी रंगाचा पेपर
- खाजगी सदस्यांना विचारले जाणारे प्रश्न (Question by private member) : पिवळ्या रंगाचा पेपर

## ✻ शून्य काळ (Zero Hour) :

- 1962 पासून संसदीय कार्यपद्धतीत भारताने निर्माण केलेली ही पद्धती आहे.
- याचा उल्लेख सभागृहांच्या कार्यपद्धती नियमांमध्ये नाही. (Not mentioned in the rules of procedure)
- सदस्यांना पूर्वसुचना न देता (Without any prior notice) मुद्दे उपस्थित करण्याचे एक महत्त्वाचे साधन
- प्रश्नोत्तराचा तास संपला की लगेच शून्य काळ सुरू होतो.
- सभागृहाचे नियमित कामकाज सुरू होईपर्यंत चालतो.

## प्रस्ताव (Motions)

- याद्वारे सभागृहाने काहीतरी कृती/आदेश/मत व्यक्त करण्याची मागणी केली जाते.
- याद्वारेच सार्वजनिक महत्त्वाच्या सामान्य मुद्यांवर (Matter of general public importance) चर्चा करता येते.
- यासाठी अध्यक्ष/सभासदांची संमती आवश्यक
- मंत्री तसेच खाजगी सदस्य प्रस्ताव मांडू शकतात.
- यावर सभागृह प्रस्ताव स्विकारते/फेटाळते/मत मांडते/निर्णय कळवते.

- **प्रस्तावांची तीन मुख्य गटात विभागणी होते.**

**1) महत्त्वपूर्ण प्रस्ताव (Substantive Motion)**
हा महत्त्वाच्या विषयांवरील स्वतंत्र स्वयंपूर्ण प्रस्ताव असतो. उदा. मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर करणे.

**2) उपप्रस्ताव पर्यायी प्रस्ताव (Substitute Motion)**
- मूळ प्रस्तावाच्या जागेवर (Moved in substitution of an original motion) मांडतात.
- धोरण /परिस्थिती/वक्तव्य/इतर बाब नव्याने विचारात घेण्यासाठी मांडतात.
- याचा स्वीकार केल्यास मूळ प्रस्ताव संपुष्टात येतो. (It supersedes the original motion)

**3) पुरक प्रस्ताव (Subsidiary Motion)**
- एखाद्या प्रस्तावावर आधारलेला/त्याच्याशी संबंधीत/ सभागृहाच्या काही कामकाजाच्या अनुषंगाने मांडला जातो.
- यास वेगळा अर्थ नसतो.

- **याचे तीन प्रकार :**

अ) अनुषांगिक प्रस्ताव (Ancillary Motion)
- एखादे विधेयक विचारात घेतले जावे/संमत केले जावे म्हणून

ब) जागा घेणारा प्रस्ताव (Superseding Motion)
- उदा. : विधेयक प्रवर समितीकडे (Select committee) पाठवावे, संयुक्त समितीकडे (Joint committee) पाठवावे, विधेयकावरील चर्चा अनिश्चित काळासाठी तहकूब करावे याबाबत.

क) सुधारणा (Amendment)
- विधेयकात/अधिनियमात/प्रस्तावात बदल करण्याबाबत.

## ✻ प्रस्तावाचे प्रकार :

- **समाप्ती / कटौती प्रस्ताव (Closure Motion)**
- एखाद्या प्रश्नाविषयी चर्चा थांबवण्याबाबत हा प्रस्ताव मांडण्यात येतो.
- हा प्रस्ताव स्विकारणे हा अध्यक्ष/सभापतींचा स्वविवेकाधिकार आहे.
- जर हा प्रस्ताव स्वीकारला तर यावर मतदान होते.

- **याचे चार प्रकार :**

1) साधारण कटौती (Simple closure) : चर्चा पुरे, मतदान घ्या.
2) घटकनिहाय कटौती (Closure by compartments) : विधेयकाच्या तरतूदी गटांमध्ये विभाजीत केल्या जातात. चर्चा गटनिहाय परंतु मतदान पूर्ण विधेयकावर.
3) कांगारू कटौती (Kangaroo closure) : केवळ महत्वाच्या तरतूदी मतदान/चर्चेसाठी घेतल्या जातात व इतर तरतूदी पारीत केल्याचे गृहीत धरतात.
4) गिलोटीन कटौती (Guillotine closure) : वेळेअभावी चर्चा झाली नाही असे विधेयके एकत्र करून मतदानासाठी ठेवतात.

### ❊ हक्कभंग/विशेषाधिकार प्रस्ताव (Privilege Motion)

- संसदीय मंत्र्याविरूध्द असा प्रस्ताव मांडता येतो.
- संसदीय विशेषाधिकाराचा भंग केल्याप्रकरणी (म्हणजेच माहिती लपवणे, चुकीची माहिती देणे (Wrong or distorted facts)).
- यावरून सभागृह /सदस्य/अनेक सदस्यांच्या अधिकाराचा भंग झाला आहे असे गृहीत धरून हा प्रस्ताव मांडतात.

### ❊ लक्षवेधी/ध्यानाकर्षन प्रस्ताव (Calling Attention Motion)

- भारतीय संसदीय शासन पध्दतीत निर्माण झालेली पद्धती (Matter of urgent public importance)
- 1954 पासून सुरू
- उद्देश : मंत्र्याचे संबंधीत परंतु सार्वजनिकदृष्ट्या महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधणे.
- अशी सूचना 1 दिवस अगोदर द्यावी लागते.
- प्रश्न व उपप्रश्न (Question and sub-questions) विचारले जाऊ शकतात.
- यासाठी सभापतींची /अध्यक्षांची परवानगी आवश्यक

### ❊ स्थगन प्रस्ताव (Adjournment Motion)

- उद्देश : तातडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या मुद्याकडे सभागृहाचे लक्ष वेधणे. (50 सदस्यांचा पाठींबा)
- विषय : केंद्र सरकारच्या कृतीशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे संबंधीत असावा.
- सरकारच्या कर्तव्यकसुरीबाबत अचूक नमूद असावे.
- याबाबत अधिकार केवळ लोकसभेला
- यावर चर्चा : किमान अडीच तास चालते.

- हा प्रस्ताव मांडण्यासाठी सदस्यांवर असलेली बंधने :

1) स्थगन प्रस्तावातील मुद्दा निश्चित, वस्तुनिष्ठ, तातडीचा आणि सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाचा असावा.
2) त्यात एकापेक्षा जास्त मुद्दे समाविष्ट नसतील.
3) तो नुकत्याच घडलेल्या विशेष मुद्यांशी संबंधीत असावा. (A specific matter of recent occurrence)
4) तो विशेषाधिकाराच्या प्रश्नाशी संबंधित नसावा. (Should not raise a question of privilege)
5) या अगोदर, त्याच अधिवेशनात आधी चर्चा केलेल्या विषयावर पुन्हा चर्चेची मागणी केलेली नसावी.
6) यात न्यायालयात प्रलंबित असलेला मुद्दा (Matter that is under adjudication by court) नसावा.

| **अविश्वास ठराव (No Confidence Motion)** | **निंदा प्रस्ताव (Censure Motion)** |
|---|---|
| - कारणे नमूद करणे गरजेचे नाही.<br>- संपूर्ण मंत्रीमंडळाविरोधात मांडतात.<br>- मंत्रीमंडळ लोकसभेचा विश्वास धारण करते आहे का हे पाहण्यासाठी मांडतात.<br>- संमत झाल्यास मंत्रीमंडळ राजीनामा देते. | - कारणे नमूद करणे गरजेचे.<br>- एक/काही मंत्री/मंत्री मंडळाविरोधात मांडतात.<br>- मंत्रिमंडळाच्या विशिष्ट धोरणांवर किंवा कृतींवर टिकाटिपण्णी करण्यासाठी मांडला जातो.<br>- संमत झाल्यास मंत्रिमंडळ राजीनामा देत नाही परंतू, राजीनामा देणे अपेक्षित असते. |

### ❊ धन्यवाद प्रस्ताव (Motion of Thanks)

- राष्ट्रपतींचे अभिभाषण : नवीन लोकसभेची पहिली बैठक किंवा वर्षाच्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीला
- या अभिभाषणात सरकारच्या मागील व चालू वर्षातील धोरणे व कार्यक्रमांची माहिती देतात.
- यानंतर दोन्ही सभागृहांमध्ये स्वतंत्ररित्या राष्ट्रपतींच्या अभिभाषणातील मुद्यांवर चर्चा करण्यासाठी धन्यवाद प्रस्ताव मांडतात.
- यासाठी पंतप्रधान दोन सदस्य निवडतात. त्यातील एक प्रस्ताव मांडतो. तर दुसरा अनुमोदन देतो.
- या प्रस्तावावर टिका करण्याचाही अधिकार असतो, या प्रस्तावाच्या चर्चेला उत्तर पंतप्रधान देतात.
- चर्चेनंतर मतदान होऊन संमत केला जातो, तो संमत न झाल्यास सरकारचा पराभव समजला जातो.

Dilip Sir's STEP UP Academy

**※ चर्चेचा अर्धा तास (half an Hour Discussion) :**

- अगोदर चर्चा झालेल्या प्रश्नांच्या उत्तरातून निर्माण झालेल्या उपप्रश्नांवर चर्चा करण्यासाठी अर्धा तास राखीव असतो.
- आठवड्यातले तीन दिवस : सोमवार, बुधवार, शुक्रवार
- विषय सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाचा असावा. (शक्यतो तारांकीत, अतारांकीत किंवा अल्पसूचना प्रश्नांच्या संबंधित असावा)
- 3 दिवस अगोदर पूर्वसूचना द्यावी.
- एका अधिवेशनादरम्यान सभासद केवळ दोन वेळाच हा प्रस्ताव मांडू शकतो.

**※ अल्पकालीन चर्चा (Short Duration Discussion)**

- सदस्य तातडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या मुद्यावर चर्चा करू इच्छित असल्यास तो अशी लेखी नोटीस देतो. (नोटीस वर इतर दोन सदस्यांच्या सह्या आवश्यक)
- यात चर्चेच्या मुद्याच्या स्पष्ट व तंतोतंत उल्लेखाबरोबरच चर्चेची कारणे सुद्धा नमूद करावी लागतात.
- यास दोन तासांपेक्षा जास्त कालावधी देता येत नसल्याने यास दोन तासांची चर्चा असेही म्हणतात.

**※ हरकतीचा मुद्दा/औचित्य प्रश्न (Point of Order)**

- जर सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालत नसेल तर सदस्य हरकतीचा मुद्दा उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधतात.
- याचा वापर विरोधी पक्षांमार्फत सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी करतात.
- पुढील बाबी याअंतर्गत अपवाद आहेत : माहितीची मागणी करणे, स्वतःची स्थिती जाहीर करणे, कोणत्याही प्रस्तावाशी संबंधित सभागृहासमोर असेल तर.
- यात सभापतीच्या अधिकारक्षेत्रातील मुद्दा उपस्थित करावा.
- सभागृहाच्या नियमाचा अर्थ लावणे/अंमलबजावणी करणे किंवा गृहाच्या कामकाजाचे नियमन करणाऱ्या घटनेतील कलमांचा अर्थ लावणे/अंमलबजावणी करणे इ. बाबत हरकतीचा मुद्दा असावा.
- यावर चर्चा होत नाही.

**※ विशेष उल्लेख (Special Mention)**

- इतर कोणत्याही नियमांत मांडता न येणारा मुद्दा हा राज्यसभेत 'विशेष उल्लेख' म्हणून मांडता येतो तर लोकसभेत '**नियम 377 अंतर्गत सूचना**' म्हणून मांडला जातो.

※※※

Dilip Sir's STEP UP Academy

**ठराव/अधिनियम (Resolutions)**

- सार्वजनिक हिताच्या सर्वसाधारण बाबींकडे (Matters of general public interest) गृहाचे किंवा सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सदस्य हा ठराव मांडू शकतात.
- यावर होणारी चर्चा केवळ त्यातील मुद्यांशीच निगडीत असू शकते.
- एकदा ठराव मांडल्यास/बदल सूचविल्यास तो सभागृहाच्या संमतीविना मागे घेता येत नाही.

- **याचे तीन प्रकार :**

1) खाजगी सदस्याचा ठराव (Private members resolution) : मंत्री सोडून इतर सदस्याने मांडलेला ठराव. (यावर केवळ एक आड एक शुक्रवारी (Alternet Friday) दुपारच्या सत्रात चर्चा होते.)
2) सरकारी ठराव (Government resolution) : मंत्र्यांनी मांडलेला ठराव (सोमवार ते गुरुवार कधीही चर्चा होते.)
3) वैधानिक ठराव (Statutory resolution) : मंत्री/खाजगी सदस्य मांडू शकतात. घटनेच्या / संसदीय कायद्याच्या तरतुदीनुसार हा ठराव मांडला जात असल्याने यास वैधानिक ठराव म्हणतात.

- सर्व अधिनियम हे महत्त्वपूर्ण प्रस्ताव या गटात मोडतात. म्हणजेच अधिनियम (Resolution) हा प्रस्तावाचा (Motions) विशेष प्रकार होय. सर्व अधिनियमांवर मतदान होते. मात्र सर्व प्रस्तावांवर असे होत नाही.

**※ संसदेतील कायदानिर्मिती प्रक्रिया (Legislative procedure in parliament) :**

- विधेयकांचे प्रकार (Types of Bills)

| **सार्वजनिक विधेयक (Public Bills)** | **खाजगी विधेयक (Private Bills)** |
|---|---|
| - मंत्र्यांनी मांडललेले विधेयक | - मंत्री व्यतिरिक्त कोणत्याही सदस्याने मांडलेले विधेयक |
| - यावरून सत्ताधारी पक्षाची धोरणे प्रदर्शित होतात. | - यावरुन विरोधी पक्षाची भूमिका प्रदर्शित होते. |
| - संसदेत संमती होणे सोपे | - संसदेत संमत होणे अवघड |
| - हे विधेयक सभागृहाने फेटाळले तर संसदेचा सरकारवर विश्वास नाही, असा अर्थ होतो. | - हे विधेयक संसदेने फेटाळले तर सरकारवर अविश्वास असा अर्थ होत नाही. |
| - यासाठी सभागृहात 7 **दिवसांची** पूर्व-नोटीस द्यावी लागते. | - यासाठी सभागृहात **एक महिन्याची** पूर्व नोटीस द्यावी लागते. |
| - हे विधेयक कायदा विभाग तयार करते. | - हे विधेयक तयार करणे संबंधित संसद सदस्याची जबाबदारी असते. |

- **विधेयकाचे विषयानुरूप प्रकार :**

1) सामान्य विधेयके (Ordinary Bills)
2) धन विधेयके (Money Bills) : कलम 110
3) वित्तीय विधेयके (Financial Bills) : कलम 117
4) घटना दुरुस्ती विधेयक (Constitutional amendment bill) : कलम 368

| **सर्वसाधारण विधेयक (Ordinary bills)** | **अर्थ विधेयक (Money bill)** |
|---|---|
| 1) कोणत्याही गृहात मांडले जाते. | 1) सुरुवातीला फक्त लोकसभेतच मांडले जाते. |
| 2) मंत्री/खाजगी सदस्य मांडतात. | 2) फक्त मंत्री मांडू शकतात. |
| 3) राष्ट्रपतींची शिफारस आवश्यक नाही. | 3) राष्ट्रपतींची शिफारस आवश्यक असते. |
| 4) राज्यसभा दुरुस्ती करू शकते किंवा असंमत करू शकते. | 4) राज्यसभेला दुरुस्तीचा किंवा नाकारण्याचा अधिकार नाही, फक्त शिफारशी सुचवू शकते. |
| 5) राज्यसभा हे विधेयक जास्तीत जास्त 6 महिन्यांसाठी प्रलंबित ठेवू शकते. | 5) राज्यसभा हे विधेयक 14 दिवसांसाठी प्रलंबित ठेवू शकते. |
| 6) यासाठी संयुक्त बैठकीची तरतूद आहे. | 6) यासाठी संयुक्त बैठकीची तरतूद नाही. |
| 7) राष्ट्रपतींचे अधिकार :<br>- संमती देणे.<br>- राखून ठेवणे.<br>- पुनर्विचारासाठी पाठवणे. | 7) राष्ट्रपतींचे अधिकार :<br>- संमती देणे.<br>- राखून ठेवणे.<br>(यांच्या शिफारशीनेच मांडलेले असल्याने राष्ट्रपती संमती देतातच) |

**1) सामान्य विधेयकांबाबत : संमती होण्याची पध्दत**

**अ) प्रथम वाचन (First reading) :** कोणत्याही सभागृहात मांडले जाऊ शकते.

- खाजगी/शासकीय विधेयक असू शकते.

Dilip Sir's STEP UP Academy

- विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची परवानगी आवश्यक असते.
- विधेयकाचे शिर्षक व उद्दिष्टे (title and objective) वाचून दाखवल्यानंतर ते भारताच्या राजपत्रात प्रकाशित करतात.
- या टप्प्यात विधेयकावर चर्चा होत नाही.

**ब) द्वितीय वाचन (Second reading) :**

1) या टप्प्यात : सर्वसाधारण स्वरूपाची चर्चा (general discussion) होते (तपशिलवार नाही)
   - यावर पुढीलपैकी एक पर्याय सभागृह स्वीकारते.
   i) हे विधेयक चर्चेसाठी तात्काळ/ नंतरच्या तारखेला घेणे. (immediately or an some other fixed date)
   ii) हे विधेयक प्रवर समितीकडे (Select Committee) कडे पाठवणे.
   iii) हे विधेयक दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे (Joint Select Committee) पाठवणे.
   iv) या विधेयकावर जनमत आजमावणे. (public opinion)
2) समिती अवस्था (Committee stage) : महत्त्वाचा टप्पा
   - यामध्ये तज्ज्ञ लोकांची मदत घेतली जाते, यामुळे सभागृहाच्या वेळेची बचत होते.
   - चर्चेनंतर समिती अंतिम मसूदा (final draft) सभागृहाकडे पाठवते.
   (येथे मसुद्याचा गाभा न बदलता सुधारणा होऊ शकतात.)
3) प्रतिवृत्त अवस्था (Consideration Stage)
   - विधेयकावर अनुच्छेदनिहाय चर्चा व मतदान (Considers the provisions of the bill clause by clause)

**क) तृतीय वाचन (Third reading) :**

- संपूर्ण विधेयकावर मतदान
- आहे तसे स्वीकारावे/नाकरावे (सुधारणा नाही). (Acceptance or rejection of the bill as a whole and no amendments are allowed)
- जर बहुमताने संमती दिली तर दुसऱ्या सभागृहाकडे मान्यतेसाठी पाठवले जाते.

● विधेयक दुसऱ्या सभागृहात आल्यानंतर (Bill in the second house)

- फक्त दुसऱ्या व तिसऱ्या वाचन टप्प्यांतून प्रवास
- अशा वेळी दुसरे सभागृह ते विधेयक
  1) सुधारणे शिवाय संमत करेल. (Pass the bill as sent by the first house)
  2) सुधारणा सुचवून पुन्हा पहिल्या सभागृहाकडे पाठवेल. (Pass the bill with amendments)
  3) पूर्णपणे फेटाळून लावेल. (Rejects bill)
  4) विधेयकावर काहीही कृती करणार नाही. (It may not take any action and thus keep the bill pending)

● यावरून

1) जर पहिल्या दोन कृतींचा विचार केला तर असे परत आलेले विधेयक पहिले सभागृह स्वीकारते तेव्हा ते विधेयक राष्ट्रपतींकडे संमतीसाठी पाठवले जाते.
2) जर - दुसऱ्या सभागृहाने विधेयक फेटाळले किंवा
   - दुसऱ्या सभागृहाच्या सुधारणा पहिल्या सभागृहात अमान्य झाल्या किंवा
   - दुसऱ्या सभागृहाने सहा महिने काही कृती केली नाही.

- तर राष्ट्रपती संयुक्त बैठक (Joint sitting) बोलावतात. (तेव्हा साधेच बहुमत विचारत घेतले जाते.)

● **विधेयकाबाबत राष्ट्रपतींची भूमिका (Assent of the president) :**

- संमती दिल्यास (Give his assent to the bill) : कायद्यात रूपांतर
- संमती रोखून ठेवल्या (Withhold his assent to the bill) : विधेयक संपूष्टात येते.
- संसदेकडे पुनर्विचारासाठी पाठवल्यास (He may return the bill for consideration) : संसद सुधारणा करून किंवा सुधारणेशिवाय पुन्हा राष्ट्रपतींकडे पाठवते आणि तेव्हा राष्ट्रपतींना सही करावीच लागते.

**2) धन विधेयके – संमती पद्धत (Money bill) :**

- धन विधेयकामध्ये काय समाविष्ट होते याबाबत कलम 110 मध्ये तरतूद आहे.
- यानुसार धन विधेयके पुढील बाबींशी संबंधीत आहेत :
- कर लावणे, रद्द करणे, माफ करणे, बदल करणे. (Imposition, abolition, remission, alteration or regulation of any tax)
- भारत सरकारकडून कर्जाला दिली जाणारी हमी तसेच कर्ज उभारणी प्रक्रियेचे नियंत्रण
- संचित निधी/आपत्कालीन निधी (Consolidated fund or contingency fund) यांचे संरक्षण व नियंत्रण
- संचित निधीतून प्रस्तावीत खर्च (Appropriation of money out of consolidated fund)

Dilip Sir's STEP UP Academy

- एखादा खर्च संचित निधीतून करण्याबाबतचा प्रस्ताव. (Expenditure charged on the consolidated fund)
- संचित निधीत पैसा स्वीकारणे/त्यातून खर्चास परवानगी देणे आणि केंद्र व राज्य यांच्या लेखांचे परीक्षण (Audit of Accounts of Union or State) करणे.
- परंतु पुढील बाबींवरून एखादे विधेयक अर्थ विधेयक आहे असे ठरवता येणार नाही :

1) दंड आकारणे. (Imposition of fines)
2) परवान्यासाठी शुल्क भरणे किंवा त्याची मागणी करणे. (Payment of fees for licenses)
3) स्थानिक प्राधिकरणाने कोणताही कर आकारणे, रद्द करणे, सूट देणे किंवा बदल करणे. (Imposition, abolition, remission, alteration or regulation of any tax by any local authority or body for local purposes.)

- **एखादे विधेयक धनविधेयक आहे काय हे ठरवण्याबाबत :**

- हे ठरवण्याचा अधिकार फक्त लोकसभा अध्यक्षांचाच
- कोणत्याही न्यायालयात त्यास आव्हान देता येत नाही.

- **धनविधेयकाबाबत इतर काही महत्त्वाचे :**

1) प्रथम लोकसभेतच मांडतात.
2) राष्ट्रपतींची पूर्व संमती आवश्यक असते.
3) हे फक्त सरकारी विधेयक असते (खाजगी नाही).
4) धनविधेयकाबाबत राज्यसभेचे अधिकार :
   - मूळ स्वरूपात संमती देणे.
   - 14 दिवस कारवाई न करता प्रलंबीत ठेवणे.
   - शिफारशी सूचवणे. (Recommendations) (लोकसभा गृहीत धरते/फेटाळते)
5) यासाठी संयुक्त बैठकीची तरतूद नाही.
6) राष्ट्रपती प्रलंबित ठेऊ शकत नाही. (पुनर्विचारासाठी पाठवू शकत नाही)
7) विनियोग विधेयक (Appropriation Bill) आणि अर्थसंकल्प (Budget) ही धनविधेयके म्हणून मंजूर केली जातात.

**3) वित्तीय विधेयक (I) (Financial Bill I) कलम 117 (1)**

- कलम 110 मधील तरतूदींसह इतरही सामान्य तरतूदींचा समावेश असतो.
- सुरुवातीस फक्त लोकसभेत मांडतात (राज्यसभेत नाही)
- त्यासाठी राष्ट्रपतींची पूर्व संमती आवश्यक
- संसदेत मंजूर होताना सामान्य विधेयकाप्रमाणेच मंजूर होते.
- राज्यसभेचे अधिकार सामान्य विधेयकाप्रमाणेच असतात.
- यासाठी संयुक्त बैठकीची तरतूद असते.
- संमतीसाठी राष्ट्रपतींचे अधिकार सामान्य विधेयकाप्रमाणेच असतात.

**4) वित्तीय विधेयक II (Financial Bill II) : कलम 117 (3)**

- यामध्ये संचित निधीतून (Consolidated Fund of India) करावयाच्या खर्चाची तरतूद असते. (यात कलम 110 मधील कोणताच विषय नमूद नसतो.)
- हे सामान्य विधेयकाप्रमाणेच असल्याने ते संमत होण्याची पद्धतीसुद्धा सामान्य विधेयकाप्रमाणेच असते.
- असे विधेयक कोणत्याही सभागृहामध्ये प्रथम मांडता येऊ शकते.
- म्हणून यासाठी राष्ट्रपतींची पूर्व संमती (Consideration of the Bill) आवश्यक नसते. (परंतु हे विधेयक सभागृहामध्ये विचारात घेण्यासाठी मात्र राष्ट्रपतींची पूर्व शिफारस आवश्यक असेल.)
- यासाठी संयुक्त बैठकीची तरतूद आहे.
- राष्ट्रपतींचे अधिकार सामान्य विधेयकाप्रमाणेच असतात.
- राज्यसभेचे अधिकार सामान्य विधेयकाप्रमाणेच असतात.

**5) घटनादुरुस्ती विधेयक (Constitutional amendment bill) :**

- कोणत्याही सभागृहात मांडता येते.
- राष्ट्रपतींच्या शिफारशींची आवश्यकता नसते.
- हे विधेयक खाजगी सदस्याद्वारे मांडले जाऊ शकते.
- प्रत्येक सभागृह विशेष बहुमताने (Special majority) पारीत करील.
- यासाठी संयुक्त बैठकीची (Joint sitting) तरतूद नाही.
- राष्ट्रपतींना यावर सही करणे बंधनकारक असते. (24 वी घटनादुरुस्ती)

**※ संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक (Joint sitting of parliament) :**

- घटनेनुसार राष्ट्रपती दोन परिस्थितीत बोलवतात.

1) कलम 108 नुसार : सामान्य किंवा वित्तीय विधेयकावर कोंडी झाली असेल तर
2) अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या (Budget session) सुरुवातीला किंवा सामान्य निवडणूका (General election) झाल्यावर (लोकसभा) अभिभाषण करण्यासाठी राष्ट्रपती दोन्ही सभागृहांना एकत्रितपणे संबोधीत करतात.

- धन विधेयक व घटनादुरुस्ती विधेयकाबाबत संयुक्त बैठक घेतली जात नाही, कारण

- धनविधेयकाबाबत : राज्यसभेला फक्त शिफारशीचा अधिकार, तिला ते मंजूर करावेच लागते.
- घटनादुरुस्तीबाबत : जर संयुक्त अधिवेशन झाले तर बहुमत लोकसभेलाच असेल मग राज्यसभेचे काही काम राहणार नाही.

- **पुढीलप्रकारे दोन्ही सभागृहामध्ये विधेयकाबाबत कोंडी निर्माण होऊ शकते :**

1) दुसऱ्या गृहाने विधेयक असंमत केले तर (If the bill is rejected by the other house)
2) विधेयकात सुचविलेल्या दुरुस्त्यांबाबत दोन्ही गृहात एकमत झाले नाही तर (If the houses have finally disagreed as to the amendments to be made in the bill)
3) दुसऱ्या गृहाला विधेयक मिळाल्यापासून सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आणि तरीसुद्धा त्या गृहाने विधेयक संमत केलेले नाही. (If more than six months have elapsed from the date of the receipt of the bill by other house without the bill being passed by it.)

- **संयुक्त बैठक :**

- दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थानी लोकसभा सभापती असतात.
  (सभापती गैरहजर असल्यास उपसभापती, उपसभापती गैरहजर असल्यास राज्यसभेचा उपाध्यक्ष आणि तिघेही गैरहजर असल्यास संयुक्त बैठकीतील सदस्य ठरवतील तो सदस्य या बैठकीचे अध्यक्षस्थानी असतो. राज्यसभेचे अध्यक्ष (उपराष्ट्रपती) हे दोन्हीही सभागृहांचे सदस्य नसल्याने त्यांना या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविता येत नाही.)
- गणपूर्ती (Quorum) : दोन्ही गृहांच्या सदस्य संख्येच्या एक-दशांश (1/10)
- कामकाजाची पद्धती : लोकसभेच्या प्रक्रियेच्या नियमानुसार
- मतदान : उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने (साधे बहुमत)

- **आतापर्यंत फक्त तीन वेळा संयुक्त बैठका आयोजित केलेल्या आहेत.**

1) हुंडा प्रतिबंध कायदा, 1960 (Dowry Prohibition Bill, 1960) (6 मे 1961 रोजी संयुक्त बैठक)
2) बँकिंग सेवा आयोग (रद्द) विधेयक, 1977 (Banking Services Commission (Repeal) Bill, 1977) (16 मे 1978 रोजी संयुक्त बैठक)
3) दहशतवाद प्रतिबंध विधेयक, 2002 (Prevention of Terrorism Bill, 2002) (26 मार्च 2002 रोजी संयुक्त बैठक)

✻ **अर्थसंकल्प (Budget) :**

- घटनेतील कलम 112 : 'वार्षिक वित्तीय पत्रक' (Annual Financial Statement) असा उल्लेख.
- भारतीय आर्थिक वर्ष : 1 एप्रिल ते 31 मार्च

- **अर्थसंकल्पातील नमूद घटक :**

1) महसुली आणि भांडवली जमेचे अंदाज (Estimated of revenue and capital receipts)
2) महसूल उभारण्याचे मार्ग व योजना (Way and means to raise the revenue)
3) खर्चाचे अंदाज (Estimates of expenditure)
4) संपणाऱ्या आर्थिक वर्षासाठी प्रत्यक्ष जमा व खर्चाचे तपशील आणि त्या वर्षातील तुटीची/शिलकीची कारणे. (Reasons for any deficit or surplus in that year)
5) पुढील वर्षासाठीची आर्थिक आणि वित्तीय धोरणे (Economic and financial policy of the comig year) म्हणजेच कर प्रस्ताव, महसूल अंदाज, खर्चाचे कार्यक्रम, नवीन योजना/प्रकल्प सुरु करण्याबाबत.

- 1924 पासून (ॲकवर्थ समितीच्या शिफारशींनुसार) रेल्वे अर्थसंकल्प सर्वसाधारण अर्थसंकल्पापासून वेगळा केला होता.
- 2017-18 पासून रेल्वे अर्थसंकल्प वेगळा मांडण्याची प्रथा बंद केली असून हा साधारण अर्थसंकल्पाचाच भाग बनवण्यात आला आहे. (विवेक देबोरॉय समितीची शिफारस)

- **अर्थसंकल्पाबाबत घटनात्मक तरतुदी (Constitutional provisions) :**

1) प्रत्येक वर्षासाठी भारत सरकारचे अंदाजे जमा व खर्चाचे पत्रक संसदेच्या दोन्ही गृहांना सादर करावे याबाबत राष्ट्रपती सुनिश्चित करतील. (कलम 112)
2) कोणतीही अनुदानाची मागणी (Demands for Grants) राष्ट्रपतींच्या शिफरशीशिवाय करता येणार नाही.
3) संचित निधीतून कोणतेही पैसे कायद्याने केलेल्या विनियोजनाव्यतिरिक्त (Appropriation) काढता येणार नाही.
4) कायद्याने प्राधिकृत केलेल्या पद्धतीशिवाय कराची आकारणी किंवा वसूली करता येणार नाही. (कलम 265)
5) कर आकारणी करणारे कोणतेही धन विधेयक राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय संसदेत मांडता येणार नाही.
6) संसद एखादा कर कमी करू शकते किंवा रद्द करू शकते मात्र त्यात वाढ करू शकत नाही.
7) अर्थसंकल्प कायदा करण्याबाबत दोन्ही गृहांची भूमिका :
   अ) अर्थविधेयक / करासंबंधीचे वित्त विधेयक फक्त लोकसभेतच सादर करावे लागते.
   ब) राज्यसभा यात दुरुस्ती करू शकत नाही म्हणजेच फक्त शिफारशी सुचवेल आणि त्या शिफारशी लोकसभा स्वीकारेल किंवा नाकारेल.
   क) राज्यसभा हे विधेयक 14 दिवसांच्या आत परत

Dilip Sir's STEP UP Academy

लोकसभेकडे पाठवेल, जर नाही पाठवले तर राज्यसभेने सदर विधेयक मंजूर केले असून ते पुढे राष्ट्रपतींकडे पाठवले जाते.

8) अर्थसंकल्पात महसूली खर्च इतर खर्चापेक्षा वेगळा दाखवला जाईल.

9) संचित निधीतून होणाऱ्या भारीत खर्चावर (Charged on expenditure) मतदान होत नाही मात्र चर्चा होऊ शकते.

- **संचित निधीत नमूद असलेल्या काही तरतूदी :**

1) राष्ट्रपती वेतन व भत्ते आणि त्यांचा कार्यालयीन खर्च
2) राज्यसभा अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच लोकसभा/सभापती, उपसभापती यांचे वेतन व भत्ते
3) भारत सरकारचे देणे असलेला ऋणासंबंधित खर्च (व्याज, राखीव निधी, परतफेडीचा खर्च, इ.)
4) इतर कोणतीही तरतूद जी संसद ठरवेल.
5) सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे पगार, भत्ते आणि पेन्शन (Salaries, allowances and pensions)
6) उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे पेन्शन
7) CAG यांचे पगार, भत्ते, पेन्शन
8) UPSC अध्यक्ष व सदस्यांचे पगार, भत्ते, पेन्शन

- **अर्थसंकल्प मांडणे :**

1) अगोदर फेब्रुवारी महिन्याच्या कामाच्या शेवटच्या दिवशी सादर केला जात असे परंतु सन 2017 पासून अर्थसंकल्प 1 फेब्रुवारी रोजी मांडण्यात येत आहे. लोकसभेत सादर झाल्यानंतर राज्यसभेपुढेही मांडतात.
2) सर्वसाधारण चर्चेला कालावधी 3 ते 4 दिवसांचा असतो. या दरम्यान कपात प्रस्ताव (Cut motions) मांडता येत नाही, तसेच अर्थसंकल्पावर मतदान घेता येत नाही.
3) त्यानंतर अस्तित्त्वात असलेल्या 24 विभागीय समित्यांकडून छाननी (Scrutiny by deportmental committees) होते. या दरम्यान सभागृहास 3-4 आठवड्यांची स्थगिती असते.
4) त्यानंतर मंत्रालय निहाय मागण्यांवर लोकसभेत मतदान घेतले जाते.
5) सर्वसाधारण अर्थसंकल्पामध्ये एकूण 109 मागण्या असतात. (103-नागरी खर्चासाठी, 6-संरक्षण खर्चासाठी) तर रेल्वे अर्थसंकल्पात 32 मागण्या असतात. यावर प्रत्येक मागणीवर स्वतंत्र मतदान होते. येथे अनुदानाची मागणी (Demands for grants) कमी करण्याची सूचना होऊ शकते, यास 'कपात प्रस्ताव' (Cut motion) म्हणतात.

- **याचे प्रकार :**

1) **काटकसर कपात प्रस्ताव (Economy Cut Motion) :**
- अनुदानाची रक्कम ठराविक रकमेने कमी करण्याची मागणीसाठी हा प्रस्ताव केला जातो. (यात कपातीची कारणे व काटकसर कशी होईल याबाबत माहिती द्यावी लागते.

2) **धोरणात्मक कपात प्रस्ताव (Policy Cut Motion) :**
- मागणी केलेली धोरणे अमान्य आहे, असे या प्रस्तावातून दर्शवले जाते.
- मागणीची रक्कम 1 रुपयापर्यंत कमी करावी, असे यात नमूद केले जाते.

3) **प्रतिकात्मक कपात प्रस्ताव (Token Cut Motion) :**
- यातून भारत सरकारच्या उत्तरदायितवाबाबत नाराजी व्यक्त होते.
- मागणीची रक्कम 100 रु. ने कमी करण्यात यावी असे यात नमूद असते.

**※ गिलोटीन (Guillotine) :**

- मागण्यांवर मतदानासाठी 26 दिवस राखीव असतात. शेवटच्या दिवशी सभापती उरलेल्या सर्व मागण्यांवर मतदान घेतात आणि चर्चा संपुष्टात येते.

**※ विनियोग विधेयक संमत करणे (Passing of Appropriation Bill)**

- कलम 114(3) : भारताच्या संचित निधीतून कोणतेही पैसे कायद्याने केलेल्या विनियोगाव्यतिरिक्त काढता येणार नाही.
- अनुदानाच्या मागण्यांना संमती देणे म्हणजे तो विभाग / मंत्रालय पुढील वर्षासाठी ती रक्कम खर्च करून शकतो.
- परंतु हे पैसे संचित निधीतून प्राप्त करण्यासाठी संसदेची संमती आवश्यक असल्याने विनियोग विधेयक (Appropriation Bill) मांडले जाते.
- हे अनुदानाच्या मागण्यांवर मतदान झाल्यावर मांडतात.

- यद्वारे पुढील नमूद खर्च भागविण्यासाठी संचित निधीतून पैसे प्राप्त होण्याची परवानगी मिळते :

1) लोकसभेत संमत झालेल्या अनुदानाच्या मागण्या (The grants voted by the lok sabha)
2) संचित निधीवर प्रभारीत खर्च (Expenditure charged on the consolidated fund of India)

- यावर राष्ट्रपतींची संमती मिळाल्यास याचे विनियोग कायद्यात (Appropriation act) रूपांतर होते.

Dilip Sir's STEP UP Academy

- वरील प्रक्रिया पार पडताना वेळ लागतो. तेव्हा 31 मार्च नंतर सरकारला लागणारा खर्च हा आगाऊ निधीतून पुरवला जातो. हा अधिकार घटनेने दिला आहे. यालाच लेखानुदान (Vote on Account) म्हटले जाते.
- लेखानुदान हे अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपल्यानंतर संमत केले जाते. यात साधारणपणे दोन महिन्यांच्या कालावधीसाठी एकूण अर्थसंकल्पीय रकमेच्या 1/6 निधी संमत केला जातो.

**※ इतर अनुदाने (Other Grants) :**

- अर्थसंकल्पातील नेहमीच्या जमाखर्चाव्यतिरिक्त काही विशेष परिस्थितीत गरज पडल्यास इतर अनुदानांची तरतूद केलेली आहे. (कलम 115 अंतर्गत)

**1) पुरक अनुदान (Supplementary Grant)**

- ज्यावेळी संसदेने विनियोजन विधेयकाद्वारे संमत केलेल्या एखाद्या विशिष्ट खर्चाची रक्कम त्या वर्षासाठी अपुरी ठरते.

**2) अतिरिक्त अनुदान (Additional Grant)**

- ज्यावेळी त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात विचारात न घेण्यात आलेली एखादी खर्चाची बाब नंतर उद्भवते.

**3) जादा अनुदान (Excess Grant)**

- ज्यावेळी चालू वर्षात एखाद्या बाबींवरील खर्च संसदेने संमत केलेल्या खर्चापेक्षा जास्त होतो.
- हे अनुदान लोकसभा पुढील आर्थिक वर्षात पारित करते. परंतु लोकसभेसमोर ठेवण्याअगोदर लोकलेखा समितीची संमती आवश्यक असते.

- **कलम 116(1) : अंतर्गत लेखानुदान (Vote on Account) पत अनुदान (Vote of Credit) आणि अपवादात्मक अनुदान (Exceptional Grant) तरतुद.**

**1) लेखानुदान (Vote on Account)**

- अर्थसंकल्प मंजूर होण्याची प्रक्रिया मे महिन्यापर्यंत चालते, अशा वेळी 31 मार्च नंतर दैनंदिन खर्चासाठी घटनेतील तरतूदीप्रमाणे आगाऊ स्वरूपात निधी दिला जातो यास लेखनुदान म्हणतात.
- साधारण परिस्थितीत हे 2 महिन्यांसाठी मंजूर केले जाते तर लोकसभा निवडणूकीच्या वर्षात हे साधारण 4 ते 5 महिन्यांसाठी मंजूर केले जाऊ शकते.

**2) पत अनुदान (Vote of Credit)**

भारताच्या वित्तीय संसाधनांवर अनपेक्षितपणे निर्माण होणारी मागणी पूर्ण करता यावी यासाठी ही तरतूद आहे. यास लोकसभेने कार्यकारी मंडळाला दिलेला Blank Cheque असे म्हणतात.

**3) अपवादात्मक अनुदान (Exceptional Grant)**

- हे विशिष्ट उद्दिष्टांसाठी संमत केले जाते, जे की कोणत्याही वित्तीय वर्षाच्या चालू खर्चाशी संबंधित नसेल.

**※ लाक्षणिक अनुदान (Token Grant)**

- या मागणीत एका बाबींवरील खर्च दुसऱ्या नवीन बाबीवर वळविण्यासाठी पुनर्विनियोजनाद्वारे (Reappropriation) केला जातो.
- यात 1 रु.च्या प्रतिकात्मक रकमेची मागणी लोकसभेसमोर संमतीसाठी ठेवली जाते. मागणी मान्य झाल्यास रक्कम नवीन बाबींसाठी उपलब्ध करून दिली जाते.
- यात खर्चाचे हस्तांतरण होते, नवीन खर्च समाविष्ट नसतो.
- वरील सर्व अनुदानांच्या मागण्यांसाठी साधारण अर्थसंकल्पासारख्याच पद्धतीचा अवलंब केला जातो.

**※ निधी (Constitutional Fund) :**

- **केंद्र सरकारसाठी निधीचे 3 प्रकार :**

1) संचित निधी (Consolidated Fund of India) : कलम 266(1)
2) सार्वजनिक लेखा (Public Account of India) : कलम 266(2)
3) भारताचा आकस्मिक निधी (Contingency Fund of India) **: कलम 267**

**1) भारताचा संचित निधी :** यात पुढील निधी जमा असतो :

अ) सरकारला प्राप्त होणारा महसूलः कर व करतेर उत्पन्न (All revenues received by Govt. of India)

ब) सरकारने घेतलेली सर्व कर्जे (All loans raised by govt.)

क) सरकारने दिलेल्या कर्जाच्या परतफेडीतून प्राप्त होणारे पैसे (All money received by govt. in form of repayment of loans)

ड) सार्वजनिक उद्योगांचा नफा.

- यातूनच सरकारच्या वतीने कायदेशीर संमती मिळालेले सर्व खर्च केले जातात.
- यातून पैसे काढण्यासाठी संसदेची परवानगी आवश्यक असते. (त्यासाठी विनियोग विधेयकास संमती मिळणे गरजेचे असते.)

**2) भारताचे सार्वजनिक लेखे (Public Account of India):**

- संचित निधीत जमा होणारा निधी वगळता भारत सरकारला

मिळणारा किंवा त्याच्या वतीने मिळणारा इतर सार्वजनिक निधी यात जमा होतो. यात भविष्य निर्वाह निधी, न्यायीक ठेवी, पोस्टातील बचती इ. (Provident fund deposits, judicial deposits, saving bank deposits, departmental deposits, remittances etc.) रक्कम समाविष्ट असते.

- या निधीतून खर्च करताना संसदेच्या मान्यतेची गरज नसते. (हे पेमेंट्स बँकिंग व्यवहाराप्रमाणे असतात.)

3) **भारताचा आकस्मिक निधी (Contingency Fund of India) :**

- यात कायद्याने निश्चित केलेला निधी जमा केला जातो. त्यासाठी 'आकस्मिक निधी कायदा, 1950' हा लागू आहे.
- हा निधी राष्ट्रपतींच्या नियंत्रणाखाली असतो, यांच्या वतीने वित्त सचिव (Finance saretary) हा निधी धारण करतात.
- खर्च करण्यासाठी संसदेची मंजूरी आवश्यक नसते. परंतु झालेला खर्च संसदेसमोर मांडून संमत करून घ्यावा लागतो.

**※ संसदीय समित्या (Parliamentary Committees) :**

**संसदीय समित्या**

↓ ↓

स्थायी समिति (Standing committees) — तदर्थ समिति (Adhoc committees)

↓ ↓ ↓ ↓ ↓

वित्तीय (Financial) — विभागीय (Departmental) — इतर (Other) — चौकशी (Inquiry) — सल्लागार (Advisory)

वित्तीय:
1) लोकअंदाज (Estimates)
2) लोकलेखा (Public Account)
3) सार्व-उपक्रम समिती (Public Undertakings)

विभागीय: (एकूण 24)

इतर:
1) कामकाज सल्लागार समिती (Business advisory)
2) विशेषाधिकार समिती (Special power committee)
3) नियम समिती, सभागृह समिती (Rules comiittee)
4) अनु.जाती. व जमाती कल्याण (Welfare of SC & ST) समिती
5) महिला सबलीकरणा बाबतची (Empowerment of women) समिती

1) **लोकअंदाज समिती (Estimates Committee) :**

- सर्व 30 सदस्य लोकसभेतील सदस्य (निवडणूक : एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशिर प्रतिनिधित्व पद्धती (The principle of proportional representation by means of the single transferable vote))
- कार्यकाल : 1 वर्ष
- उगम : 1921 साली स्थापन झालेल्या स्थायी वित्तीय समितीच्या (Standing financial committee) स्वरूपात.
- 1950 : तत्कालीन वित्त मंत्री जॉन मथाईंची शिफारस
- सुरुवातीस 25 सदस्य, 1956 पासून 30 सदस्य
- मंत्री या समितीचा सदस्य नसेल
- या समितीचे अध्यक्ष हे सत्ताधारी पक्षाचे असतात.

● कार्य : अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील धोरणे लक्षात घेऊन प्रशासनिक किंवा संघटनात्मक सुधारणा सुचवणे.

- कार्यक्षमता वाढवण्याबाबत तसेच खर्चात काटकसर करण्याबाबत पर्यायी धोरणे सुचवणे.
- ही समिती अर्थसंकल्पीय अंदाजांचे पूर्ण वित्तीय वर्षात वेळोवेळी परीक्षण करते त्यामुळे या समितीस Continuous Economy Committee म्हणतात.
- अंदाजामध्ये सुचवलेल्या धोरणांच्या मर्यादेत निधी उपलब्ध आहे की नाही, याबाबत परीक्षण करते.
- ही समिती वरील कामे सार्वजनिक उपक्रमांच्या बाबतीत करत नाही. कारण ते काम - सार्वजनिक उपक्रम समितीचे आहे. एखाद्या वर्षाच्या संपूर्ण अंदाजांचे परीक्षण समितीवर बंधनकारक नाही.
- या समितीने अहवाल सादर केला नाही तरी अनुदानाच्या मागण्यावर अंतिमतः मतदान होतेच.

● **मर्यादा :**

- संसदेने घालून दिलेल्या धोरणाबाबत समिती प्रश्न उपस्थित करू शकत नाही.
- यांच्या शिफारशी सल्ला स्वरुपाच्या असतात त्यामुळे मंत्रालयांवर बंधनकारक नसतात.
- संसदेने मतदान केल्यानंतरच समिती अर्थसंकल्पीय अंदाजांचे परीक्षण करते.
- या समितीला CAG सहाय्य करत नाही.

2) **लोकलेखा समिती (Public Account Committee)**

- 1919 च्या कायद्याच्या शिफारशीनुसार 1921 ला स्थापन
- कार्यकाल : 1 वर्ष
- सदस्य : 22 (15 : लोकसभा, 7 : राज्यसभा)
- लोकसभेतील आणि राज्यसभेतील सदस्य निवडून देतात. (निवडणूक : एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशिर प्रतिनिधित्व पद्धती)

Dilip Sir's STEP UP Academy

- 1967 पासून या समितीचे अध्यक्ष हे विरोधी पक्षातून नेमले जातात. (असे पहिले : मिनू मसानी)
- कार्य : CAG च्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालांची तपासणी करणे. (CAG हे या समितीचे मार्गदर्शक, मित्र, तत्त्वज्ञ)
- याद्वारे : केवळ तांत्रिक व औपचारीक दृष्टीने तपासणी न करता झालेला खर्चाची योग्यता, अपव्यय, भ्रष्टाचार इ. घटना शोधून काढण्याचे कार्य करतात.
- **मर्यादा :**
- या समितीचा धोरणात्मक प्रश्नांशी संबंध नाही.
- खर्च झाल्यावर समिती परीक्षण करते.
- दैनंदिन प्रशासनात हस्तक्षेप करण्याचा समितीचा अधिकार नाही.
- या समितीचे कार्य सल्लागारी स्वरूपाचे आहे त्यामुळे ते मंत्रालयांवर बंधनकारक नसतात.
- समितीच्या निर्णयावर केवळ संसदच अंतिम निर्णय घेऊ शकते.

**✲ सार्वजनिक उपक्रम समिती (Committee on Public Undertakings)**

- कृष्ण मेनन समितीच्या शिफारशीनुसार ही समिती स्थापन करण्यात आली.
- ही समिती 1964 साली स्थापन झाली.
- कार्यकाल : 1 वर्ष
- सदस्य : अगोदर 15, सध्या 22 (1974 पासून)
- 15 सदस्य : लोकसभेतून निवडून (निवडणूक : एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशिर प्रतिनिधित्व पद्धती)
- 7 सदस्य : राज्यसभेतून निवडून
- लोकसभेचे सदस्यच हे या समितीचे अध्यक्ष होऊ शकतात.
- कार्ये : सार्वजनिक उपक्रमांचे अहवाल व लेखे तपासणे. (सर्व सरकारी कंपन्या व वैधानिक मंडळे)
- सार्वजनिक उपक्रमांवरील महालेखापरीक्षकांचे अहवाल तपासणे.
- सार्वजनिक उपक्रमांची स्वायत्तता आणि कार्यक्षमता या संदर्भात त्यांचे कामकाज उत्कृष्ट उद्योग तत्त्वानुसार आणि सुज्ञ व्यापारी प्रणालीनुसार चालू आहे का याचे परीक्षण करणे.
- **मर्यादा :**
- सार्वजनिक उपक्रमांच्या व्यवहारांपेक्षा व व्यापारी कार्यांपेक्षा भिन्न असलेल्या शासकीय धोरणात्मक बाबींशी या समितीचा काही संबंध नसतो.
- दैनंदिन प्रशासनाच्या बाबींशी संबंधित बाबी या समितीशी निगडीत नसतात.
- या समितीत कोणी तज्ज्ञ व्यक्ती नसल्याने तांत्रिक मुद्यांची तपासणी होत नाही.
- या समितीच्या शिफारशी सल्ला स्वरूपाचे असल्याने त्या मंत्रालयांवर बंधनकारक नसतात.
- **विभागीय स्थायी समित्या (Departmental Standing Committees) :**
- स्थापना : 1993 – 17 समित्या
  2004 – 7 समित्या
- सर्व मंत्रालय आणि विभाग यांच्यामध्ये एकूण 24 समित्या पूर्णतः कार्यरत आहेत.
- 2004 पर्यंत 17 समित्या होत्या.
  (पैकी 8 : राज्यसभेतंर्गत, 16 : लोकसभेंतर्गत)
- कार्यकारी विभागाचे (मंत्रिमंडळाचे) संसदेप्रति असलेले उत्तरदायित्व – विशेषतः आर्थिक उत्तरदायित्व – अधिक सुनिश्चित करावे, हा स्थायी समित्यांचा मुख्य उद्देश असतो. अर्थसंकल्पावर प्रभावी चर्चा होण्यासाठीसुद्धा या समित्या संसदेला साहाय्य करतात.
- केंद्र सरकारची सर्व मंत्रालये 24 स्थायी समित्यांच्या कार्यकक्षेत येतात.
- प्रत्येक स्थायी समितीत 31 सदस्य (लोकसभेतून 21 सदस्य व राज्यसभेतून 10 सदस्य) असतात. सभापती लोकसभेतील सदस्यांपैकी व अध्यक्ष राज्यसभेतील सदस्यांपैकी समितीचे सदस्य नामनिर्देशित करतात.
- कोणत्याही स्थायी समितीवर नामनिर्देशित होण्यास मंत्री पात्र नसतो. जर स्थायी समितीवर नामनिर्देशित झाल्यावर एखाद्या सदस्याची मंत्रिपदी नियुक्ती झाली तर तो समितीचा सदस्य राहत नाही.
- प्रत्येक स्थायी समितीचा कार्यकाल स्थापनेपासून एक वर्ष असतो.
- **स्थायी समित्यांची कार्ये :**
- प्रत्येक स्थायी समितीची कार्ये खालीलप्रमाणे :

1) लोकसभेत चर्चा होण्यापूर्वी व त्यावर मतदान होण्यापूर्वी संबंधित मंत्रालयाच्या किंवा विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर विचारविनिमय करणे. मात्र समित्यांच्या अहवालात कपात सूचनेच्या स्वरूपातील काहीही असता कामा नये.
2) संबंधित मंत्रालयांशी वा विभागांशी निगडित विधेयकांचे परीक्षण करणे.
3) संबंधित मंत्रालयांच्या वा विभागांच्या वार्षिक अहवालावर विचारविनिमय करणे.
4) गृहांना सादर केलेल्या दीर्घ पल्ल्याच्या मूलभूत धोरणांवर विचारविनिमय करणे.

- **कार्यावरील मर्यादा :**
- या स्थायी समित्यांच्या कामकाजांवर खालील बंधने घालण्यात आली आहेत :
1) समितीने संबंधित मंत्रालयाच्या वा विभागाच्या दैनंदिन कामकाजात लक्ष घालू नये.
2) इतर संसदीय समित्यांच्या विचाराधीन असलेल्या मुद्यांवर सामान्यतः विचारविनिमय करू नये.
- समित्यांच्या शिफारशी सल्ला स्वरूपाच्या असतात व संसदेवर बंधनकारक नसतात हे तेथे लक्षात घेतले पाहिजे.
- **अनुदानाच्या मागण्या :**
- अनुदानाच्या मागण्यांवर विचारविनिमय करताना प्रत्येक स्थायी समितीने खालील प्रक्रियेनुसार काम केले पाहिजे व गृहांना अहवाल सादर केला पाहिजे.
1) गृहांमध्ये अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा संपल्यानंतर गृहे काही ठराविक काळासाठी स्थगित केली जातील.
2) या काळामध्ये समित्या संबंधित मंत्रालयांच्या अनुदानाच्या मागण्यांवर विचारविनिमय करतील.
3) या कालावधीतच समित्या अहवाल बनवतील; त्या अधिक कालावधी मागणार नाहीत.
4) समित्यांचे अहवाल विचारात घेऊन गृह अनुदानाच्या मागण्यांवर विचारविमर्श करील.
5) प्रत्येक मंत्रालयाच्या अनुदानाच्या मागण्यांवर स्वतंत्र अहवाल असेल.
- **कार्य प्रक्रिया :**
- विधेयकांचे परीक्षण व त्यावरील अहवाल बनविताना प्रत्येक स्थायी समिती खालील प्रक्रियेनुसार काम करील.
1) समिती तिच्याकडे सोपविलेल्या विधेयकाची सर्वसाधारण तत्त्वे व कलमे यांवर विचारविनिमय करील.
2) समिती केवळ गृहात सादर केलेल्या व विचारविनिमय करण्यासाठी समितीकडे पाठविलेल्या विधेयकांवरच विचारविमर्श करेल.
3) समिती कालबद्ध पद्धतीने विधेयकावर अहवाल बनविल.
- **स्थायी समिती पद्धतीचे फायदे :**
- संसदेमधील स्थायी समिती पद्धतीचे फायदे खालीलप्रमाणे :
1) त्यांच्या कामकाजात पक्षीय पूर्वग्रहांचा प्रभाव नसतो.
2) त्यांच्या कामाची पद्धत लोकसभेतील पद्धतीपेक्षा अधिक लवचीक असते.
3) या पद्धतीमुळे कार्यकारी विभागावरचे संसदीय नियंत्रण अधिक तपशीलवार, निकटचे, सातत्यपूर्ण, सखोल व सर्वंकष बनते.
4) या पद्धतीमुळे मंत्रालये त्यांच्या मागण्या अधिक काळजीपूर्वक बनवितात; त्यामुळे सार्वजनिक खर्चात काटकसर व कार्यक्षमता सुनिश्चित केली जाते.
5) या समित्यांमुळे संसदेच्या सर्व सदस्यांना सरकारच्या कामकाजाची माहिती होते व त्यात सहभागी होता येते आणि त्यात योगदान देता येते.
6) अहवाल बनविताना समित्या तज्ज्ञांची मते किंवा जनमताचा उपयोग करू शकतात. तज्ज्ञांची आणि अग्रगण्य व्यक्तींची मते विचारात घेण्याचा आणि अहवालांमध्ये त्यांच्या मतांचा समावेश करण्याचा समित्यांना अधिकार आहे.
7) कार्यकारी विभागावर आर्थिक नियंत्रण ठेवण्यात विरोधी पक्ष व राज्यसभा आता मोठी भूमिका बजावू शकतात.

✻ **राज्यसभेच्या अखत्यारीतील समित्या :**

| **क्र. समितीचे नाव** | **अधिकारक्षेत्रातील मंत्रालये/विभाग** |
|---|---|
| 1. वाणिज्य समिती | वाणिज्य व उद्योग |
| 2. गृह कामकाज समिती | 1) गृह कामकाज<br>2) ईशान्य क्षेत्राचा विकास |
| 3. मानव संसाधन विकास समिती | 1) मानव संसाधन विकास<br>2) युवक व्यवहार व क्रीडा |
| 4. उद्योग समिती | 1) अवजड उद्योग व सार्वजनिक उपक्रम<br>2) लघु उद्योग<br>3) कृषी आधारित व ग्रामीण उद्योग |
| 5. विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण व वने समिती | 1) विज्ञान व तंत्रज्ञान<br>2) अवकाश<br>3) पृथ्वीसंबंधित विज्ञान<br>4) आण्विक ऊर्जा<br>5) पर्यावरण व वने |
| 6. वाहतूक, पर्यटन व सांस्कृतिक समिती | 1) नागरी हवाई वाहतूक<br>2) जल वाहतूक, रस्ते वाहतूक व महामार्ग<br>3) संस्कृती<br>4) पर्यटन |
| 7. आरोग्य व कुटुंब कल्याण समिती | आरोग्य व कुटुंब कल्याण |
| 8. कार्मिक, सार्वजनिक तक्रारी, कायदा व न्याय समिती | 1) कायदा व न्याय<br>2) कार्मिक सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन |

Dilip Sir's STEP UP Academy

❊ **लोकसभेच्या अखत्यारीतील समित्या :**

| क्र. समितीचे नाव | अधिकारक्षेत्रातील मंत्रालये/विभाग |
|---|---|
| 9. कृषी समिती | 1) कृषी<br>2) अन्न प्रक्रिया उद्योग |
| 10. माहिती तंत्रज्ञान समिती | 1) संचार व माहिती तंत्रज्ञान<br>2) माहिती व प्रक्षेपण |
| 11. संरक्षण समिती | संरक्षण |
| 12. ऊर्जा समिती | 1) नवनी व नवीनीकरणीय ऊर्जा<br>2) ऊर्जा |
| 13. परराष्ट्र व्यवहार समिती | 1) परराष्ट्र व्यापार<br>2) अनिवासी भारतीयां संदर्भातील कामकाज |
| 14. वित्त समिती | 1) वित्त<br>2) कंपनी व व्यवहार<br>3) नियोजन<br>4) सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी |
| 15. अन्न, ग्राहक व्यवहार व सार्वजनिक वितरण समिती | ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण |
| 16. श्रम समिती | 1) कामगार व नोकऱ्या<br>2) वस्त्रोद्योग |
| 17. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू समिती | पेट्रोलियम व नैसर्गिक वायू |
| 18. रेल्वे समिती | रेल्वे |
| 19. शहरी विकास समिती | 1) शहरी विकास<br>2) गृहनिर्माण व शहरी गरिबी निर्मूलन |
| 20. जलसंसाधन समिती | जल संसाधन |
| 21. रसायने व खते समिती | रसायने व खते |
| 22. ग्रामीण विकास समिती | 1) ग्रामीण विकास<br>2) पंचायती राज्य |
| 23. कोळसा व पोलाद समिती | 1) कोळसा व खाणी<br>2) पोलाद |
| 24. सामाजिक न्याय व सबलीकरण समिती | 1) सामाजिक न्याय व सबलीकरण<br>2) आदिवासी कामकाज |

- कार्ये :

1) संबंधित मंत्रालय/विभाग यांच्या खर्चाच्या मागणीचा विचार करणे.
2) सभापती/अध्यक्षांनी सांगितलेली विधेयके तपासणे.
3) मंत्रालयाच्या वार्षिक अहवालावर विचार करणे.

- मर्यादा :

1) संबंधित मंत्रालय/विभाग यांच्या दैनंदिन प्रशासकीय बाबींची तपासणी
2) इतर संसदीय समित्यांच्या विचाराधीन असलेला विषय या समित्या विचारात घेत नाही.

- यांचे सल्लागार स्वरूप, संसदेवर शिफारशी बंधनकारक नाहीत.

❊ **इतर समित्या :**

**1) प्रदत्त विधिनियम समिती (Delegated Legislation Committee) :**

- प्रत्येक सभागृहात एक अशी समिती
- नियुक्त केलेले 15 सदस्य
- निर्मिती : 1953
- कार्य : संविधानाने दिलेले /संसदेने कायद्याने केलेले नियम, उपनियम इ. तयार करण्याबाबतचे अधिकार या अभिकरणांनी योग्य रितीने वापरले की नाही याबाबतचा अहवाल सभागृहाला सादर करतात.

**2) अनु.जाती व अनु.जमाती कल्याण समिती :**

- एकूण सदस्य : 30 (लोकसभा : 20, राज्यसभा : 10)

**3) महिला सबलीकरणाबात समिती :**

- सदस्य : 30 (लोकसभा : 20, राज्यसभा : 10)

**4) संयुक्त संसदीय समित्या (तदर्थ समिती) (Joint Parliamentary Committee-JPC)**

- लोकसभा व राज्यसभा यातील सदस्य 2:1 प्रमाणात
- एखाद्या सभागृहाने ठराव स्वीकारला आणि दुसरे सभागृह संमत झाले तर JPC ची स्थापना होते.
  किंवा
- दोन्ही सभागृहाचे अध्यक्ष परस्पर चर्चा विनिमय करून JPC स्थापन करतात.

❊ **आतापर्यंत स्थापन झालेल्या JPC :**

1) बोफोर्स कराराबाबत (1987) : अध्यक्ष : बी. शंकरानंद
2) सुरक्षा आणि बँकींग व्यवहारातील अनियमिततेबाबत : 1992 (हर्षद मेहता प्रकरणानंतर)
   अध्यक्ष : रामनिवास मिर्धा

Dilip Sir's STEP UP Academy

3) शेअर बाजार घोटाळ्याबाबत (2001) (केतन पारीख प्रकरणानंतर) अध्यक्ष : प्रमोद महाजन
4) शीतपेय, फळांचा रस आणि इतर खाद्यपदार्थातील किटकनाशकांचे प्रमाण अभ्यासण्याबाबत (2003) अध्यक्ष : शरद पवार
5) 2 जी घोटाळ्याची चौकशी करण्याबाबत (2010) : अध्यक्ष : पी. सी. चाको
6) VVIP चॉपर घोटाळ्याबाबत (2013)
7) जमीन अधिग्रहण कायदा अभ्यासाबाबत (2015) अध्यक्ष : अहलुवालीया एस्.एस्.

Dilip Sir's STEP UP Academy

## संसदेची भूमिका (Role of Parliament)

### ✲ संसदेच्या अधिकारांचे वर्गीकरण :

**अ) कायदेविषयक अधिकार (Legislative powers) :**

- केंद्र सूची (Union list) आणि आणि उर्वरीत विषयावर (Residuary subjects) संसदेला कायदा करण्याचा अधिकार आहे.
- समवर्ती सूचित (Concurrent list) केंद्र आणि राज्याने एकाच विषयावर कायदा केल्यास केंद्राचा कायदा ज्येष्ठ ठरतो.
- राज्यांच्या विषयावरही पुढील परिस्थितीत संसद कायदा करू शकते.

  1) आणीबाणी : राष्ट्रीय आणीबाणी (National emergency), राज्यात राष्ट्रपती राजवट (Presidential rule in states)

  2) जेव्हा दोनपेक्षा अधिक राज्ये संयुक्तरीत्या संसदेला विनंती (Joint request) करतात.

  3) जेव्हा राज्यसभा राज्यांच्या विषयावर कायदा करण्याचा ठराव संमत करते. (Rajyasabha passes a resolution to that effect)

  4) आंतरराष्ट्रीय करार आणि संकेतांची अंमलबजावणी करण्यासाठी (International treaties and conventions)
- संसदेच्या विरामकाळात राष्ट्रपतींनी काढलेल्या अध्यादेशांना (Ordinance) परवानगी संमती देणे.

  (अशी अध्यादेश असंमत झाल्यास रद्द होतात.)
- प्रदत्त विधिनियम/प्रत्यायुक्त विधिविधान/कार्यकारी कायदे (Executive legislation) /दुय्यम कायदे (Subordinate legislation) : हे संसदेसमोर परीक्षणासाठी सादर केले जातात.

  (जेव्हा संसदेचा कायदा करण्याचा अधिकार हा संसद कार्यकारींना प्रदान करते : त्यास प्रदत्त विधिनियम (Delegated Legislation) म्हणतात)

**ब) कार्यकारी अधिकार (Executive powers) :**

- संसद कार्यकारी विभागाच्या कामाचे पर्यवेक्षण करते. यासाठी संसदेच्या कामकाजातील विविध साधने (प्रश्नोत्तराचा तास, शून्य प्रहर, स्थगन प्रस्ताव, इतर) वापरली जातात.
- लोकसभा विविध प्रकारे सरकारवर विश्वास नसल्याचे दाखवू शकते.

1) राष्ट्रपतींच्या उद्घाटनाच्या अभिभाषणावरील आभारप्रदर्शक ठराव असंमत करून (By not passing a motion of thanks)
2) अर्थ विधेयक असंमत करून (By rejecting money bill)
3) निंदाव्यंजक ठराव/स्थगन प्रस्थान संमत करून (By passing censure motion / adjournment motion)
4) महत्त्वाच्या मुद्यावर सरकारचा पराभव करून (By defeating the govt. on a vital issue)
5) कपात प्रस्ताव संमत करून (By passing a cut motion)

- लोकसभेत विश्वास गमावलेले सरकार राजीनामा देते आणि पुढच्या सार्वजनिक निवडणूकांमध्ये कोणास निवडून द्यायचे हे जनता ठरवते, या अनुषंगाने संसद येथे सर्वात महत्त्वाची भूमिका बजावते, असे म्हणता येईल.

### ✲ आर्थिक अधिकार (Financial powers) :

- संसदेच्या संमतीशिवाय कोणताही कर आकारता येत नाही. तसेच कोणताही खर्च करता येत नाही.
- तसेच झालेल्या खर्चावर लोकलेखा समिती (PAC), अंदाज समिती (EC) आणि सार्वजनिक उपक्रम समितीद्वारे (Committee on public undertakings) परिक्षण केले जाते.

  अर्थसंकल्पास मंजूरी ही दरवर्षी मिळते. जर संमत केलेला निधी जर खर्च झाला नाही तर तो पुन्हा भारताच्या संचित निधीत जमा होतो. (Lapse होतो) - (म्हणजेच संसदेला दुसरा राखीव निधी निर्माण करण्याचा अधिकार नाही.)

### ✲ घटनात्मक अधिकार (Constituent powers) :

- कलम 368 नुसार घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे. घटनादुरुस्ती विधेयक हे विशेष बहुमताने मंजूर व्हावे लागते. साध्या बहुमतानेही संसद घटनेत बदल करू शकते. परंतु

### ✲ न्यायिक अधिकार (Judicial powers) :

1) राज्यघटनेचे उल्लंघन केल्याच्या कारणावरून संसद राष्ट्रपतींवर महाभियोग प्रक्रिया (imeachment) चालवू शकते.
2) उपराष्ट्रपतींना पदावरुन दूर करण्याचा संसदेचा अधिकार
3) मुख्य निवडणूक आयुक्त, CAG, तसेच सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांना (सर न्यायाधिशांना सुद्धा) आणि उच्च न्यायालयातील न्यायाधिशांना पदावरून दूर करण्यासाठी संसद राष्ट्रपतींना शिफारस करते.

4) विशेषाधिकारांचे उल्लंघन केल्याबद्दल/सभागृहाचा अवमान केल्याप्रसंगी संसद सदस्यांना तसेच इतर व्यक्तींनाही शिक्षा करू शकते.

**※ निवडणूकांबाबतचे अधिकार (Electoral powers and functions) :**

- राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणूक, सभागृहाचे अध्यक्ष/सभापती, उपाध्यक्ष/उपसभापतींची निवडणूक याबाबत संसदेची भूमिका
- संसदेतील दोन्ही गृहे, राज्याच्या विधिमंडळातील दोन/एक गृहांचे तसेच राष्ट्रपती, उपराष्ट्रपती पदांच्या निवडणुकांचे नियमन करण्यासाठी संसद कायदा करते. त्यासाठी संसदेने राष्ट्रपती व उपराष्ट्रपती निवडणूक कायदा (1952), लोकप्रतिनिधी कायदा (1950), लोकप्रतिनिधी कायदा (1951) इ. कायदे केलेले आहे.

**※ इतर अधिकार (Other powers) :**

1) राज्य विधानसभेच्या शिफारशींनुसार संसद राज्य विधानपरिषद स्थापन करते/रद्द करते. (कलम 169)
2) संघराज्यातील घटक राज्याचे क्षेत्र वाढवणे, कमी करणे, नाव बदलणे हे सर्व अधिकार संसदेला आहेत.
3) सर्वोच्च उच्च न्यायालयांचे अधिकार क्षेत्र व संघटन यांचे नियमन करण्याचे अधिकार संसदेचे आहेत.
4) आणीबाणींना मान्यता देण्याचे अधिकार संसदेला आहेत.

**※ लोकसभा विशेषाधिकार (Non confidence motion):**

1) मंत्रीमंडळाविरूद्धाचा अविश्वास ठराव फक्त लोकसभेतच मांडता येतो कारण मंत्रीमंडळ लोकसभेला जबाबदार असते.
2) धनविधेयके फक्त लोसभेतच मांडतात, त्यास लोकसभेतच मंजूरी भेटते. राज्यसभा या विषयांवर फक्त चर्चा करू शकते अथवा शिफारस सुचवू शकते.
3) राष्ट्रीय आणीबाणी कलम 352 लावताना राज्यसभेचे मत आवश्यकच असते परंतु स्थगिती करण्याबाबत राज्यसभेचे मत विचारात घेतले जात नाही. तो अधिकार फक्त लोकसभेलाच आहे.
(धनविधेयके म्हणजे : कलम 110 मधील तरतूदी ज्या विधेयकात असतील. कलम 110 मध्ये ठरवून दिलेल्या तरतूदी धनविधेयकासाठी आहेत. वित्तविधेयक म्हणजे कलम 110 मधील तरतूदी व इतर तरतूदी समाविष्ट असलेले विधेयक म्हणजेच वित्तविधेयकात कलम 110 मधील तरतूदींशिवाय इतरही तरतूदींचा समावेश असतो.)

**राज्यसभेचे स्थान**

1) लोकसभेसमोर समान दर्जा
2) राज्यसभा विशेष अधिकार
3) लोकसभेपेक्षा तुलनेत कमी स्थान

**1) लोकसभेसमोर समान दर्जा (Equal Status to Lok Sabha) :**

1. सर्वसाधारण विधेयक, घटनादुरुस्ती विधेयकाबाबत
2. राष्ट्रपती, उपराष्ट्रपतींची निवडणूक आणि पदावरुन दूर करण्याबाबत.
3. काही घटनात्मक पदावरील व्यक्तींना पदावरुन दूर करण्याबाबत (SC-HC न्यायाधीश, CAG, मुख्य निवडणूक आयुक्त)
4. राष्ट्रपतींनी काढलेल्या अध्यादेशांना संमती देणे, तसेच आणीबाणींना संमती देण्याबाबत.
5. पंतप्रधानांबरोबरच इतर मंत्रीही राज्यसभेतून असू शकतात.

**2) लोकसभेच्या तुलनेत कमी स्थान (Unequal Status to Lok Sabha) :**

1. अर्थविधेयक सादर करण्याबाबत : अर्थविधेयक फक्त लोकसभेतच मांडले जाते. राज्यसभा फक्त शिफारशी सुचवू शकते. (14 दिवसांच्या आत)
2. एखादे विधेयक अर्थविधेयक आहे की नाही, हे ठरवण्याचा अंतिम अधिकार – लोकसभा सभापतींचा
3. संयुक्त बैठकीच्या तरतुदीमुळे लोकसभेचे वर्चस्व
4. राष्ट्रीय आणीबाणी समाप्त करण्याचा अधिकार फक्त लोकसभेलाच आहे.
5. मंत्रीमंडळ सामूहीकरीत्या लाोकसभेला जबाबदार असल्याने फक्त लोकसभेतच अविश्वास ठराव दाखल करता येतो.

**※ राज्यसभेचे विशेष अधिकार (Special Powers to Lok Sabha) :**

1) कलम 249 : राष्ट्रीय हितासाठी राज्यसभा 2/3 बहुमताने तसा ठराव संमत करत असेल तर संसद राज्यांच्या विषयावर कायदा करेल.
2) केंद्र व राज्ये यांना समान असलेली नवीन अखिल भारतीय सेवा (All India Services) निर्माण करण्याचा अधिकार राज्यसभेला आहे. राज्यसभेने असा ठराव संमत केला तर संसद अशी सेवा निर्माण करते.
3) कलम 67ब : उपराष्ट्रपतींना पदावरून दूर करण्यासाठी सुरवातीचा ठराव राज्यसभेतच घेतला जातो.

Dilip Sir's STEP UP Academy

- **राज्यसभेची उपयुक्तता :**

1) लोकसभेने घाईघाईत निर्माण केलेल्या कायद्यांवर नियंत्रण ठेवायचे काम राज्यसभा करते.
2) राज्यसभेत 12 तज्ज्ञ व्यक्तींची नियुक्ती होते.

- **संसदेचे विशेष अधिकार व सूट (Parliamentary privileges) :**

1) संसद सदस्याला वैयक्तीकरित्या
2) संसदेला सामुहिकरित्या

**1) संसद सदस्याला वैयक्तीकरित्या (Individual privileges) :**

अ) भाषण स्वातंत्र्य (Freedom of speech in parliament) :

- खासदाराने संसदेत जे वक्तव्य केले असेल, जी माहिती उघड केली असेल त्यासाठी ते न्यायालयात उत्तरदायी नसतात, किंवा त्यांच्यावर कोणतीही न्यायालयीन कारवाई केली जाऊ शकत नाही.

  (कलम 105 : संसद सदस्यांसाठी, कलम 194 : विधीमंडळ सदस्यांसाठी)

- परंतु,

i) सभागृहाच्या कामकाज प्रक्रिया नियमांनी ते बांधील असतात.
ii) सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या वर्तनावर त्यांना काढून टाकण्याच्या ठरावाशिवाय चर्चा करता येत नाही.

ब) अटकेपासून स्वातंत्र्य (Freedom from arrest) :

- संसदेचे सत्र सुरू असताना किंवा सुरू होण्याच्या अगोदर 40 दिवस व संपल्यावर 40 दिवसापर्यंत संसद सदस्यास अटक करता येत नाही.

  (हे स्वातंत्र्य फक्त दिवाणी प्रकरणात (Civil cases) आहे, फौजदारी प्रकरणात नाही तसेच प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेसाठीही (Not for criminal or preventive detention) नाही.)

क) अधिवेशन सुरू असताना त्यांना ज्युरी सेवेपासून स्वातंत्र्य म्हणजेच अधिवेशन सुरू असताना त्यांना एखाद्या खटल्याबाबत
साक्ष देण्यासाठी न्यायालयात जाणे बंधनकारक नसते.

**2) संसदेने (सभागृहांचे) सामुहिक विशेषाधिकार (Collective privileges) :**

- बाहेरील व्यक्तींना सभागृहात येण्याची बंदी घालणे व महत्त्वाच्या बाबींसाठी गुप्त बैठक घेणे. (Secret sitting)
- सभागृहातील कामकाजाचा अहवाल प्रसिध्द करणे.
- संसेदेस आपले अहवाल, चर्चा आणि कामकाज प्रकाशित करण्याचा अधिकार आहे. ते इतरांनी प्रकाशित करण्यावर प्रतिबंध घालण्याचा अधिकार आहे.
- सध्या पूर्वपरवानगीशिवाय संसदेच्या कामकाजाचे वृत्तांकन देण्याचा अधिकार वृत्तपत्रांना आहे. (44 वी घटनादुरुस्ती)
- संसद आपापल्या सदस्याचे सदस्यत्व निलंबित करते/रद्द करू शकते.
- सभागृहाच्या आवारात सदस्य किंवा इतर व्यक्तींना अटक करायची असल्यास व गृहाच्या अध्यक्षांची परवानगी आवश्यक असते.
- संसद सदस्य किंवा बाहेरील व्यक्ती यांनी जर संसदेच्या विशेषाधिकारांचे उल्लंघन केले असेल किंवा संसदेचा अवमान केला असेल तर संसद त्याला शिक्षा देवू शकते.
- कामकाज नियंत्रित करण्यासाठी नियम बनवणे.
- सदस्यांची अटक, स्थानबद्धता, कारावास किंवा कारावासातून सुटका याबद्दल सभागृहाला तात्काळ माहिती मिळवण्याचा अधिकार
- न्यायालयाला सभागृहातील कामकाज वा संसदीय समित्यांचे कामकाज यांच्याविषयी चौकशी करण्यास मनाई करण्यात आली आहे.


Dilip Sir's STEP UP Academy

✲ दृष्टिक्षेपात संसदेसंबंधित कलमे :

| कलम | विषय |
|---|---|
| 79 | संसदेची संरचना |
| 80 | राज्यसभेची संरचना |
| 81 | लोकसभेची संरचना |
| 82 | प्रत्येक जनगणनेनंतर पुनःसमायोजना |
| 83 | संसदेच्या गृहांचा कार्यकाल |
| 84 | संसद सदस्यांचे पात्रता निकष |
| 85 | संसदेची अधिवेशने बरखास्ती व विसर्जन |
| 86 | गृहांना संबोधित करण्याचा आणि निरोप पाठविण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार |
| 87 | राष्ट्रपतीचे विशेष अभिभाषण |
| 88 | गृहांसंदर्भात मंत्री व महान्यायवाद्याचे हक्क |
| **संसदेचे अधिकारी** | |
| 89 | राज्यसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष |
| 90 | उपाध्यक्षाचे पद रिक्त होणे, त्याचे त्यागपत्र आणि त्याला पदच्युत करणे. |
| 91 | अध्यक्ष म्हणून काम करण्याचा किंवा त्या पदाची कार्ये पार पाडण्याचा उपाध्यक्षाचा किंवा इतर व्यक्तिंचा अधिकार |
| 92 | अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांना पदच्युत करण्याचा ठराव विचाराधीन असताना ते गृहाच्या अध्यक्षपदी असणार नाहीत. |
| 93 | लोकसभेचे सभापती आणि उपसभापती |
| 94 | सभापती आणि उपसभापती यांची पदे रिक्त होणे, त्यांनी राजीनामे देणे किंवा त्यांना पदच्युत करणे. |
| 95 | सभापती म्हणून काम करण्याचा किंवा त्या पदाची कार्ये पार पाडण्याचा उपसभापतीचा किंवा इतर व्यक्तिंचा अधिकार |
| 96 | सभापती किंवा उपसभापती त्यांना पदच्युत करण्याचा ठराव विचाराधीन असताना गृहाच्या अध्यक्षपदी असणार नाहीत. |
| 97 | अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती व उपसभापती यांचे वेतन आणि भत्ते |
| 98 | संसदेचे सचिवालय |
| **कामकाज चालविणे** | |
| 99 | सदस्यांची शपथ किंवा प्रतिज्ञा |
| 100 | गृहांमधील मतदान. पदे रिक्त असली व गणसंख्या नसली तरी कामकाज चालविण्याचा गृहांचा अधिकार. |

| | |
|---|---|
| **सदस्यांची अनर्हता** | |
| 101 | पदे रिक्त होणे. |
| 102 | सदस्यांच्या अपात्रतेचे निकष |
| 103 | सदस्यांच्या अपात्रतेच्या प्रश्नांवर निर्णय |
| 104 | कलम 99 नुसार शपथ घेण्यापूर्वी किंवा पात्र नसताना किंवा अपात्र ठरविल्यावर गृहात उपस्थित राहणे व मतदान करणे याबद्दल दंड. |
| **संसद व सदस्य यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षण** | |
| 105 | संसदेची गृहे, त्यांचे सदस्य आणि त्यांच्या समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार इत्यादी. |
| 106 | सदस्यांचे वेतन व भत्ते |
| **कायदे प्रक्रिया** | |
| 107 | विधेयके सादर करणे व संमत करणे यासंबंधी तरतुदी |
| 108 | काही बाबतीत दोन्ही गृहांची संयुक्त बैठक |
| 109 | अर्थविधेयकाच्या बाबतीत विशेष प्रक्रिया |
| 110 | अर्थविधेयकाची व्याख्या |
| 111 | विधेयकांना संमती |
| **वित्तविषयक बाबतीमधील प्रक्रिया** | |
| 112 | वार्षिक वित्तीय पत्रक |
| 113 | अंदाजपत्रकाबाबत संसदेतील कार्यपद्धती |
| 114 | विनियोग विधेयक |
| 115 | पूरक, अतिरिक्त आणि जास्तीचे अनुदान |
| 116 | लेखानुदान, प्रत्ययानुदाने व अपवादात्मक अनुदान |
| 117 | वित्त विधेयकाबाबत विशेष तरतुदी |
| **सर्वसाधारण प्रक्रिया** | |
| 118 | प्रक्रियेचे नियम |
| 119 | वित्तीय कामकाजासंबंधी संसदेतील प्रक्रियेचे कायद्याने नियमन |
| 120 | संसदेत वापरावयाची भाषा |
| 121 | संसदेतील चर्चेवरील निर्बंध |
| 122 | न्यायालयांना संसदेतील कामकाजाबाबत चौकशीचा अधिकार नाही. |
| **राष्ट्रपतीचे कायदेविषयक अधिकार** | |
| 123 | संसदेच्या अवकाशकालात अध्यादेश काढण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार |

# केंद्र – राज्य संबंध

- भारतीय संघराज्यीय प्रणालीमध्ये केंद्र आणि राज्य यांच्यात अधिकाराची विभागणी केलेली आढळते.
- केंद्र आणि राज्य यांचे संबंध पुढील तीन भागात नमूद करता येतील :

1) कायदेविषयक संबंध
2) प्रशासनिक संबंध
3) आर्थिक संबंध

**कायदेविषयक संबंध – भाग : 11 : कलम 245 ते 255**

- या व्यतिरिक्त इतर काही कलमांचाही याच्याशी संबंध आहे.

**✲ केंद्र आणि राज्याच्या कायद्यांच्या विस्ताराबाबत.**

1) संसद संपूर्ण भारतीय क्षेत्रासाठी (Territory of India) किंवा काही विशिष्ट प्रदेशासाठी कायदा करू शकते. तसेच काही विशिष्ट परिस्थितीत संसद आपल्या क्षेत्राबाहेरही (जगातील कुठल्याही भागात राहणाऱ्या भारतीय नागरिकांना तसेच त्यांच्या मालमत्तेबाबत) कायदा करू शकते.
2) घटकराज्यांचा कायदा त्या राज्यापुरता किंवा राज्याच्या काही भागासाठी केला जाऊ शकतो.

**✲ संसदेच्या कायदे करण्याच्या अधिकाराबाबत मर्यादा :**

अ) अंदमान आणि निकोबार बेट, लक्षद्वीप, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव या तीन केंद्रशासित प्रदेशांच्या प्रगती, सुशासन व शांततेसाठी राष्ट्रपती नियम करू शकतात. त्यामुळे संसदेने केलेला कायदा या प्रदेशासाठी दुरुस्ती करून लागू करायचा की पुर्णपणे रद्द करायचा हे राष्ट्रपती ठरवतील.

ब) राज्यातील अनुसूचित क्षेत्रास (Scheduled Area) संसदेचा कायदा लागू होणार नाही किंवा काही विशिष्ट बदल करून लागू करण्याबाबत आदेश राज्यपाल देतील.

क) राज्यातील आदिवासी क्षेत्रास (Tribal Area) संसदेचा कायदा लागू होणार नाही किंवा दुरुस्ती करून लागू करावा यासाठी
- आसाम राज्यासाठी राज्यपाल निर्णय घेतील तर,
- मेघालय, त्रिपुरा, मिझोरम या राज्यांसाठी राष्ट्रपती निर्णय घेतील.

**✲ विषयांची विभागणी :**

- **केंद्र सूची :** एकूण विषय : 98 (सुरूवातीला : 97 विषय)
- **काही महत्त्वाचे विषय :** संरक्षण, रेल्वे, बँक व्यवहार, परराष्ट्र व्यवहार, चलन, आण्विक उर्जा, विमा, दळणवळण, जनगणना, लेखापरीक्षण, नागरिकत्व, राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख बंदरे, आंतरराज्य व्यापार, दळणवळण, प्रदर्शनासाठी चित्रपटास परवानगी.

(88 व्या घटनादुरुस्तीने (2003) केंद्राच्या विषय सूचीत 'सेवा कर' (Service Tax) नावाचा विषय समाविष्ट केला. यानुसार कलम 268 अ हे नव्याने समाविष्ट केले गेले.
(101 व्या घटनादुरुस्तीने पुढील दोन विषय या यादीतून वगळले :
92 – वर्तमानपत्रांची खरेदी वा विक्री आणि त्यामध्ये प्रकाशित होणाऱ्या जाहिरातींवरील कर
92 ब – आंतरराज्य व्यापार वा दळणवळणादरम्यान पाठविलेल्या वस्तूवरील कर.)

**✲ राज्य सूची : एकूण विषय : 59**

- **काही महत्त्वाचे विषय :** सार्वजनिक सुव्यवस्था, पोलीस, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, कृषी, तुरूंग, स्था. स्व. संस्था, बाजारपेठा, चित्रपट, नाट्यगृहे, ग्रंथालये, राज्याच्या विधिमंडळासाठी निवडणूका, शेतजमीनीबाबत मालमत्ता शुल्क, शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नावरील कर, जमीन महसूल, जमीन नोंदीच्या देखभालीसह, व्यवसाय, व्यापार, धंदा आणि रोजगार यावरील कर, वाहनांवरील कर.

(101 व्या घटनादुरुस्तीने पुढील दोन विषय या यादीतून वगळलेले आहेत :
52 – स्थानिक क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या वस्तूंवरील कर.
55 – वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या जाहिराती सोडून इतर जाहिरातींवरील कर आणि आकाशवाणी किंवा दूरदर्शनवरून प्रसारित केल्या जाणाऱ्या जाहिरातींवरील कर.)

**✲ समवर्ती सूची : एकूण विषय : 52 (सुरूवातीला : 47)**

- **काही महत्त्वाचे विषय :** फौजदारी कायदे आणि प्रक्रिया, दिवाणी प्रक्रिया, विवाह व घटस्फोट, लोकसंख्या नियंत्रण आणि कुटुंब नियोजन, विद्युत, कामगार कल्याण, आर्थिक व सामाजिक नियोजन, औषधे, वृत्तपत्रे, पुस्तके, मुद्रणालय, जंगले, शिक्षण (तांत्रिक विद्यापीठ, वैद्यकीय शिक्षण आणि विद्यापीठ)

Dilip Sir's STEP UP Academy

(42 व्या घटनादुरुस्तीने : पुढील पाच विषय हे राज्य सूचीतून समवर्ती सूचीत समाविष्ट केले.
1) शिक्षण 2) वने 3) वजने व मापे 4) वन्य पशू व पक्षी यांचे संरक्षण 5) सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये वगळता इतर सर्व न्यायालयांची संरचना आणि संघटन करणे व न्याय प्रशासन)

**⁕ उर्वरित अधिकार (Residuary Power)**

- भारतात : केंद्र शासनाकडे (एकूण 3 : सूची)
  कॅनडात : केंद्रशासनाकडे (एकूण 3 : सूची)
- अमेरिकेत : राज्य शासनाकडे (फक्त 1 सूची)
  ऑस्ट्रेलियात : राज्य शासनाकडे (फक्त 1 सूची)
- 1935 चा भारत सरकारचा कायदा : उर्वरित अधिकार : व्हाइसरॉयकडे देतो.
- समवर्ती सूचीतील एकाच विषयावर केंद्र आणि राज्याने कायदा केला तर केंद्राचा कायदा वरचढ ठरतो. परंतु राज्याने केलेल्या कायद्यास राष्ट्रपतींनी मंजूरी दिली तरच केंद्राचा कायद्यापेक्षा राज्याचा कायदा वरचढ ठरेल, अशा वेळी केंद्र सरकार पुन्हा याच विषयावर राज्याच्या कायद्यापेक्षा श्रेष्ठ कायदा करू शकते.
- घटनेतील तरतुदीनुसार राज्य सूची आणि समवर्ती सूचीपेक्षा केंद्रिय सूची महत्त्वाची ठरते, तसेच राज्य सूचीपेक्षा समवर्ती सूची महत्त्वाची ठरते.

**राज्याच्या विषयांवर संसदेला कायदे करण्याचा अधिकार**

**1) राज्यसभेचा ठराव :**
- जेव्हा राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने राज्यसभा (कलम 249) उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या 2/3 बहुमताने, राज्य सूचीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार संसदेस देण्याचा ठराव संमत करते.
- ठरावाचा कालावधी : पुढील 1 वर्ष लागू असेल.
- पुढील प्रत्येक वर्षी वाढवायचा असल्यास नव्याने ठराव आवश्यक
- यामुळे राज्यसूचीतील विषयावर राज्याचा कायदा करण्याचा अधिकार नष्ट होत नाही.
- परंतु केंद्र आणि राज्य दोघांनाही केलेल्या कायद्यात विरोधाभास असल्यास केंद्राचा कायदा वरचढ ठरतो.

**2) राष्ट्रीय आणीबाणी दरम्यान (कलम 352) :**
- या दरम्यान केंद्र सरकार राज्य सूचीतील विषयावर कायदा करू शकते.
- आणीबाणी संपल्यानंतर पुढील 6 महिन्यात हे कायदे रद्द होतात.
- या दरम्यान याच विषयावर कायदे करण्याच्या राज्य विधीमंडळाच्या अधिकारांवर मर्यादा येत नाही. परंतु जर राज्याने केलेला कायदा संसदेने केलेल्या कायद्याच्या विरोधात असेल तर तो रद्द होऊ शकतो.

**3) दोन किंवा अधिक राज्यांची विनंती : (कलम 252 नुसार)**
- अशा राज्यांनी संसदेने आमच्या विषयावर कायदा करावा असा ठराव संमत केल्यास.
- अशा ठरावात सहभागी राज्यांनाच संसदेने केलेला कायदा लागू असेल.
  (नंतर एखादे राज्य ठराव संमत करून हा कायदा स्वीकारू शकते.)
- हा कायदा संसदेने केलेला असल्याने यात दुरुस्ती किंवा रद्द करण्याचा अधिकार राज्यांना नसेल.
- यामध्ये राज्य स्वतःहून आपला अधिकार संसदेला देतात म्हणून यास राज्याने एखाद्या विषयाचा त्याग करणे असेही म्हणतात.

**4) आंतरराष्ट्रीय करारांची अंमलबजावणी करावयाची असल्यास : (कलम 252 नुसार)**
- राज्य सूचीवर कायदे करण्याचा अधिकार संसदेचा असेल.

**5) राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाल्यावर :**
- संसदेने केलेला कायदा त्या राज्यात लागू ठरतो, परंतु राष्ट्रपती राजवट संपल्यानंतरही कायदा सुरूच राहतो.
  (नंतर राज्य विधिमंडळ असा कायदा : रद्द करेल/दुरूस्त करेल/नवीन कायदा करेल)
- वरील असाधारण परिस्थिती वगळताही पुढील बाबतीत केंद्रसरकार राज्य सरकारने केलेल्या कायद्यास थांबवू शकते.

अ) राष्ट्रपतींच्या विचारार्थ आलेले कायदे
ब) राष्ट्रपतींच्या पूर्व शिफारशीने मांडावे लागणारे राज्यांचे कायदे (उदा. व्यापार आणि वाणिज्य यांच्या स्वतंत्र्यावर निर्बंध घालणारी विधेयके)
क) आर्थिक आणीबाणीदरम्यान राज्याचा अर्थसंकल्प/वित्तीय विधेयक राष्ट्रपती विचारार्थ ठेऊ शकतात.

**प्रशासकीय संबंध (भाग 11 : कलम 256 ते 263)**

**⁕ राज्याच्या अधिकारांवर मर्यादा :**

1) राज्याने आपल्या कार्यकारी अधिकारांचा वापर संसदीय कायद्यास सुसंगत ठरेल असा करावा.
2) राज्यात केंद्राच्या कार्यकारी अधिकाराच्या अंमलावर अडथळा किंवा बाधा आणू नये.

Dilip Sir's STEP UP Academy

- **वरील उद्दिष्टांना अनुसरून तसेच इतर परिस्थितीत केंद्र राज्यांना काही आदेश देते :**

1) राष्ट्रीय किंवा लष्करी दृष्टीने महत्त्वाची म्हणून घोषित करण्यात आलेल्या दळणवळणांच्या साधनांची उभारणी व निगराणी ठेवण्याबाबत.
2) राज्यात रेल्वेच्या संरक्षणासाठी उपाययोजनाबाबत.
3) राज्यातील भाषिक अल्पसंख्यांक गटातील मुलांसाठी प्राथमिक स्तरावरचे शिक्षण त्यांच्या मातृभाषेत पुरवण्याबाबत. (कलम 350)
4) राज्यातील अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी विशिष्ट योजना आखणे आणि त्याची अंमलबजावणी करण्याबाबत.

- वरील निर्देशांचे राज्याने पालन न केल्यास 'घटनेतील तरतूदींनुसार राज्यसरकार कार्य करू शकत नाही' असा निष्कर्ष राष्ट्रपती काढतील (कलम 365) आणि या आधारावर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली जाऊ शकते.
- केंद्र आणि राज्याच्या कायदेकारी अधिकारांमध्ये झालेली विभागणी ताठर स्वरूपाची आहे (कारण फक्त विशिष्ट परिस्थितीत ही विभागणी बदलते, सामान्य स्थितीत नाही) परंतु कार्यकारी अधिकारांच्या बाबतीत मात्र लवचिकता दिसून येते ती पुढीलप्रमाणे :

1) कलम 258 (1) : राष्ट्रपती राज्यांच्या परवानगीने केंद्राचे कोणतेही कार्यकारी अधिकार राज्य सरकारकडे सोपवू शकतात.
2) कलम 258 A : राज्याचे राज्यपाल राज्याचे कोणतेही कार्यकारी अधिकार केंद्र सरकारकडे त्यांच्या संमतीने सोपवू शकतात.
   (7 वी घटनादुरुस्ती, 1956)
3) संसद कायद्याद्वारे राज्यांच्या संमतीविनाही एखाद्या राज्यावर कार्यकारी अधिकार लादू शकते. (मात्र राज्य विधिमंडळास असे अधिकार नाहीत).

### केंद्र-राज्य सहकार्य

* कलम 262 : आंतरराज्यीय नदी आणि खोरे यांच्यातील पाण्याचा वापर, योग्य वाटप आणि नियंत्रण याबाबतच्या तक्रार निवारणासाठी संसद कायदा करू शकते.
* कलम 263 : केंद्र आणि राज्यांच्या समान हिताच्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी व त्यावर चर्चा करण्यासाठी राष्ट्रपती 'आंतरराज्यीय परिषद' स्थापन करू शकतात. (1990 साली अशी परिषद स्थापन करण्यात आलेली आहे.)

### अखिल भारतीय सेवा

- कलम 312 : नुसार संसद नवीन अखिल भारतीय सेवेची निर्मिती करू शकेल.
- सध्याच्या 3 अखिल भारतीय सेवा : IAS, IPS, IFS (भारतीय वन सेवा)

- यांच्या समर्थनार्थ मुद्दे :

- प्रशासनाचा उच्च दर्जा राखण्यास मदत
- समान प्रशासन प्रणाली
- नियंत्रण : केंद्र आणि राज्य दोघांचेही

### लोकसेवा आयोग

1) राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांना पदावरून दूर करण्याचे अधिकार राष्ट्रपतींचे आहेत.
2) संसद दोन किंवा अधिक राज्यांसाठी संयुक्त लोकसेवा आयोग निर्माण करू शकते.
3) संघलोकसेवा आयोग हा राज्य लोकसेवा आयोगास मदत करू शकतो. (यासाठी राज्यपालांची विनंती आणि राष्ट्रपतींची संमती).

### न्यायव्यवस्था

- राज्यातील न्यायाधिशांची नियुक्ती राष्ट्रपती करतात. (सरन्यायाधिश आणि राज्यपालांच्या सल्ल्याने)
- त्यांची बदली आणि पदावरून दूर करण्याचे अधिकार : राष्ट्रपतींचेच
- दोन किंवा अधिक राज्यांसाठी सामाईक उच्च न्यायालय असू शकते.

### आणीबाणींच्या काळातील संबंध

- कलम 352 : राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात कोणत्याही विषयावर केंद्र सरकार राज्यांना कार्यकारी आदेश देऊ शकतात. (म्हणजे राज्य सरकारे निलंबित होत नसली तरी ती पूर्णपणे केंद्रशासनाच्या नियंत्रणाखाली येतात.)
- कलम 356 : राज्यात राष्ट्रपती लागवट लागू असताना राज्यपालांचे किंवा कार्यकारींचे अधिकार राष्ट्रपती स्वतःकडे घेतात.
- कलम 360 : आर्थिक आणीबाणीच्या काळात केंद्र सरकार आर्थिकदृष्ट्या योग्य अशा तत्त्वांचे पालन करण्यासाठी राज्यांना आदेश देऊ शकतात आणि इतर आवश्यक आदेश राष्ट्रपती राज्यांना देतात. (यामध्ये उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि राज्यातील कर्मचारी यांचे वेतन कमी करण्याचाही समावेश होतो.)

Dilip Sir's STEP UP Academy

## इतर तरतुदी

1) कलम 355 : या कलमांर्गत केंद्राची दोन कर्तव्ये :
   अ) परकीय आक्रमण आणि अंतर्गत अव्यवस्था यापासून प्रत्येक राज्याचे संरक्षण करणे.
   ब) प्रत्येक राज्याचे शासन राज्यघटनेच्या तरतुदींप्रमाणे होत आहे, याची खात्री करणे.
2) राज्यपालांच्या नियुक्तीबाबत
3) राज्य निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर करण्याबाबतचा अधिकार राष्ट्रपतींकडे

## आर्थिक संबंध (भाग : 12, कलम 268 ते 293)

- **घटनेतील करांची विभागणी :**

1) केंद्र सूचीतील विषयांवर कर आकारणी : फक्त संसद
2) राज्य सूचीतील विषयांवर कर आकारणी : फक्त राज्य विधीमंडळ
3) समवर्ती सूचीतील विषयांवर कर आकारणी : केंद्र आणि राज्य विधीमंडळ
4) उर्वरीत विषयांवर कर आकारणी : फक्त संसद

- घटनेने कर आकारण्याचा अधिकार, कर गोळा करण्याचा अधिकार आणि कराचा विनियोग करण्याचा (खर्च) अधिकार असा भेद केला आहे.
- उदा. उत्पन्न कर (Income Tax) : याची आकारणी आणि संकलन केंद्र सरकार करते तर याची विभागणी केंद्र आणि राज्यामध्ये होते.

- **घटनेतील राज्यांच्या कर आकारणीवर घातलेली बंधने :**

1) राज्य, व्यवसाय, धंदा, उपजीविकेची साधने व रोजगार यावर कर आकारू शकते, परंतु असा कर प्रत्येक व्यक्तीसाठी प्रतिवर्षी 2500 रु. पेक्षा जास्त असू नये.
2) राज्य, वृत्तपत्रांव्यतिरिक्त इतर मालाच्या खरेदी-विक्रीवर कर आकारू शकते. परंतु :
   अ) राज्याच्या बाहेरील खरेदी विक्रीवर कर लावता येणार नाही.
   ब) आयात-निर्यात होणाऱ्या खरेदी-विक्रीवर कर लावता येणार नाही.
   क) आंतरराज्यीय व्यापार आणि वाणिज्य यात होणाऱ्या खरेदी-विक्रीवर कर आकारता येणार नाही.
   ड) आंतरराज्यीय व्यापार आणि वाणिज्य यात विशेष महत्त्वाच्या म्हणून संसदेने ठरवलेल्या मालाच्या खरेदी विक्रीवर संसदेने घातलेले निर्बंध व अटी विचारात घेऊनच कर आकारता येईल.
   (अतिरिक्त उत्पादन शुल्क (विशेष महत्त्वाच्या वस्तू) कायदा, 1957 ने तंबाखू, साखर, रेशीम, सुती व लोकरी कापड या वस्तू आंतरराज्य व्यापार व वाणिज्य यामध्ये विशेष महत्त्वाच्या म्हणून घोषित केल्या आहेत.)
3) राज्य हे विजेच्या वापरावर किंवा विक्रीवर कर आकारु शकते. परंतु पुढील बाबींमध्ये कर आकारणी करता येणार नाही.
   अ) केंद्राने वापरलेली वीज / केंद्रास विकलेली वीज.
   ब) रेल्वेची उभारणी, निगराणी किंवा रेल्वे चालवणे यासाठी केंद्राने वापरलेली वीज / केंद्रास याबाबत विकलेली वीज.
4) आंतरराज्यीय नदी/नदी खोरे यांच्या विकासासाठी किंवा नियमनासाठी संसदेने स्थापन केलेल्या निर्मिती केलेल्या, वापरलेल्या, वितरीत केलेल्या किंवा विकलेल्या पाण्यावर किंवा विजेवर राज्य कर आकारू शकते.

- असा कायदा करताना यास राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवावे लागते आणि राष्ट्रपतींची यास संमती मिळाल्यास हा कायदा लागू होतो.

## ※ कर महसूल विभागणी (Distribution of Tax Revenues)

- सुरूवातीला केंद्राने आकारणी व वसूली केलेल्या करांपैकी केवळ आयकर आणि केंद्रीय उत्पादन शुल्क या करांपासून प्राप्त महसूलाचीच विभागणी केंद्र आणि राज्यांमध्ये केली जात असे.
- 80 वी घटनादुरुस्ती, 2000 : नंतर केंद्राने आकारणी व वसूली केलेल्या सर्व करांची विभागणी केंद्र आणि राज्यांमध्ये केली जाऊ लागली. (सरचार्ज आणि सेस वगळता). (10 व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी)
- 88 वी घटनादुरुस्ती (2003) :
- कलम 268 A : सेवा करांशी संबंधीत तरतूदी.
- केंद्रसूचीत 'सेवा कर' हा नवीन विषय समाविष्ट.
- केंद्र सरकार सेवाकराची आकारणी करते तर त्याचे संकलन आणि वाटप केंद्र आणि राज्यांमध्ये होते.

## ※ कराची आकारणी, वसुली आणि वाटप (उत्पन्न) बाबत सद्यस्थिती :

| कलम | आकारणी | वसूली | उत्पन्न |
|---|---|---|---|
| 268 | केंद्र | राज्य | राज्य |
| 268 A | केंद्र | केंद्र+राज्य | केंद्र+राज्य |
| 269 | केंद्र | केंद्र | राज्य (संबंधीत राज्याकडे) |
| 270 | केंद्र | केंद्र | केंद्र+राज्य |
| 271 | केंद्र | केंद्र | केंद्र |

Dilip Sir's STEP UP Academy

1) 268 : सर्व हुंडी, धनादेश, वचनपत्र, विमा पत्र आणि भाग हस्तांतरण इ. वरील मुद्रांक शुल्क (Stamp Duties)

- मद्यार्क किंवा गुंगीचे पदार्थ असलेली औषधे किंवा सौंदर्य प्रसाधन वस्तूंवरील उत्पादन शुल्क
  (राज्यातून मिळणारे हे उत्पन्न केंद्राच्या संचित निधीचा भाग नसते.)

2) 268 A : सेवा कर

3) 269 : आंतरराज्यीय व्यापार व वाणिज्यातील वृत्तपत्र सोडून इतर मालाच्या खरेदी विक्रीवरील कर.
   – आंतरराज्यीय व्यापार व वाणिज्यातील माल पाठवण्यावरील कर.

4) 270 : कलम 268, 268A, 269 मध्ये नमूद केलेले कर वगळता, कलम 271 मध्ये नमूद केलेल्या कर व शुल्क यावरील अधिभार वगळता केंद्र सूचीतील सर्व शुल्क व कर यात येतात. वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती या करांच्या व शुल्काच्या निव्वळ उत्पन्नाच्या विभागाची प्रणाली ठरवतात.

5) कलम 271 : कलम 269 व कलम 270 मधील कर आणि शुल्क यावरील अधिभार (Surcharge)

**※ राज्याने आकारलेले, संकलित केलेले व स्वत:कडे राखून ठेवलेले कर :**

1) जमीन महसूल
2) शेती उत्पन्नावरील कर आणि शेत जमिनीसंबंधी वारसा आणि वारसा-संपत्तीविषयक शुल्क
3) मानवी सेवनाकरता मद्यार्कयुक्त दारू आणि गुंगी आणणाऱ्या पदार्थांवरील उत्पादन शुल्क
4) जमीन व इमारतींवरील कर, खनिज अधिकाऱ्यांवरील कर, पशु व नौका यावरील कर, वाहन कर, चैनीच्या वस्तूंवरील कर, करमणूक कर आणि जुगारावरील कर.
5) स्थानिक क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या मालावरील कर, वृत्तपत्र सोडून जाहिरातींवरील कर, विजेच्या वापरावरील कर, रस्ते वाहतूक किंवा अंतर्गत जल वाहतूक याद्वारे प्रवासी व मालवाहतुकीवरील कर.
6) व्यवसाय धंदा उपजिविकेची साधने आणि रोजगार यावर 2500 रु. पेक्षा जास्त नसलेला कर
7) पथकर (टोल) आणि इतर
8) देणगी शुल्क
9) केंद्र सूचीत नमूद केलेली कागदपत्रे सोडून इतर कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्क
10) वृत्तपत्रांव्यतिरिक्त इतर वस्तूंवरील विक्रीकर
11) न्यायालयीन शुल्क सोडून राज्य सूचीतील नमूद केलेल्या विषयांवरील कर

**※ करेतर महसूलाचे वितरण (Distribution of Non-Tax revenue)**

- केंद्र सरकार :
  अ) पोस्ट व टेलिग्राफ ब) रेल्वे क) बँकिंग ड) प्रसारण इ) नाणे आणि चलन फ) केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रम
- राज्य सरकार :
  अ) जलसिंचन ब) वने क) मत्स्य व्यवसाय ड) राज्य सार्वजनिक क्षेत्र उपक्रम.

**राज्यांना मिळणारी अनुदाने**

**1) कलम 275 : वैधानिक अनुदान (Statutory Grants) :**

- **साधारण अनुदान :** ज्या राज्यांना आर्थिक सहाय्याची गरज अशा राज्यांनाच या अंतर्गत अनुदान देण्यात येते. यानुसार वेगवेगळ्या राज्यांना वेगवेगळ्या रकमा निश्चित केल्या जाऊ शकतात.
- **विशिष्ट अनुदान :** एखाद्या राज्यातील अनुसूचित जमातीच्या कल्याणास चालना देण्यासाठी किंवा आसामसहीत इतर राज्यातील अनुसूचित क्षेत्राच्या प्राशासनाचा दर्जा उंचावण्यासाठी विशिष्ट अनुदान देण्याबाबतही घटनेत तरतूद आहे.
  – हे अनुदान वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार देण्यात येते.

**2) कलम 282 : ऐच्छिक अनुदान देण्याची तरतूद :**

- कोणत्याही सार्वजनिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अनुदान देण्याचा केंद्र व राज्य सरकारांना हा अधिकार असेल.
  (असे अनुदान देणे बधंनकारक नसते. किंवा एखाद्या राज्यांस दिले तर दुसऱ्या राज्यांसही मिळेल असे काही नसते. अगोदर नियोजन आयोगाच्या सल्ल्यानुसार याचे वाटप होत असे).

**※ केंद्र आणि राज्ये यांची कर्ज उभारणी (कलम 292 व 293) :**

1) केंद्र सरकार भाराताच्या संचित निधीचे तारण देऊन किंवा हमी देऊन देशातून किंवा देशाबाहेरून कर्ज घेऊ शकते.
2) राज्य सरकार राज्याच्या संचित निधीचे तारण देऊन/हमी देऊन देशातून कर्ज घेऊ शकते.
3) केंद्र सरकार कोणत्याही राज्य सरकारला कर्ज देऊ शकते किंवा राज्याने उभारलेल्या कर्जास हमी देऊ शकते. असे कर्ज देण्यासाठी लागणारा निधी भारताच्या संचित निधीतून दिला जातो.

4) केंद्राने दिलेल्या कर्जापैकी किंवा ज्या कर्जासाठी केंद्राने हमी दिली आहे, अशा कर्जापैकी काही थकबाकी असेल तर केंद्राच्या संमतीशिवाय राज्य कर्ज उभारू शकत नाही.

## आंतरराज्य व्यापार आणि वाणिज्य (भाग : 13, कलम 301 ते 307)

❊ कलम 301 : भारताच्या संपूर्ण क्षेत्रात व्यापार, वाणिज्य आणि व्यवहार हे मुक्त असतील.

**अपवाद :**

❊ कलम 302 : सार्वजनिक हिताच्या दृष्टीने संसद राज्याराज्यातील व राज्यांतर्गत व्यापार, वाणिज्य आणि व्यवहार यावर बंधने घालू शकते. संसद यामध्ये एका राज्याला दुसऱ्या राज्यापेक्षा अधिक प्राधान्य देणार नाही.

❊ कलम 303 : सार्वजनिक हिताच्या दृष्टीने राज्य विधिमंडळ त्या राज्यांतर्गत किंवा राज्याबरोबरच्या व्यापार, वाणिज्य व व्यवहार यावर वाजवी बंधने घालू शकते (परंतु असे विधेयक मांडण्यासाठी राष्ट्रपतींची पूर्व संमती लागते)

- राज्य एका राज्यास इतर राज्यांपेक्षा अधिक प्राधान्य देऊ शकत नाही.

❊ कलम 304 : दुसऱ्या राज्यातून किंवा कें. प्र. तून आयात केलेल्या मालावर राज्य विधिमंडळ त्या राज्यात उत्पादित केलेल्या त्यासारख्या मालावर लावला जाणारा कर लावू शकते. यानुसार राज्याने भेदभाव करणारे कर लावण्यावर बंदी असेल.

❊ कलम 305 : कलम 301 मधील असलेल्या स्वातंत्र्यास राष्ट्रीयीकरण कायदे (केंद्र व राज्य यांना मक्तेदारी देणारे कायदे) अपवाद असतील.

## केंद्र आणि राज्यांच्या संबंधांमधील बदलता कल

● **तणावाचे मुद्दे :**

1) राज्यपाल नियुक्तीची पद्धती/पदावरून दूर करण्याची पद्धती.
2) राज्यपालांची पक्षपाती भूमिका
3) राज्यात राष्ट्रपती राजवट लावणे.
4) राष्ट्रपतींच्या विचारार्थ राज्याची विधेयके ठेवणे.
5) राज्याराज्यांमध्ये आर्थिक तरतूदींबाबत भेदभाव
6) कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केंद्रीय दल नियुक्त करणे.
7) नियोजन आयोगाची भूमिका : निधी देण्याबाबत प्रकल्पांना मंजुरीबाबत.
8) अखिल भारतीय सेवा
9) राज्य विषयावर केंद्राचे आक्रमण

## संबंध सुधारण्याबाबत झालेले प्रयत्न

### ❊ पहिला प्रशासकीय सुधारणा आयोग (1966)

- अध्यक्ष : मोरारजी देसाई (नंतर : के. हनुमंतय्या)
- त्यांनी केंद्र-राज्य संबंधांचा अभ्यास करण्यासाठी एक अभ्यास गट नेमला.
- एम. सी. सेटलवाड हे त्याचे अध्यक्ष होते.

● त्यांनी दिलेल्या अहवालातील (1969) प्रमुख तरतूदी :

1) कलम 263 नुसार, आंतरराज्यीय परिषदेची स्थापना करणे.
2) राज्यपाल पदावर नियुक्त होणारी व्यक्ती सार्व. जीवनाचा आणि प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेली व निष्पक्षपाती पद्धतीने काम करणारी असावी.
3) राज्यांकडे जास्तीत जास्त अधिकार सोपवावे.
4) आर्थिक संसाधने राज्यांकडे देऊन त्यांचे केंद्रावरील अवलंबित्व संपवावे.

- यांच्या शिफारशी केंद्र सरकारने स्वीकारल्या नाही.

### ❊ राजमन्नार समिती :

- 1969 साली तामिळनाडू राज्य सरकारने नेमलेली समिती.
- राजमन्नार हे या त्रिस्तरीय समितीचे अध्यक्ष होते. 1971 साली अहवाल सादर.

● **प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे :**

- आंतरराज्यीय परिषदेची लगेचच स्थापना करा.
  - वित्त आयोग कायमस्वरूपी संस्था असेल.
- नियोजन आयोग बरखास्त करावा.
  - कलम 365, 356, 357 वगळावे.
- उर्वरीत विषयांचे अधिकार राज्यांना द्यावे.
  - अखिल भारतीय सेवा रद्द कराव्यात.
- केंद्र सरकारने या शिफारशी स्वीकारल्या नाहीत.

❊ **आनंदपूरसाहिब ठराव : 1973 :**

- अकाली दलाने आनंदपूर साहिब येथील सभेत धार्मिक तसेच राजकीय मागण्या केल्या.

1) केंद्र सरकारकडे फक्त संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, चलन आणि दळणवळण इ. विषय असावे व उर्वरित विषय राज्यांकडे सोपवावे.
2) केंद्रात सर्व राज्यांना समान प्रतिनिधित्व आणि अधिकार असावेत.

### ❊ पश्चिम बंगाल निवेदनपत्र :

- 1977 साली साम्यवादी पदाच्या नेतृत्वाखालील पश्चिम बंगाल सरकारने केंद्र-राज्य संबंधांवर एक निवेदनपत्र केंद्र सरकारला सादर केले.



Dilip Sir's STEP UP Academy

- यामधील तरतुदीही वरील वेगवेगळ्या समित्यांनी दिलेल्या शिफारशींसारख्यात होत्या. यांच्याही मागण्या केंद्र शासनाने पूर्ण केल्या नाहीत.

**✻ सरकारिया आयोग (1983) :**

- **भारताचे निवृत्त न्यायाधीश**
- केंद्र सरकारने नेमलेला त्रिस्तरीय आयोग.
- सदस्य बी. शिवरामन, एस. आर. सेन.
- केंद्र-राज्य संबंधांबाबत परिक्षण करून त्यात बदलाबाबत उपाययोजना सुचवणे हे मुख्य काम.
- अहवाल सादर : 1987 साली.
- 'केंद्राचे अधिकार कमी करण्याची मागणी फेटाळली'.
- 'सध्याचे घटनात्मक व्यवस्थेत बदल करण्याची आवश्यकता नाही'

● **या आयोगाच्या काही महत्त्वाच्या शिफारशी :**

1) आंतरराज्यीय परिषद स्थापन करावी : (तिचे नाव, आंतर-शासन परिषद असे असेल.)
2) राष्ट्रपती राजवट : अखेरचा पर्याय असावा.
3) अखिल भारतीय सेवा अधिक प्रबल कराव्यात तसेच आणखी नवीन अखिल भारतीय सेवांची निर्मिती करावी.
4) कर आकारणीचे उर्वरित अधिकार केंद्राकडे तर इतर सर्व उर्वरित अधिकार समवर्ती सूचित समाविष्ट करावे.
5) राज्याचे विधेयक जेव्हा राष्ट्रपतींच्या संमतीसाठी राखीव असेल तेव्हा त्याचे कारण संबंधित राज्य शासनास कळवावे.
6) समवर्ती सूचीतील विषयांवर कायदा करताना केंद्राने राज्यांशी विचारविनिमय करावा.
7) राज्यपाल नियुक्ती : मुख्यमंत्र्यांशी विचारविनिमय करण्याबाबत घटनेतच तरतूद करावी.
8) विधानसभेत बहुमत असेपर्यंत राज्यपालांनी मंत्रीमंडळ बरखास्त करू नये.
9) अत्यंत अपरिहार्य कारणाशिवाय राज्यातील राज्यपालांच्या पाच वर्षांच्या कार्यकालात बदल करू नये.
10) राज्यसभेची भूमिका व राज्याची पुनर्रचना करण्याच्या केंद्राच्या अधिकारात बदल करू नये.
11) राष्ट्रीय विकास परिषदेचे नाव 'राष्ट्रीय अर्थ व विकास परिषद' करावे.
12) त्रिभाषा सुत्र समान पद्धतीने अंमलात आणावे.
13) राज्यांची संमती नसतानाही राज्यात सशस्त्र सैन्य पाठवण्यास अधिकार केंद्रास असावा.

**✻ पंछी आयोग (2007) :**

- केंद्र सरकारने केंद्र-राज्या संबंधांबाबत नियुक्त केलेला हा दुसरा आयोग होता.
- मदन मोहन पंछी - भारताचे माजी सर न्यायाधीश
- सदस्य - धीरेंद्र सिंग, अमरेश बागची, विनोद दुग्गल, एन. आर. माधव मेनन.
- 2010 साली अहवाल सादर केला.

● **प्रमुख शिफारशी :**

1) राज्यपाल नियुक्तीबाबत सरकारीया आयोगाने केलेल्या शिफारशी अंमलात आणाव्यात :
   अ) एखाद्या क्षेत्रात तो सर्वश्रेष्ठ असावा.
   ब) स्थानिक राजकारणात गुंतलेला नसावा.
   क) तो राज्याबाहेरचा असावा.
   ड) त्याचा राजकारणातील मोठा सहभाग हा अगदी अलीकडच्या काळातील नसावा.
2) राज्यपालांना ठराविक 5 वर्षांचा कार्यकाल असावा.
3) राष्ट्रपतींवरील महाभियोग प्रक्रियेत आवश्यक बदल करून ती राज्यपालांना लागू करावी.
4) राज्यपाल हे विद्यापीठांचे कुलपती किंवा इतर वैधानिक पदांवर असण्याची प्रथा रद्द करावी. त्यांची भूमिका घटनात्मक कर्तव्यांपुरतींच असावी.
5) राज्यात राष्ट्रपती राजवट लावण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये (एस. आर. बोम्मई केस-1994) योग्य तो बदल करून ती तत्त्वे घटनेत समाविष्ट करावी.
6) आंतर-राज्य परिषद ही विश्वासार्ह, अधिक प्रबळ व न्याय्य यंत्रणा बनविण्यासाठी कलम 263 मध्ये योग्य तो बदल करावा.
7) आरोग्य, शिक्षण, अभियांत्रिकी आणि न्यायव्यवस्था अशा क्षेत्रांसाठी नव्या अखिल भारतीय सेवा निर्माण कराव्यात.
8) राज्यसभेत राज्यांना समान जागा देण्याबाबत घटनेत बदल करण्याची आवश्यकता आहे.

**आंतर राज्यीय परिषद : Inter State Council**

- घटनेत तरतूद : कलम 263 (घटनात्मक संस्था)
- स्थापना वर्ष : 1990 (नियुक्ती : राष्ट्रपती) (सिंग सरकारने स्थापन)
- रचना : अध्यक्ष : पंतप्रधान

Dilip Sir's STEP UP Academy

- सदस्य : सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, विधानसभा असलेल्या कें. प्र. चे मुख्यमंत्री, विधानसभा नसलेल्या कें. प्र. चे प्रशासक
  - राष्ट्रपती राजवट सुरू असलेल्या राज्यांचे राज्यपाल
  - पंतप्रधानांनी नियुक्त केलेले गृहमंत्र्यांसहीत सहा केंद्रीय कॅबिनेट मंत्री
- **कार्ये :**

1) केंद्र-राज्यांचे समान हित असलेल्या विषयांवर सखोल चर्चा करणे.
2) धोरण व कृती यामध्ये चांगला समन्वय साधण्यासाठी कोणत्याही विषयावर शिफारस करणे.

- बैठका : एका वर्षात किमान 3 (बैठका बंदिस्त खोलीत घेतल्या जातात आणि सर्वानुमते प्रश्न सोडवले जातात)
- या परिषदेची एक **स्थायी समिती** 1996 पासून कार्यरत आहे.
- रचना : अध्यक्ष : केंद्रीय गृहमंत्री, सदस्य : 5 केंद्रीय कॅबिनेट मंत्री, 9 मुख्यमंत्री
- तसेच या परिषदेस सहाय्य करण्यासाठी 1991 पासून **सचिवालयही** कार्यरत आहे. 2011 पासून हे सचिवालय विभागीय परिषदांसाठीही काम करते.

## विभागीय परिषदा (Zonal Council)

- स्थापना : राज्य पुनर्रचना कायदा 1956 नुसार (म्हणजेच ही वैधानिक संस्था आहे).
- या कायद्यानुसार : 5 विभागीय परिषदा स्थापन करण्यात आल्या आहेत. (उत्तर, मध्य, पूर्व, पश्चिम, दक्षिण, आणि मध्य)
- रचना : अध्यक्ष : केंद्रीय गृहमंत्री
- उपाध्यक्ष : राज्याचा मुख्यमंत्री (रोटेशन पद्धती : 1 वर्षासाठी)
- सदस्य : विभागातील सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, प्रत्येक राज्याचे दोन इतर मंत्री, प्रत्येक केंद्रशासित प्रदेशाचा प्रशासक.
- तसेच पुढील व्यक्ती हे सल्लागार म्हणून काम करतात. त्यांना मतदानाचा अधिकार नसेल.
  अ) नियोजन आयोगाने नियुक्त केलेला सदस्य
  ब) राज्याचा मुख्य सचिव
  क) राज्याचा विकास आयुक्त
- केंद्र शासन, राज्ये तसेच कें. प्र. यांच्यात सहकार्य समन्वय साधण्याचे काम विभागीय परिषदा करतात.

### ✻ ईशान्य परिषद :

- ईशान्य परिषद कायदा, 1971 नुसार या विभागीय परिषदेची स्थापना.
- स्थापना : 8 ऑगस्ट 1972
- अध्यक्ष : केंद्रीय गृहमंत्री (2018 पर्यंत याचे अध्यक्ष ईशान्य प्रदेश विकास मंत्री हे होते. सध्या त्यांना उपाध्यक्षांचा दर्जा देण्यात आलेला आहे.)
- सदस्य राज्य : आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा, सिक्कीम (2002 साली समाविष्ट)
- **कार्ये :**
- सामाजिक महत्त्वाच्या मुद्यांबाबत एकात्मिक व परस्परपूरक क्षेत्रीय योजना आखणे हे या परिषदेचे मुख्य काम आहे.
- संरक्षण आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याबाबत सदस्य राज्यांनी केलेल्या उपाय योजनांचा आढावा घेणे.

### ✻ विभागीय परिषदा :

| नाव | सदस्य राज्ये | मुख्यालय |
|---|---|---|
| उत्तर विभागीय परिषदा | JK, HP, HR, PB, RJ, DL, चंदीगढ | नवी दिल्ली |
| मध्य विभागीय परिषदा | UP, UK, CG, MP | अलाहाबाद |
| पूर्व विभागीय परिषदा | BR, ZK, WB, OD | कोलकाता |
| पश्चिम विभागीय परिषदा | GJ, MH, GA, DN, D&D | मुंबई |
| दक्षिण विभागीय परिषदा | AP, TS, KA, TN, KL, PD | चेन्नई |
| ईशान्य विभागीय परिषदा | AS, MG, ArP, NG, MA, MZ, TR, SK | शिलाँग |

Dilip Sir's STEP UP Academy

# भारतीय न्यायव्यवस्था

- ❊ **रचना :** एकात्मिक स्वरूप (Unitary feature) (सर्वोच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली उच्च न्यायालये आहेत आणि उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली जिल्हा न्यायालये आणि इतर न्यायालये आहेत.)
- न्यायालयाची एकात्मिक रचना ही तरतूद 1935 च्या भारत सरकार कायद्यातून घेतलेली आहे.

> भारतामध्ये उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात राज्य तसेच केंद्राच्या कायद्यांची अंमलबजावणी केली जाते. परंतु अमेरिकेत राज्याच्या कायद्याची अंमलबजावणी ही राज्य न्याय व्यवस्थेकडून तर केंद्राच्या कायद्यांची अंमलबजावणी संघराज्यीय न्यायव्यवस्थेकडून केली जाते. म्हणजेच भारतातील न्यायव्यवस्था एकात्मिक स्वरूप दर्शवते तर अमेरिकेची न्यायव्यवस्था संघराज्यीय स्वरूप दर्शवते.

## सर्वोच्च न्यायालय – भाग 5, कलम 124–147

- 1935 च्या कायद्यानुसार : संघराज्यीय न्यायालय (Federal Court) स्थापन केले होते.
- 28 जानेवारी 1950 रोजी सर्वोच्च न्यायालय स्थापन करण्यात आलेले हे अपील करण्याठीचे वरिष्ठ न्यायालय आहे.
- फेडरल कोर्ट हे अपीलाचे वरिष्ठ न्यायालय नव्हते. 1950 पूर्वी ब्रिटनच्या प्रिव्ही काऊन्सिलला (Privy Council of Britain) भारतातील अपिलांबाबतचे अधिकारक्षेत्र होते.

- **रचना :** सुरूवातीस : 1 + 7 इतर न्यायाधीश
- सध्या : 1 + 34 इतर न्यायाधीश (न्यायाधीश संख्या ठरविण्याचा अधिकार : संसदेला)
  (2019 साली केलेल्या कायद्याने इतर न्यायाधिशांची संख्या 31 वरून 34 झाली आहे.
- **नियुक्ती :** राष्ट्रपती (Appointment by president)
- सरन्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती करतात आणि इतर न्यायाधिशांची नियुक्ती करताना राष्ट्रपती हे सरन्यायाधीश आणि योग्य वाटेल त्या सर्वोच्च न्यायालयाच्या व उच्च न्यायालयांच्या न्यायाधिशांशी विचारविनिमय करून करतात.
- इतर न्यायमूर्तींची नियुक्ती करतांना सरन्यायाधीश यांच्याबरोबर विचारविनिमय करणे हे राष्ट्रपतींवर बंधनकारक आहे.
  विचारविनिमय याबाबतचे **'न्यायाधिशांचे तीन खटले' (Three Judges Case)** प्रसिद्ध आहेत :

1) **पहिला खटला (1982) :** सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय – विचारविनिमय यामध्ये फक्त विचारांची देवाणघेवाण अपेक्षित आहे. येथे सहमती अपेक्षित नाही.
2) **दुसरा खटला (1993) :** सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय – सर्वोच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधिशांची नेमणूक करतांना राष्ट्रपतींवर सरन्यायाधीशांनी दिलेला सल्ला बंधनकारक असेल. अशा वेळी सरन्यायाधीश हे आपल्या इतर दोन सहकाऱ्यांशी चर्चा करूनच सल्ला देतील.
3) **तिसरा खटला (1998) :** सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय – भारताच्या सरन्यायाधीशांचे एकट्याचे मत म्हणजे विचारविनिमय नव्हे, अशा वेळी सरन्यायाधीश हे सर्वोच्च न्यायालयातील सर्वात जेष्ठ अशा चार न्यायाधीशांच्या मंडळाशी चर्चा करून ठरवतील. जर या मंडळातील दोघांनी विरोधी मतदान केले तर सरन्यायाधिशांनी सरकारला शिफारशी करू नये. वरील प्रक्रियेची अंमलबजावणी न करता सरन्यायाधीशांनी दिलेला सल्ला सरकारवर बंधनकारक नसेल.

> 99 वी घटनादुरुस्ती 2014 आणि त्यानुसार तयार करण्यात आलेला राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा 2014 नुसार सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती आणि बदली याबाबत सुरू असलेली कॉलेजीयम पद्धती रद्द करून राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग (National Judiciary Appointment Commission) ही नविन संस्था उभारण्यात यावी अशी तरतूद करण्यात आली होती.

4) **चौथा खटला (2015) :** सर्वोच्च न्यायालयाने 99 वी घटनादुरुस्ती 2014 आणि राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा 2014 या दोन्ही तरतुदी घटनाबाह्य ठरवल्या. त्यामुळे सध्या न्यायालयाच्या नियुक्तीसाठी जुनीच कॉलेजीयम पद्धती लागू आहेत.

### ❊ सरन्यायाधीशांची नियुक्ती :

- 1950 ते 1973 : सर्वोच्च न्यायालयातील सर्वात ज्येष्ठ न्यायाधीश सरन्यायाधीशपदी (CJI) निवडले जात.
- 1973 ला ही प्रक्रिया डावलून न्या. ए. एन. रे सरन्यायाधीशपदी नियुक्त केले.
  (जे. एम. शेलट, के. एस. हेडगे, ए. एन. ग्रोव्हर : केशवानंद भारती प्रकरण)
- 1977 : एम. यु. बेग यांची नियुक्ती (वरिष्ठ : एच. आर. खन्ना यांना डावलून)

Dilip Sir's STEP UP Academy

- 1993 : सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाद्वारे :
  i) शासनाच्या विवेकाधिकारावर मर्यादा आणल्या.
  ii) सरन्यायाधीशपदी सर्वोच्च न्यायालयातील केवळ सर्वाधिक वरिष्ठ न्यायाधीशाचीच नियुक्ती करता येईल, हे निश्चित केले.

**✻ न्यायाधीशांची पात्रता (Qualification of Judges) :**

1) ते भारताचे नागरिक असावे.
2) अ) ते उच्च न्यायालयाचे 5 वर्षे न्यायाधीश असावे. किंवा
   ब) त्यांनी उच्च न्यायालयात 10 वर्षे वकिली केलेली असवी. किंवा
   क) राष्ट्रपतींच्या मते ते निष्णात कायदेपंडीत असावे. (He should be distinguished jurist in the opinion of president)

- **शपथ (Oath)** : सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांना राष्ट्रपती किंवा त्यांनी नियुक्त केलेला व्यक्ती पुढीलप्रमाणे शपथ देतो :

1) भारतीय राज्यघटनेशी श्रद्धा व निष्ठा बाळगणे. (True faith and allegiance to the constitution)
2) भारताचे सार्वभौमत्व व अखंडता यांचे संरक्षण करणे. (To uphold the sovereignty and integrity of India)
3) पदाची कामे पूर्ण निष्ठेने आणि त्याच्या पूर्ण क्षमता, ज्ञान, विवेक वापरून निष्पक्षपातीपणे पार पाडणे.
4) राज्यघटना आणि कायदे यांचे संरक्षण करणे. (To uphold the constitution and the laws)

- **कार्यकाल** : वयाची 65 वर्षे पूर्ण होईपर्यंत पदावर राहू शकतात.
  (येथे कमीत कमी वयाची अट नमूद नाही किंवा किती वर्षे कार्यकाल असावा असेही नमूद नाही.)
- **राजीनामा** : राष्ट्रपतींना उद्देशून

**✻ न्यायाधीशांची पदच्यूती (Removal of Judges)**

- संसदेच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून दूर करू शकतात. त्यासाठी संसदेला कायदा करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.
- यासाठी संसदेचे दोन्ही सभागृहांचे विशेष बहुमत (Special majority) आवश्यक असते.
- कारण : सिद्ध झालेली गैरवर्तणवणूक आणि अकार्यक्षमता. (Proved misbehaviour or incapacity)
- पदावरून दूर करण्याची पद्धती : **न्यायाधीश चौकशी कायदा, 1968 (Judges Enquiry Act, 1968)** मध्ये नमूद आहे.

1) असा प्रस्ताव लोकसभेत 100 सदस्यांच्या सहीने आणि राज्यसभेत 50 सदस्यांच्या सहीने पीठासीन अधिकाऱ्यांना (Speaker or chairman) सादर करावा लागतो.
2) असा प्रस्ताव दाखल करून घेणे अथवा नाकारणे हा पीठासीन अधिकाऱ्यांचा अधिकार आहे.
3) त्या सभागृहात प्रस्ताव स्वीकारला तर त्रिसदस्यीय समिती स्थापन केली जाते. यामध्ये पुढील सदस्य असतात.
   अ) सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश किंवा न्यायाधीश. (CJI or judge of supreme court)
   ब) कोणत्याही उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश (A chief justic of a high court)
   क) निष्णात कायदेतज्ज्ञ (A distinguished jurist)
4) जर न्यायाधीश गैरवर्तणूक/अकार्यक्षम म्हणून आढळल्यास सभागृहात प्रस्तावावर चर्चा होते.
5) दोन्ही सभागृहात हा ठराव विशेष बहुमताने संमत होऊन राष्ट्रपतींकडे पाठवला जातो.
6) अशावेळी राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करतात.

आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयामधील एकाही न्यायाधीशाला महाभियोग प्रक्रियेद्वारे पदावरून दूर केलेले नाही. फक्त सर्वोच्च न्यायालयात कार्यरत असलेले व्ही. रामास्वामी (1991-93) यांच्यावर चौकशी समितीने गैरवर्तणूकीसाठी अपराधी ठरवले होते. परंतु लोकसभेत हा ठराव संमत होऊ शकला नसल्याने पुढील प्रक्रिया होऊ शकली नाही. कारण काँग्रेस पक्षाने या मतदानात भाग घेतला नाही (सभात्याग केला).

- **वेतन व भत्ते (Salaries & Allowances)** : संसद ठरवते. (संचित निधीतून दिले जाते.) (Consolidated fund)
- आर्थिक आणीबाणी (Financial emergency) वगळता यांच्या नियुक्तीनंतर वेतनावर प्रतिकूल परिणाम करणारा कायदा करता येत नाही.
- **प्रभारी सरन्यायाधीश (Acting Cheif Justice) : खालील परिस्थितीत राष्ट्रपती नियुक्त करू शकतात : (कलम 126)**

1) सरन्यायाधीश पद रिक्त (Vacant) असेल.
2) सरन्यायाधीश हे काही काळासाठी गैरहजर (Temporarity absent) असतील.
3) सरन्यायाधीश यांच्या पदाची कार्ये करण्यास अक्षम असतील. (Unable to perform the duties of his office)



Dilip Sir's STEP UP Academy

**※ हंगामी न्यायाधीश (Adhoc Judges) (कलम 127)**

- नियुक्ती : सरन्यायाधीश (CJI)
- कोणाची : उच्च न्यायालयातील न्यायाधीशाची
- कशासाठी : सर्वोच्च न्यायालयातील सेशन सुरू राहण्यासाठी गणसंख्या (Quorum) कमी असेल तर
- पूर्वसंमती : राष्ट्रपतीची
- सल्ला : संबंधीत उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीशांचा.
- अशा वेळी नियुक्त न्यायाधीशाला इतर न्यायाधीशांच्याप्रमाणेच अधिकारक्षेत्र प्रदान केले जाते. (Enjoys all the jurisdiction, power and privileges of judge of the supreme court)

**※ सेवानिवृत्त न्यायाधीश (Retired Judges) (कलम 128)**

- नियुक्ती : सरन्यायाधीश
- पूर्वसंमती : राष्ट्रपती आणि ती संबंधीत व्यक्ती
- कोणाची नेमणूक : सेवानिवृत्त झालेले सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाचे न्यायाधीश.
- कोठे : तात्पुरत्या काळासाठी सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशपदी कार्य करण्याची विनंती करतात.
- अधिकार : न्यायाधीशांच्याप्रमाणेच, परंतु इतर वेळी न्यायाधीश मानली जाणार नाही.
- कालावधी : 2 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे पूर्ण होईपर्यंत

**※ सर्वोच्च न्यायालयाचे ठिकाण (Seat of supreme court) : (कलम 130)**

- घटनेत सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे असेल असे नमदू केले आहे.
- राज्यघटनेने सरन्यायाधीशांना सर्वोच्च न्यायालय इतर ठिकाणी (1 किंवा जास्त) स्थापण्याचा अधिकार दिला आहे. (ही तरतूद बंधनकारक नाही).

**※ न्यायालयाची प्रक्रिया (Procedure of the court) :**

- राष्ट्रपतींच्या संमतीने सर्वोच्च न्यायालयाला आपल्या कामाची पद्धती व प्रक्रिया यांचे नियमन करण्यासाठी वेगळे नियम बनवण्याचा अधिकार आहे.
- सर्वसाधारण परिस्थितीत 3 किंवा जास्त न्यायाधीशांचे खंडपीठ असते.
- परंतु घटनात्मक बाबी आणि कलम 143 नुसार राष्ट्रपतींनी मागीतलेला सल्ला यासाठी किमान 5 न्यायाधीशांचे खंडपीठ निर्णय घेते.

**※ सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य (Independence of Supreme Court) :**

- नियुक्तीची पद्धती (Mode of appointment) : कार्यकारी आणि कायदेमंडळाच्या दबावापासून पूर्णपणे मुक्त. (राष्ट्रपती न्यायव्यवस्थेच्या सदस्यांशी विचारविनिमय करतील.)
- कार्यकालाची हमी (Security of tenure) : नियुक्ती जरी राष्ट्रपती करत असतील, तरी त्यांना पदावरून दूर करण्यासाठी किचकट प्रक्रिया आहे. (राज्यघटनेतील नमूद कारणांसाठी आणि ठराविक प्रक्रियेनुसारच त्यांना पदावरून दूर करता येते.)
- स्थिर सेवा शर्ती (Fixed service conditions) : वेतन, भत्ते, विशेषाधिकार, रजा, निवृत्तीवेतन हे सर्व संसद ठरवते परंतु यात न्यायाधीशांना प्रतिकूल ठरतील असे बदल करता येणार नाही. (खर्च संचित निधीवर भारीत (Charged on exependiture) – यावर संसदेत फक्त चर्चा होते, मतदान होऊ शकत नाही.)
- न्यायाधीशांच्या कामकाजावर भाष्य होऊ शकत नाही (Conduct of judges can not be discussed) : फक्त पदावरून दूर करण्याच्या प्रक्रियेवेळीच संसद यावर चर्चा करेल परंतु इतर वेळी असा अधिकार नाही.
- निवृत्तीनंतर वकिली व्यवसाय करण्यास बंदी. (Nan on practice after retirement)
- अवमान केल्यास शिक्षेचा अधिकार (Power to punish for its contempt) : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर किंवा कृतींवर कोणीही टीका करू शकत नाही किंवा विरोध करू शकत नाही.
- कर्मचारी नियुक्तीचे स्वातंत्र्य (Freedom to appoint its staff) : सरन्यायाधीश अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू शकतात. त्याच्या सेवाशर्तीसुद्धा ठरवू शकतात.
- संसद न्यायालयाचे अधिकार व अधिकारक्षेत्र कमी करू शकत नाही. मात्र यात वाढ करू शकते. **(कलम 138 नुसार)**
- कार्यकारींपासून स्वतंत्र (Seperation from executives) : कार्यकारींना न्यायिक अधिकार नाहीत.

## सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार आणि अधिकार क्षेत्र (Jurisdiction and Power)

''भारताच्या सर्वोच्च न्यायालयास जगातील इतर कोणत्याही सर्वोच्च न्यायालयापेक्षा अधिक अधिकार आहेत.''

– अल्लादी कृष्णस्वामी अय्यर (मसुदा समितीचे सदस्य)

Dilip Sir's STEP UP Academy

**1) प्रारंभिक अधिकार क्षेत्र (कलम 131) (Original Jurisdiction)**

- यामध्ये पुढील प्रकारच्या विवादावर निर्णय देण्याचा फक्त अधिकार सर्वोच्च न्यायालयाचा आहे.

 अ) केंद्र आणि एक किंवा अधिक घटक राज्ये.

 ब) एका बाजूला केंद्र व एक किंवा अधिक घटक राज्ये आणि दुसऱ्या बाजूला एक किंवा अधिक घटक राज्ये.

 क) दोन किंवा अधिक राज्यातील विवाद.

- **या प्रारंभिक अधिकाराबाबत नमूद दोन मुद्दे :**

1) या विवादांमध्ये न्यायिक अधिकारांचे अस्तित्व किंवा व्याप्ती अवलंबून असलेला न्याय विषयक प्रश्न असावा. (राजकीय स्वरूपाचा प्रश्न नव्हे)

2) खाजगी नागरिकाने केंद्राच्या किंवा राज्याच्या विरोधात दाखल केलेल्या खटल्याचा यात समावेश होत नाही.

- **पुढील बाबी सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही :**

अ) घटनापूर्व काळातील तह, करार, कलमे, ठराव, सनद व इतर कराच्या दस्तऐवजातून उद्भवणारे विवाद.

ब) ज्या करारात सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र नसेल असा स्पष्ट उल्लेख असल्यास.

क) आंतरराज्यीय जल विवाद (यासाठी आंतरराज्य जल विवाद कायदा, 1956 कार्यरत आहे).

ड) वित्त आयोगाकडे सोपवलेल्या बाबी.

इ) काही खर्च आणि निवृत्तीवेतन याबाबत केंद्र आणि राज्यांमध्ये असलेली फेररचना.

फ) केंद्र आणि राज्यांतील सर्वसाधारण वाणिज्यिक विवाद.

ग) केंद्राकडून राज्यास मिळणारी नुकसान भरपाई.

> सर्वोच्च न्यायालयाच्या प्रारंभिक अधिकार क्षेत्रातील पहिला खटला 1961 साली पश्चिम बंगाल राज्याने केंद्र शासनाविरुद्ध दाखल केला होता. यामध्ये संसदेने संमत केलेल्या कोळसा असलेली क्षेत्रे (संपादन व विकास) कायदा, 1957 यास आव्हान दिले. परंतु सर्वोच्च न्यायालयाने या कायद्याची घटनात्मक वैधता मान्य केली.

**2) आदेशाचे अधिकारक्षेत्र (कलम 32) (Writ Jurisdiction)**

- नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण आणि त्यांची हमी देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची तरतूद केली आहे.
- याच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालय पुढील आदेश देऊ शकते :

 अ) बंदी प्रत्यक्षीकरण (हॅबियस कॉर्पस)

 ब) परमादेश (मँडमस)

 क) प्रतिषेध (प्रोहिबिशन)

 ड) उत्प्रेक्षण (सर्शिओराराय)

 इ) अधिकार पृच्छा (को वॉरंटो)

- यास सर्वोच्च न्यायालयाचे प्रारंभिक अधिकारक्षेत्र असेही म्हणता येईल. परंतु हा अधिकार 'प्रारंभिक' असला तरी विशिष्ट किंवा निवडक नाही तो उच्च न्यायालयाबरोबर समवर्ती (Concurrent) आहे. कारण कलम 226 नुसार उच्च न्यायालयास हा अधिकार आहे.
- सर्वोच्च न्यायालय केवळ मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठीच आदेश काढू शकते, तर उच्च न्यायालय मूलभूत हक्क बजावण्याबरोबरच इतर उद्देशांसाठीही आदेश काढू शकते. म्हणजेच उच्च न्यायालयाचे आदेश देण्याचे अधिकार क्षेत्र सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रापेक्षा मोठे आहे.
- इतर कारणासाठी आदेश देण्याचा अधिकार संसद सर्वोच्च न्यायालयास प्रदान करू शकते.

**3) अपिलीय अधिकारक्षेत्र (Appellate Jurisdiction)**

**अ) घटनात्मक बाबीविषयक अपील (कलम 132) (Constitutional amendments) :**

- यात उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात जर राज्यघटनेतील तरतुदींच्या अर्थविषयक काही कायदेविषयक प्रश्न उपस्थित झाला असेल तर, उच्च न्यायालयाने असे प्रमाणित केल्यास अपील करता येते.
- यानुसार कायद्याचा अर्थ चुकीचा लावला आहे, या कारणासाठी पक्षकार सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करू शकतो.

**ब) दिवाणी खटल्यांबाबत अपील (कलम 133) (Civil Matters) :**

- जर उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे प्रमाणित केले तर उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते.

1) यात सर्वसामान्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा कायद्याचा प्रश्न आहे. आणि

2) याबाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देण्याची आवश्यकता आहे.

- सुरुवातीला अपील करण्यासाठी रु. 20,000 रकमेबाबत खटला असेल तरच अपील करता येत होते. परंतु आता अशी आर्थिक मर्यादा नाही.

Dilip Sir's STEP UP Academy

**क) फौजदारी खटल्यांबाबत अपील (कलम 134) (Criminal matters) :**

1) जर उच्च न्यायालयात अपील केल्यावर उच्च न्यायालयाने आरोपीला निर्दोष ठरविण्याचा निर्णय बदलून आरोपीस अपराधी ठरवले आणि फाशीची शिक्षा दिली तर.

2) जर उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयाकाडून खटला स्वतःकडे घेतला आणि आरोपी गुन्हेगार सिद्ध होऊन त्यास फाशीची शिक्षा दिली.

3) खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करावे असे उच्च न्यायालयाने प्रमाणित केले.

- परंतु जर उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयाद्वारे आरोपीस 'अपराध सिद्ध' केलेला निर्णय बदलून त्या आरोपीस निर्देष घोषित केले तर मात्र सर्वोच्च न्यायालयात अपील करता येत नाही.
- संसद कायद्याद्वारे सर्वोच्च न्यायालयाच्या फौजदारी अपील अधिकार क्षेत्रात कायद्याद्वारे वाढ करू शकते.

- **याबाबत संसदेने 1970 साली कायदा केलेला आहे : यानुसार :**

अ) कनिष्ठ न्यायालयाने दिलेला दोषमुक्तीचा आदेश बदलवून उच्च न्यायालयाने जर आरोपीस जन्मठेप किंवा 10 वर्षाच्या तुरूंगवासाची शिक्षा दिली असेल.

ब) उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाकडून खटला काढून घेऊन आरोपीस जन्मठेप किंवा 10 वर्षाच्या तुरूंगवासाची शिक्षा दिली असेल.

**4) विशेष अनुज्ञेद्वारे अपील (Appeal by Special Leave)**

- कलम 136 नुसार सर्वोच्च न्यायालय स्वेच्छेने कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधीकरणाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध अपील करण्याची संमती देऊ शकते. (अपवाद : लष्कर न्यायाधिकरण व कोर्ट मार्शल)

- **यात पुढील चार बाबी नमूद आहेत :**

अ) हा सर्वोच्च न्यायालयाचा स्वेच्छाधिकार असल्याने आरोपीस हक्क म्हणून मागणी करता येत नाही.

ब) हा अधिकार अंतिम/अंतरिम निकालाविरोधात वापरता येतो.

क) हा अधिकार कोणत्याही बाबींसंबंधी वापरता येतो. (घटनात्मक, दिवाणी, फौजदारी, आयकर, कामगार, महसूल इ.)

ड) हा अधिकार केवळ उच्च न्यायालयाच्या नव्हे तर कोणत्याही न्यायालयाच्या/न्यायाधिकरणाच्या निकालाविरुद्ध वापरता येतो.

**5) सल्ला देण्याचे अधिकारक्षेत्र (Advisory Jurisdiction)**

- कलम 143 नुसार राष्ट्रपती पुढील दोन बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागू शकतील.

अ) सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाचा कायदेविषयक/वस्तुस्थितीविषयक प्रश्न उद्भवल्यास/भविष्यात उद्भवण्याची शक्यता असल्यास.

ब) घटनेच्या अंमलात येण्याअगोदर करण्यात आलेले आणि सध्या सुरू असलेले तह, करार इ. अंमलबजावणीतून उद्भवलेल्या विवादाबाबत.

- अशा दोन्ही परिस्थितीपैकी पहिल्या परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयास सल्ला देणे बंधनकारक नाही. मात्र दुसऱ्या परिस्थितीमध्ये सर्वोच्च न्यायालयास सल्ला द्यावाच लागतो. परंतु दोन्ही बाबतीत दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक नसतो.

(असा सल्ला राष्ट्रपतींनी 15 मुद्यांविषयी विचारला आहे.)

**※ अभिलेख न्यायालय (A court of Record)**

- कलम 129 नुसार सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असेल. यानुसार पुढील दोन अधिकार आहे.

अ) सर्वोच्च न्यायालयाचे सर्व निकाल, कार्यवाही व कृती या भविष्यकालीन स्मृती व साक्षीसाठी अभिलेखीत (Record) केले जातात.

- भविष्यात यास पुरावा म्हणून गणले जाते त्यामुळे यावर कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येत नाही. याचे निर्णय अंतिम आणि सर्व न्यायालयावर बंधनकारक असतात.

ब) सर्वोच्च न्यायालय अवमान करण्याबद्दल 6 महिन्यापर्यंत कारावास किंवा 2000 रु. पर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा देऊ शकते. 1991 सालापासून संपूर्ण देशातील न्यायालय/न्यायाधिकरणे यांच्या अवमानाबद्दल सुद्धा सर्वोच्च न्यायालय शिक्षा देऊ शकते.

- न्यायालयाचा अवमान हा दिवाणी/फौजदारी स्वरूपाचा असू शकतो.

- **दिवाणी स्वरूपाचा अवमान :**

- न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयाचे, आदेशाचे, हुकुमाचे इ. हेतुपुरस्सर उल्लंघन करणे किंवा न्यायालयास दिलेल्या हमी पत्राचे उल्लंघन करणे.

- **फौजदारी स्वरूपाचे अवमान :**

अ) न्यायालयाच्या अधिकारांचे उल्लंघन करणे किंवा त्यांचे हनन करणे. किंवा

ब) न्यायालयाच्या नेहमीच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करणे किंवा पूर्वग्रह निर्माण करणे.



Dilip Sir's STEP UP Academy

क) कोणत्याही प्रकारे न्यायाच्या प्रशासनात हस्तक्षेप करणे किंवा अडथळा उत्पन्न करणे किंवा असे करणारी कोणतीही कृती किंवा कोणतीही बाब प्रकाशित करणे.

- परंतु यात खालील बाबी समाविष्ट होत नाही :

- न्यायालयीन प्रक्रियेचा योग्य अहवाल देणे.
- न्यायिक कृतीवर केलेली योग्य व रास्त टीका.
- न्यायालयाच्या प्रशासकीय बाजूवर केलेले विधान.

※ **न्यायिक पुनर्विलोकलनाचा अधिकार (Power of Judicial Review)**

- केंद्र/राज्य सरकारांचे कार्यकारी आदेश/कायदे यांच्या घटनात्मक वैधतेची तपासणी करण्याचे अधिकार. सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार म्हणजेच न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार होय.
- घटनेत कुठेही 'न्यायिक पुनर्विलोकनाचा' उल्लेख नाही. घटनेतील इतर तरतूदींद्वारे हा अधिकार मिळालेला आहे.
- याअंतर्गत घटनाबाह्य कायदे आढळल्यास सर्वोच्च न्यायालय त्यांना अवैध ठरवते.

- **इतर अधिकार :**

1) सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीतील विवादाबाबत अंतिम निर्णय देते. हे सर्वोच्च न्यायालयाचे प्रारंभिक अधिकार क्षेत्र आहे.
2) राष्ट्रपतींच्या निर्देशानुसार UPSC चे अध्यक्ष व सदस्यांची कामकाज व गैरवर्तवणुकीबाबत चौकशी करू शकते. याबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय राष्ट्रपतींवर बंधनकारक असेल.
3) सर्वोच्च न्यायालय आपल्याच निर्णयाचे पुनर्विलोकन करू शकते.
4) उच्च न्यायालयांत प्रलंबित खटले काढून घेऊन त्यावर स्वतःच निर्णय देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार आहे. तसेच असा प्रलंबित खटला सर्वोच्च न्यायालय दुसऱ्या उच्च न्यायालयाकडे वर्ग करू शकतो.
5) राज्य घटनेचा अर्थ लावणारी ही अंतिम संस्था आहे.
6) सर्वोच्च न्यायालय देशातील सर्व न्यायालये आणि न्यायाधिकरणे यावर न्यायिक पर्यवेक्षण आणि नियंत्रण ठेवते.

- **फरक :**

**अमेरिकेचे सर्वोच्च न्यायालय –**

1) याच्या प्रारंभिक क्षेत्रात संघराज्यीय खटला तसेच नाविक दल, राजदूत, सागरी व्यवहारांचा इ. चा समावेश होतो. भारतात फक्त संघराज्यीय खटल्यांचा समावेश.
2) या न्यायालयाच्या पुर्नविचाराच्या () अधिकारक्षेत्रात फक्त घटनात्मक खटले येतात.
3) भारतीय सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे विशेष पुर्नविचार करण्याचा विवेकाधिकार नाही.
4) या न्यायालयास सल्लागारी अधिकारस्त्रोत नाही.
5) याची न्यायिक पुनर्विलोकन व्याप्ती खूप विस्तृत आहे.
6) हे न्यायालय नागरिकांच्या हक्काचे संरक्षण 'कायद्याच्या योग्य प्रक्रियेद्वारे' करते. भारतीय सर्वोच्च न्यायालय हे कायद्याद्वारे स्थापित प्रक्रियेनुसार नागरिकांच्या हक्काचे संरक्षण करते.

※ **महत्त्वाची कलमे :**

- 125 – न्यायाधीशांचे वेतन इत्यादी
- 137 – सर्वोच्च न्यायालयाद्वारे निर्णयांचे व आदेशांचे पुनर्विलोकन
- 139 – काही आदेश काढण्याचा सर्वोच्च न्यायालयात देण्यात आलेला अधिकार.
- 140 – सर्वोच्च न्यायालयाचे अनुषंगिक अधिकार
- 141 – सर्वोच्च न्यायालयाने ठरविलेला कायदा सर्व न्यायालयांवर बंधनकारक.

***

Dilip Sir's STEP UP Academy

## उच्च न्यायालय

### भाग 6 : कलम 214 ते 231

- राज्यातील अपीलाचे सर्वात वरीष्ठ न्यायालय
- 1862 : कलकत्ता, बॉम्बे, मद्रास येथे उच्च न्यायालय स्थापन
- 1866 : अलाहाबाद - चौथे उच्च न्यायालय स्थापन

- **कलम 214 :** प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालयाची तरतूद
- **7 वी घटनादुरुस्ती, 1956 :** दोन किंवा अधिक राज्यांसाठी तसेच दोन किंवा अधिक राज्ये आणि एक किंवा अधिक केंद्रशासित प्रदेशासाठी एक सामाईक उच्च न्यायालय स्थापण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला.

- सध्या देशात 25 उच्च न्यायालये कार्यरत आहेत. (मार्च 2013 : 3 नवीन - मणीपूर, मेघालय, त्रिपूरा)
  2018 : आंध्रप्रदेश
  (एकूण चार संयुक्त न्यायालये असून दिल्ली, जम्मू-काश्मीर व लडाख या एकमेव केंद्रशासित प्रदेशासाठी उच्च न्यायालय कार्यरत आहेत.)

- **रचना (Organisation of High Court) :** एक मुख्य न्यायाधीश आणि राष्ट्रपतींना आवश्यक वाटतील इतके न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती करतील.
  (राष्ट्रपतींचा : स्वविवेकाधिकार)
- **नियुक्ती (Appointment of Judges) :** उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती भारताचे सरन्यायाधीश आणि संबंधित घटक राज्याचे राज्यपाल यांच्याशी सल्लामसलत करून करतील.

- इतर न्यायाधीशांच्या नियुक्तीवेळी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांचे मतही विचारात घेतले जाते.

**✲ नियुक्तीबाबत :**

- **न्यायाधीशांच्या दुसऱ्या खटल्यात** (1993) : सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय - सरन्यायाधीशांची सहमती असल्यशिवाय उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती करता येणार नाही.
- **न्यायाधीशांच्या तिसऱ्या खटल्यात** (1998) : सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय - उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत भारताचे सरन्यायाधीश यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या दोन सर्वात जेष्ठ न्यायाधीशांबरोबर विचारविनिमय केला पाहिजे. सरन्यायाधीशांचे एकट्याचे मत म्हणजे विचारविनिमय नव्हे.

- **पात्रता (Qualifications of Judges) :** 1) भारताचे नागरिक असावा.
  2) भारतातील कोणत्याही न्यायालयात किमान 10 वर्षे न्यायिक पदावर काम केलेले असावे. किंवा
  उच्च न्यायालयात किमान 10 वर्षे वकिली केलेली असावी.
- **शपथ (Oath) :** उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना राज्यपाल किंवा त्यांनी नियुक्त केलेला व्यक्ती पुढीलप्रमाणे शपथ देतो:

1) भारतीय राज्यघटनेशी श्रद्धा व निष्ठा बाळगणे.
2) भारताचे सार्वभौमत्व व अखंडता यांचे संरक्षण करणे.
3) पदाची कामे पूर्ण निष्ठेने आणि त्याच्या पूर्ण क्षमता, ज्ञान, विवेक वापरून निष्पक्षपातीपणे पार पाडणे.
4) राज्यघटना आणि कायदे यांचे संरक्षण करणे.

- **कार्यकाळ (Tenure of Judges) :** नियुक्तीपासून वयाच्या 62 व्या वर्षापर्यंत
  (वयाबद्दल आक्षेप : राष्ट्रपती सरन्यायाधीशांशी चर्चा करतील - राष्ट्रपतींचा निर्णय अंतिम)
- **राजीनामा :** राष्ट्रपतींना उद्देशून.
- **बडतर्फी (Removal of Judges) :** सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्याप्रमाणेच.
- **वेतन आणि भत्ते (Salaries & allowances) :** उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे वेतन, भत्ते, विशेषाधिकार, रजा आणि निवृतीवेतन ठरवण्याचा अधिकार संसदेस आहे परंतु आर्थिक आणीबाणीची परिस्थिती वगळता इतर वेळी संसद यात न्यायाधीशांना प्रतिकूल ठरणारे बदल करणार नाही.
- **न्यायाधीशांची बदली (Transfer of Judges) :** अधिकार - राष्ट्रपतींकडे (सरन्यायाधीशांशी विचारविनिमय करून)
  (बदली झालेला न्यायाधीशच बदलीच्या आदेशास आव्हान देऊ शकतो.)
- **न्यायाधीशांच्या तिसऱ्या खटल्यात** (1998) : सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय - उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची बदली करताना सरन्यायाधीशांनी सर्वात जेष्ठ अशा चार न्यायाधीशांच्या मंडळाशी आणि दोन्ही उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांशी (बदली होणारे ठिकाण व बदलून जाणारे ठिकाण) विचारविनिमय करावा.

**✲ प्रभारी मुख्य न्यायाधीश (Acting Chief Justice) :**

- नियुक्ती : राष्ट्रपती
- कोणाची : उच्च न्यायालयातील न्यायाधीशाची.
- केव्हा : अ) मुख्य न्यायाधीश पद रिक्त (Vacant) असेल तर.

Dilip Sir's STEP UP Academy

ब) मुख्य न्यायाधीश काही काळासाठी अनुपस्थित (Absent) असतील तर

क) मुख्य न्यायाधीश आपली कामे करण्यास अकार्यक्षम असतील तर. (Unable to perform the duties)

### ❊ अतिरिक्त आणि प्रभारी न्यायाधीश (Additional & Acting Judges) :

- नियुक्ती : राष्ट्रपती करतील.
- नियुक्तीचे स्वरूप : तात्पुरते.
- कोणाची : आवश्यक पात्रता पूर्ण करणाऱ्या व्यक्तीची
- केव्हा : अ) उच्च न्यायालयाच्या कामकाजात तात्पुरती वाढ झाली तर,

  ब) उच्च न्यायालयात कामे प्रलंबित असतील तर.
- वरील निकष अतिरिक्त न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत तर पुढील निकष हे प्रभारी न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत आहेत.

● **जेव्हा न्यायालयातील इतर न्यायाधीश :**

अ) अनुपस्थितीमुळे किंवा इतर कारणांमुळे आपल्या पदाची कामे करू शकत नाही. किंवा

ब) तात्पुरत्या कालावधीसाठी उच्च न्यायालयाचा प्रभारी न्यायाधीश म्हणून नियुक्त केला जात असेल.

- अतिरिक्त न्यायाधीश (Additional judges) हे जास्तीत जास्त 2 वर्षे पदावर राहू शकतात आणि प्रभारी न्यायाधीश (Acting judges) हे कायमस्वरूपी न्यायाधीश परत रूजू होईपर्यंत पदावर राहतात. येथे वयाची 62 वर्षांची मर्यादा दोघांनाही लागू ठरते.

### ❊ निवृत्त न्यायाधीश (Retired judges) :

- नियुक्ती : उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश करतात.
- कोणाची : कोणत्याही उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांची.
- वेतन व भत्ते : राष्ट्रपती ठरवतात.
- त्यांना अधिकार, विशेषाधिकार असतात. परंतु उच्च न्यायालयाचे न्यायाधीश मानले जात नाही.

● **उच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य** : सर्वोच्च न्यायालयाप्रमाणेच

## उच्च न्यायालयाचे न्यायाधिकार क्षेत्र आणि अधिकार

- यात वाढ करण्याचा अधिकार संसद आणि राज्य विधीमंडळाचा आहे.

### ❊ प्रारंभिक अधिकारक्षेत्र (Original Jurisdiction)

- मृत्यूपत्र, विवाह, घटस्फोट, दत्तक प्रकरणे कंपनी कायदे आणि न्यायालयाचा अवमान इत्यादीशी संबंधित.
- खासदार / आमदार यांच्या निवडणूकीबाबतचा वाद
- महसूल विषय / महसूल जमा करण्याबाबतचा कायदा किंवा केलेली कृती.
- नागरिकांच्या मूलभूत हक्कांची अंमलबजावणी
- कनिष्ठ न्यायालयात घटनेच्या अर्थाबाबत सुरू असलेला खटला आपल्याकडे घेणे.
- चार उच्च न्यायालयांना (कलकत्ता, बॉम्बे, मद्रास व दिल्ली) मोठ्या रकमांबाबत प्रारंभिक दिवाणी अधिकारक्षेत्र (Original civil jurisdiction) प्राप्त आहे.

### ❊ घटनात्मक उपायांसंबंधी अर्जाचे अधिकार क्षेत्र (Writ Jurisdiction)

- कलम 226 नुसार मूलभूत हक्क व कायदेशीर हक्कासाठी (इतर हक्क) उच्च न्यायालय बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, उत्प्रेक्षण, प्रतिषेध आणि अधिकारपृच्छा असे आदेश देऊ शकते.
- उच्च न्यायालय आपल्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रातील कोणत्याही व्यक्ती, प्राधिकारी आणि सरकारला उद्देशून प्राधिलेख काढू शकते. (उच्च न्यायालय आपले प्रादेशिक अधिकारक्षेत्राच्या बाहेरही प्राधिलेख काढू शकते तर वादाचे कारण (Cause of Action) त्याच्या अधिकारक्षेत्रात उद्भवले असेल तर).
- 1997 साली चंद्र कुमार खटल्यामध्ये : सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय - सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांचा प्राधिलेख काढण्याचा अधिकार हा घटनेच्या मूलभूत संरचनेचा भाग आहे त्यामुळे घटनादुरुस्ती करून हा अधिकार काढला जाऊ शकत नाही.

### ❊ अपीलाचे अधिकार क्षेत्र (Appellate Jurisdiction)

- दिवाणी खटले : जिल्हा न्यायालये, अतिरिक्त जिल्हा न्यायालये आणि अधिनस्त न्यायालये यांनी दिलेल्या आदेश आणि निकालाच्या विरुद्ध अपील थेट उच्च न्यायालयात करता येते, त्यात कायदा तसेच वस्तुस्थितीच्या प्रश्नाचा समावेश असेल व रक्कम निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक असेल.
- जेथे कायद्याचा प्रश्न निर्णय झाला आहे अशा प्रकरणी जिल्हा न्यायालय/तत्सम दुय्यम न्यायालयाने दिलेल्या निर्णयावरील दुसरे अपील उच्च न्यायालयात केले जाते.
- कलकत्ता, मुंबई आणि मद्रास उच्च न्यायालयात त्याच न्यायालयांतर्गत अपिलाची किंवा पुर्नविचाराची तरतूद आहे.
- जेव्हा एखाद्या खटल्यात (प्रारंभिक किंवा पुनर्विचाराच्या



Dilip Sir's STEP UP Academy

अधिकार क्षेत्रात) उच्च न्यायालयाच्या एकाच न्यायाधीशाने निर्णय दिला असेल तर त्याच उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे त्या निर्णयाच्या विरोधात अपील दाखल केले जाते.

- प्रशासनिक किंवा इतर न्यायाधिकरणांच्या (उदा. मॅट) निर्णयावर राज्य उच्च न्यायालयाच्या खंडपीठात अपील दाखल करून घेतले जाते.
- फौजदारी खटले : सत्र किंवा अतिरिक्तक्त सत्र न्यायालयाने दिलेली शिक्षा जर सात वर्षांपेक्षा अधिक असेल तर.
- जर सत्र न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली तर अपील नाही केले तरी उच्च न्यायालय त्याबाबत निश्चिती करते.
- यामध्ये उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात असलेली व नसलेली सर्व न्यायालये व न्यायाधिकरणे येतात तसेच केवळ प्रशासकीय नसून यात न्यायिक पर्यवेक्षणाचाही समावेश होतो.

## ❊ **पर्यवेक्षणाचे अधिकारक्षेत्र (Supervisory Jurisdiction)**

- उच्च न्यायालयाच्या भौगोलिक अधिकारक्षेत्रात येणाऱ्या सर्व न्यायालयांचे पर्यवेक्षण करण्याचा अधिकार.
  (अपवाद : सैनिकी न्यायालय किंवा न्यायाधिकरणे)
- यात कामकाजाचे नियमन करणे. तसेच अधिकारी, कर्मचारी वेतन निश्चिती. पुस्तके, नोंदी, हिशोब ठेवण्याबाबत प्रारूप निश्चिती करणे.

● **दुय्यम न्यायालयांवर नियंत्रण (Control over subordinate courts) :**

- राज्याच्या न्यायिक सेवेकरिता एखाद्या व्यक्तीची (जिल्हा न्यायाधीशांव्यतिरिक्त) नियुक्ती / जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती, बदली आणि बढती याबाबत राज्यपाल उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करतात.
- राज्यातील न्यायिक सेवेतील सदस्यांची बदली / बढती व इतर बाबत.
- उच्च न्यायालयाचा कायदा भौगोलिक क्षेत्रातील सर्व दुय्यम न्यायालयांना लागू.
- यात पगार व निवृत्तीवेतन येत नाही.

## ❊ **अभिलेखाचे न्यायालय (A court of record) :**

- कायदे कार्यपद्धतीविषयक नियम आणि न्याय-निवाडे यांची कायमस्वरूपी नोंद ठेवणे. यांना कायदेशीर संदर्भ म्हणून मान्यता.
- स्वतःचे निर्णय, आदेश, न्यायनिवाडे यांचे पुनर्विलोकन करू शकते. (उच्च न्यायालयाचा हा अधिकार घटनेत नमूद नाही, परंतु सर्वोच्च न्यायालयाचा हा अधिकार घटनेत नमूद आहे.)
- उच्च न्यायालयाने घोषित केलेला कायदा त्याच्या भौगोलिक अधिकारक्षेत्रातील सर्व दुय्यम न्यायालयांवर बंधनकारक असतो.
- न्यायालयाचा अवमान केल्यास साधी कैद किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा देण्याचा उच्च न्यायालयास अधिकार आहे.
- घटनेत 'न्यायालयाचा अवमान' म्हणजे काय हे स्पष्ट केलेले नाही. **1971 साली केलेल्या न्यायालयाचा अवमान कायदा** (Contempt of Court Act) यात याचा अर्थ नमूद आहे.
- या कायद्यानुसार न्यायालयाचा अवमान हा दिवाणी आणि फौजदारी प्रकारचा असू शकतो.
- उच्च न्यायालय आपल्या निर्णयांचे किंवा आदेशांमध्ये सुधारणा करू शकते. हा अधिकार नोंदी ठेवण्याचे न्यायालय म्हणून मिळाला आहे. सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार विशेषत्वाने प्रदान केलेला आहे.

## ❊ **न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार (Power of judicial review) :**

- केंद्र व राज्य सरकारांनी दिलेले कार्यकारी आदेश आणि कायद्यांची घटनात्मकता तपासण्याचा अधिकार.

● पुढील तीन कारणांसाठी उच्च न्यायालयात आव्हान देता येते.

- मूलभूत हक्कांचे उल्लंघन
- कायदा करण्याची अधिसत्ता नसताना केलेला कायदा
- घटनेतील तरतुदींशी विसंगत असतील.
- 42 वी घटनादुरुस्ती केंद्रीय कायद्याचे पुनर्विलोकनापासून मज्जाव केला होता.
- 43 वी घटनादुरुस्ती वरील दुरूस्ती रद्द केली.

## ❊ **बॉम्बे उच्च न्यायालय :**

- स्थापना : 14 ऑगस्ट 1862
- खंडपीठे : नागपूर, औरंगाबाद, पणजी
- प्रादेशिक अधिकार क्षेत्र : महाराष्ट्र, गोवा, दादरा आणि नगर हवेली, दमन आणि दीव
- न्यायाधीश संख्या : कायमस्वरूपी - 71, अतिरिक्त 23 (एकूण मान्यता मिळालेली संख्या : 94)
- पहिले मुख्य न्यायाधीश : सर मॅथ्यू रिचर्ड सौसी (Sausse)
- पहिले भारतीय मुख्य न्यायाधीश : एम. सी. छागला (1948-1958)
- महाराष्ट्र निर्मितीवेळी मुख्य न्यायाधीश : एच. के. चैनानी (1958-1965)



Dilip Sir's STEP UP Academy

## उच्च न्यायालयाचे नाव व अधिकारक्षेत्र

| क्र. | उच्च न्यायालये | स्थापना | प्रादेशिक अधिकार | क्षेत्र स्थान |
|---|---|---|---|---|
| 1) | बॉम्बे | 1862 | महाराष्ट्र, गोवा, दादरा आणि नगर-हवेली, दमण आणि दीव | मुंबई (नागपूर, पणजी आणि औरंगाबाद येथे खंडपीठ) |
| 2) | कलकत्ता | 1862 | पश्चिम बंगाल, अंदमान निकोबार बेटे | कोलकाता (पोर्ट ब्लेअर येथे फिरते न्यायालय) |
| 3) | मद्रास | 1862 | तमिळनाडू, पुदुच्चेरी | चेन्नई |
| 4) | अलाहाबाद अलाहाबाद | 1866 | उत्तर प्रदेश | (लखनौ येथे खंडपीठ) |
| 5) | पंजाब व हरियाणा | 1875 | पंजाब, हरियाणा व चंडिगढ | चंडिगढ संघराज्य प्रदेश |
| 6) | कर्नाटक | 1884 | कर्नाटक | बंगळुरू |
| 7) | पाटणा | 1916 | बिहार | पाटणा |
| 8) | जम्मू आणि काश्मीर | 1928 | जम्मू आणि काश्मीर | श्रीनगर व जम्मू |
| 9) | गुवाहाटी | 1948 | आसाम, नागालँड, मिझोरम व अरुणाचल प्रदेश | गुवाहाटी (कोहिमा, ऐझवाल आणि इटानगर येथे खंडपीठ) |
| 10) | ओरिसा | 1948 | ओडिशा | कटक |
| 11) | राजस्थान | 1949 | राजस्थान | जोधपूर (जयपूर येथे खंडपीठ) |
| 12) | हैदराबाद | 1954 | आंध्र प्रदेश, तेलंगाणा | हैदराबाद |
| 13) | मध्य प्रदेश | 1956 | मध्य प्रदेश (ग्वाल्हेर व इंदोर येथे खंडपीठे) | जबलपूर |
| 14) | केरळ | 1958 | केरळ व लक्षद्वीप | एर्नाकुलम |
| 15) | गुजरात | 1960 | गुजरात | अहमदाबाद |
| 16) | दिल्ली | 1966 | दिल्ली | दिल्ली |
| 17) | हिमाचल प्रदेश | 1971 | हिमाचल प्रदेश | सिमला |
| 18) | सिक्कीम | 1975 | सिक्कीम | गंगटोक |
| 19) | उत्तराखंड | 2000 | उत्तराखंड | नैनिताल |
| 20) | छत्तीसगढ | 2000 | छत्तीसगढ | बिलासपूर |
| 21) | झारखंड | 2000 | झारखंड | रांची |
| 22) | मणिपूर | 2013 | मणिपूर | इंफाळ |
| 23) | मेघालय | 2013 | मेघालय | शिलाँग |
| 24) | त्रिपुरा | 2013 | त्रिपुरा | आगरताळा |
| 25) | आंध्र | 2018 | आंध्र प्रदेश | कर्नूल |

## दुय्यम न्यायालये (Subordinate Courts) – भाग 6 : कलम 233 ते 237

### ※ जिल्हा न्यायाधीश (District Judges) :

- नियुक्ती : राज्यपाल (उच्च न्यायालयाशी सल्ला घेऊन)
- बढती, बदलीचे अधिकार : राज्यपाल
- पात्रता : 1) केंद्र व राज्याच्या सेवेत नको.
  2) कमीत कमी 7 वर्षे वकिली केलेली असावी.
  3) उच्च न्यायालयाची शिफारस

**(जिल्हा न्यायाधीश :** शहर दिवाणी न्यायाधीश, अप्पर जिल्हा न्यायधीश, सह जिल्हा न्यायाधीश, सहाय्यक जिल्हा न्यायाधीश गृह न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, मुख्य इलाका दंडाधिकारी, सत्र न्यायाधीश, अप्पर सत्र न्यायाधीश आणि सहाय्यक सत्र न्यायाधीश इ.)

- जिल्हा न्यायाधीशाला न्यायिक व प्रशासकीय दोन्ही अधिकार असतात. त्याला जिल्ह्यातील दुय्यम न्यायालयांवर पर्यवेक्षण अधिकार आहेत.

### ※ इतर न्यायाधीश :

- नियुक्ती : राज्यपाल
- निवड : राज्य लोकसेवा आयोग आणि उच्च न्यायालयाशी विचार विनिमय

Dilip Sir's STEP UP Academy

● **संरचना**

**उच्च न्यायालय**

↓

**जिल्हा व सत्र न्यायाधीशांची न्यायालये (District & Sessions Judge's Court)**

(जिल्हा न्यायाधीश ज्यावेळी दिवाणी प्रकारचे खटले हाताळतो त्यावेळी तो जिल्हा न्यायाधीश असतो.)

(जिल्हा न्यायाधीश ज्यावेळी फौजदारी प्रकारचे खटले हाताळतो त्यावेळी तो सत्र न्यायाधीश असतो.)

(सत्र न्यायाधीश आजन्म तुरुंगवास आणि देहदंडासहित कोणतीही शिक्षा देऊ शकतो.)

| | |
|---|---|
| **दिवाणी (Civil side)** | **फौजदारी (Criminal side)** |
| ↓ | ↓ |
| **दुय्यम न्यायाधीशाचे न्यायालय (Subordinate judge's court)** | **मुख्य न्यायिक दंडाधिकाऱ्याचे न्यायालय (Chief judicial magistrate's court)** |
| (यांना अमर्यादित आर्थिक अधिकार क्षेत्र असते.) | (हे सात वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा असलेले खटले हाताळतात.) |
| ↓ | ↓ |
| **कनिष्ठ दिवाणी न्यायाधीशाचे न्यायालय (Munsiff's court)** | **न्यायिक दंडाधिकाऱ्याचे न्यायालय (Judicial magistrate's court)** |
| (यांना मर्यादित आर्थिक अधिकार क्षेत्र असते.) | (हे तीन वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा असलेले खटले हाताळतात.) |

## न्यायिक सक्रियता (Judicial Activism)

● **संकल्पना :** 1947 साली अमेरिकन इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ ऑर्थर श्लेसिंजर ज्यु. यांनी मांडली.

– भारतात न्यायिक सक्रियतेचा आरंभ करणारे न्यायाधीश : न्यायमूर्ती व्ही.आर.कृष्णा अय्यर, न्या.पी.एन.भगवती, न्या.ओ.चिन्नप्पा रेड्डी, न्या.डी.ए.देसाई.

※ **जनहित याचिका (Public Interest Litigation)**

– भारतातील जनहित याचिकेचे प्रणेते : न्यायमूर्ती व्ही.आर. कृष्णा अय्यर, न्या.पी.एन. भगवती.

– **''ज्यामध्ये सार्वजनिक आर्थिक हितसंबंध किंवा कायदेशीर अधिकार व दायित्व यांच्यावर प्रभाव पाडणारे हितसंबंधी गुंतले आहेत, अशा सर्वसाधारण किंवा सार्वजनिक हितांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयात दाखल केलेला खटला म्हणजेच जनहित याचिका होय.'' – सर्वोच्च न्यायालय**

– **उद्देश :** न्यायाचे राज्य स्थापित व्हावे.

– समाजातील आर्थिकदृष्ट्या किंवा सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना न्याय मिळविण्याचा प्रभावी मार्ग सुलभ व्हावा.

– खऱ्या अर्थाने मूलभूत हक्क प्रत्यक्षात यावे.

**लोकस स्टँडी नियम :** ज्याच्या हक्काचा भंग झाला आहे अशीच व्यक्ती त्यावर उपाय व्हावा यासाठी न्यायालयात जाऊ शकते.

**ॲमियस क्युरी :** न्यायालयाचा मित्र वकील

**कपिला हिंगोरानी :** जनहित याचिकांची माता (Mother of PIL)

– PIL दाखल करणारी पहिली वकील.

– 1979 : हुस्नारा खतुन विरुद्ध बिहार राज्य खटला.

## राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (National Legal Service Authority)

– स्थापना : विधी सेवा कायदा 1987 नुसार

※ **42 वी घटनादुरुस्ती : कलम 39A** : समाजातील दुर्बल घटकांसाठी कायदेविषयक निशुल्क सहाय्य आणि सर्वांसाठी न्याय सुनिश्चित करण्याची तरतूद राज्य करेल.

– अंमल : 9 नोव्हेंबर 1995

– **रचना :** राज्य पातळीवर – राज्य न्यायिक सेवा समिती

– सर्वोच्च न्यायालय न्यायिक सेवा समिती उच्च न्यायालय न्यायिक सेवा समिती

– जिल्हा पातळीवर : जिल्हा न्यायिक सेवा प्राधिकरण

– तालुका पातळीवर : तालुका न्यायिक सेवा प्राधिकरण

– **यांची कार्ये :** NLSA ची धोरणे आणि आदेश यांची अंमलबजावणी करणे.

  – लोकांना निशुल्क कायदेशीर सेवा देणे.

– NSLA : धोरणे, तत्त्वे व मार्ग तत्त्वे ठरवते.

– देशभरात न्यायिक सेवा कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी राज्य न्यायिक सेवा प्राधिकरणांसाठी प्रभावी योजना तयार करणे.

Dilip Sir's STEP UP Academy

- **राज्य, जिल्हा आणि तालुका न्यायिक सेवा समिती यांची खालील कामे :**

1) पात्र व्यक्तींना निशुल्क व सक्षम न्यायिक सेवा पुरविणे.
2) विवादांवर सामान्य तोडगा काढण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करणे.
3) ग्रामीण भागात कायदेविषयक माहिती शिबिर आयोजित करणे.

- **यात पुढील सेवा मोफत पुरवल्या जातात :**

- न्यायालयीन शुल्क प्रक्रियेचे शुल्क
- वकिलांची फी
- कायदेविषयक प्रक्रियांमध्ये आदेश व इतर कायदपत्रे यांच्या अभिलेखित प्रति मिळवणे.
- अपील तयार करणे, कायदेशीर प्रक्रियेत कागदपत्र छापणे व त्यांचे भाषांतर करणे व त्यांचे पुस्तक बनविणे.

- **यासाठी पात्र व्यक्ती :**

1) महिला व बालके
2) SC/ST व्यक्ती
3) औद्योगिक कामगार
4) स्थानबद्ध व्यक्ती
5) अपंग व्यक्ती
6) हिंसाचार, पूर, दुष्काळ, भूकंप, औद्योगिक संकटे यांचे पिडीत.
7) वार्षिक उत्पन्न रु. 1 लाख पेक्षा जास्त नसलेल्या व्यक्ती.
8) मानवी व्यापारांचे पिडीत किंवा भिकारी

## लोक अदालत

### ❊ 1987 च्या कायद्यानुसार वैधानिक दर्जा

- न्यायालयात प्रलंबित असलेले खटले किंवा न्यायालयात दाखल करण्यापूर्वीचे खटले यावर तोडगा काढण्यासाठी लोक अदालत स्थापन करण्यात आलेली आहे.
- 1982 : पहिले लोक अदालत शिबिर गुजरातमध्ये आयोजित केले होते.

- **यात समाविष्ट होणारे खटले** : कौटुंबिक विवाद, फौजदारी (तडजोड होणारे) खटले, भूमीअधिग्रहण खटले, कामगार विवाद, कामगारांच्या मोबदल्याबाबतचे खटले, बँक वसुली खटले, निवृत्ती वेतनाचे खटले. गृहनिर्माण मंडळाचे खटले, गृहवित्त खटले, ग्राहक तक्रारी खटले, विद्युतपुरवठा बाबींशी संबंधीत खटले, दूरध्वनी देयकांबाबतचे खटले, मालमत्ता कर धरून नगरपालिकांसंबंधित खटले, भ्रमणध्वनी सेवा देणाऱ्या कंपन्यांबरोबरचे खटले.

- **न्यायालयात प्रलंबित खटला दाखल करण्यासाठी :**

1) त्यातील पक्षकार लोक अदालतमध्ये विवाद सोडवण्यासाठी तयार आहेत. किंवा
2) त्यातील एक पक्षकार लोक अदालतकडे खटला सोपवण्यासाठी अर्ज करतो. किंवा
3) संबंधित विषय लोक अदालतने हाताळण्यास योग्य आहे असा निष्कर्ष न्यायालयाने काढल्यास.

- लोक अदालतचे कामकाज भारतीय दंड संहिता 1860 नुसार न्यायालयीन कामकाज मानले जाते आणि प्रत्येक लोक अदालत ही CrPC 1973 नुसार दिवाणी न्यायालय मानली जाते.
- याचे निर्णय बंधनकारक असतात.
- लोक अदालताने दिलेल्या निर्णयाविरोधात कोणत्याही न्यायालयात अपील करता येत नाही.
- येथे कोणतीही ताठर स्वरूपाची कार्यपद्धती अवलंबली जात नाही.
- समझौता घडवून आणण्यावर न्यायालयाचा भर असतो. तडजोड झालीच नाही तर प्रकरण पुन्हा न्यायालयाकडे दिले जाते.

### ❊ राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (NLSA)

- स्थापन – 5 डिसेंबर 1995.
- भारताचे सरन्यायाधीश हे आश्रयदाता असतात.
- कार्यकारी अध्यक्ष : सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश.

### ❊ राज्य विधी सेवा प्राधिकरण :

- उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश हे याचे आश्रयदाता असतात.
- कार्यकारी अध्यक्ष : उच्च न्यायालयाचा कार्यरत न्यायाधीश

### ❊ लोक न्यायालयाची रचना :

- सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती, उच्च न्यायालय विधी सेवा समिती, राज्य न्यायिक सेवा प्राधिकरण जिल्हा न्यायिक सेवा प्राधिकरण, तालुका न्यायिक सेवा समिती हे त्यांना योग्य वाटले, अशा कालावधीसाठी आणि अशा ठिकाणी लोक अदालत गठीत करू शकतात.
- अध्यक्ष : न्यायिक अधिकारी; सदस्य : वकील किंवा सामाजिक कार्यकर्ते

Dilip Sir's STEP UP Academy

**※ लोक न्यायालयाचे अधिकार :**

- यास खटला चालवताना दिवाणी प्रक्रिया संहिता (1908) अंतर्गत दिवाणी न्यायालयाप्रमाणे अधिकार असतात.

अ) कोणत्याही साक्षीदारास समन्स पाठवणे, उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची/त्याची तपासणी करणे.

ब) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध आणि सादर करण्यास भाग पाडणे.

क) प्रतिज्ञापत्रावर पुरावे प्राप्त करणे.

ड) कोणतेही सार्वजनिक अभिलेख वा दस्तऐवज वा कोणत्याही न्यायालयाकडून प्रत प्राप्त करणे.

इ) नमूद इतर विषय.

- यास दिवाणी न्यायालयाचा दर्जा असेल.

**※ स्थायी लोक न्यायालय :**

- 2002 च्या कायद्यातील दुरुस्तीनुसार 'स्थायी लोक न्यायालयाची' तरतूद करण्यत आली.
- या नुसार सार्वजनिक उपयुक्त सेवांच्या संबंधातील विषयांचे निर्धारण करण्यासाठी केंद्र किंवा राज्य अधिसत्ता अधिसूचनेद्वारे कोणत्याही ठिकाणी 'स्थायी लोक न्यायालय' स्थापन करू शकतील.

**※ सार्वजनिक उपयुक्त सेवांमध्ये (Public Utility Services) पुढील बाबी समाविष्ट होतात :**

1) परिवहन सेवा

2) डाक, तार किंवा दूरध्वनी सेवा

3) जनतेला वीज, प्रकाश आणि पाणी पुरवठा करणे.

4) सार्वजनिक आरोग्य रक्षणाची व्यवस्था

5) विमा सेवा आणि केंद्र वा राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या अशा इतर सेवा

- **रचना :** अध्यक्ष : जिल्हा न्यायाधीश/अप्पर जिल्हा न्यायाधीश असलेली किंवा माजी किंवा जिल्हा न्यायाधीशापेक्षा वरिष्ठ दर्जाचे न्यायालयीन पद धारण केलेली व्यक्ती.

- सदस्य : सार्वजनिक उपयुक्त सेवांमध्ये पुरेसा अनुभव असलेल्या दोन अन्य व्यक्ती.
- कार्यक्षेत्रात रु. 10 लाख या आर्थिक मर्यादेपर्यंतच्या बाबी येतात. (येथे केंद्र सरकार मर्यादा वाढवू शकते.)

**ग्राम न्यायालये**

- ही ग्रामीण पातळीवर तक्रार निवारण करणारी यंत्रणा.
- कामकाज : नैसर्गिक न्यायाचे तत्त्व आणि कार्यपद्धती शक्य तितकी सोपी-सुटसुटीत असते.
- कार्यक्षेत्र : दिवाणी आणि अत्यल्प प्रमाणात फौजदारी अधिकार क्षेत्र देण्यात येते.
- स्वातंत्र्यपूर्वीच्या काळापासून भारतात अशी यंत्रणा कार्यरत होती.

**※ ग्राम न्यायालय अधिनियम 2008 :**

- स्थानिक पातळीवरील लोकांना न्यायाप्रती पोच असणे आणि दुय्यम न्यायालयावरील कामाचा ताण कमी करण्याच्या उद्देशाने हा कायदा केला गेला.

- **अपवाद :** हा कायदा जम्मू-काश्मीर, नागालँड, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम आणि आदिवासी क्षेत्रांचा अपवाद करून सर्व भारतभर लागू आहे.
- **रचना :** राज्यशासन उच्च न्यायालयांशी सल्लामसलत करून प्रत्येक जिल्ह्यातील पंचायतीच्या मध्यम स्थरावर (पंचायत समिती) ग्राम न्यायालयाची स्थापना करेल.

(मध्यम स्तर नसलेल्या ठिकाणी गट ग्रामपंचायतीच्या पातळीवर ग्राम न्यायालयाची स्थापना केली जाईल)

- राज्य शासन उच्च न्यायालयाशी सल्ला-मसलत करून यांचे सीमा/क्षेत्र निर्धारित करेल.
- न्यायाधिकारी : प्रथम वर्ग न्यायालयीन दंडाधिकारी म्हणून नियुक्त होण्यासाठी जी पात्रता लागते, ती पात्रता न्यायाधिकारी पदी नियुक्त होण्यासाठी आवश्यक आहे. (येथे राज्यशासन SC/ST/OBC/Women या वर्गांना प्रतिनिधित्व देईल.)

**※ अधिकार क्षेत्र :**

**अ) दिवाणी तक्रारी :** 1) मालमत्ता खरेदी करण्याचा हक्क

2) सामाईक चराई क्षेत्र

3) जलसंधारण बंधाऱ्यातून पाणी घेण्याचे वेळापत्रक आणि नियमन.

**ब) इतर : किमान वेतन कायद्यांतर्गत दावे.**

- व्यापार व्यवहार किंवा सावकारीमधून निर्माण झालेले आर्थिक खटले.
- शेती मशागतीच्या भागीदारीतून उद्‌भवलेले वाद
- या न्यायालयाच्या निर्णयाविरोधात अपील केले जाऊ शकते.

## ✲ ग्राम न्यायालयांची स्थापना, 2016

| क्र. | राज्ये | सूचित केलेली ग्राम न्यायालये | कार्यरत ग्राम न्यायालये |
|---|---|---|---|
| 1) | मध्य प्रदेश | 89 | 81 |
| 2) | राजस्थान | 45 | 45 |
| 3) | कर्नाटक | 2 | 0 |
| 4) | ओडिशा | 16 | 13 |
| 5) | महाराष्ट्र | 23 | 23 |
| 6) | झारखंड | 6 | 8 |
| 7) | गोवा | 2 | 0 |
| 8) | पंजाब | 2 | 1 |
| 9) | हरियाणा | 2 | 2 |
| 10) | उत्तर प्रदेश | 104 | 2 |
| | **एकूण** | **291** | **175** |

## लोकपाल (Lokpal)

- स्कॅन्डिनेव्हियन देशातील 'अम्बुडस्मन' (स्विडीश शब्द) या संस्थेशी साधर्म्य
- 1809 : सर्वप्रथम स्वीडन देशाने स्वीकारली.
  (1919 : फिनलँड, 1955 : डेन्मार्क, 1962 : नॉर्वे, न्युझीलंड, 1967 : ब्रिटन)
  (ब्रिटनमध्ये प्रशासकीय बाबींसाठी संसदीय आयुक्त)

✲ **अम्बुडस्मन : अर्थ :** प्रशासकीय व न्यायिक कृतीबाबतच्या तक्रारीची हाताळणी करण्यासाठी कायदेमंडळाद्वारे नियुक्त केलेला अधिकारी होय.

- केंद्रीय दक्षता आयोगास (CVC) केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट व गैरकारभारांची चौकशी करण्याचे अधिकार
- केंद्रीय गुन्हे अन्वेषण शाखा (CBI) ही संस्था पंतप्रधानांच्या नियंत्रणाखाली असल्याने मुक्तपणे कार्य करू शकत नाही.

✲ **पहिला प्रशासकीय सुधारणा आयोग :** (1966) च्या शिफारशीनुसार - केंद्रीय पातळीवर लोकपाल तर राज्य पातळीवर लोकायुक्त पद निर्माण करावे.

- शांतीभूषण यांनी 1968 साली पहिल्यांदा असे विधेयक मांडले आणि 1969 साली लोकसभेत संमत झाले. परंतु राज्यसभेत प्रलंबित असताना लोकसभा बरखास्त झाली. त्यानंतर ते विधेयक एकूण 10 वेळा मांडले, एकूण 11 वेळा प्रयत्न केले.
- 11 व्यांदा डिसेंबर 2013 साली मांडलेले विधेयक संसदेने पारित केले आहे.

● 1966 : पहिला प्रशासकीय आयोग : लोकपाल आणि लोकायुक्त यंत्रणा असावी.

● 2002 : घटनेच्या कामकाजाविषयीची समिती : अध्यक्ष : एम. एन. व्यंकटचेलीया

- लोकायुक्त आणि लोकपाल यंत्रणेची शिफारस
- यांच्या कक्षेत पंतप्रधान नसावे.

● 2005 - दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग : अध्यक्ष : विरप्पा मोईली

- लवकरात लवकर लोकपालाची तरतूद करावी.

## ✲ लोकपाल आणि लोकायुक्त कायदा 2013 मधील प्रमुख तरतूदी :

- हा कायदा संपूर्ण भारता लागू असेल.
- भारताबाहेरील भारतीय सरकारी अधिकाऱ्यांनाही लागू असेल.
- लोकपालाच्या अधिकारक्षेत्रात पंतप्रधान, मंत्री, खासदार, अधिकारी, कर्मचारी, सर्वांचा समावेश असेल.
- लोकपालांमध्ये : अध्यक्ष आणि 8 सदस्य (8 पैकी 50% न्यायिक सदस्य असावे)
- सदस्यांमध्ये SC/ST/OBC/ Minority/women चा समावेश असावा.

## ✲ लोकपाल निवड समिती :

- अध्यक्ष : पंतप्रधान
- सदस्य : लोकसभा सभापती, लोकसभा विरोधी पक्ष नेता
- सरन्यायाधीश / त्याने नेमलेला सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश आणि या चौघांच्या शिफारशींनुसार राष्ट्रपतीने नामनिर्देशित केलेला अग्रगण्य विधिज्ञ.
- ही निवड समिती लोकपाल अध्यक्ष व सदस्यांची निवड करेल.
  (यातील सदस्य सुद्धा 50% सदस्य SC/ST/OBC/ Minority/women या गटातील असावे.)
- लोकपाल : अध्यक्ष : हे सरन्यायाधीश (कार्यरत किंवा माजी) असतील किंवा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा माजी किंवा एखाद्या व्यक्तीस संबंधीत क्षेत्रात 25 वर्षांचा अनुभव असेल.
- पहिले लोकपाल - पिनाकी चंद्र घोष. निवड - 2019.

Dilip Sir's STEP UP Academy

**※ सदस्यांबाबत :**

- कार्यकाल : 5 वर्षे
- पुनर्नियुक्ती : अध्यक्ष/सदस्यांची पुनर्नियुक्ती होणार नाही.

● **वेतन व भत्ते :**

- लोकपाल अध्यक्षांना सरन्यायाधीश (CJI) यांच्याएवढे वेतन मिळेल.
- लोकपाल सदस्यांना सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांऐवढे वेतन मिळेल.

● **लोकपाल अध्यक्ष किंवा सदस्य हे :**

1) कार्यरत खासदार (MP) किंवा आमदार (MLA) नसावेत.
2) त्यांचे वय वर्षे 45 पेक्षा कमी नसावे.
3) ते स्थानिक पातळीवर नगरसेवक, ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेत लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत नसावे.
4) केंद्र किंवा राज्याच्या सेवेतून त्यांना पदावरून दूर केलेले नसावे.

**※ लोकायुक्त**

- राज्यपातळीवर कार्यरत असलेली यंत्रणा
- लोकायुक्त या संस्थेची स्थापना 1971 साली पहिल्यांदा महाराष्ट्रात केली गेली.
- 1970 साली ओडिशा राज्याने यासाठी सर्वप्रथम कायदा केला होता परंतु 1983 साली तो लागू केला.

**महाराष्ट्र लोकायुक्त आणि उप-लोकायुक्त अधिनियम 1971**

- स्थापना : 25 ऑक्टोबर 1972
- नियुक्ती : राज्यपाल (उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेता यांच्याशी सल्लामसलत करून)
- पात्रता : लोकायुक्त - उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश/न्यायाधीश
- उपलोकायुक्त : राज्याचे निवृत्त मुख्य सचिव किंवा अप्पर मुख्य सचिव
- कार्यकाल : पाच वर्षे
- अधिकारक्षेत्र : संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे लोकायुक्तांचे अधिकार क्षेत्र असेल.
- लोकसेवकाविरुद्धच्या भ्रष्टाचार आणि पदाचा दुरूपयोग या विरोधातील तक्रारी लोकायुक्त हाताळेल.
- लोकायुक्तांच्या कक्षेत : मुख्यमंत्री आणि राज्यातील न्यायिक व्यवस्था येत नाही.

**※ या संस्थेविषयी अधिक माहिती :**

- लोकायुक्त ही स्वतंत्र प्रशासन असलेली (प्रशासकीय गैरकारभारामुळे एखाद्या व्यक्तीवर कोणताही अन्याय झाल्यास सत्याचे अन्वेषण करून अन्यायाचे निवारण करण्याचे व प्रशासकीय कार्यपद्धतीतील दोषांचे निरसन करण्याची शिफारस करण्याचे अधिकार असलेली) आणि
- लोकसेवकांविरुद्ध पदांचा दुरूपयोग व भ्रष्टाचार या सारख्या आरोपांचा अंतर्भाव असलेल्या तक्रारींचे अन्वेषण करून योग्य ती शिफारस करण्याचे अधिकार असलेली एक यंत्रणा आहे.
- लोकायुक्त संस्था ही कार्यकारींचा प्रभाव आणि हस्तक्षेपापासून पूर्ण अलिप्त असते.
- ती एक वॉचडॉग म्हणून काम करते.
- लोकायुक्त संस्था गैरकृत्य करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करता येईल इतपत पुरेशी माहिती ज्यामध्ये अंतर्भूत आहे अशा साध्या पेपरवर किंवा पोस्ट कार्डवर पाठवलेल्या नागरिकांच्या तक्रारींची किंवा पत्रांची दखल घेऊन यथोचित चौकशी करते.
- सदर संस्था त्यांना सत्वर आणि किफायतशीर उपाय किंवा न्याय मिळून देण्यासाठी मदत करते.
- लोकायुक्त संस्थेकडून तक्रारींचे अन्वेषण गोपनीय पद्धतीने केले जाते.
- कोणत्याही न्यायालयाला लोकआयुक्तास किंवा कोणत्याही लोकसेवाकास त्यांनी पुरावा म्हणून गोळा केलेली माहिती किंवा अशा प्रकारे नोंदवलेला पुरावा दाखल करण्याची सक्ती करण्याचा हक्क नसतो.
- लोकायुक्त व उपलोकायुक्त त्यांच्या कामकाजाचा वार्षिक एकत्रित अहवाल राज्यपालांना सादर करतात. जो की नंतर दोन्ही विधिमंडळाच्या सभागृहासमोर ठेवला जातो.

**※ आतापर्यंतचे लोकायुक्त :**

| क्र. | नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| 1) | न्या. सो. पे. कोतवाल | 1972-1977 |
| 2) | न्या. आ. रा. शिंपी | 1978-1979 |
| 3) | न्या. ना. दा. कामत | 1979-1984 |
| 4) | न्या. व्य. श्री. देशपांडे | 1984-1989 |
| 5) | न्या. प्र. श्री. शाह | 1989-1994 |
| 6) | न्या. ह. ही. कंथारिया | 1994-1998 |
| 7) | न्या. वि. प. टिपणीस | 1999-2003 |
| 8) | न्या. गुलाबराव वदे | 2004-2009 |
| 9) | न्या. पुरूषोत्तम गायकवाड | 2009-2014 |
| 10) | न्या. म. ल. टहलीयानी | 2015-2020 |
| 11) | न्या. व्हि. एम. कानडे | 2021 पासून |

Dilip Sir's STEP UP Academy

## न्यायिक सक्रियता (Judicial Activism)

- **संकल्पना** : 1947 साली अमेरिकन इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ ऑर्थर श्लेसिंजर ज्यु. यांनी मांडली.
- भारतात न्यायिक सक्रियतेचा आरंभ करणारे न्यायाधीश : न्यायमूर्ती व्ही.आर.कृष्णा अय्यर, न्या.पी.एन.भगवती, न्या.ओ.चिन्नप्पा रेड्डी, न्या.डी.ए.देसाई.

## जनहित याचिका (Public Interest Litigation)

- 'लोकस स्टॅन्डी' या न्यायालयीन प्रक्रियेतील पारंपरिक नियमानुसार ज्या व्यक्ती किंवा गटावर अन्याय झाला असेल त्या व्यक्ती किंवा गटानेच न्यायालयात जाणे बंधनकारक होते. जनहित याचिकेच्या संकल्पनेने या नियमात लवचिकता आणली आणि अन्यायग्रस्त व्यक्ती किंवा गट न्यायालयात जाऊ शकत नसेल तर अशा व्यक्तीच्या वतीने जनहितार्थ इतरांना न्यायालयात जाता येते.
- जनहितार्थ याचिकेत दोन संदर्भात अर्ज दाखल केले जातात.

i) ज्या प्रकरणांचा जनहितावर प्रभाव पडू शकतो, अशी प्रकरणे

ii) गरीबी किंवा निरक्षरता यामुळे आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी न्यायालयात जाण्यास असमर्थ असणाऱ्या घटकांचे हित.

- भारतातील जनहित याचिकेचे प्रणेते : न्यायमूर्ती व्ही.आर. कृष्णा अय्यर, न्या.पी.एन. भगवती.
- **''ज्यामध्ये सार्वजनिक आर्थिक हितसंबंध किंवा कायदेशीर अधिकार व दायित्व यांच्यावर प्रभाव पाडणारे हितसंबंधी गुंतले आहेत, अशा सर्वसाधारण किंवा सार्वजनिक हितांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयात दाखल केलेला खटला म्हणजेच जनहित याचिका होय.'' – सर्वोच्च न्यायालय**
- **उद्देश :**
- न्यायाचे राज्य स्थापित व्हावे.
- समाजातील आर्थिकदृष्ट्या किंवा सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना न्याय मिळविण्याचा प्रभावी मार्ग सुलभ व्हावा.
- खऱ्या अर्थाने मूलभूत हक्क प्रत्यक्षात यावे.

**कपिला हिंगोरानी :** जनहित याचिकांची माता (Mother of PIL)

- PIL दाखल करणारी पहिली वकील.
- 1979 : हुस्नारा खतुन विरुद्ध बिहार राज्य खटला.
- बिहारमधील तुरुंगात वर्षानुवर्षे खिचपत पडलेल्या आणि न्यायालयात खटला सुरू असलेल्या कच्च्या कैद्यांच्या वतीने कपिला हिंगोरानी यांनी न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती.

**लोकस स्टँडी नियम :** ज्याच्या हक्काचा भंग झाला आहे अशीच व्यक्ती त्यावर उपाय व्हावा यासाठी न्यायालयात जाऊ शकते.

**ॲमियस क्युरी :** न्यायालयाचा मित्र वकील

**कपिला हिंगोरानी :** जनहित याचिकांची माता (Mother of PIL)

- PIL दाखल करणारी पहिली वकील.
- 1979 : हुस्नारा खतुन विरुद्ध बिहार राज्य खटला.

## मोफत कायदा सहाय्यता

### ✲ राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (National Legal Service Authority)

- स्थापना : विधी सेवा कायदा 1987 नुसार
- **42 वी घटनादुरुस्ती, 1976 : कलम 39A** : समाजातील दुर्बल घटकांसाठी कायदेविषयक निशुल्क सहाय्य आणि सर्वांसाठी न्याय सुनिश्चित करण्याची तरतूद राज्य करेल.
- अंमल : 9 नोव्हेंबर 1995
- **रचना :** राज्य पातळीवर – राज्य न्यायिक सेवा प्राधिकरण
- जिल्हा पातळीवर : जिल्हा न्यायिक सेवा प्राधिकरण
- तालुका पातळीवर : तालुका न्यायिक सेवा प्राधिकरण
- **यांची कार्ये :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाची धोरणे आणि आदेश यांची अंमलबजावणी करणे.
- लोकांना निशुल्क कायदेशीर सेवा देणे.
- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे ठरवते.
- देशभरात न्यायिक सेवा कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी राज्य न्यायिक सेवा प्राधिकरणांसाठी प्रभावी योजना तयार करते.
- **राज्य, जिल्हा आणि तालुका न्यायिक सेवा समिती यांची खालील कामे :**

1) पात्र व्यक्तींना निशुल्क व सक्षम न्यायिक सेवा पुरविणे.
2) विवादांवर सामान्य तोडगा काढण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करणे.
3) ग्रामीण भागात कायदेविषयक माहिती शिबिर आयोजीत करणे.

- **यात पुढील सेवा मोफत पुरवल्या जातात :**
- न्यायालयीन शुल्क प्रक्रियेचे शुल्क
- वकिलांची फी

- कायदेविषयक प्रक्रियांमध्ये आदेश व इतर कायदपत्रे यांच्या अभिलेखित प्रति मिळवणे.
- अपील तयार करणे, कायदेशीर प्रक्रियेत कागदपत्र छापणे व त्यांचे भाषांतर करणे व त्यांचे पुस्तक बनविणे.

● **यासाठी पात्र व्यक्ती** :

1) महिला व बालके
2) SC/ST व्यक्ती
3) औद्योगिक कामगार
4) स्थानबद्ध व्यक्ती
5) अपंग व्यक्ती
6) हिंसाचार, पूर, दुष्काळ, भूकंप, औद्योगिक संकटे यांचे पिडीत.
7) वार्षिक उत्पन्न रु. 1 लाख पेक्षा जास्त नसलेल्या व्यक्ती.
8) मानवी व्यापारांचे पिडीत किंवा भिकारी

### ※ लोक अदालत

- न्यायालयात प्रलंबित असलेले खटले किंवा न्यायालयात दाखल करण्यापूर्वीचे खटले यावर तोडगा काढण्यासाठी लोक अदालत स्थापन करण्यात आलेली आहे.

● 1987 च्या विधी सेवा कायद्यानुसार वैधानिक दर्जा

◆ **यात समाविष्ट होणारे खटले** : कौटुंबिक विवाद, फौजदारी (तडजोड होणारे) खटले, भूमीअधिग्रहण खटले, कामगार विवाद, कामगारांच्या मोबदल्याबाबतचे खटले, बँक वसुली खटले, निवृत्ती वेतनाचे खटले. गृहनिर्माण मंडळाचे खटले, गृहवित्त खटले, ग्राहक तक्रारी खटले, विद्युतपुरवठा बाबींशी संबंधीत खटले, दूरध्वनी देयकांबाबतचे खटले, मालमत्ता कर धरून नगरपालिकांसंबंधित खटले, भ्रमणध्वनी सेवा देणाऱ्या कंपन्यांबरोबरचे खटले.

◆ **न्यायालयात प्रलंबित खटला दाखल करण्यासाठी** :

1) त्यातील पक्षकार लोक अदालतमध्ये विवाद सोडवण्यासाठी तयार आहेत. किंवा
2) त्यातील एक पक्षकार लोक अदालतकडे खटला सोपवण्यासाठी अर्ज करतो. किंवा
3) संबंधित विषय लोक अदालतने हाताळण्यास योग्य आहे असा निष्कर्ष न्यायालयाने काढल्यास.

● लोक अदालतचे कामकाज भारतीय दंड संहिता 1860 नुसार न्यायालयीन कामकाज मानले जाते आणि प्रत्येक लोक अदालत ही CrPC 1973 नुसार दिवाणी न्यायालय मानली जाते.

- येथे कोणतीही ताठर स्वरूपाची कार्यपद्धती अवलंबली जात नाही.
- समझौता घडवून आणण्यावर न्यायालयाचा भर असतो. तडजोड झालीच नाही तर प्रकरण पुन्हा न्यायालयाकडे दिले जाते. येथे लवकरात लवकर आणि कमी खर्चात न्याय मिळतो.
- यामुळे न्यायालयासमोरील कामाचे ओझे कमी होण्यास मदत झाली आहे.
- लोकन्यायालयाने दिलेला निर्णय पक्षकारांवर बंधनकारक असतो. या निर्णयाच्या विरूद्ध अपील करता येत नाही.

### ※ लोक न्यायालयाची रचना :

- सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती, उच्च न्यायालय विधी सेवा समिती, राज्य न्यायिक सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायिक सेवा प्राधिकरण, तालुका न्यायिक सेवा प्राधिकरण हे त्यांना योग्य वाटले, अशा कालावधीसाठी आणि अशा ठिकाणी लोक अदालत गठीत करू शकतात.
- अध्यक्ष : न्यायिक अधिकारी; सदस्य : वकील किंवा सामाजिक कार्यकर्ते

### ※ ग्राम न्यायालय अधिनियम 2008 :

- स्थानिक पातळीवरील लोकांना न्यायाप्रती पोच असणे आणि दुय्यम न्यायालयावरील कामाचा ताण कमी करण्याच्या उद्देशाने हा कायदा केला गेला.

● **अपवाद** : हा कायदा जम्मू-काश्मीर, नागालँड, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम आणि आदिवासी क्षेत्रांचा अपवाद करून सर्व भारतभर लागू आहे.

● **रचना** : राज्यशासन उच्च न्यायालयांशी सल्लामसलत करून प्रत्येक जिह्यातील पंचायतीच्या मध्यम स्थरावर (पंचायत समिती) ग्राम न्यायालयाची स्थापना करेल.
(मध्यम स्तर नसलेल्या ठिकाणी गट ग्रामपंचायतीच्या पातळीवर ग्राम न्यायालयाची स्थापना केली जाईल)

- राज्य शासन उच्च्य न्यायालयाशी सल्ला-मसलत करून यांचे सीमा/क्षेत्र निर्धारित करेल.
- न्यायाधिकारी : प्रथम वर्ग न्यायालयीन दंडाधिकारी म्हणून नियुक्त होण्यासाठी जी पात्रता लागते, ती पात्रता न्यायाधिकारी पदी नियुक्त होण्यासाठी आवश्यक आहे. (येथे राज्यशासन SC/ST/OBC/Women या वर्गांना प्रतिनिधित्व देईल.)

Dilip Sir's STEP UP Academy

**※ अधिकार क्षेत्र :**

**अ) दिवाणी तक्रारी :** 1) मालमत्ता खरेदी करण्याचा हक्क

2) सामाईक चराई क्षेत्र

3) जलसंधारण बंधाऱ्यातून पाणी घेण्याचे वेळापत्रक आणि नियमन.

**ब) इतर : किमान वेतन कायद्यांतर्गत दावे.**

- व्यापार व्यवहार किंवा सावकारीमधून निर्माण झालेले आर्थिक खटले.
- शेती मशागतीच्या भागीदारीतून उद्भवलेले वाद
- या न्यायालयाच्या निर्णयाविरोधात अपील केले जाऊ शकते.

**※ ग्राम न्यायालयांची स्थापना, 2016**

| क्र. | राज्ये | सूचित केलेली ग्राम न्यायालये | कार्यरत ग्राम न्यायालये |
|---|---|---|---|
| 1) | मध्य प्रदेश | 89 | 81 |
| 2) | राजस्थान | 45 | 45 |
| 3) | कर्नाटक | 2 | 0 |
| 4) | ओडिशा | 16 | 13 |
| 5) | महाराष्ट्र | 23 | 23 |
| 6) | झारखंड | 6 | 8 |
| 7) | गोवा | 2 | 0 |
| 8) | पंजाब | 2 | 1 |
| 9) | हरियाणा | 2 | 2 |
| 10) | उत्तर प्रदेश | 104 | 2 |
| | **एकूण** | **291** | **175** |

## लोकपाल (Lokpal)

- स्कॅन्डिनेव्हियन देशातील 'अम्बुडस्मन' (स्विडीश शब्द) या संस्थेशी साधर्म्य
- 1809 : सर्वप्रथम स्वीडन देशाने स्वीकारली.
- त्यानंतर अशी व्यवस्था स्विकारणारे काही देश : फिनलँड (1919), डेन्मार्क (1955), नॉर्वे, न्युझीलंड (1962)
- **अम्बुडस्मन : अर्थ :** प्रशासकीय व न्यायिक कृतीबाबतच्या तक्रारीची हाताळणी करण्यासाठी कायदेमंडळाद्वारे नियुक्त केलेला अधिकारी होय.
- केंद्रीय दक्षता आयोगास (CVC) केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट व गैरकारभरांची चौकशी करण्याचे अधिकार
- केंद्रीय गुन्हे अन्वेषण शाखा (CBI) ही संस्था पंतप्रधानांच्या नियंत्रणाखाली असल्याने मुक्तपणे कार्य करू शकत नाही.
- पहिला प्रशासकीय सुधारणा आयोग (1966) च्या शिफारशीनुसार केंद्रीय पातळीवर लोकपाल तर राज्य पातळीवर लोकायुक्त पद निर्माण करावे.
- 1968 साली पहिल्यांदा असे विधेयक मांडले आणि 1969 साली लोकसभेत संमत झाले. परंतु राज्यसभेत प्रलंबित असताना लोकसभा बरखास्त झाली. पुढील काळात 1971, 1977, 1985, 1985, 1989, 1996, 1998, 2001, 2005, आणि 2008, 2011 असे 10 वेळा हे विधेयक मांडले गेले.
- 11 व्यांदा डिसेंबर 2013 साली मांडलेले विधेयक संसदेने पारित केले आहे.
- 1966 : पहिला प्रशासकीय आयोग : लोकपाल आणि लोकायुक्त यंत्रणा असावी.
- 2002 : घटनेच्या कामकाजाविषयीची समिती : अध्यक्ष : एम. एन. व्यंकटचेलीया
- लोकायुक्त आणि लोकपाल यंत्रणेची शिफारस केली. यांच्या शिफारसीनुसार लोकपालच्या कक्षेत पंतप्रधान नसावे.
- 2005 : दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग : अध्यक्ष : विरप्पा मोईली
- शिफारस : लवकरात लवकर लोकपालाची तरतूद करावी.

**※ लोकपाल आणि लोकायुक्त कायदा 2013 मधील प्रमुख तरतूदी :**

- हा कायदा संपूर्ण भारतात लागू असेल.
- भारताबाहेरील भारतीय सरकारी अधिकाऱ्यांनाही लागू असेल.
- रचना : अध्यक्ष आणि 8 सदस्य (8 पैकी 50% न्यायिक सदस्य असावे)
- सदस्यांमध्ये SC/ST/OBC/ Minority/women चा समावेश असावा.
- **लोकपाल निवड समिती :**
- अध्यक्ष : पंतप्रधान
- सदस्य : लोकसभा सभापती, लोकसभा विरोधी पक्ष नेता
- सरन्यायाधीश / त्याने नेमलेला सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश आणि या चौघांच्या शिफारशींनुसार राष्ट्रपतीने नामनिर्देशित केलेला अग्रगण्य विधिज्ञ.
- ही निवड समिती लोकपाल अध्यक्ष व सदस्यांची निवड करेल. (यातील सदस्य सुद्धा 50% सदस्य SC/ST/OBC/ Minority/women या गटातील असावे.)

Dilip Sir's STEP UP Academy

- लोकपाल : अध्यक्ष : हे सरन्यायाधीश (कार्यरत किंवा माजी) असतील किंवा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा माजी किंवा एखाद्या व्यक्तीस संबंधीत क्षेत्रात 25 वर्षांचा अनुभव असेल.
- कार्यकाल : 5 वर्षे
- पुनर्नियुक्ती : अध्यक्ष/सदस्यांची पुनर्नियुक्ती होणार नाही.

● **वेतन व भत्ते :**

- लोकपाल अध्यक्षांना सरन्यायाधीश (CJI) यांच्याएवढे वेतन मिळेल. तसेच लोकपाल सदस्यांना सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांएवढे वेतन मिळेल.
- पहिले लोकपाल : पिनाकी चंद्राघोष (2019 पासून)

● **लोकपाल अध्यक्ष किंवा सदस्य हे :**

1) कार्यरत खासदार (MP) किंवा आमदार (MLA) नसावेत.
2) त्यांचे वय वर्षे 45 पेक्षा कमी नसावे.
3) ते स्थानिक पातळीवर नगरसेवक, ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेत लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत नसावे.
4) केंद्र किंवा राज्याच्या सेवेतून त्यांना पदावरून दूर केलेले नसावे.

**※ लोकपालचे कार्यक्षेत्र (Jurisdiction and Functions of Lokpal)**

1. लोकपालच्या अधिकार क्षेत्रात पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, संसद सदस्य आणि केंद्र सरकारचे गट अ, ब, क आणि ड मधील अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होतो.
2. याचबरोबर केद्र किंवा राज्य सरकारकडून पूर्वतः/अंशतः निधी मिळणाऱ्या किंवा संसदेने केलेल्या कायद्यानुसार स्थापन करण्यात आलेली महामंडळे, संस्थाने (Corporation, Society, trust or autonomous body) यांचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी, आणि संचालक यांनासुध्दा लोकपालच्या कक्षेत समाविष्ट केले आहे.
3. याचबरोबर कोणतीही सोसायटी किंवा संस्थान (trust) ज्यास 10 लाख रु. पेक्षा जास्त परकीय निधी (foreign Contribution) प्राप्त होतो. अशा सोसायटी किंवा संस्थानांही लोकपालच्या कक्षेत समाविष्ट केले आहे.
4. एखाद्या सरकारी सेवकाविरुध्द लोकपाल कडे करण्यात येणारी तक्रार ही भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 अंतर्गत गुन्हा असणे आवश्यक आहे.
5. कोणतीही व्यक्ती तक्रार दाखल करू शकते, परंतु लोकपाल स्वतःहून (Suo Motu) तक्रार दाखल करू शकत नाही.
6. तक्रार दाखल झाल्यानंतर लोकपाल प्राथमिक चौकशीसाठी (Preliminary enquiry) त्याच्या चौकशी विभागाला (enquiry wing) किंवा ला किंवा इतर तपास यंत्रणांसाठी आदेश देऊ शकतात. लोकपाल ज्या सरकारी सेवकाविरुद्ध तक्रार दाखल झाली आहे त्यास स्पष्टीकरण देण्यासाठी बोलावू शकतात.
7. लोकपालचा चौकशी विभाग किंवा इतर कोणतीही तपास यंत्रणा ज्यांना प्राथमिक चौकशीसाठी आदेश दिला आहे त्यांनी 60 दिवसांच्या आत आपला चौकशी अहवाल सादर करायला हवा.
8. प्राथमिक चौकशी अहवाल अभ्यासून लोकपाल बेंच सरकारी सेवकास आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल आणि त्यानंतर पुढील चौकशी (Full investigation) करण्याबाबत निर्णय घेईल. जर तक्रार खोटी/चुकीची असेल तर तक्रारकर्त्या विरोधात पुढे खटला सुरू करेल.
9. तक्रार दाखल झाल्यापासून साधारण 10 दिवसाच्या आत प्राथमिक चौकशी पूर्ण व्हायला हवी.
10. जर लोकपालने पुढील चौकशीसाठी तपास यंत्रणेला आदेश दिले तर ती यंत्रणा योग्य अधिकारक्षेत्र असलेल्या न्यायालयात प्राथमिक अहवाल सादर करेल आणि प्रक्रिया सुरु करेल.
11. तपास यंत्रणेने न्यायालयात दाखल केलेल्या चार्ज शीट (charge-sheet) च्या आधारे तीन सदस्यीय लोकपाल बेंच त्या लोकसेवकाविरूद्ध योग्य प्राधिकरणाला (competent authority) Department action घेण्यास सांगेल.
12. लोकपाल यांना तपासणी आणि जप्तीचे अधिकार (power of search and seigure) आहेत.
13. दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत प्राथमिक चौकशी तपासणी आणि मालमत्ता जप्ती आणि भ्रष्टाचार निर्मुलनासाठी इतर पावले उचलण्याच्या उद्देशाने लोकपालला अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.
14. CBI सहीत इतर तपास यंत्रणांना Superintendence & Direction देण्याचे अधिकार लोकपालांना आहेत.

Dilip Sir's STEP UP Academy

## लोकायुक्त

- राज्यपातळीवर कार्यरत असलेली यंत्रणा
- लोकायुक्त या संस्थेची स्थापना 1971 साली पहिल्यांदा महाराष्ट्रात केली गेली.
- 1970 साली ओडिशा राज्याने यासाठी सर्वप्रथम कायदा केला होता, परंतु 1983 साली तो लागू केला.

### ❊ महाराष्ट्र लोकायुक्त आणि उप-लोकायुक्त अधिनियम 1971

- स्थापना : 25 ऑक्टोबर 1972
- नियुक्ती : राज्यपाल (उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेता यांच्याशी सल्लामसलत करून)
- पात्रता : लोकायुक्त - उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश/न्यायाधीश
- उपलोकायुक्त : राज्याचे निवृत्त मुख्य सचिव किंवा अप्पर मुख्य सचिव
- कार्यकाल : पाच वर्षे
- अधिकारक्षेत्र : संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे लोकायुक्तांचे अधिकार क्षेत्र असेल.
- लोकसेवकाविरुद्धच्या भ्रष्टाचार आणि पदाचा दुरूपयोग या विरोधातील तक्रारी लोकायुक्त हाताळेल.
- लोकायुक्तांच्या कक्षेत : मुख्यमंत्री आणि राज्यातील न्यायिक व्यवस्था येत नाही.

### ❊ या संस्थेविषयी अधिक माहिती :

- लोकायुक्त ही स्वतंत्र प्रशासन असलेली (प्रशासकीय गैरकारभारामुळे एखाद्या व्यक्तीवर कोणताही अन्याय झाल्यास सत्याचे अन्वेषण करून अन्यायाचे निवारण करण्याचे व प्रशासकीय कार्यपद्धतीतील दोषांचे निरसन करण्याची शिफारस करण्याचे अधिकार असलेली) आणि
- लोकसेवकांविरुद्ध पदांचा दुरूपयोग व भ्रष्टाचार या सारख्या आरोपांचा अंतर्भातव असलेल्या तक्रारींचे अन्वेषण करून योग्य ती शिफारस करण्याचे अधिकार असलेली एक यंत्रणा आहे.
- लोकायुक्त संस्था ही कार्यकारींचा प्रभाव आणि हस्तक्षेपापासून पूर्ण अलिप्त असते.
- ती एक वॉचडॉग म्हणून काम करते.
- लोकायुक्त संस्था गैरकृत्य करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करता येईल इतपत पुरेशी माहिती ज्यामध्ये अंतर्भूत आहे अशा साध्या पेपरवर किंवा पोस्ट कार्डवर पाठवलेल्या नागरिकांच्या तक्रारींची किंवा पत्रांची दखल घेऊन येथोचित चौकशी करते.
- सदर संस्था त्यांना सत्वर आणि किफायतशीर उपाय किंवा न्याय मिळून देण्यासाठी मदत करते.
- लोकायुक्त संस्थेकडून तक्रारींचे अन्वेषण गोपनीय पद्धतीने केले जाते.
- कोणत्याही न्यायालयाला लोकायुक्तास किंवा कोणत्याही लोकसेवाकास त्यांनी पुरावा म्हणून गोळा केलेली माहिती किंवा अशा प्रकारे नोंदवलेला पुरावा दाखल करण्याची सक्ती करण्याचा हक्क नसतो.
- लोकायुक्त व उपलोकायुक्त त्यांच्या कामकाजाचा वार्षिक एकत्रित अहवाल राज्यपालांना सादर करतात. जो की नंतर दोन्ही विधिमंडळाच्या सभागृहासमोर ठेवला जातो.

### ❊ आतापर्यंतचे लोकायुक्त :

| क्र. | नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| 1) | न्या. सो. पे. कोतवाल | 1972-1977 |
| 2) | न्या. आ. रा. शिंपी | 1978-1979 |
| 3) | न्या. ना. दा. कामत | 1979-1984 |
| 4) | न्या. व्य. श्री. देशपांडे | 1984-1989 |
| 5) | न्या. प्र. श्री. शाह | 1989-1994 |
| 6) | न्या. ह. ही. कंथारिया | 1994-1998 |
| 7) | न्या. वि. प. टिपणीस | 1999-2003 |
| 8) | न्या. गुलाबराव वदे | 2004-2009 |
| 9) | न्या. पुरूषोत्तम गायकवाड | 2009-2014 |
| 10) | न्या. म. ल. टहलीयानी | 2015-2020 |
| 11) | संजय भाटिया | 2020 पासून |

## न्यायिक सक्रियता (Judicial Activism)

- **संकल्पना** : 1947 साली अमेरिकन इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ ऑर्थर श्लेसिंजर ज्यु. यांनी मांडली.
- भारतात न्यायिक सक्रियतेचा आरंभ करणारे न्यायाधीश : न्यायमूर्ती व्ही.आर.कृष्णा अय्यर, न्या.पी.एन.भगवती, न्या.ओ.चिन्नप्पा रेड्डी, न्या.डी.ए.देसाई.

## जनहित याचिका (Public Interest Litigation)

- 'लोकस स्टॅन्डी' या न्यायालयीन प्रक्रियेतील पारंपरिक नियमानुसार ज्या व्यक्ती किंवा गटावर अन्याय झाला असेल त्या व्यक्ती किंवा गटानेच न्यायालयात जाणे बंधनकारक होते. जनहित याचिकेच्या संकल्पनेने या नियमात लवचिकता आणली आणि अन्यायग्रस्त व्यक्ती किंवा गट न्यायालयात जाऊ शकत नसेल तर अशा व्यक्तीच्या वतीने जनहितार्थ इतरांना न्यायालयात जाता येते.
- जनहितार्थ याचिकेत दोन संदर्भात अर्ज दाखल केले जातात.

i) ज्या प्रकरणांचा जनहितावर प्रभाव पडू शकतो, अशी प्रकरणे

ii) गरीबी किंवा निरक्षरता यामुळे आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी न्यायालयात जाण्यास असमर्थ असणाऱ्या घटकांचे हित.

- भारतातील जनहित याचिकेचे प्रणेते : न्यायमूर्ती व्ही.आर. कृष्णा अय्यर, न्या.पी.एन. भगवती.
- **''ज्यामध्ये सार्वजनिक आर्थिक हितसंबंध किंवा कायदेशीर अधिकार व दायित्व यांच्यावर प्रभाव पाडणारे हितसंबंधी गुंतले आहेत, अशा सर्वसाधारण किंवा सार्वजनिक हितांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयात दाखल केलेला खटला म्हणजेच जनहित याचिका होय.'' – सर्वोच्च न्यायालय**
- **उद्देश :**
- न्यायाचे राज्य स्थापित व्हावे.
- समाजातील आर्थिकदृष्ट्या किंवा सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना न्याय मिळविण्याचा प्रभावी मार्ग सुलभ व्हावा.
- खऱ्या अर्थाने मूलभूत हक्क प्रत्यक्षात यावे.

**कपिला हिंगोरानी :** जनहित याचिकांची माता (Mother of PIL)
- PIL दाखल करणारी पहिली वकील.
- 1979 : हुस्नारा खतुन विरुद्ध बिहार राज्य खटला.
- बिहारमधील तुरुंगात वर्षानुवर्षे खिचपत पडलेल्या आणि न्यायालयात खटला सुरू असलेल्या कच्च्या कैद्यांच्या वतीने कपिला हिंगोरानी यांनी न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती.

**लोकस स्टँडी नियम :** ज्याच्या हक्काचा भंग झाला आहे अशीच व्यक्ती त्यावर उपाय व्हावा यासाठी न्यायालयात जाऊ शकते.

**ॲमियस क्युरी :** न्यायालयाचा मित्र वकील

**कपिला हिंगोरानी :** जनहित याचिकांची माता (Mother of PIL)
- PIL दाखल करणारी पहिली वकील.
- 1979 : हुस्नारा खतुन विरुद्ध बिहार राज्य खटला.

## मोफत कायदा सहाय्यता

**※ राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (National Legal Service Authority)**

- स्थापना : विधी सेवा कायदा 1987 नुसार
- **42 वी घटनादुरुस्ती, 1976 : कलम 39A** : समाजातील दुर्बल घटकांसाठी कायदेविषयक निशुल्क सहाय्य आणि सर्वांसाठी न्याय सुनिश्चित करण्याची तरतूद राज्य करेल.
- अंमल : 9 नोव्हेंबर 1995
- **रचना :** राज्य पातळीवर – राज्य न्यायिक सेवा प्राधिकरण
- जिल्हा पातळीवर : जिल्हा न्यायिक सेवा प्राधिकरण
- तालुका पातळीवर : तालुका न्यायिक सेवा प्राधिकरण
- **यांची कार्ये :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाची धोरणे आणि आदेश यांची अंमलबजावणी करणे.
- लोकांना निशुल्क कायदेशीर सेवा देणे.
- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे ठरवते.
- देशभरात न्यायिक सेवा कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी राज्य न्यायिक सेवा प्राधिकरणांसाठी प्रभावी योजना तयार करते.
- **राज्य, जिल्हा आणि तालुका न्यायिक सेवा समिती यांची खालील कामे :**

1) पात्र व्यक्तींना निशुल्क व सक्षम न्यायिक सेवा पुरविणे.
2) विवादांवर सामान्य तोडगा काढण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करणे.
3) ग्रामीण भागात कायदेविषयक माहिती शिबिर आयोजीत करणे.

- **यात पुढील सेवा मोफत पुरवल्या जातात :**
- न्यायालयीन शुल्क प्रक्रियेचे शुल्क
- वकिलांची फी

- कायदेविषयक प्रक्रियांमध्ये आदेश व इतर कायदपत्रे यांच्या अभिलेखित प्रति मिळवणे.
- अपील तयार करणे, कायदेशीर प्रक्रियेत कागदपत्र छापणे व त्यांचे भाषांतर करणे व त्यांचे पुस्तक बनविणे.

- **यासाठी पात्र व्यक्ती :**

1) महिला व बालके
2) SC/ST व्यक्ती
3) औद्योगिक कामगार
4) स्थानबद्ध व्यक्ती
5) अपंग व्यक्ती
6) हिंसाचार, पूर, दुष्काळ, भूकंप, औद्योगिक संकटे यांचे पिडीत.
7) वार्षिक उत्पन्न रु. 1 लाख पेक्षा जास्त नसलेल्या व्यक्ती.
8) मानवी व्यापारांचे पिडीत किंवा भिकारी

### ※ लोक अदालत

- न्यायालयात प्रलंबित असलेले खटले किंवा न्यायालयात दाखल करण्यापूर्वीचे खटले यावर तोडगा काढण्यासाठी लोक अदालत स्थापन करण्यात आलेली आहे.

- 1987 च्या विधी सेवा कायद्यानुसार वैधानिक दर्जा
- **यात समाविष्ट होणारे खटले :** कौटुंबिक विवाद, फौजदारी (तडजोड होणारे) खटले, भूमीअधिग्रहण खटले, कामगार विवाद, कामगारांच्या मोबदल्याबाबतचे खटले, बँक वसुली खटले, निवृत्ती वेतनाचे खटले. गृहनिर्माण मंडळाचे खटले, गृहवित्त खटले, ग्राहक तक्रारी खटले, विद्युतपुरवठा बाबींशी संबंधीत खटले, दूरध्वनी देयकांबाबतचे खटले, मालमत्ता कर धरून नगरपालिकांसंबंधित खटले, भ्रमणध्वनी सेवा देणाऱ्या कंपन्यांबरोबरचे खटले.
- **न्यायालयात प्रलंबित खटला दाखल करण्यासाठी :**

1) त्यातील पक्षकार लोक अदालतमध्ये विवाद सोडवण्यासाठी तयार आहेत. किंवा
2) त्यातील एक पक्षकार लोक अदालतकडे खटला सोपवण्यासाठी अर्ज करतो. किंवा
3) संबंधित विषय लोक अदालतने हाताळण्यास योग्य आहे असा निष्कर्ष न्यायालयाने काढल्यास.

- लोक अदालतचे कामकाज भारतीय दंड संहिता 1860 नुसार न्यायालयीन कामकाज मानले जाते आणि प्रत्येक लोक अदालत ही CrPC 1973 नुसार दिवाणी न्यायालय मानली जाते.

- येथे कोणतीही ताठर स्वरूपाची कार्यपद्धती अवलंबली जात नाही.
- समझौता घडवून आणण्यावर न्यायालयाचा भर असतो. तडजोड झालीच नाही तर प्रकरण पुन्हा न्यायालयाकडे दिले जाते. येथे लवकरात लवकर आणि कमी खर्चात न्याय मिळतो.
- यामुळे न्यायालयासमोरील कामाचे ओझे कमी होण्यास मदत झाली आहे.
- लोकन्यायालयाने दिलेला निर्णय पक्षकारांवर बंधनकारक असतो. या निर्णयाच्या विरूद्ध अपील करता येत नाही.

### ※ लोक न्यायालयाची रचना :

- सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती, उच्च न्यायालय विधी सेवा समिती, राज्य न्यायिक सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायिक सेवा प्राधिकरण, तालुका न्यायिक सेवा प्राधिकरण हे त्यांना योग्य वाटले, अशा कालावधीसाठी आणि अशा ठिकाणी लोक अदालत गठीत करू शकतात.
- अध्यक्ष : न्यायिक अधिकारी; सदस्य : वकील किंवा सामाजिक कार्यकर्ते

### ※ ग्राम न्यायालय अधिनियम 2008 :

- स्थानिक पातळीवरील लोकांना न्यायाप्रती पोच असणे आणि दुय्यम न्यायालयावरील कामाचा ताण कमी करण्याच्या उद्देशाने हा कायदा केला गेला.

- **अपवाद :** हा कायदा जम्मू-काश्मीर, नागालँड, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम आणि आदिवासी क्षेत्रांचा अपवाद करून सर्व भारतभर लागू आहे.
- **रचना :** राज्यशासन उच्च न्यायालयांशी सल्लामसलत करून प्रत्येक जिह्यातील पंचायतीच्या मध्यम स्थरावर (पंचायत समिती) ग्राम न्यायालयाची स्थापना करेल.
(मध्यम स्तर नसलेल्या ठिकाणी गट ग्रामपंचायतीच्या पातळीवर ग्राम न्यायालयाची स्थापना केली जाईल)

- राज्य शासन उच्य न्यायालयाशी सल्ला-मसलत करून यांचे सीमा/क्षेत्र निर्धारित करेल.
- न्यायाधिकारी : प्रथम वर्ग न्यायालयीन दंडाधिकारी म्हणून नियुक्त होण्यासाठी जी पात्रता लागते, ती पात्रता न्यायाधिकारी पदी नियुक्त होण्यासाठी आवश्यक आहे. (येथे राज्यशासन SC/ST/OBC/Women या वर्गांना प्रतिनिधित्व देईल.)

* **अधिकार क्षेत्र :**

**अ) दिवाणी तक्रारी :** 1) मालमत्ता खरेदी करण्याचा हक्क

2) सामाईक चराई क्षेत्र

3) जलसंधारण बंधाऱ्यातून पाणी घेण्याचे वेळापत्रक आणि नियमन.

**ब) इतर : किमान वेतन कायद्यांतर्गत दावे.**

- व्यापार व्यवहार किंवा सावकारीमधून निर्माण झालेले आर्थिक खटले.
- शेती मशागतीच्या भागीदारीतून उद्‌भवलेले वाद
- या न्यायालयाच्या निर्णयाविरोधात अपील केले जाऊ शकते.

*** ग्राम न्यायालयांची स्थापना, 2016**

| क्र. | राज्ये | सूचित केलेली ग्राम न्यायालये | कार्यरत ग्राम न्यायालये |
|---|---|---|---|
| 1) | मध्य प्रदेश | 89 | 81 |
| 2) | राजस्थान | 45 | 45 |
| 3) | कर्नाटक | 2 | 0 |
| 4) | ओडिशा | 16 | 13 |
| 5) | महाराष्ट्र | 23 | 23 |
| 6) | झारखंड | 6 | 8 |
| 7) | गोवा | 2 | 0 |
| 8) | पंजाब | 2 | 1 |
| 9) | हरियाणा | 2 | 2 |
| 10) | उत्तर प्रदेश | 104 | 2 |
| | **एकूण** | **291** | **175** |

## लोकपाल (Lokpal)

- स्कॅन्डिनेव्हियन देशातील 'अम्बुडस्मन' (स्विडीश शब्द) या संस्थेशी साधर्म्य
- 1809 : सर्वप्रथम स्वीडन देशाने स्वीकारली.
- त्यानंतर अशी व्यवस्था स्विकारणारे काही देश : फिनलँड (1919), डेन्मार्क (1955), नॉर्वे, न्युझीलंड (1962)

- **अम्बुडस्मन : अर्थ :** प्रशासकीय व न्यायिक कृतीबाबतच्या तक्रारीची हाताळणी करण्यासाठी कायदेमंडळाद्वारे नियुक्त केलेला अधिकारी होय.

- केंद्रीय दक्षता आयोगास (CVC) केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट व गैरकारभरांची चौकशी करण्याचे अधिकार
- केंद्रीय गुन्हे अन्वेषण शाखा (CBI) ही संस्था पंतप्रधानांच्या नियंत्रणाखाली असल्याने मुक्तपणे कार्य करू शकत नाही.
- पहिला प्रशासकीय सुधारणा आयोग (1966) च्या शिफारशीनुसार केंद्रीय पातळीवर लोकपाल तर राज्य पातळीवर लोकायुक्त पद निर्माण करावे.
- 1968 साली पहिल्यांदा असे विधेयक मांडले आणि 1969 साली लोकसभेत संमत झाले. परंतु राज्यसभेत प्रलंबित असताना लोकसभा बरखास्त झाली. पुढील काळात 1971, 1977, 1985, 1985, 1989, 1996, 1998, 2001, 2005, आणि 2008, 2011 असे 10 वेळा हे विधेयक मांडले गेले.
- 11 व्यांदा डिसेंबर 2013 साली मांडलेले विधेयक संसदेने पारित केले आहे.

- 1966 : पहिला प्रशासकीय आयोग : लोकपाल आणि लोकायुक्त यंत्रणा असावी.
- 2002 : घटनेच्या कामकाजाविषयीची समिती : अध्यक्ष : एम. एन. व्यंकटचेलीया

- लोकायुक्त आणि लोकपाल यंत्रणेची शिफारस केली. यांच्या शिफारसीनुसार लोकपालच्या कक्षेत पंतप्रधान नसावे.

- 2005 : दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग : अध्यक्ष : विरप्पा मोईली

- शिफारस : लवकरात लवकर लोकपालाची तरतूद करावी.

*** लोकपाल आणि लोकायुक्त कायदा 2013 मधील प्रमुख तरतूदी :**

- हा कायदा संपूर्ण भारतात लागू असेल.
- भारताबाहेरील भारतीय सरकारी अधिकाऱ्यांनाही लागू असेल.
- रचना : अध्यक्ष आणि 8 सदस्य (8 पैकी 50% न्यायिक सदस्य असावे)
- सदस्यांमध्ये SC/ST/OBC/ Minority/women चा समावेश असावा.

- **लोकपाल निवड समिती :**

- अध्यक्ष : पंतप्रधान
- सदस्य : लोकसभा सभापती, लोकसभा विरोधी पक्ष नेता
- सरन्यायाधीश / त्याने नेमलेला सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश आणि या चौघांच्या शिफारशींनुसार राष्ट्रपतीने नामनिर्देशित केलेला अग्रगण्य विधिज्ञ.
- ही निवड समिती लोकपाल अध्यक्ष व सदस्यांची निवड करेल. (यातील सदस्य सुद्धा 50% सदस्य SC/ST/OBC/ Minority/women या गटातील असावे.)

Dilip Sir's STEP UP Academy

- लोकपाल : अध्यक्ष : हे सरन्यायाधीश (कार्यरत किंवा माजी) असतील किंवा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा माजी किंवा एखाद्या व्यक्तीस संबंधीत क्षेत्रात 25 वर्षांचा अनुभव असेल.
- कार्यकाल : 5 वर्षे
- पुनर्नियुक्ती : अध्यक्ष/सदस्यांची पुनर्नियुक्ती होणार नाही.

- **वेतन व भत्ते :**

- लोकपाल अध्यक्षांना सरन्यायाधीश (CJI) यांच्याएवढे वेतन मिळेल. तसेच लोकपाल सदस्यांना सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांएवढे वेतन मिळेल.
- पहिले लोकपाल : पिनाकी चंद्राघोष (2019 पासून)

- **लोकपाल अध्यक्ष किंवा सदस्य हे :**

1) कार्यरत खासदार (MP) किंवा आमदार (MLA) नसावेत.
2) त्यांचे वय वर्षे 45 पेक्षा कमी नसावे.
3) ते स्थानिक पातळीवर नगरसेवक, ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेत लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत नसावे.
4) केंद्र किंवा राज्याच्या सेवेतून त्यांना पदावरून दूर केलेले नसावे.

## ✻ लोकपालचे कार्यक्षेत्र (Jurisdiction and Functions of Lokpal)

1. लोकपालच्या अधिकार क्षेत्रात पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, संसद सदस्य आणि केंद्र सरकारचे गट अ, ब, क आणि ड मधील अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होतो.
2. याचबरोबर केद्र किंवा राज्य सरकारकडून पूर्वतः/अंशतः निधी मिळणाऱ्या किंवा संसदेने केलेल्या कायद्यानुसार स्थापन करण्यात आलेली महामंडळे, संस्थाने (Corporation, Society, trust or autonomous body) यांचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी, आणि संचालक यांनासुध्दा लोकपालच्या कक्षेत समाविष्ट केले आहे.
3. याचबरोबर कोणतीही सोसायटी किंवा संस्थान (trust) ज्यास 10 लाख रु. पेक्षा जास्त परकीय निधी (foreign Contribution) प्राप्त होतो. अशा सोसायटी किंवा संस्थानांही लोकपालच्या कक्षेत समाविष्ट केले आहे.
4. एखाद्या सरकारी सेवकाविरुध्द लोकपाल कडे करण्यात येणारी तक्रार ही भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 अंतर्गत गुन्हा असणे आवश्यक आहे.
5. कोणतीही व्यक्ती तक्रार दाखल करू शकते, परंतु लोकपाल स्वतःहून (Suo Motu) तक्रार दाखल करू शकत नाही.
6. तक्रार दाखल झाल्यानंतर लोकपाल प्राथमिक चौकशीसाठी (Preliminary enquiry) त्याच्या चौकशी विभागाला (enquiry wing) किंवा ला किंवा इतर तपास यंत्रणांसाठी आदेश देऊ शकतात. लोकपाल ज्या सरकारी सेवकाविरुद्ध तक्रार दाखल झाली आहे त्यास स्पष्टीकरण देण्यासाठी बोलावू शकतात.
7. लोकपालचा चौकशी विभाग किंवा इतर कोणतीही तपास यंत्रणा ज्यांना प्राथमिक चौकशीसाठी आदेश दिला आहे त्यांनी 60 दिवसांच्या आत आपला चौकशी अहवाल सादर करायला हवा.
8. प्राथमिक चौकशी अहवाल अभ्यासून लोकपाल बेंच सरकारी सेवकास आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल आणि त्यानंतर पुढील चौकशी (Full investigation) करण्याबाबत निर्णय घेईल. जर तक्रार खोटी/चुकीची असेल तर तक्रारकर्त्या विरोधात पुढे खटला सुरू करेल.
9. तक्रार दाखल झाल्यापासून साधारण 10 दिवसाच्या आत प्राथमिक चौकशी पूर्ण व्हायला हवी.
10. जर लोकपालने पुढील चौकशीसाठी तपास यंत्रणेला आदेश दिले तर ती यंत्रणा योग्य अधिकारक्षेत्र असलेल्या न्यायालयात प्राथमिक अहवाल सादर करेल आणि प्रक्रिया सुरु करेल.
11. तपास यंत्रणेने न्यायालयात दाखल केलेल्या चार्ज शीट (charge-sheet) च्या आधारे तीन सदस्यीय लोकपाल बेंच त्या लोकसेवकाविरूद्ध योग्य प्राधिकरणाला (competent authority) Department action घेण्यास सांगेल.
12. लोकपाल यांना तपासणी आणि जप्तीचे अधिकार (power of search and seigure) आहेत.
13. दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत प्राथमिक चौकशी तपासणी आणि मालमत्ता जप्ती आणि भ्रष्टाचार निर्मुलनासाठी इतर पावले उचलण्याच्या उद्देशाने लोकपालला अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.
14. CBI सहीत इतर तपास यंत्रणांना Superintendence & Direction देण्याचे अधिकार लोकपालांना आहेत.

Dilip Sir's STEP UP Academy

## लोकायुक्त

- राज्यपातळीवर कार्यरत असलेली यंत्रणा
- लोकायुक्त या संस्थेची स्थापना 1971 साली पहिल्यांदा महाराष्ट्रात केली गेली.
- 1970 साली ओडिशा राज्याने यासाठी सर्वप्रथम कायदा केला होता, परंतु 1983 साली तो लागू केला.

### ✻ महाराष्ट्र लोकायुक्त आणि उप–लोकायुक्त अधिनियम 1971

- स्थापना : 25 ऑक्टोबर 1972
- नियुक्ती : राज्यपाल (उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेता यांच्याशी सल्लामसलत करून)
- पात्रता : लोकायुक्त – उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश/न्यायाधीश
- उपलोकायुक्त : राज्याचे निवृत्त मुख्य सचिव किंवा अप्पर मुख्य सचिव
- कार्यकाल : पाच वर्षे
- अधिकारक्षेत्र : संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे लोकायुक्तांचे अधिकार क्षेत्र असेल.
- लोकसेवकाविरुद्धच्या भ्रष्टाचार आणि पदाचा दुरूपयोग या विरोधातील तक्रारी लोकायुक्त हाताळेल.
- लोकायुक्तांच्या कक्षेत : मुख्यमंत्री आणि राज्यातील न्यायिक व्यवस्था येत नाही.

### ✻ या संस्थेविषयी अधिक माहिती :

- लोकायुक्त ही स्वतंत्र प्रशासन असलेली (प्रशासकीय गैरकारभारामुळे एखाद्या व्यक्तीवर कोणताही अन्याय झाल्यास सत्याचे अन्वेषण करून अन्यायाचे निवारण करण्याचे व प्रशासकीय कार्यपद्धतीतील दोषांचे निरसन करण्याची शिफारस करण्याचे अधिकार असलेली) आणि
- लोकसेवकांविरुद्ध पदांचा दुरूपयोग व भ्रष्टाचार या सारख्या आरोपांचा अंतर्भातव असलेल्या तक्रारींचे अन्वेषण करून योग्य ती शिफारस करण्याचे अधिकार असलेली एक यंत्रणा आहे.
- लोकायुक्त संस्था ही कार्यकारींचा प्रभाव आणि हस्तक्षेपापासून पूर्ण अलिप्त असते.
- ती एक वॉचडॉग म्हणून काम करते.
- लोकायुक्त संस्था गैरकृत्य करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करता येईल इतपत पुरेशी माहिती ज्यामध्ये अंतर्भूत आहे अशा साध्या पेपरवर किंवा पोस्ट कार्डवर पाठवलेल्या नागरिकांच्या तक्रारींची किंवा पत्रांची दखल घेऊन येथोचित चौकशी करते.
- सदर संस्था त्यांना सत्वर आणि किफायतशीर उपाय किंवा न्याय मिळून देण्यासाठी मदत करते.
- लोकायुक्त संस्थेकडून तक्रारींचे अन्वेषण गोपनीय पद्धतीने केले जाते.
- कोणत्याही न्यायालयाला लोकायुक्तास किंवा कोणत्याही लोकसेवाकास त्यांनी पुरावा म्हणून गोळा केलेली माहिती किंवा अशा प्रकारे नोंदवलेला पुरावा दाखल करण्याची सक्ती करण्याचा हक्क नसतो.
- लोकायुक्त व उपलोकायुक्त त्यांच्या कामकाजाचा वार्षिक एकत्रित अहवाल राज्यपालांना सादर करतात. जो की नंतर दोन्ही विधिमंडळाच्या सभागृहासमोर ठेवला जातो.

### ✻ आतापर्यंतचे लोकायुक्त :

| क्र. | नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| 1) | न्या. सो. पे. कोतवाल | 1972–1977 |
| 2) | न्या. आ. रा. शिंपी | 1978–1979 |
| 3) | न्या. ना. दा. कामत | 1979–1984 |
| 4) | न्या. व्य. श्री. देशपांडे | 1984–1989 |
| 5) | न्या. प्र. श्री. शाह | 1989–1994 |
| 6) | न्या. ह. ही. कंथारिया | 1994–1998 |
| 7) | न्या. वि. प. टिपणीस | 1999–2003 |
| 8) | न्या. गुलाबराव वदे | 2004–2009 |
| 9) | न्या. पुरूषोत्तम गायकवाड | 2009–2014 |
| 10) | न्या. म. ल. टहलीयानी | 2015–2020 |
| 11) | संजय भाटिया | 2020 पासून |

Dilip Sir's STEP UP Academy

# 3.1 राज्य विधीमंडळ (States Legislature)

- **राज्यघटनेतील तरतुदीनुसार** : केंद्र आणि घटक राज्यांमध्ये संसदीय शासन प्रणाली (Parliamentary form of government) आहे.

**※ घटक राज्याचे कार्यकारी (Executives) मंडळ : भाग 6, कलम 153 ते 167**

- यामध्ये राज्यपाल (Governor), मुख्यमंत्री (CM), मंत्रिमंडळ आणि राज्याचा महाधिवक्ता (Advocate General) यांचा समावेश होतो.

**राज्यपाल**

- राज्यपाल हे राज्याचे घटनात्मक प्रमुख (Constitutional Head) किंवा नामधारी प्रमुख (Nominal Head) असतात.
- कलम 153 : प्रत्येक राज्यास एक राज्यपाल असेल. (7 वी घटनादुरुस्ती 1956 : एकच व्यक्ती दोन किंवा अधिक राज्यांसाठी राज्यपाल असू शकते.)
- कलम 155 : राज्यपालांची नेमणूक राष्ट्रपती करतील. (Appointed by President of India)
- 1979 सालच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार : राज्यपाल हे केंद्र शासनाच्या अधिनस्त असलेला रोजगार नाही. ते एक स्वतंत्र घटनात्मक पद असून ते केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली किंवा अधिनस्त कार्य करीत नाही.
- नेमणूक पद्धती : कॅनडाकडून स्वीकारली आहे. (अमेरिकेत गव्हर्नर थेट निवडा जातो).

- **पात्रता (Qualification)** : अ) ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.
  ब) त्याने वयाची 35 वर्षे पूर्ण केली असावी.
- **इतर संकेत (Conventions)** : ती स्थानिक राजकारणापासून अलिप्त असावी. (राज्याबाहेरील व्यक्ती असावी)
- राज्यपालाची नियुक्ती करताना राष्ट्रपती संबंधीत राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी विचारविनिमय करेल.
- **कार्यकाल** : अ) नेमणूक झाल्यापासून पाच वर्षे ते कार्य करतील.
  ब) 'राष्ट्रपतींची मर्जी' असेपर्यंत पद धारण करतात. (राष्ट्रपतींच्या मर्जीविरोधात न्यायालयात जाऊ शकत नाही.)
  क) राजीनामा : राष्ट्रपतींना उद्देशून सादर करतात.
  ड) कार्यकाल संपल्यानंतरही आपला उत्तराधिकारी पदग्रहण करेपर्यंत ते पदावर राहू शकतात.

- **शपथ (Oath)** : कलम 159 मध्ये नमूद आहे.
- राज्यपाल पुढीलप्रमाणे शपथ घेतात :

1) तो पदाची कार्ये प्रामाणिकपणे पार पाडील.
2) तो राज्यघटना आणि कायदे यांचे जतन व संरक्षण करील.
3) तो राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी व सेवेसाठी समर्पित वृत्तीने कार्य करील.

- संबंधित राज्याच्या उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपलब्ध असलेला सर्वांत वरिष्ठ न्यायाधीश राज्यपालाला शपथ देतात.
- **इतर नेमणूकीबाबत** :
- यांची पुनर्नेमणूक (Reappointment) होऊ शकते (त्याच किंवा इतर राज्यामध्ये)
- राष्ट्रपती एका राज्यपालांची बदली त्याच्या उर्वरित पदावधीसाठी दुसऱ्या राज्याचा राज्यपाल म्हणून करू शकतात.
- राष्ट्रपती घटनेत तरतूद नसलेल्या कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत (In emergency condition) राज्यपालाची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक तरतूद करू शकतात.

**※ हंगामी राज्यपाल :**

- राज्यपाल पदावरील व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याची कार्ये पार पाडण्यासाठी संबंधीत राज्याच्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाची नेमणूक हंगामी राज्यपाल म्हणून केली जाऊ शकते.
- **पदाच्या शर्ती (Conditions)**
- कलम 158 मध्ये राज्यपालपदाच्या शर्ती नमूद आहेत.

अ) राज्यपाल खासदार/आमदार असणार नाही. या पदावर असलेली व्यक्ती राज्यपाल म्हणून नियुक्त झाल्यास त्याने पदग्रहण केल्यापासून त्याचे खासदार/आमदार हे पद रिक्त होईल.
ब) राज्यपाल अन्य लाभाचे पद धारण करणार नाही.
क) संसदेने ठरवलेल्या कायद्यानुसार पगार, भत्ते आणि विशेषाधिकार त्यांना प्राप्त होतील.
ड) एकच व्यक्ती दोन/अधिक राज्यांचा राज्यपाल असेल तर त्याचे वेतन राष्ट्रपती ठरवून त्या प्रमाणात विभागणी करतील.

- **राज्यपालांचे विशेषाधिकार (Special Power of Governor)** :

- राज्यपाल आपल्या अधिकारांच्या वापराबाबत आणि कर्तव्य पालनाबद्दल कोणत्याही न्यायालयास उत्तरदायी असणार नाही. (पदावधी दरम्यान आणि पदावधी संपल्यानंतरही)
- राज्यपाल पदावर असताना त्यांच्या विरोधात फौजदारी कारवाई (Criminal case) केली जाऊ शकत नाही किंवा त्यांच्या कार्यकालादरम्यान अटकेसाठी न्यायालय आदेश काढू शकत नाही. (A. 361)

**राज्यपालाचे अधिकार व कार्ये**

* **राष्ट्रपतींसारखेच अधिकार** : कार्यकारी, कायदेविषयक, आर्थिक आणि न्यायिक अधिकार.
- राष्ट्रपतींना असलेले परंतू राज्यपालांना नसलेले अधिकार : परराष्ट्र व्यवहारविषयक, लष्करी आणि आणीबाणीविषयक अधिकार. (No diplomatic, military or emergency powers)

**1) कार्यकारी अधिकार (Executive Powers) :**

- राज्य शासनाचा सर्व कारभार राज्यपालांच्या नावे चालतो.
- राज्यपालांच्या नावाने काढलेले व अंमलात आणलेले आदेश (Orders) कोणत्या पद्धतीने काढावेत याचे नियम राज्यपाल तयार करू शकतात.
- राज्य शासनाचे कामकाज अधिक सुलभतेने चालण्यासाठी आणि हे कामकाज मंत्र्यांमध्ये वाटून देण्यासाठी तो नियम तयार करू शकतो.
- ते मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांची नियुक्ती करतात. छत्तीसगड, झारखंड, ओडिशा आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये एका आदिवासी कल्याण मंत्र्याची (Tribal welfare minister) नेमणूक करतील (94 वी घटनादुरुस्ती, 2006 नुसार बिहार वगळले त्याऐवजी झारखंड व छत्तीसगढ जोडले.)
- ते महाधिवक्ताची (Advocate General of State) नेमणूक करतात. तसेच त्याचे पगार व भत्ते ठरवतात. राज्यपालांच्या मर्जीने महाधिवक्ता हे पद धारण करतात.
- राज्य निवडणूक आयुक्तांची (State election commission) नेमणूक राज्यपाल करतात. (परंतु त्यास पदावरून दूर करावयाचे असल्यास उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून दूर करण्याची पद्धतीनुसारच असे करता येते).
- राज्य लोकसेवा आयोगाच्या (MPSC) अध्यक्ष आणि सदस्यपदी सदस्यांची नियुक्ती राज्यपाल करतात.
  (बडतर्फीचा अधिकार : राष्ट्रपतींचा)
- मुख्यमंत्र्यांकडून राज्यशासनाच्या कामकाजाच्या प्रशासनाबाबत कोणतीही माहिती राज्यपाल मागवू शकतात.
- राज्यपाल मुख्यमंत्र्याला एखाद्या मंत्र्याने एकट्याने घेतलेला निर्णय मंत्रीमंडळासमोर विचारार्थ ठेवण्यासाठी सांगू शकतात.
- राज्यात राष्ट्रपती राजवट (Presidential rule) लागू करण्याबाबत राज्यपाल राष्ट्रपतींना शिफारस करू शकतात.
- राज्यपाल विद्यापीठाचे कुलपती (Chancellor) म्हणून कार्य करतात तसेच ते विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या (Vice-Chancellors) नेमणूका करतात.

**2) कायदेविषयक अधिकार (Legislative Powers)**

- राज्याच्या विधिमंडळाचे अधिवेशन बोलावणे आणि अधिवेशनास स्थगिती (Prorogue) देणे तसेच मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार विधानसभा विसर्जित (Dissolve) करण्याचा अधिकार राज्यपालांना आहे.
- ● राज्यपाल राज्यविधिमंडळासमोर (State Legislative Assembly) अभिभाषण करतात :
  1) जेव्हा सार्वत्रिक निवडणूकीनंतर (State general election) पहिल्यांदा अधिवेशन भरते आणि
  2) नवीन वर्षाच्या सुरूवातीला जेव्हा पहिले अधिवेशन (First session of each year) सुरू होते.
- विधिमंडळातील प्रलंबित विधेयकाबाबत किंवा इतर कोणत्याही बाबीबद्दल संदेश पाठवू शकतात.
- विधानपरिषद/विधानसभा (SLA/SLC) अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदे **रिक्त झाल्यास** (Vacant) कामकाज चालवण्यासाठी राज्यपाल सभागृहातील कोणत्याही व्यक्तीस राज्यपाल या पदावर नियुक्त करतील.
- विधान परिषदेवर (SLC) **साहित्य, विज्ञान, कला, सहकार चळवळ आणि सामाजिक सेवा** (Literature, science, at, cooperative movement and social service) या क्षेत्रातील विशेष ज्ञान असणाऱ्या व्यक्तींची राज्यपाल विधानपरिषदेवर नियुक्ती (Appintment) करतात. ही संख्या एकूण सदस्य संख्येच्या 1/6 एवढी असते.
- राज्यपाल विधानसभेवर एका अँग्लो-इंडियन समाजातील व्यक्तिची नियुक्ती (Appintment) करू शकतात.
- विधिमंडळातील सदस्यांच्या अपात्रतेबाबत (Disqualification) राज्यपाल निवडणूक आयोगाच्या सल्ल्याने निर्णय घेतात.
- काही विधेयके सभागृहात मांडण्यासाठी राज्यपालांची पूर्व परवानगी आवश्यक असते.

- **राज्य विधिमंडळाने एखादे विधेयक संमत करून राज्यपालांकडे पाठवल्यानंतर ते : (A 200 नुसार)**

  अ) विधेयकास मान्यता देतील. (Give his assent to the bill) किंवा

  ब) विधेयकास मान्यता देणे राखून ठेवतील. (Withhold his assent to the bill) किंवा

  क) विधेयक विधिमंडळाकडे पुनर्विचारासाठी (Reconsideration) पाठवतील. (अपवाद : धन विधेयक (Money bill))

- राज्यविधिमंडळाकडे पुनर्विचारासाठी आलेले विधेयक सुधारणेसह किंवा सुधारणेविना परत राज्यपालांकडे आल्यास अशा वेळी राज्यपालांना यावर सही करावीच लागते.

  ड) ते विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेऊ शकतात. (Reserve the bill for the consideration of the president) (जर राज्याचे विधेयक उच्च न्यायालयाच्या स्थितीमध्ये बदल घडवून आणणारे असेल तर अशा वेळी राज्यपाल हे विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवतातच)

- या व्यतिरिक्त जर विधेयकाचे स्वरूप खालील प्रकारचे असेल तर राज्यपाल ते राखून ठेऊ शकतात.

अ) जर ते घटनेतील तरतूदींच्या विरुद्ध म्हणजेच घटनाबाह्य स्वरूपाचे असेल. (Against the provisions of the constitution)

ब) राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या विरोधी असेल. (Opposed to the DPSP)

क) देशाच्या व्यापक हिताच्या विरोधी असेल. (Against the larger interest of the country)

ड) राष्ट्राच्या दृष्टीने गंभीर महत्त्वाच्या विषयाबाबत असेल. (Of grave national importance)

इ) घटनेच्या कलम 31ए अंतर्गत मालमत्तेचे सक्तीने अधिग्रहण करण्याबाबत असेल. (Compulsory acquisition of property)

- राज्यपालांद्वारे राज्य वित्त आयोग (Finance commission), राज्य लोकसेवा आयोग (MPSC) यांचे अहवाल तसेच नियंत्रक व महालेखापाल (CAG) यांचा राज्याशी संबंधीत लेखा अहवाल राज्य विधिमंडळासमोर मांडला जातो.

**3) राज्यपालांच्या अध्यादेशाबाबत (Ordinance) :**

- राज्यपालांना अध्यादेश (Ordinance) काढण्याचे अधिकार आहेत. (जेव्हा राज्यविधिमंडळाचे अधिवेशन सुरू नसेल तेव्हा, परंतु अध्यादेश लागू झाल्यानंतर पुढील 6 महिन्याच्या आत असा कायदा विधिमंडळात संमत करावा लागतो, अन्यथा तो रद्द होतो.)
- अधिवेशन सुरू झाल्यानंतर 6 आठवड्यांचा कालावधी संपल्यावर अध्यादेश लागू राहत नाही. तोपर्यंत असा अध्यादेश विधिमंडळासमोर संमत करून घ्यावा लागतो.

- **खालील तीन परिस्थितीत अध्यादेश काढण्यासाठी राष्ट्रपतींचा आदेश गरजेचा असतो :**

1) राष्ट्रपतींची पूर्व परवानगी असल्याशिवाय ज्या तरतूदी असलेले विधेयक राज्य विधिमंडळात सादर करता येत नाही, अशा तरतूदी असलेला अध्यादेश.
2) जर राज्यपालांना अशा तरतूदी असलेले विधेयक पुन्हा राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवणे आवश्यक वाटत असेल तर अशा तरतूदी असलेला अध्यादेश.
3) जर अशा तरतूदी असलेला कायदा राष्ट्रपतींच्या मान्यतेशिवाय अवैध (Invalid) ठरला असेल तर अशा तरतूदी असलेला अध्यादेश.

**4) वित्तीय अधिकार (Financial Powers)**

- अर्थ विधेयक (अर्थ संकल्प) केवळ राज्यपालांच्या पूर्व संमतीनेच सभागृहात मांडता येते.
- राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर होईल, हे राज्यपाल सुनिश्चित करतात.
- त्यांच्या शिफारशीशिवाय अनुदानाची मागणी (Demand for a grant) करता येत नाही.
- आकस्मिक खर्चासाठी (Unforseen expenditure) तो राज्याच्या संचित निधीतून (Contingency fund of state) आगाऊ रक्कम देऊ शकतो.
- पंचायती आणि नगरपालिका यांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी राज्यपाल दर पाच वर्षांनी राज्य वित्त आयोगाची (State Finance Commission) स्थापना करतात.

**5) न्यायिक अधिकार (Judicial Powers) :**

- संबंधित राज्याच्या उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती करताना राष्ट्रपती त्यांच्याशी विचारविनिमय करतो.
- राज्यपाल राज्य उच्च न्यायालयाच्या सल्ल्याने जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती करतात.
- राज्यपाल उच्च न्यायालय आणि राज्य लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करून (जिल्हा न्यायाधीश वगळता) राज्यातील न्यायिक सेवांमध्ये (Judicial services) नियुक्ती करतात.

Dilip Sir's STEP UP Academy

- राज्यपालास राज्याच्या कार्यकारी अधिकाराच्या व्याप्तीमध्ये येणाऱ्या कोणत्याही कायद्याविरुद्ध अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आलेल्या व्यक्तिच्या शिक्षेत सूट, सवलत किंवा माफी किंवा स्थगिती किंवा शिक्षेचे स्वरूप बदलणे किंवा कालावधी कमी करणे इ. बदल करू शकतो. (He can pardon, reprieve, respite, remit, suspend or commute the punishment) या अधिकारात राज्यपाल देहदंड (फाशी) च्या शिक्षेला माफी देऊ शकत नाही. (he can not pardon or death sentence) तसा अधिकार फक्त राष्ट्रपतींनाच असेल.

**राज्यपालांचे घटनात्मक स्थान (Constitutional Position of Governer)**

- कलम 154 : राज्याचे कार्यकारी अधिकार राज्यपालांच्या हाती असतील आणि ते प्रत्यक्षपणे किंवा दुय्यम अधिकाऱ्यांच्याद्वारे राज्यघटनेनुसार ते वापरतील.
- कलम 163 : राज्यपालांना आपली कार्ये पार पाडण्यासाठी घटनेने प्रदान केलेले स्वेच्छाधीन कार्ये (Discretion work) वगळता, सहाय्य व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली एक मंत्रीमंडळ असेल.
- राज्यपालांचे एखादे कार्य विवेकाधिकारात (Discretionory power) येते किंवा नाही, असा प्रश्न उपस्थित झाल्यास राज्यपालांचा निर्णय अंतिम असतो आणि याबाबत कोठेही प्रश्न उपस्थित करता येत नाही. (कलम 163(2) नुसार)
- मंत्र्यांनी राज्यपालास सल्ला दिला होता काय आणि कोणता सल्ला दिला होता याबाबत कोणत्याही न्यायालयात चौकशी करता येणार नाही.
- कलम 164 : मंत्रिमंडळ सामूहिकरित्या (Collectively responsible) विधानसभेला जबाबदार असते तर वैयक्तिक मंत्री राज्यपालास जबाबदार असतात.
- **राज्यपालांची घटनात्मक स्थिती राष्ट्रपतींच्या स्थितीपेक्षा पुढील बाबतीत भिन्न ठरते.**

1) घटनेमध्ये राज्यपालास गरज वाटल्यास स्वविवेकानुसार (Discretion) कृती करण्याची शक्यतेची तरतूद केलेली आहे. मात्र अशी शक्यता राष्ट्रपतींसाठी नाही.
2) 42 व्या घटनादुरुस्तीने मंत्र्यांचा सल्ला (Advise) राष्ट्रपतींवर बंधनकारक (Binding) करण्यात आला आहे, परंतु असे बंधन राज्यपालांच्या बाबतीत केलेले नाही.

**❊ राज्यपालांचे घटनात्मक स्वेच्छाधीन अधिकार (Constitutional Discretion)**

- एखादे विधेयक राष्ट्रपतींसाठी राखून ठेवणे. (Reserve a bill for the consideration of president)
- राज्यात राष्ट्रपती राजवट (Presidents rule) लागू करण्याबाबत राष्ट्रपतींना शिफारस करणे.
- अतिरिक्त कार्यभार असताना लगतच्या संघराज्य प्रदेशाची प्रशासनिक कार्ये (Administrative work for UT) करणे.
- राज्याच्या प्रशासकीय व कायदेविषयक बाबींसंबधीची माहिती मुख्यमंत्र्यांकडून मागणे.
- आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोरम या राज्यांच्या शासनांना खनिज उत्पादनाच्या परवान्यातून मिळणाऱ्या रॉयल्टीमधून (स्वामित्व हक्क) काही हिस्सा स्वायत्त आदिवासी जिल्हा परिषदांना (Autonomous Tribal District Councils) देण्याबाबत रक्कम ठरवणे. (याबाबत काही वाद उद्‌भवल्यास त्यावर स्वेच्छा निर्णय देण्याचा अंतिम अधिकार राज्यपालांचा असेल.)

**❊ राज्यपालांचे प्रासंगिक स्वेच्छाधिकार (Situational discretion) :**

- सार्वजनिक निवडणूकीनंतर कोणत्याही पक्षास बहुमत नसेल तर मुख्यमंत्र्यांची नेमणूक करताना किंवा मुख्यमंत्र्यांचा अचानक मृत्यू झाल्यास आणि कोणताही स्पष्ट उत्तराधिकारी नसल्यास नवीन मुख्यमंत्र्यांची नेमणूक करताना.
- बहुमत नसलेले मंत्रीमंडळ पदच्यूत करण्याबाबत. (Dismissal of the council of ministers when it can not prove the majority)
- मंत्रीमंडळाने विधानसभेचा विश्वास गमावल्यास विधानसभा बरखास्त करणे. (Dissolution of state assembly)

**राज्यपालांच्या विशेष जबाबदाऱ्या (Special responsibilities)**

- राष्ट्रपतींनी दिलेल्या आदेशानुसार काही विशेष जबाबदाऱ्या पार पाडणे हे राज्यपालांचे काम आहे.
- यासाठी ते मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळाशी विचारविनिमय करतील मात्र अंतिम निर्णय विवेकबुद्धीने घेण्याचा अधिकार त्यांना असेल.
- कलम 371 : विदर्भ आणि मराठवाड्यासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची (Seperate development boards) स्थापना (महाराष्ट्र)

Dilip Sir's STEP UP Academy

- सौराष्ट्र आणि कच्छसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची (Seperate development boards) स्थापना (गुजरात)
- कलम 371A : नागा हिल्स आणि तूएनसंग क्षेत्रात अंतर्गत अशांतता (Internal disturbance) आहे तोपर्यंत कायदा आणि सुव्यवस्थाबाबत (With respect to law and order) तरतूदी करणे (नागालँड)
- कलम 371B : आदिवासी क्षेत्रातील प्रशासनाबाबत तरतुदी करणे. (आसाम) (Administration of Tribal Area)
- कलम 371C : राज्यातील डोंगराळ प्रदेशाच्या प्रशासनाबाबत तरतुदी करणे. (मणिपूर) (Administration of Hill Area)
- कलम 371D : आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यातील स्थानिक लोकांना रोजगार आणि शिक्षणाच्या हक्कांबाबत (It safeguards the right of local people in employment and education)
- कलम 371E : आंध्र प्रदेश राज्यामध्ये केंद्रीय विद्यापीठांची स्थापना करण्याबाबत.
- कलम 371F : सिक्कीम राज्यात शांतता आणि जनतेच्या विविध गटांचा सामाजिक-आर्थिक विकास सुनिश्चित करण्याबाबत तरतूदी करणे.
- कलम 371G : मिझोरम राज्यातील प्रशासनाबाबत.
- कलम 371H : अरुणाचल प्रदेश राज्यातील कायदा व सुव्यवस्था याशी संबंधित तरतूदी.
- कलम 371I : गोवा राज्याबाबत विशेष तरतूदी (गोवा विधानसभेतील सदस्य संख्या : 30 पेक्षा कमी नसेल).
- कलम 371J : कर्नाटक-हैदराबाद-कर्नाटक प्रदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची (Seperate development board) स्थापना करण्याचे अधिकार कर्नाटकच्या राज्यपालांना असतील.
- वरीलपैकी कलम 371D, 371E,371G आणि 371I यामधील विशेष तरतुदी या राज्यपालांच्या स्वेच्छाधिन अधिकारांमध्ये येत नाहीत.

**राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्या नकाराधिकारांची तुलना**

| **राष्ट्रपती** | **राज्यपाल** |
|---|---|
| **अ) सामान्य विधेयकासंदर्भात (Ordinary bill)** | |
| 1) ते मान्यता देतील. किंवा<br>2) ते मान्यता राखून ठेवतात. किंवा<br>3) ते पुनर्विचारासाठी सभागृहाकडे परत पाठवू शकतात. परंतु पुनर्विचारानंतर पुन्हा त्यांच्याकडे विधेयक आले तर त्यांना मान्यता द्यावीच लागते. | 1) ते मान्यता देतील. किंवा<br>2) ते मान्यता रोखून ठेवतात. किंवा<br>3) ते पुनर्विचारासाठी सभागृहाकडे परत पाठवू शकतात.<br>परंतु पुनर्विचारानंतर पुन्हा त्यांच्याकडे विधेयक आले तर त्यांना मान्यता द्यावीच लागते.<br>4) ते विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवू शकतात. |
| जर राज्याचे विधेयक जेव्हा राज्यपाल राष्ट्रपतींच्या संमतीसाठी राखून ठेवले जाते तेव्हा राष्ट्रपती -<br>1) मान्यता देतील. किंवा पुनर्विचारासाठी<br>2) मान्यता राखून ठेवतील. किंवा<br>3) ते पुनर्विचारासाठी राज्य विधीमंडळाकडे पाठवतील. असे विधेयक परत आल्यावर गृहांनी सहा महिन्यांत त्यावर पुनर्विचार केला पाहिजे. विधीमंडळाने ते विधेयक दुरुस्त केले किंवा आहे तसे परत राष्ट्रपतींकडे आले तर राष्ट्रपतींनी त्यास मान्यता देणे राष्ट्रपतींवर बंधनकारक नसते. (म्हणजेच ते मान्यता देतील किंवा राखून ठेवतील.) | राज्यपालांनी जर एखादे विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवले तर त्या प्रक्रियेमध्ये राज्यपालांची भूमिका संपूष्टात येते. ते विधेयक जर राष्ट्रपतींनी विधीमंडळाकडे पाठवले आणि विधीमंडळाने पुन्हा संमत केले तरी त्यावर राज्यपाल विचार करणार नाही. ते विधेयक राष्ट्रपतींकडेच जाईल. |
| **राष्ट्रपती** | **राज्यपाल** |
| **ब) अर्थ विधेयकाबाबत (Money bill)** | |
| 1) ते मान्यता देतील. किंवा<br>2) ते मान्यता राखून ठेवतात. | 1) ते मान्यता देतील. किंवा<br>2) ते मान्यता रोखून ठेवतात. किंवा<br>3) ते विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवू शकतात. |
| जर राज्याचे अर्थ विधेयक राष्ट्रपतींसाठी राखीव ठेवले असेल तर राष्ट्रपती<br>1) मान्यता देतील. किंवा<br>2) मान्यता राखून ठेवतात. | |

Dilip Sir's STEP UP Academy

**क) घटनादुरुस्ती विधेयक (Constituional amend ment bill)**

| **राष्ट्रपती** | **राज्यपाल** |
|---|---|
| 1) राष्ट्रपतींना मंजूरी द्यावीच लागते. (24 वी घटनादुरुस्ती) | राज्यपालांकडे याबाबत काही अधिकार नाही. |

**महाराष्ट्राचे आत्तापर्यंच्या राज्यपालांची यादी**

| No. | Name | Took Office | Left Office |
|---|---|---|---|
| 1 | John Colville, PC, GCIE | 1943 | 1948 |
| 2 | Raja Sir Maharaj Singh, CIE | 1948 | 1952 |
| 3 | Sir Girija Shankar Bajpai, KCSI, KBE, CIE | 1952 | 1954 |
| 4 | Dr Harekrushna Mahatab | 1955 | 1956 |
| 5 | Sri Prakasa | 1956 | 1962 |
| 6 | Dr P. Subbarayan | 17 April 1962 | 6 October 1962 |
| 7 | Vijaya Lakshmi Pandit | 28 November 1962 | 18 October 1964 |
| 8 | Dr P V Cherian | 14 November 1964 | 8 November 1969 |
| 9 | Ali Yavar Jung | 26 February 1970 | 11 December 1976 |
| 10 | Sri Sadiq Ali | 30 April 1977 | 3 November 1980 |
| 11 | Air Chief Marshal O P Mehra | 3 November 1980 | 5 March 1982 |
| 12 | Air Chief Marshal I H Latif | 6 March 1982 | 16 April 1985 |
| 13 | Kona Prabhakara Rao | 31 May 1985 | 2 April 1986 |
| 14 | Dr.Shankar Dayal Sharma | 3 April 1986 | 2 September 1987 |
| 15 | Kasu Brahmananda Reddy | 20 February 1988 | 18 January 1990 |
| 16 | Dr.C Subramaniam | 15 February 1990 | 9 January 1993 |
| 17 | Dr.P.C. Alexander | 12 January 1993 | 13 July 2002 |
| 18 | Mohammed Fazal | 10 October 2002 | 5 December 2004 |
| 19 | S.M. Krishna | 12 December 2004 | 5 March 2008 |
| 20 | S.C. Jamir | 9 March 2008 | 22 January 2010 |
| 21 | Kateekal Sankaranarayanan | 22 January 2010 | 24 August 2014 |
| 22 | Chennamaneni Vidyasagar Rao | 30 August 2014 | 4 September 2019 |
| 23 | Bhagat Singh Koshyari | 5 September 2019 | Present |

**❊ दृष्टिक्षेपात संसदेसंबंधित कलमे :**

| **कलम** | **विषय** |
|---|---|
| 153 | राज्यपाल |
| 154 | राज्याचे कार्यकारी अधिकार |
| 155 | राज्यपालाची नियुक्ती |
| 156 | राज्यपालाचा कार्यकाल |
| 157 | राज्यपाल नियुक्तीचे पात्रता निकष |
| 158 | राज्यपालपदाच्या अटी |
| 159 | राज्यपालाची शपथ/प्रतिज्ञा |
| 160 | काही आकस्मिक परिस्थितीमध्ये राज्यपालाने करावयाची कामे |
| 161 | माफी संबंधित राज्यपालाचे अधिकार |
| 162 | राज्याच्या कार्यकारी अधिकारांची व्याप्ती |
| 163 | राज्यपालाला सल्ला देण्यासाठी व साहाय्य करण्यासाठी मंत्रिमंडळ |
| 164 | मंत्र्यांची नियुक्ती, कार्यकाल, वेतन आणि तत्सम तरतुदी. |
| 165 | भारताचा महाधिवक्ता |
| 166 | राज्याच्या शासनाचे कामकाज चालविणे. |
| 167 | राज्यपालाला माहिती पुरविण्याबाबत मुख्यमंत्र्याची कर्तव्ये व तत्सम बाबी. |
| 174 | राज्य विधिमंडळाची अधिवेशने संस्थगित ठेवणे व विसर्जित करणे. |

Dilip Sir's STEP UP Academy

| | |
|---|---|
| 175 | राज्य विधिमंडळाच्या गृहाला/गृहांना संबोधित करण्याचा आणि त्यांना निरोप पाठविण्याचा राज्यपालाचा अधिकार |
| 176 | राज्यपालाचे विशेष अभिभाषण |
| 200 | विधेयकांना मान्यता (राज्य विधिमंडळाने संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालाची मान्यता) |
| 201 | राज्यपालाने राष्ट्रपतीच्या विचारार्थ विधेयक राखून ठेवणे. |
| 213 | अध्यादेश जारी करण्याचा राज्यपालाचा अधिकार |
| 217 | उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत राष्ट्रपतीचा राज्यपालाबरोबर विचारविनिमय |
| 233 | राज्यपालाद्वारा जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती. |
| 234 | राज्यपालाद्वारा जिल्हा न्यायाधीश सोडून राज्याच्या न्यायिक सेवांमध्ये नियुक्ती. |

***

Dilip Sir's STEP UP Academy

## मुख्यमंत्री

- मुख्यमंत्री : शासन प्रमुख (Head of the Government)
- राज्यपाल : राज्यप्रमुख (Head of the State)
- कलम 163 : राज्यपालास कार्ये पार पाडण्यासाठी सहाय्य व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली एक मंत्रीमंडळ असेल. (घटनेने प्रदान केलेले स्वेच्छाधिन अधिकार वगळता.)
- **मुख्यमंत्री** : कार्यकारी विभागाचा वास्तविक प्रमुख (Real head of executive department)
- नियुक्ती : कलम 164 नुसार राज्यपाल मुख्यमुत्र्यांची नेमणूक करतील.

- **मुख्यमंत्र्यांच्या नेमणूकीबाबत :**

1) राज्यपाल ज्या पक्षाचे विधानसभेत बहुमत (Majority) आहे, त्या पक्षाच्या नेत्यास मुख्यमंत्री पदावर नियुक्त करतील.
2) जेव्हा कोणत्याही पक्षास बहुमत नसेल तर ज्या पक्षास विधानसभेत सर्वाधिक जागा मिळालेल्या पक्षाच्या किंवा युतीच्या नेत्यास राज्यपाल मुख्यमंत्री पदावर नियुक्त करू शकतात. (अशा वेळी पुढील एका महिन्याच्या आत विधानसभेत त्याने विश्वासदर्शक ठराव संमत करून घेणे आवश्यक असते).
3) विद्यमान मुख्यमंत्र्यांचे आकस्मिक निधन झाले आणि कोणी स्पष्ट उत्तराधिकारी नसेल तर अशा वेळी राज्यपाल परिस्थितीचे योग्य परीक्षण करून मा. मुख्यमंत्र्यांची निवड व नियुक्ती करतात.
   (सत्तारूढ पक्षाने जर नियुक्त केलेल्या व्यक्तीला आपला नेता मानले नाही तर मात्र त्यांनी निवडून दिलेल्या नेत्यास मुख्यमंत्री पदी नियुक्त करावे लागते).
4) मुख्यमंत्री नियुक्त करताना तो कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसला तरीही चालतो मात्र पुढील 6 महिन्यात त्यास कोणत्याही एका सभागृहाचे सदस्यत्व मिळवावेच लागते.
5) मुख्यमंत्री पदी नियुक्त होण्यापूर्वीच त्याने विधानसभेत बहुमत सिद्ध करावे असे घटनेत नमूद नाही. राज्यपाल अगोदर मुख्यमंत्र्यांची नियुक्ती करून नंतर मात्र योग्य कालावधीत विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यास सांगू शकतात.
6) मुख्यमंत्री हे कोणत्याही एका सभागृहाचे सदस्य असावे. शक्यतो मुख्यमंत्री विधानसभेतूनच निवडले जातात. परंतु काही वेळा ते विधानपरिषदेतून सुद्धा निवडले जाऊ शकतात.

- **शपथ** : मुख्यमंत्र्यांना पदग्रहण करण्यापूर्वी राज्यपाल पुढील शपथ देतात. :

1) भारताच्या राज्यघटनेप्रती खरी श्रद्धा व निष्ठा बाळगणे. (To bear true faith and allegiance to the Constituion of India)
2) भारताचे सार्वभौमत्व आणि अखंडता अबाधित राखणे. (Uphold the sovereignty and integrity of India)
3) पदाची कामे प्रामाणिकपणे व विवेकबुद्धीने (Faithfully and conscietiously) पार पाडणे.
4) सर्व प्रकारच्या लोकांप्रती घटनेनुसार व कायदेनुसार भयाने किंवा पक्षपात तसेच आकसाने किंवा प्रेमाने प्रेरित न होता योग्य व्यवहार करणे.

- मुख्यमंत्र्यांना/मंत्र्यांना एक पदाची शपथ तर दुसरी गोपनियतेची शपथ अशा दोन शपथा घ्याव्या लागतात.

- **कालावधी :**

- घटनेत निश्चित कालावधीची तरतूद नाही.
- राज्यपालांची मर्जी असेपर्यंत मुख्यमंत्री पद धारण करतात. (म्हणजेच जोपर्यंत मुख्यमंत्र्यांकडे विधानसभेत बहुमत (Majority) आहे, तोपर्यंत ते पदावर असतील).

## कार्ये :

**अ) मंत्रीमंडळाच्या संदर्भात**

1) मुख्यमंत्र्यांच्या शिफारशीनुसारच राज्यपाल इतर मंत्र्यांची नेमणूक करतात.
2) मंत्र्यांमध्ये खातेवाटप आणि फेरबदल करण्याबाबत (Allocates and reshuffles the portfolios among ministers)
3) एखाद्या मंत्र्यास राजीनामा देण्यास सांगू शकतात किंवा त्यास काढून टाकण्यास राज्यपालास सांगू शकतात.
4) मुख्यमंत्र्यांचा राजीनामा हा संपूर्ण मंत्रीमंडळाचा राजीनामा असतो.

**ब) राज्यपालांच्या संदर्भात** : अ) कलम 167 नुसार :

1) राज्याच्या कामकाजाबबत मंत्रीमंडळाचे सर्व निर्णय आणि कायद्याचे प्रस्ताव राज्यपालास कळवणे.
2) राज्यपालांनी मागवलेली माहिती देणे.
3) एखाद्या मंत्र्याने एकट्याने घेतलेला निर्णय राज्यपालांच्या सांगण्यानुसार मंत्रीमंडळासमोर विचारार्थ ठेवणे.

ब) महाधिवक्ता (Advocate general), राज्य लोकसेवा आयोगाचे (MPSC) अध्यक्ष व सदस्य, राज्य निवडणूक आयुक्त (State election commissioner) इ. महत्त्वाच्या पदांवरील नियुक्तीबाबत ते राज्यपालांना सल्ला देतात.

Dilip Sir's STEP UP Academy

**क) राज्य विधीमंडळाबाबत (State Legislature) :**

1) राज्य विधिमंडळाचे अधिवेशन बोलाविणे आणि बरखास्त करण्याबाबत राज्यपालांना सल्ला देतात.
2) ते कधीही राज्य विधानसभा विसर्जित करण्याची शिफारस करू शकतात.
3) विधिमंडळ सभागृहात सरकारची धोरणे घोषित करू शकतो.

**ड) इतर अधिकार** : ते राज्य नियोजन मंडळाचे (State planning commission) अध्यक्ष असतात.

- विभागीय परिषदेमध्ये (Zonal council) रोटेशन पद्धतीने ते एका वर्षासाठी उपाध्यक्ष असतात.
- ते पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील आंतरराज्य परिषद (Interstate council) आणि राष्ट्रीय विकास परिषदेचे (National development council) सदस्य असतात.

## राज्य मंत्रीमंडळ

- केंद्र शासनाप्रमाणेच राज्यामध्ये संसदीय प्रणाली व्यवस्था स्विकारलेली दिसते.

● **कलम 163** : राज्यपालास सहाय्य व सल्ला देण्यासाठी मंत्रीमंडळ कार्यरत असेल.

1) कलम 163(1) : राज्यपालास आपली कार्ये पार पाडण्यासाठी सहाय्य व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळ कार्यरत असेल (घटनेने प्रदान केलेले स्वेच्छाधिकार वगळता).
2) कलम 163(2) : जर एखादी बाब राज्यपालाच्या स्वेच्छाधिन अधिकारातील आहे की नाही असा प्रश्न उद्‌भवल्यास याबाबत राज्यपालांचा निर्णय अंतिम असेल. यावर कोठेही अपिल करता येणार नाही.
3) कलम 163(3) : मंत्र्यांनी राज्यपालास दिलेल्या सल्ल्याची चौकशी कोणत्याही न्यायालयात करता येणार नाही.

**✻ कलम 164 : मंत्र्यांच्या नियुक्तीबाबत तरतूदी (Appointment of Ministers) :**

● **कलम 164(1)** : राज्यपाल मुख्यमंत्र्यांची नेमणूक करतील आणि त्यांच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची नेमणूक करतील. हे मंत्री राज्यपालांची मर्जी असेपर्यंत पदावर असतील.
(94 वी घटनादुरुस्ती, 2006 नुसार छत्तीसगड, झारखंड, मध्य प्रदेश आणि ओडीशा या राज्यांमध्ये आदिवासी कल्याणासाठी एक मंत्री कार्यरत असेल.)

● **कलम 164(1A)** : राज्य मंत्रीमंडळातील मंत्र्यांची संख्या ही मुख्यमंत्र्यासहीत विधानसभेच्या सदस्य संख्येच्या 15% पेक्षा जास्त नसेल. परंतु छोट्या राज्यांमध्ये ही संख्या 12 पेक्षा कमी नसेल. (91 वी घटनादुरुस्ती, 2003).

● **कलम 164(1B)** : राज्यातील विधिमंडळातील कोणताही सदस्य जर पक्षांतर बंदी कायद्यांतर्गत सदस्य म्हणून अपात्र ठरविण्यात आला असेल तर तो मंत्री होण्यासुद्धा अपात्र ठरतो.

- मंत्रीमंडळ सामूहिकरित्या विधानसभेस जबाबदार असेल. मंत्र्यांचा कार्यकाल राज्यपालांच्या मर्जीवर अवलंबून असतो.
- राज्य विधिमंडळाचा सलग सहा महिने सदस्य नसलेला मंत्री पदावर राहणार नाही.
- मंत्री हा कोणत्याही गृहाचा सदस्य असू शकतो.
- मंत्र्यांचे वेतन व भत्ते राज्य विधिमंडळ ठरवेल.

**✻ मंत्रीमंडळाच्या सल्ल्याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निकाल**

- 1971 : विधानसभा विसर्जित झाल्यानंतर किंवा मंत्रिमंडळाने राजीनामा दिल्यानंतरही राज्यपालास सल्ला देण्यासाठी मंत्रिमंडळ अस्तित्वात असावेच. त्यामुळे नवे सरकार स्थापन होईपर्यंत जुनेच सरकार काळजीवाहू सरकार म्हणून कार्य करू शकते.
- 1974 : राज्यपालाचे स्वेच्छाधिकार वगळता इतर ठिकाणी त्यांना मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच वागावे लागेल. घटनेत जेथे राज्यपालांची मर्जी अशी तरतूद आहे तिथे राज्यपालांची वैयक्तिक मर्जी नसून त्यचा अर्थ मंत्रिमंडळाची मर्जी असाच होतो.

● **शपथ (Oath)** : मंत्र्यांना पदाची व गुप्ततेची शपथ दिली जाते. (मुख्यमंत्र्यांनाही अशा दोन शपथा असतात, मात्र मुख्यमंत्री म्हणून ते कोणतीही शपथ घेत नाही.)

● **सभागृहाबाबत मंत्र्यांचे अधिकार** : मंत्री चर्चेसाठी कोणत्याही सभागृहामध्ये उपस्थित राहू शकतात, परंतु ते ज्या सभागृहाचे सदस्य आहेत त्याच सभागृहामध्ये ते मतदान करतील.

**मंत्र्यांची सामूहिक जबाबदारी :**

**मंत्र्यांची व्यक्तिगत जबाबदारी :**

**मंत्र्यांवर कायदेशीर जबाबदारी नाही :**

● **मंत्रीमंडळाची रचना** : तीन प्रकारचे मंत्री : कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री आणि उपमंत्री

## राज्य विधिमंडळ (State Legislature)
## (भाग 6 : कलम 168–212)

● **कलम 168** : राज्य विधानमंडळ म्हणजेच राज्यपाल आणि विधिमंडळ (Governer and legislature)

- बहुतेक राज्यांमध्ये एकगृही विधिमंडळ पद्धती (Unicameral system) आहे. विधानपरिषद असलेली राज्ये – बिहार, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, आंध्रप्रदेश, तेलंगणा (जम्मू व काश्मीर : या राज्याच्या स्वतंत्र घटनेतील तरतूदीनुसार होती. 2019 मध्ये ही तरतूद रद्द.)

Dilip Sir's STEP UP Academy

- बाकी 22 राज्यांमध्ये एकगृही विधिमंडळ अस्तित्वात आहे.
- विधानसभा (Legislative Assembly) हे कनिष्ठ सभागृह (Lower house) तर विधानपरिषद (Legislative Council) हे वरिष्ठ सभागृह (Upper house) आहे.

### विधानपरिषद निर्मिती किंवा बरखास्ती करण्याबाबत

- **कलम 169 : (Creation or Abolition of Legislative Council)**
- असा अधिकार फक्त संसदेस आहे, यासाठी संसद कायदा करेल.
- त्याअगोदर संबंधीत राज्याच्या विधानसभेने विशेष बहुमताने विधानपरिषद निर्मिती किंवा बरखास्तीबाबत ठराव संमत करून संसदेकडे पाठवावा लागतो.
- असा ठराव संसदेवर बंधनकारक नसतो, तेथे तो नाकारलाही जाऊ शकतो. (परंतु राज्य विधानसभेच्या ठरावाशिवाय संसद याबाबत कायदा करू शकत नाही).
- याबाबत केलेला कायदा कलम 368 नुसार घटनादुरुस्ती मानली जाणार नाही. (म्हणजेच संसद असा कायदा साध्या बहुमताने मंजुर करेल).
- बिहार, उत्तर प्रदेश, कर्नाटक व महाराष्ट्र या राज्यांमध्ये राज्याची निर्मितीपासूनच विधानपरिषद अस्तित्वात आहे.

### विधानसभेची रचना

- **कलम 170 : (Composition of Legislative Assembly)**
- सदस्यसंख्या : किमान 60 तर कमाल 500 **(महाराष्ट्रामध्ये : 288)**
- परंतु अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, गोवा या राज्यांमध्ये किमान सदस्य संख्या 30 ठरवली आहे. तर मिझोरम आणि नागालँडमध्ये ती संख्या अनुक्रमे 40 व 46 आहे.
- सिक्कीम व नागालँड विधानसभांमध्ये काही सदस्य अप्रत्यक्षपणे (Indirectly) निवडले जातात. बाकी सर्व ठिकाणी निवडणूक ही **'सार्वत्रिक प्रौढ मताधिकारानुसार'** (Universal adult franchise) पद्धतीने होते.
- **नामनिर्देशित सदस्य** : (कलम 333) : जर अँग्लो-इंडियन-समाजास पर्याप्त प्रतिनिधित्व मिळाले नसेल तर राज्यपाल एका अँग्लो इंडियन व्यक्तिची नियुक्ती (Appointment) विधानसभेत करत असत. ही तरतूद 104 वी घटनादुरुस्ती, 2019 नुसार रद्द.

### ❊ प्रादेशिक मतदारसंघ (Territorial Constituencies)

- हे लोकसंख्या निकषावर बनवले जातात.
- यामध्ये साधारणपणे प्रत्येक उमेदवार हा समान लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतो.
- प्रत्येक जनगणनेनंतर पुर्नरचना (Reorganisation) :
- संसदेच्या कायद्याने निर्धारित केलेल्या प्राधिकाऱ्याकडून पुनर्रचना केली जाईल.
- घटनेत प्रत्येक जनगणनेनुसार पुढील दोन बाबींमध्ये पुनर्रचना करण्याची तरतूद आहे :

अ) बदललेल्या लोकसंख्येनुसार विधानसभांमधील जागांची संख्या बदलणे आणि

ब) नवीन संख्येनुसार विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना/परिसीमन करणे. (Delimitation Commission)

- वरील दोन्ही बदल करण्यासाठी संसद 'पुनर्रचना आयोग कायदा' (Delimitation Commission Act) संमत करून पुनर्रचना आयोग स्थापन करते. असे कायदे संसदेने 1952, 1962, 1972, 2002 साली केले होते.

**❊ याबाबतपुढील तरतुदी महत्त्वाच्या आहेत :**

- 42 वी घटनादुरुस्तीनुसार : विधानसभेची सदस्य संख्या आणि मतदार संघ रचना 2000 सालापर्यंत 1971 च्या जनगणनेनुसारच असेल.
- 84 वी घटनादुरुस्ती 2001 : यानुसार विधानसभेतील जागांची संख्या ही 2026 नंतरच्या जनगणनेचे आकडे प्राप्त झाल्यानंतरच वाढवली जाईल. मतदार संघाची पुनर्रचना मात्र 1991 च्या जनगणनेनुसार होईल.
- 87 वी घटनादुरुस्ती 2003 : यानुसार मतदार संघाची पुनर्रचना (Delimitation of constituencies) 2001 च्या जनगणनेच्या आधारावर करण्याचे निश्चित केले.

- **आरक्षण (Reservation) :**
- कलम 331 नुसार विधानसभेत अनु. जाती व अनु. जमाती यांना एकूण लोकसंख्येतील प्रमाणानुसार आरक्षण दिलेले आहे.
- 2008 च्या पुनर्रचनेनंतर महाराष्ट्र विधानसभेत अनु. जातींसाठी 29 तर अनु. जमातींसाठी 25 जागा राखीव आहेत.

(या अगोदर राज्यांमध्ये अनुसूचित जातींसाठी 18 तर अनुसूचित जमातींसाठी 22 जागा राखीव होत्या.)

Dilip Sir's STEP UP Academy

**विधानपरिषद (State Legislative Council) : कलम 171**

- सदस्य निवडणूक : अप्रत्यक्ष मतदान (Indirect election) पद्धती
- घटनेने सदस्यसंख्या किमान 40 आणि कमाल त्या राज्याच्या विधानसभेच्या सदस्यसंख्येच्या एक तृतियांश असेल असे नमूद केले आहे. (The max strength of the council is fixed at one third of the total strength of the assembly and minimum is fixed of 40.)
- या मर्यादादरम्यान विधानपरिषदेची प्रत्यक्ष सदस्य संख्या संसद ठरवते.

- **निवडणूक पद्धती (Manner of election) :**

- 5/6 सदस्य : निर्वाचित सदस्य (Elected)
- 1/6 सदस्य : नामनिर्देशित सदस्य (Nominated)
- विधानपरिषदेतील 5/6 सदस्य हे **एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीनुसार** (Proportional representation by means of a single transferable votes) निवडून येतात.

1) 1/3 : राज्याच्या विधानसभा सदस्यांकडून (Members of legislative assembly) (विधानसभा सदस्य नसलेल्या व्यक्तिंमधून)
2) 1/3 : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडून (By members of local bodies)
3) 1/12 : पदवीधर मतदार संघाकडून (By graduates)
4) 1/12 : शिक्षक मतदार संघाकडून (By teachers)
5) 1/6 : राज्यपाल साहित्य, विज्ञान, कला, सहकार चळवळ आणि समाजसेवा इ. क्षेत्रातील विशेष ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्तिंना नियुक्त करतात.
   (राज्यपालांनी नामनिर्देशन केलेल्या कृतीच्या प्रामाणिकतेबाबत कोणत्याही परिस्थितीत न्यायालयात आव्हान देता येत नाही)

- कलम 171 मधील विधानपरिषदेतील रचना (Composition of legislative council) ही अंतिम नाही. यात बदल करण्याचा संसदेला अधिकार आहे. परंतु यासाठी संसदेने असा काही कायदा केलेला नाही.
- महाराष्ट्र विधान परिषद रचना - 78 सदस्य
  1) विधान सभेकडून - 30.
  2) स्था. स्व. संस्था कडून - 22.
  3) शिक्षक - 7
  4) पदवीधर - 7
  5) राज्यवाल - 12

- पदवीधर मतदार संघ : भारतातील कोणत्याही विद्यापीठाचे किमान 3 वर्षे पदवीधर असलेल्या व त्या राज्यात निवासी असलेल्या व्यक्ती यात समाविष्ट होतात.
- शिक्षक मतदार संघ : संसदीय कायद्याने निश्चित केलेल्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संस्थांमध्ये किमान 3 वर्षे शिक्षकाचे काम केलेली व्यक्ती सात समाविष्ट होते. (प्राथमिक शिक्षकांना यात सहभागी होता येत नाही).

**कालावधी (Duration of House)**

**※ विधानसभा (State Assembly) :**

- सामान्य परिस्थितीत : पाच वर्षे

- इतर परिस्थितीत :

- राज्यपाल मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने विधानसभा विसर्जीत (Dissolve) करू शकतात. या निर्णयास न्यायालयात आव्हान देता येत नाही.
- राष्ट्रीय आणीबाणीवेळी (National emergency) विधानसभेचा कार्यकाल संसदीय कायद्याद्वारे एकाच वेळी एका वर्षाने (One year at a time) वाढवता येतो. (असा कितीही वेळा, आणीबाणी संपुष्टात आल्यानंतर 6 महिन्यांपेक्षा अधिक काळासाठी हा कालावधी वाढणार नाही.)

**※ विधानपरिषद (Council State) :**

- स्थायी सभागृह (Continuing chamer) असल्याने विसर्जन होत नाही.
- प्रत्येकी 1/3 सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त (Retire) होतात.

**राज्य विधिमंडळ सदस्यत्व (Membership of State Legislative)**

- **पात्रता :** 1) तो भारताचा नागरिक असावा.

2) विधानसभेसाठी कमीतकमी वय 25 वर्षे तर विधानपरिषदेसाठी कमीत कमी वय 30 वर्षे असावे.
3) संसदेचे वेळोवेळी ठरवून दिलेले निकष त्याने पुर्ण केलेले असावे.
4) त्याने निवडणूक आयोगाने यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला शपथपत्र सादर केले पाहिजे. या शपथपत्रात तो खालील शपथ घेतो.
   अ) तो भारताच्या राज्यघटनेशी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगील.
   ब) तो भारताच्या सार्वभौमतेचे आणि अखंडतेचे रक्षण करील.

- यानुसार संसदेने 'लोकप्रतिनिधी कायदा 1951' मध्ये पात्रता निकष दिलेले आहे.

1) विधानपरिषदेवर निवडून येणारी व्यक्तीची संबंधित राज्याच्या विधानसभा मतदारसंघात मतदार म्हणून नोंद असावी.
   राज्यपालाने नामनिर्देशन करण्यासाठी (Appoint) पात्र ठरविण्यासाठी ती व्यक्ती त्याच राज्याची निवासी असावी.

Dilip Sir's STEP UP Academy

2) विधानसभेत निवडून येणारी व्यक्ती संबंधित राज्यातील विधानसभा मतदार संघात मतदार म्हणून नोंद असावी.

3) SC/ST च्या आरक्षित जागांवर उमेदवार हा SC व ST मधूनच असावा. मात्र साधारण जागेवर SC व ST गटातील व्यक्तीसुद्धा निवडणूक लढवू शकतो.

- **अपात्रता (Disqualification) :** अपात्र ठरवण्याबाबतच्या तरतुदी :

1) घटनेतील कलम : 191 नुसार

2) लोक प्रतिनिधित्व कायदा 1951 नसुार

3) पक्षांतर बंदी कायद्यानुसार

- **खालील परिस्थितीत एखादी व्यक्ती विधिमंडळ सदस्य म्हणून निवडून येण्यास अपात्र ठरते – कलम 191 नुसार.**

1) त्या व्यक्तीने केंद्र/राज्यात लाभाचे पद (Office of profit) धारण केले आहे. (राज्यविधिमंडळाने सूट दिलेले पद/ मंत्रीपद वगळून).

2) जर ती व्यक्ती असंतुलीत मनाची आहे असा निष्कर्ष न्यायालयाने काढला. (If he is of unsound mind and stands so declare by a court)

3) जर तो दिवाळखोर असेल. (If he is an undischarged insolvent)

4) जर त्याने भारतीय नागरिकत्वाचा स्वेच्छेने त्याग केला असेल.

5) संसदेने केलेल्या कायद्यानुसार जर तो अपात्र ठरला असेल. (Disqualified under the any law made by parliament)

- कलम 191 नुसार आणि लोकप्रतिनिधी कायद्याबाबतचा अपात्रतेचा निर्णय राज्यपालांचा अंतिम निर्णय असेल. मात्र राज्यपाल यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सल्ल्यानुसारच निर्णय देतील.

**2) लोकप्रतिनिधी कायदा 1951 नुसार अपात्रता (Peoples Representation Act, 1951) :**

- संबंधित व्यक्ती निवडणूकांच्या भ्रष्ट व्यवहारात दोषी आढळली तर.
- संबंधित व्यक्ती दोन किंवा अधिक वर्षांच्या कैदेची शिक्षा होईल अशा गुन्ह्यात गुन्हेगार म्हणून सिद्ध झाली तर.
- निवडणूक आयोगाने नमूद केलेल्या कालावधीत निवडणूक खर्चाचे दरपत्रक (Accounts of his election expenses) सादर केले नाही तर.
- संबंधित उमेदवार सरकारी भाग किमान 25% असलेल्या निगमांमध्ये संचालक वा व्यवस्थापन प्रतिनिधी व अन्य लाभाच्या पदी असेल तर
- भ्रष्टाचार किंवा राजद्रोह (Corruption or disloyalty) या कारणांमुळे संबंधित व्यक्ती सरकारी सेवेतून पदच्यूत (Dismissed) झालेली असेल तर.
- त्या व्यक्ती लाचलुचपत किंवा दोन गटात वैमनस्य उत्पन्न करण्याचा गुन्हा सिद्ध झाला असेल तर.
- अस्पृश्यता, सतीप्रथा, हुंडा (Untouchability, sati, dowry) अशा सामाजिक गुन्ह्यांचे समर्थन करण्याच्या गुन्ह्यात ती व्यक्ती दोषी आढळून शिक्षा झोलली असेल तर.

**3) पक्षांतर बंदी कायद्यानुसार अपात्रता (Disqualification on the ground of defection) :**

- यानुसार अपात्र ठरवण्याचा निर्णय विधानसभा/विधानपरिषद अध्यक्ष/सभापती यांचा असेल.
- त्यांच्या निर्णयास न्यायिक पुनर्विलोकन (Judicial review) लागू ठरते.

### शपथ (Oath)

- राज्य विधिमंडळाच्या दोन्ही गृहांचा प्रत्येक सदस्य पदग्रहण करण्यापूर्वी राज्यपालासमोर किंवा त्या उद्देशासाठी त्याने नियुक्त केलेल्या व्यक्तीसमोर शपथ किंवा प्रतिज्ञा घेईल.
- या शपथेअंतर्गत विधिमंडळाचा सदस्य खालील प्रतिज्ञा घेतो :

1) तो भारताच्या राज्यघटनेशी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगील.

2) तो भारताचे सार्वभौमतेचे आणि अखंडता याचे रक्षण करील.

3) तो प्रामाणिकपणे पदाची कार्ये पार पाडील.

### सदस्यांचे विशेष अधिकार

- जोपर्यंत सदस्य शपथ घेत नाही तोपर्यंत ते कामकाजात भाग घेऊ शकत नाही. तसेच त्यांना विधिमंडळाचे विशेषाधिकार सुद्धा लागू ठरत नाही.

1) जर सदस्य शपथ ग्रहणापूर्वी बैठकीस हजर राहिले.

2) सदस्यत्वासाठी अपात्र आहोत हे माहिती असूनही बैठकीस हजर राहिले.

3) कायद्यानुसार गृहातील कामकाजात सहभागी होणे / मतदान करण्यास बंदी आहे. माहिती असूनही तो गृहाच्या बैठकीस हजर असेल.

- अशा वरील तिनही परिस्थितीत त्यास 500 रु. दंड होऊ शकतो.

### जागा रिक्त होणे

1) दुहेरी सदस्यत्व : राज्य विधिमंडळाने केलेल्या कायद्यानुसार एका सभागृहातील जागा रिक्त होईल.

Dilip Sir's STEP UP Academy

2) अपात्रता : कलम 191 नुसार, लोकप्रतिनिधी कायदा 1951 नुसार, पक्षांतर बंदी कायद्यानुसार इ.
3) राजीनामा : सभापती/अध्यक्षांकडे
4) अनुपस्थिती : सभागृहाच्या संमतीशिवाय 60 दिवसांच्या कालावधीत सभागृहाच्या सर्व सभांना अनुपस्थित राहिला तर ती जागा रिक्त होते.
5) **इतर कारणे** : त्याची निवडणूक न्यायालयाने अवैध ठरवली.
- सभागृहातून त्याची हकालपट्टी झाली असेल.
- जर तो राष्ट्रपती/उपराष्ट्रपती पदावर निवडून आला असेल.
- जर तो राज्यांचा राज्यपाल म्हणून नेमला तर

**विधिमंडळाचे पिठासीन अधिकारी (Presiding Officers of State Legislature)**

- विधानसभा सभापती, उपसभापती आणि अध्यक्षीय पॅनल
- विधानपरिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि उपाध्यक्षीय पॅनल

**※ विधानसभा सभापती (Speaker of Assembly) :**

- निवड : नव्याने निवडून आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात सभापतीची निवड केली जाते.
- अशा बैठकीचे अध्यक्षस्थान : स्पिकर प्रोटेम करतात.
- स्पिकर प्रोटेम यांची नेमणूक : राज्यपाल करतात.
- **कालावधी** : विधानसभेच्या कालावधीइतका
- (मात्र विधानसभा विसर्जनानंतरही पुढील सभापती निवडीच्या बैठकीपर्यंत पदावर राहू शकतात.)
- पुढील परिस्थितीत पदावरून दूर होतात :

1) विधानसभा सदस्यत्व रद्द झाल्यास
2) उपसभापतीला उद्देशून राजीनामा सादर केल्यास
3) विधानसभेत प्रभावी बहुमताने म्हणजेच तत्कालीन सदस्यांच्या बहुमताने (Effective majority) त्यांना पदावरून दूर करण्याचा ठराव मंजूर झाल्यास. (यासाठी 14 दिवसांची पूर्व सूचना आवश्यक)

- **कार्ये** :

- गणपूर्ती नसल्यास सभा स्थगित करतात. (Adjourns the assembly in the absence of quorum)
- समान मते पडल्यास निर्णायक मत (Casting vote) देण्याचा अधिकार
- गुप्त बैठकीस परवानगी देण्याबाबत (Secret sitting)
- एखादे विधेयक धन विधेयक (Money bill) आहे किंवा नाही याबाबत अंतिम निर्णय ते देतात.
- पक्षांतर बंदी कायद्याबाबत निर्णय देतात. (On the grounds of defection)
- ते सर्व समित्यांच्या अध्यक्षांची नेमणूक करतात आणि त्याच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करतात. ते स्वतः कामकाज सल्लागार समिती, नियम समिती आणि सर्वसाधारण उद्देश समितीचे अध्यक्ष असतात. (He himself is the Chairman of Business Advisory Committee, the Rules Committee and the General Purpose Committee)
- सभापती हे सदस्यांमधून काहींना अध्यक्षीय पॅनेलमध्ये नियुक्त करतात. जेव्हा सभापती व उपसभापती गैरहजर असतील तेव्हा या पॅनलमधील व्यक्ती सभापती पदावर असते.

**※ विधानसभेचा उपसभापती :**

- सभापतीप्रमाणेच विधानसभा, आपल्या सदस्यांमधूनच उपसभापतीचीही निवड करते. सभापतीची निवडणूक झाल्यानंतर उपसभापतीची निवडणूक होते.
- सामान्यतः सभापतीप्रमाणे उपसभापतीसुद्धा विधानसभेच्या कार्यकालापर्यंत पदावर राहतो. परंतु खालील तीन परिस्थितीमध्ये कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वीच तो पद सोडतो :

1) जर तो विधानसभेचा सदस्य राहिला नाही.
2) जर त्याने सभापतीला उद्देशून राजीनामा सादर केला.
3) जर विधानसभेच्या तत्कालीन सदस्यांनी बहुमताने ठराव संमत करून त्याला पदावरून हटविले. (यासाठी चौदा दिवसांची पूर्वसूचना)

- सभापतीचे पद रिक्त असताना उपसभापती सभापतीची कार्ये पार पाडतो. जेव्हा विधानसभेच्या बैठकीस सभापती अनुपस्थित असतो त्यावेळी तो सभापतीचे काम पाहतो. या दोन्ही परिस्थितीमध्ये त्याला सभापतीचे सर्व अधिकार असतात.
- सभापती सदस्यांमधील काहींचा अध्यक्षांचा गट (Panel of Chairmen) नामनिर्देशित करतो. सभापती किंवा उपसभापती यांच्या अनुपस्थितीत या पॅनेलमधील कोणीही विधानसभेचा सभापती म्हणून काम करू शकतो; असे करताना त्याला सभापती सारखेच अधिकार असतात. अध्यक्षांचा नवीन गट नामनिर्देशित होईपर्यंत तो काम करतो.

**※ विधानपरिषदेचा अध्यक्ष (Chairperson of Legislative Council) :**

- विधानपरिषद अध्यक्षाची निवड विधान परिषद सदस्यांमधून केली जाते.

Dilip Sir's STEP UP Academy

- खालील तीन परिस्थितींमध्ये अध्यक्ष आपले पद सोडतो :
1) जर तो विधानपरिषदेचा सदस्य राहिला नाही.
2) जर त्याने उपाध्यक्षाला उद्देशून राजीनामा सादर केला.
3) जर विधानपरिषदेच्या तत्कालीन सदस्यांनी बहुमताने ठराव संमत करून त्याला पदावरून हटविले. (यासाठी चौदा दिवसांची पूर्वसूचना)
- गृहाचा पीठासीन अधिकारी म्हणून विधानपरिषदेच्या अध्यक्षाचे अधिकार आणि कामे विधानसभेच्या सभापतीप्रमाणे असतात. (फक्त एखादे विधेयक हे अर्थ विधेयक आहे किंवा नाही, हे ठरविण्याचा विशेष अधिकार विधानसभेच्या सभापतीला असतो; मात्र विधानपरिषदेच्या अध्यक्षाला हा अधिकार प्राप्त होत नाही. यासंदर्भात सभापतीचा निर्णय अंतिम असतो.)
- सभापतीप्रमाणेच, विधानपरिषद अध्यक्षाचे वेतन आणि भत्ते राज्य विधिमंडळच ठरविते. ते राज्याच्या संचित निधीवर भारित असतात आणि त्यामुळे यासाठी राज्य विधिमंडळाच्या वार्षिक मंजुरीची आवश्यकता नसते.

**✻ विधानपरिषदेचा उपाध्यक्ष :**

- अध्यक्षाप्रमाणेच, विधानपरिषद आपल्या सदस्यांपैकी एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करते.
- खालील तीन परिस्थितीत उपाध्यक्षाला पद सोडावे लागते :
1) जर तो विधानपरिषदेचा सदस्य राहिला नाही.
2) जर त्याने अध्यक्षाला उद्देशून राजीनामा सादर केला.
3) जर विधानपरिषदेच्या तत्कालीन सदस्यांनी बहुमताने ठराव संमत करून त्याला पदावरून हटविले. (यासाठी चौदा दिवसांची पूर्वसूचना)
- जेव्हा अध्यक्षपद रिक्त असेल त्यावेळी उपाध्यक्ष अध्यक्षपदाची कर्तव्ये पार पाडतो. विधानपरिषदेच्या बैठकीला अध्यक्ष अनुपस्थित असेल तेव्हा तो अध्यक्षाची कामे पाहतो. दोन्ही वेळा त्याला अध्यक्षाचे पूर्ण अधिकार असतात.
- अध्यक्ष सदस्यांमधून उपाध्यक्षांचा गट (Panel of Vice Chairmen) नामनिर्देशित करतो. अध्यक्ष किंवा उपाध्यक्षाच्या अनुपस्थित त्यांच्यापैकी कोणीही विधानपरिषदेचा पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहतो. असे करताना त्याला अध्यक्षा-सारखेच अधिकार असतात. उपाध्यक्षांचा नवीन गट (Panel of Vice Chairmen) नामनिर्देशित होईपर्यंत तो पदावर राहतो.

## राज्य विधिमंडळाची अधिवेशने (Session)

- राज्यपाल वेळोवेळी राज्य विधिमंडळाच्या दोन्ही गृहांची अधिवेशने बोलवितो. राज्य विधिमंडळाच्या दोन अधिवेशनांमधील कमाल कालावधी सहा महिने असतो.
- महाराष्ट्रात विधिमंडळाची दर वर्षी तीन अधिवेशने होतात. राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये अनेक बैठका होतात.

- **संस्थगिती (Adjournment) :**
- बैठकीचे कामकाज काही ठराविक कालावधीसाठी (तास, दिवस किंवा आठवडे) स्थगित ठेवणे म्हणजे संस्थगिती (Adjournment) होय.
- **बरखास्त (Prorogation) :**
- गृहाचा पीठासीन अधिकारी (सभापती किंवा अध्यक्ष) अधिवेशनाचे काम संपल्यानंतर गृह अनिश्चित कालासाठी स्थगित करतो. त्यानंतर काही दिवसांत राज्यपाल अधिवेशन बरखास्त (Prorogation) केल्याची सूचना जारी करतो.
- अधिवेशन चालू असतानासुद्धा राज्यपाल अधिवेशन बरखास्त करू शकतो. स्थगितीपेक्षा बरखास्ती हा प्रकार वेगळा असून बरखास्तीमुळे गृहाचे अधिवेशनच संपुष्टात येते.
- **विसर्जन (Dissolution) :**
- विधानपरिषद हे कायमस्वरूपी गृह असल्याने ते विसर्जित होत नाही. फक्त विधानसभा विसर्जित होते. विसर्जन (Dissolution) हा बरखास्तीपेक्षाही वेगळा प्रकार असून यामुळे गृहाचे अस्तित्वच संपुष्टात येते; आणि सार्वत्रिक निवडणुकानंतर नवीन गृह अस्तित्वात येते.
- विधानसभा विसर्जित झाल्याने विधेयक लोप पावण्याची स्थिती खालीलप्रमाणे :
1) विधानसभेत प्रलंबित असलेले विधेयक लोप पावते. (विधानसभेत मांडलेले किंवा विधानपरिषदेकडून आलेले).
2) विधानसभेने संमत केलेले पण विधानपरिषदेत प्रलंबित असलेले विधेयक लोप पावते.
3) विधानपरिषदेत प्रलंबित असलेले पण विधानसभेने संमत न केलेले विधेयक लोप पावत नाही.
4) एकगृही प्रणालीमध्ये विधानसभेने संमत केलेले विधेयक किंवा द्विगृही प्रणालीमध्ये दोन्ही गृहांनी संमत केलेले पण राज्यपाल किंवा राष्ट्रपती यांच्या मान्यतेसाठी प्रलंबित असलेले विधेयक लोप पावत नाही.
5) एकगृही प्रणालीमध्ये विधानसभेने संमत केलेले किंवा द्विगृही प्रणालीमध्ये दोन्ही गृहांनी संमत केलेले पण राष्ट्रपतीने पुनर्विचारार्थ परत पाठविलेले विधेयक लोप पावत नाही.

- **गणपूर्ती / गणसंख्या (Quorum) :**
- गृहाच्या सदस्य संख्येच्या **एक-दशांश (1/10)** ही गणसंख्या असते. जर गृहांच्या बैठकीमध्ये गणपूर्ती होत नसेल तर गृह स्थगित करणे किंवा गणपूर्ती होईपर्यंत बैठक तहकूब ठेवणे हे पीठासीन अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे.
- दोन्ही गृहांच्या सर्व बैठकींतील विषय उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या (पीठासीन अधिकारी सोडून) बहुमताने ठरतात.

Dilip Sir's STEP UP Academy

- **सभागृहातील मतदान :**
- कोणत्याही सभागृहाच्या कोणत्याही बैठकीतील सर्व बाबी या उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या (पीठासीन अधिकारी वगळून) बहुमताने निश्चित होतात. केवळ घटनेत विशेषत्वाने नमूद केलेल्या काही बाबींनाच, जसे विधानसभेच्या सभापतीला पदावरून दूर करणे, विधानपरिषदेच्या अध्यक्षास पदावरून दूर करणे इत्यादी बाबींनाच निव्वळ बहुमताची (Effective majority) आवश्यकता असते.
- **विधिमंडळातील कामकाजाची भाषा (Languages in state legislature) : (कलम 88 नुसार)**
- राज्य विधिमंडळातील कामकाजाची भाषा ही राज्याची अधिकृत भाषा किंवा हिंदी किंवा इंग्लिश असेल असे घटनेत म्हटले आहे. परंतु पीठासीन अधिकारी सदस्याला त्याच्या मातृभाषेत बोलण्याची परवानगी देऊ शकतो.
- राज्यघटना लागू झाल्यानंतर पंधरा वर्षांनी (म्हणजे 1965 पासून) गृहामध्ये इंग्लिश भाषेचा वापर चालू ठेवण्यावर किंवा बंद करण्यावर निर्णय घेण्याचा विधिमंडळाला अधिकार देण्यात आला होता.
- **मंत्री आणि महाधिवक्ता यांचे अधिकार (Rights of ministers and advocate) :**
- गृहाच्या सदस्यांव्यतिरिक्त, प्रत्येक मंत्र्याला आणि राज्याच्या महाधिवक्त्याला कोणत्याही गृहाच्या किंवा तो सदस्य असलेल्या समितीच्या कामकाजात सहभागी होण्याचा आणि म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे, मात्र त्याला मतदान करण्याचा अधिकार नाही. या घटनात्मक तरतुदींची दोन कारण आहेत.

1) ज्या गृहाचा तो सदस्य नाही अशा गृहातील कामकाजात मंत्री सहभागी होऊ शकतो.
2) दोन्ही गृहांचा सदस्य नसलेला मंत्री दोन्ही गृहांच्या कामकाजात सहभागी होऊ शकतो.

## कायदेनिर्मिती प्रक्रिया

1) विधानसभेतून एखादे विधेयक विधानपरिषदेमध्ये आले तर
- विधानपरिषद ते आहे तसे मंजूर करेल. (Pass the bill as sent by assembly)
- विधानपरिषदेने काही दुरुस्त्या सूचवल्या आणि विधानसभेने दुरुस्त्या मान्य केल्या तर (Pass the bill with amendments) असे विधेयक दोन्ही सभागृहांनी संमत केल्याचे समजले जाते.

2) विधानपरिषदेने ते नामंजूर केले किंवा विधानपरिषदेच्या दुरुस्त्या विधारसभेने नामंजूर केल्या किंवा
- विधानपरिषदेने त्यावर 3 महिने काहीच करावाई केली नाही तर

विधानसभा ते विधेयक विधानपरिषदेकडे पुन्हा पाठवेल आणि अशा वेळी जर
- पुन्हा विधेयक विधानपरिषदेने असंमत केले किंवा विधानसभेने न स्वीकारलेल्या दुरुस्त्या नमूद करून संमत केले किंवा एक महिना त्यावर काहीच कृती केली नाही तर
- अशा वेळी ते दोन्ही सभागृहात संमत झाले असे म्हटले जाते.
- अशा वेळी दोन्ही सभागृहात मतभेद असल्यस संयुक्त बैठकीची (Joint sitting) तरतूद नाही.
- धन विधेयक (Money bill) विधानपरिषदेस 14 दिवसात संमत करून विधानसभेकडे पाठवावे लागाते. अन्यथा ते संमत केले असे समजले जाते.
- धन विधेयकाबाबत विधान परिषद फक्तशिफारशी करु शकते.

## विधानपरिषदेचे स्थान

**1) विधानसभेच्या तुलनेत समान (Equal status to legislative assembly) :**

i) सामान्य विधेयक सादर करणे व संमत करणे. (दोन्ही गृहात जर मतभेद झाले तर विधानसभेचा निर्णय श्रेष्ठ)
ii) राज्यपालांनी जारी केलेल्या अध्यादेशांना (Ordinance) मान्यता देणे.
iii) मुख्यमंत्री किंवा मंत्री विधानसभा/विधानपरिषदेतून असू शकतात.
iv) राज्य वित्त आयोग (State finance commission), राज्य लोकसेवा आयोग (MPSC) आणि भारताचे महालेखपरीक्षक (CAG) यांच्या अहवालावर चर्चा करण्याबाबत.
v) राज्य लोकसेवा आयोगाच्या अधिकारात वाढ करण्याबाबत.

**2) विधानसभेपेक्षा कनिष्ठ दर्जा (Lower status to legislative assembly) :**

i) अर्थ विधेयक (Money Bill) फक्त विधानसभेत मांडले जाते.
ii) विधानपरिषद ही अर्थविधेयक जास्तीत जास्त 14 दिवस लांबवू शकते (रोखून धरू शकते.) त्यानंतर विधानपरिषदेने संमत जरी नाही केले तरी विधानसभा आपल्या अधिकारात संमत करून घेते.

Dilip Sir's STEP UP Academy

iii) विधानसभा विधान परिषदेच्या शिफारशी नाकारू शकते.

iv) धन विधेयक (Money bill) ठरवण्याचा अंतिम अधिकार विधानसभेच्या सभापतींना असतो.

v) सामान्य विधेयक अंतिमतः विधानसभाच मान्य करते. विधानपरिषद असे विधेयक जास्तीत जास्त 4 महिन्यांसाठी (3+1) रोखून धरू शकते.

vi) विधानपरिषदेला अर्थसंकल्पावर फक्त चर्चा करण्याचा अधिकार आहे.

vii) अविश्वास ठराव (No confidence motion) फक्त विधानसभेतच मांडतात.

viii) राष्ट्रपती आणि राज्यसभेतील सदस्यांच्या निवडणुकीत फक्त विधानसभा भाग घेते.

ix) जेव्हा निम्म्या पेक्षा जास्त राज्यांच्या संमतीसाठी एखादे घटनादुरुस्ती विधेयक राज्यांकडे येते तेव्हा विधानसभेतच मत विचारात घेतले जाते. विधानपरिषद जर याच्याशी सहमत नसेल तर तिचे मत विचारात घेतले जात नाही.

x) विधानपरिषदेचे अस्तित्व विधानसभेच्या इच्छेवर आहेत.

- **केंद्रातील राज्यसभेपेक्षा राज्यातील विधान परिषदेला अधिकार कमी असण्याची कारणे :**

- संघराज्य पद्धतीचे प्रतिनिधित्व राज्यसभा करते, विधानपरिषद असे काही करत नाही.

- **परंतु – तरीही विधानपरिषदत महत्त्वाची ठरते कारण;**

1) विधानसभेने घाई गडबडीत निर्णय घ्यायला नको म्हणून

2) निवडणुकीत न जिंकणारे परंतु तज्ज्ञ व्यक्ती ज्यांची राज्य धोरणात महत्त्वाची मदत होऊ शकते, अशा लोकांना प्रतिनिधित्व देण्याबाबत.

- विधानपरिषदेवर टिका करताना तिला 'दुय्यम गृह' 'खर्चिक अलंकार' तसेच 'पांढरा हत्ती' असे संबोधतात.

### महाराष्ट्राच्या विधानपरिषदेचा थोडक्यात इतिहास

- त्यानंतर 1892 च्या इंडियन कौन्सिल्स ॲक्ट अन्वये या विधिमंडळाचे अधिकार काही प्रमाणात वाढविण्यात आले. प्रश्न विचारणे, पुरवणी प्रश्न विचारणे, अंदाजपत्रकाची चर्चा करणे असे त्यांचे साधारणतः स्वरूप होते. सध्याच्या कामांच्या तुलनेत त्या कामांची व्याप्ती फारच मर्यादित होती.

- त्यानंतर 1909 साली मोर्ले-मिंटो सुधारणा आल्या आणि 1919 साली मॉटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणा येऊन खऱ्या अर्थाने भारतात संसदीय लोकशाहीची बीजे रोवली गेली व प्रांताप्रांतात द्विदल राज्यपद्धती सुरू झाली. त्यानंतर 1935 चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट अस्तित्वात आला. ज्यात संघराज्यात्मक शासन पद्धती स्वीकारण्यात आली आणि प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली. या उपक्रमामुळे विधीमंडळाला जबाबदार असणारे मंत्रिमंडळ प्रांताप्रांतातून अस्तित्वात आले.

- 1935 च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टमध्ये कायदे मंडळात लोकप्रतिनिधींना निवडणुकीद्वारे प्रतिनिधित्व देण्याची तरतूद करण्यात आली होती. तेव्हापासून खरे म्हणजे निवडणुकांना सुरुवात झाली. त्यामध्ये स्थानिक लोकांना कायदेमंडळावर प्रतिनिधित्व मिळाले. या कायद्यान्वयेच तेव्हाच्या मुंबई कायदेमंडळाचे 'विधानसभा व विधानपरिषद' असे नामाभिधान होऊन दोन सभागृहे मुंबई प्रांतात जुलै 1937 मध्ये अस्तित्वात आली.

- स्वातंत्र्यानंतर 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय राज्यघटना अंमलात आली. घटनेतील तरतुदींच्या अनुषंगाने 1956 मध्ये भाषावार प्रांतरचनेनुसार द्वैभाषिक मुंबई राज्य विधानमंडळ व पुढे 1 मे 1960 रोजी राज्य पुनर्रचना कायद्यानुसार 'महाराष्ट्र राज्य' स्थापन झाल्यानंतर 'महाराष्ट्र विधानमंडळ' अस्तित्वात आले.

- राज्यात विधानसभेला खालचे सभागृह (Lower House) तर विधानपरिषदेचा वरिष्ठ सभागृह (Upper House) असे संबोधण्यात येते.

- विधान सभेमध्ये थेट सार्वत्रिक मतदानाद्वारे निवडून येणारे 288 व घटनेतील तरतुदीनुसार एक अँग्लो-इंडियन प्रतिनिधी अशी एकूण 289 इतकी सदस्य संख्या आहे.

- विधान परिषदेच्या सदस्यांची संख्या 78 इतकी आहे.

### महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व त्यांची कारकीर्द

| क्र. नाव | कालावधी | ते | कालावधी |
|---|---|---|---|
| 1) यशवंतराव चव्हाण | मे 1960 | ते | नोव्हेंबर 1962 |
| 2) मारोतराव कन्नमवार | नोव्हेंबर 1962 | ते | नोव्हेंबर 1963 |
| 3) पी.के. उर्फ बाळासाहेब सावंत (काळजीवाहू) | नोव्हेंबर 1963 | ते | डिसेंबर 1963 |
| 4) वसंतराव नाईक | डिसेंबर 1963 | ते | फेब्रुवारी 1975 |
| 5) शंकरराव चव्हाण | फेब्रुवारी 1975 | ते | मे 1977 |
| 6) वसंतदादा पाटील | मे 1977 | ते | मार्च 1978 |
| 7) वसंतदादा पाटील | मार्च 1978 | ते | 18 जुलै 1978 |
| 8) शरद पवार | जुलै 1978 | ते | फेब्रुवारी 1980 |

| | | | |
|---|---|---|---|
| | **राष्ट्रपती राजवट** | **17 फेब्रुवारी 1980** | **ते 9 जून 1980** |
| 9) | बॅ.ए.आर.अंतुले | जून 1980 | ते जानेवारी 1982 |
| 10) | बाबासाहेब भोसले | जानेवारी 1982 | ते फेब्रुवारी 1983 |
| 11) | वसंतदादा पाटील | फेब्रुवारी 1983 | ते मार्च 1985 |
| 12) | वसंतदादा पाटील | मार्च 1985 | ते जून 1985 |
| 13) | शिवाजीराव पाटील निलंगेकर | जून 1985 | ते मार्च 1986 |
| 14) | शंकरराव चव्हाण | मार्च 1986 | ते जून 1988 |
| 15) | शरद पवार | जून 1988 | ते मार्च 1990 |
| 16) | शरद पवार | मार्च 1990 | ते जून 1991 |
| 17) | सुधाकरराव नाईक | जून 1991 | ते फेब्रुवारी 1993 |
| 18) | शरद पवार | मार्च 1993 | ते मार्च 1995 |
| 19) | मनोहर जोशी | मार्च 1995 | ते जानेवारी 1999 |
| 20) | नारायण राणे | फेब्रुवारी 1999 | ते ऑक्टोबर 1999 |
| 21) | विलासराव देशमुख | ऑक्टोबर 1999 | ते जानेवारी 2003 |
| 22) | सुशीलकुमार शिंदे | जानेवारी 2003 | ते ऑक्टोबर 2004 |
| 23) | विलासराव देशमुख | नोव्हेंबर 2004 | ते डिसेंबर 2008 |
| 24) | अशोकराव चव्हाण | डिसेंबर 2008 | ते डिसेंबर2009 |
| 25) | अशोकराव चव्हाण | डिसेंबर 2009 | ते नोव्हेंबर 201 |
| 26) | पृथ्वीराज चव्हाण | नोव्हेंबर 2010 | ते सप्टेंबर 2014 |
| | **राष्ट्रपती राजवट** | **28 सप्टेंबर 2014** | **ते 31 ऑक्टोबर 2014** |
| 27) | देवेंद्र फडणवीस | ऑक्टोबर 2014 | ते 12 नोव्हेंबर 2019 |
| | **राष्ट्रपती राजवट** | **12 नोव्हेंबर** | **ते 23 नोव्हेंबर 2019** |
| 28) | देवेंद्र फडणवीस | 23 नोव्हेंबर | ते 28 नोव्हेंबर 2019 |
| 29) | उद्धव ठाकरे | 28 नोव्हेंबर | ते 30 जून 2022 |
| 30) | एकनाथ शिंदे | 30 जून 2022 | ते आजपर्यंत |

## राज्य विधीमंडळाची सदस्य संख्या

| क्र. | राज्य | विधानसभेतील जागा | विधानपरिषदेतील जागा |
|---|---|---|---|
| 1. | आंध्र प्रदेश | 175 | 50 |
| 2. | अरुणाचल प्रदेश | 60 | – |
| 3. | आसाम | 126 | – |
| 4. | बिहार | 243 | 75 |
| 5. | छत्तीसगढ | 90 | – |
| 6. | गोवा | 40 | – |
| 7. | गुजरात | 182 | – |
| 8. | हरियाणा | 90 | 2– |
| 9. | हिमाचल प्रदेश | 68 | – |
| 10. | झारखंड | 81 | – |
| 11. | कर्नाटक | 224 | 75 |
| 12. | केरळ | 140 | – |
| 13. | मध्य प्रदेश | 230 | – |
| 14. | महाराष्ट्र | 288 | 78 |
| 15. | मणिपूर | 60 | – |
| 16. | मेघालय | 60 | – |
| 17. | मिझोरम | 40 | – |
| 18. | नागालँड | 60 | – |
| 19. | ओडिशा | 147 | – |
| 20. | पंजाब | 117 | – |
| 21. | राजस्थान | 200 | – |
| 22. | सिक्किम | 32 | – |
| 23. | तामिळनाडू | 234 | – |
| 24. | तेलंगाणा | 119 | 40 |
| 25. | त्रिपुरा | 60 | – |
| 26. | उत्तराखंड | 70 | – |
| 27. | उत्तर प्रदेश | 403 | 100 |
| 28. | पश्चिम बंगाल | 294 | – |

| क्र. | संघराज्य प्रदेश | विधानसभेतील जागा | विधानपरिषदेतील जागा |
|---|---|---|---|
| 1. | दिल्ली | 70 | – |
| 2. | पुदुच्चेरी | 30 | – |
| 3. | जम्मू व काश्मीर | 90 | – |

**※ दृष्टिक्षेपात राज्य विधिमंडळांसंबंधी कलमे सर्वसाधारण**

| कलम | विषय |
|---|---|
| 168 | राज्यात विधिमंडळ बनविणे. |
| 169 | राज्यायत विधानपरिषदा रद्द करणे किंवा स्थापन करणे. |
| 170 | विधानसभांची संरचना |
| 171 | विधानपरिषदेची संरचना |

Dilip Sir's STEP UP Academy

| | |
|---|---|
| 172 | राज्य विधिमंडळांचा कार्यकाल |
| 173 | राज्य विधिमंडळांच्या सदस्यत्वाचे पात्रता निकष |
| 174 | राज्य विधिमंडळाची अधिवेशने बरखास्ती व विसर्जन |
| 175 | गृहाला अथवा गृहांना संबोधित करण्याचा आणि निरोप पाठविण्याचा राज्यपालाचा अधिकार |
| 176 | राज्यपालाचे विशेष अभिभाषण |
| 177 | गृहांच्या संदर्भात मंत्र्यांचे आणि महाधिवक्त्याचे अधिकार |

**राज्यविधिमंडळांचे अधिकारी**

| | |
|---|---|
| 178 | विधानसभेचे सभापती व उपसभापती |
| 179 | सभापती व उपसभापती ही पदे रिक्त होणे, त्यांचे राजीनामे आणि त्यांची पदच्युती |
| 180 | सभापती पदाचे काम करण्याचा किंवा सभापती म्हणून काम करण्याचा उपभासती किंवा इतर व्यक्तिंचा अधिकार |
| 181 | त्यांच्या पदच्युतीचा ठराव विचाराधीन असताना सभापती किंवा उपसभापती अध्यक्षस्थानी असणार नाहीत. |
| 182 | विधानपरिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष |
| 183 | अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची पदे रिक्त होणे, त्यांचा राजीनामा आणि त्यांची पदच्युती |
| 184 | अध्यक्षपदी काम करण्याचा किंवा अध्यक्षाचे काम करण्याचा उपाध्यक्ष किंवा इतर व्यक्तिचा अधिकार |
| 185 | त्यांच्या पदच्युतीचा ठराव विचाराधीन असताना, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष अध्यक्षस्थानी असणार नाहीत. |
| 186 | सभापती व उपसभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन आणि भत्ते |
| 187 | राज्य विधिमंडळाचे सचिवालय |

**कामकाज**

| | |
|---|---|
| 188 | सदस्यांची शपथ किंवा प्रतिज्ञा |
| 189 | गृहामध्ये मतदान, गणपूर्ती नसताना किंवा रिक्त पदे असताना कृती करण्याचा गृहांचा अधिकार |

**सदस्यांची अपात्रता**

| | |
|---|---|
| 190 | जागा रिक्त होणे. |
| 191 | सदस्यत्वाच्या अपात्रतेचे निकष |
| 192 | सदस्यांच्या अपात्रतेबाबतच्या प्रश्नांवर निर्णय |
| 193 | कलम 188 अनुसार शपथ किंवा प्रतिज्ञा घेण्यापूर्वी किंवा पात्र नसताना किंवा अपात्र असताना बैठकीला उपस्थित राहणे आणि मतदान करणे याबाबत दंड |

**राज्य विधिमंडळ विशेषाधिकार व संरक्षण**

| | |
|---|---|
| 194 | विधिमंडळाची गृहे आणि सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार इत्यादी |
| 195 | सदस्यांचे वेतन व भत्ते |

**कायदेविषयक प्रक्रिया**

| | |
|---|---|
| 196 | विधेयके सादर करणे आणि संमत करणे याबाबतच्या तरतुदी |
| 197 | अर्थ विधेयक सोडून इतर विधेयकांच्या बाबतीत विधानपरिषदेच्या अधिकारांवर मर्यादा |
| 198 | अर्थ विधेयकाबाबत विशेष पद्धती |
| 199 | अर्थ विधेयकाची व्याख्या |
| 200 | विधेयकांना मान्यता |
| 201 | विचारार्थ विधेयक राखून ठेवणे. |

**आर्थिक विषयांबाबत पद्धती**

| | |
|---|---|
| 202 | वार्षिक वित्तीय पत्रक |
| 203 | अंदाजांच्या संदर्भात विधिमंडळाची कार्यपद्धती |
| 204 | विनियोग विधेयक |
| 205 | पूरक, अतिरिक्त अधिक अनुदान |
| 206 | लेखनुदान (Votes on Account), पत मतदान (Votes of Credit) आणि अपवादात्मक अनुदान (Exceptional Grants) |
| 207 | वित्तीय विधेयकांबाबत विशेष तरतुदी |

**सर्वसाधारण कार्यपद्धती**

| | |
|---|---|
| 208 | कार्यपद्धतीचे नियम |
| 209 | वित्तीय कामकाजाच्या बाबतीत राज्य विधिमंडळातील कार्य पद्धतीचे कायद्यान्वये नियमन |
| 210 | विधिमंडळातील कामकाजाची भाषा |
| 211 | विधिमंडळातील चर्चेवरील मर्यादा |
| 212 | विधिमंडळातील कामकाजाबाबत न्यायालये चौकशी करणार नाहीत. |

**राज्यपालाचे कायदेविषयक अधिकार**

| | |
|---|---|
| 213 | विधिमंडळाच्या अवकाशकाळात अध्यादेश काढण्याचा राज्यपालाचा अधिकार |

**पार्श्वभूमी**

- भूतपूर्व मुंबई प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची (Council of the Governor of Bombay) पहिली बैठक दि. 22 जानेवारी 1862 रोजी मुंबई येथील टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भरली होती. मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर सर जॉर्ज रसेल क्लार्क हे त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

Dilip Sir's STEP UP Academy

- 1862 ते 1937 या पंचाहत्तर वर्षांच्या विधिमंडळाच्या प्रदीर्घ वाटचालीत सर्वश्री जगन्नाथ शंकरशेठ, जमशेटजी, जीजीभॉय, सर माधवराव विंचुरकर, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, रावबहादूर गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, सर फिरोजशहा मेहता, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ कृष्ण गोखले व डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर असे दिग्गज सन्माननीय सदस्य म्हणून लाभले, ज्यांनी आपल्या महान कर्तृत्वाने आणि सर्वंकष कामगिरीने या विधिमंडळाला उच्चस्तर व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.
- भारताच्या घटनात्मक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे 1935 चा भारत सरकार कायदा (Government of Indian Act, 1935) अस्तित्वात आला, ज्यात संघराज्यात्मक शासन पद्धत (Federal form of Govt.) स्वीकारण्यात आली होती. तसेच, प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली होती. या कायद्यान्वये विधानसभा व विधानपरिषद असे नामाभिधान देऊन दोन सभागृहे मुंबई प्रांतात 1937 मध्ये अस्तित्वात आली.
- 1935 चा कायदा अंमलात आल्यानंतर 1939 ते 1946 पर्यंत विधानपरिषदेचे कार्य निलंबित करण्यात आले होते. तेव्हा राज्यपाल राजवट अंमलात होती. तसेच 1980 मध्येही सहा महिने राष्ट्रपती राजवट असल्याने विधानपरिषदेचे काम निलंबित करण्यात आले होते.

### ⁕ महाराष्ट्राची विधान भवने :

- पुणे येथील विधान भवन - 1935 च्या कायद्यान्वये निर्माण झालेल्या विधानपरिषदेचे पहिले अधिवेशन 20 जुलै 1937 रोजी पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये भरले होते व स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे विधानपरिषदेचे पहिले अधिवेशन 17 ऑक्टोबर 1947 रोजी पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्ये भरले होते.

### ⁕ विधानपरिषद सुवर्ण महोत्सव :

- विधानपरिषदेला 1987 मध्ये 50 वर्षे पूर्ण झाली.

## सभागृहाची रचना, कामकाज व कार्यपद्धती

### ⁕ सभागृहाची सदस्य संख्या व सदस्यत्वाची मुदत :

- भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 171 (1) मध्ये विधानपरिषद असलेल्या राज्यामधील अशा विधानपरिषदेच्या सदस्यांची एकूण संख्या विधानसभेच्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशाहून अधिक असता कामा नये तसेच ती चाळीसहूनही कमी असता कामा नये अशी तरतूद आहे.
- सध्या महाराष्ट्र विधानपरिषदेची सदस्य संख्या 78 इतकी आहे. संविधानातील उक्त तरतुदीनुसार ही सदस्य संख्या 96 इतकी असू शकते.
- महाराष्ट्र विधानपरिषदेचे एकूण जे 78 सदस्य आहेत त्यातील 30 सदस्य विधानसभा सदस्यांद्वारा, 22 सदस्य विविध स्थानिक प्राधिकारी संस्थांद्वारा, प्रत्येकी 7 सदस्य पदवीधरांद्वारा तसेच शिक्षकांद्वारा निर्वाचित होत असतात तर 12 सदस्य राज्यपालांद्वारा नामनियुक्त होत असतात.
- राज्यपाल **वाङ्मय, शास्त्र, कला, सहकारी चळवळ व समाजसेवा** यामध्ये विशेष ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्तींनाच विधानपरिषदेवर नामनिर्देशित करतात.
- अनुच्छेद 172 (2) अन्वये राज्याची विधानपरिषद विसर्जनपात्र असत नाही. परंतु सभागृहाच्या सदस्यांपैकी एक-तृतीयांश सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होत असतात.

### ⁕ सदस्यांचा शपथविधी :

- सदस्य विधानपरिषदेवर निवडून आल्यानंतर सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्यापूर्वी त्यांना भारतीय संविधानाच्या कलम 188 अन्वये शपथ घेणे आवश्यक असते. अधिवेशन चालू असेल तेव्हा सभागृहात बैठकीच्या सुरुवातीलाच शपथ दिली जाते व इतर वेळी मा. सभापती यांच्या दालनात शपथ दिली जाते.
- सर्वसाधारणपणे मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतून किंवा आपल्या मातृभाषेतून सदस्य शपथ घेतात किंवा गंभीरपणे प्रतिज्ञा करतात.

### ⁕ सभागृहाची अधिवेशने :

- वर्षातून सर्वसाधारणपणे तीन अधिवेशने होतात. ती पुढीलप्रमाणे :

1) पहिले अधिवेशन : अर्थसंकल्पिय अधिवेशन : मार्च-एप्रिल दरम्यान
2) दुसरे अधिवेशन : पावसाळी अधिवेशन : जुलै-ऑगस्ट दरम्यान
3) तिसरे अधिवेशन : हिवाळी अधिवेशन : नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान

- संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात यावा म्हणून झालेल्या नागपूर करारातील तरतुदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी घेतलेल्या निर्णयानुसार दोन्ही सभागृहांचे एक अधिवेशन दरवर्षी नागपूर येथे घेण्यात येते व सर्वसाधारणपणे हे हिवाळी अधिवेशन असते.

Dilip Sir's STEP UP Academy

- अधिवेशनाची तारीख आगाऊ घोषित करण्याची वैशिष्ट्यपूर्ण प्रथा आपल्या राज्यात सुरू झाली असून त्याप्रमाणे अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पुढील अधिवेशनाची तारीख जाहीर करण्यात येते.

### ❊ गणपूर्ती (कोरम) :

- सभागृहाच्या नियमावलीप्रमाणे विधानपरिषदेसाठी **कमीत कमी दहा** एवढी सदस्यसंख्या गणपूर्तीसाठी आवश्यक आहे.

### ❊ राज्यपालांचे अभिभाषण :

- संविधानाच्या तरतुदीनुसार प्रत्येक वेळी नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतरच्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरूवातीस विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांना उद्देशून राज्यपालांचे अभिभाषण होते.
- या अभिभाषणात राज्यपाल महोदय अधिवेशन बोलविण्याची कारणे आणि पुढील वर्षभरात शासनाकडून हाती घेण्यात येणारे कार्यक्रम यासंबंधीचा आढावा सदस्यांसमोर ठेवतात.

### ❊ अस्थायी सभापतींची नेमणूक :

- जेव्हा विधानपरिषदेतील सभापती व उप सभापती ही दोन्हीही पदे रिक्त असतात तेव्हा विधानपरिषदेच्या सभापतीची निवडणूक होईपर्यंत त्या पदाची कर्तव्ये पार पाडण्याकरिता संविधानाच्या अनुच्छेद 184 नुसार राज्यपालांकडून विधानपरिषदेतील ज्येष्ठ अशा सदस्यांची अस्थायी सभापती म्हणून नेमणूक करण्यात येते. हंगामी सभापतींना राज्यपालांकडून शपथ देण्यात येते.

### ❊ सभापती/उपसभापती यांची निवडणूक

- सभापतींचे पद रिक्त असेल अथवा रिक्त होण्याच्या बेतात असेल तेव्हा राज्यपाल सभापतींची निवडणूक घेण्याकरिता निवडणूकीची तारीख ठरवतात व त्याची सूचना सर्व सदस्यांना देण्यात येते.

### ❊ लक्षवेधी सूचना :

- तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे संबंधित मंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी जी सूचना दिली जाते तिला लक्षवेधी सूचना म्हणतात. सूचनेत उल्लेखिलेली घटना कधी घडली त्या तारखेचा उल्लेख करणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा सूचनेची तातडी ठरविणे अवघड जाते व त्यामुळे सूचना स्वीकृत करता येत नाही.

### ❊ अल्पकालीन चर्चा :

- निकडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या एखाद्या बाबीवर चर्चा उपस्थित करण्याची इच्छा असलेल्या सदस्यास नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना देता येते. अशा प्रकारच्या सूचना अधिवेशन सुरू होण्यापूर्वी तीन दिवसांपेक्षा अगोदर नव्हे अशा बेताने द्यावयाच्या असतात. तीन दिवसांपूर्वी आलेल्या सूचना विचारात घेतल्या जात नाहीत. ही सूचना देतेवेळी ज्या बाबींवर चर्चा उपस्थित करावयाची आहे ती बाब, तसेच सदस्यांच्या त्या सूचनेच्या पुष्टर्थ सह्या घेतलेल्या असाव्यात.
- सूचना मान्य झाल्यानंतर ती बाब विधानपरिषदेत लवकर उपस्थित करता येईल इतकी निकडीची व पुरेशी महत्त्वाची आहे अशी सभापतींची खात्री झाल्यानंतर सभागृहाच्या नेत्यांशी विचारविनिमय करून सूचनेच्या चर्चेसाठी तारीख ठरविण्यात येते. या सूचनेवर जास्तीत जास्त तीन तास चर्चा होते. त्यावेळी सूचना देणारे सदस्य थोडक्यात आपले भाषण करतात. त्यानंतर संबंधित मंत्री त्यास संक्षिप्त उत्तर देतात. इतर सदस्यांनादेखील सभापतीच्या पूर्वपरवानगीने चर्चेत भाग घेता येतो. यावर मतदान होत नाही.

### ❊ शासकीय ठराव :

- शासकीय ठरावाची सूचना म. वि. प. नियम 106 अन्वये मंत्री किंवा महाअधिवक्ता यांच्यामार्फत देण्यात येते. सदर सूचना सात दिवस आधी देणे आवश्यक असते. शासकीय ठरावाची सूचना प्राप्त झाल्यानंतर कोणत्या दिवशी सूचना सभागृहात चर्चेला घ्यावयाची याबाबतचा निर्णय घेण्यासाठी सदर बाब कामकाज सल्लागार समितीपुढे ठेवण्यात येते. समितीने वेळ दिल्यास त्याप्रमाणे चर्चा घेण्यात येते. सर्वसाधारणपणे शासकीय ठराव एकमताने संमत करण्यात येतात परंतु एखाद्या वेळेस मतदान घ्यावे लागल्यास मतदान घेण्यात येते व त्यानुसार ठराव संमत/असंमत झाल्याबाबत संबंधित विभागाला कळविण्यात येते.

### ❊ अशासकीय कामकाज (ठराव व विधेयके) :

- विधानपरिषदेचा प्रत्येक सदस्य, की जो मंत्री नाही त्याला, अशासकीय सदस्य म्हणून संबोधले जाते. अशासकीय सदस्यांचे कामकाज म्हणजे अशासकीय सदस्यांकडून ज्या बद्दल सूचना दिली असेल ते कामकाज परंतु यात ज्यांच्या चर्चेसाठी विधानपरिषद नियमान्वये विशिष्ट तरतुदी अस्तित्वात असतील असे सांविधानिक प्रस्ताव आणि इतर प्रस्ताव किंवा सूचना यांचा समावेश नसतो.

- विधानपरिषद नियमातील नियम 12 अन्वये **दर शुक्रवारी सभागृहाच्या बैठकीचे शेवटचे अडीच तास** अशासकीय कामकाजासाठी नेमून दिले जातात. हा वेळ आळीपाळीने अशासकीय ठराव आणि अशासकीय विधेयके यांना देण्यात येतो. सभागृहाच्या नेत्यांच्या संमतीने शुक्रवार व्यतिरिक्त अन्य दिवस अशासकीय कामकाजासाठी नेमून देण्याचा अधिकार सभापतींना आहे, तसेच ज्या शुक्रवारी बैठक नसेल त्या आठवड्यातील इतर कोणत्याही दिवशी अशासकीय कामकाज घेण्याचा निदेश सभापती देऊ शकतात.

**※ अशासकीय ठराव :**

- म. वि. प. नियम 102 अन्वये ठरावावरील चर्चेसाठी जी तारीख नेमून दिलेली असेल त्या तारखेपूर्वी 15 दिवस आधी ठराव मांडू इच्छिणाऱ्या सदस्यांनी त्यांच्या ठरावातील सूचना घ्यावयाची असते. कोणत्याही सदस्याला एका अधिवेशनासाठी जास्तीत जास्त पाचच ठरावाच्या सूचना देता येतात. परंतु त्यांनी दिलेल्या ठरावापैकी काही ठराव सभापतींनी अमान्य केल्यास त्याऐवजी ते दुसरे ठराव देऊ शकतात.

**※ शासकीय विधेयके :**

- विधिमंडळाच्या कामकाजापैकी विधिविषयक कामकाज हे प्रमुख काम समजले जाते. कोणत्याही कायदा अंमलात येण्यापूर्वी तो विधेयकाच्या स्वरूपात सभागृहात येणे जरूरीचे असते. विधेयक दोन्ही सभागृहांनी संमत केल्यानंतरच यथास्थिती राज्यपाल किंवा राष्ट्रपती त्यावर शिक्कामोर्तब करतात व त्याचे कायद्यात रुपांतर होते. संविधानाच्या अनुच्छेद 246 अन्वये संसद किंवा राज्य विधानमंडळाने संमत करावयाच्या अधिनियमाच्या विषयाबाबत परिसीमा स्पष्ट केलेल्या आहेत. संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची-1 (संघसूची) मधील विषयासंबंधी फक्त संसद कायदा करू शकते. सूची-2 (राज्यसूची) मधील विषयासंबंधी राज्य विधानमंडळ कायदा करू शकते. तर सूची-3 (समवर्तीसूची) मधील विषयाबाबत संसद व राज्य विधानमंडळे कायदे करू शकतात.

- **विधेयकाचे शासकीय व अशासकीय असे दोन प्रकार असतात :**

- शासनातर्फे पुरस्कृत केलेले ते शासकीय व दुसऱ्या कोणत्याही सदस्याने पुरस्कृत केलेले ते अशासकीय होय.
- अशासकीय विधेयकासाठी 15 दिवसांची सूचना आवश्यक असते.
- अशासकीय विधेयकाचा मसुदा तयार करण्याच्या बाबतीत विधानमंडळ सचिवालयाच्या संबंधित शाखेद्वारे आवश्यक ते मार्गदर्शन केले जाते.
- मात्र सदस्साने विधेयकाची सूचना देताना विधेयकाचा मसुदा तसेच उद्देश व कारणे यांचे निवेदन संक्षिप्त स्वरूपात दिले पाहिजे.

  विधेयकाचे (1) सर्वसाधारण विधेयक, (2) धनविषयक विधेयक (मनी बिल), (3) वित्तविषयक विधेयक (फायनान्शियल बिल) असे प्रकार असतात.
- धनविषयक विधेयकात संविधानाच्या अनुच्छेद 199(1) अन्वये कर लादण्याचे किंवा कर कमी करण्याची तरतूद असेल किंवा एखादे कर्ज काढण्याबद्दल हमी घेण्याची तरतूद असेल.
- प्रत्येक विधेयकाचे तीनदा वाचन होते. प्रथम वाचनाच्या वेळी विधेयक पुर्नस्थापित करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात येतो. विधेयक मांडल्यानंतर ते उद्देश व कारणे यांच्या निवेदनासह शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येते.

**※ अर्थसंकल्प, रचना आणि चर्चा, इत्यादी :**

- विधानमंडळाने मान्यता दिल्याशिवाय शासनाला एक पैसाही खर्च करता येत नाही. या तत्त्वानुसार आगामी 'आर्थिक वर्षात' शासनाला सर्व मार्गांनी आणि साधनांद्वारे उपलब्ध होणारे उत्पन्न तसेच हे उत्पन्न शासन कोणकोणत्या बाबींवर खर्च करणार आहे याचे एक विवरण शासन दरवर्षी तयार करते आणि शासनाच्या विविध खात्यांनी केलेल्या पैशांच्या मागण्यांना विधानमंडळाची मान्यता मिळावी यासाठी ते विधानमंडळासमोर सादर करीत असते.
- भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 202 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे या विवरणास ''अंदाजपत्रक'', ''वार्षिक आर्थिक विवरण'' किंवा ''अर्थसंकल्प'' असे म्हटले जाते. एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपासून दुसऱ्या वर्षाच्या मार्च महिन्याच्या एकतीस तारखेपर्यंतचा कालावधी 'आर्थिक वर्ष' म्हणून ठरविण्यात आला आहे.
- एका ''आर्थिक वर्षात'' होणार असलेला खर्च त्याच्या आधीचे वर्ष संपण्यापूर्वी, पूर्णपणे किंवा अंशतः विधानमंडळाकडून मंजूर करून घ्यावा लागतो.

- याचाच अर्थ असा की आगामी आर्थिक वर्षात खर्च करण्यासाठी लागणाऱ्या रकमा, त्याच्या मागील वर्षाच्या मार्च महिन्याच्या एकतीस तारखेपूर्वी मंजूर करून घ्याव्या लागतात व याच दृष्टीने, एकतीस मार्चपूर्वी राज्याचा ''अर्थसंकल्प'' आणि ''विनियोजन विधेयक'' "Appropriation Bill" यांना विधानमंडळाची मान्यता मिळणे अत्यावश्यक असते.

- शासनाचे हिशेब खाली दिलेल्या तीन प्रमुख भागात ठेवले जातात :

1) राज्याचा एकत्रित निधी (Consolidated Fund) : 266 (1)
2) राज्याचा आकस्मिकता निधी (Contingency Fund) : 267
3) राज्याचा लोकलेखा (Public Accounts) : 266 (2)

### ❊ एकत्रित निधी :

- एखाद्या वर्षासाठी असलेले शासनाचे नेहमीचे महसुली उत्पन्न, बँका आणि केंद्र शासनाकडून मिळालेली कर्जे तसेच स्वतः शासनाने खुल्या बाजारपेठेत उभारलेली कर्जे व शासनाने आधी मंजूर केलेल्या कर्जाच्या परतफेडी म्हणून आलेल्या रकमा व शासनाकडे आगाऊ म्हणून भरलेल्या रकमा, या सर्वांचा मिळून राज्याचा 'एकत्रित निधी' बनतो. या उत्पन्नातून देण्यात येणाऱ्या रकमा या भागाच्या विरतण बाजूस दाखविण्यात येतात.
- या विभागावर विधानमंडळाचे संपूर्ण नियंत्रण असते.
- 'एकत्रित निधी'चे खालीलप्रमाणे भाग पाडतात :
  अ) महसुली भाग ब) भांडवली भाग क) कर्ज भाग

### ❊ महसुली भाग :

- शासनाला एका वर्षात अनेकविध करांच्याद्वारे मिळणारे अंदाजे उत्पन्न, लाभांश (डिव्हिडंड), शासकीय निधी गुंतविल्यामुळे त्यापासून मिळणारे व्याज, केंद्र शासनाकडून मिळणारी अनुदाने आणि फी, दंड इत्यादी बाबींद्वारा मिहणाऱ्या उत्पन्नाला महसुली उत्पन्न म्हणतात.
- शासनाचा महसुली खर्च म्हणजे विविध खाती चालविण्यासाठी लागणारा खर्च, तसेच शासनाने कर्जाऊ घेतलेल्या रकमांवरील व्याज व कर्ज-खर्च आणि शासनाच्या इतर अनेकविध कामांवरील खर्च इत्यादी बाबी मिळून होत असतो.
- महसुली खर्चापेक्षा महसुली उत्पन्न अधिक असल्यास, या अधिक असलेल्या रकमेस 'महसुली शिल्लक' म्हणून समजले जाते तर महसुली उत्पन्नापेक्षा महसुली खर्च अधिक असल्यास, ती 'महसुली तूट' म्हणून समजली जाते.

### ❊ भांडवली भाग :

- ज्या स्वरूपाच्या खर्चातून राज्याच्या स्थावर मालमत्तेत भर पडते, किंवा ज्या बाबीवर आता खर्च केला परंतु त्या बाबीकडून मिळणारा फायदा काही कालावधीनंतर मिळणार असतो अशा बाबींवर केलेला खर्च 'भांडवली खर्च' म्हणता येइल. उदाहरणार्थ धरण योजनेवरील खर्च, तसेच काही खर्चाच्या बाबी अशा असतात की, त्याच्यावर पुनः पुन्हा खर्च (Recurring Expenditure) करावा लागतो. असा पुनः पुन्हा करावा लागणारा खर्च वाचविण्यासाठी एखादी योजना आखून तिच्यावर जो खर्च केला जातो तोही या 'भांडवली भागात' घातला जातो.
- भांडवली खर्चासाठी रकमा महसूल शिल्लक, राखीव निधी, केंद्र शासनाकडून मिळालेली कर्जे आणि खुल्या बाजारपेठेत उभारलेली कर्जे यामधून देण्यात येतात.

### ❊ कर्ज भाग :

- खुल्या बाजारपेठेत उभारलेली कर्जे, केंद्र शासनाकडून, तसेच बँकांकडून मिळालेली कर्जे ह्या भागात दाखविण्यात येतात, ह्या कर्जाच्या परतफेडीच्या रकमा या भागाच्या वितरण बाजूस दाखविण्यात येतात, याचप्रमाणे राज्य शासनाकडून निरनिराळ्या कामाकरिता देण्यात येणारी कर्जे आणि आगाऊ रकमाही यात नमूद करण्यात येतात. या कर्जाची परतफेड म्हणून आलेल्या रकमा या भागात प्राप्तीच्या बाजूला दाखविण्यात येतात.

### ❊ आकस्मित निधी :

- विधानमंडळाच्या पूर्वसंमतीशिवाय राज्याच्या एकत्रित निधीतून शासनाला कोणताही खर्च करता येत नाही. भारतीय संविधानातच अशा प्रकारची तरतूद केलेली आहे. (अनुच्छेद 266(3)), परंतु दैनंदिन शासकीय व्यवहार करीत असताना असे प्रसंग येतात की, शासनाला पैसा खर्च करणे अपरिहार्य असते. विधानमंडळाची मान्यता मिळविण्यासाठी वेळ नसतो. हा खर्च प्रशासकीय कार्यक्षमतेला बाधा येऊन देता किंवा शासनाचे नुकसान होऊ न देता महत्त्वाच्या आणि तातडीच्या बाबींवरच प्रामुख्याने केला जातो.
- अशा तातडीच्या आणि महत्त्वाच्या कामाकरिता खर्च करण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 267 अन्वये 'आकस्मित निधी' उभारलेला आहे. या 'आकस्मित निधी'तून महत्त्वाच्या आणि तातडीच्या बाबींवर विधानमंडळाची मान्यता मिळेपर्यंत शासन खर्च करू शकते. हा निधी 'इम्प्रेस्ट' स्वरूपाचा असून तो राज्यपालांकडे सोपविलेला असतो. या निधीतून खर्च केलेल्या रकमांसाठी आवश्यक त्या 'पुरवणी मागण्या' (Supplementary Demands) शासन विधानमंडळासमोर मांडते आणि त्याची मान्यता मिळवते व नंतर त्या रकमाची भरपाई पुनः 'एकत्रित निधीत' करते.

Dilip Sir's STEP UP Academy

- आकस्मिकता निधीतून काढण्यात येणाऱ्या आणि निधीत परत केलेल्या रकमा, निधीविषयी असलेल्या व्यवहाराच्या तपशीलवार नियमानुसार विनियमित करण्यात येतात.

**※ महत्त्वाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांची माहिती खालीलप्रमाणे आहे :**

**वित्तविषयक विवरणपत्र :**

- **अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा :**
- अर्थसंकल्प विधानपरिषदेस सादर झाल्यानंतर सात दिवस उलटून गेल्यावर, अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या तत्त्वांच्या तसेच राज्यच्या कृषी, आर्थिक व करविषयक धोरणांच्या अनुषंगाने सर्वसाधारण चर्चा केली जाते. अशा चर्चेसाठी जास्तीत जास्त पाच दिवस नेमून देता येतात. (नियम 228) चर्चेच्या शेवटच्या दिवशी वित्त राज्यमंत्री चर्चेला उत्तर देतात व चर्चा समाप्त होते. (नियम 253)
- **पूरक मागण्या (Supplementary Demands)**
- राज्याचा अर्थसंकल्प हा भविष्यातील जमा खर्चाच्या अंदाजावर आधारित असून त्यतील तरतुदी प्रत्यक्षात पुरेशा राहतीलच असे म्हणता येत नाही. त्यामुळे एखाद्या वित्तीय वर्षात विधानमंडळाने मंजूर केलेली विनियोजने पुरेशी नसल्याचे आढळून आल्यास किंवा वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना ज्या खर्चाची कल्पना करण्यात आली नसेल असा नवीन बाबींवरील खर्च या वित्तीय वर्षात करणे आवश्यक असेल त्यावेळी शासनाने असा खर्च करण्यासाठी विधानमंडळाची संमती घेणे आवश्यक ठरते व त्यासाठी ज्या जाग्या केल्या जातात त्यांना ''पूरक'' (किंवा पुरवणी) मागण्या म्हणतात.
- अर्थसंकल्पाच्याणे पूरक मागण्याही, राज्यपाल नेमून देतील अशा दिवशी विधानपरिषदेला सादर केल्या जातात. पूरक मागण्या सभागृहाला सादर झाल्यसानंतर, तीन दिवस उलटून गेल्यावर, त्यावर सभागृहात चर्चा केली जाते. अशा चर्चेसाठी एक किंवा अधिक दिवस नेमून देण्यात येतात.
- पूरक मागण्यावरील चर्चा ही ज्या विशिष्ट बाबी मिळून ती मागणी बनलेली असेल त्या बाबींपूरतीच मर्यादित असते व त्यावेळी मूळ अनुदान किंवा त्या अनुदानामागील धोरण यावर (नियम 230(3)) चर्चा करता येत नाही.
- **लाक्षणिक अनुदानाच्या मागण्या (Token Demand)**
- ज्या मागणीस ज्या कारणासाठी अगोदरच विधानमंडळाची मंजुरी मिळालेली आहे. अशा मागणीतील काही शिल्लक रकमा नवीन कामासाठी किंवा पूर्वी ज्या कामासाठी तरतूद करण्यात आली होती त्या कामाच्या स्वरूपात बदल करण्यात येऊन त्यावर खर्च करावयाचा असेल तर त्यास विधानमंडळाची मंजुरी घेणे आवश्यक असते. तेव्हा ह्या कामासाठी जी मागणी करण्यात येते तिला लाक्षणिक अनुदान म्हणतात. याकरिता 10 रूपये रकमेची नाममात्र मागणी करण्यात येते. या मागणीला विधानमंडळाने मंजुरी दिल्यास पूनर्विनियोजन (Re-appropriation) करून रक्कम उपलब्ध करून देता येते.
- **अतिरिक्त मागण्या (Excess Demands)**
- कोणत्याही आर्थिक वर्षात विधानमंडळाने मंजूर केलेल्या मागणीपेक्षा जादा रक्कम खर्च झाली असेल तर त्या खर्चाच्या जादा रकमेस त्या वर्षाकरिता विधानमंडळाची मंजूरी घेणे आवश्यक असते. अशा मागणीस अतिरिक्त मागणी म्हणतात. विधानमंडळाच्या लोकलेखा समितीने याबाबत आवश्यक छाननी करून केलेल्या शिफारशीनुसार या मागण्या असल्याने त्यावर सहसा चर्चा होत नाही. अशा मागण्या विधानपरिषदेस सादर करण्याचा दिवस राज्यपाल नेमून देतात. अनुदानाच्या मागण्यांवर ज्याप्रकारे कार्यवाही केली जाते त्याप्रकारे या मागण्यांवरही कार्यवाही केली जाते.

## विधानमंडळ समित्या

**अ) दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समित्या :**

1) अंदाज समिती (Estimates Committee) :
- एकूण सदस्य 29 (23 विधानसभेतून + 6 विधानपरिषदेतून)
- कालावधी : 1 वर्षे

2) लोकलेखा समिती (Public Account Committee) :
- स्थापना - 1921
- एकूण सदस्य 25 (20 विधानसभेतून + 5 विधानपरिषदेतून)
- कालावधी : 2 वर्षे
- 1969 पासून याचा अध्यक्ष विरोधी पक्षाचा व्यक्ती असतो.

3) सार्वजनिक उपक्रम समिती (Public Undertaking Committee) :
- स्थापना - 1966
- एकूण सदस्य 25 (20 विधानसभेतून + 5 विधानपरिषदेतून)
- कालावधी : 1 वर्षे

4) पंचायती राज समिती :
- स्थापना - 1973
- 1981 पासून एकूण सदस्य 25 (20 विधानसभेतून + 5 विधानपरिषदेतून)
- यात 2 सदस्य अनुसूचित जाती आणि 2 सदस्य अनुसूचित जमातीतील असायला हवे.

5) रोजगार हमी योजना समिती :
- स्थापना - 1975
- एकूण सदस्य 25 (20 विधानसभेतून + 5 विधानपरिषदेतून)

6) उपविधान समिती :
- एकूण सदस्य 19 (14 विधानसभेतून + 5 विधानपरिषदेतून)

7) अनुसूचित जाती कल्याण समिती :
- एकूण सदस्य 15 (11 विधानसभेतून + 4 विधानपरिषदेतून)

8) अनुसूचित जमाती कल्याण समिती :
- एकूण सदस्य 15 (11 विधानसभेतून + 4 विधानपरिषदेतून)

9) विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती :
- एकूण सदस्य 15 (11 विधानसभेतून + 4 विधानपरिषदेतून)

10) महिलांचे व बालकांचे हक्क कल्याण समिती :
- एकूण सदस्य 15 (11 विधानसभेतून + 4 विधानपरिषदेतून)
- विधानसभेतून यामध्ये 6 महिला तर विधानपरिषदेतून यामध्ये 2 महिला सदस्य असतात.

11) इतर मागासवर्गीय कल्याण समिती :
- एकूण सदस्य 15 (11 विधानसभेतून + 4 विधानपरिषदेतून)

12) मराठी भाषा समिती - स्थापना (2017)
- विधानसभा - 11 + विधान परिषद - 4 = 15 सदस्य. कार्यकाळ - 1 वर्ष

**ब) दोन्ही सभागृहाच्या स्वतंत्र समित्या :**

12) कामकाज सल्लागार समिती
13) विशेष हक्क समिती
14) विनंती अर्ज समिती
15) आश्वासन समिती
16) नियम समिती
17) सदस्य अनुपस्थिती समिती
18) अशासकीय विधेयके व ठराव समिती

**क) अधिनियमानुसार संयुक्त समित्या :**

19) सदस्यांचे वेतन व भत्ते समिती
20) विधानमंडळाच्या माजी सदस्यांच्या निवृत्ती वेतनाची नियम समिती

**ड) तदर्थ संयुक्त समित्या (Adhoc joint committee) :**

21) ग्रंथालय समिती
22) आमदार निवास व्यवस्था
23) आहार व्यवस्था समिती

- या सर्व समित्यांवरील सदस्य पीठासीन अधिकाऱ्यांकडून विविध पक्षांच्या सभागृहातील सदस्य-संख्येच्या प्रमाणात आणि सभागृहाचे नेते व विरोधी पक्ष/गट प्रमुख यांच्याशी विचारविनिमय करून नामनियुक्त करण्यात येतात व त्यांची **मुदत सर्वसाधारणपणे एक वर्षाची किंवा नवीन समिती अस्तित्वात येईपर्यंत असते.**

**✻ कामकाज सल्लागार समिती :**

- विधानपरिषदेतील कामकाजाचे वेळापत्रक ठरविणे हे या समितीचे काम आहे. या समितीत एकूण 9 सदस्य असतात. माननीय सभापती समिती प्रमुख असतात. तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, संसदीय कार्य मंत्री आणि विरोधी पक्षातील पक्ष प्रमुखांचा या समितीत अंतर्भाव असतो. (नियम 195 ते 200)

**✻ अशासकीय विधेयके व ठराव समिती :**

- महाराष्ट्र विधानपरिषद नियम 201 (1) अन्वये दरवर्षी विधानपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनास प्रारंभ झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर मा. सभापती अशासकीय विधेयके व ठराव समिती गठित करतात. समितीत एकूण सात सदस्य असतात व मा. उप सभापती हे या समितीचे समिती प्रमुख असतात. समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतात.

✻✻✻

Dilip Sir's STEP UP Academy

## केंद्रशासित प्रदेश (Centrally Administered Territories)

**भाग 8 –कलम 239–241**

* **घटनेतील कलम 1 नुसार :** भारतीय राजकीय प्रदेशात समाविष्ट होणारी क्षेत्रे : i) राज्यांची भूक्षेत्रे ii) संघराज्य प्रदेश iii) भारत सरकारने भविष्यात संपादीत केलेले प्रदेश
- कलम 239 : केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासन
- कलम 239 A : काही संघराज्य प्रदेशात स्थानिक विधीमंडळ किंवा मंत्रीमंडळ किंवा दोघांची निर्मिती
- कलम 239 AA : दिल्लीच्या संदर्भात विशेष तरतूद (69 वी घटनादुरुस्ती, 1991)
- कलम 239 AB : घटनात्मक यंत्रणा अपयशी ठरल्यास (69 वी घटनादुरुस्ती, 1991)
- कलम 239 B : विधीमंडळाचे अधिवेशन चालू नसताना वटहुकूम काढण्याचा प्रशासकाचा अधिकार
- कलम 240 : काही केंद्रशासित प्रदेशांच्या बाबतीत नियम करण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार
- कलम 241 : संघराज्य प्रदेशांसाठी उच्च न्यायालयांची तरतूद.

| सध्याचे केंद्रशासित प्रदेश | स्थापना वर्ष |
|---|---|
| 1) अंदमान – निकोबार बेटे | 1956 |
| 2) दिल्ली | 1956 |
| 3) लक्षद्वीप | 1956 |
| 4) दादरा आणि नगर–हवेली व | 1961 |
| दमण–दीव फक्त 2020 | 1962 |
| 5) पुदुच्चेरी | 1962 |
| 6) चंडिगढ | 1966 |
| 7) जम्मू व काश्मीर | 2019 |
| 8) लडाख | 2019 |

- लॅकॅदीव, मिनिकॉय व अमिनादिवी बेटे ही 1973 सालापासून लक्षद्वीप नावाने ओळखली जातात.
- 1992 साली दिल्लीला राष्ट्रीय राजधानी क्षेत्र (National Capital Region - NCR) चा दर्जा देण्यात आला.
- 2006 साली पाँडेचेरीचे नाव बदलून पुदुच्चेरी असे ठेवले गेले.
- 2020 – दमण दीव व दादारा–नगर हवेली फक्त

- **केंद्रशासित प्रदेशांची निर्मितीची कारणे :**

1) राजकीय व प्रशासकीय कारणे : दिल्ली व चंडिगढ
2) सांस्कृतिक वेगळेपण : पुदुच्चेरी, दादरा आणि नगर हवेली – दमण आणि दीव
3) भौगोलिक (ठिकाण) महत्त्व : अंदमान–निकोबार बेटे, लक्षद्वीप

**दृष्टिक्षेपात संघराज्य प्रदेशांची प्रशासकीय व्यवस्था**

| क्र. | संघराज्य प्रदेश | प्रशासक | विधी मंडळ | न्याय व्यवस्था |
|---|---|---|---|---|
| 1. | अंदमान आणि निकोबार बेटे | नायब राज्यपाल | – | कलकत्ता उच्च न्यायालयांतर्गत |
| 2. | चंडिगढ | प्रशासक | – | पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयांतर्गत |
| 3. | दादरा आणि नगर–हवेली | प्रशासक | – | मुंबई उच्च न्यायालयांतर्गत |
| | दमण आणि दीव | प्रशासक | – | मुंबई उच्च न्यायालयांतर्गत |
| 4. | दिल्ली | 1) नायब राज्यपाल 2) मुख्यमंत्री 3) मंत्रिमंडळ | विधान सभा (सदस्य–70) | **स्वतंत्र उच्च न्यायालय** |
| 5. | लक्षद्वीप | प्रशासक | – | केरळ उच्च न्यायालयांतर्गत |
| 6. | पुदुच्चेरी | 1) नायब राज्यपाल 2) मुख्यमंत्री 3) मंत्रिमंडळ | विधान सभा (सदस्य–30) | मद्रास उच्च न्यायालय |
| 7. | जम्मू–काश्मीर | 1) नायब राज्यपाल 2) मुख्यमंत्री 3) मंत्रीमंडळ | विधान सभा 90 सदस्य | जम्मू व काश्मीर न्यायालय न्यायालय |
| 8. | लडाख | प्रशासक | | न्यायालय |

- पंजाबचा राज्यपाल हा चंडिगढचाही प्रशासक असतो. दादरा व नगर–हवेलीचा प्रशासक हा दमण आणि दीवचाही प्रशासक असतो. लक्षद्विपला वेगळा प्रशासक असतो.
- जम्मू व काश्मीर आणि लडाख यांचा एकच प्रशासक असतो.
- केंद्रशासित प्रदेशांचा विचार करता फक्त पुदुच्चेरी (1963

Dilip Sir's STEP UP Academy

पासून) आणि दिल्ली (1992 पासून) या ठिकाणी विधानसभा आणि मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळ कार्यरत आहे.

- जरी येथे विधानसभा कार्यरत असली तर त्या प्रदेशावर राष्ट्रपती तसेच संसद यांचे नियंत्रण कमी होत नाही.
- केंद्रशासित प्रदेशांसाठी संसद तिन्ही सूचींवर कायदा करू शकते.
- पुदुच्चेरी विधानसभा : राज्यसूची व समवर्ती सूचीवर कायदा करू शकते.
- जम्मू व काश्मीर आणि दिल्ली विधानसभा : राज्यसूची (सार्व. सुव्यवस्था, पोलीस आणि भूमी इ. विषय वगळून व समर्ती सूचींवर कायदा करू शकते.)

## घटनात्मक तरतूदी

### ※ कलम 239 : केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन

- राष्ट्रपतींनी नियुक्त केलेल्या प्रशासकामार्फत केले जाईल.

1) जम्मू व काश्मीर, दिल्ली, पुदुच्चेरी आणि अंदमान-निकोबार बेटे येथील प्रशासक हे नायब राज्यपाल (Lieutenant Governor) या नावाने ओळखले जातील.
2) लडाख, चंदीगड, दादरा व नगर हवेली, दमण व दीव आणि लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासकांना प्रशासक (Administrator) म्हणून ओळखले जाईल.

- राष्ट्रपती एखाद्या राज्याच्या राज्यपालाची नेमणूक लगतच्या कें. प्र. चा प्रशासक म्हणून करू शकतात. अशा वेळी प्रशासक म्हणून काम करणारा राज्यपाल स्वतंत्रपणे काम करेल.

  उदा. सध्या पंजाबचे राज्यपाल हे चंदीगढचे प्रशासक म्हणून काम करतात.
- राष्ट्रपती एका केंद्रशासित प्रदेशाच्या प्रशासकाची नेमणूक दुसऱ्या कें. प्र. च्या प्रशासकपदावर करू शकतात.

  उदा. दादरा व नगरहवेलीचे प्रशासक हे दमण व दीवचे प्रशासक म्हणून कार्य करतात.

### ※ कलम 239A : काही कें. प्र. मध्ये स्थानिक विधिमंडळाची किंवा मंत्रीमंडळाची किंवा दोघांची निर्मिती (14 वी घटनादुरुस्ती)

- या द्वारे कें. प्र. साठी विधानसभा व मंत्रीमंडळ असण्याची तरतूद करण्यात आली.
- त्यासाठी कें. प्र. चे शासन कायदा 1963' संमत करण्यात आला आणि पुदुच्चेरीसाठी निर्वाचित विधानसभा व मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळ अशी तरतूद करण्यात आली.
- पुदुच्चेरीतील विधानसभेत 30 सदस्य आहेत.

### ※ कलम 239 AA : दिल्लीच्या संदर्भात विशेष तरतूदी (69 वी घटनादुरूस्ती, 1991)

- या घटनादुरुस्तीने दिल्लीस 'दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र (National Capital Territory of Delhi) असे नाव देण्यात आले.

### ※ कलम 239 AB : घटनातमक यंत्रणा अपयशी ठरल्यास

- जर दिल्लीचे प्रशासन कलम 239 AA मधील तरतुदीनुसार चालविण्यास अशक्य झाले आहे, अशी राष्ट्रपतींची खात्री पटल्यास किंवा नायब राज्यपालांकडून तसा अहवाल आल्यास राष्ट्रपती वरील तरतुदी निलंबित करू शकतात. (ही तरतूद घटनेतील कलम 356 शी मिळतीजुळती आहे.)

### ※ कलम 239 B : विधिमंडळाचे अधिवेशन सुरू नसताना वटहुकूम काढण्याचा प्रशासकाचा अधिकार :

- पुदुच्चेरी आणि दिल्लीचे नायब राज्यपाल हे विधानसभेच्या विरामकाळात अध्यादेश काढू शकतात. यासाठी त्यांना राष्ट्रपतींकडून तसे आदेश प्राप्त होणे आवश्यक असते.

### ※ कलम 240 : काही कें.प्र. बाबत राष्ट्रपतींना नियम करण्याचा अधिकार :

- यानुसार राष्ट्रपती अंदमान व निकोबार बेटे, लक्षद्वीप, दादरा व नगर हवेली आणि दमण व दीव या केंद्रशासित प्रदेशांच्या शांतता, प्रगती आणि सुशासनासाठी नियम करतील.
- असा नियम राष्ट्रपती पुद्दुचेरीसाठी सुद्धा करू शकतात, जेव्हा येथील विधानसभा कार्यरत नसेल.
- राष्ट्रपतींनी केलेले नियमांना संसदेने केलेल्या कायद्यांचा दर्जा असतो. या नियमांद्वारे कें. प्र साठी लागू असलेल्या कायद्यांमध्ये बदल करता येतो किंवा ते रद्दही केले जाऊ शकतात.

### ※ कलम 241 : संघराज्य प्रदेशांसाठी उच्च न्यायालये :

- संसद कायद्याद्वारे के. प्र. साठी उच्च न्यायालय स्थापन करू शकते. सध्या फक्त दिल्लीसाठी स्वतंत्र उच्च न्यायालय कार्यरत

Dilip Sir's STEP UP Academy

आहे.

- संसद कें.प्र. साठी शेजारच्या राज्यातील उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र वाढवू शकते.
- पुढे के.प्र. आणि संबंधीत उच्च न्यायसालयाची यादी दिलेली आहे.

1) दादरा नगरहवेली, दमण व दीव : बॉम्बे उच्च न्यायालय
2) चंदीगड : पंजाब व हरियाणा उच्च न्यायालय
3) लक्षद्वीप : केरळ उच्च न्यायालय
4) पुदुचेरी : मद्रास उच्च न्यायालय
5) अंदमान व निकोबार बेटे : कोलकाता उच्च न्यायालय
6) जम्मू व काश्मीर : जम्मू व काश्मीर न्यायालय
7) लडाख : जम्मू व काश्मीर न्यायालय

**✻ दिल्लीबाबत विशेष तरतूद :**

- 69 व्या घटनादुरुस्तीद्वारे दिल्लीला 'राष्ट्रीय राजधानी प्रदेश' (National Capital Region) चा दर्जा देण्यात येऊन विधीमंडळ आणि मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळ स्थापण करण्याची तरतूद करण्यात आली. (त्या अगोदर दिल्लीसाठी महानगर परिषद आणि कार्यकारी परिषद कार्यरत होती.)
- कलम 239 AA आणि कलम 239 AB मध्ये दिल्लीसाठी विशेष तरतुदी नमूद आहे.

- **विधानसभा सदस्य संख्या** : 70
- या विधानसभेस राज्य सूचीतील सर्व विषयांवर (सार्व. सुव्यवस्था, पोलीस व भूमी हे विषय वगळून) तसेच समवर्ती सूचितील सर्व विषयांवर कायदे करू शकते.
- मंत्रीमंडळ : मुख्यमंत्री + 6 मंत्री (एकूण 7)
- मुख्यमंत्री व इतर मंत्री नेमणूक : राष्ट्रपती
- **पुदुच्चेरी विधानसभा :**
- एकूण सदस्य संख्या : 30 (+ 3 केंद्र सरकारद्वारे नियुक्त केलेले)
- मंत्री : 1 + 5 (एकूण 6)
- मुख्यमंत्री व इतर मंत्री नेमणूक : नायब राज्यपाल

✻✻✻

Dilip Sir's STEP UP Academy

## जम्मू आणि काश्मीर

- भाग 21, कलम 370
- कलम 370 : जम्मू आणि काश्मीर राज्याला विशेष दर्जा देण्यात आला आहे.
- 26 ऑक्टोबर 1947 रोजी जम्मू आणि काश्मीर हे संस्थान भारतात विलीन करण्यात आले. यानुसार संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि संचार हे तीन विषय भारतीय संघराज्याकडे सोपवण्यात आले.
- यानुसार राज्यातील जनता संविधान सभेद्वारा राज्याची अंतर्गत राज्यघटना ठरवील आणि भारतीय संघराज्याच्या अधिकारक्षेत्राची कक्षा व स्वरूप निश्चित करील व राज्याच्या संविधान सभेचा निर्णय होईपर्यंत भारतीय राज्यघटनेद्वारा राज्याबाबत अस्थायी व्यवस्थापन करण्यात येईल, असे भारत सरकारने वचन दिले आहे. म्हणजेच कलम 370 नुसार या राज्याशी संबंधीत तरतूदी कायमस्वरूपी नसतील.
- कलम 370 नुसार कलम 1 आणि कलम 370 हे जम्मू आणि काश्मीर राज्याला एकदमच लागू होतात, आणि इतर कलमे राज्यास लागू करण्याचे अधिकार राष्ट्रपतींना आहे.
- 1952 साली भारत सरकार आणि जम्मू-काश्मीर राज्य यांच्यात दिल्ली येथे भावी संबंधांबाबत करार करण्यात आला.
- 1954 साली जम्मू-काश्मीर संविधानसभेने विलीनीकरणास आणि दिल्ली करारास मान्यता दिली आणि त्यानंतर राष्ट्रपतीने घटना (जम्मू आणि काश्मीरसाठी लागू करणे) आदेश, 1954 जारी केला.

### याबाबत काही महत्त्वाच्या तरतूदी

1) जम्मू-काश्मीर हे भारतीय संघराज्यातील घटक राज्य आहे आणि ते घटनेच्या भाग 1 आणि परिशिष्ट 1 चा भाग आहे, परंतु त्याच्या विधिमंडळाची संमती न घेता संघराज्य त्याच्या नावात, क्षेत्रात किंवा सीमांमध्ये बदल करू शकत नाही.
2) जम्मू-काश्मीर राज्याला स्वतःची राज्यघटना आहे. त्यामुळे भाग 6 हा या राज्यास लागू होणार नाही. (तसेच परिशिष्ट 5 व 6 या राज्यास लागू नाही).
3) केंद्रसूची आणि समवर्ती सूचीतील बहुतेक विषयांवर संसद राज्यशी संबंधित कायदे करू शकते. परंतु दहशतवादी कारवाया भारताचे सार्वभौमत्व आणि क्षेत्रीय अखंडतेस आव्हान आणि राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व भारतीय राज्यघटना यांचा अवमान इ. बाबी वगळता उर्वरित अधिका राज्यविधिमंडळाकडे असतील.
   - प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेचे कायदे करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळास आहे. (म्हणजेच याबाबत संसदेने केलेला कायदा राज्यास लागू नसेल.)
4) मूलभूत अधिकारांमधील काही तरतूदी राज्यास अपवाद आहेत. या राज्यात मालमत्तेच्या मूलभूत हक्कांची हमी आजही देण्यात आली आहे. सार्वजनिक नोकऱ्या स्थायी मालमत्तेचे अधिग्रहण, पुनर्वसन, सरकारी शिष्यवृत्त्या याबाबतचे काही विशेष अधिकार राज्यांच्या स्थायी निवासी लोकांना देण्यात आले आहेत.
5) घटनेतील भाग 4 आणि भाग 4अ या राज्यास लागू नाही.
6) या राज्याच्या सहमतीशिवाय अंतर्गत अशांततेमुळे घोषित केलेली राष्ट्रीय आणीबाणी राज्यास लागू होत नाही.
7) राष्ट्रपती या राज्याबाबत आर्थिक आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार नाही.
8) राष्ट्रपतींनी दिलेल्या आदेशांचे पालन होत नसल्याबद्दल या राज्याची घटना ते निलंबीत करू शकत नाही.
9) या राज्यात घटनात्मक यंत्रणा काम करण्यास अयशस्वी ठरल्यास या राज्याच्या घटनेनुसार राज्यपाल राजवट लावली जाते. तसेच इतर तरतुदींनुसार राष्ट्रपती राजवट लावली जाऊ शकते. (1986 साली पहिल्यांदा राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली गेली)

### जम्मू-काश्मीरची राज्यघटना

- 1951 साली राज्याच्या जनतेने प्रत्यक्षपणे (प्रौढ मताधिकार तत्त्वावर) संविधान सभेतील सदस्य निवडले.
- घटनेचा स्वीकार : 17 नोव्हेंबर 1956
- घटनेची अंमलबजावणी : 26 जानेवारी 1957

● **तरतूदी :**

1) जम्मू-काश्मीर राज्य हे भारताचा एकात्मिक भाग आहे.
2) विधानसभेतील सदस्य संख्या : 111 (24 जागा या पाकिस्तानव्याप्त क्षेत्रात असणाऱ्यांसाठी रिक्त असतात).
   - सध्याची व्यवहारिक उद्देशांसाठी सदस्य : 87
   - विधानपरिषदेतील सदस्य संख्या : 36
- राज्यपाल हे विधिमंडळाचे एकात्मिक घटक आहेत.
3) उच्च न्यायालयात राज्यपालांचा कालावधी 5 वर्षे असेल.
4) उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि दोन किंवा जास्त इतर न्यायाधीश असतात. हे उच्च न्यायालय रिट आदेश फक्त मूलभूत अधिकरांबाबतच जारी करू शकते इतर अधिकारांसाठी नाही.

5) उर्दू ही राज्याची अधिकृत भाषा असेल असे घटनेत नमूद आहे.

- सध्या या राज्यास भारतीय घटनेतील कलम 356 सुद्धा लागू आहे.

**✻ काही विशेष घडामोडी :**

- 26 जून 2000 रोजी राज्यास अधिक स्वायत्तता देण्याबाबत विधानसभेने ठराव मंजूर केला.
- 14 जुलै 2000 रोजी केंद्रीय कॅबिनेटने हा ठराव अमान्य केला.
- ऑक्टोबर 2010 मध्ये केंद्र सरकारने जम्मू-काश्मीर राज्यासाठी पत्रकार दिलीप पाडगावकर यांच्या अध्यक्षतेखाली एक मध्यस्थ गट स्थापन केला.
- उद्देश : राज्यातील विविध गटांशी चर्चा करून राज्यातील समस्यांवरील राजकीय उपाययोजनांची रूपरेषा ठरवणे.
- ऑक्टोबर 2011 : अहवाल सादर.
- अहवालाचे शीर्षक : A new compact with the people of Jammu and Kashmir
  (जम्मू आणि काश्मीरच्या जनतेबरोबर नवविचार)
- 31 ऑक्टोबर 2019 रोजी
  जम्मू काश्मीर पुर्नरचना कायदा अंमलात येऊन लडाख व जम्मू-काश्मीर या दोन नवीन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती झाली.
  त्यामुळे पूर्वीची जम्मू-काश्मीर बाबत असलेली स्वतंत्र घटना रद्द करण्यात आली. तसेच कलम 370 मधील जम्मू-काश्मीर बाबत अस्थायी तरतूदी सुद्धा रद्द करण्यात आल्या. (कलम 370 पूर्णपणे रद्द करण्यात आले नाही.)

✻✻✻

Dilip Sir's STEP UP Academy

## ※ जम्मू–काश्मीर पुनर्रचना अधिनियम 2019

- 5 ऑगस्ट 2019 रोजी जम्मू–काश्मीर राज्याला विशेष दर्जा बहाल केलेला राष्ट्रपती आदेश 1954 (Presidential order 1954) किंवा संविधान आदेश (Constitution order) रद्द करण्यात आला.
- यासाठी राष्ट्रपतींनी कलम 370(1) नुसार जम्मू–काश्मीर राज्य सरकारच्या संमतीने नव्याने राष्ट्रपती आदेश 2019 जारी केला.
- त्याचबरोबर 6 ऑगस्ट 2019 रोजी राष्ट्रपतींनी कलम 370(1) आणि 370(3) नुसार काही अपवाद वगळता कलम 370 रद्द केला.

- **वरील दोन्ही तरतुदींचा एकत्रित परिणाम म्हणून पुढील बदल घडले :**

1) 6 ऑगस्ट 2019 रोजी काढलेल्या आदेशाद्वारे काही अपवाद वगळता कलम 370 मधील सर्व उपकलम रद्द करण्यात आले. यामुळे जम्मू–काश्मीर राज्यास देण्यात आलेला विशेष राज्याचा दर्जा रद्द करण्यात आला. त्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या सर्व तरतुदजम्मू–काश्मीर राज्यास लागू झाल्या.
2) जम्मू–काश्मीर राज्याचे संविधान रद्द झाल्याने या राज्यातील सर्व नागरिकांना फक्त भारताचे नागरिकत्व (एकेरी नागरिकत्व) लागू असेल.

- **जम्मू–काश्मीर पुनर्रचना विधेयक 2019**

- 5 ऑगस्ट 2019 : राज्यसभेची मंजूरी
- 6 ऑगस्ट 2019 : लोकसभेची मंजूरी
- 3 ऑगस्ट 2019 : राष्ट्रपतीची सही (कायद्यात रूपांतर)
- 31 ऑक्टोबर 2019 : कायद्याचा अंमल

- **यातील प्रमुख तरतुदी :**

1) जम्मू–काश्मीर राज्याचे विभाजन करून लडाख आणि जम्मू–काश्मीर हे दोन केंद्रशासित प्रदेश तयार करण्यात आले.
2) यामुळे राज्यांची संख्या 28 तर केंद्रशासित प्रदेशांची संख्या 9 होईल.
3) लडाख या केंद्रशासित प्रदेशात कारगील आणि लेह हे दोन जिल्हे समाविष्ट केले तर उर्वरीत भाग जम्मू–काश्मीर या केंद्रशासित प्रदेशात समाविष्ट करण्यात आला.
4) दोन्ही केंद्रशासित प्रदेशाचे प्रमुख नायब राज्यपाल (Lieutenant governor) या नावाने ओळखले जातील.
5) जम्मू–काश्मीर केंद्रशासित प्रदेशाला लोकसभेच्या 5 आणि राज्यसभेच्या 4 जागा मिळतील, लडाखला फक्त लोकसभेतच एका जागेवर प्रतिनिधित्व असेल.
6) राज्यघटनेतील पुदुच्चेरीला लागू असलेले कलम 239A हे जम्मू–काश्मीरला सुद्धा लागू असेल.
7) जम्मू–काश्मीर राज्यासाठी स्वतःची 107 सदस्यसंख्या असलेली विधानसभा असेल.

- 107 पैकी 24 जागा भविष्यात समाविष्ट होणाऱ्या काश्मीर प्रदेशासाठी रिक्त घेतल्या जातील.
- या विधान सभेचा कालावधी 5 वर्षे असेल.
- जम्मू–काश्मीर आणि लडाख या दोन केंद्रशासित प्रदेशासाठी एक सामाईक उच्च न्यायालय कार्यरत असेल.



Dilip Sir's STEP UP Academy

# 3.2 राज्य प्रशासन (State Administration)

## राज्य सचिवालय (State Secretariate)

### ❊ अर्थ :

- प्रत्येक राज्याचे सचिवालय असते. हे राज्य प्रशासनाचे मुख्य केंद्र असते. यामध्ये राज्य सरकारचे अनेक विभाग असतात. या विभागांच्या प्रमुखपदी राजकीयदृष्ट्या मंत्री असतात तर प्रशासकीयदृष्ट्या सचिव असतात.
- मुख्य सचिव (Chief secretary) हा पूर्ण राज्य सचिवालयाचा प्रमुख असतो तर सचिव हा एक-दोन विभागाचा प्रमुख असतो. सामान्यतः सचिव भारतीय प्रशासनिक सेवा (IAS) चा वरिष्ठ अधिकारी असतो (सामान्यज्ञ). या नियमाला अपवाद आहे सार्वजनिक बांधकाम विभागाचा. याच्या प्रमुखपदी 'मुख्य अभियंता' (विशेषज्ञ) असतो.
- सचिव हा एका संबंधित मंत्र्याचा सचिव नसून राज्य सरकारचा सचिव असतो.

### ❊ संरचना :

- सचिवालयातील विभागांची संख्या राज्या-राज्यांत वेगळी असते. साधारणपणे 15-35 विभाग असतात. बहुतेक सगळ्या राज्यांत असलेले विभाग खालीलप्रमाणे :

| सामान्य प्रशासन | गृह | वित्त | तुरुंग | महसूल |
|---|---|---|---|---|
| वन | कृषी | श्रम व रोजगार | पंचायती राज | सार्वजनिक बांधकाम |
| शिक्षण | योजना | सिंचन व ऊर्जा | कायदा | सामाजिक कल्याण |
| गृहनिर्माण | नागरी पुरवठा | परिवहन | स्थानिक शासन | प्रसिद्धी व माहिती |
| उत्पादन शुल्क व कर आकारणी | सहकार | उद्योग | आरोग्य | -- |

- साधारणपणे प्रत्येक सचिवाला एकापेक्षा जास्त विभागाचे काम दिले जाते. त्यामुळे सचिवांपेक्षा विभागांची संख्या जास्त असते.

### ❊ कर्मचारी :

- सचिवालयात ठराविक कालावधीसाठी नियुक्त केलेले अधिकारी असतात. सचिवालयातील अधिकाऱ्यांची श्रेणीबद्धता पुढीलप्रमाणे :

1) सचिव (Secretary)
2) विशेष सचिव/अतिरिक्त सचिव (Additional secretary)
3) संयुक्त सचिव (Joint secretary)
4) उपसचिव (Deputy secretary)
5) अवर सचिव (Under secretary)
6) सहायक सचिव (Assistant secretary)

### ❊ सचिवालयातील इतर कर्मचारी खालीलप्रमाणे :

1) अधीक्षक (उपविभाग प्रमुख)
2) सहायक अधीक्षक
3) उच्च श्रेणी लिपिक
4) कनिष्ठ श्रेणी लिपिक
5) लघुटंकलेखक व टंकलेखक
6) श्रमिक कामगार

### ❊ कार्ये :

- सचिवालय हे एक कर्मचारीवर्ग अभिकरण आहे. आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी मंत्र्याला साहाय्य करणे हे त्याचे मुख्य काम आहे. सचिवालयाची कामे खालीलप्रमाणे

1) राज्य सरकारची धोरणे व कार्यक्रम ठरविणे. (Policy making)
2) राज्य सरकारच्या धोरण व कार्यक्रमात समन्वय साधणे. (Coordination)
3) राज्याचे अंदाजपत्रक बनविणे व सार्वजनिक खर्चांवर नियंत्रण ठेवणे.
4) कायदे व नियम बनविणे.
5) धोरणे व कार्यक्रम यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या विभागांवर लक्ष ठेवणे.
6) धोरणाची कार्यवाही झाल्यावर परिणमांचे मूल्यमापन करणे.
7) केंद्र सरकार व इतर राज्य सरकारे यांच्याशी संपर्क ठेवणे.
8) संघटनात्मक कार्यक्षमतेचा विकास साधण्यासाठी उपाययोजना करणे म्हणजे संघटना/प्रक्रिया (ओ अँड एम) संदर्भात काम करणे.
9) राज्य कायदेमंडळाप्रति असलेले उत्तरदायित्व पूर्ण करण्यासाठी मंत्र्यांना साहाय्य करणे, उदाहरणार्थ : कायदेमंडळात विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे.
10) विभाग प्रमुखांची नियुक्ती करणे आणि वेतन व्यवस्थेसारखी आनुषंगिक आस्थापनात्मक कामे करणे.
11) राज्य सरकारचे 'विचार मंडळ' म्हणून काम करणे.

Dilip Sir's STEP UP Academy

12) राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठीचे मार्ग शोधणे.
13) जनतेकडून त्यांच्या तक्रारी, त्यांचे म्हणणे व दाद (अपील) स्वीकारणे व त्यांचे निराकरण करणे.
14) सेवाविषयक नियम व त्यातील दुरुस्त्यांना मान्यता देणे.

## मुख्य सचिव (Chief Secretary)

### ❊ स्थान :

- मुख्य सचिव या पदाचा उगम ब्रिटिश राजवटीत केंद्र सरकारमध्ये झाला. तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली याने 1799 मध्ये हे पद निर्माण केले. जी.एच.बार्लो हा पहिला मुख्य सचिव होता.
- कालांतराने हे पद केंद्र सरकारमधून नाहीसे झाले आणि स्वातंत्र्य मिळण्याच्या बऱ्याच अगोदर राज्य सरकारांनी ते स्वीकारले.
- मुख्य सचिव हा राज्य सचिवालयाचा कार्यकारी प्रमुख (Executive head of state secretariate) असतो. मुख्य सचिव हा राज्य प्रशासनाचा प्रशासकीय प्रमुख (Administrative head) असतो आणि तो प्रशासकीय श्रेणीबद्धतेत सर्वोच्च पदावर असतो.
- इतर सचिवांच्या तुलनेत त्याचे पद समानांतील पहिला यापेक्षा मोठे असते. वस्तुतः तो सगळ्या सचिवांचा प्रमुख असतो आणि सर्व सचिवालय विभाग त्याच्या अधिकारक्षेत्रात येतात.
- तो संपूर्ण राज्य-प्रशासनाचे नेतृत्व करतो, त्यांना मार्गदर्शन करतो व त्याचे नियंत्रण करतो. त्याचे पद महत्त्वाचे असते आणि तो राज्याच्या प्रशासनिक व्यवस्थेमध्ये विविध भूमिका बजावितो.
- सन 1973 पासून मुख्य सचिव हा सर्व राज्यात सर्वांत वरिष्ठ नागरी प्रशासक असतो. त्यापूर्वी तो पंजाबमधील आर्थिक आयुक्त व उत्तर प्रदेशमधील महसूल मंडळाच्या सदस्यांपेक्षा कनिष्ठ समजला जात असे; तामिळनाडूध्मये तो सर्वांत वरिष्ठ नागरी प्रशासक असे. तथापि, 1973 मध्ये भारतीय प्रशासनिक सुधारणा आयोगाच्या शिफारशीनुसार हे पद प्रमाणित करण्यात आले व ते आता दर्जा व वेतनात भारत सरकारच्या सचिवासमान आहे.
- भारतीय प्रशासनिक सेवे (आयएएस) च्या राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यातून मुख्यमंत्री मुख्य सचिवाची निवड करतो. यासाठी सामान्यतः मुख्यमंत्री तीन निकष लावतात.
  1) अधिकाऱ्याची ज्येष्ठता 2) सेवा नोंद, सेवेतील कामगिरी व गुण 3) त्याला त्या अधिकाऱ्याविषयी वाटणारा विश्वास.
- पदाचा कालावधी : या पदासाठी ठराविक कालावधी नाही.

### ❊ अधिकार व कार्ये :

- राज्य सरकारने बनविलेल्या कामकाजाच्या नियमामध्ये मुख्य सचिवाचे अधिकार व कार्ये दिलेली असतात. त्याचे काही अधिकार व त्याची काही कार्ये प्रथेनुसार असतात. त्याचे अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे :

### ❊ मुख्यमंत्र्याचा सल्लागार :

- मुख्य सचिव हा राज्य प्रशासनाच्या सर्व मुद्यांसाठी मुख्यमंत्र्याचा प्रधान सल्लागार असतो. मुख्यमंत्री राज्याच्या शासनाबाबत सर्व धोरणात्मक बाबींवर मुख्य सचिवाशी सल्लामसलत करतो. राज्यातील मंत्र्यांनी पाठविलेल्या प्रस्तावाचा प्रशासनिकदृष्ट्या काय परिणाम होईल हे तो मुख्यमंत्र्याना विशद करतो. तसेच मुख्यमंत्री व राज्य सरकारमधील इतर सचिव यांच्यातील तो दुवा असतो.

### ❊ मंत्रिमंडळाचा सचिव :

- मुख्य सचिव हा राज्य मंत्रिमंडळाचा सचिव म्हणून काम करतो. तो मंत्रिमंडळ सचिवालयाचा प्रशासनिक प्रमुख असतो आणि मंत्रिमंडळाच्या व तिच्या उपसमित्याच्या बैठकींना आवश्यकतेनुसार उपस्थित राहतो. तो मंत्रिमंडळाच्या बैठकांची विषयपत्रिका बनवितो आणि बैठकांच्या नोंदी ठेवतो. अशा बैठकांमध्ये घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती कृती करतो.

### ❊ नागरी सेवेचा प्रमुख (Head of civil administration)

- तो राज्यातील नागरी सेवेचा प्रमुख असतो. राज्यातील वरिष्ठ नागरी अधिकाऱ्यांच्या नेमणुका, बदल्या व पदोन्नती हे विषय तो हाताळतो. राज्यातील नागरी अधिकाऱ्यांचे मनोधैर्य राखण्यात त्याची भूमिका महत्त्वाची असते. तो राज्यातील सर्व नागरी अधिकाऱ्यांची विवेक बुद्धी जागृत ठेवतो.

### ❊ मुख्य समन्वयक (Chief coordinator) :

- मुख्य सचिव हा राज्य प्रशासनाचा मुख्य समन्वयक असतो. तो विभागीय सचिवांच्या बैठकांचे अध्यक्षपद भूषवितो. सचिवालय स्तराच्याखाली सुसूत्रता आणण्यासाठी तो विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासनाच्या विभागप्रमुखांच्या परिषदेचे अध्यक्षपद भूषवितो.

Dilip Sir's STEP UP Academy

**✻ काही विभागांचा प्रमुख :**

– मुख्य सचिव हा काही विभागांचा प्रशासनिक प्रमुख म्हणूनही काम करतो. तथापि, या बाबत सर्व राज्यांमध्ये समानता नाही आणि त्याचे स्थान राज्या-राज्यांत निराळे आहे. बहुतेक राज्यांमध्ये सामान्य प्रशासन विभाग, कामिर्क विभाग, नियोजन विभाग, प्रशासनिक सुधारणा विभाग हे थेट मुख्य सचिवाकडे असतात. राज्य सचिवालयात सामान्य प्रशासन विभाग हा सर्वांत महत्त्वाचा असतो आणि याचा राजकीय प्रमुख स्वतः मुख्यमंत्री असतो. तो विभाग राज्य सरकारच्या सगळ्या कामकाजाच्या विविध विषयांशी संबंधित असतो.

**✻ संकटकालीन प्रशासक :**

– पूर, दुष्काळ, जातीय दंगली इत्यादी संकटकालीन प्रसंगात मुख्य सचिवाची भूमिका महत्त्वाची असते. निवारण कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचे व संस्थांचे तो नेतृत्व करतो व त्यांना मार्गदर्शन करतो.

**✻ इतर कार्ये व भूमिका :**

– मुख्य सचिव खालील कार्ये करतो व भूमिका बजावितो :

1) तो 'अवशिष्ट वारस' म्हणून कार्य करतो. म्हणजेच, इतर सचिवांच्या कार्यकक्षेत न येणारे सर्व विषयक त्याच्या अखत्यारीत येतात.
2) संबंधित राज्य ज्या विभागीय परिषदेचे सदस्य असेल त्या परिषदेचा तो आळीपाळीने सचिव असतो.
3) तो संपूर्ण राज्य सचिवालयावर लक्ष ठेवतो व त्याचे नियंत्रण करतो.
4) राज्य सरकार आणि केंद्र सरकार व इतर राज्य सरकारे यांच्यातील संदेशवहन प्रामुख्याने त्याच्यामार्फत होते.
5) कायदा व सुव्यवस्था आणि नियोजन यांच्या प्रशासनामध्ये त्याची महत्त्वाची भूमिका असते.
6) केंद्र सरकारच्या कॅबिनेट सचिवाच्या अध्यक्षतेखाली भरणाऱ्या मुख्य सचिवांच्या वार्षिक परिषदेला तो उपस्थित राहतो.
7) तो राज्य सरकारचा प्रवक्ता असतो.
8) राज्यात राष्ट्रपती राजवट असेल त्या काळात जर केंद्राने सल्लागार नेमले नसतील तर तो राज्यपालांचा मुख्य सल्लागार असतो.
9) तो राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकींना उपस्थित राहतो.
10) तो राज्य सरकारचा प्रमुख जनसंपर्क अधिकारी असतो.

**✻ मुख्य सचिव व कॅबिनेट सचिव (Chief Secretary & Cabinet Secretary) :**

– राज्य प्रशासनामध्ये मुख्य सचिवाची कार्ये आणि भूमिका इतक्या मोठ्या, वैविध्यपूर्ण आणि विस्तृत असतात की, ती कार्ये केंद्र स्तरावर कॅबिनेट सचिव, कार्मिक सचिव, गृह सचिव व वित्त सचिव करतात.

- **मुख्य सचिव व कॅबिनेट सचिव यांच्यातील समान बाबी पुढीलप्रमाणे :**

1) दोघेही त्यांच्या मुख्य कार्यकारी पदाचे प्रमुख सल्लागार असतात.
2) दोघेही त्यांच्या संबंधित प्रशासनाचे मुख्य समन्वयक असतात.
3) दोघेही त्यांच्या संबंधित मंत्रिमंडळाचे सचिव असतात.
4) दोघेही त्यांच्या संबंधित मंत्रिमंडळ सचिवालयाचे प्रशासकीय प्रमुख असतात.
5) दोन्ही पदांची सुरुवात केंद्रीय स्तरावर झाली.
6) दोघेही त्यांच्या संबंधित मंत्रिमंडळाच्या निर्णयांच्या अंमलबजावणीचे पर्यवेक्षण करतात.
7) दोघेही संबंधित नागरी सेवेचे प्रमुख असतात.

- **मुख्य सचिव व कॅबिनेट सचिव यांच्यातील फरक खालीलप्रमाणे :**

1) मुख्य सचिवाचे अधिकार व कार्ये कॅबिनेट सचिवापेक्षा खूप अधिक असतात.
2) मुख्य सचिव हा राज्य सचिवालयाचा प्रशासनिक प्रमुख असतो; पण कॅबिनेट सचिव केंद्रीय सचिवालयाचा प्रशासनिक प्रमुख नसतो.
3) मुख्य सचिव हा राज्य सचिवांचा मुख्य असतो; पण कॅबिनेट सचिव केंद्रीय सचिवांचा मुख्य नसतो. तो केवळ समानांतील पहिला (primus inter pares) असतो.
4) राज्य स्तरावर इतरांना देऊन उरलेली सर्व कामे मुख्य सचिवाची असतात; पण केंद्रीय स्तरावर कॅबिनेट सचिवाचे स्थान तसे नसते. इतरांना देऊन उरलेली कामे केंद्रीय स्तरावर पंतप्रधानाचा प्रधान सचिव करतो व तो पंतप्रधान कार्यालयाचा प्रशासनिक प्रमुख असतो.
5) राज्य सचिवालयातील काही विभाग थेट मुख्य सचिवाच्या हाताखाली असतात; पण केंद्रीय सचिवालयातील कोणतेही विभाग (अर्थात कॅबिनेट सचिवालयाचा अपवाद करून) कॅबिनेट सचिवाच्या हाताखाली नसतात.

Dilip Sir's STEP UP Academy

## संचालनालये (Directorate)

**✻ अर्थ :**

- राज्य स्तरावर मंत्री, सचिव व कार्यकारी प्रमुख हे सरकारचे तीन घटक असतात. एकत्रितपणे मंत्री आणि सचिव कार्यालयास 'सचिवालय' असे संबोधले जाते. तर कार्यकारी प्रमुखाच्या कार्यालयाला संचालनालय असे संबोधले जाते. संचालनालये राज्य सचिवालयांच्या अधीन कार्य करतात.
- सचिवालय हे एक कर्मचारीवर्ग अभिकरण; तर संचालनालय हे एक पंक्ती (Policy implementation) अभिकरण आहे. म्हणजेच सचिवालय हे धोरण बनविण्याशी (Policy making) संबंधित; तर संचालनालय हे धोरणाच्या अंमलबजावणीशी संबंधित असते.
- सचिवालयाने बनविलेल्या धोरणांची अंमलबजावणी करणे हे त्यांचे काम असते.
- त्यांना सचिवालय विभागापेक्षा निराळे असे कार्यकारी विभाग (Executive department) म्हटले जाते. काही उदाहरणे वगळता, प्रत्येक सचिवालय विभागाला एक संबंधित कार्यकारी विभाग असतो.

**✻ प्रमुख :**

- संचालनालये नेहमीच सचिवालयापेक्षा निराळी असतात. या स्वतंत्र संघटना असतात व त्यांच्या प्रमुखपदी संचालक असतो. त्याच्या साहाय्यासाठी अतिरिक्त संचालक, संयुक्त संचालक, उपसंचालक व सहायक संचालक असतात. तथापि, संचालनालयाच्या प्रमुखाला (कार्यकारी विभाग किंवा कार्यकारी संघटना) इतर विविध नावाने ओळखले जाते. उदाहरणार्थ : आयुक्त, महासंचालक, महानिरीक्षक, निबंधक, नियंत्रक, मुख्य अभियंता, मुख्य वनसंरक्षक इत्यादी. संचालनालये (कार्यकारी विभाग) व त्यांचे प्रमुख यांची सूची खाली दिली आहे.

**✻ संचालनालय व त्यांचे प्रमुख :**

| क्र. | संचालनालय किंवा कार्यकारी विभाग | प्रमुखाचे पद |
|---|---|---|
| 1) | कृषी विभाग | कृषी संचालक |
| 2) | पशुसंवर्धन विभाग | पशुसंवर्धन संचालक |
| 3) | सहकार विभाग | निबंधक, सहकारी संस्था |
| 4) | शिक्षण विभाग | शिक्षण संचालक |
| 5) | उत्पादन शुल्क विभाग | उत्पादन शुल्क आयुक्त |
| 6) | वन विभाग | मुख्य वनसंरक्षक |
| 7) | गृहनिर्माण विभाग | गृहनिर्माण आयुक्त |
| 8) | सिंचन विभाग | मुख्य अभियंता (सिंचन) |
| 9) | तुरूंग विभाग | तुरूंग महानिरीक्षक |
| 10) | श्रम विभाग | श्रम आयुक्त |
| 11) | पोलीस विभाग | विक्रीकर महासंचालक |
| 12) | विक्रीकर विभाग | विक्रीकर आयुक्त |
| 13) | छपाई व लेखनसामग्री विभाग | छपाई व लेखनसामग्री नियंत्रक |
| 14) | रोजगार संचालनालय | रोजगार संचालक |
| 15) | औद्योगिक संचालनालय | औद्योगिक संचालक |

**✻ कार्ये :**

- संचालनालयाच्या प्रमुखाची कार्ये खालीलप्रमाणे :

1) मंत्र्यांना तांत्रिक सल्ला देणे.
2) विभागाचे अंदाजपत्रक बनविणे.
3) नियमानुसार अधीनस्थ अधिकाऱ्यांवर अनुशासनात्मक अधिकारांचा वापर करणे.
4) पदोन्नती व शिस्तभंगाच्या कार्यवाहीबाबत राज्य लोकसेवा आयोगाला सल्ला देणे.
5) विभागीय जिल्हा कर्मचाऱ्यांनी केलेल्या अंमलबजावणीच्या कामाची तपासणी करणे.
6) अनुदान वितरण व अंदाजपत्रक पुनर्विनियोजन करणे.
7) विहित मर्यादा आणि मान्यताप्राप्त नियम यांच्या अधीन राहून सर्व दुय्यम अधिकाऱ्यांच्या नेमणुका, स्थान निश्चितीकरण, नियुक्ती, बदल्या, पदोन्नती करणे.
8) विभागीय अधिकाऱ्यांसाठी सेवेतील प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
9) विभागाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी विभागीय संशोधन व प्रयोग कार्यक्रम करणे.
10) आंतरराज्यीय किंवा केंद्र सरकारच्या परिषदा वगळता इतर परिषदांना उपस्थित राहण्यासाठी अधिकाऱ्यांना अनुमती देणे.

Dilip Sir's STEP UP Academy